शार्लट ब्रांटी

# जेन आयर



अनुवाद

गायत्री साळवणकर

# जेन आयर

## (एक आत्मकथा)

लेखिका- शार्लट ब्रांटी

अनुवाद - सौ.गायत्री साळवणकर

ई साहित्य प्रतिष्ठान

# JANE EYRE: An Autobiography.

## Charlotte Brontë

# जेन आयर: एक आत्मकथा

मराठी अनुवाद **अनुवादीका: सौ.गायत्री साळवणकर**

172/ब, 'केदार,' जवाहरनगर,

कोल्हापूर, 416012,

महाराष्ट्र.

इमेल: gayatri.salvankar@gmail.com

मोबाईल क्रमांक: 8446800213

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (दंड व तुरुंगवास) होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशक- ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.com

esahity@gmail.com

Whatsapp- 9987737237 (फ़्री पुस्तकांसाठी नाव व गाव कळवा)

प्रकाशन :- २५ जून २०२४

©esahity Pratishthan®2024

या पुस्तकाच्या छापिल प्रतींसाठी आपण **सौ.गायत्री साळवणकर यांच्याशी** 8446800213 या क्रमांकावर संपर्क करावा

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.

हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

a

# अनुवादिका परिचय

## सौ. गायत्री गिरीश साळवणकर



पुर्वाश्रमीची, उज्वला दिगंबर गुहागरकर,

जन्म: 16 जानेवारी 1963

शिक्षण: BCom.

पत्ता: 172/ब, 'केदार,' जवाहरनगर, कोल्हापूर, 416012, महाराष्ट्र.

माझा हा अनुवाद करण्याचा हा पहिलाच प्रयत्न आहे. याशिवाय काही अप्रकाशित बाल कविता आहेत. दै. लोकसत्तामध्ये नियमितपणे 'लोक मानस' सदराखाली पत्रलेखन केले आहे. 6 में 2023च्या, लोकसत्ता चतुरंग पुरवणी मध्ये 'सोने चांदी आम्हा मृत्तिके समान' हा आपल्या शिक्षकांप्रती आदरभाव प्रगट करणारा लेख, तसेच 'दृष्टी आणि कोन" या सदराखाली लेख प्रसिद्ध

दिनांक 12 जून 2023 रोजी आकाशवाणी कोल्हापूर वर "माझे जीवन गाणे " या सदरात मुलाखत प्रक्षेपित

' स्वांत सुखात ' या ब्लॉगवर काही स्फुट लेखन प्रसिद्ध केले आहे

https://swantsukhay2245533.wordpress.com/

मला सकस, वैचारिक वाङ्मयाची विशेष आवड आहे.

## थोडक्यात पुस्तक परिचय

## काळाच्या कसोटीवर खरी उतरलेली, आजवरच्या सर्वात प्रसिद्ध प्रणय कादंबरींपैकी एक: 'जेन आयर' या कादंबरीवर आधारित सोळाहून अधिक इंग्रजी भाषेतील चित्रपट बनले आहेत.

जेन आयर: एक ही शार्लट ब्रांटी या ब्रिटिश लेखिकेने ‘करर बेल' या टोपणनावाने सन 1847 साली लिहिलेली इंग्रजी भाषेतील एक उत्कृष्ट कादंबरी: जी बालपणापासून तारूण्यात पदार्पण करेपर्यंत नायिकेच्या मानसिक आणि नैतिक वाढीवर लक्ष केंद्रित करते.

एकंदरीत कादंबरी काल्पनिक असली तरी नायिका 'जेन आयर' हिच्या आयुष्यात शार्लोट ब्रांटीच्या स्वतःच्या जीवनाचे प्रतिबिंब पडलेले दिसून येते.

एक साधी सरळ मुलगी, जीवनाच्या संघर्षातून लढत असताना अनेक अडथळयांची शर्यत जिद्दीने लढते आणि शेवटी कशी विजयी होते हे पाहणे अतिशय उत्कंठावर्धक आहे. बालपणी मामाच्या ममतेव्यतरिक्त इतर कुणाकडून प्रेमाचा शब्दाला वंचित झालेले निष्प्रेम बालपण, अनाथाश्रमातील एकंदरीत भीषण परिस्थिती, स्वतंत्रपणे स्वतःला सिध्द करण्यासाठी तुलनेत थोडेफार आर्थिक स्वावलंबी झाल्यानंतर स्वतःच्या प्रयत्नाने मिळवलेली एका छोट्या मुलीची खाजगी शिक्षीकेची नोकरी आणि त्यानंतरचा नव्याने जुळून येऊ लागलेल्या नात्यातील महाभयंकर गुंता, तथापि जेन तिच्या दृढनिश्चयाने, तीक्ष्ण बुद्धी आणि धैर्याने या

a

अडथळ्यांवर कशी मात करते हे पाहताना क्षणोक्षणी आपली गृहीतके चुकीची ठरतांना जाणवत राहते.

खि्रश्चन नैतिकतेच्या तीव्र भावनेची सामाजिक समीक्षा करण्याचे धाडस एका स्त्रीने जवळजवळ पावणे दोनशे वर्षांपूर्वी दाखवले आहे ते पाहून लेखिकेच्या धाडसाला दाद दिल्याशिवाय राहवत नाही. याशिवाय सामाजिक विषमता, स्त्री शिक्षण, व्हिक्टोरिया राणीच्या सुवर्णाक्षरांनी लिहल्या गेलेल्या कारकिर्दीत देखील ब्रिटनमधील बेरोजगारी, पितृसत्ताक पद्धतीचा समाजातील पगडा आणि प्रचलीत धार्मिक रुढी परंपरेचे, एका स्त्रीने केलेले परखड परिक्षण, विचारलेले प्रश्न निश्चितच आजदेखील ते धाडसाचे असून, कौतुकास पात्र आहे. याच कारणास्तव ही कादंबरी, काळाच्या बरीच पुढे असल्याचे मानली जाते.

या कादंबरीचा मराठीमध्ये अनुवाद बहुधा प्रथमच होत असावा.

a

# अर्पण पत्रिका

माझी आई, सुशीला दिगंबर गुहागरकर ( शेट्टी बाई ),
आजी, लिला नागेश शेट्टी,

ज्यांच्या स्मृती माझ्या आईने आम्हा भावंडांच्या मनावर
कायमस्वरुपी कोरून ठेवल्या आहेत त्या माझ्या पणजी,
बेळगावातील पहिल्या शिक्षिका
श्रीमती पुतळाबाई गुंडू सोनार,

आणि माझ्या सासूबाई,
मंदाकिनी शांताराम साळवणकर,

या प्रत्येकीने आपल्या आयुष्यातील लढाई धैर्याने, जिद्दीने,
स्वाभिमानाने प्रसंगी कठोरपणे होऊन सामोरे जाऊन एक आदर्श
निर्माण केला,
त्यांच्या स्मृतीस,
श्रद्धापूर्वक अर्पण

a

# मनोगत

आज 'जेन आयर' या विश्र्व विख्यात कादंबरीचा अनुवाद पूर्ण करतांना समारोपाचे काही शब्द लिहणे अपरिहार्य आहेत. ही व्यक्तिरेखा सहज माझ्या मुलीकडे गेले असता प्रथम इंग्रजी सिनेमाच्या रुपाने सामोरी आली. थोडीफार कल्पना आल्याने गुगल सर्च करताना थोडी थोडी माहितीत भर पडत गेली. त्यातून मुळ कादंबरी वाचण्याचा योग आला. डिसेंबर महिन्यात धाकट्या कन्येकडे कॅनडाला जाण्याचा योग आला. थोडीफार सवड मिळाल्याने गंमत म्हणून गुगल ट्रान्सलेटच्या सहाय्याने एक दोन प्रकरणे मराठी मध्ये अनुवादीत केली. रिकामपणाची कामगिरी हाती वेळ आणि मोबाईल असल्याने एक दोन प्रकाशन संस्थांना ई बुक म्हणून प्रसिद्ध करता येईल काय यासंदर्भात चौकशी केली.

ई साहित्य प्रतिष्ठानच्या श्रीयुत सुनीळ सामंत यांच्या प्रतिसाद उमेद वाढवणारा ठरला. वेळोवेळी इमेल वरून त्यांनी दिलेल्या प्रोत्साहनामुळे आज हे काम पुरे होत आहे त्याबद्दल श्री. सुनीळ सामंत यांचे मनापासून आभार.

या अनुवादाच्या कामात, मोबाईल सारखे आधुनिक तंत्रज्ञानाचा सिंहांचा वाटा आहे. जवळजवळ 500 पानी पुस्तक त्यावर टाईप करणे सहजशक्य झाले, शिवाय मदतीला ऑनलाइन डिक्शनरी, संदर्भासाठी वेगवेगळ्या साईट्स यांची मदत मिळाली नसती तर हे करणे शक्य झाले नसते. त्यानिमित्ताने ख्रिश्चन धर्म, इंग्रजी भाषेतील म्हणी, वाक्प्रचार, पौराणिक, ऐतिहासिक संदर्भ, मराठीतील व्याकरण या सर्वांचा ओझरता का होईना थोडाफार अभ्यास झाला.

a

माझ्यापरीने मी हे अनुवादाचे काम परिपूर्ण करण्याचा प्रयत्न केला आहे. वाचकांच्या पसंतीस पडले तर घेतलेल्या परिश्रमाचे सार्थक होईल मात्र त्यासाठी एव्हढी मोठी कादंबरी वाचायला हवी. आपल्या प्रतिक्रिया अवश्य कळवाव्यात.

आणखी एका सुहृदांचे मला इथे आभार मानायचे आहेत, ते म्हणजे माझे भारतीय आयुर्विमा महामंडळाच्या ऑफिस मधील सहकारी श्री. जयंत जोगळेकर यांचे, खरेतर त्यांचे वाचन, व्यासंग मोठा आहे त्यांना व्हा ॅट्अप वर तयार झालेले अनुवादाचे काम पाठवत होते आणि ते वाचून मनाला उभारी मिळेल असा अभिप्राय देत त्यामुळेच हा प्रकल्प पूर्ण झाला असे म्हटले तर वावगे ठरणार नाही.

मुळ कादंबरी ब्रिटीश लेखिका शार्लट ब्रांटी यांनी लिहिली आहे, त्यांच्या संदर्भात पण थोडाफार अभ्यास झाला. आज जवळजवळ पावणेदोनशे वर्षे होत आली तरी ही कादंबरी वाचकांना अजून खिळवून ठेवते. त्यांचे भाषेवरचे प्रभुत्व कमाल आहे. एकंदर मांडणी इतकी पक्की आहे की समोरची व्यक्तींकडून काय उत्तर अपेक्षित आहे त्यानुसार शब्दांची रचना केली आहे. त्यांच्या एका वाक्याचा अर्धवट भाग जर गुगल सर्चला टाकला तर भरभरून वेगवेगळया साइटवरून माहितीचा ओघ वाहतो. शिवाय वाचकांचे मंच, एखादे अवघड वाक्य अथवा संदर्भ लागला नाही तर मदतीला तयार असतात. अगदी चीन मधल्या वाचकाला अमेरिकेतील वाचक संदर्भासहित स्पष्टीकरण देतो हे पाहताना आश्र्चर्य वाटते आणि त्याचा आपल्याला सुध्दा उपयोग होतो. सरस्वतीचे उपासक पाहून मन थक्क होते.

या अनुवादाच्या निमित्ताने मला हा लाभ मिळाला आणि अजूनही इतर काही करता येईल काय याची चाचपणी मी सुरू केली आहे. पुन्हा भेटू.

धन्यवाद

# जेन आयर

## प्रकरण 1

त्यादिवशी चालणे अतिशय अवघड झाले होते. सकाळी आम्ही बराच वेळ झाडाझुडपातून भटकलो पण दुपारनंतर, हिवाळ्यातील बर्फाळ वाऱ्याने आपल्याबरोबर इतके गडद ढग आणले होते आणि पाऊस इतका भेदक मारा सुरु झाला की सहलीहून परतण्याची सर्वांना घाई झाली.

मला त्यात आनंद झाला. मला लांब चालणे कधीच आवडत नव्हते, विशेषत: थंडी मुळे माझे हात पाय गोठले होते, त्यातच बेसीच्या, माझ्या नर्सच्या, फटकारण्याने मला अतिशय दुःख झाले होते. माझी मामे भावंडे एलिझा, जॉन आणि जॉर्जियाना रीड यांच्या व माझ्या परिस्थितीतील तफावत मनाला सतत बोचत होती.

एलिझा, जॉन आणि जॉर्जियाना त्यांच्या आईसोबत लिव्हिंग रूममध्ये एकत्र होते; आगीच्या समोर सोफ्यावर आनंदात बसले होते. मामीने मला त्यांच्या गटात सामील होण्यास मनाई केली होती.

"बेसीने माझ्याबद्दल आणखी काय तक्रार केली?" मी विचारले.

जेन, मला प्रश्न विचारलेले आवडत नाहीत! शिवाय एखाद्या मुलाने त्याच्या वडीलधाऱ्याबरोबर असे वागणे चुकीचे आहे. जोपर्यंत तू समजूतदारपणे बोलू शकत नाही तोपर्यंत दुसऱ्या खोली जाऊन बस," मामीने रागाने फर्मावले.

खिन्न मनाने मी जेवणाच्या खोलीतील लायब्ररी जाऊन पुस्तके चाळू लागले.

बेविकचा ‘हिस्ट्री ऑफ द बर्ड्स ऑफ इंग्लंड’ या पुस्तकात समुद्री पक्षी, बेटे, वादळी हवामान, बर्फाचे डोंगर, गोठलेले किनारे, तीव्र थंडी यांच्या माहितीमध्ये रममाण होऊन माझ्या कल्पनाशक्तीने नवनवीन गोष्टींचा अनुभव घेतांना त्यात इतर कोणाचा व्यत्यय येईल अशी भीती मनाला चाटून गेली.

इतक्यात, “ए रडूबाई!” असा जाँनचा कर्कश आवाज कानावर आला. मी खिडकीच्या पडद्याआड वाचनात रंगून गेले होते. मी न दिसल्याने जाँन ओरडला, “भित्री भागुबाई पळून गेली!” त्याचा आरडाओरडा ऐकून एलिझा खोलीत आली.

“ती नक्कीच खिडकीच्या चौकटीत आहे!”

तिने असे म्हणताच जॉनने माझ्या लपण्याच्या ठिकाणाहून खेचले.

“ तुला काय हवे आहे?” मी विचारले.

“अगोदर समोर ये आणि मला दादासाहेब म्हणून हाक मारायची समजले का?” जाँन ओरडला.

माझी भीतीने घाबरगुंडी उडाली. जाँन माझ्यापेक्षा चार पाच वर्षांनी मोठा चौदा पंधरा वर्षांनी मोठा होता. आईच्या लाडाने पार वाया गेलेला होता. बोर्डींग स्कूलच्या शिस्तबद्ध वातावरणात कंटाळून गेल्याने आईच्या आंधळया प्रेमाने त्याला घरी आणले गेले होते. घरी मात्र नोकर मंडळीवर डाफरत सतत माझ्यामागे हात धुऊन लागला होता. टोमणे मारणे, चिडवणे प्रसंगी दंगामस्ती करून मारबडव करणे हाच त्याचा दिनक्रम असे. ना आई बहिणी बद्दल प्रेम, ना कुणाची भीती. वडिलांच्या माघारी संपूर्ण घराचा आपण मालक असल्याची भावना विषेशतः माझ्या बाबतीत जास्त तीव्रतेने उफाळून येत असे. मला सतत धमकावणे, मारणे चालू असे आणि या बद्दल मी कुठेही दाद मागू शकत नव्हते. घरातील नोकर मंडळी त्याला घाबरून असत आणि तो मला देत असलेल्या त्रासाच्या बाबतीत, खरी बाजू मामीपुढे सांगण्यास घाबरत असत. मामी आपल्या कुलदिपकाच्या प्रेमाने आंधळी

आणि बहिरी झाली होती. तिने कधीही त्याला मला मारताना पाहिले नाही, तिने कधीही त्याला माझा अपमान करताना ऐकले नाही, जरी त्याने तिच्या उपस्थितीत दोन्ही गोष्टी केल्या तरी ती त्याच्याकडे जाणून बुजून दुर्लक्ष करत असे. त्यामुळे त्याला त्यांच्या असहाय्य आश्रीत, पोरक्या आते बहिणीला त्रास देण्यात दुष्ट आनंद मिळत असे.

मी भीतीने थरथर कापत त्याच्यापुढे आले. मला वेडावून दाखवत अत्यंत मग्रुरीने जाँन माझ्याकडे पाहू लागला. आता मला कंबरेच्या पट्टयाने मारणार याची खात्री होती. मी त्याच्या संतापाने लाल झालेल्या चेहऱ्यावर एक नजर टाकली आणि माझ्या दुर्दैवाने ते त्याच्या लक्षात आले. मघाशी आईबरोबर उद्धटपणे बोलल्या बद्दल, खिडकीच्या पडद्याआड

लपल्याबद्दल आणि त्याच्या नजरेला नजर दिल्याबद्दल, त्याच्या झालेल्या अपमानामुळे त्याने माझ्यावर हात उगारला. कशीबशी धडपडत मी तोल सांभाळून उभी राहिले.

“तू पडद्यामागे काय करत होतीस?” त्याने मला विचारले.

“पुस्तक वाचत होते,” भीतभीत मी उत्तरले आणि परत खिडकीच्या आश्रयास जाण्यासाठी वळणार तोच तो माझ्या व खिडकीच्यामध्ये उभा राहिला आणि मोठ्या आवाजात भांडू लागला.

“भिक्कारडे! आमच्या पुस्तकांना हात लावायचा नाही. आमच्या घरी रहातेस, जेवणखाण कपडेलत्ते फुकटात आणि आता आमची पुस्तके पण तुला हवी आहेत? याद राख हे सर्व माझ्या मालकीचे आहे.” तेच पुस्तक मला फेकून मारण्याच्या इराद्याने त्याने रागा रागाने उचलले. मी स्वतःला वाचवण्यासाठी मागे सरले आणि तोल जाऊन शिसवी खिडकीच्या दारावर आपटले. एक तीव्र कळ डोक्यात गेली आणि सहाजिकच हात डोक्याला लागला. रक्ताने हात माखला होता.

वेदनेने आणि दु:खाने कळवळून माझ्या तोंडून नकळतपणे शब्द आला, “रानटी, दुष्ट!”

“मी दुष्ट, रानटी ?” थांब इलिझा आणि जाँर्जियानाने पण ऐकले आहे आता आईला जाऊन सांगतो भली तुझी खोड मोडायला.”

असे बोलून तो माझ्या दिशेने धावला; त्याने मला केस आणि खांद्याला पकडले. रक्ताची धार माझ्या डोक्यावरून वाहत मानेवर पडत असल्याचे मला जाणवले, माझी भीती क्रोधात बदलली होती; मी त्याला ढकलून दिले.

माझ्याकडून क्षीण प्रतिकाराची पण त्याला अपेक्षा नसल्याने तो पार वेडावून गेला.

एलिझा आणि तिची बहिण आईला शोधायला पळाल्या. परत येताना मामीसोबत बेसी, अँबोट या दोन्ही मोलकरीणी होत्या. मी रागाने त्याला ढकलल्याचे पाहाणारे चार साक्षीदार.

“अरे देवा ! काय हा राग! मिस्टर जॉनशी धक्काबुक्की?”

त्यांनी त्याला उठवले.

“तिला घेऊन जा,” मामीसाहेब तिच्यामागे येणाऱ्या मोलकरणींना म्हणाल्याचे मी ऐकले.

“तिला लाल खोलीत घेऊन जा आणि तिथे बंद करा.”

लगोलग चार हात माझ्या अंगावर आले आणि मला फरफटत ओढून नेऊ लागले.

## प्रकरण 2

लाल खोलीकडे बेसी व अँबोट मला ओढून नेऊ लागल्या. मी प्राणपणाने प्रतिकार करत होते. त्या दोघींना मला आवरणे अशक्य झाले. बंड केल्याबद्दल शिक्षा भोगावी लागणार याची मला खात्री होती. बंडखोर गुलामाप्रमाणे मी या गोष्टींला शेवटपर्यंत विरोध करण्याचा निर्धार केला होता.

“मिस अँबोट, तिचा हात धर,” बेसी म्हणाली. तशी अँबोट पण बोलू लागली, “किती लाजिरवाणी गोष्ट आहे. ही तर वेड्या मांजरीसारखी फिस्कारत आहे. अग तुझ्या आश्रयदातीच्या मुलाला मारहाण करणे हे निंदनीय आहे. जॉन साहेब इथले पुढे होणारे मालक आहेत.”

“मालक, तो कसा काय? मी काय मग नोकर आहे की काय?”

“तुम्ही तर सेवकापेक्षा कमी आहात, कारण तुम्ही स्वतः उदरनिर्वाहसाठी त्यांच्यावर अवलंबून आहात. त्याचे आश्रीत आहात. लाल खोलीत बसून आपल्या वागण्याचा विचार करा.”

त्यांनी मला मामीसाहेबांनी सूचित केलेल्या खोलीत नेले आणि खुर्चीवर फेकले. मी उडी मारून सुटका करण्याचा प्रयत्न केला पण दोघींनी मला चांगलेच दाबून धरले होते.

“तुम्ही गप्प बसला नाहीत तर तुम्हाला बांधून ठेवावे लागेल,” बेसी म्हणाली. बोलण्याप्रमाणे त्या करतील याची खात्री झाल्याने मी थोडी पड खाल्ली.

“मला बांधून ठेऊ नका घेऊ नका,” “मी पुन्हा हलणार नाही.” मी म्हणाले.

मी खरोखर आज्ञा पाळण्याचा निर्धार केला आहे याची खात्री झाल्यावर त्यानी खुर्चीला बांधून ठेवायचा बेत बदलला.

बेसीने खोलीतून बाहेर पडताना माझ्याकडे उदास नजरेने पाहिले. तिला माझ्या शिक्षेला पात्र होण्याच्या कारणाबद्दल शंका वाटत असावी.

“तिने असे यापूर्वी कधीच केले नव्हते,” बेसी अँबोटकडे वळून म्हणाली.

“ मी मात्र बाईसाहेबांच्या मताशी सहमत आहे. इतकी कृतघ्न लहान मुलगी मी कधीच पाहिली नाही,” अँबोट म्हणाली. यावर

बेसीने काही उत्तर दिले नाही; पण लवकरच माझ्याशी बोलताना ती म्हणाली:

“तुम्हाला माहित नाही जेन, तुम्ही बाईसाहेबांचे खूप ऋणी असायला हवे. त्यानी तुम्हाला घरी ठेऊन घेतले आहे. त्या तुमच्या आश्रयदात्या आहेत, जर त्यांनी तुमचा त्याग केला तर तुम्हाला अनाथाश्रमात जावे लागेल.”

या शब्दांना उत्तर देण्यासारखे माझ्याकडे काहीच नव्हते; ‘आश्रीत आणि आश्रयदाती ' हे शब्द माझ्यासाठी नवीन नव्हते, लहानपणापासून हेच शब्द माझ्या कानी पडत होते. परावलंबित्वाची जाणीव अंत:करण खोलवर दुखावून गेली.

“जेन, तुम्ही जाँन बाबा किंवा बाईसाहेबांच्या बरोबरीच्या नाही आहात. त्या दयाळूपणे तुम्हाला सांभाळायला तयार आहेत. ते त्यामुळे तुम्ही नम्रपणे त्यांच्याशी जुळवून घेऊन राहण्याचा प्रयत्न करा.”

“आम्ही तुम्हाला जे सांगतो ते तुमच्याच भल्यासाठी आहे,” बेसी हळू आवाजात बोलली. त्यांच्या उपकारांची जाणीव ठेवा. आम्ही तुम्हाला या खोलीत येथे ठेवून जात आहोत; पण जर तुम्ही जास्त दंगा केलात, तर बाईसाहेब तुम्हाला खचितच दूर पाठवतील, याची खात्री बाळगा.”

अँबोट पुढे म्हणाली, “नाहीतर देव तुम्हाला शिक्षा करेल. चुकीबद्दल पश्चात्ताप करून देवाची प्रार्थना करा नाहीतर धुरांड्याच्या चिमणी मधून दुष्ट आत्मे येऊन तुम्हाला घेऊन जातील”.  दरवाजा बंद करून दोघीही निघून गेल्या.

लाल खोली ही एक स्वतंत्र खोली होती. ती अगदी क्वचित वापरात येत असे . मोठ्या संख्येने पाहुणे कधीतरी आले, तरच कोणीतरी ही खोली वापरत. तशी ती घरातील सर्वात मोठी आणि सुंदर खोली होती. मध्यभागी एक पलंग होता, त्याच्या चार कोपऱ्यांवर महोगनीचे भव्य खांब उभे होते ज्यावर गडद लाल रंगाचे जाळीदार पडदे लटकवले होते; पडद्यानी नेहमी बंद असलेल्या दोन मोठ्या खिडक्या होत्या. वॉर्डरोब, ड्रेसिंग टेबल, खुर्च्या चांगल्या पॉलिश केलेल्या जुन्या महोगनीच्या होत्या. या गडद फर्निचरच्या मध्यभागी पलंगावर पांढऱ्या रंगात गाद्या आणि उशांचा ढीग होता. पलंगाच्या जवळ एक मोठी पांढरी खुर्ची होती आणि त्याखाली एक लहान स्टूल होते.

खोली थंड होती, तिथे शेकोटी क्वचितच पेटली जाई; लाल खोली, स्वयंपाकघर आणि नोकरांच्या खोलीपासून लांब असल्याने खोलीत नेहमी शांतता असे. खोलीत माणसांची वहिवाट कमी असल्याने वातावरण, काहीतरी गूढगंभीर प्रकारचे भासत असे. आरशांवर आणि फर्निचरवर आठवडाभरापासून साचलेली धूळ काढण्यासाठी मोलकरीण शनिवारी एकटीच येत असे. मामीसाहेब मात्र अधून मधून येऊन कपाटातील काही गुप्त ड्रॉवर्स तपासत असत, तिथे कागदपत्रे आणि त्यांची दागिन्यांची पेटी ठेवलेली असे. माझ्या स्वर्गवासी मामांची तसबीर भिंतीवर लावली होती.  एवढी सुंदर खोली असून कोणीही न जाण्यामागे एक रहस्य होते. माझ्या मामांचे नऊ वर्षांपूर्वी याच लाल खोलीत निधन झाले होते; तिथेच त्यांनी अखेरचा श्वास घेतला; तिथूनच त्याची शवपेटी काढण्यात आली होती आणि त्या दिवसापासून ह्या खोलीतील वावर बंद झाला.

a

बेसी आणि ॲबॉटने मला ज्या खुर्चीवर बसवले होते ती शेकोटीजवळ ठेवलेली होती. माझ्यासमोर पलंग होता, उजवीकडे मोठा वॉर्डरोब; डावीकडे दोन बंद खिडक्याच्या मध्ये एक मोठा आरसा होता त्यामध्ये खोलीचे आणि पलंगाचे वैभव प्रतिबिंबित होत असे.

दार बंद झाले आहे की नाही हे मला कळले नाही आणि मी हिंमत करून खात्री करून घेण्यासाठी उठले.

अरेरे! गुन्हेगाराला कधीच इतक्या चांगल्या तुरुंगात टाकले गेले नसेल. पण तिथली प्रत्येक गोष्ट थंड, गुढ होती; आणि एक मोठी पाल, भिंतीवर चुकचुकली आणि अचानक मला एका भुताच्या गोष्टींची आठवण आली. रात्री बेसी अशा गोष्टी सांगत असे. त्यातील गुढ सावल्या मला भिंतीवर दिसू लागल्या.

मी माझ्या जागेवर परतले; एका अबोध भीतीने मला जखडून ठेवल्याचा भास झाला.

माझ्या मनामध्ये माझ्या वरील अन्यायाची जाणीव धगधगत होती. जाँनचे हिंसक अत्याचार, त्याच्या बहिणींचे माझ्या बरोबरचे शत्रुत्व, मामी माझा करत असलेला तिरस्कार, नोकरांचे पक्षपाती वागणे या सर्वांची जाणीव मनाला अस्वस्थ करत होती. "मलाच का नेहमी त्रास सहन करावा लागतो? का मला अपमानास्पद वागणूक देऊन दोषी ठरवले गेले? मी कधीतरी कुणाची मर्जी जिंकून घेऊ शकेन काय?" असे असंख्य प्रश्न पण ज्यांची उत्तरे माझ्यापाशी नव्हती.

एलिझा जरी हट्टी आणि स्वार्थी असली तरी मामीसाहेबांना तिचे कौतुक होते, जॉर्जियाना, बिघडलेली, मत्सरी, उद्धट शिवाय भांडखोर असूनही, त्या तिचे लाड करत. तिचे सौंदर्य, तिचे गुलाबी गाल, तिचे सोनेरी कुरळे केस, तिच्या दोषांवर मात करत असत. रहाता राहिला जाँन, त्याने जरी कबुतरांची मान मुरडली , पाळीव

मोरांना ठार केले , फळानी लगडलेल्या वेली उपटल्या किंवा दुर्मिळ वनस्पतींच्या कळ्या तोडल्या, तरी तो कायमच सर्वांच्या प्रेमाला आणि आदराला पात्र असे.

मी मात्र एकही चूक न करता, माझी कर्तव्ये पूर्ण करण्याचा प्रयत्न केला तथापि, मला दुष्ट आणि अविचारी घोषित केले गेले. त्या साठी मला त्रास दिला गेला, माझ्यावर झालेल्या आघातामुळे माझ्या डोक्यातून रक्त वाहत होते पण मला मारल्याबद्दल जॉनला कोणीही फटकारले नव्हते; सर्वांनी उलट माझ्यावरच आरोप केले होते. कारण, कारण मी त्याच्या विरोधात गेले होते.

“अन्याय! अन्याय!” माझे मन सारखे तडफडत होते. या सर्वांपासून सुटका करून घेण्याची विचित्र कल्पना मनात फेर धरु लागली. पळून जावे की अन्नत्याग करून मरून जावे अंतर्मनात संघर्ष चालला होता. माझ्या कोणत्याही प्रश्नांचे उत्तर माझ्याकडे नव्हते.

“मलाच असे दुःख का भोगावे लागावे?” आता अनेक वर्षांनी ही सर्व कारणे मला स्पष्ट झाली आहेत.

गेटशेडच्या वाड्यात मी पुर्णपणे विसंगत, तेथील कुणाच्या खिसगणतीत नसणारी व्यक्ती होते.

मामीसाहेब व मामेभावंडे याच्या बरोबर मी जुळवून घेण्यास मी असमर्थ होते. ते जरी माझ्यावर प्रेम करत नसले तरी मी त्यांच्यावर थोडे फार प्रेम करत होते. त्यांच्या पैकी कुणालाही, माझ्याबद्दल सहानुभूती वाटत नव्हती. उलट मी एक निरुपयोगी, भिन्न स्वभावाची, व्यक्ती असून जी त्याच्या दु:खास कारणीभूत असल्याचा त्यांचा समज होता. याच कारणांमुळे त्यांना माझ्या विषयी थोडी फार सुध्दा आपुलकी वाटत नसे. त्यांच्या या वागणुकीमुळे माझ्या मनात संताप आणि तिरस्कार दाटून राहिला होता.जर मी थोडी जरी वेगळी व्यक्ती असते, त्यांच्या सारखी सुंदर, खेळकर त्याच्यापेक्षा फारशी वेगळी नसलेली असते, तर मी आश्रित असूनही

मामीसाहेबांनी मला स्वेच्छेने सहन केले असते. माझ्या मामेभावंडानी इतर खेळगड्यासारखे प्रेमाने वागवले असते. गडी माणसांनी माझा बळीचा बकरा बनवला नसता. मात्र त्यासाठी मला माझ्या आत्मसन्मानाचा बळी द्यावा लागला असता आणि ती गोष्ट कदापिही शक्य नव्हती. या सर्वच गोष्टी माझ्या अनाथ असण्याच्या दु:खात भर घालत होत्या.

लाल खोलीतून दिवसाचा प्रकाश मावळू लागला होता; चार वाजून गेले होते; आकाश जमलेले ढग लवकरच भयानक अंधार आणतील असे वाटत होते; मी पायऱ्यांच्या खिडक्यांवर पाऊस पडत असल्याचे ऐकले; हळूहळू मी दगडासारखी थंड होत गेले आणि मी धीर गमावला. आत्मवंचनेमुळे माझा क्रोधाग्नी विझत चालला होता. स्वेच्छेने मरणाची इच्छा मनात येऊ लागली. हा नक्कीच गुन्हा आहे याची जाणीव मात्र जागी होती. वाड्याच्या मागच्या बाजूला मामाचे शव पुरले होते याची आठवण आली आणि एक प्रकारची दहशत जाणवू लागली.

माझ्या मामांनी मी गरीब अनाथ पोर म्हणून तान्हे पणीच त्यांच्या घरात आणले होते. मरते वेळी मामीसाहेबांकडून मला स्वतःच्या मुलांप्रमाणे सांभाळ करण्याचे वचन घेतले होते. आणि तिचा विश्र्वास होता की ती ते वचन योग्यप्रकारे निभावत आहे. मामांच्या मृत्यूनंतर, तिच्या लेखी काहीच किंमत नसलेली मी, तिला, तिच्या मुलांच्या वाट्यात भागीदार असणे सहन करणे, अशक्य होते, ज्या मुळात प्रेमच नाही तिच्यावर शपथ देऊन सक्तीचे प्रेम करणे हे तिच्या स्वतः च्या मुलांवर अन्याय करणारे होते.

माझे मामा असते तर ते माझ्य बरोबर मायेने वागले असते याची मला खात्री होती.

पांढऱ्या शुभ्र अंथरूणावर चादर पांघरून मी पडून राहिले होते. भिंतीवरच्या सावल्या पहाता पहातांना, मोठ्या आरशात नजर जाई त्यात अंधेऱ्या खोलीचे

प्रतिबिंब दिसे. मृतांबद्दल काय मी बरेच काही ऐकले होते. त्यांच्या शेवटच्या इच्छेचे उल्लंघन केल्यास, त्यांना थडग्यात त्रास होतो आणि अश्या खोट्या लोकांना शिक्षा करण्यासाठी असे अतृप्त आत्मे, पृथ्वीवर परत येतात. मला वाटले की मामांचा आत्मा, त्याच्या बहिणीच्या मुलीच्या दुःखाने कबरीतून उठून, या खोलीत माझ्यासमोर येईल.

मी माझे अश्रू पुसले आणि माझ्या आजूबाजूला धैर्याने पाहण्याचा प्रयत्न केला. या क्षणी, भिंतीच्या बाजूने एक प्रकाशाचा झोत सरकला; मला आश्चर्य वाटले की ते खिडकीतून आत आलेला चंद्राचा प्रकाश असावा.

पच नाही, चंद्रप्रकाश स्थिर असतो आणि हा प्रकाश तर चमकत होता.

माझे हृदय जोराने धडधडत होते, माझे डोके ठणकत होते; गंजलेल्या पंख्याचा आवाज काना शिरुन, मेंदू कुडतडू लागला होता; मी पार गुदमरून गेले; यापुढे मी स्वतःला सावरू शकले नाही. मी धावतच दाराकडे गेले आणि अथक प्रयत्नांनी दार हलवू लागले. माझे किंचाळणे बाहेरपर्यंत ऐकू जात होते.

मला पावलांचा आवाज ऐकू आला; किल्ली फिरवली गेली; बेसी आणि मिस अँबोट आत शिरल्या.

“ मिस जेन, तुम्ही आजारी आहात का?” बेसीला विचारले.

“मला घेऊन चला, मला मुलांच्या खोलीत जाऊ द्या,” मी परत ओरडले.

“कशासाठी ? तू आजारी आहेस का? तुला काही दिसले का?” बेसीला पुन्हा विचारले.

“ मला एक प्रकाश दिसला आणि मला वाटले की भूत येत आहे.”

मी बेसीचा हात पकडला आणि तिने तो सोडवून घेतला नाही.

“ती गरज मुद्दाम ओरडली असावी,” मिस अबॉटने एक प्रकारचा तिरस्कार व्यक्त केला. “काय पण रडते आहे! जर तिला खूप त्रास झाला असेल तर आम्ही

तिला माफ करू शकलो असतो, परंतु तिला फक्त आपण यावे असे वाटत होते. म्हणून तिने हे नाटक चालविले आहे.मला तिचा दुष्टपणा माहीत आहे.” तिचे रागावणे चालू होते.

“ या सगळ्याचा अर्थ काय?” मामीसाहेबांचा आवाज आला. घाईघाईने खाली येताना वाऱ्याने त्यांची टोपी उचलली गेली होती आणि अंगावरची शाल हलत होती.

“बेसी, मी जेनला स्वतःहून सांगितल्याशिवाय बाहेर न येण्याचा आदेश दिला होता.”

“ मॅडम, मिस जेन खूप मोठ्याने ओरडत होती!” बेसीने धाडस केले.

“तिला सोडा,” त्यांनी उत्तर दिले. इकडे ये, बेसीचा हात सोडू दे; आपण अश्या प्रकारे यशस्वी होणार नाही याची खात्री बाळग. मला खोटेपणाचा तिरस्कार आहे, तुला हे पटवून देणे गरजेचे आहे की फसवणुकीतून तुला अपेक्षित असलेले प्राप्त होणार नाही; अजून एक तास थांबून तुझी शिक्षा पुर्ण केल्याशिवाय तुझी इथून सुटका नाही.”

“मामीसाहेब, माझ्यावर दया करा, मला क्षमा करा. मी आता हे सर्व सहन करू शकत नाही; मला दुसरी शिक्षा द्या; नाहीतर मी इथेच मरून जाईन.”

“चुप बस! मला आरडाओरडा आवडत नाही.”

तिला सर्व माझे ढोंग वाटत होते.

बेसी आणि अँबोट निघून गेल्या.

मामीसाहेबांनी, भीतीने गांगरून आणि रडण्याने गळून गेलेल्या मला, अचानक पुन्हा खोलीत ढकलले आणि एक शब्दही न बोलता मला बंद केले. मी जाताना त्यांच्या पावलांचा आवज ऐकला आणि मूर्च्छित झाले. कारण त्यानंतर काय झाले हे मला माहीत नव्हते.

a

## प्रकरण 3

जेव्हा मला जाग आली तेव्हा मी एका भयानक स्वप्नातून बाहेर

पडल्यासारखे सारखे वाटले. डोळयांसमोर काळोख दाटला होता त्या सोबत एक लालसर चमक दिसली. हळुवार आवाजात कोणी बोलत होते. त्यात काळजीयुक्त भीतीची भावना जाणवत होती. तेव्हढ्यात कोणी तरी माझे डोके हळुवार उचलून डोक्याखाली उशी नीट केली. एवढ्या काळजीने मला कोणीही वागवले नव्हते; माझे डोके उशीला टेकले होते. मला आराम वाटला.

पाच मिनिटांनंतर डोळयासमोरील अंधार दूर झाला आणि लक्षात आले शेकोटीच्या आगीतून लाल पिवळ्या ज्वाळांचा प्रकाश दिसत आहे. रात्र पडली होती, टेबलावर मेणबत्ती जळत होती; बेडच्या पायथ्याशी उभ्या असलेल्या बेसीच्या हातात पाण्याने भरलेलेले भांडे होते.

माझ्या उशाजवळ खुर्चीवर बसलेले एक गृहस्थ माझ्याकडे झुकले होते.

एक अनोळखी व्यक्ती होती जी गेटशेड कॅसलशी व मामीसाहेबांच्या कुटुंबाचा भाग नसल्याचे मला लक्षात आले. याच गोष्टींचा मला अवर्णनीय आनंद झालाआणि एक सुरक्षितपणा मिळाल्याची खात्री वाटली. मी बेसीकडून माझी नजर फिरवून त्या अनोळखी व्यक्तीचा चेहरा पाहिला आणि त्यांना ओळखले: ते मिस्टर लॉयड, फार्मासिस्ट होते. गडीमाणसे आजारी असताना मामीसाहेब कधी कधी त्यांना बोलावत; स्वत:साठी आणि तिच्या मुलांसाठी, मात्र डॉक्टरांकडून उपचार केले जायचे.

“मी कोण आहे ?” मिस्टर लॉयडने विचारले.

मी हात पुढे करत त्याचे नाव सांगितले. त्यांनी माझा हात हातात घेतला आणि हसत हसत मला म्हणाले: “थोड्या वेळात सर्व काही ठीक होईल. »

मग त्यांनी मला काळजीपूर्वक खाली झोपवले आणि बेसीला रात्री मला त्रास होणार नाही हे पाहण्याचा सल्ला दिला. काही सूचना देऊन आणि दुसऱ्या दिवशी परत येईन असे सांगून ते निघून गेले.

पलंगाच्या बाजूला असलेल्या खुर्चीत ते बसले असताना मला खूप सुरक्षित वाटत होते. माझी त्यांना काळजी होती हे जाणवले. जेव्हा त्यांनी

त्यांच्या मागे दरवाजा बंद केला तेव्हा खोलीतील अंधार वाढला आणि माझे हृदय पुन्हा एका अव्यक्त दुःखात बुडाले.

“तुला झोप लागेल असे वाटते का, मिस?” बेसीने शांतपणे विचारले.

“नाही, तरीपण मी झोपण्याचा प्रयत्न करेन.”

“ काही खाणार काय? की गरम दूध आणू?” बेसी आपलेपणाने विचारत होती.

“नाही, बेसी, धन्यवाद.”

“तर मग मी झोपायला जाईन, कारण मध्यरात्र उलटून गेली आहे; पण रात्रीच्या वेळी तुम्हाला काही हवे असल्यास तुम्ही मला मला हाक मारा.”

तिच्या चांगुलपणाने मी भारावून गेले आणि प्रश्न विचारण्याचे धाडस केले.

“बेसी,” मी विचारले, “माझ्या बाबतीत काय झाले आहे?” मी आजारी आहे का?”

a

“ मला असे वाटते की इतके रडल्यामुळे तुम्ही लाल खोलीत बेहोश झाला असाल.”

बेसी पुढच्या खोलीत गेली, दुसऱ्या मोलकरीण बरोबर झोपताना असे म्हणताना ऐकले:

“खरोखरच ती मरणार होती तर! तिला मिळालेली शिक्षा खूप विचित्र होती! तिने कदाचित काहीतरी पाहिले असेल. मॅडम खूप कठोर आहेत.”

झोपायच्या अर्धा तास आधी मी त्यांना शांतपणे बोलताना ऐकले. मी त्यांच्या संभाषणातील काही शब्द पकडले आणि मला विषयाचा अंदाज आला.

“पांढऱ्या रंगाचे कपडे घातलेला एक आकार तिच्या समोरून गेला आणि गायब झाला... त्याच्या मागे एक मोठा काळा कुत्रा होता... बेडरूमच्या दारावर तीन वेळा जोराने ठोठावले... खोलीतील प्रकाश..”

शेवटी दोघीही झोपी गेल्या. आग आणि मेणबत्ती जळत राहिली. मी मात्र भीतीने जागीच राहिले. माझे कान सतत काही आवाज ऐकू येतो काय याचा कानोसा घेत होते. डोळे अंधारात काही दिसते आहे काय याचा शोध घेत होते, माझे मन भीतीने तणावग्रस्त होते.

लाल खोलीत प्रकरणा नंतर मला कोणताही दीर्घ किंवा गंभीर आजार झाला नाही. तथापि, माझ्या मज्जातंतूंना जो एक धक्का बसला तो मला आजही जाणवतो. “होय, मामीसाहेब मी तुमची आभारी आहे की मी एकापेक्षा जास्त मानसिक वेदना सहन केल्या आहेत; तरीसुद्धा मी तुम्हाला क्षमा केली पाहिजे, कारण तुम्ही काय

करत होतात हे तुम्हाला माहीत नव्हते: तुम्ही माझ्या दुष्ट प्रवृत्तीला उखडून टाकले आहे.”

दुसऱ्या दिवशी, दुपारच्या सुमारास, मी उठले, कपडे घातले आणि शाली गुंडाळून घेऊन शेकोटीच्या जवळ बसले. मला अशक्तपणा जाणवत होता आणि आतून तुटून गेल्याची भावना मनाला कुडकुडत होती. एका अव्यक्त निराशेमुळे मन भरून आले आणि नकळत अश्रुधारा सुरू झाल्या. माझे मीच अश्रू पुसले. दुसऱ्या कोणाला माझी ही अवस्था पाहून माझी कींव करणे मला आवडले नसते. माझी मामेभावंडे आईसोबत गाडीमधून बाहेर पडली होती;

याचे मला बरे वाटत होते. अबॉट स्वतः दुसऱ्या खोलीत शिवणकाम करत होती.बेसी अधूनमधून माझी हालहवाल विचारत होती. सतत निंदा, कष्ट, अवहेलना, दुस्वास यांची सवय झाल्याने इतक्या शांततेत मन शांत होण्याची शक्ती राहिली नव्हती. मी आनंदाने आनंदी होणे पण विसरून गेले होते.

बेसीने किचनमधून माझ्यासाठी एका चिनी मातीच्या प्लेटवर एक छोटीसी पेस्ट्री आणली होती, ज्या प्लेटवर गुलाबाच्या फुलांच्या हारावर स्वर्गीय पक्षी होते. मला ते खूप आवडत. मला या अगोदर त्यांना जवळून निरखून पहायची संधी मिळाली नव्हती. आज तीच मौल्यवान पोर्सिलेनची प्लेट माझ्या गुडघ्यावर ठेवण्यात आला होती आणि मला त्यात असलेली नाजूक पेस्ट्री खाण्यासाठी दिली होती. आता मला ती प्लेट निरखून पहावी असे वाटत नव्हते. त्यामधील पेस्ट्री मी खाऊ शकले नाही; प्लेट वरील पक्ष्यांचा पिसारा आणि फुलांचे रंग मला फिके पडलेले दिसत होते. मी प्लेट आणि केक बाजूला ठेवला.

मला वाचायला पुस्तक हवे आहे का, असे बेसीने विचारले; हा शब्द ऐकल्यावर मला झटपट डंख मारल्यासारखे झाले. मी तिला ‘गुलिव्हर ट्रॅव्हल्स’

a

घेऊन येण्यास सांगितले . मी हा खंड नेहमी नवीन आनंदाने वाचत असे आणि आज पुन्हा वाचायला सुरवात केली. मला या कथेतील कथानक , खरे वाटत असे. मला परीकथांपेक्षा त्यांच्यात जास्त रस वाटे; कारण परीकथेतील पात्रे माझ्या भवतालच्या परीसरात शोधून मला सापडली नव्हती. शेवटी ती सर्व इंग्लंड सोडून दुसऱ्या अनोळखी प्रदेश गेली असावीत जेथें मोठमोठाली झाडे असतील त्यांना मोठी पाने, रंगीबेरंगी फुले ,चित्रविचित्र प्राणी, छोटे मोठे पक्षी, नद्या, झरे असे परीराज्य असेल अशी माझी समजूत झाली होती.

मात्र लिलीपुट आणि ब्रॉब्डिग्नॅग पृथ्वीच्या पाठीमागे कुठेना कुठे नक्कीच असेल आणि एक दिवस असा येईल की लांबचा प्रवास करून मी स्वतःच्या डोळ्यांनी छोटी शेतं, छोटी घरं, घरं पाहीन यात शंका नव्हती. या लहान लोकांची छोटी झाडे; गायी, मेंढ्या आणि मोठ्या लोकांच्या राज्याचे पक्षी किंवा उंच जंगले, प्रचंड कुत्री, राक्षसी मांजरे गुलीव्हर प्रमाणे मला पण पहायची तीव्र इच्छा होती.

मात्र सध्या मी चाळत असलेले पुस्तकाची पाने, जी नक्षीदार चित्रांनी नटलेली मला खूप आवडायची. आता मात्र मला ते सर्वकाही भीतीदायक दिसू लागले: भयावह राक्षस, द्वेषाने भारले गेलेले पिग्मी, भयंकर दुष्ट एल्व्ह असे सर्वजण गुलिव्हरच्या विरोधात उभे ठाकलेले दिसत होते. बिचारा गुलीव्हर, हताशपणे, अश्या भयंकर आणि धोकादायक प्रदेशात भटकत आहे. माझ्या अंतर्मनातली भीती मुर्तीमंत होऊन त्या चित्रांच्या रुपात दिसू लागली. मी ते पुस्तक बंद केले आणि पुढे पाहायला माझी हिंमत झाली नाही. मी टेबलावर ठेवून दिले.

बेसीने खोलीची साफसफाई पूर्ण केली आणि हात धुऊन झाल्यावर तिने शिवणकामाचा ड्रॉवर उघडला आणि रेशमी कपड्याचा फ्रॉंक जॉर्जियानाच्या बाहुलीसाठी शिवायला सुरुवात केली.

शिवणकाम करताना एक लोकगीत गुणगुणायला लागली.

a

"बऱ्याच काळापूर्वी, जेव्हा आपले जीवन भटकंतीचे होते."

पूर्वी अनेकदा हे गाणं ऐकलं होतं; मला ते गाणे नेहमीच आवडायचे , कारण बेसीचा आवाज गोड होता; पण या क्षणी, जरी आवाज नेहमीसारखा मृदू असला तरी, मला तिच्या स्वरात एक अनिश्चित दुःख दिसले. मला आणखीनच उदास वाटू लागले.

गाण्याचा सारांश साधारण असा होता:

जखमी पावलांनी एकाकी वाटचाल सुरू आहे. पावले थकली आहे. भयाण जंगलात काळोखाचे साम्राज्य पसरले आहे.

जमीन दलदललीची आहे. अश्या वेळी माझी करुणा देवा शिवाय कोणाला येईल बरे

तोच चांगुलपणाने, गरीब अनाथांना संरक्षण, आधार आणि आशा देणारा आहे.

या विचाराने मला धीर दिला पाहिजे.

तोच माझा पालनकर्ता आहे.

त्याचे घर हेच माझे घर आहे आणि तेथे मला कश्याचीही उणीव भासणार नाही.

देवच आम्हा गरीब अनाथाचा मित्र आहे.

गाणे ऐकताना माझ्या अश्रूंचा बांध फुटला.

ये, मिस जेन, रडू नकोस,"गाणे संपल्यावर बेसी म्हणाली.

अग्नी आपले जळणे थांबू शकेल?

पण मी अनुभवत असलेल्या दुःखाचा तिला अंदाज आला होता.

दुसरे दिवशी सकाळी मिस्टर लॉयड आले.

a

मला उभी असलेली पाहून, “अरे ! कोण बरे उभे आहे?” आत जाताच त्यांनी विचारले, “बरं, बेसी, ती कशी आहे?”

बेसीने उत्तर दिले की मी खूप बरी आहे .

“मग ती अधिक आनंदी असावी...इकडे ये बर, मिस जेन; तुझे नाव जेन आहे, नाही का?”

“होय, सर, जेन आयर.”

“ बरं! तू का बरे रडत होतीस ते मला सांग. तुला काही दुःख आहे का?”

“नाही सर”

“ती मॅडमसोबत गाडीतून जाऊ शकत नव्हती, म्हणून रडत असावी “ बेसीने वेळ मारून नेण्यासाठी कारण पुढे केले.

“ नक्कीच नाही, अश्या छोट्या गोष्टीं साठी रडण्यासाठी ती एवढी काही लहान नाही”. लॉंयड म्हणाले.

मला त्याचे बोलणे पटले. बेसी केलेल्या खुलाश्यामुळे माझा स्वाभिमान दुखावला गेला, मी त्वरित प्रतिसाद दिला:

“मी इतक्या छोट्या गोष्टीवर कधी रडले नाही; मला गाडीमधून बाहेर जाणे आवडत नाही; मी दुःखी आहे म्हणून मी रडत होते.”

“ शू! चुप!” बेसीने मला दटावले.

मिटर लॉंयड थोडे गोंधळात पडले. माझ्या कडे रोखून पहात त्यांनी विचारले,”काल तू कशामुळे आजारी पडलीस?”

“काल ती पडली होती”, बेसी परत मध्ये बोलली.

“छे!तिला तिच्या वयात कसे चालायचे ते माहित नाही ? ती आठ-नऊ वर्षांची असावी!”, लॉंयड म्हणाले.

a

“मला फटका मारला आणि यामुळेच मी पडले,” न रहावून मी पटकन ओरडले; पण त्यामुळे काही मी आजारी पडले नाही,” मी बोलले.

मिस्टर लॉयडनी तपकिरीच्या डबीतून चिमुट भर तपकीर नाकात ओढली आणि डबी कोटाच्या खिशात सारत असता गडी माणसांच्या जेवणाची घंटा वाजली.

“हे तुझ्यासाठी आहे, बेसी,” लाँयड मोलकरणीकडे वळून म्हणाले. तु”म्ही खाली जाऊ शकता, तुम्ही परत येईपर्यंत मी मिस जेनला काहीतरी वाचून दाखवेन.”

बेसीच्या मनात जायचे नव्हते ; परंतु तिला बाहेर जाणे भाग होते, कारण तिला माहित होते की गेटशेड कॅसलमध्ये नियमांचे उल्लंघन केले जाऊ शकत नाही.

बेसी गेल्यावर मिस्टर लॉयड पुढे म्हणाले, “जर तू पडल्या मुळे आजारी पडली नाहीस तर मग नेमके काय कारण झाले?”

मला लाल खोलीत रात्री एकटीलाच कोंडून घातले होते. रात्री त्या खोलीत भुत असते.

किंचित हसत लाँयड म्हणाले, “काय भुत? तू अजून लहान आहेस. कसल्या तरी सावलीला बघून घाबरली असशील.”

“हो,” मी पुढे म्हणाले; मला माझ्या स्वर्गवासी मामांच्या सावलीची भीती वाटते.

बेसी किंवा इतर कोणीही रात्रीच्या वेळी या खोलीत प्रवेश करत नाहीत. रात्री अंधारात मला एकटीला कोंडून घालणे क्रूर होते; इतके की मला वाटत नाही की मी ते कधी विसरू शकेन.”

“हा काय वेडेपणा! त्यामुळेच तू इतकी दु:खी झालीस? आणि आता भर दिवसा पण घाबरतेस?”

“नाही, पण थोड्या वेळाने परत रात्र होईल. त्या खेरीज आणखी बरीच कारणे आहेत.”

“आणखी कोणती कारणे आहेत? त्यापैकी काही मला सांग पाहू.”

या प्रश्नाचे सविस्तर उत्तर द्यायला मला आवडले असते पण देणे माझ्या साठी अवघड होते. लहान मुलांना आपल्या भावना नेमक्या समजून घेऊन शब्दात मांडणे कठीण असते. दु:खाला व्यक्त करायची माझी पहिली आणि कदाचित शेवटची संधी गमावण्याच्या भीतीने माझ्या तोंडून खरे शब्द बाहेर पडले.

“ खरे सांगायचे म्हणजे मला आई, वडील, बहिण, भाऊ कोणी कोणी नाहीत. मी एकटीच आहे”.

“ बरे तुझी काळजी घेणाऱ्या मामी आहेत. तुझ्या बरोबरची मामेभावंडे आहेत.”

क्षणभर थांबले; मग मी सहज उत्तर दिले:

“जॉन रीडने मला खाली पाडले आणि माझ्या मामीसाहेबांनी मला लाल खोलीत बंद केले होते.”

मिस्टर लॉयडने तपकिरीची डबीतून दुसऱ्यांदा चिमुट भरून घेतली.

“गेटशेड वाडा खूप सुंदर आहे असे तुला वाटत नाही का?” त्यांनी मला विचारले; अशा घरात राहायला मिळाल्याबद्दल तुम्हाला खूप कृतज्ञता वाटत नाही का?”

“हे माझे घर नाही सर, आणि मिस अँबोट म्हणते की मला इथे नोकरापेक्षा कमी अधिकार आहेत.”

“तरीही! एवढं सुंदर घर सोडणे वाटते तितके सोपे नाही.”

a

" जर मी इतरत्र जाऊ शकले तर मला घर सोडण्यात खूप आनंद होईल; पण जोपर्यंत मी लहान आहे तोपर्यंत मी हे करू शकत नाही."

" मिसेस रीड व्यतिरिक्त तुझे कोणी नातेवाईक आहेत का?"

"मला नाही वाटत सर."

"तुझ्या वडिलांच्या बाजूने कोणी?"

" मला माहित नाही; मी मामीसाहेबांना एकदा विचारले होते; त्यांनी मला सांगितले की माझे काही गरीब नातेवाईक आहेत ज्याचे नाव आयर आहे, परंतु तिला त्यांच्याबद्दल काहीही माहिती नाही."

" जर ते असतील तर तुम्हाला त्यांच्यासोबत जायला आवडेल का?"

मी मान हलवली; प्रौढ व्यक्तींच्या दृष्टीने गरीबी एक कष्टप्रद स्थिती आहे मात्र लहान मुलांना कष्टकरी पण स्वाभिमानाने जगणाऱ्या गरीबांची कुठली कल्पना? त्यांना 'गरीब' या शब्दाचा केवळ फाटके कपडे, तुटपुंजे अन्न, अग्निरहित शेगडी, असभ्य वागणूक आणि निंदनीय दुर्गुणांशी संबंधित आहे असे वाटते: माझ्यासाठी गरिबी हा अधोगतीचा समानार्थी शब्द होता.

"नाही," मी उत्तर दिले, "मला गरिब नातेवाईकांकडे राहायचे नाही.

" ते तुमच्यासाठी चांगले असले तरीही नाही?"

मी मान हलवली; गरीब लोक चांगले कसे असू शकतात हे मला समजले नाही;

अशिक्षित, गावंढळ, पोटाला धड खायला नाही की अंगावर वस्त्र, वागण्या बोलण्याची रीत नाही, अश्या काही गरीब स्त्रिया मी वाड्याबाहेर पाहिल्या होत्या. इथून सुटका करून तिकडे अश्या स्थितीत जाणे मला मुळीच मान्य नव्हते.

"पण तुझे आई-वडील इतके गरीब कामगार होते?"

a

“मी सांगू शकत नाही; माझी मामीसाहेब म्हणतात की जर माझ्याकडे आहे ते भिकाऱ्यांच्या वंशातील असले पाहिजेत आणि मला भीक मागायला जायचे नाही.”

“तुला बोर्डिंग स्कूलमध्ये जायचे आहे का?”

मी पुन्हा विचार केला: मला शाळा काय आहे हे फार कमी माहिती होते; बेसीकडून थोडी फार माहिती मिळाली होती. तिच्या म्हणण्यानुसार शाळेत मुलींना अत्यंत साधे,शांत,शिस्तबद्ध आणि अचूक वागणे अपेक्षित असते.

जॉन रीडला त्याच्या शाळेचा तिरस्कार वाटत होता आणि त्याने शिक्षकांना उद्धटपणे उत्तरे केली होती: पण जॉन रीडची आवड माझ्यासाठी काही नियम नव्हती

.

बेसीच्या शाळेच्या शिस्तीबद्दलची माहिती तिने गेटशेडला येण्यापूर्वी ती राहत असलेल्या कुटुंबातील तरुण स्त्रियांकडून गोळा केलेली होती. याच तरुणींनी मिळवलेल्या काही कर्तृत्वाचे तिचे तपशील, मला तितकेच आकर्षक वाटले होते. शाळेत काढलेल्या लँडस्केप आणि फुलांच्या सुंदर पेंटिंगची, गायन, वादन, गणित, इतिहास, भुगोल, फ्रेंच भाषा, बोलणे, लिहणे, वाचणे सुंदर अशा पर्स बनवणे हे ऐकल्यानंतर मला अनुकरण करावे असे वाटू लागले.

याशिवाय, शाळा हा एक संपूर्ण बदल असेल: याचा अर्थ एक लांब प्रवास, गेटशेडपासून संपूर्ण विभक्त होणे, नवीन जीवनात प्रवेश करणे.

“मला खरंच शाळेत जायला आवडेल ,” हा अंतिम निष्कर्ष होता.

“बरं, बरं; काय होईल कोणास ठाऊक?” मिस्टर लॉयड उठले तसे म्हणाले; “तुझ्यासाठी वातावरणात बदल गरजेचा आहे”

बेसी आता परतली; त्याच क्षणी गाडी फाटकाच्या येत असल्याचे ऐकू आले.

"तुझ्या मालकीणबाई आहेत का बेसी?" मिस्टर लॉयडला विचारले, "जाण्यापूर्वी मला त्याच्याशी बोलायचे आहे."

बेसी त्यांना मामीसाहेबांना भेटायला घेऊन गेली.

त्यांच्याशी बोलताना मिस्टर लाँयड नी मला शाळेत पाठवण्याची शिफारस करण्याचे धाडस केले होते; आणि ही शिफारस सहजासहजी स्वीकारली गेली होती:

बेसी आणि अँबोट रात्री नर्सरीमध्ये शिवणकाम करत बसल्या तेव्हा त्या विषयावर चर्चा करताना अँबोट म्हणाली मी ऐकले आहे : मालकीणबाईना अशा कंटाळवाण्या, आजारी मुलीपासून सुटका करून घेण्यास खूप आनंद झाला असेल, ती नेहमीच जणू काही ती सर्वांकडे रोखून पाहत असते, एक नंबरची कारस्थानी मुलगी आहे."

ॲबॉट आणि बेसीच्या बोलण्यातून मला पहिल्यांदा कळले की माझे वडील गरीब होते आणि आई मोठ्या श्रीमंत जहागीरदार घराण्यातली. घरच्यांच्या विरोधात जाऊन त्यांनी लग्न केल्यामुळे, माहेरच्या लोकांनी तिचे नाव टाकले. आजोबा एव्हढे संतापले की त्यांनी तिच्या हिश्याच्या संपत्ती मधून तिला बेदखल केले.

लग्नाच्या एक वर्षानंतर माझ्या वडिलांना टायफस हा सांसर्गिक रोग झाला. गरीब वस्तीत सर्वत्र संसर्ग झाला होता, जिथे महामारी वेगाने पसरत होती. त्याची काळजी घेत असताना माझी आई आजारी पडली आणि ते दोघेही एक महिन्याच्या आत मरण पावले. मी अगदी महिन्या,दिड महिन्याचे तान्हे बाळ होते.

आजोबांनी जरी माझे नांव टाकले असले तरी माझ्या मामांचा त्यांच्या बहिणीवर अतिशय जीव होता. घरातील सर्वांच्या आणि विषेशतः मामीसाहेबांच्या

विरोधात जाऊन ते मला त्यांच्या घरी घेऊन आले. मामीसाहेबांना त्रास होऊ नये म्हणून बेसीची दाई म्हणून नेमणूक केली.

ही कथा सांगून बेसीने उसासा टाकला आणि म्हणाली:

“गरीब बिचारी पोर ,मला जेनची, खरोखरच दया येते!”

“होय, जर ती मुलगा असती तर”

घरच्याना थोडे प्रेम वाटले असते पण ही, बंडखोर मुलगी इतरांसाठी नुसता त्रास; मग कोण कशाला लक्ष देईल?”

“ते खरे आहे,” बेसी संकोचत म्हणाली; निदान मिस जॉर्जियानासारखी सुंदर मुलगी याच परिस्थितीत असती तर, निश्चितच सर्वांनी तिच्याकडे लक्ष दिले असते.”

“होय, अँबोट म्हणाली, जॉर्जियानासाठीच मला नेमले आहे, तिचे निळे डोळे, तिचे लांब कुरळे आणि गोरापान रंग ती इतकी छान आहेत की कोणी म्हणेल की कोणी परी आहे.” रात्रीच्या जेवणाची चर्चा करत दोघी खाली निघून गेल्या.

## प्रकरण 4

मिस्टर लॉयड सोबतचे माझे संभाषण आणि मी नुकतीच बेसी आणि मिस अँबोट यांच्यातील बोलणे ऐकल्यावर मला माझ्या स्थितीत लवकरच बदल होण्याची आशा वाटू लागली; त्याप्रमाणे लौकर गोष्टी घडाव्यात म्हणून मी अधीर झाले होते पण शांतपणे वाट पहाण्याखेरीज माझ्याकडे दुसरा उपाय नव्हता. त्यानंतर एक दोन महिने गेले, माझी तब्येत पण पुर्ववत झाली होती; तथापि, माझ्या शाळाप्रवेशाच्या संदर्भात काहीच हालचाल दिसत नव्हती. मामीसाहेब कधी कधी तीव्र कटाक्ष माझ्याकडे टाकत; पण माझ्याशी क्वचितच बोलण्याचा प्रसंग येत असे.

माझ्या आजारपणापासून माझ्या मामेभावंडांत व माझ्यामध्ये एक प्रकारचा दुरावा आला होता. मी एका छोट्या खोलीत एकटीच झोपत असे; माझे जेवण एकट्याने होई; मी माझा सर्व वेळ छोट्या खोलीत घालवत असे, तर माझे मामेभावंडे सतत दिवाणखान्यात असत. मामीसाहेब मला बोर्डिंग स्कूलमध्ये पाठवण्याबद्दल कधीच बोलल्या नाहीत. मला वाटले की ती यापुढे मला त्रास देणार नाही; परंतु जेव्हा जेव्हा त्यांची नजर माझ्यावर पडत असे तेव्हा तेव्हा त्यात खोलवर रुजलेली घृणा स्वच्छ दिसत असे.

एलिझा आणि जॉर्जियानाला, स्पष्टपणे माझ्याशी न बोलण्याचे आदेश दिले होते त्यामुळे त्या माझ्याशी शक्य तितके कमी बोलत. जॉन मात्र प्रत्येक वेळी माझ्याकडे पाहून तोंड वेंगाडत असे. एके दिवशी त्याने मला मारण्याचा प्रयत्न केला; तीव्र संतापाच्या भरात, मी काय करते आहे याचे भान मला उरले नाही आणि मी जोरदार प्रतिकार केला. त्याच्या तोंडावर मुठीने जोराचा तडाखा दिला. त्याला माझी ही प्रतिक्रिया अपेक्षित नव्हती. त्यामुळे माझा नाद सोडून तो मला धमकावत

माझ्यापासून दूर गेला. मी त्याचे नाक मोडले असे आईला सांगितले. माझी खोड मोडण्याची प्रतिज्ञा करून तो परत माझ्या अंगावर चालून येत असताना त्याच्या आईने त्याला अचानक अडवले.

"जॉन, त्या मुलीबद्दल माझ्याशी आणखी काही बोलू नकोस," ती त्याला म्हणाली, "मी तुला तिच्याजवळ जाण्यास मनाई केली होती; ती लक्ष देण्याच्या लायकीची मुलगी नाही; मला तुला किंवा तुझ्या बहिणींना तिच्यासोबत खेळताना बघायचं नाही."

मी अगदी जवळच असलेल्या पायऱ्यांच्या टेकले होते. मी काय बोलत आहे याचे भान न राहून मी अचानक ओरडले:

"खरे म्हणजे ते माझ्याशी खेळण्याच्या लायकीचे नाहीत."

मामीसाहेब खमकी स्त्री होती. माझे उलट बोलणे ऐकून ती पटकन पायऱ्या चढून आली; अत्यंत चपळाईने होते तिने मला मुलांच्या खोलीत ओढले आणि माझ्या पलंगाच्याजवळ ढकलले, रागारागाने मोठ्या आवाजात ओरडत, मला तेथून बाहेर पडण्यास आणि तोंडातून चकार अक्षर काढण्यास मनाई केली.

"आज माझे मामा हयात असते तर त्यांना तू काय उत्तर दिले असतेस?" माझ्या तोंडून शब्द गेले. खरोखर मी समजून उमजून बोलत नव्हते कोणी जणू कोणी अज्ञात शक्ती माझ्याकडून बोलून घेत होती. माझा स्वतः वर ताबा नव्हता.

"काय?" मामीसाहेब मोठ्याने ओरडल्या. त्यांच्या घाऱ्या डोळ्यात नेहमीच एक खुनशी थंडपणा दिसत असे तिथे आता दहशत दिसत होती. तिने माझ्या हात सोडला जणू काही मी लहान मुलगी नसून एखादा राक्षस वगैरे असावा अशा नजरेने ती मला पहात होती.

हो मी आता तशीच बनले होते, जराही न थांबता मी बोलत सुटले, "माझे मामा स्वर्गातून हे सर्व पहात आहेत आणि माझे आई बाबा देखील. तू माझ्याबद्दल

काय विचार करतेस हे त्यांना समजले आहे. तू मला दिवसभर कोंडून ठेवतेस, मी मरावे अशी इच्छा करतेस हे पण त्यांना माहीत आहे”.

क्षणभर मामी अवाक झाली पण दुसऱ्या क्षणी तिने स्वतःवर ताबा मिळवला आणि मला गदागदा हालवले. मला एक जोराची थप्पड देऊन ती एकही शब्द न बोलता निघून गेली.

त्यानंतर तासभर बेसीने माझी कान उघाडणी केली; तिने मला स्पष्टपणे सांगितले केले की मी सर्वात वाईट आणि वाया गेलेली मुलगी आहे जी खाल्या घराचे वासे मोजते. माझ्या मनात एव्हढा कडवटपणा भरला होता की मला त्याच्यावर विश्वास ठेवण्याचा मोह झाला.

नोव्हेंबर, डिसेंबर आणि अर्धा जानेवारी निघून गेला. गेटशेडमध्ये ख्रिसमस आणि नवीन वर्ष नेहमीच्या थाटामाटात साजरे केले गेले: भेटवस्तूंची देवाणघेवाण झाली. डिनर आणि पार्ट्या दिल्या आणि स्वीकारल्या गेल्या. या सर्व सुखांपासून मी स्वाभाविकपणे वगळले होते; एलिझा आणि जॉर्जियाना ख्रिसमसचीसाठी सजूनधजून दिवाणखान्यात येत, त्यांना पाहणे ही माझ्या साठी आनंदाची गोष्ट होती.

शेवटी मला या सगळ्याचा कंटाळा आला आणि मी माझ्या छोट्या खोलीत परतले. या ठिकाणी मी दुःखी नव्हते; मला खाली जायचे नव्हते, कारण माझी उपस्थिती कोणाच्या लक्षात आली नसती. जर बेसी माझ्याशी चांगली वागली असती, तर मी सुंदर स्त्रियांनी भरलेल्या खोलीत मिसेस रीडच्या कडक नजरेखाली तासनतास थांबण्यापेक्षा माझ्या सर्व संध्याकाळ तिच्यासोबत घालवण्यास प्राधान्य दिले असते.

पण बेसी, एलिझा, जॉर्जियानाचे कपडे, नटणे वगैरे आवरून झाल्यावर, स्वयंपाकघरात इतर नोकरमंडळींकडे जात असे. मग शेकोटीतील आग विझेपर्यंत,

a

मी गुडघ्यावर माझी बाहुली घेऊन बसत असे. अधून मधून माझ्या आजूबाजूला बघत भूत बीत तर नाही ना, याचा कानोसा घेत असे.

अंधार पडायला लागला की पडदे बंद करून माझ्या बाहुलीला घेऊन पलंगावरील अंथरुणात शिरत असे. बाहुलीची सोबत मला एकटेपण जाणवू देत नसे. खरचं आपण नेहमी कोणावर तरी प्रेम करणे आवश्यक आहे आणि माझ्या स्नेहासाठी या जुन्यापुराण्या बाहुली खेरीज, योग्य असे काहीच नव्हते. माझ्यासाठी ती लाकडी बाहुली जिवंत मैत्रिणी सारखी होती. तिच्या शिवाय मी झोपू शकत नव्हते. तिच्या सानिध्यात मला आश्वस्त वाटायचे. ती पण माझ्याबरोबर रहायला आनंदी आहे असा माझा विश्वास होता.

मेजवानीला आलेले पाहुणे जाईपर्यंत खूप वेळ झाला होता. मी अजूनही पायऱ्यांवर बेसीच्या पावलांचा आवाज ऐकू येतोय का हे पाहत होते. ती कधी कधी तिच्या कामाच्या वस्तू घेऊन जाण्यासाठी यायची तर कधी माझ्या साठी केक किंवा रात्रीचे जेवण घेऊन यायची. जेवल्यानंतर मी माझ्या पलंगावर बसल्यावर ती माझ्यावर ब्लँकेट ओढायची आणि मला दोनदा चुंबन घेऊन म्हणायची, “शुभ रात्री, मिस जेन.”

त्यामुळे बेसी मला पृथ्वीवरील सर्वोत्कृष्ट, सर्वात सुंदर, सर्वात प्रेमळ व्यक्ती वाटायची; तिने माझ्याकडे नेहमी चांगले आणि दयाळूपणे पाहावे अशी माझी मनापासून इच्छा होती. पण बऱ्याचशा वेळी ती तसे करत नसे.

बेसी एक सुस्वभावी मुलगी होती. तिचे काम कुशलतेने करत असे. तशी ती गोष्टीवेल्हाळही होती. तिने बालपणी सांगितलेल्या गोष्टींची छाप, माझ्या मनावर खूप खोलवर पडली. ती सुंदर होती, मला तिचे काळे केस आणि काळे डोळे, गोरा रंग आणि सळसळता उत्साह सारे काही लक्षात आहे. तशी ती थोडी फार लहरी होती.

a

तथापि, माझ्यावर होणाऱ्या अन्यायाच्या बाबतीत उदासीन होती, तरीही मी गेटशेडच्या इतर सर्व लोकांपेक्षा तिलाच जास्त प्राधान्य दिले.

15 जानेवारीचा दिवस होता, घड्याळात नऊ वाजले होते. बेसी जेवायला खाली आली होती. माझ्या चुलत भावंडांना त्यांच्या आईने अजून बोलावले नव्हते. एलिझा तिच्या कोंबड्याच्या घराला भेट देण्यासाठी तिची टोपी आणि तिचा सर्वात उबदार ड्रेस घालून चालली होती. तो त्याचा आवडता व्यवसाय होता; शिवाय ती अंडी घरकाम करणाऱ्याला लोकांना विकून त्याचे पैसे गोळा करत असे. तिची वृत्ती व्यापारी होती आणि पैसे साठवून ठेवत असे; नुसत्या अंडी आणि कोंबडीचीचा बाजार करण्यात समाधान न मानता ती तिची फुले, बिया आणि झाडाच्या कटिंग्जमधून सुध्दा पैसे कमावत असे. तिचे पैसे तिने जुन्या कागदात गुंडाळून एका कोपऱ्यात लपवले होते; परंतु पैसे लपवलेली ठिकाणे नोकराने शोधून काढल्यामुळे एलिझाने तिचा सर्व खजिना तिच्या आईकडे सोपवावा लागला. पण ती त्या बदल्यात ती आईकडून व्याज मागत असे. मिळणाऱ्या व्याजाचा दर तिमाही, हिशेब तिने छोट्या वहीत लिहून ठेवला होता.

जॉर्जियाना उंच खुर्चीवर आरशासमोर बसली होती. नवनवीन केशरचना, दागदागिने, सुंदर कपडे यामध्ये तिला विषेश रुची होती.

बेसी मला मदतनीस म्हणून, खोली स्वच्छ करण्यासाठी आणि फर्निचरची धूळ घालण्यासाठी काम करत होती. काही चित्रांची पुस्तके आणि काही खेळ तिथे विसरले होते ते जागेवर ठेवण्यासाठी मी त्यांच्या खोलीत गेले पण जॉर्जियानाने कठोरपणे मला तिच्या गोष्टींना हात न लावण्याची तंबी दिली. काहीच काम नसल्याने मी खिडकीतून बाहेर पडणाऱ्या भुरभुरत्या हिमकणांकडे पाहू लागले. खिडकीतून समोरच्या रस्त्यावरची तुरळक वाहतूक दिसत होती. मी मुख्य फाटक

a

उघडताना पाहिले आणि एक गाडी आत शिरली. गेटशेडला खूप गाड्या येत पण त्यातील पाहुणे मला कधीच रुचले नाहीत.

दारासमोर गाडी थांबली; बेल वाजली आणि एक व्यक्ती आत आली. माझ्यासाठी या पैकी कोणतीही गोष्ट महत्वाची नसल्याने असल्याने, मी माझे सर्व लक्ष एका भुकेल्या छोट्या पक्ष्याकडे वळवले. चिमुकला पक्षी खिडकीच्याखाली भिंतीसमोर ठेवलेल्या चेरीच्या झाडाच्या उघड्या फांदीवर बसून गात होता. माझ्या न्याहारीतून अजून काही ब्रेड शिल्लक होता. मी एक एक तुकडा खिडकीच्या चौकटीवर त्याच्यासाठी टाकत होते, तेव्हढ्यात बेसी घाईघाईने पायऱ्या चढून खोलीत आली आणि मी काय करत आहे याची चौकशी केली. मी पक्ष्याला ब्रेड देण्याचे थांबल्यावर मी फर्निचरवरची धुळ झटकत होते असे सांगितले. पण तिला मुळी माझे बोलणे ऐकून घ्यायला वेळ नव्हता. तिने मला सरळ ड्रेसिंग टेबलवर नेले, साबण आणि पाणी घेऊन पटकन माझा चेहरा खसाखसा धुतला. माझे केस सरळ केले, माझा ऍप्रन काढला आणि मला लवकर खाली डायनिंग रूममध्ये जाण्याचा आदेश दिला.

मी विचारणार होते की कोण माझी वाट पाहत आहे पण बेसी आधीच दरवाजा बंद करून गायब झाली होती.

मी हळूच खाली गेले. गेले तीन महिन्यांहून अधिक काळ मामीसाहेब माझ्याशी बोलल्या नव्हत्या. इतके दिवस मी छोट्या खोलीतून फारशी बाहेर पडत नव्हते. डायनिंग रूमच्या दाराशी मी थांबले. मी घाबरून भीतीने थरथरत होते. सततच्या अन्यायी शिक्षेच्या भीतीने पुढे जाण्याची माझी हिंमत होत नव्हती; सुमारे दहा मिनिटे मी गोंधळून संकोचाने उभी होते. अचानक दरवाजाची बेल कर्कशपणे वाजली: आणि मला आत जाणे भाग पाडले गेले.

" कोण असेल बरे, जे मला मामीसाहेबांच्या खोलीत भेटू इच्छित आहेत?" मी मनाशी प्रश्न केला. " असेल की पुरुष?" मी दार उघडून पुढे सरकले. काळ्या कपड्यात एक अनोळखी व्यक्ती उभी होती. चेहरा मुखवटा घातल्याप्रमाणे मख्ख होता.

मामीसाहेब त्यांच्या नेहमीच्या जागी शेकोटीच्या जवळ खुर्चीवर बसल्या होत्या. त्यांनी मला पुढे येण्यासाठी खुण केली आणि त्या व्यक्तीशी ओळख करून दिली.

"तुम्हाला सांगितलेली ही मुलगी."

त्याने तोंड माझ्याकडे वळवलं आणि जाड काळ्या पापण्यांमधून डोकावलेल्या जिज्ञासू नजरेने माझी तपासणी करून, गंभीर स्वरात आणि अगदी हळू आवाजात विचारलं, माझं वय किती आहे..

"दहा वर्षे," माझ्या मामी साहेबांनी उत्तर दिले.

"इतके?" त्यांनी संशयाने प्रश्न केला.

आणि त्याने आणखी काही मिनिटे त्याची परीक्षा चालू ठेवली; मग मला उद्देशून, तो म्हणाला:

"बाळा, तुझे नाव काय आहे?"

"जेन आयर, सर."

हे म्हणत असताना, मी त्याच्याकडे पाहिले: तो मला मोठा वाटत होता, परंतु मला आठवते की तेव्हा मी खूप लहान होते; मला ती व्यक्ती कठोर आणि शिष्ट वाटली .

" जेन आयर, तू चांगली मुलगी आहेस का?"

होकारार्थी उत्तर देणे अशक्य होते. माझ्या सभोवतालच्या लोकांचे मत माझ्या विरोधात होते. मी गप्प रहाण्याचे पसंत केले. मामीसाहेब माझ्यासाठी

बोलल्या, आणि डोके स्पष्टपणे हलवत पटकन पुढे सांगितले: "या विषयावर आपण जितके कमी बोलू तितके चांगले होईल, मिस्टर ब्रोकलहर्स्ट."

" ठिक आहे. मला तिच्या बरोबर थोडे बोलायचे आहे."

तो स्वतः मामीसाहेबांच्या समोरच्या खुर्चीवर बसला आणि मला जवळ बोलवले.

काहीसे पुढे आलेले दात आणि मोठाले नाक पाहून मला भीती वाटली.

तो पुढे म्हणाला, "व्रात्य मुले आणि विषेशतः मुली यांसारखे जगात दु:खी कोणी नसते हे तुला ठाऊक आहे? काय वाईट माणसे मेल्यानंतर कोठे जातात?"

माझा प्रतिसाद जलद आणि सनातनी होता.

"नरकात," मी म्हणाले.

" आणि नरक म्हणजे काय? तू मला सांगशील का?"

"तो आगीचा खड्डा आहे."

"तुला या आगीत फेकून तिथे अनंतकाळ जळायला आवडेल का?"

" नाही सर."

"आणि असे नशीब टाळण्यासाठी तुम्ही काय केले पाहिजे?"

मी क्षणभर विचार केला आणि यावेळी मी जे उत्तर दिले त्यामुळे त्यांना माझ्यावर हल्ला करणे सोपे झाले.

"मी स्वतःला निरोगी ठेवून मरण दूर ठेवले पाहिजे."

"आणि तू असे करू शकशील? तुझ्यापेक्षा लहान मुले रोज मरतात. काही दिवसापूर्वी मी पाच वर्षांच्या मुलाला पुरले; पण तो चांगला होता आणि त्याचा आत्मा स्वर्गात गेला. जर तुला दुसऱ्या जगातून बोलावणे आले तर तुझ्या विषयी असेच म्हणता येणार नाही."

मी काहीच न बोलता माझी नजर खाली वळवली. आणि एक उसासा टाकला.

a

“मला आशा आहे की हा उसासा तुझ्या हृदयातून आला आहे,” मि. ब्रोकलहर्स्ट पुढे म्हणाले, “आणि तू तुझ्या परोपकारी आश्रयदातीला नेहमीच दुःख देत असल्याने तुला पश्चात्ताप करावा लागेल.”

“परोपकारी! मामीसाहेब जर परोपकारी असतील तर 'परोपकारी 'अत्यंत वाईट व्यक्ती असते असे समजायला हवे,” असा विचार माझ्या मनात आला.

“तू सकाळ संध्याकाळ प्रार्थना करतेस का?” त्यांनी माझी चौकशी चालू ठेवली.

“होय सर”

“ बायबल वाचतेस का?”

“ कधी कधी.”

“ ते वाचून आनंद होतो काय? तुला बायबल वाचायला आवडते का?”

“ मला प्रकटीकरणे, डॅनियलचे पुस्तक, उत्पत्ति, सॅम्युअल, निर्गम, किंग्ज, क्रॉनिकल्समधील काही उतारे आवडतात.”

“ आणि स्तोत्र?, मला आशा आहे की तुला ते आवडत असावीत?”

“नाही सर.”

“ अरेरे! किती लाजिरवाणी गोष्ट आहे! माझ्याकडे तुझ्यापेक्षा लहान मुलगा आहे, ज्याला आधीच सहा स्तोत्रे तोंडपाठ आहेत; आणि जेव्हा मी त्याला विचारले की त्याला जिंजरब्रेड खाणे आवडेल की श्लोक शिकणे?” त्याचे उत्तर : “मला श्लोक शिकणे आवडते, कारण देवदूत स्तोत्रे गातात आणि मला पृथ्वीवर एक छोटा देवदूत व्हायचे आहे.” आणि मग मी त्याला दोन जिंजरब्रेड दिले, त्याच्या बालपणीच्या धार्मिकतेचे बक्षीस म्हणून.

“स्तोत्र मनोरंजक नाहीत,” मी माझे निरीक्षण सांगितले.

"हा तर तुझे मन वाईट असल्याचा पुरावा आहे. तुला देवाला वाईट मन बदलण्यासाठी, शुध्द मन देण्याची विनंती केली पाहिजेस."

मिसेस रीड यांनी मला खाली बसण्याची आज्ञा दिली आणि स्वतः बोलायला सुरुवात केली.

"मला विश्वास आहे, मिस्टर ब्रोकलहर्स्ट,ती म्हणाली, "मी तुम्हाला माझ्या पत्रात तीन आठवड्यांपूर्वी नमूद केले होते की, या लहान मुलीचे वागणे आणि स्वभाव तुम्हाला आवडेल असा नाही आहे . जर तुम्ही तिला लॉवूड शाळेत प्रवेश दिलात तर मी सांगेन की प्रमुखांनी आणि शिक्षकांनी तिच्यावर लक्ष ठेवावे; मी विशेषतः त्यांना तिच्या सर्वात मोठ्या दोषापासून सावध राहण्यास सांगेन, म्हणजे खोटे बोलण्याची तिची प्रवृत्ती. मी या सर्व गोष्टी मुद्दाम तुझ्यासमोर सांगते आहे, जेन.

ती पुढे म्हणाली, जेणेकरून तू ब्रोकलहर्स्टना फसवण्याचा प्रयत्न करणार प्रयत्न करणार नाहीस."

मामीसाहेबांनी नेहमीच माझा दुस्वास केला होता. सहाजिकच मला त्यांच्या विषयी भीती आणि नावड निर्माण झाली होती. त्यांच्या सहवासात मी कधीच आनंदी राहू शकत नव्हते. त्यांची मर्जी सांभाळण्यासाठी मी बरेच प्रयत्न केले तरी मला नेहमीच नाकारले गेले. त्याचा परिणाम स्वरूप माझ्या विषयी वर उल्लेख केल्याप्रमाणे जाणीवपूर्वक एका वाईट, बिघडलेल्या मुलीचे चित्र अशा अनोळखी व्यक्ती पुढे केले की जो माझ्या भविष्यकाळाची काळजी घेणार आहे. अशाप्रकारे नवीन जीवनातील माझ्या सर्व आशा धुळीला मिळवण्यात त्या यशस्वी झाल्या. ज्या मार्गावर जाणार आहे त्या मार्गावर त्यांनी तिरस्कार आणि द्वेष पेरला होता.

मला स्वतःला मि. ब्रोकलहर्स्टच्या डोळयात एका खोटारड्या, व्रात्य आणि कृतघ्न मुलीचे चित्र उभे त्यानी उभे केल्याचे जाणवले." हा अन्याय पुसून टाकण्यासाठी मी काय करू करावे?" हा प्रश्न मनात उभा राहिला.

“काही नाही, काहीच नाही,” मी स्वतःशी विचार केला. मी माझे रडणे दाबण्याचा प्रयत्न केला आणि पटकन काही अश्रू पुसले, हे सर्व माझ्या दुःखाचा स्पष्ट पुरावा होते.

मि. ब्रोकलहर्स्ट म्हणाले, “लहान मुलामध्ये खोटे बोलणे हा एक वाईट दोष आहे आणि जो त्यांच्या आयुष्यात शेवटपर्यंत दूर होत नाही. याची शिक्षा अग्नी आणि गंधक यांच्या अथांग डोहात मिळेल; पण तिच्यावर लक्ष ठेवले जाईल. मी मिस टेंपल आणि शिक्षकांना तिच्याबद्दल सर्व कल्पना देईन.”

“मला आवडेल, मामीसाहेब पुढे म्हणाल्या, “तिचे शिक्षण तिच्या स्थितीनुसार असावे, तिला उपयुक्त आणि नम्र बनायला योग्य असे असावे. सर्व सुट्ट्या तिला लोवूड येथे घालवण्याची परवानगी मी तुम्हाला आताच देत आहे.”

“तुमची योजना अगदी योग्य आणि परिपूर्ण आहे, मॅडम, “मिस्टर ब्रोकलहर्स्टने उत्तर दिले; नम्रता हा ख्रिश्चनांचा सद्गुण आहे आणि तो विशेषतः लोवुड विद्यार्थ्यांसाठी आवश्यक आहे. त्यांच्यामध्ये ही प्रेरणा निर्माण व्हावी यासाठी मी सतत विशेष काळजी घेत असतो.

माझी मुलगी शाळेला भेट द्यायला आली तेव्हा तेथील मुली ज्यांनी केस गच्च बांधलेले होते, छोटे छोटे खिसे असलेले एप्रन घातलेले पाहिले, आणि मला म्हणाली की बाबा या मुली, गरीब मुलींसारखे कपडे घालतात, माझ्या आणि आईच्या ड्रेसकडे असे बघत होत्या की जणू त्यांनी रेशमी कपडे कधीच पाहिला नाहीत.”

“ही शिस्त मला पूर्णपणे मान्य आहे,” मामीसाहेब पुढे म्हणाल्या; “मी संपूर्ण इंग्लंडमध्ये शोधले असते तरी जेनसारख्या मुलीसाठी इतकी चांगली संस्था सापडली नसती. तिच्यासाठी दृढता, सुसंगतपणा आवश्यक आहे.”

a

"नक्कीच, मॅडम, हे पहिल्या ख्रिश्चन कर्तव्यांपैकी एक आहे आणि लोवूड येथे आम्ही ते प्रत्येक गोष्टीत पाळत आहोत: साधे अन्न आणि कपडे, साधी रहाण्याची व्यवस्था कठोर आणि कष्टदायक दिनक्रम असेल अशीच काळजी घेतली जावी असेच नियम आहेत."

"खूप छान, सर: मग मी विश्वास ठेवू शकते की या मुलीचे लॉवुड येथे स्वागत होईल, तिच्या पदासाठी आणि तिच्या भविष्यातील कर्तव्याच्या दृष्टीकोनातून तिचे पालनपोषण होईल. अशी मी आशा करते."

"निश्चितच तुम्ही करू शकता, मॅडम; तिला या आश्रयस्थानात ठेवले जाईल. आणि मला आशा आहे की तिच्या प्रवेशाचा अतुलनीय विशेषाधिकार तिला कृतज्ञ बनवेल."

"मी तिला शक्य तितक्या लवकर पाठवीन, मिस्टर ब्रोकलहर्स्ट; कारण मी प्रतीक्षा करू शकत नाही, मी तुमच्यावर एक मोठी जबाबदारी सोपवत आहे."

"शंका नाही. मॅडम, ते पुढे म्हणाले, . मी फक्त एक किंवा दोन आठवड्यात परत येईन; आणि मी मिस टेंपलला संदेश पाठवतो की तिच्याकडे एक नवीन विद्यार्थी अपेक्षित आहे आणि त्यामुळे मिस जेनच्या स्वागतास कोणतीही अडचण येणार नाही, निघतो, मॅडम."

" ठीक आहे, सर, आपल्या पत्नीला आणि मुलींना मी आठवण केली आहे असे सांगा."

"नक्कीच मॅडम. मुली", ते माझ्याकडे वळून म्हणाले, "हे बालपण मार्गदर्शक नावाचे पुस्तक आहे; त्यातील प्रार्थना वाच; पण विशेषतः मार्थाचा भाग वाच, ज्यामध्ये तिचा अचानक आणि भयंकर मृत्यू दिसेल, जिला तुझ्यासारखी खोटे बोलण्याची सवय लागली होती."

a

हे शब्द बोलून, मिस्टर ब्रोकलहर्स्टनी माझ्या हातात काळजीपूर्वक कागदाने झाकलेले एक छापील कागद ठेवला आणि, त्यांची गाडी बोलावून ते निघून गेले.

मी मिसेस रीडसोबत एकटी राहिले. काही मिनिटे शांततेत गेली. ती शिवणकाम करत होती आणि मी तिच्याकडे पहात होते.

मामीसाहेब साधारण चाळीशीच्या होत्या. हाडपेर भक्कम होते. मोठ्या हनुवटीमुळे चेहरा रुंद दिसत असे. तिचे कपाळ लहान होते, मोठे नाक; विरळ भुवया, डोळयामध्ये जाणवण्या इतपत कठोरपणा, रंग सावळा आणि केस थोडे पांढरे होते. तब्येत ठणठणीत असल्याने तिला आजारपण काय याची कल्पना नव्हती; ती एक हिशोबी आणि कुशल गृहिणी होती जी तिच्या शेताची तसेच घराची काळजी घेत होती; फक्त तिची मुले कधीकधी तिच्या अधिकार गाजवण्यावर वैतागत असत; पोशाख नीटनेटका असे. ती बसलेल्या आरामखुर्चीपासून जवळच बसून मी तिला निरखून पहात होते. तिच्या चेहऱ्याच्या सर्व वैशिष्ट्यांचा अभ्यास करताना माझ्या हातात मिस्टर बोकलहर्स्टनी दिलेले पुस्तक धरले होते ज्यात लबाडाच्या अचानक मृत्यूबद्दल सांगितले होते; माझे लक्ष त्याकडे गेलं आणि आणि जणू एक मामीसाहेबसाठी योग्य इशारा मिळाल्याची जाणीव झाली.

नुकत्याच घडलेल्या प्रसंगाचे पडसाद माझा मनात उमटत होते. मामीसाहेब, ब्रोकलहर्स्ट यांचे संभाषण आठवून मनाला वेदना होत होत्या. त्यातील प्रत्येक शब्द मनाला डंख मारत होता. प्रचंड संतापाने मी आतल्या आत धगधगत होते.

मामीसाहेबांनी हातातले काम बाजूला ठेवले आणि मला खोलीत जाण्यास फर्मावले.

माझे अस्तित्व तिच्यासाठी निःसंशयपणे दु:खदायक होते. जरी तिने स्वतः ला सावरून घेतले असले तरी, तिचा स्वर चिडका होता. मी परत जाण्यासाठी उठले.

दाराकडे निघाले; पण मी माझी पावले मागे घेतली, मी खिडकीकडे गेले, मग खोलीच्या मध्यभागी जाऊन शेवटी मी तिच्याजवळ गेले. माझ्यासाठी त्याक्षणी बोलणे आवश्यक होते; मला निर्दयपणे पायदळी तुडवले गेले होते, मला प्रतिकार करायलाच हवा होता. “पण कसा ? अशा शत्रूविरुद्ध लढण्याची माझी ताकद काय होती?” मी माझी सर्व शक्ती एकवटली आणि कसलाही मुलाहिजा न ठेवता माझ्या तोंडून शब्दबाहेर पडले, “ मी खोटारडी नाही आहे. जर खोटारडी असते तर मी तुमच्यावर माझे प्रेम आहे असे म्हटले असते. मी उघडपणे सांगते की जॉन रीड वगळता जगातील इतर कोणापेक्षाही मी तुमचा तिरस्कार करते. खोट्याची ही गोष्ट, तुम्ही ती तुमच्या मुलीला, जॉर्जियानाला देऊ शकता, कारण तीच तुमच्याबरोबर खोटे बोलते, मी नाही.”

अवाक होऊन मामीसाहेब थंडपणे माझ्याकडे पहात राहिल्या.

“तुला अजून काय सांगायचं आहे?” तिने मला अशा स्वरात विचारले की मी तिच्या वयाची एक प्रौढ व्यक्ती असावी. तिची ती नजर, तो आवाज ऐकून माझ्या मनात असलेली प्रत्येक वैरभावना उफाळून वर आली. डोक्यापासून पायापर्यंत थरथरत, एका अनियंत्रित आवेशात मी पुढे म्हणाले:-

“मला आनंद आहे की तू माझ्या नातेवाईकांपैकी नाहीस, मी तुला आयुष्यात पुन्हा कधीच, मामी म्हणून हाक मारणार नाही. मी मोठी झाल्यावर तुला भेटायला कधीच येणार नाही. तुझा नुसता विचारदेखील मला त्रास देतो आणि तू मला अतिशय क्रूर वागणूक दिली आहेस.”

“तुझी हिंमत कशी झाली, जेन?”

“माझी हिम्मत कशी झाली, मिसेस रीड? कारण ते सत्य आहे. तुम्हाला वाटते मला काही भावना नाहीत, मला जगण्यासाठी प्रेमाची, चांगुलपणाची आवश्यकता नाही तर ते खोटे आहे. मी तशी जगू शकत नाही पण तुला माझी दया

a

आली नाही. मी नेहमी लक्षात ठेवेन की तू मला कठोरपणे लाल खोलीत ढकललेस, जेव्हा मी दुःखात होते तेव्हा तू मला अजून दु:ख दिलेस आणि तरीही दुःखाने दडपून, मी तुम्हाला विनवले: "मामी, माझ्यावर दया करा! आणि ही शिक्षा, होती तुमच्या दुष्ट मुलाने मला मारले आणि जमिनीवर फेकले म्हणून मीही त्याला मारले या साठी . मला जे कोणी प्रश्न विचारतील त्यांना मी अचूक सत्य सांगेन. लोक तुम्हाला चांगले समजतात; पण तुझे हृदय कठोर आहे आणि तू खोटारडी आहेस हे लोकांना समजेल."

जेव्हा मी बोलणे थांबवले, तेव्हा मला वाटलेली विजयाची विचित्र भावना माझा ताबा घेत होती. मला विश्वास होता की एक अदृश्य बंधन तोडले आणि मी नुकतेच अनपेक्षित स्वातंत्र्य जिंकले आहे.

मला खरंच यावर विश्वास बसला, कारण मामीसाहेब घाबरल्या होत्या; अस्वस्थ दिसत होत्या आणि तिच्या आकसलेल्या चेहऱ्यावरून असे वाटत होते की ती रडायच्या बेतात आहे.

"जेन," ती मला म्हणाली, "तू चुकीची आहेस. तुला काय झाले आहे? तू इतकी का थरथरत आहेस? तुम्हाला थोडे पाणी प्यायचे आहे का?"

"नाही, मिसेस रीड."

"तुला अजून काही हवे आहे का, जेन?" मी तुम्हाला खात्री देते की मला तुझी मैत्री हवी आहे."

" नाही; तुम्ही आताच मिस्टर ब्रोकलहर्स्टसमोर दावा केला होता की मी वाईट आहे आणि लबाड आहे; पण लोवुडमधील सर्वांना तुम्ही कशा आहात ते समजेल. मी सांगेन सर्वांना."

"जेन, तुला या गोष्टी समजत नाहीत; मुलांच्या चुका सुधारल्या पाहिजेत."

a

“मी कधीच खोटे बोलत नाही. माझी काही चूक नाही,” मी मोठ्याने ओरडले.

“कबूल , जेन, तू रागावली आहेस आणि आता तुझ्या खोलीत परत जा, माझ्या प्रिय मुली, आणि थोडे झोप.”

“ मी तुमची प्रिय मुलगी नाही आणि मी शांत झोपू शकत नाही. मला लवकरात लवकर बोर्डिंग स्कूलमध्ये पाठवा मामीसाहेब कारण मला हे घर आवडत नाही.”

“ अरेरे! ठीक, मी तुला लवकरात लवकर तिकडे पाठवीन,” मामीसाहेब पुटपुटल्या हातात राहिलेले काम घेत पटकन खोलीतून निघून गेल्या.

आणि खोलीत मी एकटीच राहिले एका विजयी योध्दाच्या आविर्भावात. माझ्या छोट्याशा आयुष्यातील सर्वात कठीण लढाई मी जिंकले होते.

मि. ब्रोकलहर्स्ट जिथे बसले होते तिथे मी क्षणभर थांबले. प्रथम मी स्वतःशी हसले. मला अतिशय आनंद वाटला. नाडीचे ठोके वाढायला लागले आणि आनंद क्षणात मावळला. लहान असून मी मोठ्यांबरोबर वाद घातला होता. माझ्या संतापाचा उद्रेक मी आवरु शकले नव्हते.

मामीसाहेबांबरोबर भांडत असताना, त्यांच्यावर आरोप करत असताना, माझ्या मनात जणू एक आग धगधगत होती आता ती आग विझली होती तिथे काळ्याकुट्ट राखेशिवाय काहीच उरले नव्हते. माझ्या मनाची पण आता तशीच राखरांगोळी झाली होती.

अर्ध्या शांततेत गेला. माझ्या मनात झाल्या गोष्टींविषयी उलट सुलट विचारांचे काहूर उठले आणि मला माझ्या वागण्यातील मूर्खपणाची जाणीव झाली. द्वेष आणि द्वेषाची होणारी परिणिती याची जाणीव जागृत झाली.

a

पहिल्यांदा उगवलेला सूड, मदिरेची मादक चव चाखल्यागत अंगाला उबदारपणा देत होता पण थोड्या वेळात कडवटपणा पसरला. विष चाखल्यागत वाटू लागले आणि माझी चुक समजून आली.

खरेतर मी स्वेच्छेने जाऊन मामीसाहेबांची माफी मागितली असती; परंतु मी अनुभवाने शहाणी झाले होते. अंतःप्रेरणेने माहित होते की माफी मागितली तर मी अधिक शत्रुत्व ओढवून घेतले असते आणि त्यामुळे मी अधिक हिंसक बनले असते.

मी विचार केला की माझ्या तीव्र संतापाला खतपाणी घालणाऱ्या रागिट बोलण्यापेक्षा, माझी क्षमता वाढवण्यासाठी, माझ्यामधील कलागुणाना अधिक नैपुण्य मिळवण्यासाठी मी लक्ष देणे उचित ठरेल. मी अरेबियन नाईट्स हे पुस्तक वाचायला सुरू केले पण मला काहीच समजेना. माझे भटकणारे विचार वाचनावर केंद्रित होणे कठीण होते. मी तो नाद सोडून दिला आणि बागेत फिरायला गेले.

पाईनच्या झाडाखाली गळून पडलेली पाने, पाईनचे कोन बर्फाच्या ढिगाऱ्याखाली गाडले गेले होते. बाहेर पाहिले असता जिथे शेळया चरताना दिसत, त्या कुरणांवर पांढरा शुभ्र बर्फाचा थर दिसत होता. त्या शांत वातावरणात माझे दु:ख पुन्हा उफाळून वर आले. “मी काय करू? कुठे जाऊ?” असा स्वतः ला प्रश्न केला.

तेव्हढ्यात,” जेन कोठे आहेस? जेवायला ये” अशी बेसीची हाका मारत समोर आली.

“जेन, तू बोलवल्यावर लगेच का येत नाहीस?” बेसी थोडी रागावून बोलली. तरीसुद्धा ती बोलवायला आल्याबद्दल मला आनंद झाला. मामीसाहेबांबरोबर झालेला वादात माझी सरशी झाली असल्याने, बेसीच्या दटावणीचा माझ्या काहीही परिणाम झाला नाही.

उलट मी माझे दोन्ही हात तिच्या गळयाभोवती टाकले आणि म्हटले , “बेसी मला रागावू नको”.

माझा नेहमीपेक्षा वेगळा पवित्रा पाहून बेसी पण खुश झाली आणि म्हणाली, “ अगदी विचित्र मुलगी आहेस तू. आता तू बोर्डींग स्कूलला जाणार, नाही का?”

मी होकारार्थी मान हालवली.

“मग काय गरीब बेसीला सोडून जाताना तुला वाईट वाटत नाही का?”

“बेसीला कुठे माझ्या बद्दल प्रेम वाटते? सारखी सारखी रागवत तर असते.”

“ तू थोडी लाजाळू आहेस. थोडी धाडसी असतीस तर…”

“होय, मग आणखी मार बसला असता.”

“हा काय वेडेपणा! खरं आहे की तुला इथे चांगली वागणूक दिली जात नाही ; माझी आई, गेल्या आठवड्यात जेव्हा ती मला भेटायला आली तेव्हा मला म्हणाली की जगात कुणावर पण अशी वेळ येऊ नये पण चल, माझ्याकडे तुझ्यासाठी एक चांगली बातमी आहे.”

“मला असे नाही वाटत, बेसी.”

“ तुला काय म्हणायचे आहे? तू एवढी उदास का बरं? आज बाईसाहेब बाहेर जाणार आहेत. आपण दोघी एकत्र चहा घेऊ. मी एक छोटासा केक बनवायला घेतला आहे . तू मला तुझे कपाट आवरायला मदत करशील कारण मला लवकरच तुझी ट्रंक भरायला हवी आहे. बाईसाहेबांची इच्छा आहे की तू एक-दोन दिवसांत गेटशेड सोडावे; तुला कोणते कपडे घ्यायचे आहेत ते निवडून ठेव.”

“बेसी,' मी म्हणाले, “मला वचन दे की मी जाईपर्यंत तू मला रागावणार नाहीस.”

“ होय तसेच होईल ; पण चांगली मुलगी हो आणि कुणाला घाबरू नकोस. मला घाबरलेले आवडत नाही.”

“मला वाटत नाही की मी आता तुला कधीही घाबरणार नाही बेसी कारण मला तुझ्या वागण्याची सवय झाली आहे. मला आता दुसऱ्या अनोळखी लोकांना घाबरून रहावे लागेल.” ब्रोकलहर्स्टचा चेहरा डोळ्यासमोर आला.

a

“ जर तुम्ही त्यांना घाबरत असाल तर ते तुमचा राग करतील.”

“तू माझा राग करतेस तसा?”

“मी तुझा राग करत नाही, मला वाटते की मी तुझ्यावर इतरांपेक्षा जास्त प्रेम करते.”

“पण तू ते दाखवून देत नाहीस.”

“ही काय मोठ्या बरोबर बोलायची पद्धत झाली? लहान असून एव्हढी कशी धाडसी झालीस?”

“लवकरच मी तुझ्यापासून दूर जाईन, बेसी आणि त्याशिवाय...”

मी आणि मामीसाहेबांमध्ये जे काही घडले होते त्याबद्दल मी बोलणार होते; पण विचार केल्यानंतर, मला वाटले की या विषयावर मौन बाळगणे चांगले.

“आणि म्हणून तू मला सोडून जाण्यासाठी आनंदी आहेस?”

“नाही, बेसी, नाही, खरंच; आणि आता मला याक्षणी थोडेसे वाईट वाटू लागले आहे.”

“ या क्षणी आणि थोडेसे! तू किती थंडपणे असे म्हणत आहेस, माझे बाई! मला खात्री आहे की जर मी तुला माझे चुंबन घेण्यास सांगितले तर तू मला नकार देईल.”

“ नाही मला तुझे चुंबन घ्यायचे आहे आणि ते माझ्यासाठी आनंददायक असेल; तुझे डोके थोडे खाली कर.”

बेसीने वाकली आणि आम्ही मिठी मारली; थोड्या वेळाने आम्ही घरात गेलो.

दुपार शांततेत आणि सौहार्दात गेली. संध्याकाळी बेसीने मला छान छान गोष्टी सांगितल्या आणि गाणी सुध्दा म्हणून दाखवली.

माझ्या जीवनातही स्वच्छ सूर्यप्रकाश चमकत होता.

a

## प्रकरण 5

19 जानेवारीची सकाळ होती; सकाळी पाच वाजता बेसी मेणबत्ती घेऊन माझ्या लहानशा खोलीत आली. अर्ध्या तासापुर्वी मी सर्व आवरून कपडे घालून तयार झाले होते. बरोबर सहा वाजता मला गेट्सवुड सोडून पोर्टल पार्कमध्ये गाडी पकडायला लागणार होती.

बेसी उठून माझ्यासाठी नाष्टा बनवला. प्रवासाच्या विचाराने मला काही खाण्याची इच्छा नव्हती. शेवटी बेसीने बळजबरीने चार घास खायला आणि थोडे गरम दूध प्यायला भाग पाडले.

ती एकटीच उठली होती; शेगडी पेटवून तिने माझे दुपारचे जेवण गरम करायला सुरुवात केली. प्रवासाच्या विचाराने उत्साहात असताना मुले क्वचितच खातात. वाटेत खायला थोडी बिस्किटे, केक असा कोरडा खाऊ बॅगेत भरला. बेसीने मला थंडीसाठी कोट टोपी घालायला लावून वर शाल पांघरली. आम्ही खोलीतून बाहेर पडलो. मामीसाहेबांच्या खोलीच्या दाराशी आल्यावर मला बेसीने आत जाऊन निरोप घेणार काय असे विचारले.

“नाही, बेसी,” मी उत्तर दिले; “काल रात्री, तू जेवायला खाली गेल्यावर त्या मला भेटायला आल्या तेव्हा मला म्हणाल्या उद्या सकाळी तिला किंवा माझ्या मामेभावंडाना त्रास देण्याची गरज नाही; शेवटी मला सांगितले की त्या माझ्या हितचिंतक आहेत हे मी विसरू नये. त्यांनी माझ्यावर केलेल्या उपकाराची मी नेहमी जाणीव ठेवली पाहिजे. त्याबद्दल मी आयुष्यभर कृतज्ञ रहायला हवे.”

“ मग तू काय म्हणालीस?” बेसीने विचारले.

a

“काहीही न बोलता मी तोंडावर पांघरूण घेऊन भिंतीकडे तोंड केले.”

“हे चुकीचे होते, मिस जेन.”

“नाही, बेसी, ते अगदी बरोबर होते. तुझ्या बाईसाहेब कधीही माझ्याशी प्रेमाने वागल्या नाहीत. नेहमी माझ्या पासून दूर राहून मला शत्रूसारखी वागणूक देत होत्या.”

“अग! मिस जेन, असे बोलू नये.”

“गुडबाय गेटशेड कॅसल ,” मी गेटमधून बाहेर पडताना वाड्याचा निरोप घेतला.

चंद्र मावळला होता तरीही अजून रात्र होती. बेसीने कंदील उचलला आणि त्याच्या प्रकाशात पोर्चच्या ओलसर पायऱ्या आम्ही खाली उतरलो. हिंवाळ्यातील सकाळ थंडीने गोठलेली होती. माझे दातावर दात वाजत होते. आम्ही पोर्टर्स लॉज येथे पोहोचलो. तिथल्या मालकीणबाई शेकोटी पेटवत होत्या. आदल्या दिवशी संध्याकाळी माझी बँग तिकडे पाठवली होती. ती खाली दारात ठेवली होती. सहा वाजायला आले आणि तेव्हा चाकांच्या आवाजाने गाडी आल्याची घोषणा झाली; मी दरवाज्याकडे निघाले, बेसी कंदिलाचा प्रकाश दाखवत पुढे जात होती.

“ती एकटी जाणार आहे का?” पोर्टरच्या बायकोला विचारले.

“ होय.”

“ती किती दूर जाणार ?”

“पन्नास मैल.”

“ म्हणजे खूप दूर आहे; मला आश्चर्य वाटते की तिच्या मामीसाहेबांनी इतक्या लांबच्या प्रवासासाठी तिच्या एकटीच्या जीवावर कसे काय पाठवण्याचे धाडस केले?”

कोणी काहीच उत्तर दिले नाही.

a

दोन घोड्याच्या गाडीत समोर प्रवासी बसले होते. दरवानाने माझे सामान आत ठेवले आणि आत बसायला सांगितले, शेवटी न रहावून मी बेसीच्या गळयात पडले.

“या मुलीची चांगली काळजी घे,” तिने गाडीवानाला ओरडून सांगितले. त्याने मला आत जागेवर बसवले.

“हो,” त्याने उत्तर दिले. दार बंद होते आणि घोड्याला उद्देशून आवाज दिला: “हे ! चल” मग गाडी पुढे जात राहिली.

अशा रीतीने मी, बेसी आणि गेटशेड कॅसलपासून वेगळी झाले; पुढचा अज्ञात प्रवास मला खूप लांबचा आणि रहस्यमय वाटत होता.

मला माझ्या हा प्रवास फार थोडा आठवतो: तो संपूर्ण दिवस मला खूप मोठा वाटत होता; शेकडो मैल मागे पडले असे वाटत होते. वाटेत अनेक गावे लागली. त्यापैकी एका गावात गाडी थांबली. घोडे बदलले आणि प्रवासी जेवायला गेले. मला एका खानावळीत नेण्यात आले. तिथे गाडीवानाने मला खाण्यासाठी विचारले; पण मला भूक लागली नव्हती म्हणून त्याने मला एका मोठ्या खोलीत बसायला सांगितले, ज्याच्या दोन्ही टोकांना शेकोट्या होत्या; मध्यभागी एक झुंबर टांगलेले होते आणि खोलीच्या वरच्या बाजूला ठेवलेल्या गॅलरीत अनेक वाद्ये दिसत होती.

मी त्या खोलीत बराच वेळ फिरले, मनात उलट सुलट विचारांची गर्दी झाली होती. कोणीतरी येऊन माझे अपहरण करेल, अशी भीती वाटत होती; बेसीच्या गोष्टींमध्ये अश्या अपहरणाच्या गोष्टी असायच्या. शेवटी माझा गाडीवान आला आणि मी परत गाडीत बसले; गाडीचे दार बंद केले आणि त्याने हॉर्न वाजवला आणि आम्ही खडकाळ रस्त्याने लोवूडकडे जाण्यास सुरुवात केली. बाहेर धुके होती व हवेतील गारठा हळुहळु वाढत होता, संध्याकाळ होत आली आणि मला आपण गेटशेडपासून कायमस्वरूपी खूप दूर जात आहोत अशी भावना मनात दाटून येऊ

लागली. वाटेवरची मोठी गावे मागे पडली आणि सभोवतालचा निसर्ग पण पार बदलून गेला. मोठमोठ्या उंच टेकड्याजवळ येऊ लागल्या होत्या. संधीप्रकाशात आम्ही एक डोंगर उतरून दरीतून पुढे निघालो. अंधार पडू लागला होता. झाडाच्या मधून वाहणाऱ्या वाऱ्याचा आवाज ऐकता ऐकता मला डोळा लागला.

"येथे जेन आयर नावाची कोणी लहान मुलगी आहे का?" एक आवाज ऐकू आला.

"होय." असे मी उत्तर दिले.

मला लगेच खाली उतरवले, माझी बँग नोकराच्या स्वाधीन केली आणि घोडागाडी पुन्हा पुढे निघाली. दिवसभराच्या प्रवासाने अंग बधीर झाले होते. गाडीचा आवाज अजून कानात घुमत होता. अजून गाडीत बसल्याचा भास होत होता. सर्वत्र अंधार दाटला होता. त्यातच घोंगावणारे वारे, त्यालासोबत करणारा पाऊस. माझ्यातील सर्व बळ एकवटून मी आजूबाजूचा अंदाज घेऊ लागले. समोर एक भली मोठी भिंत होती आणि त्या मध्ये एक भक्कम दरवाजा नजरेस पडला. क्षणभरासाठी दरवाजा उघडला आणि सेविकेने मला आत नेले नंतर तिच्यामागे दरवाजा काळजीपूर्वक बंद केल्यावर कड्या कुलपे घातली गेली.

समोर एक घर होते, किंवा एका मोठ्या जागेवर एकसारखी बरीच घरे होती. समोरच्या भागात पडदे ओढलेल्या खिडक्या दिसत होत्या. त्यापैकी फक्त काही खिडकीतून प्रकाश दिसत होता. सेविकेसोबत मी एका मोठ्या वाटेने पुढे निघाले. वाटेत ओली वाळू होती. एका दरवाजातून आम्ही एका सोप्यामध्ये प्रवेश केला जिथे शेकोटी होती, तिथे मला सोडून सेविका निघून गेली.

थंडीने गारठून बधीर झालेले हात उबदार करण्याचा प्रयत्न करत मी शेकोटीच्या समोर उभी राहिले; मग मी माझ्या आजूबाजूला पाहिले तिथे प्रकाश नव्हता, परंतु शेकोटीच्या उजेडात मला जमिनीवर जाड सतरंज्या पसरलेल्या दिसून

a

आल्या, भिंतीवर पडदे होते आणि चमकदार महोगनी लाकडाच्या खुर्च्या टेबले पण दिसली.

मी एका दिवाणखान्यात होते. तो गेट्सहेडच्या दिवाणखान्याइतका शोभिवंत नव्हता, पण तरीही तो मला खूप आरामदायक वाटला. मी भिंतीवर टांगलेल्या एका चित्राचा विषय समजून घेण्याचा प्रयत्न करत असताना, कोणीतरी दिवा घेऊन आत आले; तिच्यामागे दुसरी पण एक व्यक्ती उभी होती.

पहिली एक उंच स्त्री होती. तिचे केस आणि डोळे काळे होते; कपाळ, उंच आणि फिकट, अर्धी शालीत लपलेली असली तरी धीरोदात्त आणि शालीन व्यक्ती वाटली.

मेणबत्ती टेबलावर ठेवत ती म्हणाली, "ही मुलगी खूप लहान आहे . एकटीला कसे पाठवले?"

तिने एक-दोन मिनिटे माझी बारकाईने निरीक्षण केले, मग ती पुढे म्हणाली:

"तिला लगेच झोपवावे लागेल; ती थकलेली दिसत आहे. मुली, तू थकली आहेस का?" माझ्या खांद्यावर हात ठेवत ती मला म्हणाली.

"थोडीशी , मॅडम."

" तुला भूक लागली असेल, यात काही शंकाच नाही, मिस मिलर तुम्ही तिला झोपायला पाठवण्यापूर्वी, खायला द्या. मुली, तू तुझ्या पालकांना सोडून बोर्डिंग स्कूलमध्ये येण्याची ही पहिलीच वेळ आहे का?"

मी सांगितले की मला आई-वडील नाहीत; त्यांनी मला विचारले की त्यांचा मृत्यू कधी झाला, माझे नाव काय आहे, वय किती, मला लिहता वाचता येते काय आणि शिवणकाम कसे करतात ते माहित आहे काय; मग तिने हळूवारपणे माझ्या गालाला स्पर्श केला आणि म्हणाली: "मला आशा आहे की तू चांगली मुलगी होशील;" आणि तिने मला मिस मिलरच्या स्वाधीन केले.

a

माझ्याशी नुकतीच बोललेली तरुणी एकोणतीस/तीस वर्षांची असू शकेल; तिच्या वागण्या बोलण्याने मी प्रभावित झाले. माझ्या सोबत आलेली मिस मिलर, तिच्यापेक्षा काही वर्षांनी लहान वाटत होती, पण मिस मिलर तिच्या तुलनेत सामान्य होती. फिकट पडलेला चेहरा काळजीने थकलेला वाटत होता. कामाच्या बरीच जबाबदारी असल्याचे तिच्या एकंदर घाईगडबडीतून जाणवत होते. बहुधा ती एक उप-शिक्षिका असावी, नंतर मला कळले की ती खरोखरच लॉवुड मधली सहाय्यक शिक्षिका होती.

तिच्यासोबत मला एका खोलीतून दुसऱ्या खोलीत नेले. वाटेत संपूर्ण शांतता होती, त्याची मला भीती वाटली. शेवटी एका लांबलचक, अरुंद मार्गाने आम्ही एका मोठ्या खोलीत मध्ये प्रवेश केला. आतून बराच आवाज येत होता. समोरच्या भागात दोन मोठी टेबलं होती. त्यावर प्रत्येकी दोन दोन मेणबत्त्या जळत होत्या. समोर बाकांवर मुली बसल्या होत्या. ज्यांचे वय दहा ते अठरा वीस पर्यंत असावे. त्यांची एकूण संख्या ऐंशीच्या घरात असावी. सर्वांचा एकसारखा युनिफॉर्म होता. तपकिरी रंगाच्या कपड्यापासून बनवलेले जून्या पध्दतीचे फ्रॉक्स आणि त्यावर लांब एँप्रेन घातलेला होता. अभ्यासाची वेळ होती आणि दुसऱ्या दिवशीच्या कामांची पुर्वतयारी पण सुरु होती, त्याविषयी त्यांची आपापसात कुजबुज सुरु होती.

मिस मिलरने मला दरवाजाजवळच्या बाकावर बसण्यास सांगितले; मग या लांब खोलीच्या शेवटच्या दिशेने जाताना, तिने वर्ग प्रमुखांना अभ्यासाची पुस्तके गोळा करून एकत्र करण्यासाठी सांगितले.

चार मोठ्या मुली वेगवेगळ्या टेबलवरून उठल्या त्यांनी पुस्तके घेतली आणि बाजूला ठेवली.

मिस मिलर पुन्हा ओरडली, "सर्वांचे जेवण आणा."

a

चार मुली बाहेर गेल्या आणि काही क्षणानंतर परतल्या. प्रत्येकीने एक ट्रे घेतला होता ज्यावर खाण्याचा पदार्थ ठेवला होता सुरुवातीला मी तो ओळखला नाही. त्याचे तुकडे केले होते, समभाग विद्यार्थीनींना वाटण्यात आले. ज्यांना तहान लागली त्यांनी कपातून थोडेसे पाणी घेतले. जेव्हा माझी पाळी आली तेव्हा मी पाणी प्यायले कारण मला खूप तहान लागली होती पण मी काहीही खाऊ शकले नाही. प्रवासाच्या थकव्याने माझा उत्साह आणि भूक निघून गेली होती. ट्रे माझ्या पुढून जात असताना ते रात्रीच्या जेवणासाठी पातळ कापलेले ओटकेक होते असे दिसले.

जेवण संपले, मिस मिलरने प्रार्थना वाचली आणि मुली दोन-दोन जणींची रांग करून झोपण्यासाठी बाहेर पडल्या.

त्या रात्री मी मिस मिलरसोबत झोपणार होते; तिने मला कपडे बदलण्यास मदत केली. एकदा आडवे झाल्यावर मी आजुबाजुला पाहिले. एका रांगेत अंथरूण घातली होती. दहा मिनिटानंतर, आम्हाला उजेड देणारा करणारा एकमेव दिवा विझला. मी पूर्ण अंधार आणि शांततेच्यासोबत झोपी गेले.

रात्र लवकर निघून गेली; प्रचंड वाऱ्याच्या आवाजाने मला जाग आली. बाहेर मुसळधार पाऊस पडत होता. शेजारी मिस मिलर झोपलेल्या होत्या, मी परत डोळे मिटले.

घंटेच्या मोठ्या आवाजाने माझी झोप मोडली. मुली उठल्या होत्या आणि कपडे घालत होत्या. अजून उजडायचे होते. मी अनिच्छेने उठले, कारण खूप गारठा होता. थंडीने कुडकुडत मी शक्य तितके कपडे घातले. सहा मुलींसाठी एक अशी अंघोळीसाठी सोय होती. त्याप्रमाणे माझा नंबर आल्यावर प्रातर्विधी उरकले. सर्व मुली दोन दोनच्या गटाने रांगेत उभ्या राहिल्या आणि अभ्यासाच्या खोलीत शिरल्या. आता दिवे लावले होते.

a

मिस मिलरनी प्रार्थना वाचली आणि वर्गात जागेवर बसण्याची आज्ञा केली. थोडा वेळ गोंधळ सुरु होता पण नंतर सर्व मुली चार गटात विभागल्या गेल्या.

एक एक गट अर्धवर्तुळात उभा होता. प्रत्येक गटासमोर एक एक टेबल खुर्ची होती. प्रत्येक टेबलावर बायबलचे मोठे पुस्तक होते. सर्व मुलींच्या हातात पण पुस्तके होती.

शाळेची घंटा वाजली. तीन शिक्षिका वर्गात आल्या. मिस मिलरसह चारी शिक्षिका टेबलाजवळच्या खुर्चीवर बसल्या.

दरवाजाजवळ मिस मिलरची खुर्ची होती. तिच्यासमोर लहान मुलींचा गट होता. मला लहान मुलींच्या गटा सामिल करून शेवटच्या बाकावर बसायला सांगितले.

शाळा सुरु झाली; त्या दिवशीचे धडे तसेच पवित्र शास्त्रातील काही उताऱ्यांचे वाचन झाल्यावर, मग बायबलचे वाचन सुमारे एक तास झाले. जेव्हा हे संपले तेव्हा दिवस उजाडला होता. चौथ्यांदा घंटा वाजली आणि विद्यार्थीनी पुन्हा वेगळया होऊन डायनिंग हॉलच्या दिशेने निघाल्या. काहीतरी खायला मिळण्याची शक्यता वाटून मला आनंद झाला. आदल्या दिवशी खूप कमी खाल्ल्याने मला आजारी असल्यासारखे वाटत होते.

अनाथाश्रमाचे जेवणघर म्हणजे एक मोठी अंधारी खोली होती. दोन मोठ्या चुलींवर शिजणारा पदार्थ करपल्याचा वास येत होता. दुपारच्या जेवणासाठी बनवलेल्या या पदार्थांचा करपट धुरकट वास सर्वत्र पसरला होता तो मोठ्या मुलींपर्यंत पोहोचला तेव्हा त्याच्यामध्ये नाराजी पसरली आणि कुजबुज सुरु झाली. “अरे देवा, आज पण तेच.”

“शांत बसा!” वरच्या वर्गातील एक शिक्षिका ओरडल्या. त्यांची अंगकाठी लहानखुरी होती. उत्तम पोशाख केलेला होता पण चेहऱ्यावर उदासवाणा भाव दिसत होता.

तिच्याशेजारी दुसऱ्या शिक्षिका अंगाने चांगल्या थोराड होत्या पण प्रेमळ वाटत होत्या. आदल्या दिवशी मला भेटलेल्या शिक्षिका कुठे दिसल्या नाहीत.

मिस मिलरच्या शेजारच्या खुर्चीवर एक वयस्क शिक्षिका बसल्या होत्या, यांना पाहिल्यावर त्या परदेशी असल्याचे जाणवत होते. नंतर मला समजले की, त्या फ्रेंच शिकवत असत.

एक मोठी प्रार्थना झाल्यावर सर्वांनी भजन गायले. शिक्षिकांसाठी चहा आला.

मुलींना न्याहारी दिली गेली. धुरकटलेले सूप मी जिभेवर चव घेण्यापुर्वी गिळून टाकले. तेव्हा पोटाला थोडा फार आधार वाटला पण नंतर त्या वासाने मळमळु लागले. लापशी खाण्याचा प्रयत्न केला पण ती करपली होती ती खाणे अशक्य होते. प्रत्येक मुलीने सूप पिण्याचा आणि लापशी गिळण्याचा प्रयत्न सोडून दिला. न्याहारी कोणी न खाता संपली. आम्ही मात्र न खाता देणाऱ्याचे आभार मानले आणि प्रार्थना म्हटली.

जेवणाच्या खोलीतून आम्ही अभ्यासाच्या वर्गात गेलो; मी सर्वात शेवटी होते. एक शिक्षिका सूप चाखून पहात होत्या. तिने इतरांकडे पाहिले; सर्व असमाधानी दिसत होते; त्यापैकी एक कुजबुजली:

“अतिशय वाईट बनवले आहे, हे कोणीही खाणे अशक्य आहे!”

वर्ग सुरू होण्यापूर्वी अजून अर्धा पाऊण तास बाकी होता. मुली न्याहारी बद्द्ल बोलू लागल्या. प्रत्येकीने खाण्यायोग्य नसल्याचे मत मांडले. गरीब बिचाऱ्या तेव्हढेच करू शकत होत्या. वर्गात फक्त मिस मिलर होती. तिच्याबरोबर मोठ्या

a

वर्गातील मुली तावातावाने बोलत होत्या. कोणीतरी मिस्टर ब्रोकलहर्स्टचे नाव घेतल्याचे मी ऐकले. मिस मिलर मान हलवत होती. परंतु ती मुलींना शांत करू शकली नाही. तिला पण मनातून त्यांची बाजू पटली असावी.

घड्याळात नऊ वाजले. मिस मिलर पुढे येऊन मोठ्याने म्हणाली.

“ शांतता ! आपापल्या जागांवर बसा!”

दहा मिनिटांनंतर गोंधळ थांबला आणि हे सर्व गोंगाट करणारे आवाज पुन्हा शांत झाले. इतर शिक्षक पण आपल्या जागेवर पुन्हा रुजू झाले होते; शाळेत संपुर्ण शांतता होती.

ऐंशी मुली शांतपणे आपापल्या बाकांवर बसल्या होत्या. वेगवेगळ्या वयाच्या मुलींचा समुदाय तिथे एकत्र झाला होता. सर्व मुलींनी केस चापून चोपून विंचरून कानामागे घट्ट वेण्या घातल्या होत्या. एखादी चुकार बट कपाळावर येण्यास सक्त मनाई होती. लांब तपकिरी रंगाचे गणवेशाला गळ्याभोवती अरूद कॉलर होती. समोरच्या बाजूस एक खिसा शिवलेला होता जो वेळ प्रसंगी कामाची पिशवीसारखा उपयोगी पडे. त्यांनी लोकरीचे मोजे आणि खेड्यातील कष्टकरी लोकांसारखे शूज घातले होते, ज्याला साध्या तांब्याच्या तारेचे बकल होते. त्यापैकी काही मुली वीस/ एकवीस वर्षांच्या तरुणी होत्या. या असल्या पोशाखात त्या गबाळ्या दिसत. त्याचे सौंदर्य जणू या पोशाखाने केले हिरावून घेतले होते.

मी त्यांच्याकडे पहात होते, त्या वेळी इतर शिक्षिकांकडे पण माझी नजर वळत होती. मला कोणीच मनाला भावल्या नाहीत. थोराड अंगाबांध्याच्या शिक्षिका थोड्या साध्यासुध्या होत्या, लहानखोर शिक्षिका रागिट वाटत होत्या, फ्रेंच शिकवणाऱ्या बाई कठोर आणि व परक्या वाटत होत्या. मिस मिलर, स्वभावाने गरीब होती. रंग लालसर होता, आणि काळजी धास्तावलेली दिसत होती; मी सर्व पहात होते.

तेव्हढ्यात सर्वजणी एकदम उभ्या राहिल्या. माझा पण कोणी हात धरून मला उभे रहायला सुचवत होते पण मला समजायला वेळ मिळण्याआधीच वर्ग पुन्हा बसला होता.

सर्वांचे लक्ष त्याच आत येणाऱ्या व्यक्तीकडे लागले होते. मी त्या दिशेने पाहिले आणि मला खोलीत तीच व्यक्ती दिसली जिने माझे आदल्या दिवशी स्वागत केले होते. ती लांब खोलीच्या मागच्या बाजूला शेकोटीजवळ उभी होती; खोलीच्या प्रत्येक टोकाला एक शेकोटी होती. तिने मुलींच्या बाकांवर गंभीरपणे आणि शांतपणे नजर टाकली. मिस मिलर तिच्याकडे गेली, आणि तिच्याबरोबर विचार विनिमय करून परत ती तिच्या जागी आली आणि मोठ्याने म्हणाली:

''सर्व जणी गोलाकार बसा''.

सर्वजणी बसत असता ती हळूहळू वर्गात फिरत होती. तिच्या पावलांवर माझी नजर आदराने लवली होती. आजही ती वंदनीय भावना माझ्या मनात वसते आहे. आदल्या रात्री मला नीटपणे पाहता आले नव्हते. दिवसा ती मला सुंदर, उंच आणि सुबक दिसली; तिच्या तपकिरी डोळयांत दयाळूपणा चमकत होता; तिचे काळेभोर केस, कुरळे होते. तिचा पोशाख जांभळ्या रंगाचा होता आणि काळ्या मखमलीमध्ये स्पॅनिश दागिन्यांनी सजवलेला होता आणि तिच्या कमरेच्या पट्ट्यावर सोन्याचे घड्याळ चमकत होते, जे तेव्हा आजच्यापेक्षा दुर्मिळ होते. फिकट गुलाबी रंग, एक प्रतिष्ठित आणि उमदे व्यक्तिमत्व या वर्णनावरुन, मिस टेंपलची कल्पना वाचकांना येऊ शकेल. त्यांचे मेरी टेंपल हे नांव मला नंतर समजले, जेव्हा त्यांनी मला एक प्रार्थना पुस्तक चर्चमध्ये नेऊन देण्यास सांगितले होते त्या पुस्तकावर त्यांचे नांव लिहलेले मी वाचले.

मिस मेरी टेंपल लोवुड शाळेच्या मुख्याध्यापिका आणि अनाथाश्रमाच्या व्यवस्थापक होत्या. खुर्चीवर बसण्यापुर्वी त्यांनी हातातील पृथ्वीचा गोल टेबलावर

ठेवला. त्यांनी त्यांच्याभोवती मोठ्या मुलींचा वर्ग गोळा केला आणि भूगोलाचा धडा सुरू केला.

इतर वर्गांना दुसऱ्या शिक्षकांनी बोलावले, आणि तासभर व्याकरण आणि इतिहासाची पुनरावृत्ती झाली, नंतर लेखन आणि अंकगणित शिकवले.

काही मोठ्या मुलींना मिस टेंपलने नंतर संगीताचे धडे दिले. घड्याळाप्रमाणे प्रत्येक धडे पुर्ण झाले.. दुपारचे 12 वाजले आणि मुख्याध्यापिका उभ्या राहिल्या.

“मला लॉवुडच्या विद्यार्थीनींना सांगायचे आहे,” त्यांनी घोषणा केली.

अभ्यासाचे तास संपल्यावर सुरु झालेली बडबड मिस टेंपलच्या आवाजाने लगेच थांबली. त्या पुढे म्हणाल्या:

“तुम्ही आज सकाळी नाश्ता केला होता जो तुम्ही खाऊ शकला नाही; तुम्हाला भूक लागलीच असेल, मी तुम्हाला ब्रेड आणि चीजचा नाश्ता देण्याची ऑर्डर दिली आहे.”

शिक्षकांनी आश्चर्याने एकमेकांकडे पाहिले.

“मी या गोष्टीची जबाबदारी स्वतःवर घेते,” असे म्हणून जणू तिच्या आचरणाचे स्पष्टीकरण देत त्या अभ्यासाच्या खोलीतून निघून गेल्या.

ब्रेड आणि चीज आणले आणि वाटले गेले. संपूर्ण शाळेला खूप समाधान वाटले; त्यानंतर वर्गाला बागेत जाण्यास सांगितले. सर्व मुलीं सोबत मी पण बागेत फेरफटका मारण्यासाठी निघाले.

बाग एका मोठ्या जागेवर तयार केली होती. सर्व बाजू उंच भिंतींनी बंदिस्त केल्या होत्या. एका बाजूला लांब रुंद ओसरी होती. तिच्या छपरावर वेगवेगळ्या प्रकारचे वेल चढवले होते. मध्यभागी लहान मोठे वाफे बनवलेले होते. हे वाफे विद्यार्थीनींना लागवडीसाठी दिले जात. प्रत्येकीच्या वाटणीला एक लहान वाफा दिली जात असे. त्यात लागवड करण्यासाठी, पाणी देणे, मशागत करणे ही कामे,

त्या त्या विद्यार्थीनींवर सोपवली जात. उन्हाळ्यात, फुलांनी बहरलेले वाफे, बागेची शोभा वाढवत असत. पण जानेवारीच्या शेवटी सर्व काही गोठलेले होते. बाग उदासवाणी दिसत होती. मी थंडीने कुडकुडत होते. माझ्या आजूबाजूला पाहिले तो दिवस मैदानी व्यायामासाठी अनुकूल नव्हता; पाऊस नव्हता पण दाट धुके दाटून आले होते. आदल्या दिवशीच्या वादळी पावसाने जमीन ओली झाली होती. काही मोठ्या मुली खेळात गुंतल्या होत्या; काही अशक्त लहान मुली छपरा खाली ओसरीवर थंडीपासून बचाव करण्यासाठी गेल्या. थंडीमुळे बऱ्याच जणी सर्दी, खोकल्याने त्रासल्या होत्या.

मी अजून कोणाशी बोलले नव्हते आणि कोणी माझ्याकडे लक्ष दिलेले दिसत नव्हते. मला एकटेपणाची सवय झाली होती. मी ओसरीच्या एका खांबांवर मी टेकून उभी होते. मी अंगावरचा कोट छातीवर घट्ट पकडून धरला होता; बाहेरची थंडी आणि आतून आतडे कुरतडणारी भूक विसरण्याचा मी प्रयत्न करत होते. माझी विचारशक्ती गोठून गेली होती. मला अनाथाश्रमाविषयी त्रोटक माहिती होती. गेटशेड आणि माझे भूतकाळाचे जीवन माझ्या नजरे समोर तरळत होते. दु:खदायक भूतकाळ आणि गोंधळून गेलेला वर्तमानकाळ, यावरून मी भविष्याबद्दल कोणतेही अनुमान तयार करू शकले नाही.

मी त्या बागेकडे पाहू लागले, जी कॉन्व्हेंटची आठवण करून देत होती; मग माझी नजर घराकडे गेली, जिचा एक भाग राखाडी आणि जुना होता, तर दुसरा पूर्णपणे नवीन दिसत होता. नवीन भाग, ज्यामध्ये अभ्यासाचा वर्ग आणि वसतिगृहे होती, जाळीदार खिडक्यांमुळे त्याला चर्चचे स्वरूप प्राप्त झाले. प्रवेशद्वाराच्या जवळ ठेवलेल्या एका मोठ्या दगडावर एक शिलालेख होता:

लॉवुड इन्स्टिट्यूट: हा भाग ब्रोकलहर्स्ट कॅसलच्या नाओमी ब्रोकेलहर्स्टने या काउंटीमध्ये बांधला होता.

a

तुमचा प्रकाश लोकांसमोर चमकू द्या, जेणेकरून ते तुमची चांगली कामे पाहू शकतील आणि तुमच्या स्वर्गातील पित्याचे गौरव करतील. (सेंट मॅथ., v. 16.)

हे शब्द एकदा वाचल्यानंतर आणि नंतर परत वाचल्यानंतर देखील मला त्यांचा अर्थ पूर्णपणे समजू शकला नाही. मी संस्था म्हणजे काय याचा विचार करत होते आणि शिलालेखाचा पहिला भाग आणि बायबलमधील श्लोक यांच्यात काय संबंध असू शकतो हे शोधण्याचा प्रयत्न करत होते.

जेव्हढ्यात खोकल्याचा आवाज ऐकू आला. दगडी बाकावर माझ्याजवळ एक मुलगी बसलेली दिसली; तिने एक पुस्तक डोळ्यासमोर धरले होते त्यामुळे तिचा चेहरा दिसत नव्हता. मी उभी होते तिथून पुस्तकाचे शीर्षक वाचले: ते ‘हिस्ट्री ऑफ रसेलास ', असे होते; नाव मला विचित्र वाटले आणि त्यामुळे माझी उत्सुकता ताणली गेली. पुस्तकाचे पान उलटून त्या मुलीने वर पाहिले, मी तिच्याशी बोलण्याची संधी घेतली.

“ पुस्तक मजेदार आहे का?” मी विचारले.

तिच्याकडून वाचायला मागून घेण्याचा बेत मी आधीच तयार केला होता.

“हो, माझे आवडते पुस्तक आहे,” तिने माझ्याकडे पहात उत्तर दिले .

“पुस्तक कशाबद्दल आहे?” मी पुढे जाऊन विचारले.

अशा प्रकारे अनोळखी व्यक्तीशी संवाद साधण्याचे धाडस मी प्रथमच करत होते. हा आगाऊपणा माझ्या स्वभावाच्या आणि सवयींच्या विरुद्ध होता. तिला वाचताना पाहून मला तिच्या विषयी आत्मीयता वाटली. मलाही लहान मुलांच्या गोष्टी वाचायला आवडायच्या. गंभीर विषयावरची पुस्तके समजत नव्हती.

“तू ते पाहू शकतेस,” अनोळखी मुलीने मला पुस्तक देऊ केले.

मला पटकन चाळून माझी खात्री पटली की ते एक कंटाळवाणे पुस्तक असावे. मला फक्त लहान मुलांच्या गोष्टी आवडत होत्या. त्या पुस्तकात परी किंवा

राक्षस काही दिसले नाहीत; म्हणून मी ते तिला परत केले. तिने शांतपणे परत वाचायला सुरुवात केली. मी तिला पुन्हा व्यत्यय आणला आणि विचारले,

“तू सांगू शकतेस का?, या दगडावर कोरलेल्या शिलालेखाचा अर्थ काय? लॉवुड इन्स्टिट्यूशन म्हणजे काय?”

“हे ते घर आहे जिथे आपण राहात आहोत.”

“आपण त्याला संस्था का म्हणतो? ते इतर शाळांपेक्षा वेगळे आहे का?”

“ही अंशतः धर्मादाय शाळा आहे; तू, मी आणि इतर सर्व विद्यार्थींनी येथे आश्रीत आहोत; मला वाटते तू पण अनाथ असशील. तुझे आई अथवा वडील हयात नसावेत. नाही का?”

“मी तीन चार महिन्याची असतांना दोघेही मरण पावले.”

“बरं, इथल्या मुलींनी त्यांच्या पालकांपैकी एक तरी गमावला आहे आणि म्हणूनच या शाळेला अनाथांच्यासाठी शिक्षण संस्था म्हटले गेले.”

“ आमच्याकडून काहीही पैसे न घेता आमची देखभाल केली जाते?”

“आपले परिचित नातेवाईक वर्षाला 15 पौंड देतात.”

“मग आम्हाला आश्रीत मुले का म्हणतात?”

“ कारण 15 पौंड रक्कम आमच्या देखभाल आणि शिक्षणाचा खर्च भागवण्यासाठी पुरेशी नाही, त्याची उणीव वर्गणी काढून पुरी जाते.”

“ ही वर्गणी कोण देतात?”

“आजूबाजूच्या परिसरात किंवा अगदी लंडनमध्ये राहणारे दानशूर लोक.”

“आणि ह्या नाओमी ब्रोकलहर्स्ट कोण आहेत?”

“शिलालेख लिहल्याप्रमाणे, या घराचा नवीन भाग बांधणारी स्त्री होती. त्यांचा मुलगा आता शाळेचा सरव्यवस्थापक आहे.”

“का बरे ?”

“कारण तो खजिनदार आणि आस्थापनाचा प्रमुख आहे.”

“म्हणजे हे घर सोन्याचे घड्याळ असलेल्या या शिक्षिकेचे नाही ज्यांनी आपल्याला ब्रेड आणि चीज दिले होते?”

“छे छे! त्या मिस टेंपल आहेत. माझी इच्छा आहे की त्याच असायला हव्या होत्या परंतु त्यांना मिस्टर ब्रोकलहर्स्ट यांच्या हुकुमाप्रमाणे वागावे लागते. ते आपले अन्न आणि कपडे खरेदी करतात.”

“मिस्टर ब्रोकलहर्स्ट इथे राहतात काय?”

“नाही; ते लॉवुडपासून दोन मैलांवर असलेल्या त्यांच्या वाड्यात राहातात.”

“ ते चांगले आहेत का?”

“ते एक पाद्री आहेत, त्यांनी की चांगले काम करणे अपेक्षित असते.”

“ त्या उंच शिक्षिका मिस टेंपल आहेत नाही का?”

“होय.”

“आणि इतर शिक्षिकेंची नावे काय आहेत?”

“ त्या तिकडे मिस स्मिथ उभ्या आहेत, त्या शिवणकाम शिकवतात आणि देखरेख करतात; कारण आपणच स्वतः आपले कपडे, कोट आणि इतर सर्व कपडे बनवतो.

काळे केस असलेली ती लहानसर शिक्षिका मिस स्कॅचर्ड आहे, त्या इतिहास आणि व्याकरणाचे धडे देतात आणि दुसरीच्या वर्गाला शिकवतात. त्या शेवटी, ज्यांनी शाल गुंडाळली आहे आणि खिशाला रुमाल बांधला आहे, त्या आहेत मॅडम पियरोट; त्या ‘लायल’ येथून आल्या आहेत. त्या फ्रेंच शिकवतात.”

“ तुला शिक्षिका आवडतात?”

“ होय.”

" काळे केस असलेल्या लहानसर दिसणाऱ्या बाईंचे नांव काय आहे? तुला कशा वाटतात?

"त्या मिस स्कॅचर्ड चिडखोर आहेत, त्या दुखावल्या जाणार नाहीत याची काळजी घ्यावी लागेल."

"मिस पियरोट एक चांगली व्यक्ती आहे."

"पण मिस टेंपल सर्वात चांगल्या आहेत, नाही का?"

- हो! मिस टेंपल खूप छान आहेत; त्यांना खूप काही माहिती आहे; त्या इतर शिक्षिकांपेक्षा श्रेष्ठ आहेत, कारण त्यांचे सर्वांपेक्षा अधिक शिक्षण झाले आहे."

"तू लॉवुडमध्ये किती दिवस रहात आहेस?"

"दोन वर्ष."

"तू अनाथ आहेस का?"

"मला आई नाही."

"तू इथे आनंदी आहेस का?"

"तू मला बरेच प्रश्न विचारत आहेस; आपण आतापर्यंत पुरेसे बोललो आहोत, मला थोडे वाचायचे आहे."

पण त्याच क्षणी जेवणाची घंटा वाजल्याने सर्वजण परतलो.

जेवणाच्या खोलीत भरलेला वास सकाळच्या न्याहारीपेक्षा फारसा बरा नव्हता. जेवण दोन मोठ्या डिशेसमध्ये दिले गेले होते, वितळलेल्या चरबीच्या वाफा निघत होत्या. चव नसलेले बटाटे आणि मांस सर्व एकत्र शिजवलेले होते. प्रत्येक विद्यार्थ्याला बऱ्यापैकी मोठा भाग मिळाला; जेव्हढे खाणे शक्य होते तेव्हढे मी खाल्ले. रोज रोज असेच खाणे असेल तर कसा काय निभाव लागणार असा विचार करत कसेबसे पोटात ढकलले. .

a

जेवण झाल्यावर आम्ही स्टडी रूममध्ये गेलो; धडे पुन्हा सुरू झाले आणि पाच वाजेपर्यंत चालले. दुपारी कोणत्याही लक्षात रहाण्यासारखा प्रसंग घडला. मी ज्या मुली सोबत ओसरीवर गप्पा मारत होते, तिला मिस स्कॅचर्डने इतिहासाच्या तासाला उभे केले. मला कारण समजले नाही. तिला वर्गात मध्यभागी उभे राहण्याची शिक्षा दिली होती. ही शिक्षा मला फार अपमानास्पद वाटली. तेरा ते चौदा वर्षांच्या मुलीला अशी शिक्षा अपमानास्पद शिक्षा करणे अयोग्य होते पण मला आश्चर्य वाटले की ती मुलगी रडली नाही किंवा रागाने लाल झाली नाही. अगदी शांत आणि गंभीरपणे, ती तिथेच उभी राहिली. “सर्व वर्गा समोर एवढ्या शांततेने आणि खंबीरपणाने ती हे कसे सहन करेल? जर मी तिच्या जागी असते तर मला धरणी मातेने पोटात घ्यावे अशी इच्छा झाली असती,” असे मला वाटल.

पण ती मुलगी वेगळ्याच विचारात गुंतली असल्यासारखे वाटत होते. तिला शिक्षेचे दु:ख वा अपमानाची जाणीव झाल्याचे दिसत नव्हते. सभोवताली काय चालले आहे या पासून ती अलिप्त दिसत होती. तिचे डोळे जमिनीवर खिळले होते पण ती अंतर्मुख होऊन वेगळ्याच विचारात गर्क होती; नक्कीच ती वर्तमानात नव्हती. ही कशी मुलगी असेल चांगली की वाईट असा प्रश्न मला पडला पण उत्तर सापडले नाही. जेव्हा पाच वाजले तेव्हा आम्हाला एक कप कॉफी आणि काळ्या ब्रेडचा तुकडा दिला गेला; मी माझी कॉफी प्यायले आणि माझी ब्रेड खाऊन टाकला; पण मला आणखी हवे होते, मला अजून भूक लागली होती. शेवटी अर्धा तास करमणूक मग पुन्हा अभ्यास.रात्री एक ग्लास पाणी आणि ओटकेकचा तुकडा खाल्यानंतर प्रार्थना झाल्यावर सर्वजणी झोपायला गेले.

माझा लोवूडमधला पहिला दिवस असा गेला.

## प्रकरण 6

दुसऱ्या दिवसाची सुरुवात पहिल्या दिवसाप्रमाणेच झाली; आम्ही उठलो, मेणबत्तीच्या प्रकाशात कपडे घातले; पण त्या दिवशी सकाळी आमचा कपडे धुण्याचा कार्यक्रम पुढे ढकलला गेला, कारण तलावामधील पाणी गोठले होते. आदल्या संध्याकाळी तापमानात बदल झाला होता; खिडक्यांतून रात्रभर वाहणारा वारा पलंगावर थरथर कापायला लावत होता.

प्रार्थनेसाठी आणि बायबल वाचनासाठी दीड /दोन तास लागले, मी थंडीने जवळजवळ गोठल्यासारखी झाले होते.

सकाळची न्याहारी आली. आज खिचडी करपली नव्हती, खाण्यायोग्य बनवली होती पण प्रत्येकीच्या वाटणीला भुकेच्या मानाने निम्मीच आली होती.

त्या दिवशी मला चौथीच्या वर्गात प्रवेश दिला आणि मला गृहपाठ देण्यात आला. तोपर्यंत मी फक्त लॉवूडचा निरीक्षक होते; आता मी तेथील विद्यार्थीनी बनणार होते. मला मनापासून शिकण्याची सवय नसल्याने सुरुवातीला अभ्यास मोठा अवघड वाटला; एका विषयातून दुसऱ्या विषयाकडे सतत जाण्याने मी गोंधळात पडले होते.

दुपारी तीनच्या सुमारास मिस स्मिथने मला दोन मीटर लांबीची एक मलमलची पट्टी, अंगठा आणि सुया दिल्या आणि खोलीच्या एका कोपऱ्यात बसून हेम करण्याची शिकवणी सुरू केली. यावेळी जवळजवळ सर्वजणी शिवणकाम करत होत्या. मिस स्कॅचर्डच्या खुर्चीभोवती गट करून काही विद्यार्थीनी मोठ्याने वाचत होत्या. धडा काय आहे हे एकूण येत

a

होते प्रत्येक विद्यार्थीनी कशी वाचते ते लक्षात येत होते. त्या कडे शिक्षकांची बारीक नजर होती ते त्यांनी वेळोवेळी केलेल्या टीकेवरून किंवा प्रशंसेवरून समजत होते.

इंग्रजी इतिहासाच्या वाचनामध्ये काल भेटलेली मुलगी सुरवातीला पहिल्या रांगेत होती; पण उच्चारातील काही त्रुटींमुळे आणि थोडे दुर्लक्ष झाल्याने तिला परत मागच्या रांगेत पाठवण्यात आले. मिस स्कॅचर्ड सतत तिच्यावर टीका करत होत्या.

'बर्न्स' तिचे आडनाव होते. "बर्न्स, नीट बैस. वर्ग सुरू असताना चुळबूळ नको. आपापसात बोलणे बंद. बर्न्स, तू तोंड का वेडेवाकडे केलेस? खांदे पाडून बसू नको. माझ्या वर्गात हे चालणार नाही." सतत तिला धारेवर धरले होते.

अध्याय दोनदा वाचून झाल्यावर पुस्तके बंद करून प्रश्नोत्तरे सुरू झाली. त्यात किंग चार्ल्सच्या कारकिर्दीचा काही भाग होता; याबद्दल अनेक प्रश्न होते ते बहुतांश विद्यार्थीनींना उत्तर देणे शक्य झाले नव्हते. मिस बर्न्सने सर्वांची अचूक उत्तरे दिली. तिने संपूर्ण धड्याचा अभ्यास केलेला दिसत होता. मला वाटले मिस स्कॅचर्ड त्याची चांगली नोंद घेईल पण उलट मी त्यांना अचानक असे रागाने बोलताना ऐकले:

" बर्न्स तू आज सकाळी तुझी नखे साफ केलेली दिसत नाहीस."

तिने काहीच उत्तर दिले नाही; तिच्या मौनाचे मला आश्चर्य वाटले.

"का,?" मी विचार केला, "का ती स्पष्ट बोलत नाही की पाणी गोठल्यामुळे तिला नखे किंवा चेहरा धुता आला नाही?"

पण या क्षणी मिस स्मिथ माझ्याशी बोलली, मी कधी बोर्डिंग स्कूलमध्ये गेले आहे का, मला मार्किंग, शिवणे, विणणे कसे माहित आहे हे विचारले; आमचे बोलणे पूर्ण होईपर्यंत, माझे मिस स्कॅचर्डच्या बोलण्याकडे माझे दुर्लक्ष झाले. जेव्हा मी माझ्या जागेवर परतले तेव्हा तिने बर्न्स काय आज्ञा केली होती ज्याचे महत्त्व मला

ते पूर्णपणे समजले नाही पण मी पाहिले की बर्न्स ताबडतोब खोलीतून बाहेर पडली, एका छोट्या खोलीत गेली जिथे पुस्तके ठेवली होती आणि एका मिनिटात परत आली, तिच्या हातात एक वेताची छडी होती. तिने ती मिस स्कॅचर्डला दिली आणि शांतपणे हात पुढे केला. मिस स्कँचरने हातावर जोरदार प्रहार केला पण तिच्या तोंडातून हूं की चूं आले नाही की डोळ्यातून पाणी. मी शिवणकाम बंद केले. तिच्यावरील अन्याय पाहून मी रागाने थरथर कापू लागले पण बर्न्सच्या चेहऱ्यावर शांतपणा होता.

"तू कोडगी मुलगी आहेस," मिस स्कॅचर्ड ओरडली, "तुझ्यामध्ये सुधारणा होणे अशक्य आहे. जा छडी जागेवर ठेव!"

बर्न्सने शांतपणे आज्ञा पाळली. ती खोलीतून बाहेर पडताना मी तिच्याकडे निरखून पाहिले: ती तिचा रुमाल परत खिशात ठेवत होती आणि तिच्या पातळ गालावर अश्रू चमकत होते.

संध्याकाळची सुट्टी हा दिवसभरातील सर्वात आनंददायी तास होता. पाच वाजता दिलेला ब्रेड आणि कॉफी याने भूक शांत झाली नाही तरीही थोडी तरतरी आली. दिवसभराच्या श्रमाचा थोडा विसर पडला. अभ्यासाची खोली सकाळपेक्षा जास्त उबदार होती. मेणबत्ती अजून पेटवली नव्हती. चूलीच्या मंद उजेडात मुलींचा आपापसातील बोलण्याचा आवाज ऐकू येत होता. स्वातंत्र्याची गोड संवेदना जागी झाली.

त्या दिवशी संध्याकाळी जेव्हा मिस स्कॅचर्डला बर्न्सला शिक्षा केली तेव्हा मी घोळक्यात फिरत होते पण माझी म्हणून कोणी मैत्रीण नव्हती. तरी मला एकटे वाटले नाही. खिडक्यांचे पडदे ओढून मी बाहेर बघत होते. बर्फ पडत होता; भिंतीजवळ बर्फाचा ढीग झाला होता. खिडकीजवळ वाऱ्याचा जसा आवाज ऐकू येत होता तसाच माझ्या मनातून दु:खद आक्रोश बाहेर पडत होता. मनात उलटसुलट

विचार येत होते. जर मी माझ्या स्वतःच्या घरातून आई वडीलांपासून दूर या अश्या ठिकाणी आले असते तर निश्चितच खूप दु:खी झाले असते पण मी ज्या परिस्थितीतून इथे आले होते, त्यामुळे इथे येण्याचे दु:ख वाटण्याऐवजीं मनात एक विचित्र उत्साह, बेपर्वा वृत्ति आणि तापदायक विचार असा गोंधळ उडला होता. असे वाटत होते की जोरजोराने वारा वहावा, सर्वत्र अंधार पसरावा त्यामुळे एक प्रचंड कोलाहल माजेल.

बाकांवर उडी मारत, टेबलांखाली रेंगाळत मी चूल गाठली आणि फायर गार्डसमोर गुडघे टेकले. येथे मला बर्न्स वाचनात गढून गेलेली दिसली. खोलीत काय चालले आहे याकडे तिचे अजिबात लक्ष नव्हते. सर्व लक्ष देऊन ती ज्योतीच्या प्रकाशात एक पुस्तक वाचत होती.

"पुन्हा रसेलस का?" मी तिच्या मागे उभं राहून विचारले.

"होय, तिने उत्तर दिले, मी आत्ताच ते पूर्ण केले."

पाच मिनिटांनी तिने खरं तर पुस्तक बंद केलं; मला त्याचा खूप आनंद झाला.

"आता," मला वाटलं, "तिला माझ्याशी थोडं गप्पा मारायच्या असतील."

मी जमिनीवर तिच्या शेजारी बसले.

"बर्न्स तुझे नाव काय आहे?" मी विचारले.

"हेलेन."

" तू लांबून आली आहेस का?"

"मी स्कॉटलंडजवळच्या उत्तरेकडील देशातून आली आहे."

"तू कधी परत जाशील ?"

"मला अशी आशा आहे, परंतु पुढे काय होणार याची कोणालाही खात्री देता येत नाही."

“तुला लॉवुड सोडायचे आहे?”

“नाही; मला ते हवे आहे. मला माझ्या शिक्षणासाठी लोवूडला पाठवण्यात आले; ते पूर्ण होण्याआधी निघून गेल्याने मला काय फायदा होईल?”

“पण मिस स्कॅचर्ड तुझ्यासाठी खूप क्रूर वागत आहे!”

“ क्रूर ? नाही; ती गंभीर आहे; तिला माझ्या चुका आवडत नाहीत.”

“जर मी तुझ्या जागी असते तर मी तिचा द्वेष केला असता; माझ्या वरच्या अन्यायाला विरोध केला असता; जर तिने मला काठीने मारले तर मी ती तिच्या हातातून काढून घेऊन तिच्या नाकासमोर टिच्चून मोडून टाकली असती!”

“हे शक्य नाही; पण जर तू असे केले तर मिस्टर ब्रोकलहर्स्ट तुला शाळेतून काढून टाकतील आणि तुझ्या पालकांसाठी ही खूप दुःखाची बाब असेल. असे अविचारी कृत्य करण्यापेक्षा तू एकट्याने वेदना सहन करणे अधिक चांगले आहे. तुमच्या चुकीचे परिणाम तुमच्या संपूर्ण कुटुंबाला भोगावे लागतील; आणि याशिवाय बायबल आपल्याला वाईटासाठी चांगल्याची परतफेड करण्याची आज्ञा देते.”

“पण छडीने मारणे, भर वर्गात एकट्याला शिक्षा करणे अयोग्य आहे, विशेषत: तुझ्या या वयात; मी तुझ्यापेक्षा खूप लहान आहे, आणि मी हे कधीही सहन करू शकत नाही.”

“तरीही तुम्ही ते टाळू शकत नसाल तर ते सहन करणे तुमचे कर्तव्य असेल. तुमच्या नशिबी जे सहन करावे लागेल ते तुम्ही सहन करू शकत नाही असे म्हणणे चुकीचे आणि भ्याडपणाचे आहे.”

मी आश्चर्याने तिचे म्हणणे ऐकले, सहनशीलतेची ही शिकवण मला समजू शकली नाही आणि ज्यांनी तिला शिक्षा केली त्यांच्याबद्दल तिने दाखवलेला हा संयम मी स्वीकारू शकले नाही. मला असे वाटले की मला न दिसणाऱ्या, न जाणवणाऱ्या गोष्टींचा हेलेन बर्न्स विचार करत असावी. मला वाटले कदाचित ती

बरोबर असेल आणि मी चूक; पण या प्रकरणाचा खोलात जाऊन विचार करण्याची माझी इच्छा नव्हती.

"तू म्हणतेस की तुझ्यामध्ये दोष आहेत, हेलेन; ते काय आहेत? मला तर तू छान वाटतेस."

"मग दिसण्यावरून न्याय करू नका हे माझ्याकडून शिका. मिस स्कॅचर्डनी म्हटल्याप्रमाणे मी खूप बेफिकीर आहे; मी क्वचितच गोष्टी व्यवस्थित ठेवते आणि मी वस्तू जागच्या जागी ठेवत नाही; मी नियम विसरते; जेव्हा मला अभ्यास करायला हवा असतो तेव्हा मी पुस्तके वाचत असते; माझ्याकडे अभ्यासाची योग्य पद्धत नाही; मी कधीकधी तुझ्याप्रमाणेच म्हणते की मी नियमांच्या अधीन राहणे सहन करू शकत नाही. हे सर्व मिस स्कॅचर्डला खूप त्रासदायक वाटते, ती स्वतः नीटनेटकी आणि अचूक आहे."

"भांडखोर आणि दुष्ट ," मी जोडले.

पण हेलेनला ही जोड मंजूर करायची नव्हती; पण ती गप्प राहिली.

"मिस टेंपल मिस स्कॅचर्डइतकी कठोर आहे का?"

मिस टेंपलचे नाव ऐकून तिच्या गंभीर चेहऱ्यावर मंद हास्य उमटले.

ती म्हणाली, "मिस टेंपल दयाळू आहे; त्यांच्यासाठी कठोर असणे वेदनादायक आहे, अगदी वाईट विद्यार्थ्यांसाठी देखील; ती माझ्या चुका पाहते आणि त्याबद्दल मला सावध करते; पण जर मी कौतुकास पात्र असे काही केले तर त्या मला उदारपणे बक्षीस देते: माझ्या स्वभावादोषाचा पुरावा हा आहे की त्यांनी स्पष्टपणे माझे दोष, सौम्य शब्दात दाखवून दिले तरीही माझ्यामध्ये चुका सुधारण्याची ताकद नाही अथवा त्यांनी केलेली स्तुती जी माझ्यासाठी खूप मोलाची आहे, पण मला काळजीपूर्वक आणि दूरदृष्टीने वागण्यासाठी प्रोत्साहन देऊ शकत नाही."

"हे आश्चर्यकारक आहे," मी म्हणाले; सावधगिरी बाळगणे खूप सोपे आहे!"

“तुझ्यासाठी आहे, यात मला काही शंका नाही. सकाळी वर्गात माझ्या लक्षात आले की तू लक्ष देतेस; मिस मिलरने धडा समजावून सांगितल्यामुळे आणि तुला प्रश्न विचारल्यामुळे तुझे विचार कधीच भरकटलेले दिसले नाहीत, तर माझे विचार सतत भटकत असतात. जेव्हा मी मिस स्कॅचर्डचे बोलणे ऐकत असते तेव्हा मला तिचा आवाज देखील ऐकू येत नाही. मी एका प्रकारच्या स्वप्नात असल्यासारखे वाटते. कधीकधी मला वाटते की मी नॉर्थम्बरलँडमध्ये आहे; माझ्या आजूबाजूला ऐकू येणारा आवाज हा, आमच्या घराजवळून वाहणाऱ्या एका लहान ओढ्याचा आवाज आहे असे वाटत असते. माझ्यावर उत्तर देण्यासाठी पाळी आली की मला माझ्या स्वप्नातून बाहेर पडावं लागते; परंतु, जे काही वर्गात वाचलेले असते, शिकवलेले असते ते मला ऐकूच न आल्याने त्यांची उत्तरे माझ्याकडे तयार नसतात.”

“परंतू आज सकाळी तू किती चांगली उत्तरे दिलीस!”

“ती निव्वळ शुद्ध संधी होती; विषय माझ्या आवडीचा होता, त्याविषयी माझे वाचन पण भरपूर झाले आहे. आज दुपारी दिवास्वप्न पहाण्याऐवजी मी किंग चार्ल्सचा विचार करत होते. मला आवडतो तो राजा. पण ज्याला चांगले करायला आवडत होते, तो चार्ल्स, अन्यायी आणि अविवेकी कसे वागू शकतो? याचा मला खेद वाटतो. त्याच्या सचोटीने आणि प्रामाणिकपणाने, तो मुकुटाच्या विशेषाधिकारांपेक्षा जास्त दूर पाहू शकला नाही. जर तो दूरवर पाहू शकला असता, तर एक वेगळा इतिहास घडला असता. तरीही, मला चार्ल्स आवडतो, मी त्याचा आदर करते, मला त्याची दया येते, गरीब बिचारा खून झालेला राजा! होय, त्याचे शत्रू सर्वात वाईट होते; त्यांनी त्याचे रक्त सांडले. त्यांना मारण्याची हिम्मत कशी झाली?”

a

हेलेन स्वतःशी बोलत होती; मी तिला समजू शकले नाही कारण ती जे बोलत होती त्याविषयी मला काहीही माहित नव्हते, मी तिला वास्तवात परत आणले.

"आणि मिस टेंपल जेव्हा तुला शिकवत असते तेव्हा पण तुझे मन भटकत राहते का?"

"नक्कीच नाही; अगदीच क्वचित. मिस टेंपलकडे माझ्या स्वतःच्या विचारांपेक्षा काहीतरी नवीन सांगायचे असते; तिची भाषा मला सौम्य वाटते आणि ती मला जे शिकवते तेच मला जाणून घ्यायचे असते."

"मग तू मिस टेंपलसोबत चांगली आहेस?"

"होय, पण त्यासाठी मी मुद्दाम प्रयत्न करत नाही. जिथे मला हवे असलेले मार्गदर्शन मिळते तिथेच मी जाते."

" म्हणजे तू त्यांच्याशी चांगली आहेस, जे तुझ्याशी चांगले आहेत. माझे पण हेच मत आहे. दुष्ट व अन्यायी लोकाशी जर दयाळूपणे वागले तर| दुष्टांचे आयते फावेल. त्यांना कशाचीही भीती वाटणार नाही, उलट ते अधिकाधिक वाईट वागू लागतील. जेव्हा आपल्यावर विनाकारण हात उचलला जाईल तेव्हा आपण पुर्ण ताकदीने उत्तर द्यायला हवे म्हणजे पुन्हा ते लोक आपल्या वाटेला जाण्याचे धाडस करणार नाही."

" तू अजून लहान आहेस आणि तुला समजत नाही. तू मोठी झाल्यावर, मला आशा आहे की तुझे विचार बदतील."

"पण हेलेन, मला असे वाटते की ज्या माणसांबरोबर मी चांगली वागूनही, जर ते माझा तिरस्कार करत असतील तर, मी सुद्धा त्याचा नेहमी तिरस्कारच करेन. मला अन्यायकारक शिक्षा करणाऱ्यांना मी जोरदार प्रतिकार करेन; जे माझ्याशी

ममतेने वागतात, त्यांच्यावर मी प्रेम करेन, आणि माझे खरच काही चुकले असेल तर अश्या लोकांनी दिलेली शिक्षा मला मान्य असेल.''

''असंस्कृत आणि मागास लोकांची ही धारणा आहे; पण ख्रिश्चन आणि सुसंस्कृत जगात याला मान्यता नाही.''

''कसे ? मला समजले नाही.''

''हिंसेने द्वेषावर मात करता येत नाही, किंवा सूडाने समाधान मिळत नाही.''

''मग काय करायचे?''

''नवीन करार वाच; येशु काय म्हणतो ते ऐक आणि त्याने काय केले ते पहा: त्याचे वचन तुमचा नियम बनू द्या आणि त्याचे आचरण तुमचे उदाहरण बनू द्या.''

''आणि तो काय म्हणतो?''

''तो म्हणतो: ''तुमच्या शत्रूंवर प्रेम करा; जे तुम्हाला शाप देतात त्यांना आशीर्वाद द्या आणि जे तुमचा द्वेष करतात आणि तुमचा तिरस्कार करतात त्यांच्याशी चांगले वर्तन करा.''

''मग मला मिसेस रीडवर प्रेम करावे लागेल?'' मी करू शकत नाही. आणि जॉनला तर सहन करणे अशक्य आहे''

याउलट, हेलेनने मला स्वतःची माहिती देण्यास सांगितले: मी माझ्या दुःखाची कहाणी सांगण्यास सुरवात केली. माझ्या वरच्या अन्याया विरुद्ध सांगताना मी संतापाने पेटून उठले होते. काहीही आडपडदा न ठेवता मी माझी बाजू मांडली. हेलेनने शेवटपर्यंत धीराने माझे बोलणे ऐकले; उत्तरा दाखल ती काही बोलेल अशी माझी अपेक्षा होती, पण ती काहीच बोलली नाही.

''बरं!'' मी रागाने म्हणाले, ''मिसेस रीड एक कठोर आणि निर्दयी स्त्री आहे, नाही का?''

a

“नि: संशय ; ती तुझ्याबाबतीत निर्दयी वागली, कारण तिला तुझे व्यक्तीमत्व आवडत नव्हते, जसे मिस स्कॅचर्डला माझे आवडत नाही, पण तिचे सगळे शब्द, तिची सगळी कृती तुला नेमकी कशी आठवते! तिने केलेल्या अन्यायाचा तुझ्या हृदयावर किती खोल ठसा उमटला आहे!

“मिस स्कँचर्डने माझ्या बाबतीत केलेल्या गैरवर्तनाने माझ्यावर इतकी खोल छाप सोडली नाही. मिसेस रिडप्रती निर्माण झालेल्या या कटू भावनांना विसरून जाण्याने तू सुखी होशील. इतरांच्या चुकांची नोंद ठेऊन त्या बद्दल शत्रुत्व आणि कटूता बाळगण्यासाठी सारे आयुष्य पुरे पडणार नाही.

“जोवर हा नाशवंत देह आहे तोवर मान, अपमान, दु,:ख, अवहेलना या भावना त्याला जखडून आहेत पण जेव्हा शरीर त्यागण्याची वेळ येईल तेव्हा शरीराला जखडलेल्या या अपमानाच्या, दु:खाच्या भावना आपल्या पासून दूर होतील.

“मग तेथे केवळ आत्म्याचे, शुद्ध अभेद्य तत्त्व उरेल, जसे की सृष्टीला सजीव करण्यासाठी निर्माणकर्त्याच्या हातून आले होते. आत्मा जिथून आला होता तिथे परत जाईल. कदाचित आत्मा, परमात्म्याशी संवाद साधेल; आत्मा अधिक उन्नत अवस्थेत परिवर्तीत होईल. परंतु हे निश्चित आहे की या तत्त्वाचा ऱ्हास होऊ शकत नाही. या उलट वाईट माणूस सैतानात परिवर्तित होणार नाही. कधीच नाही. माझा विश्वास अगदी वेगळा आहे. मला ते कोणीही शिकवले नाही आणि मी त्याबद्दल क्वचितच बोलते, मी ते सर्वांपर्यंत पोहोचवते; मी अनंतकाळाला विश्रांती मानते, प्रकाशमय निवासस्थान मानतो; या विश्वासाने, मी गुन्हेगार आणि त्याच्या गुन्ह्याला यांत फरक करू शकते; गुन्हेगाराला मी मनापासून क्षमा करते मात्र गुन्ह्याचा तिरस्कार करते. बदला घेण्याची इच्छा माझ्या मनात येत नाही; दुर्गुणामुळे मी अपराध्याचा

तिरस्कार करु शकत नाही आणि अन्याय सहन करण्याचे माझे धैर्य गमावू देत नाही; मी शांतपणे जगते माझे डोळे माझ्या अस्तित्वाच्या शेवटाकडे वळले आहेत."

हेलेन स्वतःशी बोलत होती; मला तिच्या नजरेतून दिसले की तिला आता माझ्याशी बोलायचे नाही, तर तिच्या स्वतःशीच संवाद साधायचा होता.

मात्र, तिला ध्यानासाठी फारसा वेळ दिला गेला नाही; आमचे बोलणे पूर्ण होता होता, त्याच वेळी आलेली एक वर्ग प्रमुख जोरात बोलली:

"हेलन बर्न्स, जर तू तुझ्या कपाटातील वस्तू व्यवस्थित ठेवल्या नाहीत आणि तुमचे काम पुर्ण केले नाही तर मला मिस स्कॅचर्डला सांगावे लागेल."

हेलेनने उसासा सोडला, तिची इच्छा नसताना ती उठली आणि काहीही उत्तर न देता तिने लगेच आज्ञा पाळली.

# प्रकरण 7

लॉवुडमध्ये घालवलेले पहिले तीन महिने युगासारखे वाटले. माझ्यासाठी सर्व प्रकारच्या अडचणींच्या विरुद्धचा हा संघर्ष थकवणारा होता. मला नवीन नियमांची, मला सवय नसलेल्या कामांची सवय करून घ्यावी लागली. कामामध्ये चुकण्याची भीती, मला त्यासाठी होणाऱ्या शारीरिक कष्टांपेक्षा जास्त थकवा देत असे. हे सर्व माझ्यासाठी सोपे नव्हते. जानेवारी, फेब्रुवारी आणि मार्च महिन्यांत, घनदाट बर्फ वितळल्याने रस्ते दुर्गम झाले होते: म्हणून चर्चला जाण्याशिवाय आम्हाला बाहेर जाण्याची सक्ती नव्हती; मात्र, रोज एक तास मोकळ्या हवेत घालवावा लागत असे. अशा कडक थंडीपासून आमचे रक्षण करण्यासाठी आमचे कपडे अपुरे होते; बुटांच्या ऐवजी, आमच्याकडे फक्त शूज होते ज्यामध्ये बर्फ सहज प्रवेश करू शकत असे; हातमोजे नसल्यामुळे हाताना, पायांप्रमाणेच हिमबाधाने होई. मला आजही आठवते की मला रोज संध्याकाळी, सुजलेल्या पायामुळे किती त्रास व्हायचा आणि रोज सकाळी, दुखरी पावले शूजमध्ये घालता येत नसत.

अन्नाची कमतरता ही एक वस्तुस्थिती होती. वाढत्या वयाची प्रचंड भूक असलेल्या आमच्याकडे स्वतःची भूक भागण्याइतके वाट्याला येणारे अन्न पुरेसे नव्हते. याचा परिणाम असा होई की सर्वात लहान मुलीची उपासमार होत असे. प्रत्येक वेळी जेव्हा संधी मिळेल तेव्हा मोठ्या वयाच्या विद्यार्थीनी, भुकेलेल्या लहान मुलींच्या वाट्याचे अन्न त्यांना धमकावून पळवून नेत. माझ्या वाट्याचा काळ्या ब्रेडचा तुकडा अशा दांडगेश्र्वरी मुलींनी अनेकदा वाटून घ्यायला भाग पाडले होते

a

आणि मिळालेली कॉफी अर्धी अधिक दुसऱ्या मुलींनी ढोसल्यावर, भुकेने कासावीस होऊन सुद्धा शांतपणे रडत उरलेली गिळावी लागली होती.

हिंवाळ्यातील, रविवार जास्त दुःखदायी दिवस असे. ब्रॉकलब्रिज येथील चर्चला जाण्यासाठी आम्हाला दोन मैलांचे अंतर चालत जावे लागे. आम्ही या चर्चला संलग्न होतो. त्या दिवशी प्रचंड थंडी होती. आम्ही पोहोचलो तोपर्यंत गारठा आणखी वाढला; सकाळचे प्रवचन, प्रार्थना संपण्यापूर्वी आमचे हातपाय बधीर झाले. दुपारच्या जेवणात ब्रेड आणि थंड मांस मिळाले तेही आमच्या नेहमीच्या जेवणाप्रमाणे अपुरे होते.

संध्याकाळची प्रार्थना आटोपून आम्ही एका खडकाळ वाटेने परतलो. उत्तरेचा वारा, डोंगराच्या माथ्यावर इतका जोराने वाहत होता की त्यामुळे आमची त्वचा सोलवटल्यासारखी झाली होती.

मला मिस टेंपल नेहमी स्मरणात राहील. त्या, बर्फाळ वाऱ्याने उडणारा अंगरखा सावरत, दोन दोन मुलीच्या केलेल्या रांगे सोबत, हलक्या पावलांनी, भरभर चालत होत्या; स्वतः एक उदाहरण बनून सैनिकांप्रमाणे अशा कठीण प्रसंगी, दृढपणे मार्ग दाखवत होत्या. इतर शिक्षक स्वतः इतके हताश झाले होते की विद्यार्थ्यांना आनंदित करण्याचा प्रयत्न करण्याइतके त्यांच्याकडून होणे अशक्य गोष्ट होती.

लोवूडला पोचल्यावर आम्ही सर्वजणी शेकोटीच्या उबेची आणि प्रकाशाची आतुरतेने वाट पाहत होतो! पण हे सुख चिमुकल्यांना नाकारले गेले. शेकोटीच्या भवतालची जागा ताबडतोब मोठ्या विद्यार्थीनींनी पटकावली आणि लहानांच्या

a

नशिबी मात्र आपले तळवे एकमेकांवर घासत, थंडगार हात त्यांच्या खिशात घालून उब आणायचे अयशस्वी प्रयत्न आले.

तथापि आमच्यासाठी एक छोटासा आनंद राखून ठेवला होता: पाच वाजता, आम्हाला दोन दोन ब्रेड आणि थोडे बटर वाटले गेले; ही साप्ताहिक मेजवानी होती ज्याची आम्ही एका रविवारपासून दुसऱ्या रविवारपर्यंत वाट पहात असू. मी सहसा या स्वादिष्ट जेवणाचा अर्धा भाग वाचवण्याचा प्रयत्न करत असे; पण वरच्या वर्गातील मुलींनी ते मला, त्यांच्या सोबत वाटून घेण्यास भाग पाडले.

रविवारची संध्याकाळ सेंट मॅथ्यूच्या पाचव्या, सहाव्या आणि सातव्या अध्यायांची मनःपूर्वक पुनरावृत्ती गेली. मिस मिलर यांनी आम्हाला वाचलेले एक लांबलचक प्रवचन ऐकवले. तिला स्वतःला जांभई दाबणे अशक्य होते शेवटी प्रवचन देऊन थकून गेली.

छोट्या मुली पेंगून झोपल्या. काही झोपेत बेंचवरुन घसरुन खाली पडल्या. त्यांना शिक्षा म्हणून प्रवचन संपेपर्यंत खोलीच्या मध्यभागी उभे राहण्यास भाग पाडले गेले; काही मुलीना उभे रहाणे अशक्य झाल्याने त्यांनी बसकण मारली पण परत त्यांना उंच स्टुलाच्या आधाराने उभे केले गेले.

मी अद्याप श्री. ब्रोकलहर्स्टच्या भेटींबद्दल बोलले नाही: ते पहिल्या महिन्यात पहिले 3 आठवडे लोवूडला अनुपस्थित होते; कदाचित त्याचे मित्र आर्च डीकॉन आल्याने शाळेला भेट देऊ शकले नसावेत . ही अनुपस्थिती माझ्यासाठी दिलासा देणारी होती; तसे मला त्यांना घाबरण्याचे कारण नव्हते. शेवटी महिना अखेरीस ते आले.

मी सुमारे तीन आठवडे लोवूड मध्ये राहत होते. एके दिवशी दुपारी मी गुडघ्यावर पाटी घेऊन, एक मोठ्या गुणाकाराचे गणित सोडवत बसले होते. अचानक माझे लक्ष खिडकीतून बाहेर गेले.

मला एक व्यक्ती जवळून जाताना दिसली. मी तिला सहज ओळखले ते मि. ब्रोकलहर्स्ट होते. त्यांनी वर्गात प्रवेश केल्यावर, सर्वजण उभे राहिले, ते कोण आहेत, हे जाणून घेण्याची मला गरज नव्हती: लांब टांगा टाकत ते मिस टेंपल उभ्या असलेल्या ठिकाणी पोहोचले. मागच्या भिंतीवर, एक आक्राळ विक्राळ, सावली पडलेली दिसली. होय, ती तिच व्यक्ती होती जिने गेटशेडला माझ्या कोमल ह्रदयावर कठोरपणे आघात केला होता.

मी आजुबाजुला पाहिले माझी काही चूक होत नव्हती ते मिस्टर ब्रोकलहर्स्ट होते, त्यांनी मोठी बटणे असलेला ओव्हरकोट होता आणि गेटशेडला पाहिल्यापेक्षा जास्त भव्य कठोर आणि अधिक गंभीर दिसत होते.

या त्रस्त संमंधाला घाबरण्याची माझी कारणे होती; मामीसाहेबांनी मुद्दाम अशा व्यक्तीचे माझ्याविषयी मत कलुषित केले होते, जेणेकरून अंतिमतः माझा भविष्यकाळ अंध:कारमय व्हावा.

लोवूडमधिल माझ्या शिक्षकांना आणि सहाध्यायाना माझे स्वभावदोष मुद्दामहून परिचित करून देण्याचा त्याचा इरादा त्यानी मामीसाहेबांसमोर प्रगट केला होता. ते कधीही येऊन मी एक वाईट मुलगी आहे याची जाहीर प्रसिद्धी करतील याचीच मला इथे आल्यापासून भीती वाटत होती.

मिस टेंपलबरोबर हळू आवाजात ते काही सांगत होते. जरुर माझ्याविषयी खोटेनाटे सांगत असावेत यात मला संशय नव्हता. मी भीतभीत मिस टेंपलच्या

चेहऱ्यावर नजर टाकली. त्यांच्या नजरेत माझ्याविषयी चिंता अथवा तिरस्काराची भावना दिसते आहे का याचा अंदाज घेतला. त्यांच्या बोलण्याकडे माझे लक्ष होते. सहज माझ्या कानावर काही शब्द पडले आणि माझी भीती दूर झाली.

"मला वाटतं, मिस टेंपल," मिस्टर ब्रोकलहर्स्ट म्हणाले, "लोवूड येथे विकत घेतलेला धागा चालेल." मला असे दिसते की कॅलिको शर्टचा आकार चांगला आहे. मी काही सुया देखील विकत घेतल्या आहेत ज्या मला वाटते की धाग्याला अगदी योग्य आहेत. तुम्ही मिस स्मिथला सांगाल की मी येताना सुया आणायला विसरलो पण पुढच्या आठवड्यात तिला त्यातील काही पॅकेट्स मिळतील पण कोणत्याही परिस्थितीत प्रत्येक विद्यार्थीनीला एकापेक्षा जास्त देऊ नये; त्या त्यांना हरवू शकतात आणि तसेही मॅडम, आपण लोकरीच्या स्टॉकिंग्जची अधिक चांगली काळजी घ्यायला हवी मी मागच्या वेळी इथे आलो तेव्हा, किचन गार्डनमधून जाताना मी तपासले, कपडे दोरीवर सुकत घातले होते आणि काळ्या स्टॉकिंग्जची अवस्था अतिशय वाईट दिसली; त्याना पडलेली भोके वेळेवर दुरुस्त केली नाहीत तर कायमस्वरूपी ते बाद होतील."

त्यानी स्वतःला थांबवले.

"सर, तुमची आज्ञा पाळली जाईल," मिस टेंपलने उत्तर दिले.

"आणि मग, मॅडम," तो पुढे म्हणाला, "वॉशरबाईने मला सांगितले की काही मुलींनी आठवड्यातून गणवेशा व्यतिरिक्त इतर ड्रेस घातले होते; नियमानुसार फक्त एकदा परवानगी देता येते."

“मला वाटतं, याबाबत मी हे सांगू शकेन, सर. एग्नेस आणि कॅथरीन जॉनस्टोन यांना लोटन येथे काही मैत्रिणींनी चहासाठी आमंत्रित केले होते आणि मी त्यांना या प्रसंगी वेगळे कपडे घालण्याची परवानगी दिली.”

मिस्टर ब्रोकलहर्स्टने मान हलवली.

“बरं! एकदा, हे ठिक आहे ; परंतु याची वारंवार पुनरावृत्ती होऊ नये. मला आश्चर्य वाटणारी आणखी एक गोष्ट आहे. घरकाम करणाऱ्या व्यक्तीकडे तपासणी केली असता, गेल्या पंधरवड्यात दोन वेळा मुलींना ब्रेड आणि चीजचा नाश्ता दिल्याचे मी पाहिले; हे कसे? मी नियमांकडे पाहिले आणि मला तेथे देणे सूचित केलेला दिसत नाही. हा उपक्रम कोणी आणला आणि कोणत्या अधिकाराने?”

“मी याला जबाबदार आहे, सर,” मिस टेंपलने उत्तर दिले; दुपारचे जेवण इतके खराब तयार केले होते की मुलींना ते खाणे अशक्य होते आणि मी त्यांना रात्रीच्या जेवणाच्या वेळेपर्यंत उपाशी ठेवू देऊ शकत नव्हते.”

“एक मिनट , मॅडम! तुम्हाला माहित आहे की या मुलींचे संगोपन करताना, माझे ध्येय त्यांना चैनीची सवय लावणे नाही, तर त्यांना सहनशील बनवणे आणि दुःख सहन करण्यासाठी सक्षम करणे, त्यांना भौतिक सुखसुविधांना स्वतःला नकार देण्यास शिकवणे हा आहे. बिघडलेल्या जेवणासारखी एखादी छोटीशी गोष्ट त्यांच्यासोबत घडली तर नाहक क्षुल्लक भुकेचा बाऊ करून शरीराचे चोचले पुरवुन तुम्ही या संस्थेचा उद्देश विसरलात. सहनशीलता वाढण्यासाठी उपवास मुलींची मनोधारणा बळकट होण्यास उपयुक्त ठरेल. जीवनात अशा प्रसंगी त्यांना धैर्याचा

a

संदेश देण्याची ही शिकवण ठरेल; आम्ही त्यांना ख्रिस्ताचे हे शब्द पुन्हा सांगू शकतो: ‘मनुष्य केवळ भाकरीने जगत नाही, तर देवाच्या मुखातून आलेल्या प्रत्येक शब्दाने जगतो.’ मग हे सांत्वन देणारे वाक्य: ‘जे माझ्यासाठी भूक व तहान सहन करतात ते धन्य!’ मॅडम! जळलेल्या सूपऐवजी तुम्ही या मुलींच्या तोंडात ब्रेड आणि चीज घालून, मी तुम्हाला खरे सांगतो, तुम्ही त्यांच्या शरीराचे पोषण कराल पण , तुम्ही त्यांच्या अमर आत्म्याचे मारेकरी बनाल.”

मिस्टर ब्रोकलहर्स्ट पुन्हा थांबले, जणू त्याच्या विचारांनी गोंधळात पडले होते.

मिस टेंपलने बोलायला सुरुवातीला तेव्हा तिने नजर खाली केली होती, पण नंतर ती सरळ नजरेला नजर भिडवून, शांतपणे बोलू लागली. हळूहळू तिच्या धीरगंभीर चेहऱ्यावर संयमाने रोखून धरलेल्या, तीव्र भावना अभिव्यक्त होताना दिसत होत्या.

मिस्टर ब्रोकलहर्स्ट शेकोटीच्या समोर उभे होते. पाठीमागे हात ठेवून त्यानी संपूर्ण शाळेची पाहणी केली. अचानक त्यांच्या नजरेला काही धक्कादायक गोष्ट पडल्याने, ते मागे वळले आणि त्याने पूर्वीपेक्षा जास्त जोरात ओरडले:

“मिस टेंपल!” मिस टेम्पल! कुरळे केस, लाल केस, मॅडम, ही कुरळे केस असलेली मुलगी कोण आहे?.

त्यानी आपली छडी त्या दिशेला वळवली. त्यांचा हात थरथरत होता.

a

“ती ज्युलिया सेव्हर्न आहे,” मिस टेंपलने अतिशय शांतपणे उत्तर दिले.

“ ज्युलिया सेव्हर्न, मॅडम; बरं, या संस्थेची सर्व तत्त्वे झुगारून ती बाहेरच्या जगाच्या नियमांचे इतके उघडपणे पालन का करते? येथे चर्चच्या अखत्यारीत असलेल्या संस्थेमध्ये, धार्मिक नियमांचे पालन न करता केस कसे काय कुरळे केले आहेत?”

“ज्युलियाचे केस नैसर्गिकरित्या कुरळे आहेत,” मिस टेंपलने आणखी शांतपणे उत्तर दिले.

“अर्थातच होय; पण आपण निसर्गाला नियमांना बांधिल नाही आहोत. या मुलींवर परमेश्वराची कृपा व्हावी अशी माझी इच्छा आहे! मग अशी छानछोकी का बरे? मी बरेचदा सांगितले आहे की मला केस नीट, घट्ट विंचरलेले हवेत आहेत. त्या बटा बाहेर येता कामा नयेत.

मिस टेंपल, या मुलीचे केस पूर्णपणे कापले पाहिजेत. मी उद्या न्हावी पाठवीन.”

“पण इतरही काही मुलींचे केस लांब दिसतात. त्या उंच मुलीला इकडे पहायला सांगा. ज्यांचे केस खूप लांब आणि खूप घनदाट आहेत त्या मुलींना ओळीने पाठमोरे उभे करा.”

मिस टेंपलच्या चेहऱ्यावर एक विशादाचे हसू उमटले ; तरीही तिने मुलींना आदेश दिला आणि मोठ्या वर्गातील मुलींनी त्याचे पालन केले. मुलींच्या चेहऱ्यावरचे भाव मला दिसत होते. पण मिस्टर ब्रोकलहर्स्ट त्यांना पाहू शकले नाहीत याचे मला वाईट वाटले. जर त्यांनी पाहिले असते तर कदाचित समजले असते की, त्यांनी मुलींवर अधिकार दाखवण्याचा प्रयत्न केला तरी, तो मुली नेहमीच मानतील असे नाही.

त्यांनी पाच मिनिटे या निसर्गाच्या दैवी देणगीचे निरीक्षण केले, त्यानंतर त्यांनी फर्मान सोडले. क्षणभर कानात जणू शिश्याचा रस ओतल्या सारखे झाले

ते म्हणाले, "हे सर्व केस कापले जातील."

मिस टेंपल याची नोंद घ्यावी.

"मॅडम," ते म्हणाला, "मला अलौकिक अशा ईश्वराची सेवा करायची आहे. माझे ध्येय आहे की देहाच्या वासना, संयमाने आणि नम्रतेने जिंकायला शिकले पाहिजे न की छानछोकीने. होय, मी पुन्हा सांगतो, या सर्व मुलींच्या वेण्या कापायलाच हव्यात म्हणजे मग बटा बाहेर रुळणार नाहीत. ही गोष्ट लौकर व्हायला हवी, आधीच वेळ वाया गेलेला आहे."

इथे मिस्टर ब्रोकलहर्स्टला व्यत्यय आला. तीन स्त्रिया खोलीत शिरल्या. प्रवचन ऐकण्यासाठी त्या थोड्या अगोदर आल्या असाव्यात कारण त्यांनी मखमली, रेशीम आणि फरचे अतिशय सुंदर कपडे घातले होते; त्यापैकी दोन मुली, सोळा ते सतरा वयोगटातील होत्या त्यांनी त्या काळातील फॅशननुसार शहामृगाच्या पंखांनी सजवलेल्या बीव्हर हॅट्स घातल्या होत्या, आकर्षक केशरचनांमधून काळजीपूर्वक केस वळवून, कुरळे केले होते . मोठ्या स्त्रियानी मखमली शाल पांघरली होती तसेच फ्रेंच पद्धतीने खोट्या कुरळ्या केसांचा टोप घातला होता.

मिसेस ब्रोकलहर्स्ट आणि त्यांच्या मुलींचे मिस टेंपलने आदराने स्वागत केले; त्यांना सन्मानाच्या ठिकाणी नेण्यात आले.

बहुधा ते सर्वजण एकत्रच आले होते मुली व पत्नी काही कारणाने मागे राहिल्या असणार. मिस्टर ब्रोकलहर्स्ट घरकाम करणाऱ्या, कपडे धुणाऱ्या कामगार स्त्रियांशी तसेच मिस टेंपल बरोबर हुज्जत घालत होते. तागाची जबाबदारी असणाऱ्या मिस. स्मिथ बरोबर पण त्यांची काही हुज्जत सुरु होती पण ते ऐकायला मला वेळ नव्हता. मला एक वेगळीच काळजी लागून राहिली होती. आतापर्यंत

मिस्टर ब्रोकलहर्स्ट आणि मिस टेंपल याचे संभाषण सुरू असतांना, त्यांचे लक्ष माझ्या कडे वळू नये म्हणून एका बेंचच्या आडोशाला राहून गणिते करण्याच्या मिषाने पाटीमागे चेहरा लपवला होता. पण माझ्या दुर्दैवाने माझ्या हातातील पाटी निसटून खाली पडली आणि त्या आवाजाने सर्वांचे लक्ष माझ्या दिशेला वळले.

सर्वस्व गमावल्याचा भास मला झाला आणि येणाऱ्या संकटात तोंड देण्यासाठी मी सज्ज झाले.

वादळ येण्यास फार काळ नव्हता.

"निष्काळजी मुलगी,"

मि. ब्रोकलहर्स्ट म्हणाले; "मला वाटते की ती नवीन विद्यार्थिनी आहे; आणि ते मोठ्या आवाजात म्हणाले , "त्या पाटी फोडलेल्या मुलीला इकडे घेऊन या."

भीतीने माझी घाबरगुंडी उडाली. उभे रहाण्याचे त्राण माझ्या पायानी गमावले. दोन मोठ्या मुलींनी ओढत मला त्या भयावह न्यायाधिशापुढे उभे केले.

मिस टेंपलने मला हळूवारपणे मला आधार दिला आणि माझ्या कानात कुजबुजली:

"घाबरू नकोस, जेन; मी पाहिले की हा एक अपघात होता आणि तुला काही शिक्षा होणार नाही."

माझ्या जीवात जीव आला.

"एका मिनिटात त्या माझा तिरस्कार करतील आणि मला खोटारडी म्हणून पाहील," मी विचार केला.

आणि मग मिसेस रीड आणि मिस्टर ब्रोकलहर्स्ट यांच्या विरोधात संतापाची भावना माझ्या रक्तात पेटली: मी हेलन बर्न्स नाही.

एका उंच स्टलवर उभे करण्यासाठी आज्ञा झाली.

मला तिथे कसे उभे केले? ते मला समजले नाही. आता माझी उंची मिस्टर ब्रोकलहर्स्ट यांच्या नाका पर्यंत पोहोचली. माझ्या पायाखाली, त्यानी घातलेल्या केशरी, जांभळया, रेशमी अंगरखा, एका चंदेरी ढगासारखा पसरला होता.

मिस्टर ब्रोकलहर्स्ट आपल्या कुटुंबाकडे वळत म्हणाले, “मिस टेंपल, शिक्षक आणि विद्यार्थीनींनो, तुम्ही सर्वजण ही लहान मुलगी पहा.”

त्या सर्वांनी मला पाहिले यात शंका नाही; त्यांच्या नजरेचा चटका माझ्या सर्वांगाला जाणवत होता.

“ पाहा ही मुलगी अजून लहान आहे; तिच्यामध्ये कोणतेही वेगळेपण लक्षात येत नाही. पण तिच्या आत एक दुष्ट आत्मा वास करत आहे. यावर कोणाचा विश्वास बसणार नाही आणि तरीही खेदाने म्हणावे लागेल ते सत्य आहे.” असे म्हणून ते थोडे थांबले.

आता मला कणखर व्हावे लागणार होते. अग्निपरीक्षा आता टाळता येणार नव्हती; धैर्याने ते सहन करण्याचा मी निर्धार केला होता.

ब्रोकलहर्स्ट पुढे म्हणाले, “ही एक अत्यंत दुर्दैवी आणि दुःखद गोष्ट आहे आणि तुम्हाला सावध करणे हे माझे कर्तव्य आहे: ही लहान मुलगी, जी देवाच्या कोकरा पैकी एक असायला हवी होती पण ती निंदनीय आहे; विश्वासू कळपातील सदस्य नसून तिच्यापासून सावध रहा, तिच्या असण्यावर, तिच्या दिसण्यावर विश्र्वास ठेवू नका; शक्य असल्यास, तिची संगत टाळा, तिच्याशी खेळू नका. बोलूही नका. सर्व शिक्षिकांसाठी एक सूचना आहे, तिच्या सर्व हालचालींवर तुमची नजर असू दे, तिच्या वागण्या बोलण्याची खात्री करून घ्या. तिच्या आत्म्याला वाचवण्यासाठी तिच्या शरीराला शिक्षा करा कारण ही मुलगी पुढे बोलायला माझी जीभ धजावत नाही पण ख्रिश्चन घरात जन्मलेले हे मूल, अन्य धर्मिय, मूर्तीपूजकांपेक्षा वाईट आहे; ही मुलगी खोटारडी आहे!”

ते आणखी दहा मिनिटांसाठी थांबले, त्या दरम्यान, मी माझ्या बुद्धीवर ताबा मिळवला. मिसेस ब्रोकलहर्स्ट डोळयावरुन रूमाल फिरवत मान डोलवत होती. आणि मुली ,"किती लाजिरवाणी गोष्ट आहे!" असे उद्गगारत होत्या.

मिस्टर ब्रोकलहर्स्ट शेवटी उद्गारले:

"या सर्व गोष्टी मी तिला आश्रय देणाऱ्या परोपकारी स्त्री कडून मला समजल्या. त्या धार्मिक आणि दानशूर महिलेने, जिने तिला अनाथ असताना दत्तक घेतले आणि तिला स्वतःच्या मुलींसोबत वाढवले; पण या दुर्दैवी मुलीने तिच्या दयाळूपणाची आणि उदारतेची परतफेड इतक्या मोठ्या कृतघ्नतेने केली की, परोपकारी श्रीमती रीड यांना जेनला तिच्या मुलांपासून वेगळे करण्यास भाग पाडले गेले, कारण तिचे उदाहरण पाहून, त्याची स्वतः ची मुले वाममार्गाला लागू नयेत, जुन्या काळी, यहुदी लोकांनी त्यांच्या आजारी लोकांना बेथेस्दा सरोवरात पाठववले होते, तसेच तिला बरे करण्यासाठी येथे पाठवले आहे. संचालक, शिक्षिका, मी तुम्हाला पुन्हा सांगतो, तिच्याभोवती पाणी साचू देऊ नका!"

या उदात्त निष्कर्षानंतर, मिस्टर ब्रोकलहर्स्ट यांनी त्यांच्या ओव्हरकोटचे शेवटचे बटण दाबले आणि शांतपणे त्यांच्या कुटुंबाला काहीतरी सांगितले. सर्व जण उभे राहिले, मिस टेम्पलला नमस्कार केला आणि वर्गातून बाहेर पडली. दारात आल्यावर माझे न्यायाधीश मागे वळून म्हणाले:

"तिला आणखी अर्धा तास त्या स्टुलावर उभी राहू दे आणि उरलेल्या दिवसात कोणाला तिच्याशी बोलू देऊ नका."

म्हणून मी तिथेच उभी होते. खोलीच्या मध्यभागी उभं राहण्याची शिक्षा मला कधीच सहन होणार नाही असं म्हणालेली मी आता सर्वांच्या नजरेसमोर उभी होते. कोणत्यात शब्दात मी माझ्या संवेदना व्यक्त करू शकत नाही; सर्व जण उठले.

मी सारे धैर्य एकवटून माझ्या श्वासावर नियंत्रण मिळवण्याचा प्रयत्न करत होते, तोच एक मुलगी माझ्या शेजारुन गेली. जाताना तिने पाहिले. तिथे एक तेजस्वी ज्योत चमकत होती! त्या तेजस्वी नजरेची माझ्यावर विलक्षण छाप पडली . मला एक शक्ती प्राप्त झाल्याचा भास झाला. एका गुलामाला शक्ती देणारी कोणी देवता असावी. माझ्या हृदयात उठलेल्या द्वेषावर नियंत्रण ठेवले मी माझे डोकेवर केले आणि स्वतःला माझ्या स्टुलावर घट्ट रोवून उभी राहीले.

ती हेलेन बर्न्स होती. मिस स्मिथला तिने तिच्या कामाबद्दल प्रश्न विचारला या करीता तिची खरडपट्टी काढली आणि ती परत सीटवर येताना पुन्हा माझ्याकडे पाहून हसली. ते हसू! मला ते आताही आठवते; हे महान बुद्धिमत्तेचे आणि खरे धैर्याचे चिन्ह होते; एखाद्या देवदूताची स्पष्ट वैशिष्ट्ये, तिच्या ठायीं एकवटली होती.

त्याक्षणी तिचा चेहरा निर्विकार होता. डोळे उदास दिसत होते. हातावर शिक्षे स्वरूप म्हणून ‘अस्वच्छपणाचा बँच' लावला होता.

कारण लेखनाच्या नमुन्याची कॉपी करताना त्यावर डाग पडला होता. त्यासाठी मिस स्कॅचर्डने तिला ब्रेड आणि पाणी न देण्याची सजा सुनावली होती.

असा आहे माणसाचा अपूर्ण स्वभाव! आकाशातील ग्रहांवर पण स्पष्ट असे डाग आहेत; आणि मिस स्कॅचर्ड्स सारखे डोळे फक्त तेच क्षणिक दोष पाहू शकतात आणि ग्रहांच्या पूर्ण तेजा प्रती संपुर्णपणे आंधळे आहेत.

## प्रकरण 8

माझी अर्धा तासाची स्टुलावर उभे रहाण्याची शिक्षा पूर्ण होण्याआधीच पाच वाजण्याची घंटा वाजली. आमचा वर्ग सुटला आणि सर्वजण कॉफी घेण्यासाठी जेवणघरात गेले. मी खाली जाण्याचे धाडस केले; अंधार होता, मी एका कोपऱ्यात सरकून, जमिनीवर बसले. तेव्हा तोपर्यंत माझे टिकवून ठेवलेल्या धैर्याचा बांध ठासळला. एका जबरदस्त दु:खाने मी असहायपणे कोसळले. जमिनीत चेहरा खुपसून मी रडायला लागले. हेलेन बर्न्स तिथे नव्हती. माझ्या मदतीला कोणीही आले नाही. मी एकटीने भरपूर अश्रू ढाळले. मी जेव्हा लॉवुडला आले तेव्हा मी चांगले होण्यासाठी, खूप प्रयत्न करण्याचा, खूप मैत्रिणी करण्याचा, गुरुजनांकडून कौतुक मिळवण्याचा आणि सर्वांच्या आपुलकीला पात्र होण्याचा निर्धार केला होता. या बाबतीत मी बरीच प्रगती सुध्दा केली होती. त्याच दिवशी सकाळी मिस मिलरने माझे मनापासून कौतुक केले होते; मिस टेंपलने मला एक स्मित हास्य दिले आणि अशीच माझी प्रगती दोन महिने चालू राहिल्यास मला चित्रकला शिकवण्याचे आणि फ्रेंच शिकायला मान्य केले होते. मला माझ्या मैत्रिणींचे प्रेम मिळाले होते; समवयस्क मुलींनी मला आपले मानले होते; वरच्या वर्गातील मोठ्या मुलींनी विषेश मला त्रास दिला नव्हता: आणि आता सर्व धुळीस मिळाले होते. मी पुन्हा कधीही उठू शकेन की नाही याचे उत्तर माझ्याकडे नव्हते. कदाचित मी हे समजता पायदळी तुडवले जाण्याचीच शक्यता जास्त होती.

a

"नाही, मी करू शकत नाही," मी स्वतःशी विचार केला आणि मृत्यूची मनापासून इच्छा करू लागले.माझ्या रडक्या आवाजात मी ही इच्छा स्वतःशी करत असतानाच कोणीतरी जवळ आले, मी परत रडायला सुरुवात केली; हेलेन बर्न्स

माझ्याजवळ आली होती, शेकोटीतील आगीच्या उजेडात, ती मोठी, एकाकी खोली पार करून, ती माझ्यासाठी ब्रेड आणि कॉफी आणताना मला दिसली.

"काहीतरी खा," ती मला म्हणाली.

पण तिने मला जे देऊ केले होते ते मी नाकारले, कारण मी ज्या परिस्थितीत सापडले होते, त्या परिस्थितीत कॉफीचा एक थेंब किंवा ब्रेडचा तुकडा मला मला गिळवला नसता. हेलेनने माझ्याकडे आश्चर्याने पाहिले; मी कितीही प्रयत्न केले तरी मी स्वतःला थांबवू शकले नाही, मी रडतच राहिले. ती माझ्या शेजारी मांडी घालून शांतपणे बसून राहिली. मी प्रथम बोलायला सुरुवात केली.

"हेलेन," मी म्हणाले, "प्रत्येकजण मला खोटारडे मानत आहे अशा मुलीजवळ तू का आली आहेस?"

"प्रत्येकजण, जेन? जेमतेम ऐंशी लोकांनी ह्या विषयी ऐकले आहे. जगात लाखो करोडो लोक आहेत."

"मला लाखो करोडो लोकांशी माझा काय संबंध? मला माहीत असलेल्या ऐंशी लोकांच्या लेखी माझी किंमत शून्य आहे."

"जेन, तू चुकीचा विचार करत आहेस; हे ही शक्य आहे की एकही मुलगी तुझा तिरस्कार करत नसेल आणि अनेकांना तुझी दया असेल, अशी मला खात्री आहे."

"मिस्टर ब्रोकलहर्स्ट यांनी जे सांगितले त्या नंतर कोण माझी दया कशी करतील?"

“ मिस्टर ब्रोकलहर्स्ट हे देव नाहीत; शिवाय अशीही व्यक्ती नाही ज्यावर सर्वजण विश्वास ठेवतात. त्यांना इथे कोणीही पसंत करत नाही, कारण त्यांनी आमचे प्रेम मिळवण्यासाठी कधीच काही केले नाही. या उलट त्यांनी तुझ्यावर विषेश मर्जी दाखवली असती, तर तुला निःसंशयपणे तुझ्या आजूबाजूला एकतर जाहीर किंवा गुप्त शत्रू सापडला असता. तुझ्याबद्दल सहानुभूती वाटणाऱ्यांची संख्या तुझा तिरस्कार करणाऱ्यांपेक्षा नक्कीच जास्त आहे. शिक्षिका आणि विद्यार्थीनी एक, दोन दिवस तुमच्याकडे थंडपणे पाहातील; परंतु मैत्रीपूर्ण भावना प्रत्येकाच्या अंतःकरणात लपलेल्या असतात आणि लवकरच प्रकट होतील. तुझ्यातील चांगुलपणा पुढे या भावना तात्पुरत्या जरी दडपल्या गेल्या तरी शेवटी अधिक स्पष्टपणे प्रगट होतील,” या शिवाय ...असे बोलून ती थांबली.

“या शिवाय काय बरे, हेलेन?” मी तिचा हात हातात घेत म्हणाले.

तिने हळूवारपणे माझी थंड पडलेलेल्या बोटांना कुरवाळत पुढे म्हणाली: “जर संपूर्ण जगाने जरी तुझा द्वेष केला आणि तुला दोषी मानले, तरी तुझी सद्सद्विवेक बुध्दी ते मान्य करत नसेल तर तुझ्या अंतःकरणावर विश्र्वास ठेव की तू दोषी नाहीस. जेन, तू मित्राशिवाय राहू नको.”

“मला ते माहित आहे, परंतु ते माझ्यासाठी पुरेसे नाही. निष्प्रेम असे जगण्यापेक्षा मरण पसंत करेन; मी एकटेपणा आणि तिरस्कार स्वीकारू शकत नाही. हेलन, हे बघ, तुझ्याकडून, मिस टेंपलकडून आणि माझ्या मनापासून प्रेम करणाऱ्या सर्वांकडून खरा स्नेह मिळवण्यासाठी, सर्व जगाबरोबर टक्कर देण्यासाठी तयार आहे.”

“ शांत, हो जेन! तू इतरांच्या प्रेमाला खूप उच्च स्थान देत आहेस; तू स्वतः आवेगपूर्ण, खूप उत्कट आणि प्रभावशाली आहेस. खूप उत्साही आहेस. ज्याने, तुमचे शरीर निर्माण केले आणि त्यामध्ये जीवनाचा श्वास फुंकला, तुमच्या भरण

पोषणासाठी संसाधने निर्माण केली, त्या परमेश्वराचे अदृश्य राज्य या पृथ्वीच्या पलीकडे आहे; या जगाच्या वर एक प्रभुचे जग वसलेले आहे, तेथे पवित्र आत्म्याचे वास्तव्य आहे, हे प्रभुचे जगच आपल्या सभोवताली पण पसरले, त्याचे आपल्यावर सदैव लक्ष असते. आपले रक्षण करण्याचे त्याचे कार्य आहे; जर कोणी तिरस्काराच्या, द्वेषाच्या आगीत होरपळत असेल आणि दु:खाने, वेदनेने मरणयातना सोसत असेल, तर देवदूत आपला यातना पाहतात आणि आपण खरोखरच निर्दोष असू तर ओळखतात, तुझ्या बाबतीत, मला माहित आहे की मि. ब्रोकलहर्स्टने तुझ्यावर भ्याडपणाने आरोप केलेले असून, त्या दोषांपासून तू निर्दोष आहेस, मिसेस रीडच्या सांगण्यावरून त्यांनी तुझ्यावर आरोप केले आहेत. पण ते आरोप एक असत्यकथन आहे. मला तुझ्या डोळयात तुझा प्रामाणिकपणा, सद्वर्तन स्वच्छ दिसत आहे. परमेश्वर मृत्यूनंतर नक्कीच, त्याच्या कृपेचा वर्षाव आपल्यावर करेल.

आपले लहान आयुष्य असे दु:खात का बरे बडवून टाकायचे? मृत्यू ही शाश्वत आनंदाची, प्रभुच्या कृपावर्षावात न्हाऊन जाण्याची सुरुवात आहे.”

मी शांत झाले, हेलेनने मला शांत केले होते; पण या शांततेत तिने माझ्याशी संवाद साधला होता त्यातूनच मला एक अव्यक्त दु:ख व्यक्त झाल्याची अनुभूती येत होती. बोलताना तिचा श्वास वेगवान झाला आणि कोरडा खोकला सुरू झाला. तिच्या काळजीने मी माझे दु:ख विसरले. मी तिच्या खांद्यावर डोके ठेवले आणि आम्ही दोघी शांतपणे बसून राहीलो. खोलीत एक व्यक्ती आत आली. खिडकीतून चंद्रप्रकाश आत आला होता. त्या प्रकाशात मिस टेंपलचे दर्शन झाले.

“जेन, मी तुला बोलवायला आले होते,” त्या म्हणाल्या; मला तुझ्याशी माझ्या खोलीत बोलायचे आहे, आणि हेलेन तुझ्या बरोबर असल्याने तीही येऊ शकते.”

त्यांच्या आम्ही निघालो. त्याच्या घरापर्यंत जायला आम्हाला बरेच चालावे लागते. एक जिना चढून आम्ही घरात प्रवेश केला. घरातील वातावरण प्रसन्न दिसत होते.

शेकोटी चांगली पेटली होती. मिस टेंपलने हेलनला शेकोटीच्याजवळ एका छोट्या खुर्चीवर बसण्यास सांगितले आणि दुसरी स्वतःला घेऊन तिने मला तिच्या बाजूला बसण्यास सांगितले.

"तू थोडी सावरली आहेस काय? तिने माझ्या चेहऱ्याकडे बघत मला विचारले; तू खूप रडलेली दिसत आहेस."

"मला भीती वाटते की माझे दु:ख कधीच संपणारे नाही."

" का बरे ?"

"कारण माझ्यावर अन्यायकारक आरोप करण्यात आले आहेत; त्यामुळे तुमच्यासह, प्रत्येकजण मला खूप दोषी मानत आहे."

"तू निर्दोष आहेस हे सिध्द करु शकतेस. त्यावर आम्ही विश्र्वास ठेऊ. आणि माझी खात्री आहे की तू आम्हाला निराश नाही करणार."

"खरचं? मिस टेंपल?"

"होय," तिने माझ्या खांद्यावर हात ठेवून उत्तर दिले, "आणि आता मला सांग ही महिला कोण आहे जिला मिस्टर ब्रोकलहर्स्ट तुमची आश्रयदाती म्हणतात?"

"ही श्रीमती रीड आहे माझी मामी, माझ्या मामाची पत्नी; माझे मामा वारले आणि मला त्यांच्या देखरेखीखाली सोपवले गेले."

"म्हणजे तिने तुला स्वतः हून दत्तक घेतले नाही?"

"नाही, उलट मिसेस रीडला हे आवडले नव्हते, ; पण माझ्या मामांनी, मरताना तिच्याकडून वचन दिले होते की तिने माझा आपल्या मुलांप्रमाणे सांभाळ करावा, असे मला तेथील नोकरांनी सांगितले."

a

“बरं आता, जेन, तुला माहिती आहे किंवा किमान मी तुला सांगेन की जेव्हा एखाद्या गुन्हेगारावर आरोप लावला जातो, तेव्हा त्याला नेहमी स्वतःच्या बचावात बोलण्याची परवानगी असते. तुझ्यावर खोटे आरोप लावण्यात आले आहेत: तुला जमेल तसा स्वतः चा बचाव कर. तुला जे सुचते, जे जे आठवते ते ते खरे सांगा; पण काहीही पदरचे जोडून अतिशयोक्ती करू नको.”

मी मनात संयमी आणि अचूक राहण्याचा निश्चय केला: आणि मला काय म्हणायचे आहे ते व्यवस्थित मांडण्यासाठी काही मिनिटे विचार केल्यानंतर, मी माझ्या दुःखी बालपणाची संपूर्ण कहाणी सांगू लागले.

हा वेदनादायक विषय मांडताना मी मनातून पूर्णपणे खचून गेले होते. अत्यंत साध्या शब्दात मी सांगायला सुरुवात केली . जस जशी गोष्ट पुढे सरकली तसा मिस टेंपलचा माझ्या वरचा विश्र्वास दृढ होत गेला.

माझ्या कथेच्या ओघात, मी मिस्टर लॉयडबद्दल बोलले की माझ्या आजारपणात मला भेटायला आले होते. कारण मी लाल खोलीतील भयानक प्रसंग विसरले नव्हते. तो कथन करताना माझ्या संयमाचा बांध तुटून गेला. चंद्रप्रकाशात झालेला भास, मामांच्या अतृप्त आत्म्याचे भय, मी फोडलेल्या किंचाळया, पुन्हां पुन्हा केलेल्या विनवण्या अव्हेरून मामीसाहेबांनी परत अंधाऱ्या खोलीत दुसऱ्यांदा कोंडणे, ज्याला खोलीला मी आत्म्याने पछाडले आहे असे मानत होते त्या खोलीत, हरपलेली शुध्द आणि त्यानंतरचे आजारपण.

सर्वकाही निवेदन मी शांतपणे संपवले.

मिस टेंपलने काही मिनिटे माझ्याकडे पाहिले; मग ती मला म्हणाली:

“मी मिस्टर लॉयडला ओळखते, मी त्यांना पत्र लिहीन; जर त्याचे उत्तर तुझ्या म्हणण्याशी सहमत असेल, तर तुला कोणत्याही आरोपातून जाहीरपणे निर्दोष मुक्त केले जाईल; माझ्यासाठी, जेन, आतापासून मी तुला निर्दोष मानते.”

a

तिने मला प्रेमाने जवळ घेतले. तिच्या प्रेमळ सहवासात मला माझे हरवलेले बालपण गवसल्याचा आनंद झाला.

मिस टेंपल हेलेनकडे वळून ती म्हणाली: “आज संध्याकाळी तुझी तब्बेत कशी आहेस, हेलेन? तुला आज खूप खोकला आहे का?”

“बरी आहे. खोकला नेहमी एव्हढा नाही, मॅडम.”

“आणि तुझ्या छातीत दुखणे कसे आहे?”

“ थोडे कमी आहे.”

मिस टेंपल उभी राहिली, हेलेनचा हात हातात घेतला आणि तिची नाडी तपासली. मग ती तिच्या जागी परत आली आणि मला तिचा सुस्कारा ऐकू आला. ती काही मिनिटे विचारमग्न राहिली, अचानक तिने आम्हाला सांगितले: आज संध्याकाळी तुम्ही माझ्या पाहुण्या आहात.”

हे शब्द बोलताच तिने बेल वाजवली.

“बार्बरा,” ती आत आलेल्या नोकराणीला म्हणाली, “मी अजून चहा घेतला नाही; ट्रे आण आणि या दोन मुलींसाठी पण कप द्या.”

बार्बराने ट्रे आणला. या चिनी मातीच्या कपांनी आणि आगीजवळ एका लहानशा गोल टेबलावर ठेवलेले हे चहाची किटली पाहून माझे डोळे कसे मोहून गेले! चहाचा सुगंध आणि टोस्टचा वास मला किती मधुर वाटत होता, मला भुकेची जाणीव झाली पण आणलेले पदार्थ त्यामानाने कमी वाटले. मिस टेंपल यांच्या ध्यानात ही गोष्ट आली.

“बार्बरा,” ती म्हणाली, “आमच्यासाठी आणखी थोडे ब्रेड आणि बटर आणतेस काय? तिघांसाठी पुरेसे नाही.”

नोकराणी बाहेर गेली आणि लवकरच परतली.

“मिस,” ती म्हणाली. मिस हार्डन म्हणतात की तिने नेहमीच्या एव्हढेच पाठवले आहे.”

मिसेस हार्डन घरकाम करणाऱ्या होत्या; मिस्टर ब्रोकलहर्स्ट सारख्या नियमांना बांधील होत्या.

“ठीक! खूप चांगले, मिस टेंपलने उत्तर दिले.”

नोकराणी निघून जात असताना, तिने हसतमुखाने म्हणाल्या, “सुदैवाने यावेळी माझ्याकडे जी उणीव आहे ते भरून काढण्यासाठी पुरेसे खाण्याचे साहित्य आहे.”

मिस टेंपलने हेलेन आणि मला टेबलाजवळ येण्यास आमंत्रित केले आणि आपल्या प्रत्येकासमोर चहाचा कप आणि लोण्याचा एक स्वादिष्ट पण छोटा गोळा ठेवला; मग ती उठली, एक ड्रॉवर उघडला आणि कागदात गुंडाळलेले एक पॅकेज बाहेर काढले: मोठा जिंजरब्रेड आमच्या समोर आला.

ती म्हणाली, “मला तुमच्यापैकी प्रत्येकाला एक एक तुकडा द्यायला मला आवडेल. पण, आपल्याकडे पुरेसा ब्रेड आणि बटर नसल्याने आम्हाला ते आता तेच खावे लागेल.”

आणि त्यांनी उदार हाताने त्याचे मोठे तुकडे केले.

ती संध्याकाळ जणू अमृतमय झाली. मिस टेंपलने आमच्याकडे पाहिलेले समाधानाचे स्मितहास्य आमच्या आनंदात भर घालत होते.

चहा संपला आणि ट्रे काढला, तिने आम्हाला पुन्हा शेकोटीच्याजवळ बोलावले; त्यांच्या बरोबर बोलण्याची संधी आमच्यासाठी एक मोठा सन्मान होता.

मिस टेंपलच्या व्यक्तिमत्व शांत, गंभीर आणि उदात्त होते. भाषा अस्खलित असून बोलणे मृदु होते. तिला पाहताना किंवा ऐकताना केवळ आनंदच नाही तर मनापासून आदरही वाटत असे. माझ्याबाबतीत असेच झाले होते.

आरामदायी जेवण, आनंदी घर, त्याच्या प्रिय शिक्षकाची उपस्थिती आणि दयाळूपणा या साऱ्यामुळे हेलनच्या आत्मीक सौंदर्याला उजाळा मिळाला. आंतरिक शक्ति जागृत झाल्या. त्याच्या तेजाने नेहमीचा फिकट, आजारी चेहरा उजळला, डोळे आनंदाने लकाकू लागले. ते सौंदर्य जे सौंदर्य प्रसाधनाने अथवा आकर्षक केशभूषा, वस्त्र भुषणांनी प्राप्त झालेले नसून, विचारांच्या शक्तीने आणि आत्म्याच्या वैभवाने झळकत होते.

हेलनचे, त्या चौदा/ पंधरा वर्षांच्या मुलीचे हृदय पुरेसे मोठे, शुद्ध आणि उत्कट वक्तृत्वाने परिपूर्ण होते. त्या संध्याकाळी हेलेनच्या संभाषणाचा विषय असा होता, ज्याची आठवण मी कधीही विसरणार नाही.

मिस टेंपल आणि हेलेन माझ्यासाठी देश परदेशातील विविध विषयांवरची माहिती, भूतकाळातील घटना, दैवी झालेल्या निसर्गाच्या रहस्यांबद्दल सांगितले. त्या वेगवेगळया पुस्तकांबद्दल बोलत होत्या; त्यांनी कितीतरी ग्रंथ वाचले होते! त्यांना अफाट ज्ञान होते! फ्रेंच लेखकांची नावे त्यांना परिचित होती. पण माझे आश्चर्य शिगेला पोहोचले होते, जेव्हा मिस टेंपलने हेलेनला विचारले की तिला तिच्या वडिलांनी शिकवलेल्या लॅटिन भाषेतील तिच्या लायब्ररीतून एक पुस्तक घेऊन तिने तिला एक पान वाचून भाषांतरित करण्यास सांगितले. .

हेलेनने आज्ञा पाळली आणि प्रत्येक ओळीने माझी प्रशंसा वाढत गेली. भाषांतर संपले तशी बेलने वाजली झोपायची वेळ झाली होती. त्यामुळे आम्ही जास्त वेळ राहू शकलो नाही.

मिस टेंपलने निरोप दिला.

"माझ्या मुलांनो, देव तुम्हाला आशीर्वाद देईल!"

शयनगृहात पोहोचल्यावर आम्हाला मिस स्कॅचर्डचा आवाज ऐकू आला; ती ड्रॉवर्स तपासत होती, हेलेन बर्न्सने प्रवेश केल्यावर तिला कठोरपणे फटकारले

गेले. दुसऱ्या दिवशी अर्धा डझन विस्कटलेल्या वस्तू तिच्या खांद्याला जोडल्या जातील असे त्याला सांगण्यात आले.

"हे अगदी खरे आहे की माझा ड्रॉवर आवरला नव्हता," हेलेन मला हळू आवाजात म्हणाली, "मला आवरायला हवा होता आणि मी विसरले."

दुसऱ्या दिवशी, मिस स्कॅचर्डने पुठ्ठ्याच्या तुकड्यावर मोठ्या अक्षरात लिहिले: 'गबाळ'

मग तिने तो पुठ्ठा, त्या चांगल्या, उदात्त, सौम्य, बुद्धिमान हेलनच्या कपाळाला बांधला.

संध्याकाळपर्यंत, त्या मुलीने धीराने तिची शिक्षा सहन केली आणि एक क्षणही संतापाची कल्पना न करता; कारण तिने ही शिक्षा योग्य मानली.

संध्याकाळच्या शाळेनंतर मिस स्कॅचर्ड निघून गेल्यावर मी हेलेनकडे धावत सुटले. मी तिच्या कपाळावरचा कागद फाडून आगीत टाकला. हेलन मात्र रागालोभापासून अलीप्त होती. तिची अवहेलना पाहून माझ्या गालावरून अश्रू वाहू लागले. हा अन्याय तिला निमुटपणे सहन करतांना पाहून माझ्या हृदयात असह्य वेदना झाल्या.

मी नुकतेच जे काही सांगितले आहे त्यानंतर एका आठवड्यानंतर, मिस टेंपल, ज्यांनी मिस्टर लॉयड यांना पत्र लिहिले, त्यांना उत्तर मिळाले; त्यांचे उत्तर माझ्याशी निवेदनाशी सहमत आहे असे दिसले म्हणून मिस टेंपलने संपूर्ण शाळा एकत्र करून जाहीर केले की जेन आयरवर श्री ब्रोकलहर्स्टनी कोणत्या दोषांचे आरोप केले होते याची माहिती तिने घेतली आहे आणि तिला निर्दोष घोषित करण्यात आनंद आहे. शिक्षकांनी हात हलवून समर्थन दिले. माझे चुंबन घेऊन मैत्रीणी आनंदित झाल्या.

a

अशा प्रचंड ताणातून मुक्त होऊन मी कामाला लागण्याचा आणि सर्व अडचणींवर मात करण्याचा संकल्प केला.

मी धैर्याने काम सुरू केले आणि माझे यश माझ्या प्रयत्नांच्या प्रमाणात होते: माझी स्मृती जी नैसर्गिकरित्या फार चांगली नव्हती ती सरावाने सुधारली; व्यायाम नियमित सुरु झाला . व्याकरणाचे पाठ सुरु झाले. काही आठवड्यांनंतर मला वरच्या वर्गात प्रवेश दिला आणि जेव्हा मला फ्रेंच आणि चित्र काढण्याची परवानगी मिळाली तेव्हा पहिले चित्र मी एका झोपडीचे काढले.

मी झोपायला जात असे तेव्हा गरम बटाटे, पांढरा ब्रेड आणि ताजे दूध अशी मनाशी कल्पना करत पोटातील भुकेचे शांत करण्यासाठी करण्याची सवय लावून घेतली होती. त्या विचारात भुकेची जाणीव विरत जाई आणि एकदाची झोप लागे.

प्रथम चित्र काढलेल्या रात्री सुध्दा भूक लागली होती पण अंधारात माझ्या डोळ्यांसमोर, नेहमीचे जेवणाचे चित्र येण्याऐवजी, मी घरे, झाडे, खडक आणि नयनरम्य परिसर, किल्ल्यांचे समूह, कळयावर, फुलांवर फडफडणारी फुलपाखरं, पिकलेल्या चेरीला चोच मारणारे पक्षी किंवा आयव्हीच्या फांद्यामध्ये झाकलेले लहान रॉबिनचे घरटे माझ्या मनात आणि नजरेसमोर साकारले होते त्यामुळे माझी भुकेची जाणीव निमाली.

मी मॅडम पियरोटने मला दाखवलेल्या एका छोट्या फ्रेंच पुस्तकाचे अस्खलितपणे भाषांतर करत आहे, याचा विचार करत करत मला झोप लागली आणि दुसरे दिवशी फ्रेंचची शिकवणी सहज सोपी झाली.

सॉलोमनचे म्हणणे बरोबर आहे: “प्रेमाची मीठ भाकर, तिरस्काराच्या पंच पक्वान्ना पेक्षा श्रेष्ठ आहे.”

गेटशेड आणि तेथिल सोईसुविधांपेक्षा लोवूड आणि येथील समस्या, उपासमार, त्रास, वेदना मला जास्त प्रिय होत्या.

# प्रकरण 9

लोवूड मध्ये आल्यापासून, उपासमार, त्रास, वेदना, दु:ख याचा सामना करता करता, नकळतपणे सर्व अंगवळणी पडले आणि काही दिवसांनी त्रास कमी वाटायला लागला. आता वसंत ऋतु येणार होता.

जवळजवळ आला होता; दंव थांबले होते; बर्फ वितळला होता; थंड वारे कमी जोरात वाहू लागले; माझे पाय, जे जानेवारीच्या बर्फाळ हवेने जखमी झाले होते आणि चालणे त्रासदायक झाले होते, ते एप्रिलच्या वाऱ्याच्या प्रभावाखाली बरे होऊ लागले होते. दिवस रात्र रक्त गोठवणारे तापमान, आता थोडे फार उबदार बनत चालले होते. बागेत तासाभराचे खेळणे शक्य होऊ लागले. जेव्हा सूर्यप्रकाश पडत असे तेव्हा पानगळीने उजाड झालेल्या जमिनीवर अधूनमधून मऊ, हिरवळीची लव उगवल्याचे दिसून येई.

पाना आडून कळया, फुले दिसू लागली होती; गुरुवारी अर्धा वेळ सुट्टी असल्याने आम्ही फिरायला गेलो, आणि आम्हाला कुंपणावर आणखी सुंदर फुले बहरलेली दिसली.

मला याची जाणीव झाली की, आनंद आणि समाधानला गवसणी घालायच्या संधी, आमच्या सभोतालच्या उंच, काटेरी कुंपणाच्या पलीकडे, पार क्षितीजाला जाऊन भिडली गेली आहे.

या आनंदात सभोतालच्या डोंगरांची उंच शिखरे, त्यांच्या पायथ्याशी पसरलेले हिरवेगार समृद्ध पठार, मध्यभागी झुळझुळ वाहणारा एक ओढा, त्याच्या प्रवाहातील चमकदार भोवरे आणि गुळगुळीत दगडगोटे सर्वांचाच सहभाग होता. हिंवाळात सर्व काही बर्फाखाली गाडले गेले होते. मरणाची थंडी आणि जोराने

a

वाहणारा वारा डोंगराच्या माथ्यावर घोंघावत होता. डोंगराच्या अंगावर वहाणारे झरे आणि प्रवाहाने तयार झालेले बेट, चोहोबाजूंनी बर्फाळ धुक्यात मिसळून जात असे.

एरव्ही हा ओढा, गढूळ पाण्याचा जोमाने वाहणारा स्वच्छंद प्रवाह झाला होता; त्याच्या मार्गामध्ये एक मोठे झाड आडवे पडल्याने त्याचे दोन भाग झाले होते. त्याला आदळून प्रवाह पुढे जाताना, त्याचा आवाज आसमंतात घुमत असे. कधी कधी मुसळधार पाऊस किंवा गारांच्या वर्षाव झाल्यास हा ओढा दुथडी भरुन वहात असे. हिंवाळ्यात मात्र त्याचे दोन्ही तीर गोठलेल्या अवस्थेत असत.

एप्रिल महिना संपत आला होता आणि स्वच्छ, उबदार मे महिन्याचे वेध लागले. हळूहळू निळे आकाश, सूर्याची उबदार किरणे, वाऱ्याची मंद झुळूक मे महिन्याची चाहूल देत होती. झाडे जोमाने वाढत होती; निष्पर्ण झालेले वृक्ष, कोवळ्या पालवीने सजू लागले. वेली पाना फुलांनी बहरल्या. निसर्गाने ओक, बीचेस, एल्म्स सारख्या वृक्षांना नवजीवन प्रदान केले. खड्डे विविध प्रकारच्या शेवाळयानी व्यापून गेले. जंगली प्राईमरोजच्या बहराने सगळीकडे फिकट गुलाबी रंग पसरला होता.

असे कधीही न पाहिलेले, अपुर्व निसर्ग सौंदर्य मी एकटीने अनेकदा मनसोक्त आणि विनामूल्य अनुभवले: हे स्वातंत्र्य आणि आनंदाच्या मागे एक निराळेच कारण होते, त्या विषयी मला आता सांगायलाच हवे आहे.

आतापर्यंत मी लावुडचे वर्णन एक सुंदर रहाण्याचे ठिकाण असेच केले आहे, नाही का? लावुड पर्वतांनी वेढलेल्या जंगलात एका नदी काठी वसलेले होते. खरोखरच नैसर्गिकदृष्ट्या सुंदर आणि आनंददायी अशी जागा होती पण ती निरोगी की नाही, हा खरा प्रश्न आहे.

a

जंगलातील ज्या दरीत लावुड वसलेले होते, ती धुक्याचे उगमस्थान होती. त्यामुळे संसर्गजन्य रोगांची पैदास होण्यास अनुकूल अशी होती. वसंत ऋतूमध्ये धुके परत आले आणि त्यासोबत टायफस फिवर पण आला.

लौकरच टायफस फिवरचा प्रवेश लोवुडच्या अनाथाश्रमात झाला.

शाळेत आणि वसतिगृहात संसर्गामुळे अनेक विद्यार्थीनींना त्याची लागण झाली आणि त्यामुळे मे महिना सुरू होण्यापूर्वीच शाळेचे रूपांतर हॉस्पिटलमध्ये झाले. निकृष्ट आणि अपूरे अन्न, आणि दुर्लक्षित थंडी यामुळे बहुतेक विद्यार्थ्यीनींना संसर्ग होण्याची शक्यता होती: ऐंशीपैकी पंचेचाळीस मुली एका वेळी आजारी पडल्या. वर्ग बंद पडले; नियम शिथिल झाले. ज्या कोणी विद्यार्थीनी संसर्गापासून बचावल्या होत्या, त्यांना पूर्ण स्वातंत्र्य मिळाले, कारण डॉक्टरांनी, संसर्गापासून बचाव करण्यासाठी व्यायाम मोकळया हवेची गरज आहे यावर जोर दिला आणि त्याशिवाय, आमच्यावर लक्ष ठेवण्यासाठी कोणालाही वेळ नव्हता. मिस टेंपल पूर्णपणे आजारी मुलींच्या देखभाल करण्यात गढून गेल्या होत्या; फक्त काही तास विश्रांतीचे सोडले, तर संपूर्ण दिवस त्या आजारी मुलींच्या कक्षात असत. ज्यांचे पालक अथवा नातेवाईक आपल्या पाल्यांना संसर्गापासून दूर ठेवण्यासाठी घरी घेऊन जाण्यास तयार होते अशा मुलींची पाठवणी करण्यात शिक्षकवृंद गुंतून गेला होता. काही आजारी मुली शेवटच्या क्षणी घरी पाठवल्या गेल्या तर काहीनी लोवूड येथे अखेरचा श्वास घेतला, आणि त्वरीत त्यांचे शांतपणे दफन करण्यात आले, महामारीच्या गंभीर स्वरूपामुळे कोणताही विलंब धोकादायक बनला होता.

आजारपणाने लोवुड येथे घरच केले होते आणि मृत्यू वारंवार भेटीला येई. सर्वत्र खोल्या आणि कॉरिडॉरमधून हॉस्पिटलचा आणि औषधांचा वास भरून राहिला होता. सर्व उपायांसह संसर्गाचा मुकाबला करण्याचे प्रयत्न निष्फळ झाले.

तथापि, लोवुडच्या अनाथाश्रमाच्या बाहेर, मे महिन्यातील निरभ्र आकाश, नयनरम्य पर्वत, घनदाट जंगल, जंगली गुलाबांचा सुगंध, तलावात फुललेल्या वॉटर लिलीज्, वसंत ऋतूचे आगमन सुखावत होते.

आमच्या बागेतील फ्लॉवरबेड, गुलाबी क्लोव्हर आणि डबल डेझीने उजळले होते; सकाळ, संध्याकाळ आंबटगोड बेरीजचा वास आसमंतात दरवळत असे.

परंतु हा ठेवा पाहण्याचे भाग्य लोवुडच्या बहुतांश मुलींच्या नशीबी नव्हते. कधी कधी फक्त आम्हीच काहीजणी जाऊन शवपेटी सुशोभित करण्याच्या हेतूने औषधी वनस्पती आणि फुलांचा एक लहान पुष्पगुच्छ घेऊन येत असू.

मी आणि बाकीच्या निरोगी मुलींनी या ऋतुमानाचा आणि मिळालेल्या स्वातंत्र्याचा पुरेपूर आनंद उपभोगला. सकाळपासून रात्रीपर्यंत आम्ही जंगलात जिप्सीसारख्या फिरत असू. आम्हाला वाटले तसे आम्ही वागलो, आमची लहर आम्हाला नेईल तेथे आम्ही गेलो; आमचा आहार पूर्वीपेक्षा चांगला झाला होता. मिस्टर ब्रोकेलहर्स्ट आणि त्याचे कुटुंब मात्र यावेळी लोवुडकडे फिरकले देखील नाही सर्व तपासणी थांबली होती.

संसर्गाच्या भीतीने, स्वयंपाकीण बाईलोवुड सोडून गेल्या. तिच्या जागी, जी बाई आली ती लोटन दवाखान्यात नोकरीला होती. नवीन नोकरीचे नियम न जाणून घेता तिने अधिक उदारतेने अन्न वाटप सुरू केले. खाणाऱ्यांची संख्या कमी झाली होती; आणि आजारी लोक कमी खात. त्यामुळे आम्हाला जेवण जास्त प्रमाणात मिळत होते.

आमच्या न्याहारी चांगली असून वाडगा भरलेला असे. जेव्हा रात्रीचे जेवण तयार करण्यासाठी वेळ नसे आणि असे नेहमी व्हायचे, तेव्हा आम्हाला थंड पॅटीचा एक मोठा तुकडा किंवा ब्रेड आणि चीजचा जाड तुकडा दिला जात असे; मग आम्ही

a

आमचे जेवण जंगलात नेऊन, सर्वात जास्त आवडणारी जागा आम्ही निवडून, झाडाखाली गवतावर बसून जेवण करत असू.

माझे आवडते ठिकाण एक मोठा साधा दगड होता जो प्रवाहामध्ये असून कोरडा होता. उथळ पाण्यातून अनवाणी आम्ही तिथे जात असू. दोन व्यक्ती आरामात बसू शकतील एवढा हा दगड रुंद होता; मी दुसऱ्या एका मुली सोबत तिथे जात असे. तिचे नाव मेरी अँन विल्सन. माझ्यापेक्षा काही वर्षांनी मोठी होती. ती एक हुशार मुलगी होती. तिची निरीक्षण शक्ती चांगली होती. मनमिळावू असल्याने तिची माझी मैत्री झाली. तिला बाहेरच्या जगाची बरीच माहिती होती; त्याविषयी सांगण्यास ती बरीच उत्सुक असायची. माझ्या प्रश्नांची उत्तरे देण्यात तिलाही आनंद वाटे. त्याबरोबर माझ्या चुकांची पण सौम्यपणे जाणीव करून देत असे. आम्ही एकत्र पोहायला जात असू. त्यामुळे पोहण्यामधील कौशल्य जास्त विकसित झाले नसले तरी आम्ही पोहण्याचा आनंद मनमुराद लुटला.

पण या काळात, हेलन बर्न्स काय करत होती? हे दिवस, स्वच्छंदपणे तिच्यासोबत का घालवू शकले नाही? तिच्या आत्मीयतेचा मला कंटाळा तर आला नव्हता? नक्कीच हेलन, मेरी अँन पेक्षा सर्वार्थाने सरस होती. मेरी अँन मजेदार गप्पा मारत असे पण हेलनचे वैशिष्ट्य म्हणजे तिच्याशी साधलेल्या संभाषणातून उच्चतम आणि उदात्त मुल्यांची ओळख होत असे.

वाचकहो, मला माझ्यातले दोष माहित होते. जरी माझ्यात अनेक दोष, अवगुण असले तरी त्यांचे निवारण करण्यासाठी हेलन न कंटाळता तत्परतेने तयार असे. मी तिच्याबरोबर एका कोमल पण मजबूत धाग्यानी बांधली गेले होते.

हेलनने प्रत्येक वेळी कठीण परिस्थितीत, विश्र्वासाने माझी साथ दिली होती. कधीही चिडली अथवा रागवली नाही. माझ्या मनात कायम तिच्याविषयी आदरयुक्त, प्रेमभावना वास करत राहीली आहे.

a

पण सध्या हेलन आजारी होती. कित्येक आठवड्यात मी तिला पाहिले नव्हते. तापाच्या साथीच्या इतर आजारी मुलींसमवेत ती हॉस्पिटलमध्ये नव्हती. तिचा आजार ताप नसून तिचा जुना खोकला असल्याचे समजले होते. त्यामुळे मला विषेश काळजी वाटत नव्हती. थोड्या औषधोपचारांनी तिला लौकरच बरे वाटेल अशी माझी समजूत होती.

थोडे ऊन पडल्यावर दोन-तीन वेळा मिस टेंपलने तिला बागेत नेलेले मी पाहिले होते. त्यामुळे तिच्या बरे होण्याविषयी माझी खात्री झाली पण मला तिच्याशी बोलण्याची परवानगी नव्हती; मी तिला फक्त स्टडी रूमच्या खिडकीतून पाहू शकले तेही अगदी अस्पष्टपणे कारण तिने शाल गुंडाळलेली होती आणि थोड्या दूर अंतरावर व्हरांड्यात उभी होती.

जून महिना सुरू झाला. एका संध्याकाळी मी आणि मेरी अँन दोघीच बऱ्याच वेळ जंगलात इकडे तिकडे भटकताना रस्ता चुकलो. एका मेंढपाळ जोडप्याला रस्ता विचारुन मार्गी लागे पर्यंत रात्र होत आली.

आम्ही पोहोचलो तेव्हा चंद्र उगवला होता; आम्ही डॉक्टरांचा घोडा बागेच्या गेटला बांधलेला पाहिला. ते पाहून मेरी अँन म्हणाली, बहुतेक कोणीतरी गंभीर आजारी असावे म्हणून डॉ. बेट्सना बोलावून घेतले असावे असे म्हणून ती आत गेली.

मी बागेत माझ्या वाफ्याकडे गेले आणि रानातून आणलेले कंद जमिनीत रोवले; जास्त वेळ झाला तर मरुन जातील की काय अशी आशंका वाटत होती. थोडा वेळ मी बागेतच थांबले. फुलांचा मंद सुवास दरवळत होता. सर्वत्र शांततेचे साम्राज्य होते. हवा उबदार होती. चंद्रप्रकाश चोहीकडे विखुरला होता. जणु उद्या एक चांगला दिवस उजाडेल याचीच खात्री देत असावा. लहानपणापासून मी आणि बेसी अश्या शांत चांदण्या रात्रींचा आनंद घेत असू. मी अंगावर शाल पांघरून

बेसीच्या गोष्टी ऐकत असे. आज सर्वत्र शांतता असून मन मात्र क्षुब्ध झाले होते. कोणीतरी गंभीर आजारी असेल या मेरी अँनच्या शब्दांनी अंतर्मनात खळबळ उडाली असावी.

मनात विचार आला अशा वेळी वेदनेने तळमळत, मृत्यूची चाहूल घेत असणे किती दु:खदायक आहे. हे सुंदर जग सोडून जावे लागणे या सारखी दुसरी कुठली दुर्दैवी गोष्ट नसेल. शिवाय नेमके कोठे जावे लागते काय माहित.

मग माझ्या मनाने स्वर्ग आणि नरकाबद्दल काय अंतर्भूत केले आहे हे समजून घेण्याचा आटोकाट प्रयत्न केला: आणि प्रथमच ते मागे हटले, गोंधळले; मला, मी एका अथांग खाडीच्या मधोमध उभी असल्याचा भास झाला. त्यावेळी मला फक्त एकच गोष्ट जाणवली आणि समजली ती म्हणजे वर्तमान; बाकी सर्व फक्त एक आकारहीन पोकळ ढग होता, आणि या गोंधळामुळे स्वत:ला बुडत चालले आहे असा वाटून मी भीतीने थरथर कापायला लागले.

असा विचार करत असताना दरवाजा उघडल्याचा आवाज ऐकू आला; डाँक्टर बेट्स, नर्ससोबत बाहेर आले.

डॉक्टर घोड्यावर बसून निघून गेल्यावर नर्स दार बंद करत असता मी तिच्या दिशेने धावले

"हेलेन बर्न्स कशी आहे?" मी विचारले.

"खूप वाईट," तिने उत्तर दिले.

"डॉक्टर बेट्स तिच्यासाठी आले होते काय?"

"होय."

"आणि ते काय म्हणाले?"

"ते म्हणतात, की ती इथे जास्त काळ राहणार नाही."

जर मी हेच वाक्य आदल्या दिवशी ऐकले असते, तर मला विश्वास वाटला असता की हेलन नॉर्थम्बरलँडला, तिच्या वडिलांकडे परत जाणार आहे आणि मी मृत्यू कधीच गृहीत धरला नसता; पण त्या दिवशी मला लगेच स्पष्टपणे जाणवले की हेलेन तिचे शेवटचे दिवस मोजत आहे, जर मृत्यूनंतर खरोखरच काही अस्तित्व असेल, तर ती आत्म्याच्या प्रदेशात जाण्यासाठी हे जग सोडून जाणार होती. माझी पहिली भावना भीती होती; मग माझे हृदय तीव्र वेदनेने पिळवटून गेले; तिला शेवटचे पाहण्याची इच्छा झाली; मी विचारले ती कोणत्या खोलीत आहे.

“ती मिस टेंपलच्या खोलीत आहे,” नर्सने मला सांगितले.

“मी वर जाऊन तिच्याशी बोलू शकते काय?”

“नाही, मुली, हे शक्य नाही; आता तू झोपायला आत जा. थंडीत बाहेर राहिल्यास ताप येईल.”

मोठा दरवाजा बंद झाला आणि मी बाजूच्या एका दारातून आत शिरले. नऊ वाजले होते आणि मिस मिलर विद्यार्थीनींना झोपायला बोलावत होती.

दोन तास उलटले; सुमारे अकरा वाजले असावेत; मला झोप येत नव्हती. सर्व मुली गाढ झोपेत होत्या. शयनगृहात संपूर्ण शांतता होती. मी उठले, माझा ड्रेस घातला आणि अनवाणी अपार्टमेंट सोडले. मी मिस टेंपलची खोली शोधू लागले; ती घराच्या दुसऱ्या टोकाला होती; मला रस्ता माहीत होता, आणि खिडक्यांमधून येणारा चंद्राचा प्रकाश मला वाट दाखवू लागला.

कापूर आणि जळलेल्या व्हिनेगरच्या वासाने मला सावध केले की मी तापाच्या वॉर्डजवळ आहे; रात्रभर पहारा देणारी गार्ड ऐकेल या भीतीने मी त्वरेने पुढ गेले: तिच्या नजरेस पडल्यास मला परत झोपायला पाठवण्यात आले असते. मला हेलनला भेटायचे होते; तिचा मृत्यू होण्यापूर्वी तिला माझ्या मिठीत घेण्याचा, तिला

a

शेवटचे चुंबन देण्याचा, तिच्याशी एखादा शेवटचा शब्द बोलण्याचा मी मनोमन निर्धार केला होता.

एक जिना उतरून, घराचा एक भाग आवाज न करता ओलांडून मी दोन दरवाजे उघडून, मिस टेंपलच्या खोलीजवळ पोहोचले. .

कीहोलमधून आतील प्रकाश दिसत होता; तिथे सर्व काही शांत होते. मी जवळ गेल्यावर मला दिसले की दार उघडे होते, बहुधा बाहेरून येणारी हवा आत येण्यासाठी असावे.

मी दरवाजा ढकलला आणि खोलीत पाहिले; माझे डोळे हेलनला शोधत होते आणि मला मृत्यूची भीती वाटत होती.

मिस टेंपलच्या पलंगाच्याजवळ आणि एक छोटा पलंग होता; त्यावर पाहिले मी बागेत ज्या गार्डशी बोलले होते ती खुर्चीत झोपली होती; टेबलावर एक मेणबत्ती जळत होती.

मिस टेंपल तिथे नव्हती; मला नंतर कळले की ती दुसऱ्या आजारी मुलीला पहायला गेली होती.

मी सावध पावले टाकली आणि बेडसमोर थांबले:

“हेलन,” मी हळूवारपणे कुजबुजले, “तू जागी आहेस का?”

तिने हुंकार दिला. पडदा बाजूला सरकला आणि मला तिचा फिकट गुलाबी, क्षीण पण एकदम शांत चेहरा दिसला. तिला पहाताच माझी भीती लगेचच पळून गेली.

“ तू आहेस, जेन?” तिने तिच्या गोड आवाजात मला विचारले.

“मला वाटले, ती मरणार नाही; ते चुकीचे आहेत: कारण, तसे असते तर तिचे बोलणे इतके शांत नसते.”

मी तिच्या लहान पलंगावर गेले आणि कपाळावर हात ठेवला . तिचे कपाळ, गाल, हात, संपूर्ण शरीर थंड होते; पण ती पूर्वीसारखीच हसली.

"तू इथे का आलीस, जेन? अकरा वाजले आहेत; काही क्षणांपूर्वी मी टोले ऐकले."

"मी तुला भेटायला आले, हेलन; मला समजले की तू खूप आजारी आहेस, तुझ्याशी बोलल्याशिवाय मला झोप येत नव्हती."

"मग तू माझा निरोप घ्यायला वेळेवर पोहोचलीस."

"तू कुठे जात आहेस, हेलन? तू तुझ्या घरी परत जाणार आहेस का?"

"होय, माझ्या शेवटच्या, माझ्या शाश्वत घरात."

"नाही, हेलन नाही!"

मी थांबले, आतून हालून गेले. मी माझे अश्रू गिळण्याचा प्रयत्न करत असताना, हेलनला खोकल्याचा त्रास झाला आणि तरीही गार्ड उठली नव्हती. उबळ कमी झाल्यावर, हेलेन काही मिनिटे थकून गेली; मग ती कुजबुजली:

"जेन, तुझे पाय उघडे आहेत; ये आणि माझ्याबरोबर चादरीत झोप"

मी आज्ञा पाळली; तिने तिचा हात माझ्याभोवती ठेवला आणि मी तिच्याजवळ पडून राहिले. दीर्घ शांततेनंतर ती मला खूप शांतपणे म्हणाली:

"मी खूप आनंदी आहे, जेन. जेव्हा तुला सांगतील की मी मेले आहे, तेव्हा त्यावर विश्वास ठेव आणि दु:ख करू नको; यात दुःख करण्यासारखे काहीही नाही: आपण सर्व एक ना एक दिवस मरणार आहोत आणि मला पृथ्वीवरून घेऊन जाणारा आजार वेदनादायक नाही, तो सौम्य आणि हळू आहे; माझे मन शांत आहे; माझी उणीव इथे कोणाला भासणार नाही. माझ्याकडे फक्त माझे वडील आहेत; त्यांनी अलीकडेच पुनर्विवाह केला आहे आणि माझ्या मृत्यूमुळे त्याच्यासाठी फार मोठी पोकळी होणार नाही. लहानपणातील मरणाने माझी मोठेपणीच्या दुःखापासून सुटका

a

होते आहे, माझ्याकडे जगात टिकून रहाण्यासाठी आवश्यक असलेले गुण आणि कौशल्ये नाहीत त्यामुळे मी सतत अपयशी ठरले असते.''

'' तू कुठे जात आहेस, हेलन? आपण ते पाहू शकतो? तुला माहीत आहे का?''

'' माझा विश्वास आहे आहे की मी देवाकडे जात आहे.''

''देव कुठे आहे? देव म्हणजे काय?''

''माझा आणि तुझा निर्माता आहे; तो त्याचे कार्य कधीही नष्ट करणार नाही; माझा त्याच्या सामर्थ्यावर आणि चांगुलपणावर विश्वास आहे; मी तो पवित्र क्षण येण्याची वाट पहात आहे.''

''तर, हेलेन, तुला खात्री आहे की स्वर्ग खरोखर अस्तित्वात आहे आणि मृत्यूनंतर आपले आत्मे तेथे पोहोचू शकतात?''

''होय, जेन, मला खात्री आहे की या पुढे एक जीवन आहे; माझा विश्वास आहे की देव चांगला आहे आणि मी माझ्या अमरत्वाच्या वाट्यासाठी आत्मविश्वासाने स्वतःला त्याच्याकडे सोडू शकते. देव माझा पिता आहे, देव माझा मित्र आहे; मी त्याच्यावर प्रेम करते आणि मला विश्वास आहे की तो माझ्यावर प्रेम करतो.''

'' हेलन, मी मेल्यानंतर तुला पुन्हा भेटू का?''

''होय, तुही याच आनंदाच्या प्रदेशात येशील; त्याच सर्व-शक्तिशाली आणि सार्वभौम कुटुंबाकडून तुमचे स्वागत होईल, यात काही शंका नाही, प्रिय जेन!''

हा प्रदेश अस्तित्त्वात असेल तर काय, असा प्रश्न मला पडला; पण मी माझ्या शंका हेलनला सांगितल्या नाहीत. मी तिचा हात अधिक जोराने दाबला; ती मला नेहमीपेक्षा प्रिय होती; मला असे वाटले की मी तिला जाऊ देऊ शकत नाही

आणि मी माझा चेहरा तिच्या गळ्यात लपविला. मग ती मला गोड उच्चारात म्हणाली:

"मला बरं वाटत आहे ; पण खोकल्याच्या या शेवटच्या चढाईने मला थोडा थकवा आला आहे आणि मला झोपण्याची गरज आहे. मला सोडू नकोस, जेन, मला तुला माझ्या जवळ रहायला आवडते."

"प्रिय हेलेन, मी तुझ्याबरोबर राहीन आणि कोणीही मला येथून दूर नेऊ शकणार नाही."

"माझ्या प्रिय मैत्रिणी, तू उबदार आहेस का?"

"होय."

"शुभ रात्र, जेन."

"शुभ रात्र, हेलन."

मी तिचे चुंबन घेतले आणि आम्ही दोघे झोपी गेलो.

मला जाग आली तेव्हा दिवस उजाडला होता. मला जाग आली; मी माझ्या आजूबाजूला पाहिलं, मी कोणाच्या तरी कुशीत होते, गार्ड मला घेऊन जात होती; तिने मला शयनगृहात परत नेले. अंथरुण सोडल्याबद्दल मला फटकारले गेले नाही पण मी विचारलेल्या प्रश्नाची उत्तरे मला मिळाली नाहीत; काही दिवसांनंतर मला कळले की मिस टेंपल, खोलीत परत आल्यावर, मी हेलनच्या लहान पलंगावर पडलेली आढळले होते, तिच्या गळ्यात माझा हात होता; आणि हेलन बर्न्स मरण पावली होती.

तिच्या पार्थिवावर ब्रोकलब्रिज स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. एक राखाडी संगमरवर ती जिथे विश्रांती घेते ती जागा दर्शवतो.

आम्ही तिचे नाव आणि हा एक शब्द वाचायला मिळतो:

resurgam : Latin for "I will rise again." "मी पुन्हा उठेन"

# प्रकरण 10

आत्तापर्यंत मी माझ्या छोट्याशा आयुष्यातील वैविध्यपूर्ण घटना तपशीलवार सांगितल्या आहेत; माझ्या आयुष्याच्या दहा वर्षांसाठी मला जवळजवळ दहा अध्याय बनवावे लागले; परंतु माझे अचूक चरित्र बनवण्याचा माझा हेतू नाही, केवळ माझ्या आठवणीच्या पोतडीतून काही महत्वाच्या घटनांचा आढावा घेण्याचा एक प्रयत्न होता म्हणून मी या पुढील आठ वर्षे फक्त काही महत्त्वाचे दुवे जोडून पुढे जाण्याचे ठरविले आहे; काय होणार आहे हे समजून घेण्यासाठी फक्त काही तपशील आवश्यक असेल.

टायफसने आपले विनाशाचे कार्य पूर्ण केल्यावर त्याने हळूहळू लोवुड सोडले; परंतु त्याची तीव्रता आणि बळी गेलेल्या विद्यार्थीनींची संख्या याने शाळेकडे लोकांचे लक्ष वेधले गेले; अरिष्टाचे मूळ शोधण्यासाठी चौकशी समिती नेमली गेली. त्या मधून जी कारणे पुढे आली, त्यामुळे उच्च पातळीवर संताप व्यक्त केला गेला. प्रतिकूल वातावरण, अपुरे आणि निकृष्ट प्रतीचे अन्न, अन्न तयार करण्यासाठी वापरण्यात येणारे खारे आणि अशुद्ध पाणी, कपड्यांची कमतरता, सर्वकाही शेवटी उघड झाले. हे निष्कर्ष, श्री. ब्रोकलहर्स्टला धक्का देणारे पण संस्थेसाठी खूप उपयुक्त ठरले.

अनेक श्रीमंत आणि परोपकारी लोकांनी रक्कम जमा केली ज्यामुळे लॉवुडला अधिक योग्य रीतीने आणि चांगल्या स्थितीत पुनर्बांधणी करणे शक्य झाले; जुन्या नियमांची जागा नवीन नियमांनी घेतली. अन्न आणि कपड्यांमध्ये अनेक सुधारणा झाल्या: शाळेचा निधी एका समितीकडे सोपवण्यात आला.

मिस्टर ब्रोकलहर्स्टना त्यांच्या संपत्तीमुळे आणि त्याच्या कुटुंबाच्या प्रसिद्धीमुळे हाकलून लावता आले नाही; म्हणून ते खजिनदार राहिले, परंतु त्याच्या मदतीला अनेक दिलदार आणि सहानुभूतीशील सदगृहस्थ जोडले गेले. शाळा तपासणी कार्यालयातील अधिकाऱ्यांनी, काटेकोरपणे, आवश्यक सोईसुविधा, काटकसर आणि न्याय या सर्वांची सांगड घालून एक नवी घडी बसवायला मदत केली. अशा प्रकारे अपेक्षित सुधारणा झाल्या आणि शाळा खरोखर एक उदात्त आणि उपयुक्त संस्था बनली.

लोवुडच्या शाळेला नवसंजीवनी मिळाल्यानंतर, मी आणखी आठ वर्षे लोवुडच्या शाळेत राहिले; सहा वर्षे विद्यार्थीनी म्हणून आणि दोन वर्षे तिथेच अध्यापिका म्हणून काम केले. विद्यार्थीनी आणि शिक्षिका दोन्ही गोष्टी मी पूर्ण क्षमतेने मूल्य आणि महत्त्व यांना न्याय देऊ शकले याचा मला अभिमान वाटतो.

या आठ वर्षांत माझे आयुष्य एकसुरी होते; पण मी, क्रियाशील असल्याने मला त्या कंटाळा आला नाही. त्यामुळे मला उत्कृष्ट शिक्षण घेता आले. अभ्यासांबद्दलचे माझे प्रेम, प्रत्येक गोष्टीत उत्कृष्ट बनण्याची माझी इच्छा त्यामुळे माझ्या गुरुजनांची मी विषेश आवडती विद्यार्थीनी होते. मला मिळालेल्या संधीचा मी पूर्ण फायदा करून घेत, मी नेहमीच वर्गात सर्व प्रथम येण्यात यशस्वी झाले; नंतर याच संस्थेमध्ये शिक्षिका म्हणून अध्यापन करु लागले.

मी माझे काम दोन वर्षे उत्साहात आणि आस्थेने पार पाडले; पण त्यानंतर माझ्या मनात काही वेगळ्या कल्पनांनी घर करायला सुरुवात केली.

मी नुकतेच बोलले त्या सर्व बदलांच्या दरम्यान, मिस टेंपल शाळेच्या मुख्याध्यापिका राहिल्या. माझ्या ज्ञान संपादनाचे संपूर्ण श्रेय मी त्यांनाच देईन. त्यांच्या सहवासात आणि त्यांच्या स्नेहात मला नेहमीच माझा आनंद मिळत असे. लोवूडला प्रथमतः त्यांनीच आईच्या मायेने देखभाल करुन शिक्षणाचा श्रीगणेशा

केला होता. अलीकडच्या काळात त्या माझ्या सहकारी बनल्या होत्या पण नंतर त्याचा विवाह झाला. त्यांचे पती रेव्हरंड मिस्टर नास्मिथ, चर्चमध्ये पाद्री होते. अत्यंत अनुरूप असे हे दाम्पत्य होते. लग्नानंतर त्या पतीसमवेत दूरच्या देशात स्थाईक झाल्या.

ज्या दिवसापासून मिस टेंपल मला सोडून गेल्या, त्या दिवसापासून मी पूर्वीसारखी राहिले नाही; त्यांच्यामुळे सहवासात लोवुड माझे घरच बनले होते, ते आता नाहीसे झाले. त्यांच्या स्वभावातील चांगुलपणा, चांगल्या सवयी, शिष्टाचार आत्मसात केल्याने माझे विचार अधिक सुसंगत झाले. भावनांवर योग्य नियंत्रण आणि कामाप्रती निष्ठा माझ्या मनात रुजल्या गेल्या. मी शांत आणि समाधानी बनल्याची माझी मलाच खात्री पटली. सर्वांच्या नजरेत मी एक शिस्तप्रिय आणि धीरगंभीर व्यक्ती समजली जात असे.

पण नियती, 'रेव्हरंड मिस्टर नास्मिथ', मिस टेंपलच्या पतीच्या रुपाने, मिस टेंपल आणि माझ्यामध्ये मध्ये उभी राहिली.

लग्न समारंभ आटोपून, पतीसह घोडागाडी मध्ये चढताना मी मिस टेंपलला पाहिले. बघता बघता, डोंगर उतारावरून घोडागाडी दिसेनासी झाली. आणि मी माझ्या खोलीवर परतले. उरलेला वेळ, एकटीने खोलीत निरुद्देश फेऱ्या मारत घालवला.

मिस टेंपलच्या लोवुड मधून जाण्याने माझी न भरून येण्याजोगी हानी झाली होती. या विषयी सखोल मनन केल्यावर मला एक निराळाच शोध लागला. त्या अवधीत माझ्यामध्ये परीवर्तन घडल्याचे मला जाणवले. माझ्या मनाने जेव्हढे काही मिस टेंपल कडून उधार घेतले होते ते पुसट झाल्यासारखे वाटू लागले अथवा तिच्या सानिध्यात मी ज्या शांत, प्रसन्न वातावरणात मी श्वास घेत होते, ते

वातावरण ती जाताना स्वतः बरोबर घेऊन गेली असावी. परत माझ्या मुळ स्थितीत आले. आजवर दबून असलेल्या माझ्या भावना उचंबळून वर येऊ लागल्या. त्यांच्या आधार काढला गेला नसून त्यांचे प्रयोजनच आता उरले नव्हते. शांत करणारी शक्ती उरली नव्हती असे नसून शांततेची गरजच आता संपली होती.

गेली काही वर्षे लावुड हेच माझे जग बनले होते. माझा अनुभव फक्त लोवुडच्या नियम आणि कार्यप्रणाली पुरता मर्यादित होता.

पण आता मला आठवले होते की पृथ्वी मोठी आहे आणि आशा, भीती, भावना आणि उत्साहाची अनेक क्षेत्रे, ज्यांच्याकडे पुढे जाण्याचे आणि संकटांमध्ये जीवनाचे ज्ञान शोधण्याचे धैर्य होते, त्यांच्यासाठी खुली होती.

मी खिडकीजवळ जाऊन खिडकी उघडून बाहेर नजर फिरवली. शाळेचे दोन वेगवेगळया भाग होते, त्या पुढे बाग आणि लोवुडच्या भोवतालच्या भिंती, त्या भिंतीच्या पलीकडे दूरवर क्षितिजापर्यंत पर्वत रांगा दिसत होत्या. माझी नजर दूरवरच्या निळया शिखरावर खिळली.

ते मला पार करायचे होते.

ओसाड जमीन आणि खडकांनी वेढलेले हे विस्तीर्ण पठार मला तुरुंगासारखे वाटले. माझी नजर डोंगराच्या पायथ्याशी वळणा-या मुख्य रस्त्याकडे वळली. दोन टेकड्यांमधील एका घाटात पुढील वाट दिसेनासी झाली होती. त्या पुढचा रस्ता पहायला मला आवडले असते.

मी याच रस्त्याने प्रवास केल्यावर संधिप्रकाशाच्या अंधुक प्रकाशात याच डोंगरावरून खाली उतरले होते. त्या काळाचा विचार करू लागले. मी लोवूडला आल्यापासून, एक शतक उलटून गेल्यासारखे वाटत होते आणि तरीही मी लोवुड सोडले नव्हते; आजवरच्या सर्व सुट्ट्या तिथेच घालवल्या होत्या. मिसेस

a

रीड यांनी मला कधीही गेटशेडला बोलावले नव्हते; ती किंवा तिच्या कुटुंबातील कोणीही मला भेटायला आले नव्हते.

माझ्याबरोबर कोणी पत्राने देखील संपर्क साधला ना कुणाचा निरोप आला. शाळेच्या संदर्भातील, नियम, कर्तव्य, सवयी, विश्र्वास, आवाज, चेहरे, चालीरीती, आवड निवड, कपडेलत्ते या एव्हढ्याच गोष्टी माझ्या लेखी अस्तित्वात होत्या. एक दिवस या आठ वर्षांच्या दिनचर्येचा कंटाळा आला. मला या सर्वांपासून स्वातंत्र्य हवे होते.

स्वातंत्र्य मिळावे म्हणून मी उसासा टाकला. स्वातंत्र्यासाठी प्रार्थना केली. पण माझी प्रार्थना, वाऱ्याच्या झुळूकेबरोबर वाहत वाहत विरून गेल्याचे मला वाटले म्हणून मी ही आशा सोडून दिली आणि आणखी नम्र विनंती केली; मला बदल मिळावा म्हणून विनंती केली; ही विनंती देखील अवकाशात हरवली गेली.

मग, मी निराशेने म्हणाले : “ मला या गुलामगिरीऐवजी नवीन काम मिळू दे!”

एव्हढ्यात रात्रीच्या जेवणाची बेल वाजली आणि मी खाली गेले. सर्व विद्यार्थींनी झोपेपर्यंत मी, माझे विचारचक्र सुरू करु शकत नव्हते. तेव्हढ्यात दुसऱ्या एक शिक्षिका माझ्याबरोबर बोलू लागल्या आणि मला माझ्या समस्येवर उपाय शोधण्याचे काम सुरु करणे शक्य झाले नाही. माझी सहकारी शिक्षिका झोपी गेल्यावर माझ्या विचारांना चालना मिळाली.

“नवीन काम,” मी स्वतःशी शांतपणे म्हणाले. मी येथे आठ वर्षे काम केले. आता मला फक्त इतरत्र सेवा करण्याची इच्छा आहे; ही एव्हढी गोष्ट माझ्या मनाप्रमाणे होऊ शकणार नाही काय? ही गोष्ट फारशी अवघड नसावी. फक्त कशी साध्य करायची याचा शांतपणे विचार करायला हवा.

a

“मला काय पाहिजे?” मी स्वतःलाच विचारले. नवीन देश, नवीन घर, नवीन चेहरे, नवीन वातावरण, यापेक्षा दुसरे काहीही मला नको आहे. पण नवीन नोकरी मिळवण्यासाठी काय करावे लागेल? मित्रांची मदत घ्यावी तर मला कोणी मित्रमैत्रिणी नाहीत. पण असेही लोक असत असतील, ते काय बरे करत असावेत? माझे मलाच प्रयत्न करावे लागतील. त्यासाठी माहिती कुठे आणि कशी मिळणार?”

खूप विचार करुनही मला उत्तर सापडले नाही. माझ्या कल्पनाशक्तीला खूप ताण दिला. पण शेवटी अगदी थकून झोपी गेले.

पहाटे जाग येताना माझ्या मनात तोच प्रश्न जागा होता आणि अचानक एक उत्तर सापडले, “ज्यांना नोकरी हवी आहे, त्यांनी काऊंटी हेराल्ड वृत्तपत्रामध्ये जाहिरात द्यावी.”

पण कशी द्यायची तेच मला माहीत नव्हते.

उत्तर स्वतःहून सुचले, हेरॉल्डच्या संपादकांना जाहिरातीचा मसुदा आणि लागणारे पैसे नेऊन द्यावे लागतील. जाहीरातीत , 'जेन आयर' हे नाव व लोटन येथील पोस्टमास्तरांच्या पत्त्यावर उत्तर मिळण्याचे आवाहन करणे आवश्यक आहे. साधारण आठवड्याभरात उत्तर आल्याच्या संदर्भात लोटनच्या पोस्ट ऑफिसला जाऊन विचारणा करायला हवी. जर योग्य प्रतिसाद असेल तर पुढे संपर्क साधावा लागणार.

माझ्या डोक्यात हा संकल्प आकार घेऊ लागला. माझ्या मनात तो स्पष्ट आणि व्यवहार्य होईपर्यंत मी त्याबद्दल विचार केला; मग मी जे केले त्यावर समाधानी तोडगा मिळाल्यावर मी झोपी गेले.

मी पहाटे उठले, आणि संपूर्ण शाळेला जाग आणणारी बेल वाजण्याच्या अगोदर माझे पत्र लिहून पुर्ण केले. त्याचा मसुदा देत आहे:

a

“शिक्षिकेच्या कामाचा दोन वर्ष अनुभव असलेल्या एका तरुण मुलीला, घरी राहून चौदा वर्षांपेक्षा कमी वयाच्या मुलांना शिकवण्यासाठी नोकरी हवी आहे. चांगले इंग्रजी, सामान्य विज्ञान, गणित हे शिकवू शकते शिवाय फ्रेंच, रेखाचित्र आणि संगीत या विषयांची ओळख पण करून देऊ शकते. त्या वेळी, वाचकहो, हा अभ्यासक्रम बराच उच्च दर्जाचा मानला जात होता.

जे.आ.

पोस्तमास्तर, लोटन,

ग्रेटर मँचेस्टर, इंग्लंड

हा संदेश दिवसभर माझ्या ड्रॉवरमध्ये बंद होता. चहापानानंतर मी नवीन मुख्याध्यापिकेला लोटनला काही खरेदी करण्यासाठी जाण्याची परवानगी मागितली. मला लगेच परवानगी मंजूर झाली आणि मी निघाले.

दुपारी लोटनला जाण्यासाठी निघाले. दोन तास पायी जायचे होते. एक-दोन दुकानात किरकोळ खरेदी केली आणि माझे पत्र पोस्टात टाकून परत निघाले. परतीच्या प्रवासात पाऊस सुरु झाला. माझे कपडे भिजून ओलेचिंब झाले होते, पण मला माझे मन हलके झाले होते.

पुढचा आठवडा कधी नव्हे एव्हढा मोठा वाटत होता; तरीही एकदाचा संपला आणि एका छान शरद ऋतूतील संध्याकाळी, मी पुन्हा शहराकडे जाणाऱ्या रस्त्याच्या मागे लागले.

रस्ता नयनरम्य होता: तो नदीच्या प्रवाहाच्या काठावरुन जात होता आणि दरीच्या वळणावरुन घसरत होता; पण त्यादिवशी, नदीचा प्रवाह आजूबाजूचे निसर्गसौंदर्याने माझे फारसे लक्ष वेधून घेतले नाही. माझे सर्व लक्ष जाहिरातीच्या उत्तराच्या अपेक्षेत गुंतलेले होते.

त्या दिवशी माझे आणखी एक काम म्हणजे शूजची एक जोडी ऑर्डर करायची होती म्हणून मी प्रथम गोष्ट ती केली आणि मग स्वच्छ आणि शांत लहानशा रस्त्याने मी पोस्ट ऑफिसच्या दिशेने निघाले.

एक वृद्ध महिला तिथे काम करत होती.

“जे.आ. साठी काही पत्रे आहेत का?” मी विचारले.

तिने तिच्या चष्म्यातून माझ्याकडे पाहिले, तिचा ड्रॉवर उघडला आणि बराच वेळ शोधले, माझी आशा मावळू लागली. शेवटी तिने एक कागद घेतला जो तिने तिच्या डोळ्यांसमोर धरुन सुमारे पाच मिनिटे वाचला, मग तिने तो माझ्यासमोर ठेवला, माझ्याकडे एक प्रश्नार्थक नजर टाकली, त्यात अविश्र्वास दिसत होता.

“एकच पत्र आहे का?” मी विचारले.

“इतकेच आहे,” तिने उत्तर दिले.

मी ते माझ्या खिशात ठेवले आणि लॉवुडला परत आले. मला ते लगेच उघडता आले नाही: नियमांनुसार मला आठ वाजेपर्यंत परतणे आवश्यक होते आणि जेव्हा मी परतले तेव्हा जवळजवळ साडेसात वाजले होते.

लोवुडला परतल्यावर वेगवेगळ्या कामांची यादी तयार होती: मुलींचा अभ्यास, प्रार्थना वाचणे, विद्यार्थीनींच्या झोपण्याच्या वेळेस उपस्थित राहणे ह्याची जबाबदारी माझ्यावर होती त्या नंतर शिक्षकवर्गाचे रात्रीचे जेवण आले आणि शेवटी, आम्ही मोकळ्या झालो.

माझ्याकडे फक्त थोडीशी मेणबत्ती उरली होती, मी माझे पत्र घेतले, ज्याच्या सुरवातीला 'एफ' असे नावाचे आद्याक्षर होते. त्यात खालीलप्रमाणे मजकूर होता:

“मंगळवारच्या हेराल्डमध्ये जाहीर झालेल्या जाहिरातीला प्रतिसाद म्हणून कळवण्यात येत आहे की, जर जे.आ.ला जाहिरातीमध्ये सूचित केलेली अर्हता प्राप्त असेल तर, तिच्या चारित्र्याबद्दल आणि तिच्या शिक्षणाबद्दल शिफारस पत्र, सादर

a

केल्यास, तिला एक जागा देऊ केली जाईल; विद्यार्थी आहे, दहा वर्षांपेक्षा कमी वयाची मुलगी. पगार वर्षाला, 30 पौंड आहे, आपले संपूर्ण नाव, पत्ता आणि विनंती केलेली सर्व माहिती मिसेस फेअरफॅक्स, थॉर्नफिल्ड, मिलकोट, मिलकोट काउंटीजवळ पाठवावी.”

मी बराच वेळ पत्र वाचले. माझ्या जाहिराती मिळालेला प्रतिसाद एका वृद्ध महिलेचा आलेला पाहून मला थोडे हायसे वाटले कारण मी माझ्या एकटीच्या जीवावर एक मोठा निर्णय घेणार होते. तो चुकला तर, कुठल्या भलत्याच सापळ्यात अडकले जाण्याची भीती वाटत होती. माझ्या प्रयत्नांना यश मिळावे अशी माझी इच्छा होती. त्यामुळे मला त्या वृद्ध महिलाचे पत्र माझ्या यशस्वी नोकरीची हमी वाटली.

मनोमनी मी तिचे एक चित्र रेखाटले. मी तिला काळया पोशाखात आणि विधवेची टोपी घातलेले चित्रित केले आहे, कदाचित शिष्ट असेल पण अविचारी नक्कीच नाही; शेवटी मी हे पात्र जुन्या इंग्लिश सरदारांच्या धर्तीवर मी बेतले होते. थॉर्नफील्ड! निःसंशयपणे ते सुंदर आणि सुबक घराचे नाव असावे; मिलकोट! मी माझ्या आठवणीत इंग्लंडच्या नकाशाची उजळणी करू लागले. मिलकोट काउंटी इथून खूप दूर होती. मिलकोट हे एक नदीच्या काठावरचे एक मोठे उत्पादन करणारे शहर होते. “पण,” मी स्वतःला म्हणाले, “थॉर्नफिल्ड शहरापासून खूप दूर असेल यात शंका नाही.”

तेव्हढ्यात मेणबत्ती विझली.

दुसरा दिवस उजाडला. माझ्या नवीन नोकरीसाठी आवश्यक गोष्टींची पुर्तता करण्यासाठी, मला त्यांच्याबद्दल इतरांशी बोलणे आवश्यक होते.

दुपारच्या सुट्टीच्या वेळी मुख्याध्यापिका बाईंना मी लोवुड सोडणार आहे याची कल्पना दिली. नव्या नोकरी मला इथल्या दुप्पट पगार मिळणार असल्याचे

पण सांगून त्याना माझ्यासाठी मिस्टर ब्रोकलहर्स्ट किंवा समितीच्या इतर सदस्यांशी बोलण्यास सांगितले आणि जर कोणी त्यांच्याकडे माझी चौकशी केली तर शिफारस पत्र देण्याची विनंती केली.

त्यांनी माझ्या संदर्भात आणि दुसऱ्या दिवशी मिस्टर ब्रोकलहर्स्टशी चर्चा केली. ब्रोकलहर्स्ट यांच्या म्हणण्यानुसार, त्यांना या संदर्भात श्रीमती रीड यांची संमती घेणे आवश्यक वाटले कारण त्या माझ्या नैसर्गिक पालक होत्या. मामीसाहेबांना संस्थेचे पत्र गेले. त्यांनी उत्तर दिले की मी माझ्या इच्छेनुसार करू शकते आणि त्यांनी माझ्याशी संबंधित कोणत्याही गोष्टीत अडकणे फार पूर्वीपासून सोडले आहे. ही चिठ्ठी समितीच्या सर्व सदस्यांच्या हातातून गेली. मी एक शिक्षका आणि विद्यार्थीनी या नात्याने लॉवुडमध्ये नेहमीच चांगले वागले असे सांगणारे प्रमाणपत्र, माझ्या चारित्र्य आणि माझ्या क्षमतेच्या बाजूने साक्ष देणारे आणि निरीक्षकांनी स्वाक्षरी केलेले, शिफारस पत्र मला दिले गेले.

हे प्रमाणपत्र मिळाल्यावर मी मिसेस फेअरफॅक्सना त्याची प्रत पाठवली आणि त्यांच्याकडून आठवड्यात उत्तर मिळाले. मी त्यांना दिलेल्या तपशिलांवर त्या समाधानी होत्या आणि मला त्याच्यासोबत शिक्षिका म्हणून माझी जागा घेण्यापूर्वी पंधरा दिवसांचा कालावधी दिला. मी माझी तयारी करण्यात व्यस्त होते; पंधरवडा लवकर निघून गेला.

आठ वर्षांपूर्वी मी गेटशेडहून आल्यावर आणली होती तिच ट्रंक भरली होती, त्यावर मिलकोटचा पत्ता दिला होता; अर्ध्या तासात तिला उचलून लोटनला घेऊन जाणारी गाडी येणार होती. मला स्वतःला दुसऱ्या दिवशी लवकर निघायचे होते. काळ्या रंगाचा सूट, मफलर, प्रवासाची टोपी, हातमोजे, मफ अशी प्रवासाची जय्यत तयारी झाली. मी काहीही विसरले तर नाही ना? याची खात्री करण्यासाठी मी माझ्या सर्व ड्रावर्स तपासले. सर्व तयारी पूर्ण करून मी आराम करण्याचा प्रयत्न केला

पण ते शक्य झाले नाही; मी खूप उल्हसित होते. माझ्या आयुष्याचा एक टप्पा त्या संध्याकाळी संपला, आणि दुसरा टप्पा दुसऱ्या दिवशी सुरू होणार होता .

मला भेटायला कोणी आल्याची नोकराने वर्दी दिली.

गाडीवान असावा म्हणून मी पहायला पुढे झाले. तेव्हढ्यात कोणीतरी माझ्या दिशेने धावत आले. मी तिला पटकन ओळखले. काळे केस निळ्या डोळयांची एक सुंदर स्त्री माझ्यासमोर आली आणि "मी कोण आहे?" असा तिने हसत हसत प्रश्न केला. "मला वाटतं तू मला विसरली नाहीस, मिस जेन?"

एका सेकंदानंतर मी तिच्या मिठीत होते, आनंदाने ओरडले, "बेसी! बेसी!" ती तिथे उभी होती, तिच्या अश्रूंनी हसत असताना मी एवढेच बोलू शकले. आम्ही दोघी दिवाणखान्यात आलो. शेकोटीच्या जवळ एक छोटा मुलगा होता.

"हा बाँबी,माझा लहान मुलगा," बेसी मला म्हणाली.

"तुझे लग्न झाले?"

"होय, सुमारे पाच वर्षांपूर्वी, रॉबर्ट लीव्हन, गेट्सवुड येथे कोचमन होते; आणि बॉबीला एक छोटी बहीण आहे जिचे नाव मी जेन ठेवले आहे."

"आणि तू आता गेट्सहेडमध्ये नाहीस?"

"मी आता लहान घरात रहाते; जुने वाँचमन ते घर सोडून गेले सोडून होते."

"आणि बाकी सर्व कसे आहेत? मला कुटुंबाबद्दल सर्व काही सांग, बेसी... आधी बस. बॉबी, ये आणि माझ्या मांडीवर बस."

पण बॉबीने आईकडे जाणे पसंत केले.

"तू फार उंच नाहीस, मिस जेन, ना फार जाड," मिसेस लीव्हन पुढे म्हणाली; त्यांनी इथे तुमची चांगली काळजी घेतली नाही. मिस एलिझा तुमच्यापेक्षा उंच आहे आणि मिस जॉर्जियाना दुप्पट मजबूत आहे.

"जॉर्जियाना सुंदर दिसत असली पाहिजे, खरे ना बेसी?"

“अरे! खूप सुंदर. गेल्या हिंवाळ्यात ती तिच्या आईसोबत लंडनला गेली आणि सर्वांनी तिचे कौतुक केले. एक सरदार पुत्र तिच्या प्रेमात पडला; पण त्याच्या आई-वडिलांना हे लग्न नको असल्याने त्यांनी काय केले माहीत आहे का? तो आणि मिस जॉर्जियाना निसटले! मात्र त्यांना शोधून अटक करण्यात आली. मिस एलिझा यांनी त्यांचा शोध घेतला होता; मला वाटतं तिला बहिणीचा हेवा वाटला असावा आणि आता दोन बहिणी सतत वाद घालत असतात.”

“आणि जॉन रीडचे काय चालले आहे?”

“तो त्याच्या आईला हवा तसा वागत नाही; तो कॉलेजला गेला पण त्याला काढून टाकले. त्याच्या मामांना त्याला वकील करायचे होते म्हणून त्याला कायद्यांचा अभ्यास करायला लावले होते: पण तो एक उधळलेला तरुण आहे, मला वाटत नाही की ते त्याच्यासोबत काही चांगले होईल.”

“आणि मिसेस रीड?”

“मॅडम बऱ्यापैकी दिसत आहेत; पण मला वाटते की त्याचे मन अस्वस्थ आहे. मिस्टर जॉनचे आचरण त्यांना अजिबात आवडत नाही; तो खूप पैसे खर्च करतो!”

“तिने तुला इथे पाठवले, बेसी?

“नाही, खरं तर; मला खूप दिवसांपासून तुला भेटण्याची इच्छा होती. आणि जेव्हा मी ऐकले की तू लिहीले आहेस की तू देश सोडणार आहेस, तेव्हा तू माझ्यापासून पूर्णपणे दूर जाण्यापूर्वी मी तुला पुन्हा एकदा भेटण्याचे ठरवले.”

“मला भेटून तुझी निराशा झाली, खरे ना बेसी? मी हसत विचारले.

“नाही, मिस जेन, तू दयाळू आहेस; तू सुंदर तरूणी झाली आहेस. मला तुझ्याकडून एवढीच अपेक्षा होती. लहानपणी तू सुंदर नव्हतीस.”

“पण मला वाटतं तू शिकलेली आहेस,” बेसी पुढे म्हणाली, ; तुला काय काय माहित आहे? तुम्ही पियानो वाजवू शकतेस का?”

“थोडा.”

खोलीत पियानो होता. बेसीने तो उघडला आणि मला तिच्या काही नोट्स वाजवायला सांगितले. मी एक किंवा दोन वाल्ट्ज वाजवून दाखवले.”

“मिस रीड्स तुझ्याइतके चांगले वाजवत नाही,” ती उत्साहाने ओरडली;

“मला नेहमी वाटते की तुम्ही तिला विज्ञानात मागे टाकाल.

तुम्हाला चित्र कसे काढायचे हे माहित आहे का?”

“शेकोटीच्या वर माझे एक पेंटिंग आहे.”

“हे भव्य आहे, मिस जेन: ते इतकेच सुंदर आहे मिसेस रीडचा ड्रॉइंग मास्टरच काय ते तसे काढू शकतो.

आणि तू फ्रेंच शिकली आहेस?”

“होय, बेसी, मी ते वाचू शकते आणि बोलू शकते.”

“तुम्हाला भरतकाम आणि टेपेस्ट्री कशी बनवायची हे माहित आहे का?”

“हो, बेसी.”

“मग तू खूप सुंदर स्त्री आहेस, मिस जेन; मला माहित होते की हे व्हायलाच हवे होते. आई-वडील नसूनही तुम्ही मार्ग काढाल. आह! मला तुम्हाला काही विचारायचे होते: तुम्ही तुमच्या वडिलांच्या कुटुंबाबद्दल ऐकले आहे का?”

“कधीच नाही.”

“बरं! तुम्हाला माहित आहे की मॅडम नेहमी म्हणायची की ते गरीब आणि दुःखी आहेत. ते गरीब असू शकतात, परंतु मी सांगते की ते रीड्सपेक्षा चांगले शिक्षित आहेत. सुमारे सात वर्षांपूर्वी एक मिस्टर आयर गेटशेडला आले होते; त्यांना तुला भेटायचे होते; मॅडमने उत्तर दिले की तुम्ही पन्नास मैल दूर बोर्डिंग हाऊसमध्ये

a

आहात. ते खूप अस्वस्थ झालेले दिसत होते कारण ते म्हणाले, त्यांना तिथे जायला वेळ नव्हता; ते खूप दूरच्या देशात निघाले होते आणि बोट एक-दोन दिवसात लंडन सोडणार होती. ते एकदम सज्जन दिसत होते; माझा विश्वास आहे की ते तुझ्या वडिलांचे भाऊ होते.''

''आणि ते कोणत्या देशात जाणार होता, बेसी?''

''ते एका बेटावर जात होते जे इथून तीनशेहून अधिक मैल आहे आणि जिथे वाइन बनवली जाते.''

''मडेरा?'' मी विचारले.

''होय, तेच आहे; तेच नाव आहे.''

''आणि मग ते निघून गेले?''

''होय, ते घरात जास्त काळ राहिले नाही; मॅडम त्याच्याशी अत्यंत अविचारीपणे बोलल्या आणि त्याच्या पाठीमागे तिने त्यांना एक नीच व्यापारी म्हटले. माझ्या पतीला वाटते की ते वाइन व्यापारी असावेत.''

''खूपच शक्यता आहे,'' मी उत्तर दिले, ''किंवा एखाद्या वाईन कंपनीतला एजंट.''

बेसी आणि मी आणखी अर्धा तास भूतकाळाबद्दल बोललो मग तिला मला सोडून जाण्यास भाग पाडले.

दुसऱ्या दिवशी सकाळी मी गाडीची वाट पाहत असताना लोटन येथे काही मिनिटे तिला पाहिले; आम्ही मिस्टर ब्रोकलहर्स्टच्या घरासमोर वेगळे झालो.

आम्ही प्रत्येकजण आपापल्या वेगळ्या मार्गाने गेलो; बेबी गेटशेडला घेऊन जाणाऱ्या गाडीकडे गेली तर मी मिलकोटच्या अज्ञात परिसरात नवीन नोकरी आणि नवीन कर्तव्याकडे घेऊन जाणाऱ्या गाडीत चढले.

# प्रकरण 11

माझ्या आयुष्यातील नवा अध्याय सुरू झाला. शेवटी मी मिलकोटला पोहोचले. येथील जॉर्ज यांच्या खानावळीत एका शेकोटीच्याजवळ मी माझा कोट, टोपी घालून बसले होते. छत्री आणि मफलर टेबलावर काढून ठेवला होता. ऑक्टोबरच्या थंडीच्या दिवशी सोळा तासांच्या प्रवासानंतर, थंडीने आणि प्रवासाच्या दगदगीने थकून गेले होते. बरोबर पहाटे चार वाजता मी लोटन सोडले होते आणि मिलकोटला पोहोचले तेव्हा घड्याळात नुकतेच आठ वाजत होते.

वरकरणी मी शांत दिसत असले तरी मनाने मी अस्वस्थ होते. मिलकोटहून थॉर्नफिल्डला घेऊन जाण्यासाठी कोणी आले असेल म्हणून मी वाट पाहू लागले पण मला तसे कोणी आढळले नाही. तेथील मुलाकडे चौकशी केली की जेन आयरसाठी म्हणून विचारत कोणी आले होते काय? त्याने नकारार्थी मान हलवली. माझ्याकडे वाट पहाण्याखेरीज दुसरा कोणत्याही पर्याय नव्हता.

एकटेपणाची भावना विचित्र होती. ध्येय गाठण्यासाठी एका अनिश्चित प्रवासाला निघालेली मी एक अनुनभवी मुलगी होते. मागे परतण्याचे दोर स्वतः कापून एक वेडे धाडस करुन बसले होते. माझे धैर्य, माझा अभिमान संपुष्टात आला आणि भीतीचा पगडा माझ्यावर बसला होता.

जेव्हा अर्ध्या तासानंतर मला कोणीही, नेण्यासाठी येत नसल्याचे पाहिले आणि शेवटी मी बेल वाजवायचे ठरवले.

“इथे जवळपास थॉर्नफिल्ड नावाचे एखादे ठिकाण आहे का?” मी तेथील मुलाला विचारले.

a

“थॉर्नफील्ड? मला माहित नाही, मॅडम, पण मी शोधून काढेन.”

तो बाहेर गेला, पण काही वेळातच परतला.

“तुम्ही मिस आयर आहात का?” तो म्हणाला.

“होय.”

“बरं, इथे कोणीतरी तुमची वाट पाहत आहे.”

मी उठले, माझा मफलर आणि छत्री घेतली आणि घाईघाईने खोलीच्या बाहेर पडले. दारासमोर एक माणूस घोडागाडी घेऊन उभा होता.

“हे तुमचे सामान आहे का?” माझ्या ट्रंकेकडे बोट दाखवून तो माणूस म्हणाला.

“होय.”

गाडीत बसल्यावर मी विचारले की थॉर्नफिल्ड किती दूर आहे.

“सुमारे सहा मैल.”

“ तिथे पोहोचायला किती वेळ लागेल?”

“सुमारे दीड तास.”

शेवटी माझे ध्येय साध्य करण्याच्या इतक्याजवळ आल्याने मला आनंद झाला. मी पुढला विचार करू लागले. नोकर आणि गाडीच्या साधेपणा वरून मिसेस फेअरफॅक्स या साध्या असाव्यात असे मी अनुमान बांधले आणि थोडे हायसे वाटले मला श्रीमंत लोकांचा अनुभव चांगला नव्हता. तिथे मी दु:खी होते पण मिसेस फेअरफँक्स लहान मुलीसोबत एकट्याने का रहात असाव्यात याचे मला कोडे वाटत होते. जर त्या सुस्वभावी, मनमिळाऊ असतील तर त्यांचे माझे चांगले जुळेल. मी माझे सर्वोत्तम देण्याचा जो लोवुडला संकल्प केला आणि तो पूरा झाला होता. त्यामुळेच मी लोवुडनमध्ये स्विकारली गेले. पण मामीसाहेब : मिसेस रिड्सनी मला

a

नेहमीच नाकारले. मिसेस फेअरफॅक्स या मिसेस रिड्ससारख्या असू नयेत, नाहीतर मला नवीन नोकरी शोधावी लागेल.

मी खिडकीतून बाहेर पाहिले. मिलकोटमागे पडले होते. चमचमणाऱ्या दिव्यांच्या संख्येवरून मिलकोट हे लोवुडपेक्षा बरेच मोठे आणि महत्त्वाचे शहर असावे असे वाटले.

रात्र झाली होती आणि रस्ता अवघड होता, त्यामुळे घोडा दौडण्याऐवजी सावकाश चालत होता. साधारण दोन तासांनी गाडीवान म्हणाला, “आम्ही आता थॉर्नफिल्डपासून फार दूर नाही.”

मी पुन्हा पाहिले तेव्हा गाडी चर्चसमोरून जात होती; चर्चचे रुंद बुरुज दिसले. टेकडीच्या उतारावर गावांतील दिवे लुकलुकत होते. दहा मिनिटानंतर, गाडीवान खाली उतरला आणि दोन मोठे दरवाजे उघडले. आम्ही आत गेल्यावर दरवाजे बंद झाले. आम्ही हळूहळू एका टेकडीवरील घरासमोर आलो. कमानदार खिडकीच्या पडद्यामागे दिवे चमकताना दिसत होते; बाकी सर्व काही अंधारात होते. नोकराने उघडलेल्या मधल्या दरवाज्यासमोर गाडी थांबली; मी खाली उतरून घरात शिरले.

“माझ्या मागून या, मॅडम,” नोकराणी मला म्हणाली; तिने मला एका खोलीत नेले, ज्या खोलीत शेकोटीच्या आगीचा आणि मेणबत्त्यांच्या भरपूर प्रकाश पडला होता. अंधारातून आल्याने माझे डोळे दिपून गेले. मी एका छोट्या खोलीत उभी होते. फायर प्लेस जवळ एक गोल टेबल होते; उंच पाठ असलेल्या जुन्या काळातील आर्मचेअरवर एक साधीसुधी लहानखुरी स्त्री विणत बसली होती. तिने विधवेचा बोनट, काळा रेशमी पोशाख आणि पांढरा मलमलचा एप्रन घातला गेला होता: मी मिसेस फेअरफॅक्सची कल्पना तशीच केली होती. तिच्या पायाजवळ एक

a

मोठी मांजर झोपली होती. एका नवीन शिक्षिकेसाठी आश्वासक असे वातावरण होते. मी आत गेल्यावर ती स्त्री उभी राहिली आणि उत्सुकतेने मला भेटायला आली.

"मुली तू कशी आहेस?" तिने मला विचारले; प्रवासामुळे खुप कंटाळा आला असेल; जॉन गाडी खूप हळू चालवतो! पण तुला थंडी वाजत असली तर आगीजवळ ये."

"मिसेस फेअरफॅक्स, मला बरे वाटतं आहे?" मी बोलले.

"ठिक आहे. बसून घे."

तिने मला तिच्या जागी नेले आणि माझ्या अंगावरील शाल, टोपी काढली; मी त्यांना उगाच त्रास घेऊ नये अशी मी त्यांना विनंती केली.

"अग! "यात त्रास कसला?" तिने उत्तर दिले; "पण थंडीमुळे तुझे हात जवळजवळ बधीर झाले असतील. लेआला, मँडमसाठी गरम पेय आणि एक दोन सँडविच तयार करून आण, असे सांगितले आणि आपल्या खिशातून चाव्या काढून नोकराणी कडे दिल्या.

"आगी जवळ ये," ती पुढे म्हणाली. तुझी ट्रंक लेआला तुझ्या खोलीत ठेवायला सांगते."

मिसेस फेअरफँक्स मी पाहुणी असल्यासारखे वागत होत्या. अशा पाहुणचाराची मी बिल्कुल अपेक्षा केली नव्हती. पण मग पुन्हा विचार मनात की, "आपण खूप लवकर मत बनवू नये."

लेआने ट्रे आणल्यावर, त्यांनी स्वतः माझ्या खाण्याकडे जातीने लक्ष दिले. त्यामुळे मला थोडे अवघडल्यासारखे वाटले.

"मला आज रात्री मिस फेअरफॅक्स मला भेटेल काय?" मी खात असतांना मी विचारले.

a

“मिस फेअरफॅक्स?” नाही! मिस वॅरन्स. वॅरन्स हे तुझ्या भावी विद्यार्थीनीचे नाव आहे.”

“खरच ? मग ती तुमची मुलगी नाही का?”

“नाही.”

मी तिला विचारणार होते की तिचे आणि मिस वॅरन्सचे काय नाते आहे पण मला आठवले की जास्त प्रश्न विचारणे अयोग्य आहे मला नंतर ते समजेल याची खात्री होती.

“मला खूप आनंद झाला आहे,” ती माझ्यासमोर बसली आणि तिची मांजर तिच्या मांडीवर घेऊन म्हणाली, “तू आल्यामुळे मला एक सोबती मिळाला आहे. तुझे इथले वास्तव्य आनंददायी ठरेल. नक्कीच आपण इथे आनंदी असू; थॉर्नफिल्ड एक जुना, थोडा दुर्लक्षित, पण नामांकित किल्ला आहे. तथापि, मी इथे एकटी रहाते. तशी लेआ निःसंशयपणे एक चांगली मुलगी आहे; जॉन आणि त्याची पत्नी देखील खूप चांगले आहेत, परंतु ते फक्त नोकर आहेत. गेल्या हिंवाळयात, नोव्हेंबरपासून फेब्रुवारीपर्यंत कसाई आणि पोस्टमन वगळता येथे कोणीही आले नाही. लेआ मला कधी कधी वाचून दाखवते. वसंत ऋतु आणि उन्हाळयात सर्व काही चांगले असते. शरद ऋतूच्या सुरूवातीस, लहान अँडेल वॅरन्स तिच्या दायीसोबत आली; या मुलीने घरात जीवन आणले आणि आता तू इथे आहेस, मी खूप आनंदी होईन.”

मिसेस फेअरफँक्सचे बोलणे ऐकून मला फार आनंद झाला. आणि त्यांच्या अपेक्षेप्रमाणे वागण्याचा मी निश्चय केला.

त्या म्हणाल्या: “आता फार उशीर नको . आत्ताच मध्यरात्र झाली आहे; तू दिवसभर प्रवासाने थकली असशील. मी तुला तुझी खोली दाखवते. मी तुझ्यासाठी माझ्या शेजारची खोली तयार केली आहे; ती लहान आहे, पण मला वाटले की

a

समोरच्या मोठ्या खोल्यांपेक्षा तुला तिकडे नक्कीच चांगले वाटेल. तिथले फर्निचर सुंदर आहे.”

त्यांच्या निवडीबद्दल मी आभार मानले. मी प्रवासामुळे खरोखर थकले होते, त्या मेणबत्ती घेऊन मला खोलीत घेऊन गेल्या. खोलीत प्रवेश केल्यावर, मला ती लहान आणि आधुनिक शैलीत सुसज्ज असल्याचे पाहून खूप आनंद झाला.

मिसेस फेअरफॅक्सने मला ‘गुड नाईट’ म्हटले आणि मी माझे दार बंद केले. माझे हृदय कृतज्ञतेने भरून गेले होते. मी माझ्या अंथरुणासमोर गुडघे टेकले आणि मला जे काही दिले त्याबद्दल देवाचे आभार मानले. थकल्यामुळे आणि आनंदाने मी पटकन गाढ झोपी गेले. मला जाग आली तेव्हा दिवस उजाडला होता.

माझ्या खिडकीच्या निळ्या पर्शियन पडद्यांवरून चमकणारा सूर्य चमकत होता. फरशीवर कार्पेट पसरलेले होते. सुंदर वॉल पेपरनी भिंत सजलेली होती. माझी खोली एकदम प्रसन्न वाटत होती! मला लोवुडच्या साध्यासुध्या आणि काळ्या पडलेल्या भिंतींची आठवण आली. खोलीतील सुंदर दृश्यामुळे मी उत्साहित झाले.

मी उठले आणि काळजीपूर्वक साधे, स्वच्छ कपडे घातले; कधी कधी मला सुंदर नसल्याबद्दल खेद वाटायचा; मला गुलाबी गाल, सरळ नाक, सुंदर चेहरा हवा होता, असे वाटायचे; मला चांगले उंच बनवायचे होते.

तथापि, जेव्हा मी माझे केस सरळ केले, स्वच्छ कॉलरचा, काळा ड्रेस घातला, जो अगदी साधा असला तरी चांगला होता, तेव्हा मला वाटले की आता मी मिसेस फेअरफॅक्ससमोर हजर होण्यास पात्र आहे, आणि माझी नवीन विद्यार्थीनी माझ्यापासून दूर जाणार नाही. खिडकी उघडल्यानंतर आणि ड्रेसिंग टेबलवर सर्वकाही व्यवस्थित आहे की नाही हे तपासल्यानंतर मी माझी खोली सोडली.

मी चटईने झाकलेला लांब कॉरिडॉर ओलांडला आणि मी निसरड्या ओकच्या पायऱ्यांवरून खाली उतरले. मी एका मोठ्या हॉलमध्ये पोहोचले. मी

भिंतींवरचे फोटो पाहण्यासाठी काही क्षण थांबले. काचेचा दरवाजा उघडा होता, मी बाहेर जाण्याची संधी साधली. ती शरद ऋतूतील एक सुंदर सकाळ होती; हिरव्यागार शेतांवर सूर्य चमकत होता. मी लॉनच्या दिशेने काही पावले टाकली आणि घराकडे पाहिले. घराला तीन मजले होते. फार मोठे नसतानाही ते खूप प्रशस्त होते; तो एखाद्या सभ्य माणसाच्या वाड्यासारखा दिसत होता. त्याच्या राखाडी रंगाच्या दर्शनी भागाने त्याला विषेश शोभा प्राप्त झाली होती. मिलकोट सारख्या शहराच्या अगदी जवळ अस्तित्व असूनही थॉर्नफिल्डला एक प्रकारचा शांत आणि एकांत मिळाला होता. एका टेकडीच्या उतारावर एक छोटंसं गाव होतं, ज्याची छप्परं झाडांशी मिसळली होती. जिल्हाचे चर्च हे गावापेक्षा थॉर्नफिल्डच्या जास्त जवळ होते; त्याच्या जुन्या बुरुजाचा वरचा भाग तिथून सहज दिसत होता.

मी या शांततेचा आनंद घेतला. मी हॉलच्या रुंद प्रवेशद्वाराकडे पाहिले आणि मला वाटले की हे घर किती मोठे आहे. मला मिसेस फेअरफॅक्स, दारात उभ्या दिसल्या.

मी त्याच्या दिशेने चालत गेले; आणि त्यांना गुड मॉर्निंग म्हटले.

“तुला थॉर्नफिल्ड आवडले काय?” त्यांनी मला विचारले.

मी त्यांना खूप आवडल्याचे सांगितले.

“हो,” त्या म्हणाल्या, “हे एक सुंदर ठिकाण आहे; पण जर मिस्टर रोचेस्टरने तिथे राहण्याचा किंवा वारंवार भेटी घेण्याचा निर्णय घेतला नाही तर खूप काही गमावावे लागेल. सुंदर जमिनी आणि मोठ्या घरांना मालकाची उपस्थिती आवश्यक आहे.

“मिस्टर रोचेस्टर! मी विचारले; ते कोण आहेत?

“थॉर्नफिल्डचे मालक,” तिने शांतपणे उत्तर दिले; त्यांचे नाव रोचेस्टर आहे हे तुला माहीत नव्हते का?”

a

“अर्थात, नाही, मला ते माहित नव्हते; मी त्याच्याबद्दल कधीच ऐकले नव्हते.”

त्यांचा असा विश्वास होता की मिस्टर रोचेस्टरांचे नांव सर्वत्र ज्ञात आहे आणि प्रत्येकाला त्यांची जाणीव असावी.

“मला वाटले,” मी पुढे म्हणाले, “थॉर्नफिल्ड तुमचेच आहे.”

“माझे ! माझ्या मुली, देव तुला आशीर्वाद देवो; काय कल्पना आहे! माझे! मी फक्त इथे घरकामावर देखरेख करणारी आहे. हे खरे आहे की मी मिस्टर रोचेस्टरच्या आईकडून दूरची नातेवाईक आहे किंवा किमान माझे पती नातेवाईक होते. ते ह्या टेकडीच्या उतारावर तुम्हाला दिसणारे हे छोटंसं गाव, त्या गावातील एक धर्मगुरू होते आणि हे चर्च त्याचं होतं. मि. रोचेस्टरांची आई फेअरफॅक्स होती, माझ्या पतीची चुलत चुलत बहीण होती; पण मी कधीच या नात्याचा फायदा घेण्याचा प्रयत्न केला नाही, ते माझ्या दृष्टीने शून्य आहे; मी स्वतःला एक साधी घरकाम करणारी समजते; आणि माझ्या मालकाशी नेहमी नम्र असते.”

“आणि लहान मुलगी, माझी विद्यार्थिनी?”

“मिस्टर रोचेस्टरांची आश्रीत आहे. त्यांनी मला तिच्यासाठी गव्हर्नेस शोधण्यास सांगितले. माझा विश्वास आहे की, तिचे संगोपन करण्याचा त्याचा हेतू आहे.”

अशा प्रकारे कोडे उलगडले. ही दयाळू विधवा येथील मालकीण नव्हती, तर माझ्यासारखीच एक आश्रित व्यक्ती होती. ह्यामुळे त्यांच्यावरील कमी प्रेम केले नाही; उलट, मी नेहमीपेक्षा जास्त आनंदी झाले. त्यांच्या आणि माझ्यात एकप्रकारची समानता होती.

a

मी या गोष्टींचा विचार करत, असतानाच एक छोटी मुलगी तिच्या मोलकरणी सोबत धावत आली. मी माझ्या विद्यार्थीनीकडे पाहिले, ती सात किंवा आठ वर्षांची, नाजूक, फिकट गुलाबी रंगाची, कुरळ्या केसांची मुलगी होती.

“हॅलो, मिस अँडेल,” मिसेस फेअरफॅक्स म्हणाल्या. इकडे या आणि बाईंना नमस्कार सांगा. ही तुमची टिचर असेल आणि जी तुम्हाला एक दिवस खूप शिकलेली स्त्री बनवेल.”

ती माझ्या जवळ आली.

“ह्या माझ्या गव्हर्नेस आहेत काय?” ती तिच्या नर्सला फ्रेंचमध्ये म्हणाली, तिने उत्तर दिले: “पण हो, नक्कीच.”

“ती परदेशी आहे काय? मी त्यांना फ्रेंच बोलत असल्याचे ऐकून आश्चर्याने विचारले.

“नर्स परदेशी आहे आणि अँडेलचा जन्म इथला नाही. सहा महिन्यांपूर्वी ती आली, तेव्हा तिला इंग्रजीचा एक शब्दही येत नव्हता; आता ती थोडं बोलायला लागली आहे; पण मला ते समजत नाही, कारण दोन भाषांमध्ये गोंधळ उडतो. तुझ्याबद्दल मला खात्री आहे की तुला चांगले समजेल.”

सुदैवाने लोवूडला एक फ्रेंच शिक्षिका होती आणि मी नेहमी मॅडम पियरोटशी शक्य तितके फ्रेंच बोलण्याचा प्रयत्न केला होता आणि गेल्या सात वर्षांत मी माझ्या शिक्षिकेच्या उच्चारांचे अनुकरण करण्याचा प्रयत्न करून दररोज थोडे थोडे फ्रेंच शिकले होते. मी शक्य तितके अँडेलबरोबर संपर्क साधण्याची खात्री करण्यासाठी पुरेसे योग्यरित्या बोलू शकले. ती माझ्याकडे आली, मी तिची खाजगी शिक्षिका असल्याचे सांगितल्यावर तिने मला हँडशेक केला. तिला जेवणाकडे नेत असताना मी तिला तिच्या भाषेत काही वाक्ये संबोधित केली. तिने प्रथम थोडक्यात

a

उत्तरे दिली; पण जेव्हा आम्ही टेबलावर होतो, आणि तिने तिचे हलके तपकिरी डोळे माझ्याकडे रोखले होते, तेव्हा तिने अचानक बडबड सुरू केली.

“ओहो! ती फ्रेंचमध्ये म्हणाली,”तुम्ही मिस्टर रोचेस्टरसारखी माझी भाषा बोलता. मी तुझ्याशी बोलू शकते आणि सोफीही बोलू शकते; तिला खूप आनंद होईल, तिचे बोलणे येथे कोणालाही समजत नाही; मिसेस फेअरफॅक्स इंग्रजी आहेत. सोफी माझी नर्स आहे; तिने माझ्यासोबत एका मोठ्या बोटीवर समुद्र पार केला. तेव्हा मी आजारी होते. सोफी आणि मिस्टर रोचेस्टर सोबत होते. ओहो! मिस, तुझे नाव काय आहे?”

“आयर, जेन आयर.”

“आयर! बरं! सकाळी सूर्य उगवण्याआधी आमची बोट थांबली. मिस्टर रोचेस्टरनी मला आपल्या हातात घेतले आणि एक फळी ओलांडली मग जमिनीवर गेलो; मग आम्ही एका घोडागाडी मध्ये बसलो जी आम्हाला एका मोठ्या आणि सुंदर घरात घेऊन गेली, यापेक्षा मोठ्या आणि सुंदर, ज्याला ते हॉटेल म्हणतात; आम्ही जवळपास एक आठवडा तिथे राहिलो. सोफी आणि मी रोज एका मोठ्या चौकात फिरायला जायचो ज्याला आम्ही पार्क म्हणतो. तिथे इतर बरीच मुलं होती आणि एक मोठे तळे होते त्यात पक्षी होते ज्यांना मी ब्रेडचे तुकडे दिले होते.

“ती इतक्या भरभर बोलते ते तुम्हाला समजू शकते का?” मिसेस फेअरफॅक्सला विचारले.

मी तिला उत्तम प्रकारे समजून घेतलं, कारण मला मॅडम पियरोटच्या बडबडीची सवय झाली होती.

“तुम्ही तिला तिच्या पालकांबद्दल काही प्रश्न विचारावेत अशी माझी इच्छा आहे,” त्या पुढे म्हणाल्या; मला जाणून घ्यायचे आहे की तिला त्यांची आठवण आहे का.

"अँडेल," मी विचारले, "तू मला सांगितलेल्या या सुंदर गावात असताना तू कोणासोबत राहत होतीस?"

"मी माझ्या आईबरोबर बराच काळ राहिले; पण ती व्हर्जिनियाला निघून गेली. आईने मला नाचायला, गाणे गायला शिकवले; सुंदर गृहस्थ आणि सुंदर स्त्रिया तिला भेटायला यायचे. आई मला त्यांच्यासमोर नाचायला नाहीतर गायला लावत असे. मला ते खुप आवडते. तुला मला गाणे ऐकायचे आहे का?"

तिने दुपारचे जेवण पूर्ण केल्यामुळे मी तिला, तिची प्रतिभा दाखवू दिली. ती तिच्या खुर्चीवरून उतरली आणि माझ्या मांडीवर बसून ऑपेरा सुरु केला. विषय तिच्या वयाला शोभेलसा नव्हता, इतक्या छोट्या मुलीसाठी विचित्रपणे निवडलेला वाटला. त्यानंतर तिने एक गोष्ट सांगितली.

ती दंतकथा, शब्दांवर आवश्यक जोर देऊन आणि विरामचिन्हांकडे काळजीपूर्वक लक्ष देऊन सांगत होती. तिच्या आवाजाची लवचिकता आणि तिचे अतिशय योग्य हावभाव, जे लहान मुलांमध्ये फारच दुर्मिळ होते, हे लक्षात येत होते की तिला काळजीपूर्वक शिकवले गेले होते.

"तुझ्या आईने तुला ही दंतकथा शिकवली होती का?" मी विचारले.

"होय, आता मी तुझ्यासमोर नाच करू?"

"नाही, इतके पुरेसे आहे. पण जेव्हा तुझी आई व्हर्जिनियाला गेली तेव्हा तू कोणाकडे राहिलीस?"

"मॅडम फ्रेडरिक आणि तिच्या पतीसह; तिने माझी काळजी घेतली, पण ती माझ्याशी संबंधित नाही. मला वाटते ती गरीब आहे कारण तिच्याकडे आईसारखे छान घर नाही. शिवाय मी तिथे फार काळ थांबले नाही. मिस्टर रोचेस्टरनी मला विचारले की मला त्याच्याबरोबर इंग्लंडमध्ये येऊन राहायचे आहे का आणि मी हो म्हणाले कारण मी मिस्टर रोचेस्टराना मिसेस फ्रेडरिकच्या आधी ओळखत होते

a

आणि ते नेहमीच माझ्याशी चांगले वागत होते, त्यांनी मला सुंदर कपडे आणले होते. पण खेळणी दिली नाहीत. आपले वचन न पाळता, मला इंग्लंडला आणल्यानंतर ते पुन्हा निघून गेले आणि त्यानंतर मी त्यांना पाहिले नाही."

दुपारचे जेवण झाल्यावर अँडेल आणि मी लायब्ररीत आलो. मि. रोचेस्टरच्या आदेशानुसार ती अभ्यासाची खोली म्हणून वापरली जाणार होती. बहुतेक पुस्तके कपाटात बंद होती. एका कपाटात, कादंबऱ्या आणि साहित्य, कविता, चरित्रे आणि प्रवासाचे काही खंड होते. लोवूड येथे वेळोवेळी गोळा केलेल्या काही पुस्तकांच्या तुलनेत, मला असे वाटले की येथे मनोरंजक आणि ज्ञानवर्धक पुस्तकांची रेलचेल आहे. एक उत्कृष्ट दर्जाचा एक नवीन पियानो, एक चित्रफलक आणि पृथ्वीचा गोल देखील होता. रात्रीच्या जेवणाच्या वेळेपर्यंत तिच्यासाठी काही स्केचेस काढण्याचा संकल्प केला.

मी माझे पाकीट आणि पेन्सिल घेण्यासाठी वरच्या मजल्यावर गेले असता मिसेस फेअरफॅक्सने मला हाक मारली.

"तुझा सकाळचा वर्ग संपला आहे, मला वाटतं," ती मला म्हणाली.

त्यांचा आवाज ऐकून मी आत गेले. ती एक तुर्की कार्पेटने सजलेली एक भव्य खोली होती. उत्तम फर्निचर आणि लाल रंगाचे पडदे होते. भिंती अक्रोडाच्या लाकडाच्या पॅनलने केलेल्या होत्या आणि एक मोठी खिडकी होती. मिसेस फेअरफॅक्स साइडबोर्डवर ठेवलेल्या काही सुंदर फुलदाण्या साफ करण्यात व्यस्त होत्या.

"किती सुंदर!" मी पाहताच उद्गारले.

"होय ही जेवणाची खोली आहे; थोडी हवा आणि सूर्यप्रकाश येण्यासाठी मी आताच खिडकी उघडली; इथे सर्वकाही इतके दमट होते! तिथल्या लिव्हिंग रूमला तळघर सारखा वास येतो." मिसेस फेअरफँक्स म्हणाल्या.

a

त्यांनी खिडकीच्या शेजारील एका मोठ्या कमानीकडे इशारा केला, त्यावरील पडदा वर उचलला होता. दोन पायऱ्या चढून मी पुढे पाहिले. तो एक अतिशय सुंदर दिवाणखाना होता. त्याच्याशेजारी एक शयनगृह होते; दोन्ही कडे पांढऱ्या रंगाचे गालिचे पसरले होते, त्यावर फुलांचे नक्षीकाम केलेले होते.

छतावर द्राक्षे आणि वेलींच्या पानांफुलांचे पांढऱ्या रंगाचे गुच्छ यांचे कोरीवकाम केलेले होते. दिवाणखान्यांतील लाकडी फर्निचर, लाल मखमली गाद्या गिरद्यांच्या पार्श्वभूमीवर उठून दिसत होते. शेकोटीच्या वरच्या बाजूला धुरांड्याची लाकडी चौकट, लाल रंगाच्या चमकदार बोहेमीयन काचेने सजवली होती. खिडकीजवळच्या एका मोठ्या आरशात या सर्वांचे मनोहर प्रतिबिंब पहायला मिळत होते.

“तुम्ही या सर्व खोल्या किती नीटनेटक्या ठेवता, मिसेस फेअरफॅक्स!” मी न रहावून म्हणाले. “जराही धूळ नाही. नेहमीच्या वापरात असल्यासारख्या वाटतात.”

“मिस आयर, मिस्टर रोचेस्टर इथे कधीतरीच पण अनपेक्षितपणे येतात आणि आल्यावर त्यांना सर्व फर्निचर झाकून ठेवलेले चालत नाही. आयत्या वेळी स्वच्छता करताना झालेली गडबड गोंधळ, यांचा आवाज त्यांना आवडत नाही, म्हणून मी नेहमी खोल्या तयार ठेवत असते.”

“मिस्टर रोचेस्टर कडक शिस्तीचे, अतिचोखंदळ आहेत का?”

“तसेच काही नाही; पण त्यांना, त्यांच्या आवडीनिवडी आणि सवयी नुसार त्यानुसार सर्व काही व्यवस्थित असायला लागते.”

“तुम्हाला ते आवडतात काय? इतर लोक त्यांना पसंत करतात?”

“होय; त्यांच्या कुटुंबाचा नेहमीच आदर केला जातो. तुम्ही पहात असलेली जवळजवळ सर्व जमीन, रोचेस्टर घराण्याच्या मालकीची आहे.”

त्याला न आवडण्याचे माझ्याकडे कोणतेही कारण नाही आणि मला विश्वास आहे की त्याची रयत त्याला न्यायी आणि उदारमतवादी जमीनदार मानतात; पण तो त्यांच्यामध्ये जास्त काळ राहात नाही.”

“यांच्यात उल्लेखनीय असे काय आहे ? एका शब्दात, त्यांचे चरित्र काय आहे?”

“त्यांचे चारित्र्य निर्दोष आहे, असे मला वाटते; थोडासा चमत्कारिक असावा; त्याने खूप प्रवास केला आहे आणि खूप जग पाहिले आहे, मला खात्री आहे की तो खूप शिकलेला आहे; पण मी त्याच्याशी जास्त वेळ बोलले नाही.”

“चमत्कारिक म्हणजे नेमके कसे?”

“कसे ते मला नेमके सांगणे अवघड आहे. फार काही विशेष नाही पण त्यांच्याबरोबर बोलताना आपल्याला, तो गांभीर्याने बोलत आहे की थट्टा करत आहे त्यांचा अंदाज येत नाही. तो खरोखरीच रागावला आहे की नाही, हे आपल्याला नीट समजत नाही, निदान मला तरी कळतं नाही ; पण काही फरक पडत नाही, तो खूप चांगला मालक आहे.”

रोचेस्टर यांची, एक सज्जन जमीनदार अशी प्रतिमा, मिसेस फेअरफॅक्सच्या नजरेत होती, हे मला अवगत झाले. त्यांच्याविषयी अधिक जाणून घेण्याच्या माझ्या इच्छेने नक्कीच त्या आश्चर्यचकित झाल्या.

आम्ही जेवणाच्या खोलीतून बाहेर पडल्यावर त्यांनी मला बाकीचे घर दाखवण्यास सुरुवात केली. मी त्यांच्या मागून निघाले. समोरच्या खोल्या मला विशेषतः मोठ्या आणि सुंदर वाटत होत्या; तिसऱ्या मजल्यावरील काही खोल्या, कमी उजेडाच्या आणि कमी उंचीच्या जुन्या पद्धतीच्या होत्या. पहिल्या मजल्यावरील जुने फर्निचर वरच्या मजल्यावर ठेवले होते. एका लहान खिडकीच्या अपुऱ्या प्रकाशात आम्ही शतकानुशतके जुने बेड, ओक किंवा अक्रोडाच्या

a

लाकडाची कपाटे, वेगवेगळया प्रकारची शिल्पे, खुर्च्या आणि हातांनी बनवलेल्या भरतकामाच्या नमुने अशा काळाने पुसलेल्या खुणा पाहायला सापडल्या.

"या खोल्यांमध्ये नोकर झोपतात का?" मी विचारले."

"नाही, ते घराच्या मागील बाजूस लहान खोल्यांमध्ये असतात.; येथे कोणीही झोपत नाही."

"तुला गच्चीवरून पहायचे आहे का?"

एक अतिशय अरुंद जिना पोटमाळाकडे घेऊन गेला आणि तिथून एक शिडीवरुन आम्ही छताकडे गेलो. माझ्यासमोर पसरलेल्या मैदानांचे निरीक्षण करू लागले. मग मला घराच्या पायथ्याभोवती हिरवीगार हिरवळ दिसली; चर्च, दरवाजे, रस्ता, शांत टेकड्या; सर्व निसर्ग, शरद ऋतूतील सूर्याखाली विश्रांती घेत असल्याचे दिसत होते. क्षितिजावर मोत्यासारखे पांढरेशुभ्र ढग दिसत होते. निळे आकाश, सभोवताली विस्तीर्ण कुरणे, हिरव्यागार टेकड्या, या सर्वांच्या केंद्रस्थानी किल्ला होता, हे सर्व दृश्य सूर्याच्या किरणांनी उजळून निघाले होते. याच्या तुलनेत पोटमाळा मला खूप काळोखी वाटला.

वरचा दरवाजा बंद करण्यासाठी मिसेस फेअरफॅक्स मागे राहिल्या. आजूबाजूला पाहत असताना मला पोटमाळातून बाहेर जाणारा दरवाजा सापडला आणि मी अंधारलेल्या छोटा जिना उतरू लागले. समोरच्या खोल्या, तिसऱ्या मजल्यावरील मागच्या खोल्यांपासून वेगळ्या करणाऱ्या पॅसेजमधून मी जात असताना माझ्या कानावर हास्याचा स्फोट ऐकू आला; ते एक विचित्र हास्य होते, स्पष्ट होते आणि कोणत्याही प्रकारे आनंदाचे सूचक नव्हते. मी थांबले; काही क्षणांसाठी आवाज बंद झाला, नंतर पुन्हा जोरात आवाज सुरू झाला: पहिला आवाज, जरी वेगळा असला, तरी तो खूपच मंद होता; यावेळी एकाकी खोलीत

घुमल्यासारखा ऐकू येत होता. ज्या खोलीतून आवाज येत होता, तिचा दरवाजा मी अचूक दाखवू शकले असते.

"मिसेस फेअरफॅक्स," मी ओरडले कारण त्या क्षणी त्या पायऱ्यांवरून खाली येत होत्या, "तुम्ही हा मोठ्याने हसण्याचा आवाज ऐकला का? तो कुठून येत असावा?"

*ती बहुधा नोकरांपैकी एक आहे," तिने उत्तर दिले; "कदाचित ग्रेस पूल."

"तुम्ही ऐकले का?" मी पुन्हा विचारले.

"होय; आणि मी ते खूप वेळा ऐकते; ती यापैकी एका खोलीत शिवणकाम करते. कधीकधी लेआ तिच्यासोबत असते; जेव्हा त्या एकत्र असतात तेव्हा त्यांचा आवाज येत असतो."

हास्याची पुनरावृत्ती झाली आणि एका विचित्र बडबडीत संपली.

"ग्रेस", मिसेस फेअरफॅक्स आतल्या नोकराणीच्या नावाने ओरडल्या.

मला कोणी दिसले नाही. पण ते हास्य दुःखद, अमानवीय, अनैसर्गिक आणि गूढ होते; मी असे काही या आधी ऐकले नव्हते. सुदैवाने दुपारची वेळ होती नाहीतर भूत दिसण्यासाठी आवश्यक असलेली कोणतीही परिस्थिती या आवाजासोबत वाटली असती तथापि, या घटनेने मला मी अगदी आश्चर्यचकित झाले होते.

मला माझ्याजवळचा दरवाजा उघडा दिसला आणि एक नोकराणी बाहेर आली. ती तीस-चाळीस वर्षांची स्त्री होती. तिचे चौकोनी खांदे, लाल केस आणि एक कुरूप, कठोर चेहरा होता.

"आतून खूप आवाज येत आहे, ग्रेस," श्रीमती फेअरफॅक्स म्हणाल्या; तुम्हाला मिळालेल्या सूचना लक्षात ठेवा."

ग्रेस शांतपणे नमस्कार करून आत गेली.

विधवा पुढे म्हणाली, “ही नोकराणी आहे जी आम्हाला शिवणकाम आणि लेआला मदत करते. ती नक्कीच निर्दोष नाही, पण ती तिचे काम चोख करते.

तसे आज सकाळी तुम्ही तुमच्या विद्यार्थीनीसोबत काय काय केले?”

अशा प्रकारे संभाषण अँडेलकडे वळले, पुढे चालू राहिले आणि लवकरच आम्ही खाली पोहोचलो. अँडेल ओरडत आम्हाला भेटायला आली:

“मँडम जेवण तयार आहे काय?” मग ती पुढे म्हणाली: “मला खरोखर भूक लागली आहे!”

जेवण तयार झाले होते आणि मिसेस फेअरफॅक्सच्या खोलीत आमची वाट पाहत होत्या.

# प्रकरण 12

थॉर्नफिल्ड येथील स्वागताने, माझी नोकरीची कारकीर्द सुकर होण्याची शक्यता वाटू लागली. तेथे रहाणाऱ्या व्यक्तींची चांगली ओळख पटल्यावर माझ्या समजुतीला दुजोरा मिळाला.

मिसेस फेअरफॅक्स खरोखरच एक सभ्य, आत्मसंतुष्ट स्त्री, पुरेशी शिक्षित आणि बुद्धिमान होती.

माझी विद्यार्थीनी एक चैतन्यमय, आनंदी आणि थोडीशी लहरी मुलगी होती. अती लाडाने थोडी हट्टी झाली होती.

सुदैवाने तिला जबाबदारी पूर्णपणे माझ्यावर सोपवण्यात आल्यामुळे माझ्या शैक्षणिक योजनांना कोणीही विरोध केला नाही. त्यामुळे लवकरच तिचा लहरीपणा कमी झाला आणि शिकण्यास उत्सुक आणि आज्ञाधारक झाली. तिच्यामध्ये काही असाधारण बुद्धीमता नव्हती पण काही दोषही नव्हते. त्यामुळे शिकवलेले मनापासून शिकून ती चांगली प्रगती करण्याची करू लागली होती.

तिचा साधेपणा, बडबड, मला खुश करण्यासाठी मन लावून केलेला अभ्यास यामुळे मी पण तिच्या बरोबर मायेने जोडले गेले. अँडेलच्या कल्याणासाठी आणि प्रगतीसाठी तळमळीने प्रयत्न करणे हे माझे कर्तव्य आहे अशी माझी धारणा होती. तिच्याविषयी ममत्व वाटत होते.

a

त्याचप्रमाणें मिसेस फेअरफॅक्सच्या दयाळूपणामुळे मला प्रेम वाटू लागले. त्यांच्या सहवासात मला आनंद वाटू लागला होता.

बऱ्याचवेळा मी मोकळया मैदानात फेरफटका मारत असे अथवा किल्ल्याच्या दरवाजातून समोरचा रस्ता न्याहाळत असे. अँडेल तिच्या नर्सबरोबर खेळत असतांना किंवा मिसेस फेअरफँक्स कामात असतांना, मी तीन मजले चढून गच्चीवर जाण्यासाठीचा दरवाजा उघडून वरून आसमंत न्याहाळत असे. समोरची शेते, दूरवरचे डोंगर, आकाश पाहतांना, नजरेच्या टप्प्यात येणाऱ्या जगाच्या पलीकडे जे क्रियाशील जग आहे, मोठमोठाली शहरे आहेत, ज्यांच्याविषयी मी फक्त ऐकले आहे त्या जगाला पहाण्याची उत्कट इच्छा वाटे. जास्तीत जास्त व्यवहारीक अनुभव मिळण्याची, वेगवेगळया व्यक्तींबरोबर संवाद साधून त्यांना जाणून घेण्यासाठी मी इच्छुक होते.

मिसेस फेअरफँक्स मधील प्रेमळपणा, अँडेल मधील लोभसपणा मला भावला होता. या पेक्षाही वेगवेगळया लोकांच्यामध्ये चांगुलपण वास करत असतो यावर माझा विश्वास होता आणि मला ते मला जाणून घ्यायला आवडले असते. माझ्या या असमाधानी वृत्तीला अनेकजण मला दोष देतील यात शंका नाही. माझा स्वभावच अस्थिर आहे त्यामुळे माझी नेहमीच चिडचिड होत असे तेव्हा मी एकटी तिसऱ्या मजल्यावर शांतपणे फेऱ्या मारत असे. अशा वेळी माझ्या मन:चक्षुसमोर वेगवेगळे प्रसंग साकार होत. काही वेळा त्यातील काही अत्यंत उत्साही प्रसंगाने हृदय आनंदाने फुलून जात असे तर कधी दु:खाने कोमेजत असे दोन्ही प्रकारच्या अनुभूतीने माझा जीवनाविषयीचा दृष्टिकोन विस्तारत होता. या सर्वांची सांगड घालून एक कथा मनात स्फुरत होती. वेगवेगळे प्रसंग, प्रदेश, व्यक्ती त्यासंदर्भातील मला हव्याहव्याशा वाटणाऱ्या पण आजवर न अनुभवलेल्या भावना आणि कल्पना या सर्वांचा मेळ घालत घालत कथावस्तू आकार घेत होती.

शांततेने आणि स्थिरचित्ताने राहणे आनंददायी आहे हा समज चुकीचा असून माणसाने कामात गुंतून रहायला हवे असे मला वाटते. जर काम मिळत नसेल तर काम निर्माण करायला हवे. लाखो लोकांच्या नशीबात बेरोजगारी आहे त्याविरोधात काही करणे त्यांना शक्य नाही. काही लोक या विरोधात बंड करून रोजगाराच्या संधी मिळवण्यासाठी झगडत आहेत. राजकीय बंडखोरांव्यतिरिक्त असे बेरोजगार बंडखोर नेमके कितीजण अशा बेरोजगारीच्या चिखलात रुतले गेले आहेत याची कोणालाही माहिती नाही. स्त्रिया शांत असतात असे समजले जाते परंतु स्त्रियांना देखील पुरुषांप्रमाणेच वाटते; त्यांना त्यांच्या कौशल्यांचा वापर करता यायला हवा.

स्त्रियांसाठी विद्याशाखांची निर्मिती आणि पुरुषांप्रमाणे रोजगाराच्या संधी मिळणे आवश्यक आहे. स्त्रियांवर सामाजिक निर्बंध जास्त आहेत. स्वयंपाक पाणी, शिवणकाम, विणकाम, भरतकाम, चित्रकला, गायन, वादन या पुरते स्वतःला मर्यादित ठेवणे हे स्त्रियांच्या स्वतःच्या आणि पर्यायाने समाजाच्या दृष्टीने अयोग्य आहे. त्यासाठी स्त्रियांनी शैक्षणिकदृष्ट्या सक्षम होऊन पुरुषांच्या बरोबरीने काम करण्यास पात्र होणे आवश्यक आहे असे विचार माझ्या मनात घोळत असत.

अशा प्रकारे जेव्हा मी एकटी तिसऱ्या मजल्यावर असायची तेव्हा अनेकदा ग्रेस पूलचे हसणे ऐकू येत असे. घंटानादासारखे पण हळूहळू, ज्यामुळे मी सुरवातीला घाबरले होते त्याबरोबर विचित्र बडबड पण ऐकू येई. काही दिवस शांतता असायची तर काही वेळा पुर्वीचा विचित्र प्रकार सुरू व्हायचा. कधीकधी ती तिच्या खोलीतून हातात प्लेट किंवा ट्रे घेऊन बाहेर पडताना, स्वयंपाकघरात जाऊन परत येताना दिसत असे. तिच्या दिसण्यात एक प्रकारचा थंडपणा वाटत असे. त्यामुळेच तिच्या नेहमीच्या हसण्याची सततच्या बडबडीची सांगड घालणे अवघड होते. तिच्या चेहऱ्यावर गंभीर आणि कठोर भाव असत.

a

मी तिच्याशी संवाद साधण्याचा अनेक वेळा प्रयत्न केला; पण ती बोलकी नव्हती. अतिशय तुटक उत्तर देण्यामुळे संवाद साधणे शक्य झाले नाही.

इतर नोकर, जॉन, त्याची पत्नी आणि लेआ यांच्याकडे घराची देखभाल असे. सोफी, फ्रेंच आया, स्वभावाने चांगली होती. मी अनेकदा सोफी बरोबर फ्रेंच बोलत असे.

ऑक्टोबर, नोव्हेंबर आणि डिसेंबर असेच गेले. जानेवारीत एका दुपारी मिसेस फेअरफॅक्सनी मला अँडेलसाठी एक दिवस सुट्टी मागितली कारण तिला सर्दी झाली होती; अँडेलने पण सुट्टीसाठी गळ घातली. लहानपणी सुट्टी माझ्यासाठी मौल्यवान होती हे आठवून मी लगेच अँडेलच्या सुट्टीला मान्यता दिली.

तो एक सुंदर दिवस होता. शांत पण खूप थंड होता; मी सकाळपासून लायब्ररीत शांत बसून मी कंटाळून गेले होते; मिसेस फेअरफॅक्सनी नुकतेच पत्र लिहिले होते; ते दोन मैल दूर असलेल्या पोस्ट ऑफिसमध्ये घेऊन जायला हवे होते. मी स्वतः पत्र पोस्टाच्या पेटीत टाकून येण्याची तयारी दाखवली आणि कोट टोपी चढवून जाण्याची तयारी केली. अँडेल शेकोटीच्या जवळ मेणाची बाहुली घेऊन खुर्चीत बसली होती. तिच्या हातात एक गोष्टींचे पुस्तक दिले तेव्हा अँडेल मला म्हणाली, "माझी चांगली मैत्रीण, माझी प्रिय जेनेट, लवकरच परत ये." मी तिचा गोड पापा घेतला आणि तेथून निघाले.

रस्त्यावर फारसे कोणी नव्हते. रस्ता थोडा खडकाळ होता. हवेत गारठा होता. अंगात उब येण्यासाठी मी भरभर चालायला सुरवात केली. थोड्या वेळाने थोडी दमछाक झाल्याने रमत गमत चालू लागले. चर्च जवळून जाताना तीनचे

a

ठोके पडले. अंधार लौकर पडणार होता. सूर्याची फिकट किरणे हळूहळू क्षितिजाकडे येत होती. थॉर्नफिल्डपासून मी एक मैल पुढे आले होते.

उन्हाळ्यात जंगली गुलाब आणि शरद ऋतूतील हेझलनट आणि ब्लॅकबेरीसाठी ओळखल्या जाणाऱ्या मार्गावर तेव्हाही हॉथॉर्नची काही लाल फळे होती; सर्वत्र नीरव शांतता होती. पानगळीचे दिवस असल्याने वाऱ्याचा सुध्दा आवाज ऐकू येत नव्हता. लांबवर पसरलेली शेते नजरेस पडत होती. गुरे चरायला सोडलेली दिसली नाहीत. एक लहान तपकिरी पक्षी कुंपणावर बसलेला दिसला, क्षणभर त्याला पाहून झाडाचे गळलेले पान असल्याचा भास झाला.

'हाय' नावाच्या गावाकडे कडे जाणारा रस्ता टेकडीच्या चढावरून जात होता. एका शेताच्या बांधाजवळच्या दगडावर मी जराशी टेकले. थंडी जाणवू नये म्हणून शाल अंगावर घट्ट पांघरली आणि हात कोटाच्या खिशात लपवले. बांधावर बर्फाचा थर जमला होता. काही दिवसांपुर्वी वेगाने वाहणारा ओहोळ आता गोठलेला होता. मी जिथे बसले होते तिथून मला थॉर्नफील्ड दिसत होते; राखाडी रंगाचा किल्लेवजा वाडा ही दरीतील सर्वात आकर्षक वास्तू होती. पूर्वेला थॉर्नफिल्डची जंगले दिसत होती; सूर्य झाडांमध्ये उतरेपर्यंत आणि लाल किरणांनी वेढून अदृश्य होईपर्यंत मी हा देखावा पाहिला आणि मी पश्चिमेकडे वळले.

टेकडीच्या शिखरावर चंद्र उगवत होता. 'हाय'' येथील चिमण्यांमधून निळा धूर दिसू लागला होता. मी गावापासून अजून एक मैल दूर होते.

या संपूर्ण शांततेत वाहत्या पाण्याचा आवाज ऐकू आला. नेमका प्रवाह दिसत नव्हता. जवळपास एखादा ओढा वाहत असावा यात शंका नव्हती. या आवाजाने संध्याकाळच्या शांततेचा भंग केला.

अचानक दुसरा एक आवाज आला दूर असला तरी स्पष्ट; घोड्याच्या टापांचा टपटप आवाज ऐकू येऊ लागला.

बांधावरून घोडा येत असल्याचा हा आवाज होता. वळणा वळणाच्या वाटेमुळे अजून दिसत नव्हता परंतु मला तो जवळ येत असल्याचे ऐकू येत होते. मी माझी जागा सोडणार होते पण रस्ता अतिशय अरुंद असल्याने मी त्याला जाऊ देण्यासाठी थांबले.

जेव्हा मी घोडा अंधारात जवळ येताना पाहिला, तेव्हा मला बेसीची एक विशिष्ट कथा आठवली, इंग्लंडच्या उत्तरेकडील ‘गायट्रॅश’ नावाच्या आत्म्याबद्दल. घोडा, खेचर किंवा मोठ्या कुत्र्याच्या रूपात दिसणारा हा प्रेतात्मा एकाकी रस्त्यांवर पछाडतो आणि एकट्या दुकट्या प्रवाशाला गाठतो.

घोडा जवळ आला होता पण मी अजून तो पाहू शकत नव्हते तेव्हा टापांच्या आवाजाव्यतिरिक्त, आणखी एक आवाज कुंपणामधून आला. काळया पांढऱ्या रंगाचा एक मोठा कुत्रा पुढे येत होता. हे तंतोतंत बेसीच्या गायट्रॅशने घेतलेल्या रुपापैकी एक रूप होते; तथापि माझ्या अपेक्षेप्रमाणे तो माझ्याकडे न पाहता अगदी शांतपणे माझ्याजवळून निघून गेला. त्या मागून एका उंच घोड्यावर बसून एक घोडेस्वार पुढे आला.

काहीतरी गडबड होती ज्याअर्थी घोड्यावर एक स्वार होता त्याअर्थी घोड्याच्या रुपात गायट्रँश असू शकणार नव्हता कारण कोणताही मानव कधीही गायट्रॅशवर स्वार झाला नव्हता; तो नेहमीच एकटा असायचा.

माझ्या कल्पनेनुसार प्रेतात्मा प्राण्यांच्या शरीरात रहातो माणसाचे रूप घेत नाही त्यामुळे तो गायट्रॅश नव्हता तर जवळच्या अरुंद रस्त्याने मिलकोटहून प्रवास

करणारा प्रवासी होता. तो पुढे निघून गेला आणि मी माझ्या वाटेला लागले. तेव्हढ्यात काहीतरी पडल्याचा आवाज आणि

"अरे देवा! आता काय करायचे?" असे उद्गार ऐकू आले. मागे वळून पाहताच घोडेस्वार आणि घोडा दोघेही खाली पडले होते. बांधावरील बर्फावरून घोडा घसरला होता. कुत्र्याने मागे येऊन आपल्या मालकाला जमिनीवर पडलेले पाहिले आणि घोड्याचा आवाज ऐकून जोरजोराने भुंकू लागला. जवळच्या पर्वत रांगांतून त्याचा प्रतिध्वनी ऐकू येऊ लागला. कुत्र्याने धोडेस्वाराभोवती प्रदक्षिणा घातली आणि मग माझ्या दिशेने धावला त्यात मदतीसाठी मागणी दिसत होती.

मी त्याच्यामागे गेले, घोडेस्वार त्याच्या घोड्यापासून सुटका करण्याचा प्रयत्न करत असल्याचे दिसले. त्याचे प्रयत्न इतके जोमाने सुरू होते त्यावरून त्याला फारसे लागले नसावे असे मला वाटले.

"सर, तुम्ही जखमी आहात का?" मी विचारले.

मला वाटले की चिडून तो काही अपशब्द बोलला असावा पण माझी नक्की खात्री नाही; थोडी उसंत घेऊन मी परत विचारले, "मी तुमच्यासाठी काय करू शकते?"

"तुम्ही एका बाजूला उभ्या राहा," उठून बसण्याचा प्रयत्न करत त्याने उत्तर दिले.

मला थोडेसे दूर जाणे भाग पडले.

स्वतःला उठून उभे रहाण्याच्या प्रयत्नात त्याल बहुधा वेदना होत असाव्यात. त्यातच कुत्र्याचे भुंकणे चालू होते. मोठ्या कष्टाने उभे राहिल्यावर त्याने कुत्राला शांत रहाण्याचा इशारा केला. पायाला कितपत दुखापत झाली आहे हे

पहाण्यासाठी त्याने थोडे चालून पहाण्याचे ठरवले. पण या प्रयत्नाने त्याला दुखापत झाली असावी कारण उठण्याचा प्रयत्न केल्यावर, तो लगेच एका पायरीवर बसला.

काहीतरी मदत करण्याच्या हेतूने मी जवळ जाऊन पुन्हा विचारले, "सर, तुम्हाला दुखापत झाली असेल तर मी थॉर्नफिल्ड किंवा हाय येथून कोणालातरी बोलावून घेऊ शकते.

"धन्यवाद, मी पाहीन, माझा पाय काही मोडला नाही फक्त मुरगळला आहे एव्हढेच."

उभे राहून त्याने पुन्हा चालण्याचा प्रयत्न केला. पण 'आई ग !' असे तो जोरात ओरडला.

दिवस पूर्णपणे संपला नव्हता आणि चंद्र प्रकाशमान होत होता. मी अनोळखी व्यक्ती पाहू शकत होते. त्याने फर कॉलर आणि स्टीलची बटणे असलेला कोट घातला होता; तो मध्यम उंचीचा होता, त्याची छाती रुंद होती, रंग निमगोरा होता, चेहरा करारी असून त्यावर कठोर भाव होते. कपाळावर आठ्या दिसत होत्या. त्याचे डोळे आणि आकुंचन पावलेल्या भुवया पाहता सामान्यतः रागिट असावा असे वाटत होते आणि त्या क्षणी तो असमाधानी असल्याचे दिसत होते. वयाने तरुण नव्हता पण मध्यमवयाचा पण वाटत नव्हता. पस्तीस वर्षांचा असू शकला असता; मला त्याची भीती वाटली नाही पण थोडे बुजल्यासारखे झाले. जर तो अनोळखी माणूस एक कादंबरीतील नायकासारखा देखणा तरुण असता तर मी स्वत:हून त्याला पुन्हा विचारण्याचे धाडस केले नसते अथवा त्याने माझ्याकडे न मागितलेली मदत त्याला देऊ केली नसती.

मी एका देखण्या तरुणाशी कधीच बोलले नव्हते; मी अभिजात सौंदर्य अभिजातता, शौर्य आणि आकर्षकपणा, या गुणांचा मी आदर नक्कीच केला

असता; परंतु जर मला हे सर्व गुण एखाद्या तरूणांत, एकत्रितपणे आढळले असते, तर मला अंतःप्रेरणाने इशारा दिला असता की मी त्याच्याबद्दल सहानुभूती बाळगू शकत नाही अथवा तो माझ्याबद्दल सहानुभूती बाळगू शकत नाही. अग्नीपासून, विजेपासून, थोडक्यात तेजस्वी असले तरी अप्रिय असलेल्या सर्व गोष्टींपासून दूर जावे, तशी मी त्याच्यापासून दूर गेले असते.

जर हा अनोळखी माणूसही माझ्याकडे पाहून हसला असता, मी देऊ केलेल्या मदती बद्दल जर त्याने माझे आभार मानले असते, तर मी माझ्या जादा चौकशी करण्या ऐवजी मी माझ्या वाटेने निघून गेले असते. पण या प्रवाश्याच्या, तिरसटपणा, रुक्षपणा आणि कपाळावरच्या आठ्यांनी मला तिथे थांबण्यात काही वावगे वाटले नाही. जेव्हा त्याने मला तेथून जाण्यासाठी सुचवले , तेव्हा मी म्हणाले,"पण, सर, अश्या वेळी या निर्जन रस्त्यावर, तुम्ही घोड्यावरून जाण्यास तंदुरुस्त असल्याशिवाय, एकाकी सोडून जाणे मला उचित वाटत शकत नाही."

त्याने माझ्याकडे पाहिले आणि लगेच पुढे म्हणाला: "मला असे वाटते की यावेळी तुम्ही स्वतः घरी असायला हवे, तुम्ही जवळपास राहत असाल. तुम्ही कुठे रहाता?"

"खाली दरीजवळ, चंद्रप्रकाश असताना उशीरा बाहेर पडण्याची मला अजिबात भीती वाटत नाही. मी 'हाय' कडे पोस्टात एक पत्र टाकण्यासाठी निघाले आहे."

"तुम्ही म्हणता की तुम्ही दरीतून वर आला आहात. तुम्ही किल्यात राहता का?" थॉर्नफिल्डकडे निर्देश करतत्याने मला विचारले.

"होय सर"

"ते घर कोणाचे आहे?"

"मिस्टर रोचेस्टरांचे "

“तुम्हाला मिस्टर रोचेस्टर माहीत आहे का?”

“नाही, मी त्यांना कधीच पाहिले नाही.”

“म्हणजे तो तिथे राहत नाही?”

“नाही.”

“तो कुठे आहे ते सांगू शकाल का?”

“नाही सर.”

“तुम्ही नक्कीच वाड्याच्या सेवकांपैकी नाही आहात: तुम्ही आहात ...”

त्याने थांबून माझ्या पोशाखाकडे पाहिले जे नेहमीप्रमाणे अगदी साधे होते: एक काळा मेरिनो कोट आणि एक बीव्हर टोपी जी नोकराणी घालत नसत;

“मी तिथे गव्हर्नेस आहे.”

“ओहो! गव्हर्नेस,” त्याने पुनरावृत्ती केली आणि माझा पोशाखाचे बारकाईने निरीक्षण केले.

दोन मिनिटांनी तो पायरी वरून उठला; पण जेव्हा त्याने चालण्याचा प्रयत्न केला तेव्हा त्याच्या चेहऱ्यावर वेदना स्पष्ट दिसत होती.

तो मला म्हणाला, “मी तुला आदेश देऊ शकत नाही; पण जर तुम्हाला माझी मदत करायची असेल तर तुम्ही एक करू शकता.”

“काय सर,” मी म्हणाले .

“तुमच्याकडे जी छत्री आहे ती मी काठीऐवजी वापरू शकतो?”

“नाही.”

“तर मग घोड्याचा लगाम घ्या आणि घोड्याला माझ्याकडे आणण्याचा प्रयत्न करा. तू घाबरत नसावीस मला वाटतं.”

मी एकटी असते तर घोड्याला हात लावायची भीती वाटली असती; तथापि, मला सांगितल्याप्रमाणे, मी आज्ञा पाळण्यास तयार झाले आणि घोड्याच्या

दिशेने चालू लागले; पण घोडा जोशात होता आणि त्याने मला त्याच्या जवळ येऊ दिले नाही. मी एक प्रयत्न केला पण व्यर्थ जेव्हा मी त्याला त्याच्या पुढच्या पायांनी जमिनीवर आपटताना पाहिले तेव्हा मी खूप घाबरले. प्रवासी काही वेळ आमच्याकडे बघून शेवटी हसायला लागला.

तो म्हणाला, "मला दिसतंय पर्वत मोहम्मदाकडे येणार नाही; म्हणून तुम्ही मोहम्मदला पर्वतावर जाण्यास मदत करू शकता. कृपया इकडे ये."

मी जवळ गेले.

"माफ करा," तो पुढे म्हणाला; गरज मला तुमचा आधार घेण्यास भाग पाडत आहे."

त्याने माझ्या खांद्यावर एक हात ठेवला आणि जोरदार झुकत तो त्याच्या घोड्यावर पोहोचला, लवकरच स्वतःला सावरले आणि मग त्याने त्याच्या खोगीरात उडी मारली आणि वेदनेने एकदम कळवळला कारण या प्रयत्नांमुळे त्याच्या वेदना जास्त वाढल्या होत्या.

"आता," तो त्याच्या खालच्या ओठ दातांखाली घट्ट दाबून धरला होता, मला मुक्त करत तो म्हणाला, "आता मला माझे राइडिंग पीक द्या जे तिथे कुंपणाच्या जवळ आहे."

मी ते शोधले आणि त्याच्या स्वाधीन केले.

"धन्यवाद. आता तुझे पत्र त्वरीत पोष्ट ऑफिस घेऊन जा आणि शक्य तितक्या लवकर परत जा."

त्याने घोड्याला चालना दिली आणि टाच मारली; कुत्राही त्याच्या मागोमाग गेला आणि जंगलातील वारा वावटळ वाहून नेतो तसे तिघेही गायब झाले मग मी पण माझ्या वाटेला लागले. साहस संपले होते.

मी आनंदी होते; मी काहीतरी चांगले काम केले होते; जरी ही कृती क्षुल्लक आणि फारशी महत्वाची नसली तरी माझ्या कंटाळवाण्या आयुष्यात थोडा बदल सुखावह वाटला. सर्वात महत्त्वाचे म्हणजे मी निष्क्रिय अस्तित्वाने कंटाळले होते; यानिमित्ताने माझ्या मनात जी कथा आकार घेत होती त्यात नव्या प्रसंगाची आणि पात्रांची भर पडली: अनोळखी घोडेस्वार, उमदा घोडा आणि प्रसंगावधानी इमानी कुत्रा. मी हाय गावामध्ये प्रवेश केला आणि माझे पत्र पोस्टाच्या पेटीत टाकले. थॉर्नफिल्डला परत जाताना पुन्हा मघाचा प्रसंग घडलेली जागा लागली. मी थोडावेळ उगीचच रेंगाळले परत मला गायट्रॅशची आठवण करून देणारा कुत्रा, घोड्याच्या टापांचे आवाज आणि अपघाताचा प्रसंग आठवला आता त्या ठिकाणची कुंपणाशेजारील पायरी आणि फांद्या छाटलेले विलोचे झाड चंद्रप्रकाशाने उजळले होते. त्या जागेकडे पाहत असताना मला किल्ल्याच्या एका खिडकीत प्रकाश दिसला. मला उशीर झाल्याचे लक्षात आले आणि मी माझा वेग वाढवला.

थॉर्नफिल्डला परतणे मला तितकेसे भावले नाही; परत संथ दिनक्रमाची सुरुवात होणार होती. प्रत्येक दिवस आदल्या दिवसासारखा असणार होता.

मी थोडा वेळ गेटजवळ रेंगाळले नंतर हिरवळीवरुन संथपणे काचेचा दरवाजा उघडून आत प्रवेश केला. दिवाणखाना उजळला होता. जेवणघराचे दार उघडलेले होते. भिंतीतील शेकोटीजवळ काही लोक बसल्याचे दिसले. त्यांचा आवाज कानावर आला. त्यात अँडेलची बालीश बडबड लगेच ओळखू येत होती.

गडबडीने मी फेअरफँक्सच्या खोलीकडे गेले. तिथे त्या नव्हत्या. त्यांच्या जागी एक मोठा काळा पांढरा कुत्रा अगदी गायट्रॅश सारखा वाटणारा, गालिच्यावर बसून आगीकडे गंभीरपणे पाहत होता. हे साम्य पाहून मला इतका धक्का बसला की मी त्याच्याकडे गेले आणि म्हणाले: “पायलट!” तो उठला आणि माझा वास घ्यायला लागला. मी त्याला थोपटले; तो आपली मोठी शेपटी हलवू लागला; तो

तिथे कसा आला याचे मला आश्चर्य वाटले. मी बेल वाजवली, हा पाहुणा कोण आहे हे देखील मला जाणून घ्यायचे होते तशी लेआ आत शिरली.

“हा कुत्रा इथे कसा ?” मी विचारले.

“तो मालकांसोबत आला.”

“कोणा बरोबर?”

“मालकांसोबत, मिस्टर रोचेस्टर जे नुकतेच आले आहेत.”

“खरंच आणि मिसेस फेअरफॅक्स त्याच्यासोबत आहेत?”

“होय आणि मिस अँडेल सुध्दा; जॉन डॉक्टरांना आणायला गेला कारण त्यांचा अपघात झाला आहे; त्यांचा घोडा पडला आणि मिस्टर रोचेस्टरचा पाय मोडला असावा.”

“त्यांचा घोडा हायच्या मार्गावर पडला नाही का?”

“होय, टेकडीवरून खाली घसरले.”

“ओहो! लेआ, मला एक दिवा आण.”

लेआ लवकरच दिवा घेऊन परतली त्यानंतर मिसेस फेअरफॅक्स आल्या त्यांनी मला ही बातमी पुन्हा ऐकवली आणि सांगितले की डॉक्टर कार्टर आले असून मिस्टर रोचेस्टरांची तपासणी करत आहेत; मग त्या चहाची ऑर्डर द्यायला निघून गेल्या आणि मी कपडे बदलण्यासाठी माझ्या खोलीत गेले.

# प्रकरण 13

डॉक्टरांच्या आदेशानुसार मिस्टर रोचेस्टर लवकर झोपायला गेले आणि दुसऱ्या दिवशी उशिरा उठले. त्याच्या कामधंद्याच्या कारणाने ते खाली आले. त्याचे कारभारी आणि काही शेतकरी त्याच्याशी बोलण्यासाठी आले होते.

अँडेल आणि मला आमची नेहमीची शिकवणीची जागा- लायब्ररी सोडावी लागली कारण ती आता आलेल्या मंडळींच्या भेटीगाठीसाठी वापरली जाणार होती. दुसऱ्या खोलीतील शेकोटी पेटवली गेली; मी आमची पुस्तक नवीन स्टडी रूममध्ये ठेवून आले. त्या दिवसापासून वाड्याचे स्वरूप बदलले: ते आता चर्चसारखे शांत राहिले नाही; दर तासाला दारावर ठोठावण्याचा, बेल वाजवण्याचा किंवा खोलीत येण्याजाण्याचे आवाज ऐकू लागले. या सर्व घाईगोंधळामुळे वाड्यात उत्साह सळसळत होता त्यामुळे मी आनंदी होते.

त्या दिवशी, अँडेलची शिकवणी घेणे कठीण होते; तिचे अजिबात लक्ष नव्हते. ती मिस्टर रोचेस्टरना शोधत होती. काहीतरी निमित्ताने ती खाली गेली.

तिला कदाचित लायब्ररीत जायचे होते. मी रागावून तिला परत अभ्यासाच्या खोलीत आणले आणि तिला शांत राहायला लावले तेव्हा तिने माझ्याशी तिच्या मित्राविषयी म्हणजे मिस्टर एडवर्ड रोचेस्टर फेअरफॅक्सबद्दल बोलण्यास सुरुवात केली. त्यांचे संपूर्ण नाव मी प्रथमच ऐकले होते; तिच्यासाठी काय भेटवस्तू आणणार आहे याचा अंदाज घेत होती. काल संध्याकाळी मिस्टर रोचेस्टरनी तिला एक लहान बॉक्स मिलकोटहून येणार आहे आणि त्यात तिच्यासाठी भेटवस्तू असतील असे जाहीर केले होते.

a

ती म्हणाली, “माझ्या आणि कदाचित तुमच्यासाठीही भेटवस्तू असेल. मिस्टर रोचेस्टरने मला तुमच्याबद्दल सांगितले होते; त्याने मला माझ्या गव्हर्नेसचे नाव काय ती कशी दिसते हे विचारले आणि ‘जर ती खूप बारीक आणि थोडी फिकट नसली तर बरे झाले असते’ असेही म्हणाले. मी हो म्हणाले, कारण ते खरे आहे; ते बरोबर नाही का, मँडम?”

मी काहीच उत्तर दिले नाही.

मी आणि अँडेल नेहमीप्रमाणे मिसेस फेअरफॅक्सच्या खोलीत जेवलो. बर्फवृष्टी होत असल्याने आम्ही दुपारी अभ्यासाच्या खोलीतच थांबलो. रात्री मी अँडेलला तिची पुस्तके आणि तिचे काम सोडून खाली जायला परवानगी दिली; कारण खाली शांतता नांदत होती आणि अशी बर्फवृष्टी सुरू असताना बाहेरून कोणी येणार नाहीत आणि मिस्टर रोचेस्टर निवांत असतील असे वाटत होते. मी एकटीच खिडकीकडे निघाले; पण बाहेर बघण्यासारखे काही नव्हते. संध्याकाळ आणि बर्फवृष्टी मुळे हवा थंडगार झाली होती आणि लॉनवरील झुडुपेदेखील बर्फाखाली झाकली गेली होती. मी पडदा खाली केला आणि शेकोटीच्या उबेला जाऊन बसले. शेकोटीच्या निखाऱ्यातून आणि राखेतून काही मजेदार चित्रांची रेखाटने जाणवत होती अगदी परीपूर्ण चित्रे नव्हेत पण काळसर राखेच्या पार्श्वभूमीवर चमकदार निखाऱ्यांचे नक्षीकाम शोधता येत होते. मिसेस फेअरफॅक्स अचानक आल्याने माझे नक्षीकाम मोडून गेले आणि काही अनिष्ट विचार मनात डोकावू लागले.

त्या म्हणाल्या, “मिस्टर रोचेस्टरला आनंद होईल जर तुम्ही आणि अँडेल आज संध्याकाळी त्याच्यासोबत चहा घेतलात तर, ते दिवसभर इतके व्यस्त होते की ते अजून तुम्हाला भेटायला सांगू शकले नाहीत.”

“ते किती वाजता चहा घेतात?” मी विचारले.

“सहा वाजता; तुम्ही कपडे बदलून तयार रहा. मी येऊन तुला मदत करीन; उजेडासाठी ही मेणबत्ती आणली आहे.”

“माझे कपडे बदलणे आवश्यक आहे का?”

“होय, मी सुद्धा जेव्हा मिस्टर रोचेस्टर असतात तेव्हा नेहमी संध्याकाळी वेगळे कपडे घालते.”

ही गोष्ट मला काहीशी बडेजावाची वाटली; तरीसुद्धा मी माझ्या खोलीत परत आले आणि मिसेस फेअरफॅक्सच्या मदतीने मी माझा काळा लोकरीचा पोशाख बदलून काळया रंगाच्या रेशीम पोशाख घातला. तो एकमेव माझा विशेष प्रसंगी परिधान करण्याचा पोशाख होता .

“तू ब्रोच घालतेस काय?” मिसेस फेअरफॅक्स मला म्हणाल्या.

माझा एकमेव दागिना मोत्याचा ब्रोच होता, मिस टेंपलची लोवुड सोडून जाताना मला दिलेली भेट होती. मी तो घातला आणि आम्ही खाली गेलो.

मि. रॉचेस्टर, यांच्याबरोबर भेटणे बोलणे विशेष परिचय नसल्याने माझी जणू परिक्षाच होती. मिसेस फेअरफॅक्सच्यामागून मी जेवणाच्या खोलीत प्रवेश केला.

दोन मेणबत्त्या टेबलावर आणि दोन भिंतीतल्या शेकोटीच्या चिमणीजवळ पेटवल्या होत्या. पायलट उबेला पडून होता. अँडेल त्यांच्याशेजारी गुडघ्यावर बसली होती. मिस्टर रोचेस्टर, कोचवर आरामात तक्क्याला टेकून पायलट आणि अँडेल या जोडीकडे पाहत होते. दोघांच्या चेहरे शेकोटीच्या ज्वालांचा प्रकाशात उजळले होते. पोस्ट ऑफिसला जातांना भेटलेल्या प्रवाशाला मी ओळखले. मोठ्या भुवया, चौकोनी कपाळ, काळे केस अश्या रितीने कापले होते ज्यामुळे चेहरा अजूनच चौकोनी वाटत होता. मोठे पण सरळ नाक, तोंडांची ठेवण हनुवटीप्रमाणे एकूण

काहीसा रागिट स्वभाव दर्शवीत होती. रुंद छाती, मजबूत खांदे एकंदरीत खेळाडूसारखी बांधेसूद शरीरयष्टी होती.

मि. रोचेस्टरना आम्ही दोघी आल्याचे नक्कीच लक्षात आले होते; पण त्यांनी तसे दर्शविले नाही.

"मिस आयर आली आहे," मिसेस फेअरफॅक्स शांतपणे म्हणाल्या.

किंचित झुकत, "बसून घ्यावे," असे म्हणत त्यांनी पायलट आणि अँडेलवर रोखलेली नजर थोडी आमच्याकडे वळवली. त्यांच्या स्वरात थंड बेफिकीरपणा जाणवत होता. फारसे मनावर न घेता मी बसले.

शिष्टाचाराला धरून केलेल्या स्वागताला मी फारसा प्रतिसाद देऊ शकले नाही. मिस्टर रोचेस्टर पण फारसे बोलले नाहीत. न रहावून मिसेस फेअरफँक्सनी बोलायला सुरवात केली. दिवसभराच्या कामाची तसेच मुरगळेल्या पायाची चौकशी केली आणि सहनशीलतेची प्रशंसा करत विशेष काळजी घेण्यासंबंधी सुचविले.

"मॅडम, मला चहा घ्यायचा आहे," एवढाच तिला प्रतिसाद मिळाला.

तिने घाईघाईने बेल वाजवली आणि ट्रे आल्यावर तिने कप आणि चमचे मांडायला सुरुवात केली. अँडेल आणि मी टेबलाजवळ गेलो पण रोचेस्टरनी आपली जागा सोडली नाही.

"हा कप मिस्टर रोचेस्टरला देता काय?" मिसेस फेअरफॅक्स मला म्हणाल्या, "अँडेल कदाचित धक्का देईल."

तिने सांगितल्याप्रमाणे मी चहा देऊ केला. जेव्हा त्याने माझ्या हातातून कप घेतला तेव्हा अँडेल, माझ्या बाजूने विनंती करण्यास अनुकूल क्षण आहे असे समजून उद्गारली: "सर, तुमच्या छोट्या बाँक्समध्ये मिस आयरसाठी भेट आहे का?"

"भेटवस्तूबद्दल कोण बोलत आहे? तो उदासपणे म्हणाला; मिस आयर, तुला भेटीची अपेक्षा होती का? तुम्हाला भेटवस्तू आवडतात का?"

a

त्यांची चिडचिडी नजर माझा चेहरा तपासत होती.

“मला माहीत नाही सर, मला भेटवस्तू संबंधात काही अनुभव नाही, त्याबद्दल फारसे बोलू शकत नाही; पण भेटवस्तू ही एक आनंददायी गोष्ट मानली जाते.”

“हो साधारणपणे; पण तुला काय वाटते?”

“सर, तुम्हाला समाधानकारक उत्तर देण्यापूर्वी मला थोडा वेळ विचार करावा लागेल. भेटवस्तू देणे आणि घेणे यामागे अनेक पैलू असतात आणि मत बनवण्यापूर्वी त्या सर्वांचा विचार केला पाहिजे.”

“मिस आयर, तू ॲडेलसारखी भोळी नाहीस; मला पाहताच ती भेटवस्तूसाठी हट्ट करते. तू विषयाला सोडून बोलते आहेस.”

“कारण माझ्या अधिकारांबद्दल मला अँडेलपेक्षा कमी आत्मविश्वास आहे; ती जुन्या ओळखीचा आणि सवयीचा विशेषाधिकार घेऊ शकते कारण तिने मला सांगितले की तुम्ही तिला नेहमीच खेळणी दिली आहेत; माझ्याबाबतीत असे काही म्हणता येत नाही. एक तर मी अनोळखी आहे आणि दुसरे म्हणजे मी ओळखीस पात्र होण्याजोगे काहीही केलेले नाही.”

“अरे! नम्र होऊ नका; मी अँडेलची परीक्षा पहात होतो आणि मला दिसले की तुम्ही तिच्यावर भरपूर परीश्रम घेतले आहेत; तिच्याकडे उत्कृष्ट क्षमता नाहीत परंतु थोड्याच वेळात तुम्ही तिच्यात लक्षणीय सुधारणा केली आहे.”

“सर, तुम्ही मला माझी भेट दिली आहे आणि त्याबद्दल मी तुमची आभारी आहे. शिक्षकाला सर्वात हवाहवासा वाटणारा पुरस्कार म्हणजे त्याच्या विद्यार्थ्यांच्या प्रगतीची प्रशंसा करणे.”

"हं" रोचेस्टर म्हणाले; आणि त्यानी शांतपणे त्यांचा चहा प्यायला सुरवात केली. "शेकोटीच्या जवळ ये," ते अँडेलला म्हणाले, मिसेस फेअरफॅक्स कोपऱ्यात विणकाम करून बसल्या होत्या.

अँडेल मला सुंदर पुस्तके आणि दागिने दाखवण्यासाठी बोलवत होती. तिला माझ्या मांडीवर बसायचे होते पण रोचेस्टरनी तिला पायलटसोबत खेळायला सांगितले.

"तू इथे तीन महिन्यांपासून आहेस का?" त्याने मला विचारले.

"होय सर"

"तू कुठून आलीस?"

लॉवूड येथून, काउंटीमधील...लँकेशायर- एक धर्मादाय शाळा."

"तू तिथे किती दिवस राहात होतीस?"

"आठ वर्षे."

"आठ वर्षे! मग अविश्रांत काम करावे लागले असणार; मला वाटते अशा ठिकाणी निम्मा वेळ कष्ट करण्यातच निघून जातो. तरीच तू दुसऱ्या जगातून आल्यासारखी वाटत आहेस; जेव्हा तू मला हायच्या वाटेवर भेटलीस तेव्हा मला परीकथेतील परीने माझ्या घोड्याला मंत्रमुग्ध केले असावे यावर दाट विश्वास बसला होता; मला अजून तुला पाहूनही खात्री पटत नाही."

"तुझे पालक कोण आहेत?"

"मला पालक नाहीत."

"बालपणापासून तू पोरकी असावीस. तुला त्यांची आठवण तरी आहे का?"

"नाही."

"मला खरंच वाटलंआणि त्या पायरीवर बसलेली मला दिसली तेव्हा तू तुझ्या माणसांची वाट पाहत असावीस."

“तुम्ही कोणाबद्दल बोलत आहात, सर?”

“आयरिश परीकथेतील ‘ग्रीन मेन'. चंद्रप्रकाश त्यांच्यासाठी अनुकूल असतो; मी तुझा मार्गामध्ये आलो म्हणून तू माझ्या मार्गावर मंत्रभारीत बर्फाचा तुकडा फेकलास तर नाहीस?”

मी मान हलवली.

“शतकाहून अधिक वर्षांपूर्वीच, मी त्याच्याप्रमाणेच गंभीरपणे म्हणाले, “सर्व ‘ग्रीन मेन' इंग्लंड सोडून गेले. हायच्या वाटेवर किंवा आजूबाजूच्या शेतातही, तुम्हाला त्यांच्या मार्गाच्या खुणा सापडणार नाहीत. आता कधीच उन्हाळा अथवा हिंवाळा शेतामध्ये चंद्रकिरण ‘ग्रीन मेन' च्या मौजमस्तीमध्ये भाग घेणार नाहीत.”

मिसेस फेअरफॅक्स विणकाम थांबवून आश्र्चर्याने आमचे संभाषण ऐकू लागली पण तिला विशेष बोध झाला नाही.

“बरं! मिस्टर रॉचेस्टर म्हणाले, जर तुमचे वडील किंवा आई नसतील तर तुला किमान काका काकू इतर कोणी नातेवाईक आहेत?”

“नाही, मला माहित नाही.”

“तुझे घर कुठे आहे?”

“माझ्याकडे घर नाही.”

“तुमचे भाऊ आणि बहिणी कुठे राहतात?”

“मला भाऊ किंवा बहिणी नाहीत.”

“तुला इथे कोणी आणले?”

“मी माझे नावाने वर्तमानपत्रात जाहिरात दिली होती आणि मिसेस फेअरफॅक्सनी मला पत्र लिहिले.”

“होय, ती चांगली मुलगी आहे, तिला नेमके काय करायला हवे याची कल्पना आहे. तिची नेमणूक करून मी एक चांगला निर्णय घेतला असे मला वाटते.

a

मिस आयर माझ्यासाठी एक परिपूर्ण सहकारी आहे आणि अँडेलसाठी एक प्रेमळ पण दक्ष शिक्षिका आहे.” मिसेस फेअरफॅक्स म्हणाल्या.

“तिच्या चारित्र्याचे विश्लेषण करण्याची तसदी घेऊ नका,” मिस्टर रोचेस्टरने उत्तर दिले, “माझ्या मतावर स्तुतीचा प्रभाव पडणार नाही; मी स्वत: न्याय करेन. तिने माझा घोडा खाली पाडून सुरुवात केली.”

“सर!” श्रीमती फेअरफॅक्स म्हणाल्या.

“माझ्या पायाच्या दुखापतीसाठी मला तिचे आभार मानायला हवेत.”

फेअरफँक्सने न समजूनआश्चर्याने पाहिले.

“मिस आयर, तू कधी शहरात राहिली आहेस का?” मिस्टर रोचेस्टरने विचारले.

“नाही सर.”

“तुम्ही बरेच लोक पाहिले का?”

“नाही,फक्त लॉवुडच्या विद्यार्थीनी, शिक्षक आणि थॉर्नफिल्डचे रहिवासी.”

“तू खूप वाचले आहे का?”

“मला जी पुस्तके मिळाली ती मी वाचली. फार काही नाहीत आणि फारशी महत्वाची पण नाहीत.”

“म्हणजे ननसारखे धार्मिक शिस्तबद्ध जीवन, यात शंका नाही. ब्रोकलहर्स्ट जे मला विश्वास आहे की लॉवुड चालवतात ते पाद्री असावेत.”

“होय सर”

“आणि बहुधा तुम्हा मुलींचे श्रध्दास्थान असावेत जशा नन्स, कॉन्व्हेंटच्या प्रमुखांना सर्वोच्च मानतात.”

“नक्कीच नाही!”

"तू खूप विद्रोही दिसतेस; धर्मगुरुंचा मान न ठेवणारी शिष्या! हे काहीतरी निंदनीय आहे."

"मी मि. ब्रोकलहर्स्टचा तिरस्कार करत होते आणि मी एकटीच होते असे नाही; तो एक कठोर माणूस होता; स्वतःच्या तोऱ्यात रहाणारा आणि ज्यात त्यात आपले नाक खुपसणारा. त्याने मुलींचे केस कापले आणि पैसे वाचवण्यासाठी त्याने आम्हाला असे साहित्य विकत घेतले की शिवणकाम कठीण व्हावे."

"ही एक अतिशय वाईट व्यवस्था होती," श्रीमती फेअरफॅक्स म्हणाल्या.

"आणि हा त्याचा सर्वात मोठा गुन्हा होता का?" मिस्टर रोचेस्टरला विचारले.

"शाळेच्या सुधारण्यासाठी कमिटीची नेमणूक होण्यापूर्वी ते शाळेत एकमेव व्यवस्थापक होते तोपर्यंत त्यांनी आम्हाला पुरेसे अन्नही दिले नाही. आठवड्यातून एकदा कंटाळवाणी प्रवचने देत आणि दररोज संध्याकाळी; पाप ,पुण्य, मरण, स्वर्ग, नरक विषयावरची भीतीदायक पुस्तके वाचायला भाग पाडत. या पुस्तकांनी आम्हाला इतकं घाबरवलं की आम्हाला झोपायला जाण्याची भीती वाटत असे."

"तू कोणत्या वयात लॉवुडमध्ये प्रवेश केला?"

"दहा वर्षांची असताना."

"आणि तू तिथे आठ वर्षे राहिलीस: म्हणजे तू अठरा वर्षांची आहेस!"

मी होकारार्थी उत्तर दिले.

"तुला पाहिल्यावर तुझ्या वयाचा अंदाज येत नाही. अंकगणिताने काम सोपे केले. तुम्ही लोवुड येथे अंकगणित शिकलात काय?"

"होय"

"तू पियानो वाजवतेस का?"

"थोडा फार."

a

“अर्थातच: हे ठरलेले उत्तम आहे. लायब्ररीत या!…कृपया, म्हणजे. माफ करा, मला अधिकारवाणीने बोलायची आहे आणि ती मी नवख्या माणसासाठी बदलू शकत नाही: लायब्ररीत प्रवेश कर; दिवे लाव, दार उघडे ठेव, पियानोवर बसून एक धून वाजव.”

मी तिथून निघाले आणि त्यांच्या निर्देशांचे पालन केले.

“पुरे झाले!” त्यांनी काही मिनिटांत हाक मारली. “तू पियानो थोडा फारच वाजवू शकतेस. इतर कोणत्याही शाळकरी इंग्लिश मुलींप्रमाणे. कदाचित काहींपेक्षा थोडा बरा परंतु एकदम चांगले काही वाजवता नाही.”

मी पियानो बंद केला आणि परत आले. मिस्टर रोचेस्टर पुढे म्हणाले;

“आज सकाळी, अँडेलने मला काही स्केचेस दाखवले; तिने सांगितले होते की ती तुमची आहेत; मला माहित नाही की ते पूर्णपणे तू बनवली गेले आहेत की एखाद्या शिक्षकांनी तुम्हाला मदत केली?”

“नाही, खरंच नाही!” मी त्यांचे म्हणणे खोडून काढले.

“ओ हो ! तुमच्या स्वाभिमानाला धक्का पोहोचला वाटते; बरं, जा तुझी स्केचेस घेऊन ये. जर तू खात्रीपूर्वक म्हणतेस की तू चित्रे काढली आहेत; पण तुला खात्री असल्याशिवाय शब्द देऊ नकोस कारण मला पँच वर्क ओळखता येते.”

“मग सर, माझे काहीच म्हणणे नाही. तुम्हीच काय तो निर्णय घ्यावा.”

मी माझे चित्रांचे पाकीट आणले.

“टेबल वर ठेव,” ते म्हणाले.

मी ते तिकडे वळवले. अँडेल आणि मिसेस फेअरफॅक्स रेखाचित्रे पाहण्यासाठी पुढे आल्या.

“एवढी घाई करू नका,” मि. रोचेस्टर म्हणाले; मी ते पाहणे पूर्ण केल्यावर तुम्ही रेखाचित्रे पहा.”

त्यांनी चित्रे आणि रेखाचित्रे तपासली; त्यांनी त्यातील तीन चित्रे बाजूला ठेवली; उरलेली चित्रे मिसेस फेअरफँक्सकडे सोपवली आणि अँडेलच्याबरोबर दुसऱ्या टेबलावर जाऊन पहायला सांगितले आणि माझ्याकडे बघत म्हणाले, “आता माझ्या प्रश्नांची उत्तरे दे. ही तिन्ही चित्रे एकाच हाताने बनवल्याचे मला स्पष्ट दिसते; हा हात तुझा आहे का?”

“होय.”

“तुला ती काढण्यासाठी वेळ कधी मिळाला? कारण त्यांना काढण्यासाठी बराच वेळ आणि थोडा विचार करावा लागला असावा.”

मी त्यांना शेवटच्या दोन सुट्ट्यांमध्ये ती बनवल्याचे सांगितले. मी सर्व सुट्ट्या लोवुडमध्ये घालवत असल्याने तेव्हा वेळ मिळत असे आणि माझ्याकडे दुसरे काही काम करायला नसायचे.

“तुम्हाला या प्रतींचे मूळ कल्पना कोठे मिळाली?”

“माझ्या डोक्यात.”

“जे तुझ्या खांद्यावर मला दिसत आहे ते?”

“होय सर.”

“त्यामध्ये अजूनही त्याच प्रकारचे इतरही विषय आहेत का?”

“मला तसे वाटते आणि मला आशा आहे की ते याहून अधिक चांगले असतील.”

त्याने चित्रे समोर पसरवली आणि पुन्हा त्यांच्याकडे पाहिले.

मि. रॉचेस्टर अशाप्रकारे गुंतलेले असताना असताना वाचकांनो, मला चित्रांची पार्श्वभूमी सांगायला हवी. खरे तर त्या चित्रांची निर्मिती ही काही आश्चर्यकारक गोष्ट नाही. मी ते प्रसंग माझ्या अंत:चक्षुंनी पाहिले होते, अनुभवले होते. चित्रांचे विषय माझ्या मनात अचानक स्फुरले होते. त्यांचा आवेगच इतका

होता की त्यांनी मला रेखाटन करण्यासाठी भाग पाडले. परंतु माझ्या कल्पनेतील चित्र तसेच्या तसे मी रेखाटू शकले नाही. माझ्या मनाने जे पाहिले त्यापेक्षा फिकट चित्र कागदावर उमटली. ती सर्व जलरंगामध्ये बनली होती.

पहिले चित्र:

वादळी समुद्र आणि त्यावरील आकाशात पांढुरके राखाडी ढगांनी केलेले आक्रमण; अगदी अग्रभागी भल्यामोठ्या ढगांनी झाकला गेलेला सुर्य; त्यातून एक चुकार प्रकाशाचा झोत एका बुडलेल्या जहाजाच्या अर्धवट तरंगत असणाऱ्या डोलकाठीवर बसलेल्या एका मोठ्या पाणकावळयावर स्थिरावला होता. त्याच्या पसरलेल्या पंखांवर लाटांचा फेस स्पष्ट दिसत होता. त्याने त्याच्या चोचीत हिरेजडित सोनेरी ब्रेसलेट पकडले होते. मी सर्वात स्पष्ट आणि सर्वात चमकदार रंगांनी ब्रेसलेट रंगवले होते. डोलकाठी आणि पाणकावळयाच्या जवळ काळपट हिरव्या लाटांखाली एक बुडणारी स्त्री अस्पष्टपणे दिसत होती मात्र तिचा हात अगदी स्पष्ट दिसत होता, ज्यामधून तो दागिना पाणकावळयाने नुकताच हिरावून घेतला असावा.

दुसरे चित्र:

पेंटिंगच्या अग्रभागी डोंगरमाथ्यावर गवत आणि वाऱ्याच्या झुळकीने एका बाजूला उडालेली पाने दिसत होती. दूरवर संध्याकाळचे गडद निळे आकाशात एका स्त्रीची अर्धाकृती दिसत होती. मी त्यासाठी गडद तरी सौम्य रंगछट वापरली होती. तिच्या कपाळावर तारा चमकत होता; तिच्या चेहऱ्याच्या खालील भागावर धुके पसरले होते; काळया डोळयात थोडी उग्र रानटी झाक होती; विजेने किंवा वादळाने विस्कटलेल्या काळया ढगांसारखे तिचे केस तिच्याभोवती तरंगत होते; मानेवर चंद्राच्या किरणांसारखा फिकट प्रकाश पडला. कपाळावरील ताऱ्यांच्या भोवती असलेल्या हलक्या ढगांवरही ही चमक पसरली होती.

तिसरे चित्र:

शेवटचे पेंटिंग, हिमनगाच्या शिखराचे जे उत्तर ध्रुवीय हिंवाळयातील आकाशाला छेदून उभे होते. सभोवताली पार क्षितीजापर्यंत नॉर्दन लाईट्सचे मंद झोत क्षणार्धात चमकून जात होते. एक प्रचंड आकाराचा चेहरा हिमनगाच्या समोरील बाजूला कललेला असून त्याच्या आधारावर उभा होता. दोन नाजूक हात कपाळावर टेकलेले होते. चेहऱ्याचा खालील भाग काळया बुरख्यांमागे झाकला होता. निस्तेज कपाळ, भावशून्य हताश डोळयातील नजर एकाजागी खिळलेली होती. कपाळावर एक काळया रंगाचा रुमालाची घडी सैलसर बांधली होती. त्यावर चमकदार रंगांच्या मौल्यवान खड्यानी, जडावाचे काम केलेला चंद्रकोरीच्या आकाराचा मुकुट घातला होता.''

''तुम्ही ही रेखाचित्रे बनवली तेव्हा तुम्हाला आनंद झाला होता का?'' मि. रोचेस्टरने मला विचारले.

''होय, मी आनंदी होते; चित्रकला मला सर्वात जास्त आवडते!''

''तुम्ही दररोज त्यासाठी बराच वेळ याकरिता घालवला का?''

''ते सुट्टीचे दिवस होते; मला काही काम नसायचे; मी सकाळी तिथेच सुरुवात करून आणि रात्रीपर्यंत करत असायची; उन्हाळयाच्या दिवसांत दिवस मोठा असल्याचे बराच वेळ मिळायचा.''

''आणि तुम्ही तुमच्या उत्कट श्रमांच्या परिणामावर समाधानी आहात का?''

''त्यापासून फार दूर, मी माझे आदर्श आणि माझे काम यांच्यामध्ये फारच फरक आहे; मी ज्याची कल्पना केली होती तिला मूर्त स्वरूप देणे मला पूर्णपणे साध्य झालेले नाही.''

"फारसे नाही; थोडक्यात तुमच्या विचारांची थोडीफार झलक तुमच्या चित्रात उतरली आहे. त्यापेक्षा जास्त काही नाही. कदाचित ते पूर्णपणे चित्रात उतरण्यासाठी लागणार तंत्र अथवा कौशल्य तुझ्याकडे नसावे. तथापि, ही रेखाचित्रे शाळकरी मुलीसाठी उल्लेखनीय आहेत. त्यात जो विचार मांडायचा आहे तो विलक्षण आहे; भले तू 'इव्हनिंग स्टार' आहे तुझ्या स्वप्नात पाहिला असशील पण तू त्याला इतके तेजस्वी आणि तरीही इतके निस्तेज कसे बनवू शकलीस? त्याला इतके खोल आणि गंभीर बनवून तुला नेमके काय म्हणायचे आहे? तुला वारा रंगवायला कोणी शिकवलं? आकाशात ठराविक उंचीवर वादळ आहे याचे चित्र कसे रेखाटले? तू लॅटमॉस पर्वत कुठे पाहिला? कारण नक्कीच तो लॅटमॉस आहे. ठिक आहे. आता रेखाचित्रे ठेऊन द्या."

मी जेमतेम पाकीटाची तार बांधत होते, तेव्हा त्यांच्या घड्याळाकडे पाहून ते अचानक म्हणाले: "नऊ वाजले आहेत ; मिस आयर, अॅडेलला एवढ्या उशीरापर्यंत जागू देण्याचा तुमचा विचार आहे काय? तिला झोपायला घेऊन जा."

अँडेलने खोली सोडण्यापूर्वी त्यांना गुड नाईट म्हटले. उत्तरादाखल त्याने तिचा गोड पापा घेतला.

"आता मी तुम्हा सर्वांना गुड नाईट म्हणतो," ते दाराकडे बोट दाखवत म्हणाले; याचाच अर्थ असा होता की त्यांना आम्हाला निरोप द्यायचा होता.

मिसेस फेअरफॅक्सने त्यांचे विणकाम गुंडाळले. मी माझे चित्रांचे पाकीट घेतले; आम्ही त्यांना गुड नाईट म्हटले ज्याला त्यांनी थंडपणे प्रतिसाद दिला आणि आम्ही तेथून बाहेर पडलो.

"मि. रोचेस्टर विलक्षण आहेत, नाही काय मिसेस फेअरफॅक्स?" मी तिला म्हणाले, अँडेलला अंथरुणावर झोपवल्यानंतर मी मिसेस फेअरफँक्स यांच्या खोलीत

गेले आणि त्याना म्हणाले, “तुमच्या म्हणण्यानुसार मिस्टर रोचेस्टर कमालीचे त-हेवाईक आहेत.”

“मग तुला ते त-हेवाईक वाटले?”

“मला ते खूप लहरी आणि तुटक वाटले.”

“हे खरे आहे; अनोळखी व्यक्तीला तसे वाटू शकते पण मला त्यांच्या वागण्याच्या पध्दतीची इतकी सवय आहे की मी त्याबद्दल कधीच विचार करत नाही: आणि तसे असेल तरीही त्याबद्दल माफ करायला हरकत नाही.”

“कशासाठी?”

“एकतर, तो त्याचा स्वभाव आहे आणि कोणीही त्याचा स्वभाव बदलू शकत नाही; दुसरे म्हणजे निःसंशयपणे त्याला वेदनादायक विचारांनी घेरले आहे आणि यामुळेच त्याला माझ्यामते सर्व काही माफ आहे.”

“कसले त्रासदायक विचार?” मी विचारले.

“कौटुंबिक संघर्ष हे एक कारण आहे.”

“पण त्याना तर कुटुंब नाही.”

“आता नाही पण पुर्वी होते; काही वर्षांपूर्वी त्याने त्याचा मोठा भाऊ गमावला.”

“त्याचा मोठा भाऊ?”

“होय, भाऊ गेल्यावर, मि. रोचेस्टर यांचेकडे सुमारे नऊ वर्षांपुर्वी या मालमत्तेची मालकी आली.”

“नऊ वर्षे म्हणजे बराच मोठा काळ लोटला; त्यांचे आपल्या भावावर इतकं प्रेम होतं का की ते इतका वेळ दु:खी आहेत?”

“अरे नाही! मला वाटतं त्यांच्यात वाद झाला होता. मि. रोलँड रोचेस्टर आणि मि. एडवर्ड यांच्यामध्ये फारसे सख्य नव्हते. त्यांने आपल्या वडिलांना मि.

a

रोचेस्टरांच्या विरोधात भडकावले. वडील कौटुंबिक मालमत्तेचे दोन भाग करायचे नव्हते आणि तरीही त्याला मिस्टर एडवर्डनेही श्रीमंत व्हावे याकरिता मोठेपणा मिळविण्यासाठी एक अत्यंत दुर्दैवी गोष्ट घडली. वडिलांनी आणि भावानी मिळून बनवलेल्या योजनेमुळे, मिस्टर एडवर्डला अतिशय वेदनादायक परीस्थितीला सामोरे जावे लागले. त्यांनी नेमके काय केले ते मला माहीत नाही; परंतु वस्तुस्थिती अशी आहे की मि. एडवर्ड यांना जे काही सहन करावे लागले ते सहन करणे शक्य नव्हते. तो क्षमाशील नाही; म्हणून त्याने आपल्या कुटुंबाशी संबंध तोडले आणि बराच काळ त्यांने भटके जीवन जगायला सुरुवात केली. मला वाटत नाही की तो सलग दोन आठवडे इथे राहिला असावा. त्याच्या भावाच्या मृत्यूनंतर, मृत्युपत्र नसल्याने तो किल्ल्याचा मालक झाला. या कारणांमुळे तो हे ठिकाण टाळतो याचे मला आश्चर्य वाटत नाही.”

“आणि का?”

“त्याला कदाचित हताश वाटत असावे.”

उत्तर अस्पष्ट होते. मला काहीतरी स्पष्ट आवडले असते; परंतु मिसेस फेअरफॅक्सनी मिस्टर रोचेस्टरच्या समस्येचे मूळ कारण आणि स्वरूप याबद्दल अधिक परिस्थितीजन्य तपशील दिले नव्हते किंवा देणारही नाहीत. तिने कबूल केले की हे तिच्यासाठी एक रहस्य आहे आणि ती फक्त अनुमान काढू शकते; हे स्पष्ट होते की तिला यापुढे याबद्दल बोलायचे नव्हते: मला हे समजले आणि मी माझ्या खोलीत परतले.

# प्रकरण 14

त्यानंतर, मि. रोचेस्टर फार कमी वेळा दिसले. सकाळी ते त्यांच्या व्यवसायात व्यस्त असत. दुपारी मिलकोट आणि आजूबाजूचे गृहस्थ त्याला भेटायला यायचे; कधी कधी त्यांच्याबरोबर जेवायलाही राहायचे. जेव्हा त्यांचा पाय घोड्यावर बसण्याइतका बरा झाला तेव्हा ते दिवसाचा बराचसा वेळ बाहेरच राहात. रात्री उशिरापर्यंत परत येत नसत.

या काळात,त्यांनी क्वचितच अँडेलसाठी विचारले; जेव्हा मी त्यांना मोठ्या खोलीत किंवा कॉरिडॉरमध्ये योगायोगाने भेटले तरच पाहिले. कधी ते थंडपणे नजर टाकून अपरिचित असल्यासारखे फक्त मान डोलवत तर कधी प्रसन्नपणे हसून वाकून अभिवादन करत. त्यांच्या या वागण्यातील चढ उताराने मी स्वतः अजिबात विचलित होत नसे कारण मी विचार केला की माझे त्याच्यांशी काही देणेघेणे नाही; त्यांच्या भावनिक आंदोलनाच्या भरती ओहोटीच्या कारणांवर, माझे नियंत्रण नव्हते.

एक दिवस त्यांच्याकडे पाहुणे जेवायला आले होते तेव्हा त्यांनी माझे चित्रांचे पाकीट मागवले होते; त्यातली चित्रे नक्कीच त्यांना पाहुण्यांना दाखवायची असणार. मिलकोट येथील सभेसाठी पाहुणे लवकर निघाले; पावसाळी हवेमुळे मिस्टर रोचेस्टर त्यांच्यासोबत गेले नाहीत. पाहुणे गेल्यानंतर बेल वाजली आणि मला ॲडेलसोबत खाली यायचा निरोप मिळाला. मी अँडेलची वेणी घातली कपडे बदलले आणि मी माझा पोशाख नीटनेटका आहे की नाही याची खातरजमा करून घेतली कारण अगदी लहान चुकसुध्दा मिस्टर रोचेस्टरनी दाखवून दिली असती. अँडेलला तिच्यासाठी आणलेल्या खेळण्यांचा बॉक्स अजूनही मिळाला नव्हता.

काही त्रुटींमुळे अद्याप त्याचे वितरण झाले नव्हते. जेवणाच्या खोलीत प्रवेश करताच आम्हाला टेबलावर एक छोटासा बॉक्स दिसताच तिने तो सहज ओळखला.

"माझा बॉक्स! माझा बॉक्स!" ती ओरडली.

"होय, शेवटी तुझा बॉक्स आला आहे."

एका ठिकाणी बसून मग उघडून बघ. खरी पॅरिसची मुलगी शोभतेस. जा खेळ गंमत कर पण मोडून ठेवू नको. शेकोटीच्या बाजूला खुर्चीवर बसलेल्या मिस्टर रोचेस्टर तिरकस स्वरात म्हणाले; पण सर्वात महत्त्वाचे म्हणजे मला त्याबद्दल फार काही सांगायला येऊ नको. शांतपणे तुझी तू खेळ. तुला समजले का?"

ॲडेलला जास्त काही सांगायची गरज नव्हती. ती तिच्या खजिन्यासह एका सोफ्यावर जाऊन बसली आणि बॉक्स उघडायला लागली. झाकण उचलून आणि चांदीचा काही कागद काढल्यानंतर ती उद्गारली: "अय्या!, किती सुंदर!" आणि ती तिच्या खेळण्यात रंगून गेली.

"मिस आयर " अर्धवट उठून माझ्या दिशेने बघत रोचेस्टरनी म्हणाले, "ये आणि इथे बस," त्यांनी आपली खुर्ची माझ्याजवळ आणली आणि म्हणाले, "मला मुलांची बडबड आवडत नाही. संपूर्ण संध्याकाळ एका दंगा धुडगूस करणाऱ्या मुलांसोबत घालवणे, माझ्यासाठी असह्य गोष्ट आहे. तुमची खुर्ची दूर हलवू नका, मिस आयर; मी तिला जिथे ठेवले आहे तिथे बसा, प्लीज. मला बऱ्याचवेळा शिष्टाचार, सौजन्य या गोष्टींचा विसर पडतो. मला लहान मुले आणि वृद्ध स्त्रिया फारशा आवडत नाहीत. परंतु मिसेस फेअरफँक्स मात्र अपवाद आहेत, त्या वयाने वृद्ध असल्यातरी साध्या मनाच्या आहेत आणि माझ्या वागण्याचा फारसा परिणाम करून घेत नाहीत. तरीही मला या गोष्टींची विशेष काळजी घ्यायला हवी कारण शेवटी त्या फेअरफँक्स आहे, मग भले त्या फेअरफँक्स फँमिलीत विवाह करून आलेल्या असतील, म्हणतात ना, रक्त पाण्यापेक्षा दाट असते."

a

त्यांनी बेल वाजवली आणि मिसेस फेअरफॅक्सला बोलावले, त्या लवकरच त्यांच्या विणकामासह आल्या.

“गुड इव्हनिंग मॅडम,” ते म्हणाले “मी तुम्हाला एका कामासाठी बोलविले आहे. ॲडेलला तिच्या भेटवस्तूंबद्दल माझ्याशी बोलण्यास मनाई केली आहे आणि तिला त्याबाबत खुपच बडबड करायची आहे. तुम्ही थोडा वेळ तिच्याबरोबर बोलत बसा म्हणजे तिला श्रोता मिळेल आणि माझ्यावर मेहरबानी होईल.”

खरं तर, ॲडेलने मिसेस फेअरफॅक्सना पाहिल्याबरोबर त्यांना सोफ्यावर आपल्याजवळ बोलावले आणि त्यांच्या मांडीवर तिच्या मालकीची सर्व चीनी मातीची, हस्तिदंताची खेळणी, तिची मेणाची बाहुली ठेवली आणि मोडक्या तोडक्या इंग्रजीमध्ये आनंदाने त्याविषयी सांगू लागली.

“आता,” त्यादोघीकडे पहात, मि. रॉचेस्टर म्हणाले, “घराचा मालक म्हणून मी, माझे कर्तव्य पार पाडले आहे; माझे दोन्ही पाहुणे एकमेकांचे मनोरंजन करण्यात दंग आहेत. आता मी माझ्या स्वतःच्या आनंदाचा विचार करू शकतो. मिस आयर, तुमची खुर्ची थोडी पुढे सरकवा; तू खूप मागे आहेस मला तुला नीट पहाता येत नाही. तसे पाहिले तर मी थोडे मागे असणे पसंत केले असते, पण मि. रोचेस्टरचा आदेश इतका स्पष्ट होता की मी लगेच माझी खुर्ची पुढे ओढली.

मी आधीच म्हटल्याप्रमाणे आम्ही जेवणाच्या खोलीत होतो; रात्रीच्या जेवणासाठी लावलेल्या झुंबराने संपूर्ण खोली उजळून टाकली होती. शेकोटीतील आग धगधगत होती; जांभळया रंगाचे मखमली पडदे मोठ्या खिडकीसमोर आणि त्याहूनही मोठ्या कमानीसमोर टांगलेले होते; सर्व काही शांत होते; आम्हाला ॲडेलची हळू आवाजातली बडबड ऐकू येत होती कारण तिला मोठ्याने बोलण्याची मनाई केली होती. हिवाळयातील पाऊस खिडक्यांवर धडकत होता.

a

मोठ्या राजेशाही खुर्चीवर बसलेले मिस्टर रोचेस्टर, मी त्यांना पूर्वी पाहिलेल्यापेक्षा वेगळे दिसत होते. नेहमी दिसत तसे कठोर आणि उद्विग्न दिसत नव्हते. मला त्याच्या ओठांवर हसू दिसले; डोळे चमकत होते. कदाचित वाईन घेतली असेल, नक्की सांगता येत नाही पण असू शकेल. थोडक्यात सांगायचे झाले तर, त्यांचे वर्तन सकाळपेक्षा मनमोकळे आणि सौदार्यपूर्ण होते. नेहमीचा हट्टी आणि दुराग्रहीपणा लुप्त होऊन त्याऐवजी जास्त क्षमाशीलता दिसून येत होती. पण तरीही ते खूप गंभीर वाटत होते. त्यांनी आरामखुर्चीत मागे डोके टेकवले होते. शेकोटीच्या आगीचा उजेड त्यांच्या चेहऱ्यावर आणि डोळयांवर पडला होता आणि ते सुध्दा प्रकाशित झाले होते. त्यांचे डोळे खूप सुंदर आणि काळेभोर होते. कधीकधी त्यांच्या डोळयातील नेहमीचा गंभीर, अलीप्त भाव जाऊन हलकेच मार्दव झळकत असे.

सुमारे दोन मिनिटे त्यांनी आगीकडे पाहिले आणि त्याच वेळी मी त्यांच्याकडे बघत होते. अचानक त्यांनी माझ्याकडे नजर वळवली आणि त्यांच्या लक्षात आले की मी त्यांना निरखून पहात होते.

“मिस आयर, तू माझी तपासणी केली आहेस तर मग,” त्यांनी विचारले; तुझ्यामते देखणा, आकर्षक वाटतो की नाही?”

मला जर विचार करायला वेळ मिळाला असता तर मी शब्द तोलून मापून एक औपचारिक अस्पष्ट अशी सभ्य प्रतिक्रिया दिली असती; पण माझ्या नकळत शब्द माझ्या ओठातून पडले.

“नाही सर,” मी उत्तर दिले.

“तुझ्यामध्ये काहीतरी विचित्र आहे हे तुला माहीत आहे का?” त्याने विचारले; “तू एखाद्या लहान ननसारखी दिसतेस; जुन्यापुराणे रितीरिवाज असणारी, शांत, गंभीर आणि साधी. नेहमी तू हातसमोर घेऊन नजर कार्पेटवर खिळवून बसत असतेस. हा! थोड्या वेळापुर्वी माझे निरीक्षण करत होतीस तो अपवाद म्हणावा

a

लागेल. जेव्हा तुला एखादा थेट प्रश्न विचारला जातो अथवा काही शेरा मारला जातो, ज्याबाबत तुला बोलणे भाग पाडते, तेव्हा तुझे प्रत्युत्तर, पटकन कोणाचाही मुलाहिजा न ठेवणारे, तुटक आणि अनादर करणारे असते. या बाबत तुझे काय मत आहे?”

“माफ करा, सर, मी प्रांजळपणे, पूर्व-ग्रहविरहित मत दिले. मला ज्या प्रश्नाचे उत्तर देण्यासाठी भाग पाडले होते, ते देणे कठीण होते. परंतु जेव्हा सौंदर्य पारखण्याचा प्रश्न असतो तेव्हा अभिरुचीनुसार फरक पडतो. सौंदर्याला फारसे महत्त्व नाही, सौंदर्य पहाणाऱ्याच्या नजरेत असते.”

“असे उत्तर तू देऊ शकत नाहीस. सौंदर्याला फारसे महत्त्व नाही, खरचं! काहीतरी बतावणी करून पुर्वी केलेल्या चुकीची सारवासारव करते आहेस. अगोदर मला डागण्या देऊन मग फुंकर घालून शांत करण्यासाठी हे उत्तर आहे. असो पुढे चालू असू दे. तुला माझ्यामध्ये कोणती वैगुण्यें आढळली? माझ्या मते मी अन्य कोणत्याही पुरुषांप्रमाणे आहे.”

“मि. रोचेस्टर कृपया मला माझ्या चुकीची दुरुस्ती करू द्या. तुम्हाला दुखावण्याचा माझा कोणताही हेतू नव्हता, तो माझा शुद्ध अविचारीपणा होता.”

“नेमके, मलाही तेच वाटते; पण या अविचारीपणाला तुम्ही जबाबदार आहात; माझ्यावर टीका करा. माझे कपाळ तुला आवडले नाही काय?”

त्यांनी कपाळावर आलेले केस मागे सारले. भव्य कपाळ कपाळ बौध्दिक उंची दर्शवीत होते. परंतु तिथे अंगभूत विनयशीलता आणि परोपकारी वृत्तीचा अभाव जाणवत होता.

“मग ? मॅडम, मी मूर्ख दिसतो आहे का?” त्यांनी मला विचारले.

“ते राहू दे; तुम्हाला माझे बोलणे उद्धटपणाचे वाटेल पण मला सांगा आपण परोपकारी आहात काय? जगाच्या कल्याणासाठी आपण आपला वेळ, पैसा, अनुभव, कौशल्ये दान करता काय?” मी विचारले.

a

“परत एकदा माझ्या माथी दोष मारला जात आहे. तो म्हणजे मी अगोदरच मान्य केले आहे की, मला लहान मुले आणि वृद्ध स्त्रिया आवडत नाहीत. ते, पुढे बोलूया... नाही, मिस आयर, मी सामान्यतः परोपकारी नाही; पण माझ्याकडे विवेक आहे, मला खऱ्या खोट्याची पारख आहे.” स्वतःच्या डोक्याकडे निर्देश करत ते पुढे बोलू लागले, “पूर्वी माझ्याही मनात एक प्रकारची कोमलता होती. तुझ्या वयाचा असताना, मलाही दुर्बल आणि दुःखी लोकांची दया येत असे; पण नशिबाने इतक्या जोराची ठोकर मारली की आता मी फक्त स्वतःची खुशामत करू शकतो. मी आता इंडियन रबरी बॉलसारखा कठीण आणि चिवट बनलो आहे, कदाचित दोन-तीन ठिकाणी भेदता येण्याजोगा फक्त एखाद दुसरा संवेदनाक्षम बिंदू शिल्लक आहे. माझ्यासाठी अजूनही काही आशा आहे असे तुला वाटते का?”

“ कशाची आशा आहे, सर?”

“ इंडियन रबरी बॉल पुन्हा बदलून हाडामांसाचा माणूस बनण्याची.”

“त्यांनी नक्कीच खूप वाइन प्यायली असावी,” मी विचार केला आणि त्याच्या प्रश्नाचे काय उत्तर द्यावे हे मला माहित नव्हते. तो पुन्हा बदलण्यास सक्षम होता की नाही हे मी कसे सांगू शकेन.

ते मला म्हणाले, “तू गोंधळून गेल्याचे दिसत आहे, आणि मी जेव्हढा आकर्षक आहे तेव्हढी काय तू सुंदर नाही आहेस. तरीसुद्धा गोंधळलेला चेहरा तुला शोभून दिसत आहे: शिवाय ते सोईस्कर सुध्दा आहे, जेणेकरून तू गोंधळून गेल्याने माझे निरिक्षण करण्याऐवजी, खाली कार्पेट वरची फुले न्याहाळू शकशील. तेव्हा गोंधळून जा मुली गोंधळून जा. मिस आयर; मी आज मनापासून बोलण्यास आणि संवाद साधण्यास इच्छुक आहे.”

या घोषणेनंतर ते उठले आणि शेकोटीच्या चौकटीवर हात धरून उभे राहिले. मी त्यांचे शरीर, चेहरा स्पष्टपणे पाहू शकत होते. उंचीच्या मानाने त्यांची छाती रुंद

होती. जवळपास सगळयांनाच ते एक साधारण व्यक्ती वाटले असते; त्यांच्या हालचालीत एक स्वाभाविक डोल होता. वागण्यात एक नैसर्गिक सहजता होती ; त्यांना त्यांच्या बाह्य सौंदर्याच्या कमतरतेबद्दल फारशी काळजी वाटत नव्हती आणि बाह्य आकर्षणाची जागा घेण्याइतके त्याचे वैयक्तिक गुण पुरेसे सामर्थ्यवान आहेत याची त्यांना इतकी पक्की खात्री होती की नक्कीच त्यांच्याकडे पाहून एखाद्या

आंधळयानेसुध्दा त्यांच्या शारीरिक वैगुण्याकडे दुर्लक्ष करून त्यांच्या सामर्थ्यावर, गुणांवर विश्वास ठेवला असता.

"आज मी मनापासून बोलण्यास आणि संवाद साधण्यास इच्छुक आहे." त्यांनी मघाच्याच घोषणेची पुनरावृत्ती केली, "आणि म्हणूनच मी तुला बोलावले आहे. ही पेटलेली शेकोटी, हे उजळलेले दिवे, हे माझे सोबती बनू शकत नाहीत, हा पायलटही नाही कारण त्याला बोलता येत नाही. अँडेल काही अंशी ठिक आहे पण आवश्यकतेपेक्षा कमीच; मिसेस फेअरफँक्स, त्यांना पण मर्यादा येतात. तुझ्याबद्दल, मला खात्री आहे की मला जे हवे होते ते तूच आहेस; मी तुला पाहिले त्या पहिल्या संध्याकाळपासून मला तुझ्याविषयी एक कोडे पडले आहे; तेव्हापासून, मी तुला जवळजवळ विसरलो होतो; इतर कामांमुळे तुला माझ्या आठवणीतून बाजूला केले होते; पण आज मला जे काही लोचटपणे चिकटून राहिले आहे, त्यापासून मुक्त व्हायचे आहे आणि जे मला आनंदित करते ते जाणून घ्यायचे आहे. बरं, तुझ्याबद्दल अधिक जाणून घेणं मला आवडेल; म्हणून आता बोल."

बोलण्याऐवजी मी हसले; आणि माझे स्मित मैत्रीपूर्ण किंवा नम्र नव्हते.

"बोल," ते पुन्हा म्हणाले.

"कशा विषयी, सर?"

"तुला काय हवे आहे; मी विषयाची निवड तुझ्यावर सोडतो आणि तू तुझ्या इच्छेनुसार ते सुरुवात करू शकतेस."

त्यांच्या आदेशामुळे मी खाली बसले आणि काहीही बोलले नाही. “जर त्यांची अशी अपेक्षा असेल की निव्वळ दिखाऊपणा म्हणून मी बोलावे असे असेल तर तसे होणार नाही; त्यांनी चुकीच्या माणसाची निवड केली आहे,” असे मला वाटले.

“तुम्ही नि:शब्द आहात का, मिस आयर?”

तरीही मी शांत राहिले; त्याने डोके माझ्याकडे वळवले आणि क्षणभर माझ्या डोळ्यात पाहिले.

“काहीही बोलायचे नाही असे पक्के ठरवलेले दिसते,” ते म्हणाले; “नाराज पण दिसत आहेस. तुझे बरोबर आहे, एक गैरवाजवी अपेक्षा तुझ्याकडे करण्यात, माझ्याकडून उद्धटपणा झाला आहे. त्याकरिता मी तुझी क्षमा मागतो. मात्र एक गोष्ट कायमस्वरूपी लक्षात ठेव की माझी इच्छा तुला कनिष्ठ अथवा कमी दर्जाची मानण्याची नाही, परंतु ते पुढे म्हणाले, मी तुझ्यापेक्षा वयाने वीस वर्षांनी मोठा आहे आणि बाहेरच्या जगाचा अनुभव तर तुझ्यापेक्षा शंभर पट जास्त आहे ही गोष्ट तर उघड आहे अगदी अँडेललासुध्दा समजेल, आणि या वडीलकीच्या नात्याने तुला माझ्याशी थोडे बोलण्याची आणि माझे विचार, जे एकाच गोष्टीवर केंद्रित झाले आहेत त्याना वेगळ्या दिशेला वळवण्यासाठी मदत करण्याची विनंती करतो.”

त्यांनी मला मोठ्या मनाने स्पष्टीकरण देऊ केले होते, जवळजवळ माफी मागितली होती; मला त्यांच्या बोलण्यात काही अवाजवी वाटले नाही आणि वाटणारही नाही.

“सर, मला तुमची विनंती मान्य करण्यात कोणतीही अडचण नाही. पण तुम्हाला कशात रस आहे हे मला समजणे अवघड आहे. तेव्हा मला असे वाटते, तुम्ही प्रश्न विचारा आणि मी शक्य तितकी उत्तरे देईन.”

"तर मग, काही वेळा, अचानकपणे काही गोष्टींची अंमलबजावणी उत्कृष्टपणे आणि अचूक करण्यात संदर्भात आज्ञा देण्याचा

माझा अधिकार तुला मान्य आहे. त्याची कारणे मी अगोदरच विशद केली आहेत: एकतर मी वयाने मोठा, जवळजवळ तुझ्या वडिलांच्या वयाचा आहे, आणि दुसरे म्हणजे मला बाहेरच्या जगाचा बरा वाईट अनुभव आहे. जवळपास अर्धे अधिक जग मी पालथे घातले आहे. बाकी तू थोड्याफार लोकांबरोबर एकाच जागी शांतपणे राहिली आहेस."

"तुमच्या इच्छेप्रमाणे करा, सर."

"हे उत्तर नाही, किंवा किमान ते खूप चिड आणणारे आहे, कारण उत्तर देण्यास टाळाटाळ करणारे आहे; मला स्पष्टपणे उत्तर अपेक्षित आहे."

"ठीक आहे, सर, मला असे वाटत नाही की तुम्हाला मला आज्ञा देण्याचा अधिकार यासाठी आहे; की तुम्ही वयाने मोठे आहात आणि जग माझ्यापेक्षा चांगले जाणता; तुमची श्रेष्ठता तुम्ही तुमचा वेळ आणि अनुभव यांचा वापर कसा करता, त्यावर अवलंबून असते."

"हं!पटकन उत्तर, पण मी हे मान्य करणार नाही, कारण हे माझ्या बाबतीत कधीच लागू पडणार नाही; मी माझ्या वेळेचा आणि अनुभवाचा फारसा चांगला वापर केलेला नाही, म्हणजे मला श्रेष्ठत्वाचा दावा बाजूला ठेवावा लागणार असे दिसते ; तरीही मग तू माझ्या आदेशाने नाराज न होता मी तुला वेळोवेळी दिलेल्या माझ्या आज्ञा नाराज न होता, स्वीकारण्यास तयार आहेस काय?"

मी हसले. "मिस्टर रोचेस्टर विचित्र आहेत", मी स्वतःशी विचार केला; त्यांच्या ऑर्डर्स घेण्यासाठी तर, ते मला वर्षाला तीस पौंड देतात हे ते विसरलेले दिसतात.

a

ते म्हणाले, “हे एक स्मित आहे जे मला आनंदित करते, पण ते पुरेसे नाही; उत्तर हवे आहे.”

“मी आत्ताच विचार करत होते, सर,” मी उत्तर दिले, “अगदी फार कमी मालकांना, काळजी असते की ते ज्यांना पैसे देतात त्यांना त्यांची ऑर्डर स्विकारणाऱ्याचा स्वाभिमान दुखावणार नाही अथवा नाराज होणार नाही याविषयी काळजी करत असेल.”

“पगारी नोकर ! अरे होय!, मी ते विसरलो होतो, ; बरं, मग या पगाराच्या कारणास्तव, तुम्ही मला थोडा अधिकार गाजवायला देऊ शकाल काय?”

“या कारणासाठी नाही सर. आपल्यावर अवलंबून असणारा नोकर त्याची कर्तव्ये, स्वाभिमानाने आणि स्वखुशीने पार पाडतो की नाही, याविषयी आपण जाणून घेण्यासाठी उत्सुक आहात, याकरिता माझी मनापासून सहमती आहे.”

“आणि तू मला अनौपचारिक वागण्याची सवलत देण्यास सहमत आहेस की असे वागणे उद्धटपणाचे समजतेस?”

“मला खात्री आहे की, सर, मी अनौपचारिकपणाला, उद्धटपणा समजण्याची चुक करणार नाही. अनौपचारिकपणा मला आवडतो; पण उद्धटपणा मात्र इतर कोणाही स्वतंत्र व्यक्तीप्रमाणे मी सहन करू शकत नाही, अगदी पगाराच्या पैश्यासाठी सुध्दा.”

“चूक! बहुतेक सर्व स्वतंत्र व्यक्ती, पगाराच्या पैशासाठी काहीही स्वीकारतील. म्हणून आपले मत स्वतः पुरते मर्यादित ठेवा; ज्या गोष्टींविषयी तुम्ही पुर्णपणे अज्ञानी आहात, त्या संबधात सरसकट मत बनवू नको. चुकीची असली तरीही तू स्वतःची बाजू स्पष्टपणे मांडलीस, त्याकरिता मी तुझा आभारी आहे: कारण तू प्रामाणिकपणे बोललीस, जे सहसा पहाण्यात येत नाही;

a

“या उलट खुशामतखोरपणा, कद्रुपणा, भावनाशून्यता यांनाच गैरसमजाने स्पष्टवक्तेपणा समजला जातो. शंभर सहाय्यक शिक्षिकांपैकी, एखादीनेही तुझ्यासारखे उत्तर दिले नसते. पण मला तुझी खुशामत करायची आहे असे समजू नको. तू इतरांपेक्षा वेगळ्या मुशीतून घडली असावीस, त्यात काही तुझा मोठेपणा मानता येणार नाही. ती निसर्गाची निर्मिती आहे. शिवाय मी अद्याप निष्कर्ष काढू शकत नाही; मला जेव्हढे समजते त्यावरून, तू पण इतरांहून फारशी वेगळी नसावीस, तुझ्यातील काही चांगल्या गुणांचा समतोल राखण्यासाठी काही असह्य दोष असू शकतील.”

“कदाचित तुमच्याकडे असू शकतील,” मी मनात विचार केला. आणि त्याच क्षणी मी त्यांच्याकडे पाहिले; त्यांनी माझे विचार एका नजरेत वाचले असावेत आणि मी ते शब्दात व्यक्त केल्याप्रमाणे त्यांनी प्रतिसाद दिला.

“हो, होय, तू बरोबर आहेस,” ते म्हणाले; माझ्या स्वतःमध्ये अनेक चुका आहेत, मला ते माहित आहे आणि मी त्याकरिता स्वतःला माफ करण्याचा प्रयत्न करत नाही. मला इतरांबरोबर कठोर वागण्याचा अधिकार नाही; माझा भुतकाळ, माझ्याकडून घडलेली कृत्ये, माझ्या जीवनात घडलेले प्रसंग, याविषयी माझ्या मनात सतत विचार येत असतात. याबद्दल माझे परिचित माझ्यावर टीका करून, माझा उपहास करतील. वयाच्या एकविसाव्या वर्षी मी एका धोकादायक मार्गावर फेकला गेलो तेव्हापासून मी कधीही योग्य मार्गावर शकलो नाही. याचा अर्धा दोष मी नशिबाला आणि अर्धा माझ्या भोवतालच्या परिस्थितीला देईन. तसे नसते तर मी आज जो काही आहे त्यापेक्षा खुप वेगळा असू शकलो असतो; कदाचित तुझ्याइतका चांगला, अधिक अनुभवी आणि अधिक शुद्ध असू शकलो असतो; मला तुझ्या मनाच्या शांतीचा, विवेकाच्या शुद्धतेचा आणि निष्कलंक भूतकाळाचा

हेवा वाटतो. लहानपणीचा निष्कलंक भूतकाळ हा एक उत्कृष्ट खजिना तसेच आनंदाचा एक अक्षय स्त्रोत असतो, बरोबर?"

"अठराव्या वर्षी तुमचा भूतकाळ काय होता, सर?"

"अगदी योग्य, सभ्यतेच्या मर्यादा सांभाळून होता. निर्मळ, स्वच्छ पारदर्शक पाण्यासारखा, पण त्यात अशुद्ध पाण्याचा प्रवाह जोरदारपणे घुसला आणि त्याचे कुबटलेल्या पाण्याच्या तलावात रुपांतर झाले. अठराव्या वर्षी मी बरासा तुझ्यासारखा होतो. निसर्गाने मला एक परिपूर्ण, चांगला माणूस बनवला होता. उत्तम व्यक्तींपैकी एक. मिस आयर; तू म्हणशील, मी तसा दिसत नाही, मी स्वतःची खोटी स्तुती करत आहे, तुझ्या डोळ्यात मला स्पष्ट वाचता येते. तुझ्या डोळ्यात व्यक्त होणारे भाव, मी समजू शकतो."

"मी तुला काय सांगतो आहे यावर विश्वास ठेव: मी दुष्ट नाही; तू मला तसे समजू नको. असा नाहक दोष माझ्या माथ्यावर मारु नको. माझ्या स्वभावदोषांपेक्षा, माझ्या अध:पतनास परिस्थिती कारणीभूत आहे. तुला मी हे सर्व उघडपणे का सांगत आहे याबद्दल आश्र्चर्य वाटत आहे असेल; तुझ्या भावी आयुष्यात अनेकदा, तुझे परिचित, विश्र्वासाने आपल्या गुप्त गोष्टी सांगतील, जसे की मी आता तुझी विश्र्वासू म्हणून निवड केली आहे. माझ्यासारख्या अनेकांना सहजतेने असे वाटेल, की स्वतःविषयी बोलणे हा तुझा स्वभाव नाही तर, तू इतरांचे बोलणे ऐकणे हा तुझा स्वभाव आहे. सांगणाऱ्यांच्या घोडचुकींबाबत तिरस्कार अथवा उपहास न करता कनवाळूपणे, तू नुसते ऐकत नाहीस, तर अंगभूत सहानुभूतीने सांत्वन करून, स्वतःला धोरणीपणाने प्रगट न होऊ देता, दुसऱ्याला दिलासा आणि प्रोत्साहन देतेस."

"तुम्हाला कसं माहीत?, तुम्ही या सगळयाचा अंदाज कसा करू शकता, सर?"

a

"मला ते माहित आहे आणि म्हणूनच मी माझ्या डायरीत लिहिल्यासारखे तुझ्याकडे मन मोकळे केले आहे. तू मला सांगशील की मी परिस्थितीवर वर्चस्व गाजवायला हवे होते, हे खरे आहे परंतु मी तसे करू शकलो नाही; नशिबाने माझ्यावर आघात केला तेव्हा मी शहाणपणाने शांत राहायला हवे होते पण मी अविचारीपणा केला. मग माझी अधोगती सुरू झाली; आणि आता जेव्हा एखादा दुष्ट मूर्ख त्याच्या लज्जास्पद कृत्यांमुळे माझा तिरस्कार उत्तेजित करतो, तेव्हा मी त्याच्यापेक्षा चांगला असल्याचा अभिमान बाळगू शकत नाही. तो आणि मी एकाच पातळीवर आहोत हे मला कबूल करावे लागेल. मी ठाम का राहिलो नाही! मला जे हवे आहे ते देव जाणतो. जेव्हा तुम्हाला चुकीची गोष्ट करण्याचा मोह होतो तेव्हा त्याच्या परिणामांची भीती वाटली पाहिजे, मिस आयर; मोहामुळे चुका घडतात आणि घडून गेलेल्या चुकांबद्दल होणारी सदसदविवेकबुद्धीची टोचणी हे जीवनाचे विष आहे."

"पश्चात्ताप, हाच हातून घडलेल्या पापांचा इलाज आहे सर."

"नाही; चुकांची दुरुस्ती हाच एकमेव संभाव्य उपाय आहे आणि मी ते साध्य करू शकेन; माझ्याकडे अजूनही पुरेसे सामर्थ्य आहे जर... पण आता असा विचार करून काय उपयोय, मी तर सर्व बाजूने कोंडीत सापडलेला, असह्य ओझ्याखाली दबला गेलेला एक शापित माणूस आहे, नाही का? आणि याशिवाय, आज पावेतो मला जीवनातील प्रत्येक सुख कायमस्वरूपी नाकारले गेले असल्याने मला जीवनात सुख मिळविण्याचा पुर्ण अधिकार आहे आणि मी ते कोणत्याही किंमतीत मिळवीन."

"मग, सर, तुमचे आणखी अध:पतन होईल."

"हे शक्य आहे ; पण जर मला हवेहवेसे सुख मिळणार असेल; आणि ते मधमाश्यांनी गोळा केलेल्या ताज्या गोड जंगली मधासारखे असेल तर मी त्याची किंमत मोजायला तयार आहे."

a

“सावधगिरी बाळगा, सर, जंगली मधमाश्यांचा डंख तो आनंद कडूशार करेल.”

“तुला याबद्दल काय माहिती आहे? तू ते कधी चाखले नाहीस. तू गंभीर आहेस आणि विचारीही दिसतेस! या सर्व गोष्टींबद्दल तुझे डोके, एक कच्चे मडके आहे; एक नवशिकी, जिने जीवनाचा अजून उंबरठा ओलांडला नाही, जिला जीवनाचे कोणतेही रहस्य माहित नाही तिला, मला उपदेश करण्याचा काहीएक अधिकार नाही.”

“मी तुम्हाला फक्त तुमच्याच शब्दांची आठवण करून देत आहे, सर; तुम्हीच म्हणाला होतात, की मोहामुळे चुका घडतात आणि घडून गेलेल्या चुकांबद्दल होणारी, सदसदविवेकबुद्धीची टोचणी हे जीवनाचे विष आहे.”

“अहो! आता चुकांबद्दल कोण बोलत आहे? मला नुकतीच सुचलेली कल्पना मोह आहे असे मला वाटत नाही; ती तर एक प्रेरणा आहे; मला माहित आहे की, ती शांत आणि सुखावह प्रेरणा आहे. परत एकदा तो विचार माझ्या मनात साकारत आहे. तुला मी खात्री देतो, तो सैतान नाही आहे, आणि जरी असलाच तर त्याने देवदूताचा झगा धारण केला आहे; मला असे वाटते की अशा दैवी पाहुण्याला मला माझ्या हृदयात प्रवेश नक्कीच दिला पाहिजे.”

“त्याच्यापासून सावध रहा, सर, तो खरा देवदूत नाही.”

“पुन्हा, तुला कसे समजले? कोणत्या आधारे तू खोल विवरात पडलेला सैतान आणि प्रभूच्या संदेशवाहकात फरक करत आहेस?”

“सर, तुमच्या चेहऱ्यावरच्या भावावरून समजले, ज्यावेळी तुम्ही म्हणालात की परत एकदा तो विचार माझ्या मनात साकारत आहे, तेव्हा तुमच्या चेहऱ्यावरचे भाव त्रासलेले होते आणि मला खात्री आहे की जर तू तुम्ही त्यानुसार वागलात तर तुम्ही आणखी दुःखी व्हाल.”

a

"अजिबात नाही; हा जगातील सर्वात दयाळू संदेश आहे. शिवाय, तुम्ही माझ्या सद्सद्विवेकबुद्धीचा रक्षक नाही. त्यामुळे काळजी करू नका. आनंदी रहा!"

त्यांची दृष्टि जणू अज्ञाताचा वेध घेत होती, स्वतःशी बोलताना त्यांनी आपले दोन्ही हात छातीजवळ अशा रितीने धरले होते, जणू एखाद्या अदृश्य अस्तित्वाला मिठी मारली असावी.

"आता," ते मला उद्देशून पुढे म्हणाले "मला देवतास्वरूप मार्गदर्शक मिळाला आहे; असा माझा विश्र्वास आहे. त्याने आधीच माझे चांगले केले आहे: माझे हृदय एक उजाड थडगे होते, आता ते एक पवित्र मंदिर बनले आहे."

"खरं सांगू, सर, मी तुम्हाला अजिबात समजू शकत नाही; आपल्याशी संभाषण चालू ठेवणे आता माझ्या समजण्याच्या पलीकडची गोष्ट आहे. मला फक्त एकच माहीत आहे ती म्हणजे: तुम्हाला जेव्हढे चांगले बनायला आवडले असते, तेव्हढे तुम्ही नाही आहात. तुम्हाला तुमच्या अपरिपूर्णतेबद्दल खेद वाटतो--- एका गोष्टीचे मला आकलन झाले आहे ती म्हणजे तुमच्या भूतकाळातील अप्रिय आठवणी तुमच्यासाठी कायमस्वरूपी यातना देणाऱ्या आहेत. मला असे वाटते तर तुम्ही कठोर परिश्रम केलेत, तर शक्य आहे की काही कालावधीनंतर, तुम्ही स्व-मान्यता मिळवण्यास पात्र व्हाल आणि जर त्या दिवसापासून, तुम्ही तुमच्या कृती आणि विचार सुधारण्याचा संकल्प केलात, तर काही वर्षांनी तुम्हाला शुद्ध, चांगल्या आठवणींचे भांडार मिळू शकेल. एक असा भूतकाळ, ज्याचा तुम्ही आनंदाने विचार करू शकाल."

"योग्य विचार आणि अचूक मांडणी, मिस आयर मी या क्षणी अधिक चांगल्या उद्दिष्टांसाठी, नरकातून सुटका करून घेत आहे."

"सर?"

“होय, मी चांगल्या योजना आखतो आहे मला वाटते की, त्या अत्यंत कठीण परिस्थितीत सुध्दा फलद्रूप होतील. नक्कीच यामधील माझे सहयोगी आणि प्रयत्न मात्र आत्तापर्यंत होते त्यापेक्षा वेगळे असतील.”

“आणि चांगले असतील काय सर? “

“होय, चांगले. तू माझ्यावर संशय घेत आहेस आणि तरीही मला शंका नाही; मला माझा उद्देश आणि हेतू माहीत आहेत; आणि या क्षणापासून, मी माझ्या राज्यासाठी एक नवीन कायमस्वरूपी वेगळा कायदा लागू करत आहे जो एकाच वेळी फिर्यादी आणि आरोपीच्या बाजूने न्याय करेल. थोडक्यात एकाच वेळी दोघांचा जय होईल.”

एकाच वेळी दोन्ही बाजूंचा विजय', तसे घडणे अशक्य, सर. “जर त्यांना कायद्याच्या मान्यतेसाठी, नवीन कायदा करण्याची गरज लागत असेल तर ते न्याय्य होणार नाही.”

“मिस आयर, त्यांच्यासाठी नक्कीच हा नवा कायदा आवश्यक आहे; अभूतपूर्व परिस्थितीकरिता, लोकविलक्षण नियम गरजेचे असतात.”

“ही एक धोकादायक गोष्ट आहे, सर; कारण तिचा कधीही दुरुपयोग होऊ शकतो.”

“हे तू बरोबर बोलतेस, जणू उपदेशामृताचे घुटके पाजणारी तत्ववेत्तीच! पण मी शपथ घेऊन सांगतो की माझ्याकडून कधीही त्याचा दुरुपयोग होणार नाही.”

“आपण एक माणूस आहात आणि माणूस प्रमादशील असतो.”

“मी आहे: तू पण आहेस; मग काय?”

“माणसांनी चुकूनही अशा शक्तीवर स्वत:चा गैरवाजवी हक्क सांगू नये, जी केवळ परिपूर्ण आणि दैवी व्यक्तींनाच सोपविली जाऊ शकतो.”

“कोणती शक्ती?”

“अनधिकृत-रूढीबाह्य कृतींचे परिणाम अंतिमतः, सर्व चांगले होईल अशा भ्रमात रहाणे.”

“होय,” मिस्टर रोचेस्टर म्हणाले, “तुम्ही म्हटले आहे, तसेच मी जाहीर करतो की सर्व चांगले होईल.”

“मग चांगलेच होवू देत!” मी उठून उत्तर दिले, कारण मला ते दुर्बोध अस्पष्ट, संभाषण चालू ठेवणे मला व्यर्थ वाटले.

शिवाय, मला समजले की मी मिस्टर रोचेस्टर यांच्या अंतरंगाचे यथार्थाने समजून घेण्यास यशस्वी होऊ शकले नाही, किमान त्यावेळी तरी मुळीच नाही आणि शेवटी मला ही अनिश्चितता, असुरक्षितता, अस्पष्टपणे जाणवली जी नेहमी एखाद्याच्या अज्ञानाची खात्री देते.

“तू कुठे जात आहेस?” मिस्टर रोचेस्टरने मला विचारले.

“ॲडेलला झोपवायला,” मी उत्तर दिले; बराच वेळ झाला आहे.

“तुला माझी भीती वाटते, कारण माझे शब्द स्फिंक्स सारखे गूढ वाटतात.”

“तुम्ही खरचं कोड्यात बोलता; म्हणून मी गोंधळून गेले आहे पण निश्चितच घाबरलेली नाही.”

“होय, तुला भीतीच वाटते; तू वर्तवलेले भविष्यातील अंदाज भीती आहे.”

“त्या अर्थाने, होय, मला काळजी वाटते; मला निरर्थक बोलायचे नाही.”

“मिस आयर, तू कधीच हसत नाहीस का? उत्तर देण्यास त्रास घेऊ नको; मी पाहतो की तू क्वचितच हसतेस, पण तू खूप आनंदाने हसू शकतेस. माझ्यावर विश्वास ठेव, तू जन्मजात विरक्त नाहीस जसा मी जन्मतः दुर्गणी नव्हतो. मला तुझ्यावर अजूनही लोवूडचे दडपण जाणवते, तू स्वतःच्या असण्यावर, दिसण्यावर, वागण्याबोलण्यावर कमालीचे नियंत्रण घालून घेतले आहेस. तू जवळच्या व्यक्तींना पण घाबरत असावीस. तुला भीती वाटते की तूझे स्मित खूप आनंदी होईल, तुझे

बोलणे खूप मोकळे होईल, तुझ्या हालचाली खूप जलद होतील. पण लवकरच, मला आशा आहे, तू माझ्याबरोबर नैसर्गिक राहायला शिकशील कारण तुझ्याबरोबर औपचारिक राहणे माझ्यासाठी अशक्य आहे; यापुढे तुझे दिसणे, तुझे वावरणे अधिक चैतन्यशील आणि अधिक वैविध्यपूर्ण असेल. काहीवेळा तू तुझ्या आजूबाजूला कुतूहलाने नजर टाकतेस तेव्हा एक पक्षी त्याच्या पिंजऱ्यातून डोकावत असल्यासारखे वाटते; तू एका अस्वस्थ बंदिवानासारखी आहेस, जर मुक्त असतीस तर उंच ढगांवर भरारी घेतली असतीस; पण तरीही तू तुझ्या पिंजऱ्यात अडकून आहेस."

"सर, नऊ वाजले."

"काही हरकत नाही, एक मिनिट थांब. अँडेल अजून झोपायला तयार नाही. मी तुझ्याशी बोलत असताना, मी वेळोवेळी अँडेलकडे पहात होतो. सुमारे दहा मिनिटांपूर्वी तिने तिच्या बॉक्स मधून गुलाबी रेशमी ड्रेस घेतला; "मला हे घालून पहावे लागेल," म्हणून सोफी कडून तिला ड्रेस घालून घ्यायला गेली आहे; काही मिनिटांत ती परत येईल. मला माहित आहे, मी थिएटरमध्ये सुरुवातीला परिधान केलेल्या पोशाखात सेलिन व्हॅरेन्सचे एक छोटी प्रतिमा पाहणार आहे... पण आता त्याबद्दल विचार करू नकोस आणि तरीही माझ्या सर्वात कोमल भावनांना धक्का बसेल असे मला ते जाणवत आहे; मी बरोबर आहे की नाही हे पाहण्यासाठी येथे रहा."

काही मिनिटांनंतर, आम्हाला मोठ्या खोलीत ॲडेलच्या पावलांचा आवाज ऐकू आला. तिने रोचेस्टरनी सांगितल्याप्रमाणे तिने गुलाबी सॅटिनचा नवीन ड्रेस घातला होता: तिच्या कपाळाभोवती गुलाबाच्या फुलांचा मुकुट होता; तिने सिल्क स्टॉकिंग्ज आणि पांढरे साटन शूज घातले होते.

"माझा ड्रेस कसा दिसतो ?" तिने ओरडून उडी मारली आणि

a

म्हणाली, “माझे शूज आणि माझे मोजे? येथे, मला वाटते की मी नृत्य करायचे आहे.”

तिचा ड्रेस पसरवून, ती खोलीत उड्या मारू लागली. मिस्टर रोचेस्टरच्या जवळ पोहोचून तिने टाचा उंचावत एक गिरकी घेतली, नंतर त्याच्यासमोर गुडघे टेकले.

“सर, तुमच्या दयाळूपणाबद्दल मी तुमची आभारी आहे,” ती म्हणाली; मग उठून ती पुढे म्हणाली, “आई असंच करायची, नाही का सर?”

“नक्की!” त्याने उत्तर दिले, “आणि म्हणून तर मी तिच्यावर सोन्या, मोत्यांची उधळण केली. मी तरुण होतो, मिस आयर; तुमच्या चेहऱ्याइतकाच ताजेपणा माझ्याही चेहऱ्यावर नक्कीच होता. आता माझा वसंत ऋतु संपला, परंतु त्याने हे छोटे फ्रेंच फूल माझ्यासाठी सोडले.

“कोणत्या मुळापासून ते कसे उगवले त्याला महत्त्व नाही; असे आढळून आले की ते मूळ, अशा प्रकारचे होते की ज्याला सोन्याच्या धूळशिवाय इतर काहीही खत म्हणून घालू शकत नाही, या कळीला तशीच आवड आहे: नाही, मला हे मूल आवडत नाही, विशेषत: जेव्हा ती आतासारखी दिखाऊ दिसते तेव्हा.

आता मी थांबतो आणि कॅथलिकांच्या तत्त्वानुसार, ज्यांचा विश्वास आहे की ते एकाच चांगल्या कामाने अनेक पापांचे प्रायश्चित करतात यावर विश्र्वास ठेवतो. पण हे सर्व मी तुम्हाला नंतर समजावून सांगेन.

शुभ रात्री.”

# प्रकरण 15

मिस्टर रोचेस्टर यांनी मला ते समजावून सांगितले.

त्या दिवशी दुपारी मी ॲडेलसोबत शेतात फिरत असताना, ते अचानक भेटले. त्यावेळी अँडेल पायलट बरोबर खेळत होती. त्यानी मला आपल्यासोबत फिरायला बोलावले. जवळच बीच वृक्षांच्या रांग होती तिथून आम्ही चालायला सुरवात केली.

त्यानंतर त्यांनी मला सांगितले की ॲडेल ही फ्रेंच ऑपेरा डान्सर सेलिन वॅरेन्सची मुलगी होती, जिच्यावर त्यांचे खूप प्रेम होते. सेलिनने उत्कट प्रेमाने प्रतिसाद देण्याचे नाटक केले. ते तिला त्यांची प्रेमदेवता समजत असत. स्वत:ला तिच्या तुलनेने, दिसण्यात रांगडा, ओबडधोबड समजत असला तरी, तिने त्यांच्या सशक्त दणकट शरीराला, अपोलो देवाच्या देखणेपणापेक्षा जास्त महत्व दिले.

"आणि मिस आयर, त्या नाजुक सुंदर फ्रेंच परीने, इंग्रजी बटुबैंगणाला पसंत केल्यामुळे मी खूप खुश झालो, इतका की मी तिला एका हॉटेलमध्ये नेऊन ठेवले. दिमतीला नोकरांचा ताफा, घोडागाडी तर होतीच शिवाय, किंमती वस्त्रप्रावरणे, काश्मिरी शाली, सोनेनाणे, हिरे मोती यांची उधळ केली, थोडक्यात

मी स्वत:, स्वतःच्या अधोगतीचे कारण बनलो.

विनाशाकडे निघालेला, मानहानी आणि अपकीर्तीचा मार्ग बदलून नव्याने चांगला मार्ग निवडण्याचे शहाणपण माझ्याकडे नव्हते; मी मूर्खपणाने स्विकारलेल्या मार्गापासून एक इंचही मागे हटलो नाही. त्याची परिणती जी व्हायची होती तीच माझ्या नशीबी आली.

a

एका संध्याकाळी मी हाँटेलवर आलो. त्यादिवशी मी येईन याची सेलिनला कल्पना नव्हती; ती बाहेर गेली होती. मी त्यादिवशी पॅरिसभर फिरून पार कंटाळलो होतो म्हणून तिच्या खोलीत जाऊन बसलो. ती खोली तिच्या अस्तित्वाने भारली गेली आहे असे मला वाटले. ते मला स्वतःमध्ये सामावून घ्यायची इच्छा होती. माफ करा, माझ्याकडून अतिशयोक्ती होत आहे;

तिच्यामध्ये कोणतेही पवित्र गुण आहेत यावर माझा कधीच विश्वास नव्हता; तिने लावलेल्या कस्तुरी आणि अंबरच्या अत्तराचा वास दरवळत होता.

खिडकी उघडून बाल्कनीत गेलो. चांदणी रात्र होती. सर्वत्र शांतता आणि प्रसन्न वातावरण होते; रात्री उमलणाऱ्या फुलांचा सुगंध आसमंतात दरवळत होता. बाल्कनीत काही खुर्च्या होत्या, मी खाली बसलो आणि सिगार पेटवली.

मिस आयर, आपली हरकत नसेल तर मी एक सिगार घेईन.”

त्यांनी थांबून खिशातून एक सिगार काढली, पेटवून एक झुरका ओढला. हवानाच्या सिगारचा धूर बर्फाळ हवेत सोडला आणि पुढे म्हणाले: “मला त्या दिवसांत गोड खूप आवडायचे, मिस आयर; मी चॉकलेट चघळत होतो आणि आळीपाळीने धुम्रपान करत होतो, अधूनमधून शेजारच्या ऑपेरा हाऊस जवळची गर्दी न्याहाळत होतो. तेव्हढ्यात मला, दोन ऐटबाज घोडे जोडलेली एक सुंदर बंद दार असलेली घोडागाडी दिसली. मी सेलिनला दिलेली ती घोडागाडी होती. ती घरी येत होती; लोखंडी रेलिंगवर मी झुकलो होतो, माझे हृदय स्वाभाविकपणे अधीरतेने उड्या मारू लागले होते. हॉटेलच्या दारात गाडी थांबली; माझी प्रिय सखी घोडागाडीतून उतरत होती. तिचे नाजुक पाऊल माझ्या दृष्टिस पडले. बाल्कनीवर झुकत, मी कुजबुजणार होतो: ‘माझी राणी,’ त्याचवेळी तिच्या पाठोपाठ दुसरी व्यक्ती बाहेर आली; पण यावेळी फरसबंदीवर आदळणारी टाच, एका टोपी घातलेल्या पुरुषाची होती आणि तो तिच्याबरोबर हाँटेलच्या दारातून आत शिरला.

“तुला कधीच मत्सर वाटला नाही, मिस आयर?” नक्कीच नसावा: कारण तुला प्रेम म्हणजे काय माहित नाही. प्रेम आणि मत्सर या दोन भावनांचा अनुभव यावा लागतो; तुझ्या भावना निद्रिस्त आहेत, तुला अजून तो धक्का बसलेला नाही ज्यामुळे त्यांना जाग येईल.

“तुला असे वाटते की आजवरचे तुझे आयुष्य जसे शांत प्रवाहासारखे व्यतीत झाले तसेच तरूणपण सुध्दा जाईल. पण मिटलेल्या डोळ्यांनी आणि बंद कानांनी तरंगत असताना, तुला पाण्याखालील खडक दिसणार नाहीत. पण मी तुम्हाला सांगतो - आणि तू माझे शब्द लिहून ठेऊ शकतेस - तू एखाद्या दिवशी प्रवाहातील अश्या एखाद्या घळई प्रवेश करशील, जिथून संपूर्ण जीवनाचा प्रवाह चक्राकार आणि गोंधळ, फेस आणि गोंगाटात विभागला जाईल: एकतर तुझा खडकावर आपटून नाश होईल अथवा एखादी मोठी लाट तुला वर उचलून घेऊन शांत प्रवाहात वाहून नेईल - जसा मी सध्या आहे.”

“मला हा दिवस आवडतो, मला येथील राखाडी रंगाचे आकाश आवडते, मला या गोठलेल्या दंवाखालील या आसमंतातील, शांतता आणि कठोरता आवडते; मला थॉर्नफिल्ड, त्याची पुरातनता, त्याचे वेगळेपण, त्याची जुनी झाडे, त्याची काटेरी झुडपे, त्याचा राखाडी दर्शनी भाग आणि त्याच्या गडद खिडक्यांच्या रेषा ज्या या राखाडी आकाश प्रतिबिंबित करतात, सर्व सर्व आवडते; आणि तरीही बऱ्याच काळापासून मी या साऱ्यांचा तिरस्कार केला, मी ते एखाद्या शापित घरासारखे टाळले आणि ज्याचा मला अजूनही काही कारणाने तिरस्कार सुध्दा आहे! पण अंत:करणातून मी थॉर्नफिल्डवर प्रेम करतो .”

तो दात ओठावरगच्च आवळून ते खात एका जागी उभे होते; गोठलेल्या बर्फाने, कडक झालेल्या जमिनीवर त्यांनी पाय ठेवला; एक जीवघेणा विचार त्यांना इतका घट्ट धरून होता की त्यांना एक पाऊलही पुढे टाकता येत नव्हते.

a

ते असे थांबले तेव्हा आम्ही झाडाच्या रांगेतून जात होतो. समोर वाडा होता; त्यांनी युध्दभुमीवर एक जळजळीत नजर टाकली, अशी नजर मी यापूर्वी कधी पाहिली नव्हती: वेदना, लाज, राग, अधीरता, किळस, द्वेष, त्यांच्या विस्तारलेल्या डोळयांच्या बाहुल्यांमध्ये क्षणभर संघर्ष होताना दिसला. या संघर्षात रागाचा विजय होण्याची शक्यता दिसत होती; पण आणखी एक वेगळी भावना निर्माण झाली आणि तिने रागावर विजय मिळवला: ती काहीशी कठोर, उपहासिक दृढनिश्र्चयी आणि लवचिक होती. त्यांनी आपल्या भावनांना वश केले, स्तब्ध होऊन पुढे म्हटले:

"मी शांत बसलो होतो, मिस आयर, मी माझ्या पुढील आयुष्याला कसे यशस्वीपणे सामोर जायचे याची योजना आखत होतो;

मॅकबेथला दिसणाऱ्या चेटकीणींसारखी, एक चेटकीण या झाडाच्या बुंध्याजवळ उभी होती. "तुला थॉर्नफिल्ड आवडते, तुझे थॉंर्नफिल्डवर प्रेम आहे ?" थॉंर्नफिल्डकडे बोट उंचावत, मला म्हणाली; आणि तिने हवेत एक स्मरणपत्र लिहिले, जे किल्ल्याच्या दर्शनी भागावर पण भडक रंगात चित्रलिपीमध्ये छापू लागली; "जर शक्य असेल तर प्रेम कर! हिम्मत असेल तर प्रेम कर!" - होय, "मी प्रेम करेन, मी उत्तर दिले, मला प्रेम करण्याची हिंमत आहे!"

आणि ते उत्कटतेने पुढे म्हणाले: "मी माझे वचन पाळीन, मला आनंदी आणि चांगले होण्यापासून रोखणारे अडथळे मी दूर करीन; मी आत्तापर्यंत जो काही आहे त्यापेक्षा अधिक चांगले व्हायला मला आवडेल. त्यासाठी, मला अधिक मजबूत आणि कठोर बनावे लागेल."

त्याच क्षणी, ॲडेल आली आणि तिच्या खेळण्यांसह त्याच्या एकदम जवळ गेली.

"बाळा, येथून दूर जा," ते कठोरपणे ओरडले, "किंवा सोफीबरोबर खेळायला जा!"

a

मग ते शांतपणे चालत राहिले. ते ज्या विषयापासून भरकटला होते त्याची आठवण करून देण्याचे धाडस मी केले.

“मिस वॅरेन्स आत आल्यावर तुम्ही बाल्कनी सोडली काय?” मी त्यांना विचारले.

या चुकीच्या वेळेच्या प्रश्नासाठी मला जवळजवळ फटकारण्याची अपेक्षा होती; पण, त्याउलट त्यांच्या स्वतःच्या कोशातून बाहेर पडून, त्यांनी माझ्याकडे डोळे वळवले, त्यांच्या कपाळावरच्या आठ्या आता गेल्याचे दिसत होते.

“अरे! मी सेलिनला विसरलो होतो,” त्यांनी मला सांगितले, “बरं, जेव्हा मी सेलिनला त्या माणसाबरोबर खोलीत येताना पाहिले आणि मत्सराच्या हिरव्या सापाने माझ्या हृदयाला डंख मारला.”

“विचित्र!” तो उद्गारला, “खरोखरच हे विचित्र आहे की तुझ्यासारख्या तरुण मुलीला, अश्या गोष्टींची वाच्यता करण्यासाठी विश्र्वासार्य व्यक्ती म्हणून मी निवड केली करावी. त्याहूनही विचित्र म्हणजे, तू माझे बोलणे शांतपणे ऐकून घेत आहेस, जणुकाही ही एक जगातील सर्वसामान्य घटना असावी, माझ्यासारखा माणूस आपल्या ऑपेरामध्ये नाच करणाऱ्या मुलीबरोबरच्या विवाह बाह्य संबंधांची गोष्ट सांगत आहे, शेवटची आश्र्चर्यकारक गोष्ट, जी की, तुला यापुर्वी एकदा सांगितली होती, तू एक गंभीर, विवेकपूर्ण आणि ज्ञानी मुलगी आहेस. विश्वासाने तुझ्याकडे गुपित उघडे करायला हरकत नाही. मला कल्पना आहे की मी कशा प्रकारच्या व्यक्तीबरोबर संवाद साधत आहे; जिच्यावर माझ्या व्यक्तिमत्त्वाचा अनिष्ट परिणाम कधीही होणार नाही, जिची आकलनशक्ती असाधारण आहे, जी एकमेवाद्वितीय

a

आहे. मला तिला हानी पोहोचवायची नाही आणि जरी समजा माझ्याकडून काही हानी पोचली गेली तरी, ती स्वतःचे रक्षण करण्यास सक्षम आहे.

"मिस आयर, जेव्हढे म्हणून आपण एकमेकांशी जास्त बोलू, तेव्हढे जास्त आपण एकमेकांना समजून घेऊ शकू. माझा तुझ्यावर प्रतिकूल परिणाम होणार नाही मात्र तुझ्यामुळे मला नवचैतन्य लाभेल."

हे थोडे विषयांतर झाले त्यानंतर त्यानी परत सुरुवात केली---

"मी बाल्कनीत थांबलो. ते निःसंशयपणे आतल्या खोलीत येतील, असे मला वाटले; दबा धरून बसण्यासाठी मी खिडकीचे पडदे बंद केले, निरीक्षण करण्यासाठी फक्त एक लहानशी फट मोकळी ठेवली. ज्याद्वारे आतील माणसांचे निरिक्षण करणे आणि संवाद ऐकणे शक्य झाले असते. ते आत गेले, मी पडद्याआडून डोकवून पहात होतो. सेलिनच्या दासीने दिवा लावला आणि निघून गेली; मग मी खोलीतल्या जोडीकडे पाहिले, सेलिनने सँटिनचा पोशाख घातला होता, अंगावर किंमती दागिने घातले होते, मी दिलेल्या भेटवस्तू; तिच्या सोबत्याने सैनिकी अधिकाऱ्याचा गणवेश घातला होता, मी त्याला ओळखले: तो व्हिस्काउंट होता, एक दुष्ट आणि बुद्धीहीन तरुण, ज्याला मी समाजात कधी कधी भेटलो होतो; मी त्याला खिसगणतीत कधीच धरले नसते इतका तो तुच्छ होता. त्याची ओळख पटल्यावर माझा मत्सराग्नी शांत झाला आणि सेलिनवरील माझे प्रेम देखील संपले; एका तुच्छ माणसासाठी, जिने माझ्याशी प्रतारणा केली, अशी स्त्री,फक्त माझ्या तिरस्काराच्या पात्र होती. माझ्यापेक्षा, तिचीच फसवणूक झाली होती."

a

"ते गप्पा मारू लागले; शांतपणे मी त्यांचे बोलणे ऐकू लागलो: ते छचोर, लोभी, निष्ठुर आणि असमंजसपणाचे होते. ते ऐकून संताप येण्याऐवजी, कंटाळा येत होता. माझ्या नावाचे कार्ड टेबलावर होते; ते पाहताच संभाषणाचा ओघ माझ्याकडे वळला. परंतु त्यांच्यापैकी, कोणाकडेही माझ्यावर टीका करण्यासाठी अक्कल नव्हती आणि लायकी पण नव्हती.

"उद्धटपणाने माझा त्यांनी शक्य होता, तितका अपमान केला. विशेषतः सेलिन, माझ्या वैयक्तिक वैगुण्यांवर आणि दोषांवर, निर्लज्जपणे ताशेरे ओढत होती जी, आजवर माझ्या पुरुष सौंदर्याचे उत्कट कौतुक करत असे. तू तिच्यापेक्षा खूपच वेगळी आहेस, जिने सुरवातीला स्पष्टपणे सांगितले, ती मला देखणा समजत नाही; तेव्हा हा विरोधाभास मला स्पष्टपणे जाणवला आणि…"

या क्षणी, ॲडेल पुन्हा आमच्याकडे धावत आली: "सर," ती म्हणाली, "जॉन नुकतेच म्हणाले की तुमचा कारभारी आला आहे आणि तुम्हाला विचारत आहे."

"ओहो! आता हे प्रकरण, मी थोडक्यात सांगणे आवश्यक आहे. मी खिडकी उघडून त्यांच्याकडे गेलो. मी सेलिनला मी माझ्या बंधनातून मुक्त केले, तिला हॉटेल सोडण्यास सांगितले. तातडीच्या गरजांसाठी लागतील तेव्हढे पैसे दिले; तिचे उन्मादी किंचाळणे, मानभावीपणाने रडणे, आर्जवे, विनंती, माफी, प्रार्थना, लटके स्पष्टीकरण, बेशुद्ध पडण्याचा बहाणा यापैकी कशाचाही माझ्यावर यत्किंचितही परिणाम झाला नाही. व्हिस्काउंटला दुसरे दिवशी, बोईस डी बोलोनमध्ये भेटण्यास सांगितले.

"मला दुसऱ्या दिवशी त्याच्याशी लढण्याचा आनंद मिळाला; मी त्याच्या दंडावर एक गोळी चालवली, त्याने शरणागती पत्करली, अगदीच कमकुवत निघाला

a

आणि मग मला वाटले की सर्व संपले; परंतु दुर्दैवाने, सहा महिन्यानंतर, सेलिनने या अँडेलला जन्म दिला, जी माझी मुलगी असल्याचा तिचा दावा होता: कदाचित तो बरोबर असू शकेल जरी मला तिच्यामध्ये माझ्या कुरूप पितृत्वाचा कोणताही पुरावा सापडला नाही; पायलट सुध्दा माझ्यासारखा दिसतो पण ती नाही. आमच्या ब्रेकअपनंतर काही वर्षांनी, अँडेलला तिच्या आईने सोडून दिले आणि एका संगीतकार की गायकसह इटलीला पळून गेली. मी ॲडेलचे काही देणे लागतो हे मी कबूल करत नाही आणि मी तिच्याकडून काही अपेक्षाही करत नाही, कारण मी तिचा पिता नाही; पण तिचा सेलिनने त्याग केल्याची माहिती मिळाल्यावर, मी पॅरिसच्या चिखलातून या गरीब बिचाऱ्या मुलीला उचलून इंग्रलंडच्या ग्रामीण भागातील निरोगी मातीत निरोगीपणे वाढवण्यासाठी येथे आणले. श्रीमती फेअरफॅक्सनी तिच्या शिक्षणासाठी तुझी नेमणूक केली; परंतु आता तुला माहित आहे की ॲडेल ही ऑपेरा डान्सरची अनौरस मुलगी आहे, तू कदाचित यापुढे तिला शिकवण्याचा विचार बंद करशील; आणि तू एके दिवशी माझ्याकडे येऊन सांगशील की तुला दुसरी नोकरी सापडली आहे आणि तू मला दुसरी गव्हर्नेस शोधण्यास सांगशील.''

''नाही सर ; तुमच्या अथवा तिच्या आईच्या दोषांबद्दल मी, अँडेल जबाबदार धरणार नाही. मला तिच्याबद्दल आपुलकी आहे, आणि आता तिच्या विषयी सर्वकाही समजल्यावर की तिला आईवडील नाही आहेत, आईने तिचा त्याग केला आणि मुलगी म्हणून तुम्ही नाकारत आहात, आता मी उलट तिच्या जास्त जवळ जाईन. तिच्या शिक्षिकेत, मित्र शोधणाऱ्या गरीब अनाथ मुलीला मी कशी काय नापसंत करू शकेन?''

''ओहो या पद्धतीने तू या गोष्टीकडे पहात आहेस तर ... पण मला आता घरी जावे लागेल आणि तुलाही, कारण रात्र खूप झाली आहे.''

a

मी अँडेल आणि पायलटसोबत आणखी काही मिनिटे थांबले; मी तिच्याबरोबर पळापळीचा आणि बॅडमिंटनच्या खेळ खेळले आम्ही घरी आल्यावर मी तिची टोपी आणि कोट काढला मग मी तिला माझ्या मांडीवर बसवून घेऊन सुमारे एक तास बडबड करू दिली; तिला काही काही गोष्टी स्वतः करून पहायला आवडायच्या, जसे की नटणे, मुरडणे, लक्ष वेधून घेणे, तिच्या आईच्या फ्रेंच रक्तातील या आवडीनिवडी, इंग्लिश रितीरिवाजानुसार वावग्या ठरवल्या जात, पण मी त्याकडे थोडे दुर्लक्ष करायचे ठरवले. तथापि, तिच्यामध्ये जे काही चांगले गुण होते, त्यांचे मनापासून कौतुक करण्यास मी तयार होते. तिच्या आणि मि. रोचेस्टरांच्या, दिसण्यात,वागण्या बोलण्यात काही साम्य दिसते का पहाण्याचा प्रयत्न केला, परंतु मला तसे काहीही सापडले नाही; याचा मला खेद वाटला, जर ती थोडी जरी त्यांच्यासारखी दिसली असती तर त्यांचे तिच्याबद्दल चांगले मत झाले असते.

जेव्हा मी झोपायला गेले तेव्हाच मी, मिस्टर रोचेस्टरांच्या गोष्टींचा विचार करू लागले. कथेत विलक्षण असे काहीही नव्हते: फ्रेंच नर्तकीसाठी श्रीमंत गृहस्थाची उत्कटता, नंतरचा विश्वासघात, ही वस्तुस्थिती, जी समाजात कुठेही, कधीही घडणे शक्य होते; जेव्हा रोचेस्टर स्वतःच्या मन:स्थिती बद्दल बोलताना, त्याच्या जुन्या वाड्यात परत आल्याने आनंदी आहे हे सांगत असता, अचानक भावनोद्रेगाने स्तब्ध झाले, ही गोष्ट मला आश्चर्यकारक वाटली. त्यामागे काय रहस्य असावे यावर विचार करूनही काही गुंता सुटेना मग मी तो विचार सोडून दिला.

मग मिस्टर रोचेस्टरांच्या शिष्टाचाराचा विचार करू लागले. त्यानी त्यांचा पुर्वेतिहास माझ्या समोर उघड करणे उचित ठरवण्यासाठी माझ्या विवेकबुद्धीवर ठेवलेला विश्वास ठेवला; किमान तेव्हढे गृहीत धरण्यात काही हरकत वाटली नाही. त्यांनी जो विश्र्वास माझ्यावर ठेवला, तो मला माझ्या वागणुकीतील दक्षता घेण्याचा

a

आणि योग्यायोग्य ठरवण्याचा अधिकार योग्य वेळी घेतल्याचा परिणाम वाटला. गेले काही आठवडे त्यांचे माझ्या बरोबरचे वागणे, पहिल्या काही दिवसांपेक्षा जास्त सुसंगत वाटत होते. मला आता त्यांचा त्रास होणार नाही असे वाटत होते. त्यांची नेहमीची थंड नजरेने दुसऱ्यांना तुच्छ लेखण्याची वृत्ती, जी आता माझ्याबाबतीत जाणवत नव्हती. जेव्हा जेव्हा त्यांची अनपेक्षित गाठ पडे, तेव्हा तेव्हा हसून एखादा छान शब्द बोलायचे; जेव्हा त्यांनी मला त्याच्यासमोर येण्याचे आमंत्रण दिले, तेव्हा त्यांनी माझे मनापासून स्वागत केले, ज्यामुळे मला माझ्याकडे खरोखरच त्यांचे मनोरंजन करण्याची शक्ती आहे याची खात्री पटली, आणि या संध्याकाळच्या भेटींमधून झालेल्या चर्चांमधून त्यांना माझ्याप्रमाणे त्यांना आनंद मिळतो आहे दिसून येत होते. खरोखरच मी तुलनेत फार कमी बोलत असे, पण त्यांचे बोलणे ऐकणे, एक आनंददायी गोष्ट होती. त्यांचा स्वभाव बोलका होता. जगाला अपरिचित असलेल्या गोष्टींविषयी, माहिती देण्यास ते नेहमीच तयार असत. त्यांनी मांडलेल्या नवीन कल्पना, त्यांनी चित्रित केलेल्या नवीन चित्रांचे चित्रण आणि त्यांनी दिलेली नवीन प्रदेशांची माहिती या सर्वांचा पाठपुरावा करण्यात मला खूप आनंद होत असे. त्यांच्या सहज वागण्याने मला एका त्रासदायक बंधनातून मुक्ती मिळाली; त्यांच्या वागण्यातील मनमोकळेपणाने, किंबहुना सलोख्याच्या वागणूकीने मी नकळतपणे त्यांच्या कडे आकर्षित झाले. काहीवेळा तर ते माझे मालक वाटण्याऐवजी, कुटुंबिय वाटू लागले, पण अजूनही काही वेळा हुकुमशाही प्रवृत्ती डोकावत असे, पण मी ते मनावर घेणे सोडून दिले होते. तो त्यांच्या वागण्याचाच एक भाग असल्याचे मला पटले होते. माझ्या आयुष्यात जोडल्या गेलेल्या, मित्रत्वाच्या या नवीन नात्यामुळे मी इतकी आनंदी आणि कृतज्ञ झाले की, मला कुटुंब नसल्याची खंत फारशी जाणवेनाशी झाली. शारीरिक आणि मानसिक आरोग्य सुधारले.

a

आणि मिस्टर रोचेस्टर अजूनही माझ्या नजरेत कुरूप होते का? नाही. कृतज्ञता, साहचर्य आणि आनंददायी सौहार्दपूर्ण वागणूक यामुळे त्यांचा चेहरा पाहणे माझ्यासाठी एक आनंदाची बाब बनली. खोलीतील त्यांची उपस्थिती माझ्यासाठी तेजस्वी अग्नीपेक्षा अधिक आनंददायक होती; तथापि, मी त्याचे दोष विसरले नव्हते; मी तसे करू शकले नाही, कारण ते सातत्याने नजरेस येत असत: ते गर्विष्ठ आणि उपरोधिक होते, कोणत्याही प्रकारचा कमीपणा जराही खपत नसे. .

मी मनोमन जाणून होते की, जेव्हढे ते माझ्याशी जास्त दयाळूपणे वागत, तेव्हढे प्रसंगी, इतरांच्या बाबतीत कठोर वागत असत, अश्या रितीने चांगले आणि वाईट वागण्याचा समतोल राखला जाई.

बऱ्याचशा वेळी त्यांचे वागणे लहरी आणि अनाकलनीय भासत असे. मला लायब्ररीत काहीवेळा वाचून घेण्यासाठी बोलवत असत. एकदा अशीच मी गेले असता, ते एकटेच हातावर डोके टेकवून खाली मान करून बसले होते. जेव्हा त्यांने डोळे वर केले तेव्हा, चेहरा दुर्मुखलेला होता, कपाळावर आठ्यांचे जाळे उमटले होते; द्वेषाने धुमसणारा चेहरा, संतापाने

काळानिळा झाला होता. परंतु माझा विश्वास आहे की त्यांचे दुर्मुखलेपण, आत्यंतिक संताप आणि भूतकाळातील घसरलेली नीतिमत्ता, हे सारे नशीबी आलेले दुर्दैव होते. रोजेस्टर, स्वभावतःच चांगल्या प्रवृत्तीचे, उच्च मुल्ये धारण करणारे आणि उत्तम अभिरुची संपन्न होते, हे सर्व परिस्थितीवशात, उत्तम शिक्षणाने अथवा नशीबाने मिळले, असे समजणे योग्य नव्हते. त्यांच्यामध्ये उत्तम गुणांचा समुच्चय झाला होता, पण काही अज्ञात कारणांमुळे ते झाकोळून गेले होते. त्यांच्या दु:खाने मी व्यथित झाले होते आणि ते हलके करण्यासाठी त्यांना मदत करण्याची माझी तयारी होती.

a

मी माझी मेणबत्ती विझवली आणि झोपायला गेले; तरीसुद्धा मला झोप येत नव्हती: परत एकदा बागेतील घटनाक्रम डोळ्यासमोर उभा राहिला. त्यांच्या सांगण्यानुसार, थॉर्नफिल्डवर त्यांचे प्रेम आहे, यावर नशीबाने चेटकीणीच्या रुपात येऊन आव्हान दिले होते, आणि ते आव्हान त्याने, "होय, मी प्रेम करेन, मला प्रेम करण्याची हिंमत आहे!" म्हणून स्विकारले होते.

"आणि असे का होणार नाही?" मी स्वतःलाच विचारले. काय कारण आहे की जे, त्यांना या घरापासून दूर ठेवते? ते पुन्हा लवकरच थॉर्नफिल्ड सोडून जातील काय? मिसेस फेअरफॅक्सनी अगोदरच सांगितले की ते क्वचितच पंधरवड्यापेक्षा अधिक काळ येथे रहात; आणि गेले आठ आठवड्यांपासून ते इथेच आहेत. ते निघून गेले तर वाड्यातील चैतन्य निघून जाईल!"

मला झोप लागली की नाही माहीत नाही; पण अचानक मला माझ्या डोक्याजवळ एक अस्पष्ट बडबड ऐकू आली. ती विचित्र आणि दु:खाने भरलेली होती. मला वाटले मेणबत्ती विझवायला नको होती: सर्वत्र काळोख दाटून राहिला होता, त्यामुळे मी भयभीत झाले आणि पलंगावर उठून बसले. अंधारात आवाजाचा कानोसा घेऊ लागले; पण आवाज थांबला होता.

मी परत झोपी जाण्याचा प्रयत्न केला; पण माझे हृदय जोराने धडधडत होते: माझ्या मनाची शांतता भंगली होती. मोठ्या हॉलमधले घड्याळात दोनचे टोले वाजले. त्या क्षणी मला असे वाटले की, कोणी तरी माझ्या दाराला स्पर्श करून चाचपडत अंधारलेल्या गॅलरीतून बाहेर गेले असावे, "कोण आहे तिकडे?" मी विचारले. कोणीही उत्तर दिले नाही; मी भीतीने थिजून गेले होते.

मी स्वत:ला समजूत घातली की तो पायलट असू शकतो जो स्वयंपाकघर उघडे असताना अनेकदा मिस्टर रोचेस्टरांच्या दारात झोपायला यायचा. मी स्वतः कधी कधी सकाळी उठल्यावर तो दिसत असे. या विचाराने मला थोडे शांत वाटले;

मी परत झोपायला गेले. यानंतर सर्व शांत झाले, मला घरात कोणताही आवाज ऐकू आला नाही, मला पुन्हा झोप येऊ लागली; पण त्या रात्री मी झोपता येणार नव्हते. स्वप्नात असल्यासारखे माझ्या अगदी कानाजवळ, एक राक्षसी हास्य दबलेल्या हळू पण खोलवर आवाजात ऐकू आले, जेव्हा ते दूर गेले तेव्हा भीतीने हाडे गोठली गेली होती.

माझ्या पलंगाची डोक्याकडील बाजू दाराजवळ होती आणि मला क्षणभर वाटले की ज्या राक्षसाचे अस्तित्व नुकतेच मला जाणवले होते, तो माझ्या पलंगावर जवळ उभा असावा. मी उठले, माझ्या आजूबाजूला पाहिले; पण मला काहीच दिसत नव्हते. पुन्हा तो विचित्र आवाज आला आणि मला जाणवले की तो कॉरिडॉरमधून येत आहे. सर्वात प्रथम मी दरवाजाची कडी घट्ट बंद केली आणि जोरात ओरडले, " कोण आहे तिथे? "

कोणीतरी घृणास्पदरीत्या गुरगुरले; काही क्षणानंतर मला कॉरिडॉरमधून तिसऱ्या मजल्यावरील जिन्याच्या दिशेने पावलांचा आवाज ऐकू आला, ज्याचा दरवाजा लवकरच उघडला आणि बंद झाला; मग सर्व काही शांत झाले.

"ही ग्रेस पूल आहे की एखादे भुत पिशाच्च?" मी स्वतःलाच प्रश्न विचारला, "मी यापुढे एकटी राहू शकत नाही, मला मिसेस फेअरफॅक्सला शोधावे लागेल."

मी कपडे नीट केले आणि शाल घातली, कडी काढून दरवाजा थरथर कापत उघडला. जवळच गॅंलरीच्या डाव्या बाजूला एक मेणबत्ती पेटलेली होती.

मला आश्चर्य वाटले, पण मी पाहिले सगळीकडे धुर पसरला आहे; तो कुठून येत असेल हे समजून घेण्यासाठी मी आजूबाजूला पाहत होते, तेव्हा मला जळका वास आला.

मी आगीचा तडतडणारा आवाज ऐकला; आणि माझे लक्ष या दिशेला गेले. मिस्टर रोचेस्टरांच्या खोलीचे दार अर्धवट उघडे होते आणि तेथून धुराचे लोट बाहेर

a

येत होते. यापुढे क्षणभरही माझ्या मनात मिसेस फेअरफॅक्स, ग्रेस पूल किंवा विचित्र हसण्याचा विचार आला नाही. एका झटक्यात मी मिस्टर रोचेस्टरांच्या खोलीत गेले; खोलीतील पडदे पेटले होते, आणि मिस्टर रोचेस्टर त्या पेटत्या आगीच्या ज्वाळा आणि धुराच्या मध्ये झोपले होते.

"उठा!" मी त्याच्यावर ओरडले, त्यांना हालवले.

ते झोपेत काहीतरी बडबडले आणि कुशीवर वळले; धुरामुळे झोपेत जीव गुदमरला होता, एक क्षणही गमावून चालणार नव्हता; आगीच्या ज्वाळा पलंगाच्याजवळ येऊ लागल्या होत्या. मी त्यांच्या बेसिनकडे धावले; सुदैवाने दोन मोठे पाण्याचे घडे भरलेले होते, मी पलंगाच्या आजूबाजूला आणि रोचेस्टरांच्या अंगावर पाण्याचा मारा केला, मग मी आणखी पाणी घेण्यासाठी माझ्या खोलीत गेले; आणि शेवटी, धुमसणारे लाकूडसामान आणि पडदे यांची आग विझवण्यात यशस्वी झाले.

विझत चाललेल्या ज्वाळांचा चुरचुरणारा आवाज येत होता, त्यातच माझ्या हातातून पाण्याचे भांडे निसटून जमिनीवर पडल्याने मोठा आवाज झाला आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे मी इतके जास्त पाणी ओतलेले होते की त्याच्या ओलीने आणि गारव्याने, मिस्टर रॉचेस्टर जागे झाले; अंधारात भिजलेल्या स्थितीत जागे झाल्याने संतापाने ओरडले, "इथे पूर आला आहे का?"

"नाही, सर," मी उत्तर दिले; पण आग लागली आहे. आपण उठून उभे रहा; आपण सुरक्षित आहात; आता मी मेणबत्ती आणायला जाणार आहे.

"अरे देवा!, तू जेन आयर आहेस? त्यांनी विचारले; नेमका तू काय पराक्रम केला आहेस? तुझ्याशिवाय या खोलीत आणखी कोण आहे? मला काय तू बुडवायचेच ठरवले आहेस काय?"

"सर, मी मेणबत्ती घेऊन येईन; पण कृपया आपण उठावे; कोणी दुसऱ्यानी हे काम केले आहे, ते शोधल्याखेरीज लगेच उत्तर मिळू शकणार नाही."

"मी येथे आहे; तुला मेणबत्ती आणायला हवी, एक मिनिट थांब, मला काही कोरडे कपडे सापडतात का पहातो, काही शिल्लक असल्यास. हं! हा माझा ड्रेसिंग गाऊन मिळाला; आता धावत जाऊन मेणबत्ती घेऊन ये."

मी निघाले आणि कॉरिडॉरमध्ये राहिलेली मेणबत्ती परत आणली; त्यांनी माझ्या हातातून घेऊन, आगीने काळवंडलेला पलंग, तसेच चादर, पडदे आणि पाण्याने भिजलेले कार्पेट तपासले.

"हे कोणी केले?" त्यांनी विचारले.

मला जे माहीत होते ते मी त्यांना थोडक्यात सांगितले; मी त्यांना विचित्र हसण्याबद्दल, तिसऱ्या मजल्याकडे जाताना ऐकलेल्या पावलांच्या

आवाजाबद्दल, धूर आणि वासाने मी त्याच्या खोलीत आले, तसेच मला ते ज्या अवस्थेत सापडले होते त्या सर्व गोष्टींची माहिती दिली; शेवटी, मी त्यांना सांगितले की आग विझवण्यासाठी मिळालेले सर्व पाणी मी त्यांच्यावर फेकले आहे.

त्याने माझे म्हणणे गंभीरपणे ऐकले; त्याच्या चेहऱ्यावर आश्चर्यापेक्षा अधिक दुःख दिसत होते; ते काही वेळ न बोलता तसेच राहिले.

"मी मिसेस फेअरफॅक्सला जाऊन सांगावे असे तुम्हाला वाटते का?" मी विचारले.

"मिसेस फेअरफॅक्स?" नाही, त्यांना कशाला हाक मारायची? त्या काय करणार? त्यांना शांत झोपू द्या."

"मग मी लेआ, जॉन आणि त्याची बायको यांना उठवते."

"नाही, इथेच थांब; तुझ्याकडे शाल आहे. जर तू पुरेसे उबदार नसशील तर स्वत:ला माझ्या कोट घालून, या आरामखुर्चीवर बस; आता आपले पाय या स्टूलवर

ठेव, म्हणजे ते ओले होणार नाहीत; मी मेणबत्ती घेईन आणि काही क्षणांसाठी तुला एकटीला इथे सोडेन. मी परत येईपर्यंत इथेच थांब; एकदम शांत; मला जाऊन कोणाला तरी भेटायचे आहे; पण सर्वात महत्त्वाचे म्हणजे, इथून हालू नको आणि कोणालाही बोलावू नको.''

रोचेस्टर निघून गेले आणि जाताना मेणबत्ती घेऊन गेले; त्यांनी कॉरिडॉर ओलांडला, शक्य तितक्या शांतपणे पायऱ्यांचे दार उघडले, ते बंद केले आणि सगळीकडे अंधार पसरला. मी कानोसा घ्यायचा प्रयत्न केला, पण मी काहीच ऐकू आले नाही. रोचेस्टर जाऊन बराच वेळ निघून गेला होता; माझ्या अंगावर शाल असूनही थंडी वाजत होती, अगदी मी थकून गेले होते; मला तिथे थांबण्याची गरज आहे असे वाटत नव्हते, कारण कोणाला उठवायचे नव्हते. तेव्हा मी मिस्टर रोचेस्टरच्या आदेशांचे उल्लंघन करून, त्यांची नाराजी पत्करण्याचा धोका पत्करून तिथून निघून जाण्याचे ठरवले. तेव्हढ्यात बाहेर उजेड दिसला आणि कॉरिडॉरच्या बाजूने त्यांच्या पावलांचा आवाज ऐकू आला. ''बहुतेक तेच असावेत, आणखी काही वेगळे भयंकर नसेल'' मी विचार केला.

तेव्हा मिस्टर रोचेस्टरनी उदास चेहऱ्याने प्रवेश केला.

ड्रेसिंग टेबलवर मेणबत्ती ठेवत ते म्हणाले, ''मी सर्वकाही शोधून काढले आहे; मला नेमकं जे वाटले तेच होते.''

''नेमके काय, सर?''

त्यांनी उत्तर दिले नाही; पण, हाताची घडी घालून जमिनीकडे पहात होते; शेवटी काही मिनिटांनंतर, त्यांनी चमत्कारिक स्वरात मला विचारले:

''तू तुझ्या बेडरूमचा दरवाजा उघडला तेव्हा तुला काही दिसले का?''

''नाही, सर, फक्त मेणबत्ती.''

a

"पण तू जे विचित्र हसणे ऐकले; ते याआधी कधी ऐकले होते काय? किंवा किमान त्याच्यासारखे काहीतरी?"

"होय, सर, इथे ग्रेस पूल नावाची एक स्त्री आहे, जी तशी हसते; ती विचित्र आहे, असे मी ऐकले आहे."

"होय, ग्रेस पूल; आपण अंदाज केला तो बरोबर आहे; ती विचित्र आहे, जसे तू म्हणतेस आणि नुकतेच जे घडले त्यावर मी विचार करेन; दरम्यान, या प्रकरणाचे तपशील फक्त तुला आणि मला माहीत आहेत. त्याबद्दल कोणाबरोबर कधीही बोलू नको; मी हे सर्व नंतर समजावून सांगेन, असे म्हणत त्यांनी अंथरुणाकडे इशारा केला. आपल्या खोलीत परत जा; माझ्यासाठी, लायब्ररीचा पलंग रात्रीच्या विश्रांतीसाठी पुरेसा असेल. चार वाजले आहेत; दोन तासात नोकर उठतील."

"म्हणून, गुड नाईट, सर," मी उठून म्हणाले.

त्यांनी मला स्वतःहून निघून जाण्यास सांगितले होते तरीही ते आश्चर्यचकित झाल्याचे दिसत होते.

"काय!" ते ओरडले, "तू आधीच मला सोडून जात आहेस आणि अशा प्रकारे?"

"तुम्ही मला सांगितले की मी करू तसे शकते, सर."

"पण असे नाही, निरोप न घेता, माझ्याशी एक शब्दही न बोलता, इतक्या कोरडेपणाने आणि थोडक्यात. तू माझे प्राण वाचवले आहेस ; तू मला भयंकर मृत्यूपासून वाचवले आहेस, आणि आता अनोळखी असल्यासारखे मला सोडून जात आहेस; निदान मला हँडशेक तरी करू देत."

त्यांनी माझ्याकडे हात पुढे केला; मी त्यांना माझा हात दिला, जे त्यांनी प्रथम त्यांच्या एका हातात हात घेतला, नंतर तो दोन्ही हातानी धरला.

"तू माझा जीव वाचवलास, मला तुझे ऋणी असण्याचा आनंद आहे; मी अधिक काही बोलू शकत नाही. इतर कोणी माझ्यावर असे उपकार केले असते, तर मला त्याचे ओझे वाटले असते; पण तुझी गोष्ट वेगळी आहे. जेन, मला तुझ्या उपकाराचे ओझे वाटत नाही."

त्यांनी थांबून माझ्याकडे पाहिले; त्यांचे ओठ थरथरत आणि त्यांचा आवाज भरून आला होता.

"पुन्हा एकदा, गुड नाईट, सर; यासाठी उपकार, कर्ज, दायित्व अथवा बंधन समजण्याची आवश्यकता नाही."

ते पुढे म्हणाले, "मला माहीत होतं, एक ना एक दिवस तू माझं भलं करशील; मी पहिल्यांदा तुझ्याकडे पाहिलं तेव्हा तुझ्या डोळ्यात ते दिसलं. त्यातील अभिव्यक्ती आणि स्मित हे विनाकारण नाही…" ते थांबले, मग पटकन पुढे म्हणाले: "हे माझ्या हृदयात खोलवर जाणवले. लोक ज्या नैसर्गिक सहानुभूती आणि चांगल्या अलौकिक बुद्धिमत्तेबद्दल बोलतात, ते तुझ्या रूपात सत्यात उतरले आहे. तू माझी रक्षणकर्ती झालीस, धन्यवाद, गुड नाईट!"

त्याच्या आवाजात एक विलक्षण ऊर्जा आणि डोळ्यात अनोखी चमक होती.

"मला जाग आली याबद्दल आनंद वाटत आहे," असे म्हणून मी परत निघाले.

"काय, तू निघालीस?"

"हो खुप थंडी आहे, सर."

"हे खरे आहे, आणि तू पाण्यात उभी आहेस; मग जा, जेन जा!"

पण तरीही त्यांनी माझा हात धरून ठेवला होता आणि मी सोडवून घेऊ शकले नाही. मी एक उपाय केला.

a

मी म्हणाले, “मला असे वाटते की, सर,” मी मिसेस फेअरफॅक्स येत असाव्यात.”

“मग मला सोड.” त्यांनी पकड सैल केली आणि मी माझ्या खोलीकडे निघाले.

मी माझ्या पलंगावर परतले, पण आता झोप उडाली होती.

खवळलेल्या समुद्रात मी तरंगत होते, मोठ्या लाटांचे संकट अंगावर आदळत असताना, आतून आनंद तरंग उठत होते. काहीवेळा या उसळलेल्या लाटांच्या मधून, दूरवर समुद्र किनाऱ्याजवळ बियूलाचा डोंगर दिसत होता. वेळोवेळी आशेने जागृत झालेल्या माझ्या मनाला, ताजेतवाना वारा, मला माझ्या ध्येयाकडे विजयीपणे पोहोचवण्याचा प्रयत्न करत होता. पण मी तिथवर पोहोचू शकले नाही, अगदी कल्पनेत सुध्दा नाही. शेवटी मी कंटाळून गेले.

विरुद्ध दिशेने येणाऱ्या वाऱ्याने मला किनाऱ्यापासून मागे ओढले आणि परत एकदा लाटांच्या मध्यभागी ढकलले.

तारतम्यभाव, बुध्दीविभ्रमाच्या विरोधात उभा ठाकला होता: सूज्ञबुध्दी मोह, अभिलाषा यांच्यापासून सावध करायचा प्रयत्न करत होती. अस्वस्थतेमुळे विश्रांती मिळणे अशक्य झाले आणि पहाट होताच मी उठले.

# प्रकरण 16

शेवटी एकदा ती भयंकर रात्र संपली, दुसऱ्या दिवशी मला रोचेस्टरना भेटण्याची आतुरता लागून राहीली होती, मला त्यांचा आवाज ऐकायचा होता, पण त्यांच्या नजरेला नजर मिळवण्याची भीती वाटत होती. सकाळपासून मी क्षणोक्षणी त्यांच्या येण्याची वाट पाहत होते. अनेकदा ते अभ्यासाच्या खोलीत येत नसेत, पण कधी-कधी तिथे येणे होत असे आणि मला वाटले की त्या दिवशी ते भेट देतील.

पण सकाळ नेहमीप्रमाणे निघून गेली; अँडेलच्या अभ्यासात व्यत्यय आला नाही. दुपारच्या जेवणानंतर मी मि. रोचेस्टरच्या खोलीच्या बाजूने आवाज ऐकू आले; मिसेस फेअरफॅक्स, लेआ आणि इतर मंडळी बोलत होती, "देवाची कृपा, नशीब मालकांचा पलंग जळला नाही!, रात्री मेणबत्ती जळत ठेवणे नेहमीच धोकादायक असते. तरी बरे, पाण्याचे घडे भरलेले होते आणि त्यांच्या लक्षात आले म्हणून आग विझवता आली! परंतु त्यानी कोणालाच का उठवले नाही? आशा आहे की लायब्ररीत झोपल्याने त्यांना सर्दी झाली नसेल!"

या बोलण्यानंतर मंडळी सर्व आवराआवर करायला लागली. मी जेवायला खाली आले, तेव्हा बेडरूमचा दरवाजा उघडा होता आणि मी पाहिले की, खराब झालेले पलंगाचे पडदे काढलेले होते; लेआ खिडक्यांच्या धुराच्या काळया कडा धुण्यात व्यस्त होती; मी त्यांच्याशी बोलण्यासाठी पुढे आले, कारण मला मिस्टर रोचेस्टरनी त्यांना दिलेले स्पष्टीकरण जाणून घ्यायचे होते; पण जेव्हा मी जवळ गेले, तेव्हा मला दुसरी एक व्यक्ती दिसली: ती पलंगाच्या जवळ बसली होती आणि पडद्यांच्या रिंग शिवण्यात व्यस्त होती. मी ग्रेस पूलला ओळखले.

ती तिथे होती, नेहमीप्रमाणेच शांत, तपकिरी रंगाचा ड्रेस, ऍप्रन, पांढरा रुमाल आणि बोनेट घातलेले होते. ती तिच्या कामात पूर्णपणे गुंतलेली दिसत होती; तिच्या चेहऱ्यावर नेहमीप्रमाणे अलिप्त भाव होते पण कुठेही अपराधीपण अथवा हताशपण दिसले नाही. तिने खुनाचा प्रयत्न केला होता, भले सावज वाचले होते, पण त्यांनी तिला भेटून तिच्या गुन्हाचा जाब विचारला होता अशी माझी समजूत होती. मी तिच्याकडे पहात असतांना तिने मान वर करून माझ्याकडे पाहिले, नेहमीप्रमाणे भावशून्य डोळे दिसत होते, ना त्यात गुन्हाची जाणीव ना गुन्हा उघडकीस येण्याची भीती दिसत नव्हती.

नेहमीप्रमाणेच मला बघून म्हणाली, “हँलो मिस”, आणि दुसरे अंगुली त्राण घालून शिवणकाम सुरू ठेवले.

मी तिची परिक्षा घ्यायचा विचार केला. कारण ती इतकी अभेद्य कशी आहे हे मला समजत नव्हते, “हॅलो, ग्रेस,” मी म्हणाले, “इथे काही घडले आहे काय? आताच मी नोकरांचे बोलणे ऐकले.”

“काल रात्री मालक मेणबत्तीच्या उजेडात वाचत होते. झोपताना मेणबत्ती तशीच पेटती राहिली आणि वाऱ्याच्या झोताने पडद्यांना आग लागली. सुदैवाने पलंगपोस, चादरी पेटण्यापुर्वीच ते जागे झाले आणि आग विझवण्यात त्यांना यश आले.”

“हे विचित्र आहे,” मी तिच्याकडे स्थिरपणे पाहत म्हणाले, “पण मिस्टर रोचेस्टरनी कुणाला जागं केलं नाही का? त्याची हालचाल कोणी ऐकली नाही का?”

तिने माझ्याकडे पाहिले, आणि यावेळी तिच्या चेहऱ्यावरचे भाव बदलले होते; तिने माझ्याकडे लक्षपूर्वक पाहिले आणि नंतर उत्तर दिले: “नोकर दूर झोपत असतात, मिस त्यामुळे, त्यांना ऐकू येणे शक्य नव्हते. तुमची आणि मिसेस

फेअरफॅक्सची खोली, सर्वात जवळ आहे; मिसेस फेअरफॅक्स म्हणाल्या की त्यांनी काहीही ऐकले नाही; जेव्हा आपण म्हातारे होतो तेव्हा आपल्याला अधिक झोप येते."

ती थांबली, मग तिने बेफिकीरपणे, खोचक स्वरात प्रश्न केला:

"पण मिस तुम्ही तरुण आहात, तुमची झोप सावध असेल; कदाचित तुम्ही काही आवाज ऐकलात?"

"होय, लेआला ऐकू येऊ नये म्हणून मी हळू आवाजात उत्तर दिले, जी अजूनही फरशा धुत होती: मी आवाज ऐकला, मला सुरुवातीला वाटले की तो पायलट आहे; पण पायलट हसत नाही, आणि मला खात्री आहे की मी खूप विचित्र हसणे ऐकले."

तिने एक नवीन धागा घेतला मेणाला घासून स्थिर हातांनी सुईमध्ये ओवला, शांतपणे माझे निरीक्षण करून म्हणाली, "माझा तर विश्र्वास बसत नाही की अशा वेळी मालक हसतील यावर, ते तर संकटात होते; तुम्ही ते स्वप्नात पाहिले असेल."

"नाही!" मी पटकन उत्तर दिले; कारण या बाईच्या थंडपणाने मला राग आला होता.

तिने पुन्हा माझ्याकडे एक टक लावून पाहिलं. "तुम्ही हसताना ऐकल्याचं मालकाना सांगितलं का?" तिने विचारले.

"आज सकाळी मला त्याच्याशी बोलण्याची संधी मिळाली नाही."

"तुम्ही तुमचा दरवाजा उघडण्याचा आणि कॉरिडॉरमध्ये डोकावून पाहण्याचा विचार केला नाही?"

तिने माझी उलटतपासणी चालवली होती. माझ्याकडून माहिती काढण्याचा तिचा प्रयत्न चालला होता. जर तिच्या लक्षात आले की, मला तिचा गुन्हा माहित

a

आहे किंवा तिच्यावर संशय आहे, तर ती बदला जरूर घेईल; म्हणून सावध राहणे मला इष्ट वाटले.

"उलट," मी उत्तर दिले, "मी कडी घट्ट लावली."

"म्हणजे तुम्हाला झोपायच्या आधी कडी लावायची सवय नाही?"

"दुष्ट शत्रू! मला वाटते; तिला आणखी घातक योजना आखण्यासाठी माझ्या सवयी जाणून घ्यायच्या असाव्यात."

त्यामुळे सावधगिरीऐवजी संताप उफाळून आला. तीव्रपणे मी म्हणाले, "आतापर्यंत मी अनेकदा ही खबरदारी घ्यायला विसरले आहे, कारण त्याची गरज नाही, असा माझा विश्वास होता. थॉर्नफिल्डमध्ये काही धोका आहे असे मला वाटत नव्हते. पण भविष्यात, "प्रत्येक शब्दावर जोर देत मी म्हणाले, "मी यापुढे, माझ्या सुरक्षिततेची पूर्ण काळजी घेईन."

"तुमचे बरोबर आहे," तिने उत्तर दिले. आजूबाजूचा परिसर शक्य तितका शांत आहे, आणि वाडा बांधल्यापासून मी कधीही चोरांबद्दल ऐकले नाही; आणि तरीही आपल्याला माहित आहे की येथे मोठ्या प्रमाणात चांदीची भांडी आहेत; आणि एवढ्या मोठ्या घरासाठी तुम्ही पाहाल तर नोकर फारच कमी आहेत, कारण आमचे मालक इथे क्वचितच राहतात आणि त्याचे लग्न झालेले नाही त्यामुळे गोतावळा पण काही नाही.

जेव्हा केव्हा ते इथे असतात, तेव्हा ह्या गोष्टींकडे त्यांचे फारसे लक्ष नसते. म्हणून आपण सावध राहणे केव्हाही चांगले; दरवाजा घट्ट बंद करून कडी कुलप लावणे इष्ट आहे. अनेकजण देवावर हवाला ठेवून स्वस्थ बसतात, पण मला असे वाटते की आपल्या सुरक्षिततेची काळजी आपणच घेतली पाहिजे आणि जे शहाणपणाने वागतात त्यांना देवाचा आशीर्वाद मिळतो."

इथे तिने वरपांगी काळजी दाखवणारे, पांडीत्यपूर्ण प्रवचन बंद केले.

ग्रेस पूलचे दांभिकपणाचे बोलणे ऐकून मी अवाक झाले. किती सफाईने तिच्या विरोधात जाणाऱ्या सर्व गोष्टी खोडून काढल्या होता. एकंदरीत तिने स्वतः वर आणि परिस्थिती वर पूर्ण नियंत्रण ठेवले होते.

तेव्हढ्यात स्वयंपाकघरातील नोकराणी तिला जेवणाविषयी विचारायला आली.

"मिसेस पूल," ती ग्रेसला उद्देशून म्हणाली, "नोकरांचे जेवण लवकरच तयार होईल: तुम्ही खाली याल का?"

"नाही; फक्त एका ट्रे वर एक पाइंट बियर आणि थोडे पुडिंगचा घेऊन या."

"तुम्हाला काही मांस आवडेल का?"

"होय, थोडे मांंस आणि थोडे चीज, चालेल."

"आणि पुडींग वगैरे?"

"मला आता त्याची गरज नाही; मी चहाच्या वेळेपूर्वी खाली येईन आणि ते स्वतः करेन."

नंतर नोकराणी, माझ्याकडे वळली आणि मला म्हणाली की मिसेस फेअरफॅक्स तुमची वाट पाहत आहेत. मग मी खोलीतून बाहेर पडले.

जेवणाच्या वेळी मिसेस फेअरफँक्सचे आदल्या रात्रीच्या अग्नीकांडा संदर्भातील बोलण्याकडे माझे बिल्कुल लक्ष नव्हते. ग्रेस पूलच्या गूढ,अनाकलनीय व्यक्तिरेखेचे कोडे सुटता सुटत नव्हते. मुख्य म्हणजे थॉर्नफिल्डमध्ये तिचे नेमके स्थान काय आहे हे समजत नव्हते. तिला तिच्या प्रमादाबद्दल मिस्टर रोचेस्टरनी शिक्षा का केली नाही? निदान नोकरी वरून तरी काढून टाकायला हवे होते.

ती आगीसाठी दोषी आहे हे आदल्या रात्री, त्यांनी माझ्याकडे उघड केले होते: असे कोणते रहस्यमय कारण असू शकेल की जे त्यांना तिचा गुन्हा उघड करण्यापासून रोखू शकते? त्यांनी मला कसलीही वाच्यता न करण्याविषयी का

सुचवले होते? ते नक्कीच विचित्र नव्हते का? एक गर्विष्ठ, बेपर्वा आणि बदला घेणारा जमीनदार, त्याच्या क्षुल्लक नोकराणीच्या आहारी तर गेला नव्हता? अगदी तिने त्याचा जीव घेण्याचा प्रयत्न केला, तरी त्याने शिक्षा तर दूरची गोष्ट राहिली, आरोप करण्याचे धाडस सुध्दा केले नाही.

जर ग्रेस तरुण आणि सुंदर असती, तर माझा असा समज झाला असता की, तिच्या बाबतीत न्याय करताना सारासार बुद्धी अथवा भीतीपेक्षा, मिस्टर रोचेस्टर, काही नाजुक संबंधात गुंतलेले असण्याची शक्यता वाटली असती. पण ग्रेसकडे पाहताच हे अनुमान अशक्य आहे असे जाणवले. आणि तरीही मी विचार करू लागले. ती कधीकाळी तरुण होती, तेव्हा मिस्टर रोचेस्टर पण तिच्याच वयाचे असतील; मॅडम फेअरफॉँक्स म्हणाल्या होत्या, की ती वाड्यात बऱ्याच काळापासून रहात होती; ती कधीच सुंदर नसावी, पण सुदृढ, मजबूत आणि स्वतंत्र विचारांची व्यक्तिमत्व असणारी व्यक्ती होती. मिस्टर रोचेस्टरला विक्षिप्तपणाची आवड होती आणि ग्रेस पण नक्कीच विक्षिप्त होती. कदाचित नादिष्टपणामुळे, बेदरकार स्वभावाने त्यांचे, या स्त्री बरोबर संबंध आले असतील; आणि आता ती त्यांच्या अविवेकीपणाचा गैरफायदा घेत असेल, म्हणून त्यांनी त्याची वाच्यता करणे टाळले असावे. पण त्या क्षणी ग्रेसचा चौकोनी, लठ्ठ, कुरूप, कठोर चेहरा माझ्या डोळ्यांसमोर आला आणि मी स्वतःला म्हणाले: “नाही, माझी कल्पना चुकीची आहे! आणि” माझ्या अंतर्मनाने मला एक प्रश्न विचारला, “तू तरी कुठे सुंदर आहेस?, तरीही रोचेस्टर तुला पसंत करतात, याची तुला वेळोवेळी खात्री पटली आहे; कालची रात्र आठव, त्यांचे शब्द, त्यांची नजर, त्यांचा आवाज!”

मला सगळं आठवलं; ते शब्द, ती नजर, तो आवाज, परत एकदा सर्व स्पष्टपणे साकार झाले. आम्ही अभ्यासाच्या खोलीत होतो; अँडेल चित्र काढत होती;

a

मी वाकून तिला पेन्सिल धरण्यासाठी शिकवत होते; तिने अचानक माझ्याकडे पाहिले.

"काय झालंय तुला, मिस?" ती म्हणाली ; तुझी बोटे पानांसारखी थरथरत आहेत आणि तुझे गाल चेरीसारखे लाल झाले आहेत."

"मला गरम होत आहे, ॲडेल, आणि मी खाली वाकले होते. "

ती काम करत राहिली आणि मी विचारमंथन करत राहिले.

मी ग्रेस पूलच्या संबधी मनात आलेला तिरस्करणीय विचार, घाईघाईने माझ्या मनातून काढून टाकला; त्या विचाराने मी अस्वस्थ झाले होते. मी तिची, माझी तुलना केली आणि आढळून आले की आम्ही दोघी वेगळ्या आहोत. बेसीने मला सांगितले की मी एक सभ्य कुलीन स्त्री दिसते आणि ते खरे होते. मी सभ्य स्त्री आहे. बेसीने मला पाहिले तेव्हापेक्षा मी आता जास्त चांगली दिसत होते. लोवुडपेक्षा माझी तब्बेत सुधारली होती, रंग अजून उजळून निघाला होता, चैतन्याला नवनवीन धुमारे फुटत होते; कारण मला माझ्या उज्वल भवितव्याची खात्री वाटत होती आणि मी आनंदी रहायला शिकत होते.

"रात्र होत आली," मी खिडकीकडे बघत स्वतःशीच म्हणाले; मी दिवसभरात ना मिस्टर रोचेस्टरच्या पाऊलखुणा ऐकल्या ना त्यांचा आवाज; पण आज संध्याकाळी मी त्यांची नक्की भेट होईल."

सकाळी मला भेट घेण्याची भीती वाटत होती, पण आता मला ती हवी होती. इतकी वेळ वाट पाहून मी अधीर झाले होते.

a

जेव्हा अंधार पडला आणि ॲडेल सोफीसोबत खेळायला गेली, मी मोकळी झाले, माझी इच्छा शिगेला पोहोचली होती; मला दारावरची बेल ऐकू येईल आणि मला खाली येण्यासाठी निरोप द्यायला, लेआ येईल या आशेवर राहिले होते. मिस्टर रोचेस्टरच्या पावलांच्या आवाजाचा भास झाला आणि माझी नजर दरवाजाकडे वळली; वाटले की मिस्टर रोचेस्टरला आता दार उघडून आत येतील; पण दार बंदच राहिले. अजून फार उशीर झालेला नव्हता; अनेकदा त्यांनी मला सात/आठ वाजता बोलावले होते, आणि आता तर अजून सहा सुध्दा वाजलेले नव्हते. मला त्यांना खूप काही सांगायचे होते, ग्रेस पूलबद्दल बोलायचे होते, ते मला काय उत्तर देतात, ते पाहायचे होते. मला त्यांना स्पष्टपणे विचारायचे होते की काल रात्रीचे कृत्य तिनेच केले असावे असे त्यांना पक्के वाटते काय? आणि जर असेल तर ते त्यांनी उघडकीस का आणले नाही? माझ्या या चौकशीने ते चिडतील, याची मला फारशी चिंता नव्हती; त्यांना कसे शांत करायचे हे आता मला कळाले होते; आणि त्यात मला आनंद वाटत होता, कोणताही वाद अगदी टोकापर्यंत नेणे मी माझ्या अंतःप्रेरणेने टाळत असे; मी कधीही त्यांना चिथावणी देण्याचे धाडस केले नाही, परंतु माझ्या कौशल्याने मला शक्य तितके त्यांना उत्तर देण्यासाठी भाग पाडत असे. प्रत्येक क्षणी, त्यांचा आदर राखून, स्वतः योग्य त्या मर्यादांचे पालन करून, भीती न बाळगता, मुक्तपणे, मला जे योग्य वाटेल, त्याबाबत प्रतिवाद करू शकत होते प्रसंगी विरोधही करू शकत होते. अशा प्रकारच्या युक्तिवादासाठी आम्ही दोघे अनुकूल होतो.

जिन्याच्या पायऱ्यांवर आवाज ऐकू आला, आणि लेआ आत आली, मला निरोप देण्यासाठी की मिसेस फेअरफॅक्सच्या खोलीत चहा दिला तयार आहे; मी तिथं गेले, उतरताना आनंद वाटत होता, कारण मला असं वाटत होतं की मी मिस्टर रोचेस्टरच्या जवळ चालले आहे.

“तुला तुमच्च्या चहाची गरज आहे,” मी आत जाताच त्या म्हणाल्या; तू खुपच कमी जेवण केलेस! मला भीती वाटते, की आज तुझी तब्येत ठीक नसावी: तुला ताप आहे काय?”

“छे ! मी उत्तम आहे, मी कधीही झालेले नाही.”

“बरं, मग, चांगली भूक पण लागली असेल; मी हे विणकाम पूर्ण करते तोपर्यंत, चहा ओतसेस का?”

त्यांचे काम संपल्यावर, त्यांनी उठून दार बंद केले, जे दिवसा उजेडासाठी उघडे ठेवले जात असे, अंधार पडला होता.

“चांदणे नसले तरी हवामान ठीक आहे,” खिडकीतून बाहेर पाहत त्या म्हणाल्या; मिस्टर रोचेस्टरनी त्यांच्या सहलीसाठी चांगला दिवस निवडला.

“म्हणजे, मिस्टर रोचेस्टर गावी गेले आहेत? मला यातले काहीच माहीत नव्हते!”

“मि. रोचेस्टर, दुपारच्या जेवणानंतर थेट मिलकोट पासून दहा मैलांवर असलेल्या मिस्टर एश्टनच्या वाड्याकडे जाण्यासाठी निघाले. मला विश्वास आहे की लॉर्ड इंग्राम, सर जॉर्ज लिन, कर्नल डेंट आणि इतर अनेक लोक तिथे जमले असले असतील.”

“आज रात्री परतणार आहेत काय?”

“छे! नाही, उद्याही नाही; मला वाटतं ते तिथे किमान आठवडाभर तरी राहतील. जेव्हा उच्चभ्रू, प्रतिष्ठित लोक एकत्र येतात तेव्हा त्यांच्या सभोवताली उत्साह, उत्कृष्ट अभिरुचि आणि मनोरंजनाच्या वेगवेगळ्या विषयांची इतकी रेलचेल

a

असते, की त्यांना वेगळे होण्याची घाई नसते; म्हणून मुद्दाम असे कार्यक्रमांचे आयोजन केले जाते: मिस्टर रोचेस्टर गोष्टींमध्ये तरबेज आहेत त्यामुळे, ते तेथे खूप लोकप्रिय आहेत. विशेषतः अनेक स्त्रिया त्यांच्या चाहत्या आहेत, रोजेस्टरना पाहून असे वाटत नाही की ते स्त्री वर्गात इतके लोकप्रिय असतील, पण मला वाटते, त्यांनी संपादन केलेले सामर्थ्य, कौशल्य अथवा त्यांची संपत्ती, उच्च घराणे यामुळे, दिसण्यातील थोड्याफार उणीवा मागे पडतात.”

“आणि त्या वाड्यात काही स्त्रिया आहेत का?”

“होय, मिसेस एश्टन आणि त्यांच्या तीन मुली, खरोखरच मनमोहक आहेत, मिस ब्लाँचे आणि मेरी इंग्राम, ज्या माझ्या मते खूप सुंदर आहेत. मी ब्लाँचे यांना सहा, सात वर्षांपूर्वी पाहिले; तेव्हा ती अठरा वर्षांची होती, आणि मिस्टर रोचेस्टरनी दिलेल्या ख्रिसमस पार्टीसाठी आली होती. आह! त्या दिवशी, जेवणाचे खोली मोठ्या प्रमाणात सजवलेली होती आणि दिव्याचा लखलखाट होता. मला आठवते की बॉल डान्ससाठी, सरदार, जमीनीदार कुटुंबातील पन्नास स्त्रिया आणि पुरुष होते.”

“तुम्ही म्हणता की तुम्ही तिला पाहिले आहे, मिसेस फेअरफॅक्स. ती कशी आहे?”

“होय, मी तिला पाहिले आहे; जेवणाच्या खोलीचे दरवाजे उघडे होते, आणि ख्रिसमसचा दिवस असल्याने नोकरांना, नाच गाणे ऐकण्यासाठी मोठ्या हॉलमध्ये एकत्र येण्याची परवानगी होती. मिस्टर रोचेस्टरनी मला आत बोलावले, मी एका कोपऱ्यात शांतपणे बसले होते. मी माझ्या आजूबाजूला पाहिले; यापेक्षा सुंदर देखावा मी कधीच पाहिला नाही! स्त्रियांनी अत्यंत सुंदर वस्त्रे परिधान केली होती, त्याला शोभेतील असे दागदागिने, मला सर्वजणी खूप सुंदर वाटत होत्या; पण मिस इंग्राम नक्कीच पार्टीची राणी होती.”

“आणि ती कशी होती?”

“उंच, सडपातळ कंबर, झुकणारे खांदे, लांब आणि देखणी मान, निमगोरा रंग, उमदे व्यक्तीमत्व, मिस्टर रोचेस्टरसारखे मोठे काळे डोळे आणि त्यात हिऱ्यांसारखी चमक. तिने सुंदर काळया केसांची कलात्मकपणे केशभूषा केली होती; समोर कुरळया बटा. तिने शुभ्र पांढरा पोशाख घातला होता; तिने अंगावर तांबूस-रंगाचा स्कार्फ पांघरुन, खांद्यावरून मागे सोडला होता. गुडघ्यापर्यंत लांब झालर पसरली होती. तिचे केस फुलांनी सुशोभित केले होते.”

“तिची चांगलीच प्रशंसा झाली असेल?”

“अरे हो ! आणि केवळ तिच्या सौंदर्यासाठीच नाही तर तिच्या प्रतिभेसाठी देखील, कारण तिने मिस्टर रोचेस्टरसोबत युगल गीत गायले.”

“मिस्टर रोचेस्टर! गातात हे मला माहीत नव्हते.”

“अहो! त्यांचा खर्जातील आवाज खूप सुंदर आहे आणि त्यांना संगीताची खूप आवड आहे.”

“आणि मिस इंग्रामचा आवाज कोणत्या प्रकारचा आहे?”

“एक अतिशय पूर्ण आणि शक्तिशाली आवाज; तिने वाखाणण्याजोगे गायले, आणि तिचे गाणे ऐकून खूप आनंद झाला. मग तिने पियानो वाजवला; मला याबद्दल काही कळत नाही, पण मी रोचेस्टरनी म्हणताना ऐकले तिने अतिशय उल्लेखनीय पद्धतीने ते सादर केले.”

“आणि ही तरुण मुलगी, इतकी सुंदर आणि हुशार, अजून लग्न झालेली नाही?”

“असे दिसत नाही; मला विश्वास आहे की तिला किंवा तिच्या बहिणीला फारशी संपत्ती मिळाली नाही; सर्वात मोठ्या मुलाला त्यांच्या वडिलांच्या संपत्तीचा वारसा मिळाला.”

a

"पण मला आश्चर्य वाटतं की कोणीही कुलीन माणूस तिच्या प्रेमात पडला नाही, उदाहरणार्थ, मिस्टर रोचेस्टर; ते तर श्रीमंत आहेत, नाही का?"

"अरे! होय; पण वयात खूप फरक आहे. मिस्टर रोचेस्टर जवळजवळ चाळीस वर्षांचे आहेत आणि ती फक्त पंचवीस वर्षांची आहे."

"त्याने काय फरक पडतो? अशी लग्ने दररोज होतात जिथे आपण दोन जोडीदारांमधील वयातील फरक पाहतो."

"हे खरे आहे; तथापि, मिस्टर रोचेस्टरनी अशी कल्पना कधी केली असेल यावर माझा विश्वास नाही. पण तू काहीही खात नाहीस, तू चहा सुरू केल्यापासून तुझा टोस्ट चाखला नाहीस."

"मला खायला नको, खूप तहान लागली आहे; कृपया मला आणखी एक कप चहा द्याल का?"

मी मिस्टर रोचेस्टर आणि सुंदर ब्लाँच यांच्यातील विवाहाच्या संभाव्यतेबद्दल पुन्हा बोलणार होते, तेव्हा ॲडेल आत आली, ज्यामुळे आम्हाला आमच्या संभाषणाचा विषय बदलण्यास भाग पाडले.

मी एकटी होताच, मिसेस फेअरफॅक्सने मला रोजेस्टर संबंधी जे सांगितले होते ते मी माझ्या मनात घुमत राहिले; मी माझ्या अंतःकरणात डोकावून पाहिले, मी माझे विचार आणि माझ्या भावना तपासल्या आणि माझे मन, जे कल्पना विश्वात रमून इतरत्र भरकटले होते, त्याला खंबीरपणे विवेकाच्या मार्गावर परत आणण्याचा प्रयत्न केला.

माझ्या स्वतःच्याच, न्यायालयात, वकील मंडळींसमोर बोलावून आरोपपत्र वाचून दाखवले गेले.

स्मरणशक्तीने आपले पुरावे सादर केले: आशा, इच्छा, भावना ज्या कालच्या रात्रीपासून मनात उमलल्या होत्या; गेल्या पंधरा दिवसात, माझ्या मनाने

a

ज्याला जास्त अनुकूलता दाखविली, त्यालाच सत्य म्हणून स्विकारण्याच्या, मनाचा कौल.

आणि तर्कशक्तीने दुसरी बाजू मांडली: अगदी शांतपणे,स्पष्ट शब्दात, कोणत्याही मुलाम्याशिवाय घडलेल्या गोष्टी, जशा ज्या तशा मांडल्या.

सारासार विचार करता, मी सत्य नाकारल्याचे दिसत होते. थोडक्यात, विवेक नष्ट झाल्याने, भावनेच्या आहारी जाऊन मी आदर्शाला मुठमाती दिली होती.

मग मी माझा निकाल जाहीर केला आणि घोषित केले:

या जगात जेन आयरपेक्षा मुर्ख कोणी दुसरी व्यक्ती नाही: त्याहीपेक्षा चमत्कारिक गोष्ट ही की, खोटे बोलून तिने, स्वतःची नुसती फसवणूकच केली नाही, तर अमृत म्हणून विष प्राशन केले आहे.

"तू," मी स्वतःला उद्देशून म्हणाले, "मि. रोचेस्टराची आवडती आहेस? त्यांना खुश करण्याची शक्ती तुझ्याकडे आहे? त्यांच्यासाठी तू महत्वाची आहेस? मला तुझ्या या वेडेपणाची कीव येते! एका सदगृहस्थांनी,

आपली आश्रीत असलेल्या, अनुनभवी मुलीला प्रसंगवशात क्वचित कधीतरी कौतुक केले, आपलेपणा दाखवला, तर त्याला प्रियाराधन समजून आनंदी झालीस? मूर्ख मुलगी! तुझी हिम्मत कशी झाली? तुला काडीमात्र अक्कल नाही! आज सकाळी, त्या गोष्टी आठवून, लाजत काय होतीस? खरं तर तुला लाज वाटली पाहिजे! काय तर म्हणे, त्यांनी तुझ्या डोळयाची तारीफ केली, जरा डोळे उघडून बघ, तुझ्याशी लग्न करण्याचा इरादा नसलेल्या वरिष्ठाकडून खुशामत होणे हे तुझे दुर्दैव आहे. प्रेमाची परिणीती, दुसऱ्या व्यक्तीचे प्रेम मिळवण्यात होत नसेल आणि जे कधी प्रगट करणे शक्य नसेल, तर असे प्रेम हा एक वेडेपणा आहे त्यामुळे सर्व आयुष्य बर्बाद होते. जर प्रेम उघड होऊन प्रतिसाद दिला गेला आणि विवाह झाला नाही, तर बेअब्रूच्या दलदलीत कायमचे रुतणे नशिबी येते.

a

“जेन आयर, आता आपली शिक्षा ऐक: उद्या आरशासमोर बसून स्वतःचे एक चित्र काढ; अगदी सचोटीने, स्वतःतील वैगुण्ये सौम्य न करता: कडवटपणा वगळू न देता, अप्रिय दोष झाकून न टाकता; त्या चित्राखाली खाली लिही, ‘एक गोंधळलेली, गरीब, सामान्य गव्हर्नेस.'

तुझ्या ड्रॉईंग बॉक्समधील कागदावर मिसेस फेअरफॅक्सने तुला इंग्राम ब्लाँचचे वर्णन केल्याप्रमाणे, तुझ्या रंगफळीवर, स्वच्छ, ताजे आणि उत्कृष्ट रंग मिसळून, तुझी कल्पनाशक्ती पणाला लावून, अतिशय नाजुक रेषांनी, सर्वात मोहक चित्र काढ. रंगवण्यात साठी सर्वात शांत, गोड रंगछटांचा वापर करायला विसरू नको. काळे कुरळे केस आणि काळे डोळे विसरू नको.

काय, मिस्टर रोचेस्टरला मॉडेल म्हणून घेण्याचा विचार करत आहेस? नाही, चुकूनही नाही; चिडचिड नको, भावना दुखावल्या जाणे नको की खंतही नको. फक्त संकल्पाची जाणीव असू देत. सुसंगत आकृतीविशेष ध्यानात असू देत, ग्रीक देवतेसारखी मान आणि कंबर, सुंदर, गोल दिसणाऱ्या भुजा आणि नाजुक, कोमल हात; आणि हो, हिऱ्याची अंगठी आणि सोन्याचे ब्रेसलेट विसरु नको. आता पोशाखासंबंधी; नक्षीदार लेस वाला सॅटिनचा ड्रेस, डौलदार स्कार्फ आणि सोनेरी गुलाब यांचे रेखाटन आणि रंगकाम, अचूक असू देत.

त्या चित्राखाली खाली लिही, “इंग्राम ब्लाँच, कुशल तरुण मुलगी, उच्च घराण्यातील आहे.”

“आणि जर भविष्यात कधी तुझी पुन्हा, अशी कल्पना झाली की मिस्टर रोचेस्टर तुझ्याबद्दल विशेष विचार करत आहेत, तर ही दोन पोर्ट्रेट घे, त्यांची तुलना कर आणि स्वत:ला विचार: मिस्टर रोचेस्टर कदाचित, उच्च घराण्यातील या स्त्रीचे प्रेम जिंकतील, जर त्यांनी त्यासाठी प्रयत्न करायचे ठरवले असेल तर; ते या गरीब, सामान्य गव्हर्नेसचा गांभीर्याने विचार करणे तरी शक्यता आहे का?”

“हो ठीक आहे,” मी स्वतःशी कबूल केले, “मी हे दोन पोर्ट्रेट करेन.”

आणि, हा संकल्प केल्यावर, मी शांतपणे झोपी गेले.

मी माझा शब्द पाळला; माझ्या पोर्ट्रेटचे रेखाटन मी पेन्सिलने एक किंवा दोन तासात पुर्ण केले.

आणि एका पंधरवड्याहून कमी कालावधीत मी एका काल्पनिक ब्लाँच इंग्रॅमचे एक पेंटिंग पूर्ण केले: खूपच सुंदर चेहरा होता. जेव्हा मी दोन्ही चित्रांचे निरिक्षण केले, फरक ठळकपणे लक्षात येत होता, त्यामुळे मला जे अपेक्षित होते ते, माझ्या भावना नियंत्रित करणे शक्य झाले.

मला या कामाचा आणखी एक फायदा झाला: त्याने माझे डोके आणि हात कामात गुंतून राहिले.

माझ्या विचारांना बळ मिळून स्थिरता आली आणि माझ्या हृदयावर त्यांचा कायमचा ठसा उमटला.

मी माझ्या भावनांवर लादलेल्या या कडक शिस्तीचे, मला लवकरच बक्षीस मिळाले. त्यामुळेच मी नंतरच्या घटना शांतपणे सहन करू शकले; आणि जर मी त्यासाठी तयार नसते, तर कदाचित मी अगदी शांत राहू शकले नसते.

a

## प्रकरण 17

एक आठवडा गेला तरी, मि. रोचेस्टरांची काही खबरबात समजली नाही: दहा दिवस झाले तरी ते परत आले नाहीत. मिसेस फेअरफॅक्सने मला सांगितले की ते मि.एश्टनच्या वाड्यावरून परस्पर लंडनमार्गे अमेरिकेला जरी गेले, तरी ती आश्चर्याची गोष्ट असणार नाही. बऱ्याच ते ते असे अचानक वर्ष वर्षभर बाहेर असतात. त्यांचे असे बोलणं ऐकून मला एक विचित्र गारवा जाणवला आणि मला माझ्या हृदयाचा ठोका चुकला. माझी पुरती निराशा झाली होती.

मी माझे मनोबल वाढवण्यासाठी पुन्हा पुन्हा माझी तत्त्वे आठवून, मी स्वतःला सावरण्याचा प्रयत्न केला आणि लवकरच मी तात्पुरते का होईना माझी चुक सुधारण्यात यशस्वी झाले.

मि.रोचेस्टरनी कोठे जावे, कधी यावे यात मला स्वारस्य असण्याचे काहीच कारण नाही, पण हा विचार करतांना, मालक-नोकर या नात्याने माझ्याकडे कमीपणा येणार नाही याची काळजी घेतली; मी स्वतःला ठामपणे सांगितले की, “तुझा थॉर्नफिल्डच्या मालकांशी काहीही संबंध नाही; तुला तिथे गव्हर्नेस म्हणून काम केल्याचा पगार मिळतो, आणि तुझे काम तू योग्य रितीने केल्यावर त्यांच्या चांगुलपणास पात्र असेल त्याबद्दल तू कृतज्ञ असू शकतेस फक्त हे एकमेव कारण त्यांनाही मान्य आहे. त्यामुळे त्यांना, तुझ्या गोड भावना, तुझा आनंद, तुझ्या वेदना आणि अशा कोणत्याही गोष्टींचे प्रयोजन बनवू नको. त्यांची आणि तुझी बरोबरी होऊ शकत नाही, तू आपल्या पायरीने रहा, पण आपला आत्मसन्मान सोडू नकोस,

तुझ्या हृदयातील प्रेम, जिथे त्याची आवश्यकता नाही, जिथे ते तुच्छ समजले जाईल, अशा ठिकाणी उधळून टाकू नको,"

मी शांतपणे माझे कार्य चालू ठेवले, परंतु वेळोवेळी थॉर्नफिल्ड सोडण्याचा विचार मनात डोकावू लागला होता. नवीन नोकरी मिळवण्यासाठी काही मार्ग निघतो काय याची चाचपणी आपोआपच सुरू झाली; मला वाटले की या विचारांचा ओघ थांबवणे व्यर्थ आहे, "ठिक आहे, विचार करून जास्त काळजी करण्यात अर्थ नाही, वेळ आल्यावर त्यातून काहीतरी मार्ग नक्की निघेल."

सुमारे पंधरवडाभराने, मिस्टर रोचेस्टरचे पत्र,मिसेस फेअरफॅक्सला पत्र मिळाले.

"पत्रावरचा स्टँप मि. रोचेस्टरांचा आहे," स्टॅम्पकडे बघत त्या म्हणाल्या; "ते इकडे परत यातात की नाही हे आपल्याला कळेल."

त्यांनी सील तोडले आणि पत्र वाचत असताना, मी माझी कॉफी पीत होते; पत्र आल्याचे समजल्यावर, माझे हृदय जोराने धडधडू लागले, चेहरा लालेलाल झाला; थरथरत्या हातातून कपातील काँफी हिंदकळून अर्धी अधिक बशीत सांडली मात्र त्यासाठी, काँफी गरम असण्याचे कारण समजून मी इतर कसलाच विचार करण्याचे टाळले.

"कधीकधी माझी तक्रार असते की थाँर्नफिल्ड खूपच निवांत आहे," चष्म्यासमोर पत्र धरत मिसेस फेअरफॅक्स म्हणाल्या; पण आता काही दिवस खूप कामाचे असणार आहेत."

येथे मी कारण विचारण्याचे धाडस केले;

अँडेलचे कपडे सारखे करून तिच्या कपात दूध ओतत, मी थोड्या बेफिकीरपणे म्हणाले: "मिस्टर रोचेस्टर लवकर तर परत येणार नाहीत?"

a

“खरोखरच!,येत्या तीन दिवसांत, म्हणजे गुरुवारी इथे येत आहेत; आणि ते एकटे येत नाहीत: त्याच्यासोबत त्यांचा संपूर्ण मित्रपरिवार पण येत आहे. वाड्यातील सर्वात सुंदर खोल्या तयार करण्यास सांगितले आहे; लायब्ररी आणि लिव्हिंग रूमचीही स्वच्छता, दुरुस्ती करणे आवश्यक आहे. मिलकोट किंवा इतर ठिकाणाहून स्वयंपाकासाठी मदतीला माणसे बोलावून घ्यायला त्यांनी मला सांगितले आहे; स्त्रियांसोबत त्यांच्या सेविका असतील आणि सदगृहस्थ त्यांचे सेवक बरोबर आणतील; आता वाडा माणसांनी भरून जाईल.”

ऐवढे बोलून झाल्यावर, मिसेस फेअरफॅक्सनी जेवण केले आणि इतरांना ऑर्डर देण्यासाठी निघून गेल्या.

पुढच्या तीन दिवसात खरंच खूप काही कामे करायची होती. मला थॉर्नफिल्डच्या सर्व खोल्या खूप स्वच्छ आणि अतिशय व्यवस्थित दिसत होत्या; पण मी चुकले असे दिसले. वाड्यातील नोकराणींच्या मदतीसाठी तीन नवीन स्त्रिया आल्या होत्या; सर्व काही घासले पुसले गेले; भिंतीवरील फोटो, चित्रे खाली काढून स्वच्छ पुसून परत भिंतीवर टांगली गेली. गालिचे आपटून धूळ काढली गेली. आरसे आणि झुंबर पॉलिश केले गेले. सर्व खोल्यांमध्ये शेकोटीची व्यवस्था केली गेली आणि गाद्या गिरद्यांची धूळ झटकून टाकली. चादरी, पलंगपोस सर्व काही धुवून तातडीने वाळवण्याचा खटाटोप केला. काही वेळा चूलीसमोर चादरी वाळवल्या; मी असे काही मी यापूर्वी कधी पाहिले नव्हते. अँडेल पण सगळीकडे धावली पळत होती; तिला सर्व तयारीची गंमत वाटत होती. खूप लोक येणार आणि तिला बघणार याचा तिला खूप आनंद झाला होता. स्वतःचे जूने कपडे बाजूला ठेवून नवीन कपडे, दागिने, खेळणी याकडे सोफीने लक्ष घालावे म्हणून तिने सारखी भुणभूण चालवली होती. सारखे सारखे सर्व खोल्यांमध्ये जाऊन डोकावणे, पसरलेल्या घातलेल्या गाद्यांवर उड्या मारणे, दोरीवर वाळत घातलेल्या बेडशीट, चादरी मागे लपणे आणि

a

शेकोटीसमोर, उश्या एकामेकावर ठेवून मनोरा रचणे याशिवाय तिने इतर काहीही केले नाही. तिच्या शाळेला सुट्टी देण्यात आली होती: मिसेस फेअरफॅक्सनी मला त्यांच्या मदतीसाठी बरोबर घेतले होते. मी दिवसभर स्टोअर-रूममध्ये होते, त्यांना आणि स्वयंपाक्यांना मदत करत होते; मी कस्टर्ड आणि चीजकेक्स आणि फ्रेंच पेस्ट्री बनवायला शिकले होते, डेझर्ट-डिश सजवणे, पार्टीसाठी काही गमतीशीर खेळ योजून त्यांची तयारी करण्याची जबाबदारी माझ्यावर सोपविण्यात आली होती.

मि. रोचेस्टर, मित्रपरिवारासह गुरुवारी रात्रीच्या जेवणाची वेळी, म्हणजे सहा वाजता येणे अपेक्षित होते; या धामधुमीत मला पडलेल्या अनाकलनीय कोड्यांची उत्तरे शोधण्यास, मनात घोळत असलेल्या यक्षप्रश्नांचा विचार करण्यास अजिबात वेळ मिळाला नाही. त्यामुळे मी इतरांप्रमाणे कामात पुर्ण गुंतून गेले होते आणि त्यामुळेच की काय, अँडेलप्रमाणे मीही आनंदी होते. तथापि परत परत माझ्या आनंदाचा हिरमोड होई आणि शंका, दुश्चिन्हे, मला निराशाजनक अनुमान काढण्यास भाग पाडत असत. विशेषतः जेव्हा मी तिसऱ्या मजल्यावरच्या जिन्याचे दार उघडताना पाहिले. जे नेहमी बंद असायचे, दार उघडून ग्रेस पूल बाहेर आली, नेहमीचा तपकिरी ड्रेस, पांढरा एँप्रेन, टोपी आणि स्कार्फ पेहराव होता. ती शांतपणे, हळूहळू गँलरीकडे जाताना तिच्या पायातील चपलांचा आवाज ऐकू येत होता. बेडरूममध्ये स्वच्छतेची कामे सुरू होती, तेथे काम करणाऱ्या बाईशी तिला बोलताना मी ऐकले; बहुदा शेगडी किंवा धुरांड्याची चौकट, नीट साफ करून पाँलीश करण्यासाठी किंवा भिंतीवरील डाग स्वच्छ पुसून घेण्यासाठी ती सांगत असावी. ती दिवसातून एकदा खाली जेवणासाठी येत असे. शेकोटीजवळ थोडावेळ धुम्रपान करून, परत तिच्या अंधारलेल्या, एकाकी खोलीत परततांना तिच्या हातात बियरचे भांडे असे. चोवीस तासांपैकी फक्त एखादा तास ती इतर नोकर स्त्रियांबरोबर बोलण्यात घालवत असे, इतर वेळी दुसऱ्या मजल्यावरील, उतरत्या छपराच्या,

a

ओकच्या लाकडांनी बनवलेल्या खोलीत, अंधारकोठडीतील एखाद्या कैद्यासारखी एकटी बसून शिवणकाम करत असे, कदाचित त्यावेळीही स्वतःशी हसत असेल.

माझ्याशिवाय घरातल्या कुणालाही ग्रेसच्या या सवयींचे आश्चर्य वाटत नव्हते, ती तिथे काय करते याची, कोणालाच नीटपणे माहिती नसावे, तिच्या एकाकीपणाबद्दल कोणाला तिची दया येत नसावी.

त्या दिवशी लेआ आणि रोजंदारीवर काम करणाऱ्या बाई मधील बोलणे माझ्या कानावर पडले ; त्या दोघी ग्रेसबद्दल बोलत होत्या. लेआ प्रथम काय बोलली ते मी ऐकले नाही, पण रोजंदारीवर काम करणाऱ्या बाईने विचारले, “तिला चांगले पगार मिळतो, हे खरे आहे?”

“हो,” लेआ म्हणाली. मला पण तेव्हढा मिळावा, अशी माझी इच्छा आहे; मी तक्रार करते आहे असे नाही. तसे थॉर्नफिल्डमध्ये चांगला पगार देतात; पण मिसेस पूलला माझ्यापेक्षा पाचपट जास्त पगार आहे आणि तिने तो सर्व साठवून ठेवला आहे; प्रत्येक तिमाहीत ती मिलकोट येथील बँकेत पैसे घेऊन जाते; तिने स्वतंत्र जीवन जगण्यासाठी पुरेसे पैसे साठवले असतील याचे मला आश्चर्य वाटणार नाही. पण मला वाटते की तिला थॉर्नफिल्डची सवय आहे; तशी ती अजून चाळीशीची नाही; आणि चांगली धट्टीकट्टी आहे, कोणत्याही कामाला तयार असते: त्यामुळे अजून बरीच वर्षे काम करू शकेल.”

“ती चांगली नोकर आहे का?” त्या रोजंदारीच्या स्त्रीने विचारले.

“हो! तिला नेमके काय करायचे आहे ते कोणापेक्षाही चांगले समजते,” लेआने हळु आवाजात उत्तर दिले; “दुसरे कोणीही तिची जागा घेऊ शकत नाही, अगदी तिच्या एव्हढा पगार मिळाला तरी.”

“त्या साठी नाही”, दुसरी स्त्री काही बोलत होती, “मला मालकांचे आश्चर्य वाटते....”

ती पुढे बोलणार होती, पण लेआने मला पाहिले आणि तिला थांबवले.

मग तिने हळू आवाजात विचारले: "तिला माहीत नाही का?"

लेआने नकारार्थी मान हलवली आणि संभाषण थांबले; थॉर्नफिल्डमध्ये एक गूढ आहे, जे मला माहित नसावे असे मला आत्ताच कळले होते.

गुरुवार आला: आदल्या संध्याकाळी सर्व काम पूर्ण झाले; गालिचे अंथरले होते, पडदे लटकवलेले होते, पांढरे शुभ्र बेडशीट्स पलंगावर पसरलेल्या होत्या, ड्रेसिंग टेबल्स मांडलेली होती, फर्निचर पॉलीश केलेले होते, फुलदाण्यांमध्ये फुलांची सजावट केली होती: चेंबर्स आणि सलून दोन्ही स्वच्छ आणि चमकदार दिसत होते. हॉल पण घासून, पुसून लखलखीत केला होता; मोठे कोरीव घड्याळ, तसेच जिन्याच्या पायऱ्या आणि पायऱ्यांचे कठडे, काचेच्या चमकाने पॉलिश केले होते: जेवणाच्या खोलीत साइडबोर्ड प्लेटसह चमकदार चमकत होता; ड्रॉईंग-रूम आणि स्त्रियांच्या खोलीत, सर्व बाजूंनी विदेशी फुलांनी फुलदाण्या सजल्या होत्या.

दुपार झाली; मिसेस फेअरफॅक्सनी त्यांचा सर्वात सुंदर काळा सॅटिनचा ड्रेस हातमोजे आणि सोन्याचे घड्याळ घातले: कारण त्याच स्वागत करणार होत्या, त्यांना, महिलांना त्यांच्या त्यांच्या खोलीत घेऊन जायचे होते. ॲडेलला देखील नवीन कपडे घालायचे होते. त्या दिवशी तिची पाहुण्या स्त्रियांसमोर ओळख करून देण्यात येईल असे मला वाटत नव्हते . तथापि, तिला नाराज न करता, मी सोफीला तिला पांढरा मलमलचा ड्रेस घालण्याची परवानगी दिली; मला माझ्यामध्ये काही बदल करण्याची गरज वाटली नाही: मला पूर्ण खात्री होती की मला अभ्यासाच्या खोलीतून बाहेर बोलावले जाणार नाही. माझ्यासाठी अभ्यासाची खोली, संकटकालीन आनंददायी सुरक्षागृह बनणार होते.

a

तो एक वसंत ऋतूचा एक शांत, प्रसन्न दिवस होता: उन्हाळ्याची चाहुल लागली होती. दिवस संपत आला होता; संध्याकाळ अगदी उबदार होती, आणि मी खिडकी उघडून शाळेच्या खोलीत काम करत होते.

“उशीर होत आहे,” मिसेस फेअरफॅक्स प्रवेश करत म्हणाल्या; तरी बरं, मी मिस्टर रॉचेस्टरनी सांगितल्यापेक्षा, एक तास उशिराने जेवण तयार ठेवायला सांगितले आहे कारण आता आधीच सहा वाजले आहेत. मी जॉनला रस्त्यात कोणी दिसतंय का हे पाहण्यासाठी पाठवले आहे; पार्कच्या गेट्सवरून मिलकोट मार्गाचा काही भाग दिसतो.”

त्या खिडकीकडे गेल्या: “अरे वा! जॉन येत आहे,” त्या म्हणाल्या. आणि मग मोठ्याने विचारले: “बरं, जॉन, काय बातमी?”

“ते येत आहेत, मॅडम; ते दहा मिनिटांत येतील!” जॉनने उत्तर दिले.

अॅडेल खिडकीकडे गेली, मी तिच्यामागे गेले आणि पडद्याच्या आडून बाहेर पाहू लागले मला इतरांच्या नजरेला पडायचे नव्हते.

जॉनने सांगितलेली, दहा मिनिटे मला फार मोठी वाटत होती; पण शेवटी गाडीच्या चाकांचा आवाज ऐकू आला आणि चार घोडेस्वार दौडत आले; त्यांच्या पाठीमागे, दोन घोडागाड्या आल्या. त्यांचे छत उघडे होते, आतील पडदे वाऱ्याने फडफडत होते. घोडेस्वारांपैकी दोघे, तरुण आणि देखणे होते. काळ्या घोड्यावर मिस्टर रॉचेस्टर बसलेले होते, त्याच्यासोबत पायलट होता. त्यांच्या शेजारी एक तरुण स्त्री, घोड्यावर बसून आली होती. ते दोघे सर्वात पुढे होते. तरुण स्त्रीने जांभळ्या रंगाचा घोडेस्वारीचा पोशाख घातला होता, जो जवळजवळ जमिनीला स्पर्श करत होता. वाऱ्याच्या झुळकीने, तिचा लांब जाळीदार बुरखा उचलला गेला आणि काळ्याभोर कुरळ्या केसांच्या बटा बाहेर डोकावताना दिसल्या.

a

“मिस इंग्राम!” असे म्हणत मिसेस फेअरफॅक्स पटकन खाली गेल्या.

घोडेस्वारांचा ताफा तबेल्याकडे वळला आणि मग दिसेनासा झाला. अँडेल खाली जाण्यासाठी हट्ट करू लागली होती; पण मी तिला जवळ घेऊन समजावले की मोठ्या माणसांनी तिला बोलावल्याशिवाय असे पाहुणेमंडळीं समोर जाणे योग्य होणार नाही. मि. रोचेस्टरनी जर तिला असे वागताना पाहिले तर त्यांना मुळीच आवडणार नाही. ती थोडी चिडली, रडली परंतु माझा गंभीर चेहरा पाहून तिला त्या सगळ्याचा उपयोग होणार नाही याची खात्री पटली आणि मग तिने डोळे पुसले.

हॉलमध्ये आता जमलेल्या मंडळींची गडबड गोंधळ सुरु होती. पुरुष मंडळींची आपापसातील चर्चा हास्यविनोद थोड्या मोठ्या आवाजात ऐकू येत होते; स्त्रियांच्या गोड नाजुक आवाजात गप्पागोष्टी सुरू होत्या. या सर्व आवाजांमधून मि. रोचेस्टरांचा भारदस्त आवाज ओळखू येत होता. यजमान या नात्याने घरी आलेल्या पाहुण्यांचे स्वागत करतांना त्यांच्या आवाजातील प्रसन्नता लक्षात येत होती. नंतर हलक्या पावलांनी जिना चढल्याचे आवाज ऐकू येऊ लागले; कॉरिडॉरमध्ये वर्दळ जाणवू लागली; थट्टा, मस्करी, हशा, कुजबुज असे संमिश्र आवाज होते. खोल्यांच्या दारांची उघडझाप ऐकू आली आणि थोड्या वेळाने सर्व शांत झाले.

“ते कपडे बदलत आहेत,” अ‍ॅडेल म्हणाली, तिने सर्व लक्षपूर्वक ऐकले होते आणि आवाजावरून, प्रत्येक हालचालीचे अनुमान बांधले होते.

शेवटी तिने उसासा टाकला. “आमच्या घरी,” तिची पुढे बडबड चालूच होती, “जेव्हा पाहुणे येत, तेव्हा मी सगळीकडे जात असे, दिवाणखान्यात, बेडरूममध्ये; मी बऱ्याचदा मोलकरणींना बाईसाहेबांची केशभूषा करताना आणि स्त्रियांना तयार करताना पहात असे, खूप मजा असायची!”

तिचे लक्ष दुसरीकडे वळवण्यासाठी, मी विचारले, “तुला भुक लागली आहे का अँडेल?”

“होय, मिस; जेवून खूप वेळ झाला.”

“बरं, स्त्रिया त्यांच्या खोलीत असताना, मी खाली उतरून काहीतरी घेऊन येते.”

मी अँडेलचे जेवण आणण्यासाठी, जास्त कुणाच्या लक्षात येऊ नये म्हणून, मागचा जिना उतरून थेट स्वयंपाकघरात गेले. तिकडे सगळी गडबड सुरू होती; सूप आणि मासे जवळजवळ तयार झाले होते, स्वयंपाकीणबाई आगीजवळ जाऊन काम करत होत्या, मला कुणाला तरी भाजेल की काय अशी भीती वाटली;

नोकरांच्या खोलीत, दोन कोचमन आणि आलेल्या पाहुण्यांचे तीन नोकर आगीभोवती उभे होते; सेविका निःसंशयपणे त्यांच्या मालकिणींच्या सेवेमध्ये व्यस्त होत्या असणार; मिलकोटहून आणलेले नवीन नोकर पण कामात खूप व्यस्त होते. या गोंधळातून मी वाट काढत, पॅन्ट्रीमध्ये पोचले, जिथे मी एक थंड चिकन, काही पाई, एक ब्रेड, प्लेट्स, काटे आणि चाकू घेतले आणि लगेच माघारी निघाले. मी कॉरिडॉरमध्ये पोहोचले आणि जिन्याचे दार बंद करणार; तेव्हाच पाहुणेमंडळीं पार्टीसाठी तयार होऊन खाली निघत असल्याची लगबग मला जाणवली. माझ्या हातात जेवणाची सामुग्री असल्याने त्यांच्या पुढ्यातून जाणे उचीत दिसले नसते म्हणून गॅलरीच्या एका टोकाला शांतपणे उभी राहीले.

लौकरच खोल्यातून नटूनथटून समस्त स्त्रीवर्ग बाहेर पडला. अंगावरची किंमती वस्त्रप्रावरणे, दागिने चमकत होते. चेहरे आनंदाने फुलले होते. थोडावेळ सर्वजणी घोळका करून एकत्र जमल्या. त्यांचे आपापसातील मंजुळ बोलणे मला गॅलरीच्या दुसऱ्या टोकापर्यंत ऐकू येत होते. नंतर त्यांनी शांतपणे जीना उतरण्यास सुरुवात केली, जणू टेकडीवरून एखादा चंदेरी, सोनेरी दिमाखदार ढग हळूहळू खाली यावा, तसे ते खानदानी अभिजात लावण्य जीन्यावरून अलगद खाली निघाले होते. त्यानंतर मी अभ्यासाच्या खोलीकडे गेले. अँडेल दार उघडून खाली पाहू लागली,

आणि म्हणाली, “किती छान! मला पण खाली जायचे आहे, मिस्टर रोचेस्टर रात्रीच्या जेवणानंतर, आपल्याला बोलवतील, तुम्हाला वाटते का?”

“नाही, खरं तर; मिस्टर रोचेस्टरांकडे इतर खूप कामे आहेत; आज खाली जाण्याचा विचार सुध्दा करू नको; कदाचित तुला उद्या त्यांना पहाता येईल, आता येथे तुझे रात्रीचे जेवण आणले आहे ते जेवून घे.”

तिला खूप भूक लागली होती, ती चिकन आणि पाई पाहून खुश झाली, तरी बरे मी अगोदरच खाणे घेऊन आल्याने अँडेल, सोफी आणि माझे रात्रीचे जेवण आरामात पार पडले नाहीतर, जेवण करायला दहा वाजून गेले असते; नोकरमंडळीं पार्टीमध्ये डेझर्ट घेऊन गेली, तेव्हा नऊ वाजून गेले होते, आणि दहा वाजले होते तरीही काँपीचे ट्रे घेऊन आतबाहेर चालले होते. सकाळी अँडेलला उठवायची घाई केली नाही, रात्री पार्टीची जाग होती तो पर्यंत ती चांगला ड्रेस उतरवून घेण्यास तयार नव्हती, न जाणो रोचेस्टरनी बोलावले आणि आपण साध्या कपड्यात कसे खाली जाणार, याची तिला काळजी वाटत होती. मग गोष्ट सांग म्हणून हट्टून बसली. त्यानंतर, आम्ही गँलरीतून खाली पाहू लागलो, हाँल मध्ये मोठा दिवा पेटवला होता, नक्षीदार खांब असलेल्या कठड्याला टेकून ती खाली चाललेली नोकर मंडळींची गडबड बघण्यात दंग होती.

थोड्या वेळाने ड्रॉईंग-रूममधून संगीताचा आवाज आला, तिथे पियानो होता; ॲडेल आणि मी ऐकण्यासाठी वरच्या पायरीवर बसलो. लौकरच एक आवाज, समृद्ध स्वरांसह वाद्याच्या कंपनांत मिसळला. एक स्त्री गात होती, तिच्या आवाजात गोडवा होता. अगोदर सोलो नंतर युगलगीत आणि मग कोरस झाला; नंतर मजेत गप्पा गोष्टी बराच वेळ चालल्या, मी ऐकत होते, अचानक माझ्या लक्षात आले की, त्या ऐकण्याचा माझा उद्देश फक्त, त्या आवाजातून रोजेस्टरांचे उच्चार

वेगळे करण्याचा होता, त्यानंतर स्वरांचा मागोवा घेत, लांबून ऐकू येणाऱ्या संभाषणातून शब्द आणि अर्थबोध होतो का पाहण्यासाठी माझा प्रयास चालला होता.

अकरा वाजले; मी ॲडेलकडे पाहिले, ती माझ्या खांद्यावर डोके ठेऊन पेंगत होती; डोळे जड झाले होते. मी तिला उचलून घेतले आणि बेडवर झोपवले. पाहुणेमंडळी त्यांच्या खोलीत परतली तेव्हा जवळपास एक वाजला होता.

दुसरा दिवस उजाडला, तो पण आदल्या दिवशी इतकाच चांगला होता. त्या दिवशी सहलीचा कार्यक्रम ठरला होता. सर्वजण सकाळी लौकरच निघाले. काही घोड्यावरून, उरलेले घोडागाडीतून. महिलावर्गापैकी फक्त मिस इंग्राम तेव्हढी घोड्यावरून मि. रोजेस्टरांच्या बरोबर चालली होती. आदल्या दिवशी प्रमाणे त्या दोघांची जोडी सर्वांपासून वेगळी निघाली होती. मी ही गोष्ट, मिसेस फेअरफँक्स ज्या माझ्या समवेत खिडकीतून हे पहात होत्या, त्यांच्या लक्षात आणून दिली.

“तुम्ही त्यादिवशी म्हणाला होता,” मी म्हणाले, “त्यांचे लग्न होण्याची शक्यता नाही; पण मिस्टर रॉचेस्टर तर, इतर सर्वांपेक्षा त्यांना पसंत करतात असे वाटते, ते तुम्ही स्वतः पहा.”

“होय, ते निःसंशयपणे तिचे कौतुक करतात.”

“ती पण कौतुक करत असावी,” मी म्हणाले; “ती पहा मान वळवून त्यांच्याकडे बघत आहे, दोघे काहीतरी खाजगी बोलत असावेत; मला तिचा चेहरा बघायचा आहे. मला काही तिला पहायला मिळाले नाही.”

“तुम्ही आज संध्याकाळी तिला भेटू शकाल,” मिसेस फेअरफॅक्सनी उत्तर दिले. मी मिस्टर रोचेस्टरला सांगितले की ॲडेलला सर्वांना पाहायचे आहे; ते म्हणाले, “ठीक आहे, रात्रीच्या जेवणानंतर तिला ड्रॉईंग-रूममध्ये येऊ द्या आणि मिस आयरला पण तिच्यासोबत येण्यास सांगा.”

a

“त्यांनी केवळ शिष्टाचार म्हणून सुचवले असेल; पण मी नक्कीच जाणार नाही,” मी उत्तर दिले.

“मी त्यांना सांगितले की तुला बाहेरच्या लोकांमध्ये मिसळायची सवय नाही आणि या सर्व अनोळखी लोकांसमोर येणे कदाचित तुला आवडणार नाही; पण त्याने मला त्याच्या तुटक स्वरात उत्तर दिले: “मूर्खपणा! जर तिने आक्षेप घेतला तर तिला सांगा की मला ती खरोखर यायला हवी आहे आणि तरीही तिने विरोध केला तर मी स्वतः येऊन तिला घेऊन जाईन.”

“मी त्यांना मला घेऊन जाण्यासाठी त्रास देणार नाही,” मी उत्तर दिले; म्हणून मी जाईन, अन्यथा मला अशा भेटीगाठी आवडत नाहीत; मिसेस फेअरफॅक्स तुम्ही तिथे असाल का?”

“नाही. मी त्यांना सांगून बघितले पण त्यांच्या निर्णय अगोदरच झाला आहे. मी तुला विशेष अवघडलेपण न वाटून घेता, शिष्टाचाराला धरून कसे वागायचे ते सांगते, तू ड्रॉइंगरुम रिकामी असतानाच तिथे जा आणि तुला आवडेल त्या शांत कोपऱ्यात जागा निवडून बसून घे. जेवण झाले की महिला वर्ग तिथे यायला सुरवात होईल. पुरुष मंडळी आल्यावर तुला तिथे थांबून रहाण्याची गरज नाही. फक्त तू तिथे आली आहेस हे रोचेस्टरनी पाहीले की झाले. नंतर मग तू कधीही, तुला थांबायचे नसेल तर तेथून परत निघू शकतेस, कोणाच्याही लक्षात येणार नाही.”

“सर्व मंडळी वाड्यात बरेच दिवस राहतील असे तुम्हाला वाटते का?”

“एक किंवा दोन आठवडे, त्यापेक्षा जास्त नक्कीच नाही. इस्टरच्या सुट्टीनंतर, सर जॉन लिन, ज्यांची नुकतीच मिलकोटसाठी सदस्य म्हणून नियुक्ती झाली आहे, त्यांना तिकडे जावे लागेल. मला वाटते मि. रोचेस्टर पण त्याच्यासोबत जातील, कारण ते थॉर्नफिल्डमध्ये इतके दिवस कसे काय राहिले, याचे मला आश्चर्य वाटते.”

a

ज्या गोष्टींची मला भीती वाटत होती तो पाहुणे मंडळींना भेटण्याचा क्षण आला. मी अँडेलला घेऊन ड्राइंगरुम मध्ये प्रवेश केला. जेव्हा तिला समजले की तिची पाहुण्यांशी ओळख करून दिली जाणार आहे, तेव्हापासून ती खुपच आनंदात होती. शांतपणे तिने सोफीकडून आवरून घेतले. तिचे केस कुरळे करून त्यांची आकर्षक केशभूषा केली होती. तिने गुलाबी रंगाचा सँटिनचा ड्रेस घातला होता. कमरेला लांब कमरपट्टा बांधून हातात जाळीदार हातमोजे घातले होते. सर्व आवरून झाल्यावर, ड्रेसिंगरूम मध्ये अगदी गंभीरपणे तिच्या छोट्या खुर्चीवर बसली होती. सँटिनचा ड्रेस खाली लोळेल म्हणून तिने तो व्यवस्थित सावरून धरला होता. माझी तयारी होईपर्यंत तिथून हलणार नाही, हे तिने कबूल केले होते. मी, मिस टेंपलच्या लग्नाच्या निमित्ताने, विकत घेतलेला, माझा राखाडी रंगाचा रेशमी पोशाख घातला आणि जो फक्त मिस टेंपलच्या लग्नाच्या वेळी घातला होता; माझे केस सरळ केले; माझा एकमेव अलंकार, मोत्याचा ब्रोच घातला. आणि आम्ही खाली उतरलो.

सुदैवाने लिव्हिंग रूममध्ये प्रवेश करण्यासाठी जेवणाच्या खोलीतून जायची गरज नव्हती. लिव्हिंग रूम रिकामी होती; संगमरवरी शेकोटीमध्ये आग पेटलेली होती, आणि मेणबत्त्या टेबलवर तेवत होत्या. दिवाणखान्यातून जेवणाच्या खोलीत जाणारी कमान लाल पडद्याने बंद केली होती; पाहुणे मंडळी इतक्या हळू आवाजात बोलत होती की, पलीकडेचे काही ऐकू येत नव्हते.

अँडेल, सांगितलेल्या छोट्या स्टूलवर एक शब्दही न बोलता ती बसली होती. मी एक टेबलवरून पुस्तक घेऊन, खिडकीजवळ गेले आणि वाचायचा प्रयत्न करत होते. ॲडेलने तिचे स्टूल माझ्याजवळ आणले; थोड्या वेळाने तिने माझ्या गुडघ्याला स्पर्श केला.

“काय हवे आहे, ॲडेल?” मी विचारले.

“मिस, मी या सुंदर फुलांपैकी एक घेऊ? फक्त माझे घालायचे आहे.”

a

मी तिच्या बेल्टला एक गुलाब घेऊन खोचला.

ती खुप खुश झाली ते पाहून मला हसू आवरता आवरेना. सुंदर दिसण्या संबंधित प्रत्येक गोष्टीबद्दल, पॅरिसच्या या छोट्या परीचा जन्मजात चोखंदळपण पाहून विनोदी वाटत होते आणि तेव्हढेच वाईटही.

अचानक मला पुढच्या खोलीत अनेक लोक उठल्याचे ऐकू आले. कमानीचा पडदा सरकवला गेला आणि मला जेवणाची खोली दिसली, झुंबराच्या प्रकाशात, मोठ्या लांब टेबलावर, काचेची आणि चांदीची डेझर्टचे बाऊल चमकत होते. महिलांचा एक गट कमानीखालून आत आला; आणि परत पडदा सरकवला गेला.

एकूण आठ महिला होत्या, पण एकदम घोळक्याने आल्याने कितीतरी जास्त असाव्यात असे वाटले. त्यांच्यापैकी काही जणी उंच होत्या, बऱ्याच जणींचे पोशाख पांढरे होते आणि ते बरेचसे घेरदार असल्याने, चंद्राभोवती असणाऱ्या ढगांप्रमाणे शोभा आणत होते. मी उभे राहून त्यांना अभिवादन केले. एक-दोघींनी, मान हलवून मला प्रतिसाद दिला; इतरांनी फक्त माझ्याकडे पाहिले.

नंतर सर्वजणी खोलीत पांगल्या गेल्या; त्यांच्या चपळ हालचाली आणि घेरदार ड्रेसमुळे तरंगणाऱ्या पांढऱ्या पक्षांचा थवा असल्याचा भास होत होता; काहींनी सोफा पसंत केला आणि काही खुर्चीवर बसल्या, तर काहींनी फुलं आणि पुस्तके पाहण्यासाठी टेबलांवर गर्दी केली; शेवटी काही जणी, शेकोटीच्या जवळ आगीभोवती जमा झाल्या, आणि नेहमीच्या हळू पण स्पष्ट आवाजात बोलू लागल्या. त्यांची नावे मला नंतर समजली पण आता नांवाने मी ओळख करून देईन. प्रथम मी मिसेस एश्टन आणि त्यांच्या दोन मुलींना पाहिले. त्या सुंदर तर होत्याच आणि त्यांचे संगोपन पण चांगल्याप्रकारे केले गेले होते. एमी, मोठी मुलगी होती, लहान चणीची, भोळी आणि बालिश वाटत होती. तिचा चेहरा आणि वागणूक, मन

प्रसन्न करणारे होते; तिने पांढरा मलमलचा ड्रेस आणि तिचा निळा पट्टा घातला होता तो तिच्या व्यक्तीमत्वाशी सुसंगत होता. तिची बहीण लुईसा, सुसंस्कृत वाटत होती, उंच आणि खूप सुंदर होती. शिवाय दोन्ही बहिणी व्हाईट लिलीसारख्या गोऱ्यापान होत्या.

लेडी लिन ही सुमारे चाळीस वर्षांची मोठी आणि कणखर व्यक्ती होती; अतिशय ताठ, अतिशय गर्विष्ठ दिसणारी, तिने बदलत्या रंगाचा साटनचा ड्रेस परिधान केला होता: डोक्यावर घातलेल्या, रत्नजडीत पट्ट्याचे रंग, त्यांच्या काळया केसांवर पडल्याने त्यावर निळसर झाक ते पडून चमकत होते.

मिसेस डेंट, कमी भपकेबाज होत्या. सभ्य कुलीन स्त्री शोभत होत्या. सडपातळ कमर, सौम्य, फिकट गुलाबी चेहरा आणि सोनेरी केस होते. काळा साटनचा पोशाख, लेसचा स्कार्फ आणि काही मोजके मोत्यांचे दागिने परिधान केले होते.

तीन उंच महिलाचा एक गट थोडा बाजूला उभा होता. त्या होत्या लेडी इंग्राम आणि त्यांच्या दोन मुली ब्लाँचे आणि मेरी; तिघीजणी स्वतःच्या मोठेपणाच्या तोऱ्यात असल्याचे वाटत होते. लेडी इंग्राम, साधारण पन्नाशीच्या असाव्यात. वयाच्या मानाने बांधेसूद होत्या. केस अजूनही काळे होते, निदान मेणबत्तीच्या उजेडात तरी वाटत होते. दात पांढरे शुभ्र होते. तब्बेतीची निगा चांगली राखली राखली होती. त्यांच्या वयाचा विचार करता, तेथील सर्वजणी पैकी सर्वात सुंदर स्त्री असण्याचा मान त्यांनाच जात होता परंतु त्यांच्या वागण्या बोलण्यात कमालीचा अहंकार आणि चेहऱ्यावर मग्रूरी दिसत होती. रोमन सौंदर्याची सारी वैशिष्ट्ये त्यांच्या मध्ये दिसून येत होती. मात्र दुहेरी हनुवटीमुळे गळा जाड वाटत होता, ताठलेली हनुवटी विचित्र वाटत होती, त्यामुळे मान, सुजलेल्या सारखीच नाही तर गर्वाने फुगल्यासारखी वाटली.

डोळयात हिंस्त्र आणि कठोरता भाव दिसत होते. त्यांना पाहून मला मामीसाहेबांची, मिसेस रीडची आठवण झाली. बोलण्यात शिष्टपणा जाणवत होता. आवाज खोल होता, बोलायच्या पद्धतीत, दिखाऊपणा आणि हटवादीपणा होता. एका शब्दात सांगायचे झाले तर एकंदरीत स्वभाव अगदी असह्य होता. त्यांनी किरमिजी रंगाचा मखमली पोशाख परिधान केला होता, त्यावर सोन्याचे जरीकाम केलेली भारतीय शाल, स्कार्फ म्हणून बांधली होती. आपण जणू काही एखादी सम्राज्ञीच आहोत, असा काहीसा त्यांचा आविर्भाव होता.

ब्लाँचे आणि मेरी, दोघीही ताडमाड उंच होत्या; मेरी खूप सडपातळ होती, परंतु ब्लाँचे एखादी दैवी मुर्ती घडवल्यासारखी दिसत होती. मी तिच्याकडे विशेष लक्ष देऊन पाहिले: मला तिच्याविषयी, मिसेस फेअरफँक्सनी जे वर्णन केले होते ते पडताळून पहायचे होते; त्यावरून मी बनवलेल्या चित्रासारखी जर ती दिसत असेल तर मग मि. रोजेस्टरना तिची भुरळ पडली असल्यास नवल नव्हते.

मिसेस फेअरफॅक्सने मला तिचे जे वर्णन केले होते आणि त्यावरून मी तिचे जसे चित्र रेखाटले होते, तशीच ती होती; उंच, सडपातळ कमर, झुकणारे खांदे, लांब आणि देखणी मान, निमगोरा रंग, उमदे व्यक्तीमत्व, पण चेहरा? चेहरा, तिच्या आईसारखाच होता: जणु ती तरुणपणीची लेडी इंग्राम होती; तसेच कपाळ, त्यांच्यासारखीच गर्विष्ठपणा दर्शवणारी वैशिष्ट्ये, तोच अभिमानी ताठा, पण चेहऱ्यावर लेडी इंग्राम प्रमाणे खिन्नता नव्हती, ती सारखी हसत होती पण तिच्या कमानदार ओठांवर हास्य, दुसऱ्याकडे तुच्छतेने पाहणार होते.

अलौकिक बुद्धिमत्ता, आत्म-जागरूक असल्याचे म्हटले जाते: मिस इंग्राम प्रतिभाशाली होती की नाही हे मी सांगू शकत नाही, परंतु ती आत्म-जागरूक होती,

a

विलक्षणपणे आत्म-जागरूक होती. तिचे आणि मिसेस डेंट यांचे वनस्पतिशास्त्रावरील संभाषण चालले होते. मिसेस डेंटनी सांगितले, “मी वनस्पती शास्त्राचा अभ्यास असा केलेला नाही, पण मला 'जंगली फुले' आवडतात,” यावर मिस इंग्रामने तिच्याकडच्या शब्दसंग्रहावर विशेष भर देत आपल्या ज्ञानाचे पुरेपूर प्रदर्शन केले. माझ्या लक्षात आले की ती मॅडम डेंटच्या अज्ञानावर हसत होती: त्यांचे अज्ञान उघडे करण्याचा डाव, तिने बऱ्याच हुशारीने रचला होता, पण कोणत्याही परिस्थितीत, तो निश्चितपणे चांगला स्वभाव ठरला नसता. तरीही तिने डाव खेळला आणि चांगल्याप्रकारे खेळला. तिने गाणे गायले: तिचा आवाज चांगला होता; ती तिच्या आईबरोबर चांगल्या उच्चारात आणि ओघवत्या फ्रेंच मध्ये बोलत होती.

मेरीचा चेहरा, ब्लाँचेपेक्षा अधिक मोकळा आणि सौम्य भाव दर्शवत होता. रंग अधिक उजळ होता. मिस ब्लाँचेचा रंग खरा स्पॅनिश लोकांसारखा होता, पण मेरीच्या आयुष्यात कमतरता होती, तिच्या चेहऱ्यावर भाव नव्हते, डोळ्यात चमक नव्हती. तिच्याकडे बोलण्यासारखे काहीच नव्हते, एका जागी पुतळ्यासारखी स्थिर बसून राहिली. दोन्ही बहिणींनी पांढऱ्या रंगाचे कपडे घातले होते.

आणि मग मी विचार करू लागले, की मिस्टर रोचेस्टर, मिस ब्लाँचेची निवड करतील? मी सांगू शकत नाही. मला त्यांची स्त्री सौंदर्याची आवड माहिती नव्हती. जर त्यांची आवड राजेशाही, खानदानी स्त्री असेल, तर ती राजेशाही असण्यात चपखलपणे बसू शकत होती. बहुतेक सर्वजण तिची प्रशंसा करत होते, रोचेस्टर पण तिचा प्रशंसक आहेत याचा मला अंदाज होता. पण खात्री करून घेण्यासाठी मला त्या दोघांना एकत्र पहायला हवे होते.

यादरम्यान अँडेल शांत बसून राहिली होती असे समजणे चुकीचे ठरेल. सर्वजणी आत आल्यावर तिने त्यांच्या जवळ जाऊन अभिवादन केले.

a

मिस ब्लांचेने तिच्याकडे उपहासाने पाहिले आणि म्हणाली: "अरे! किती छोटी बाहुली!

"मला वाटते," लेडी लिन म्हणाली, "ही मिस्टर रोचेस्टरची पाल्य असावी, ज्या लहान फ्रेंच मुलीबद्दल त्याने आम्हाला सांगितले होते."

मिसेस डेंटने हळूच तिचा हात धरून तिचे चुंबन घेतले. एमी आणि लुईसा एश्टन एकत्र ओरडल्या: "ओहो! किती गोड आहे!"

त्यांनी तिला सोफ्यावर नेले आणि तिने फ्रेंच किंवा तुटक्या इंग्रजीत बोलण्यास सुरुवात केली, तिने केवळ दोन तरुण मुलीच नव्हे तर मिसेस एश्टन आणि लेडी लिन यांना देखील आपलेसे केले; त्यांनी तिचे पाहिजे तेव्हढे लाड केले.

शेवटी कॉफी आणली आणि सर्व सदगृहस्थ आत आले. मी आडोशाला बसलेली होते, जर खरंच इतक्या चांगल्या दिवाणखान्यात असा निवांत कोपरा मिळणे अवघड होते; खिडकीच्या पडद्यामुळे मला लपता आले. बाकीची मंडळी आली. त्यांचे स्वरूप मला स्त्रियांप्रमाणेच आकर्षक वाटत होते. सर्वांनी काळे कपडे घातले होते; त्यापैकी काही वयाने मोठे होते, तर काही तरुण. हेन्री आणि फ्रेडरिक लिन हे हुशार तरुण होते. कर्नल डेंट हे एक उत्तम सैनिक होते. मिस्टर एश्टन, जिल्हा दंडाधिकारी, असून एक सज्जन शिष्टाचारी व्यक्ती होते; त्याचे केस पांढरे असून, भुवया आणि मिशा काळ्या होत्या, त्यामुळे नाटकातील भारदस्त व्यक्तिमत्त्व भासत होते. लॉर्ड इंग्राम, त्याच्या बहिणींप्रमाणे उंच आणि देखणा होता. पण मेरीप्रमाणे उदास वाटत होता. रक्तात जोम कींवा मेंदूत चैतन्य दिसण्याऐवजी फक्त त्याचे हाडपेर मजबूत होते.

मिस्टर रोचेस्टर कुठे होते?

शेवटी ते आले. मी दरवाज्याकडे पाहत नव्हते आणि तरीही मला ते आत येत असल्याचे जाणवले. मी बनवायला घेतलेल्या पर्सच्या कामावर लक्ष केंद्रित

a

करण्याचा प्रयत्न करत होते. मला फक्त माझ्या हातातील कामाचा विचार करायचा होता. चांदीचे मणी, रेशमाचे धागेच फक्त पहायचे होते, तरीही, मला त्यांची आकृती स्पष्टपणे दिसली. अपरिहार्यपणे मला आमची शेवटची भेट आठवली. भयंकर मृत्यूपासून वाचवल्याबद्दल आभार प्रदर्शन करू द्यायची विनंती त्यांनी केली होती. दोन्ही हातात हात धरून, मन मोकळे करून धन्यवाद दिले होते, त्यांच्या भावनांचा मी भाग बनले होते, त्या क्षणी मी त्याच्या किती जवळ गेले होते. तेव्हापासून काय काय घडले होते, मला कुटुंब मिळाल्यासारखे वाटले होते, आणि तरीही आता आम्ही किती दूर, दूर झालो होतो! आता ते माझ्याशी बोलतील अशी मला अपेक्षा नव्हती. त्यामुळे मला आश्चर्य वाटले नाही की, ते माझ्याकडे न पाहता, खोलीच्या पलीकडे जाऊन बसले आणि काही स्त्रियांशी बोलू लागले.

मी त्यांना संभाषणात गढून गेलेले पाहिले आणि मला खात्री झाली की मी त्यांच्या लक्षात न येता, त्यांना पाहू शकेन; माझी नजर अनैच्छिकपणे त्याच्या चेहऱ्याकडे गेली: आता माझ्या डोळ्यावर माझे नियंत्रण उरले नव्हते, खुशाल ते त्यांना अनिमिषपणे न्याहाळू लागले, त्यातून मला एक स्वर्गीय आनंद मिळत होता, अत्यंत मौल्यवान तरीही तीव्र वेदनादायी आनंद, सोन्यासारखा तेजस्वी तरीही, मन दु:खाने पोलादासारखे घट्ट करणारा: त्यांना न्याहाळत असताना माझी स्थिती, तहानेने तडफडणारा मरणासन्न माणसाने, विहिरीचे पाणी विषारी आहे याची कल्पना असूनही, दैवी पेय म्हणून प्राशन करावे, अशी झाली होती.

“सौंदर्य हे पाहाणाऱ्याच्या नजरेमध्ये असते,” ही खरी गोष्ट आहे. मिस्टर रॉचेस्टरांचा निमगोरा रंग, चौकोनी चेहरा, मोठे कपाळ, जाड भुवया, मजबूत बांधा, कणखर, गंभीर तोंड, सौंदर्य नियमांमध्ये यातील काही बसत नव्हते; पण माझ्यासाठी त्यांचा चेहरा अधिक सुंदर होता, तो मला आवडला आणि त्यांचा प्रभाव मला बरेच

काही शिकवून गेला. माझ्या भावनांना माझ्यापासून खेचून, त्यांनी आपल्या भावनांशी जखडून टाकले, त्यांच्यावर प्रेम करायचा माझा हेतु नव्हता.

आपल्याला कल्पना असेल, पहिल्यावहिल्या प्रेमाचे कोवळे अंकुर, मुळापासून खुडून काढण्याचा मी खूप प्रयत्न केला आणि आता नुसते त्यांना पाहिल्यावर, उरल्या सुरल्या मुळांना नवीन धुमारे फुटले, हिरवेगार आणि मजबूत. रोचेस्टरनी माझ्याकडे न पहाता, मला त्याच्यावर प्रेम करण्यास भाग पाडले.

मी त्यांची तुलना, तिथे जमलेल्या पाहुणे मंडळींची करून पाहीली. मिस्टर लिन यांची धाडसी वृत्ती, लॉर्ड इंग्राम यांची उत्कृष्ट अभिरुची, कर्नल डेंटचे लष्करी वेगळेपण या सर्वांच्या विरुद्ध बाजूला मिस्टर रोचेस्टरांचा जन्मजात मजबूत बांधा आणि खरेखुरे सामर्थ्य. माझ्या लेखी रोजेस्टरांचे बाह्य स्वरुप अथवा अभिव्यक्तीला फारसे महत्त्व नव्हते परंतु इतर लोकांनी पाहुणे मंडळींना देखणे आणि आकर्षक घोषित केले असते तर त्यांना रोचेस्टरचा चेहरा कठोर आणि वृत्ती उदास वृत्ती वाटली असती.

मी पाहुणे मंडळींना हसताना पाहिले होते. त्यात काहीच विशेष नव्हते: मेणबत्तीच्या प्रकाशा इतकेच चैतन्य, त्यांच्या हसण्यात होते, छोट्या घंटेची किणकीण ऐकू यावी, एव्हढीच त्याची व्याप्ती होती; मी मिस्टर रोचेस्टरला हसताना पाहिले; त्यांचा चेहरा एकदम मृदू झालेला दिसला; त्यांचे डोळे, तेजस्वी आणि सौम्य झाले, नजर प्रसन्न आणि शोधक वाटत होती, त्या वेळी ते लुईस आणि ॲमी एश्टन यांच्याशी बोलत होते. मला याचे आश्र्चर्य वाटले की त्या दोघी अगदी शांतपणे त्यांच्याबरोबर बोलत होत्या, मला त्यांची भेदक नजर अस्वस्थ करत असे, त्या दोघींपैकी ना कुणाचे गाल लाल झाले, ना कुणाची नजर खाली झुकली, मात्र माझे मन ते पाहून आश्वस्त झाले. ते “माझ्यासाठी जसे आहेत, तसे त्यांच्यासाठी नाहीत” मी विचार केला: “ते त्यांच्या प्रकारची व्यक्ती नाहीत, ते माझे आहेत, हा माझा

विश्र्वास आहे, नक्कीच आहे, ते मला माझ्या बरोबरीचे वाटतात, त्यांच्या चेहऱ्यावरचे भाव मला वाचता येतात, त्यांच्या वागण्यातून मला अर्थबोध होतो, त्यांचा सामाजिक दर्जा, संपत्ती यामुळे आमच्या मध्ये बरेच अंतर असले, तरी

माझ्या हृदयात आणि मनात, माझ्या भावनांत आणि विचारांत, असे काही आहे ज्यामुळे, मी मानसिक पातळीवर त्यांची बरोबरी साधली आहे. मी स्वतःला फक्त एक पगारी नोकर समजण्या व्यतिरिक्त इतर काही संबंध असल्याचे नाकारले नव्हते काय? प्रत्येक चांगल्या, खऱ्या भावना, जोमदारपणे त्यांच्याभोवती आवेशाने गोळा झालेल्या असतांना, असा विचार करणे ही बाब, निंदनीय अपराध समजायला हवी.

मला माहित आहे की मी माझ्या भावना लपवल्या पाहिजेत: मला सर्व आशा सोडून द्यायला हव्यात; मला हे लक्षात ठेवायला हवे की त्यांना माझी फारशी काळजी नाही. कारण जेव्हा मी म्हणते की, ‘मी त्यांच्या प्रकारची आहे', तेव्हा माझा अर्थ असा नाही की माझ्यावर प्रभाव पाडण्याची त्यांना शक्ती आहे आणि मला आकर्षित करण्याची त्यांच्याकडे जादू आहे: फक्त, त्यांच्यात आणि माझ्यात, काही आवडीनिवडी आणि भावना, एकसमान आहेत हे सत्य मानून, ते सतत स्वतःला, परत परत पटवून दिले पाहिजे, आपण एकमेकांना कायमचे मुकलो आहोत: - आणि तरीही, मी श्वास घेत असतांना, प्रत्येक विचार करत असतांना, मला त्यांच्यावर प्रेमच केले पाहिजे.”

आम्ही कॉफी घेतली. सदगृहस्थांचे आगमन झाल्यापासून स्त्रिया चैतन्यमय झाल्या होत्या. आनंदी आणि चैतन्यशील संभाषण सुरू होते. कर्नल डेंट आणि मिस्टर एश्टनचे राजकारणावर बोलणे सुरू होते आणि त्यांच्या स्त्रिया ते ऐकत होत्या. लेडी लिन आणि लेडी इंग्राम एकत्र गप्पा मारत होत्या. सर जॉर्ज, सोफ्यासमोर उभे राहून काँफी घेता घेता गप्पा मारत होते. मि. फ्रेडरिक लिन, मेरी इंग्रामच्या शेजारी

बसले होते आणि तिच्याबरोबर, एका सुंदर पुस्तका विषयी बोलत होते; ती वेळोवेळी हसून भाग घेत होती. लॉर्ड इंग्राम, एमी एश्टनच्या खुर्चीच्यामागे झुकून उभा होता; ती वेळोवेळी त्याच्याकडे एकटक पहात होती, बहुधा तिला मिस्टर रोचेस्टरपेक्षा लॉर्ड इंग्राम पसंत असावा. हेन्री, ॲडेलच्या शेजारी बसून लुईसा बरोबर फ्रेंच बोलण्याचा प्रयत्न करत होता. त्याच्या चुकांवर लुईसा हसत होती. ब्लाँचे इंग्राम एका टेबलासमोर एकटीच, आल्बम पहात बसली होती. बहुधा कोणी येईल याची वाट पहात होती, पण कोणी न आल्याने तिने स्वतःच रोचेस्टरबरोबर बोलायला सुरुवात केली, ते ब्लाँचेच्या टेबलासमोर शेकोटीच्या जवळ उभे होते.

"मिस्टर रोचेस्टर," ती म्हणाली, "मला वाटलं तुम्हाला मुलं आवडत नाहीत?"

"बरोबर आहे."

"मग या लहान बाहुलीची जबाबदारी घेण्याचा निर्णय तुम्ही कसा काय घेतला? तिने अँडेलकडे निर्देश करत पुढे बोलणे चालू ठेवले; तिला कुठून उचलून आणतेत?"

"मी तिला उचलून आणले नाही; ती माझ्याकडे सोपवली गेली."

"तुम्ही तिला बोर्डिंग स्कूलमध्ये पाठवायला हवे होते."

"ते मला परवडणारे नाही, बोर्डींग स्कूल खूप महाग आहेत."

"पण मला असे वाटते की तुमच्याकडे गव्हर्नेस आहे; मी आताच तिला पाहिले; ती निघून गेली असेल का? अरे नाही! ती पडद्यामागे, खिडकीच्याजवळ उभी आहे. तुम्ही त्यासाठी पैसे देत असणार. मला वाटते की, तेही तितकेच महाग असणार किंवा त्याहूनही अधिक, कारण तुम्हाला त्या दोघींचा सांभाळ करावा लागत असणार."

मला भीती वाटली किंवा एक वेडी आशा म्हणा ना, मी तिथे उपस्थित असल्याचे अप्रत्यक्षपणे ऐकून ते माझ्या दिशेला बघतात की काय? म्हणून मी, अनिच्छेने अजून थोडी मागे झाले. पण त्यांनी माझ्या दिशेला नजर वळवली नाही.

“मी याबद्दल विचार केला नाही,” त्यांनी सरळ पुढे पाहत अलिप्तपणे उत्तर दिले.

“नाही, बहुतेक सर्वच पुरुष पैसे खर्च करतांना फारसा विचार करत नाहीत किंवा त्यांना अशा गोष्टींबाबतीत सामान्य ज्ञान कमी असते. माझ्या आईकडून तुम्ही गव्हर्नेस बाबत ऐकायला पाहिजे, मेरी आणि माझ्याकरिता किमान डझनभर तरी गव्हर्नेस होत्या, अर्ध्या घृणास्पद तर अर्ध्या हास्यास्पद, सर्वजणी अगदी असह्य होत्या; बरोबर ना आई?

“माझ्या प्रिय मुली, तू काही बोललीस का?”

ब्लाँचेने तिचा प्रश्न पुन्हा विचारला.

“गव्हर्नेसचा विषय सुध्दा काढू नकोस; मला या शब्दाची मला भीती वाटते, त्यांची कामाबाबतची अक्षमता आणि त्यांचे लहरी स्वभाव या पुढे मी तर हात टेकले. नशीब आता यापुढे मला त्याच्याशी संबंध येणार नाही.”

तेव्हढ्यात मिसेस डेंट मग लेडी इंग्रामकडे झुकल्या आणि हळू आवाजात तिला काहीतरी सांगू लागल्या, मला प्रतिसादावरून, असे वाटले की तिथे अनुपस्थित असलेल्या सदस्यांविषयी काहीतरी चहाडीचुगली असावी.

“खूप वाईट,” मिसेस इंग्राम म्हणाल्या, “मला आशा आहे की त्यामुळे तिचे तरी चांगले होईल!” मग हळू आवाजात, परंतु तरीही मला ऐकू येईल एवढ्या मोठ्याने म्हणाल्या, “मी तिची नोंद ठेवली आहे: न्यायधिशांसारखी माझी ख्याती आहे, माझे निरिक्षण कधी चुकत नाही. समाजातील तिच्या वर्गातील लोकांत असलेले सर्व दोष तिच्यामध्ये आहेत.”

a

"ते काय दोष आहेत मॅडम?" मिस्टर रोचेस्टरनी मोठ्याने चौकशी केली.

"मी तुला तुझ्या कानात सांगेन," तिने मान हलवून स्पष्टपणे उत्तर दिले.

"पण माझी उत्सुकता तेव्हा संपली असेल आणि मला आता समाधानी व्हायला आवडेल."

"तर मग ब्लाँचेला विचारा: ती माझ्यापेक्षा तुमच्याजवळ आहे."

"नाही! मला हे करायला लावू नकोस आई. माझ्या मते गव्हर्नेस हा प्राणी, फक्त उपद्रव देण्यासाठी आहे. असे काही नाही की मला त्यांचा खूप त्रास झाला, कारण मी बरोबर बाजी उलटून लावत होते, थिओडोर आणि मी आमच्या मिस विल्सन आणि मिसेस ग्रेज आणि मॅडम जॉबर्ट्स यांच्या आम्ही नेहमीच खोड्या काढत असू, यामध्ये मेरीचा सहभाग फार कमी असे. बऱ्याचशा वेळी ती झोपलेली असायची. मॅडम जाॅबर्टना त्रास द्यायला खूप मजा यायची: पण मिस विल्सन ही स्वभावाने गरीब होती, खिन्न आणि निरुत्साही: त्यामुळे आमच्या दंग्याचा, खोड्यांचा तिच्यावर फारसा परिणाम होत नसे; आणि श्रीमती ग्रे गावंढळ आणि बावळट होत्या: त्यांच्यावर कश्याचाही फरक पडत नसे.

पण मिसेस जॉबर्ट! आम्ही तिच्या सहनशक्ती परिक्षाच घेत असू, तेव्हा मात्र तिचा राग अनावर होत असे; आम्ही चहा पिताना सांडला किंवा टोस्टचा चुरा खाली पाडला तर त्यांना चालत नसे, आम्ही आमची पुस्तके छतावर लपवून ठेवत असू. पट्टी, पेन्सिलने डेस्कवर ताल धरून गाणी म्हणत हुल्लडबाजी करण्यात आम्ही आनंद मिळे आणि मिसेस जाँबर्टना संतप्त होत. थिओडोर, तुला ते आनंदाचे दिवस आठवतात का?

"हो नक्कीच," लॉर्ड इंग्रामने हळूच उत्तर दिले; आणि ती म्हातारी आम्हाला दुष्ट मुले म्हणायची. मग आम्ही तिला दाखवून दिले की आम्ही किती तयारीची मुले आहोत, हे समजून घेणे, तिच्या आकलनाच्या बाहेरची गोष्ट आहे."

a

“होय, आणि आपण तुझे शिक्षक, मिस्टर विनिंगचा आणि मिस विल्सनचे प्रेमप्रकरण उघडकीस आणले होते. आईला समजल्यावर, तिने ते अनैतिक असल्याचे घोषित केले; बरोबर ना आई?”

“होय, चांगल्या घरात असे प्रेमप्रकरण निर्माण होऊ देऊ नये याची हजारो कारणे आहेत.”

“आपल्या सर्वांना हे माहित आहे: निरागस मुलांसमोर एक वाईट उदाहरण; शिक्षक आणि गव्हर्नेस यांचे, त्यांच्या कर्तव्याकडे सतत दुर्लक्ष होते; दोघांचे एकमत झाले की मग मालकांविषयी अपरिहार्य उद्धटपणा सुरू होतो; बंड आणि सामान्य विद्रोह. मी बरोबर आहे का, इंग्राम-पार्कच्या बॅरोनेस इंग्राम?”

“होय, तू नेहमीप्रमाणेच बरोबर आहेस.”

“मग त्याबद्दल अधिक बोलण्यात अर्थ नाही; चला विषय बदलूया.”

एमी एश्टनने हे वाक्य ऐकले नाही किंवा तिला त्याकडे लक्ष द्यायचे नव्हते, कारण ती तिच्या मऊ, बालिश आवाजात म्हणाली:

“मी आणि लुईसाही आमच्या गव्हर्नेसला त्रास द्यात असू; पण ती इतकी चांगली होती की तिने सर्वकाही सहन केले; ती कधीही आम्हाला रागे भरली नाही, बरोबर ना लुईसा?”

“अरे! होय! आम्हाला जे हवे ते आम्ही तिच्या बरोबर करत असू, आम्ही तिचा डेस्क, तिची कामाची पेटी कितीतरी वेळा विस्कटली किंवा तिच्या ड्रॉवरमध्ये हात घातला, तरीही तिने आम्हाला दोष दिला नाही; उलट ती इतकी चांगली होती की ती आम्ही जे काही मागू ते देत असे.”

“हा योगायोग असेल, “मिस इंग्राम आपले उपरोधिक ओठ चावत म्हणाली, “काय आपण गव्हर्नेसच्या सर्व गुणांचा पाढा ऐकण्यास बांधील आहोत?” कंटाळा आला, आपण संभाषण बदलू.” मग विषय बदलण्यासाठी तिने रोचेस्टरना गाणे

गाण्याविषयी विनंती केली, आणि स्वतः पियानो वर साथसंगत करण्यासाठी तयार झाली.

मिस इंग्राम डौलात पियानोवर बसली होती. तिने आपला पांढरा पोशाख, राजेशाही पद्धतीने पसरवल्यानंतर, तिने आपले बोलणे न थांबवता एक शानदार प्रस्तावना सादर केली. आपण कसे चांगले आहोत, इतर लोकांपेक्षा आपल्याला सर्वच गोष्टीबद्दल अधिक माहिती आहे हे दर्शविणारा करणारा एक नमुनाच तिने सादर केला. आज श्रोत्यांकडून फक्त प्रशंसाच मिळवण्यासाठी नव्हे तर त्यांना आश्र्चर्यचकीत करायचा तिचा इरादा दिसत होता. आपल्या सौंदर्याच्या आणि प्रतिभेच्या तेजाने सर्वांना दिपवून टाकायचे ठरवलेले दिसत होते. मला मात्र तिचा पवित्रा चलाख आणि धाडसी वाटला.

"आजकालच्या तरुण मुलांना पाहून, त्यांची किंव येते, स्वतःच्या घराच्या गेट बाहेर जाण्यासाठी त्यांना आईची परवानगी लागते, सुंदर दिसण्यासाठी, त्यांचा खटाटोप सुरु असतो, चेहऱ्याची निगा, हाता पायाची निगा, किंमती वस्त्रप्रावरणे यात तरूण गुंतलेले असतात, जणू सौंदर्याचा विशेषाधिकार, स्त्रियांचा नसून पुरुषांचा असावा. या उलट, माझ्या मते, सौंदर्य हा स्त्रियांचा प्रांत आहे, पुरुषांचा नाही, त्यांनी फक्त धैर्य आणि शक्तीची आराधना करायला हवी. शिकार, नेमबाजी, लढाया यामध्ये नैपुण्य मिळवणे हा पुरुषार्थ आहे.

"जेव्हा माझे लग्न होईल," ती पुढे म्हणाली, "माझा पती माझा प्रतिस्पर्धी न होता मला पुरक असायला हवा, मला माझ्या अधिकारात कोणी वाटेकरी नको आहे, मला पुर्णतः पत्नीपदाचा मान मिळायला हवा, त्याची पुर्ण निष्ठा त्याच्या स्वतःच्या आरश्यातील प्रतिबिंबापेक्षा, माझ्याप्रती असायला हवी." आता गायला सुरवात करावी, मिस्टर रोचेस्टर, "मी तुम्हाला साथ देईन."

"मी तयार आहे."

a

“कॉर्सेअरचे गाणे म्हणाल काय? मला कार्सेअर माझे आवडते आहे.”

“जशी आपली ईच्छा.”

“गाताना मात्र काळजी घ्या. जर का मला आवडले नाही, तर मला तुम्हाला कसे गायचे ते गाऊन दाखवावे लागेल आणि तुमची शोभा होईल.”

“अरे व्वा!, तसे असेल तर आमचे भाग्यच म्हणायचे, मी मुद्दाम बेसुर गाण्याचा प्रयत्न करेन.”

“आपण जाणूनबुजून चूक केल्यास, शिक्षेस पात्र असाल.”

“मिस इंग्रामने दयाळूपणा दाखवावा, आमच्या सहनशक्तीची परिक्षा पाहू नये.”

“नेमके आपल्याला काय म्हणायचे आहे, ते जरा स्पष्टपणे सांगाल काय?”

₹माफ करा मॅडम; तुम्हाला कोणत्याही स्पष्टीकरणाची गरज नाही; एव्हढी गोष्ट तुमच्या अंतःप्रेरणेने तुम्हाला समजली असेल की आपण, आपली मर्जी खप्पा झाल्यास, देहदंडाची शिक्षा पण फर्मावू शकाल.”

“आता गाणे सुरू करावे,” पुन्हा पियानोवर साथसंगत सुरू करत ती म्हणाली.

“आता इथून निघून जावे,” असा मी विचार केला; पण माझ्या कानावर पडणाऱ्या सुरेल स्वरांनी मला खिळवून ठेवले.

मिसेस फेअरफॅक्सनी मला सांगितले होते की मिस्टर रोचेस्टरचा आवाज सुंदर आहे;

खोल, गंभीर त्यात त्यांनी त्यांच्या भावना आणि शक्ती ओतली होती. त्यांचे मधुर स्वर कानावाटे थेट हृदयाकडे पोहोचत होते, एक अनोखी संवेदना निर्माण करत

होते. शेवट पर्यंत मी ऐकत होते. शेवटच्या सुराचे कंपन वातावरणात विरून जाईपर्यंत मी तिथेच थांबले, गाणे संपले,

नेहमीच्या प्रशंसामुळे होणारी हालचाल थोडीशी शांत होईपर्यंत मी थांबले: मग मी माझा कोपरा सोडला, सुदैवाने दरवाजा माझ्या अगदी जवळ होता, त्यातून बाहेर पडले. गँलरीतून मी हाँलमध्ये पोहोचले, तो ओलांडून मी पुढे जात असता, माझ्या बुटाची लेस सैल झाली, जिन्याच्या पायरीवर पाय ठेवून मी लेस बांधायला वाकले, एव्हढ्यात, जेवणाच्या खोलीचा दरवाजा उघडण्याचा आवाज आला, कोणीतरी माझ्या दिशेने येत होते; मी पटकन उभी राहिले, पाहिले तर मिस्टर रोचेस्टर समोर उभे होते.

“तू कशी आहेस?” त्यांनी मला विचारले.

“खूप छान सर.”

“तू दिवाणखान्यात येऊन माझ्याशी बोलली का नाहीस?”

मलाही हाच प्रश्न त्यांना विचारावासा वाटला, पण मला विचारण्याचे धाडस झाले नाही.

“तुम्ही व्यस्त दिसत होता, आणि मी तुम्हाला त्रास देण्याचे धाडस केले नसते सर.”

“आणि मी गेल्यावर तू काय केलेस?”

“काही विशेष नाही ; मी अॅडेलला शिकवत होते.”

“पण तू पहिल्यापेक्षा खूपच फिकट वाटत आहेस. मी पाहिल्यावर लगेच माझ्या लक्षात आले; काही झालयं काय?”

“काही नाही मी ठिक आहे, सर.”

“त्या रात्री तू मला पाण्यानी भिजवून टाकलेस, तेव्हा तुला गारठा बाधला काय? तुला सर्दी झाली का?”

“अजिबात नाही.”

“तर मग ड्राईंगरुम मध्ये परत जा, तू खूप लवकर निघून आलीस.”

“मी थकले आहे, सर.”

त्यांनी क्षणभर माझ्याकडे पाहिलं.

“आणि थोडी उदास,” ते पुढे म्हणाले; “काय झाले? कृपया मला सांग.”

“काही नाही, काही नाही, सर; मी दु:खी नाही.”

“मला उलट खात्री आहे; तू इतकी दु:खी दिसत आहेस की एखादा शब्द तुझ्या डोळ्यात अश्रू आणेल; नाही आताही अश्रू डोळ्यात तरळत आहेत, एक ओघळला देखिल. मी आता गडबडीत आहे आणि कोणी नोकरमंडळीमध्ये कडमडण्याची शक्यता पण आहे, नाहीतर मी सर्व जाणून घेतले असते; आजची वेळ मी तुला माफ करतो; परंतु हे लक्षात असू दे, जोपर्यंत माझे पाहुणे येथे आहेत, मी तुला दररोज संध्याकाळी लिव्हिंग रूममध्ये येण्यास बजावत आहे; माझी खूप इच्छा आहे; कृपया त्याप्रमाणे कर. आता जा आणि सोफीला अँडेलला आणण्यासाठी पाठवून दे . गुड नाईट, माझे ...”

ते थांबले, त्यांनी ओठ चावला आणि अचानक मला सोडून निघून गेले.

a

# प्रकरण 18

थॉर्नफिल्ड हॉलमध्ये हे आनंदाचे आणि व्यस्त दिवस होते: या छताखाली, पहिले तीन महिने शांतता, एकाकीपणा आणि एकसुरीपणामध्ये घालवले होते, सर्व दुःखी भावना आता घरातून बाहेर पडल्यासारख्या वाटत होत्या. उदासपणा नाहीसा झाला होता: सर्वत्र चैतन्य होते, दिवसभर गजबज होती. वाड्यात कुठेही गेले तरी सतत कोणी ना कोणी सामोरे येई, एखादी मोलकरीण अथवा पाहुण्यांचे नोकर नक्की भेटत.

स्वयंपाकघर, नोकरांची खोली, वाड्याचा मोठा सभामंडपही चैतन्यमय होता; निळे आकाश आणि वसंत ऋतूच्या सुंदर सुर्यप्रकाशात, किल्ल्यातील पाहुणे मिस्टर रोचेस्टरच्या शेतीवाडीत, जंगलात फिरायला बाहेर पडत, तेव्हाच काय ती ड्रॉईंग रूम शांत आणि रिकामी असे. जर कधी अचानक चांगले हवामान बदलून पावसाची पिरपीर सुरू झाली तरी थॉर्नफिल्डवरच्या आनंदाला बाधा येत नसे, अशा वेळी अनेक मनोरंजनाचे कार्यक्रम, वातावरण अधिक चैतन्यशील आणि अधिक वैविध्यपूर्ण बनवत असे.

एका संध्याकाळी वाड्यावर मनोरंजक कार्यक्रमाचे आयोजन करण्याचे, मि. रोचेस्टरनी ठरवले, मला ते काय करणार याविषयी आश्र्चर्य वाटले. 'शरेड् गेम' बद्दल मी प्रथमच ऐकत होते. नोकरांना बोलावून जेवणघरातील टेबल काढून जागा रिकामी केली गेली. दिव्यांची रचना बदलली, व्यासपीठाच्या समोर अर्धगोलाकार खुर्च्यांची मांडणी केली गेली. मि. रोचेस्टर आणि इतर पुरुष मंडळी देखरेख करून सुचना करत होते, स्त्री वर्गाची, जिन्यावरून सारखी ये जा सुरू होती, त्यांच्या सेवक सेविका पण लगबगीने कामाला लागल्या होत्या.

मिसेस फेअरफॅक्सना वाड्यात कोणकोणते कपडे, शाली आणि सर्व प्रकारचे वेषभूषेसाठी योग्य पोशाख, अलंकार, पडदे व नाटकासाठी लागणारे नेपथ्याचे साहित्य शोधून तयार ठेवण्यासाठी सांगितले होते; ब्रोकेडचे स्कर्ट्स, सॅटिनचे कपडे, तिसऱ्या मजल्यावरील कपाटात ठेवलेल्या लेस, हेअरस्टाइलचे सामान मोलकरणींनी खाली आणले; त्यातले योग्य ते कपडे निवडून लिव्हिंग रूमलालागून असलेल्या छोट्या खोलीत नेऊन ठेवले.

दरम्यान, रोचेस्टरनी सर्व स्त्रियांना एकत्र बोलावले, त्यांना त्यांच्या टीमचे सदस्य निवडायचे होते. “मिस इंग्राम माझ्या टीममध्ये नक्कीच आहे,” ते म्हणाले, नंतर त्यांनी मिसेस एश्टन आणि मिसेस डेंट यांची निवड केली. तिथे जवळच मी, मिसेस डेंट यांच्या ब्रेसलेटचा सुटलेला फासा नीट करत उभी होते, रोचेस्टरनी मला विचारले, “तू भाग घेणार काय?.” मी नकारार्थी मान हलवली, त्यांनी फारसा आग्रह केला नाही, ज्याची मला भीती वाटत होती पण मला माझ्या नेहमीच्या जागेवर जाऊ दिले.

नंतर रोचेस्टर आणि त्यांची माणसे, पडद्याआड गेली, दुसऱ्या टीमचे प्रमुख कर्नल डेंट होते, त्यांचे सदस्य अर्धगोलाकार मांडलेल्या खुर्च्यांवर बसले होते. त्यांच्यापैकी एक, मि. एश्टन यांनी, मला पाहून, त्यांच्या टीममध्ये घेण्यासाठी सुचना केली; पण लेडी इंग्राम, लगेचच ती उडवून लावत म्हणाल्या, “नाही, कोणत्याही अश्या खेळांसाठी, ती खूप मूर्ख दिसते.”

थोड्या वेळाने एक घंटा वाजली आणि पडदा वर गेला. कमानीच्याआतत, सर जॉर्ज लिन पांढरे कापड पांघरून एका, टेबलासमोर एक मोठे पुस्तक उघडून बसले होते; आणि त्याच्या बाजूला एमी एश्टन उभी होती, तिच्या हातात पण एक पुस्तक होते, कुठुनतरी मंजुळ घंटानाद झाला; मग ॲडेल एक फुलांची टोपली घेऊन आली आणि तिने फुले उधळली मग मिस इंग्राम येताना दिसली. तिने पांढरा पोशाख

घातलेला होता. डोक्यावर एक लांब बुरखा आणि तिच्या कपाळावर गुलाबाची माळ घातली होती: ती मिस्टर रोचेस्टर समवेत चालत आली आणि ते दोघे एकत्र टेबलाजवळ आले. त्यांनी गुडघे टेकले; मिसेस डेंट आणि लुईसा एश्टन यांनी सुध्दा पांढरे कपडे घातले होते त्या, दोघांच्या मागे उभ्या होत्या. सर्व समारंभ मुकपणे पार पडला, लग्न समारंभाचे मुकनाट्य ओळखणे सोपे होते. ते संपल्यावर कर्नल डेंट आणि त्यांच्या सदस्यांनी दोन मिनिटे कुजबुजत चर्चा केली, नंतर कर्नलने उत्तर ओळखले,

"वधू!" मिस्टर रोचेस्टरनी उत्तराचा वाकून स्विकार केला आणि पडदा पडला.

मध्यंतरात बराच वेळ गेला आणि पुन्हा पडदा वर गेला, यावेळी पूर्वीपेक्षा अधिक तयारीने रंगभूमीवरील देखावा सादर केला होता. पायऱ्यांपैकी सर्वात उंचीवर एक मोठे संगमरवरी, पाण्याचे कुंड ठेवले होते जे नेहमी बागेत ठेवलेले असे, त्यात रंगीबेरंगी माशांनी पोहताना दिसत; त्याचा आकार आणि वजन पाहता, ते उचलून आणणे अवघड काम होते. त्याच्याबाजूला, मिस्टर रोचेस्टर, शाल गुंडाळून आणि डोक्यावर फेटा बांधून, बसले होते; त्यांचे काळे डोळे, निमगोरा रंग आणि यहुदी लोकांसारखी चेहरेपट्टी यामुळे त्यांना पेहराव शोभून दिसत होता; एखाद्याने त्यांना 'पूर्वेचा अमीर' म्हटले असते; मग मी मिस इंग्रामला पुढे येताना पाहिले; तिने पौर्वात्य पद्धतीचा पोशाख केला होता: कमरेभोवती लाल पट्टा बांधला होता; एक नक्षीदार रुमाल कपाळावरुन घेऊन कानामागे बांधला होता; तिचा पोशाख, तिचा रंग आणि शरीराची ठेवण पाहून ती जुन्या काळातील सुंदर इस्रायली राजकन्या वाटत होती; आणि हेच तिला दाखवायचे होते. मिस इंग्राम पाणी भरण्याचा घडा घेऊन पाण्याच्या कुंडाजवळ गेली आणि पाणी भरण्यासाठी वाकून घडा डोक्यावर घेणार होती, तोच खाली बसलेला माणूस तिच्याकडे मुकयाचना करत असल्याचे दिसले. तिने त्याला

घड्यातील पाणी पिण्यासाठी दिले. तहान भागल्यावर त्याने अंगरख्याच्या खिश्यातून एक डबी काढली आणि त्यातील सुंदर बांगड्या आणि झुमके तिला दाखवले. तिने आश्चर्याचा आणि आवडल्याचा अभिनय केला; त्या अनोळखी व्यक्तीने वाकून ते तिच्या पायावर ते दागिने वाहिले, ते पाहून तिने अत्यानंद झाल्याचे दर्शविले, त्या अनोळखी व्यक्तीने पुढे होऊन तिच्या हातात बांगड्या भरल्या आणि झुमके तिच्या कानात घातले: ते दोघे, एलिएजर आणि रिबेकाची भुमिका वठवत होते; मात्र तिथे फक्त उंटांची कमी होती.

मिस्टर डेंट आणि त्याच्या साथीदारांनी पुन्हा एकमेकांचा सल्ला घेतला; परंतु असे दिसते की त्यांचे एकमत होऊ शकले नाही, कारण कर्नलने निर्णय घेण्यापूर्वी शेवटचा प्रवेश पाहाणार असल्याचे सांगितले. आणि पडदा पुन्हा खाली गेला.

तिसऱ्या प्रवेशात फक्त, दिवाणखान्याचा काही भागच दिसत होता; बाकीचे सर्व पडद्याने लपवून ठेवलेले होते, संगमरवरी पाण्याचे कुंड तेथून काढले होते, फक्त एक खुर्ची आणि ऑफिस टेबल कंदीलाच्या अंधुक प्रकाशात दिसत होते. मेणबत्त्या विझल्या होत्या.

या दुःखद दृश्याच्या मध्यभागी एक माणूस बसला होता; गुडघे हातांनी पकडून खाली जमिनीकडे नजर लावून बसला होता. उग्र चेहरा, जीर्ण कपडे, कोटाची एक बाही मारामारीमध्ये फाटल्यामुळे लोंबत होती, चेहरा हताश, केस विस्कटलेले दिसत होते ; ते मिस्टर रोचेस्टर होते, त्यांनी थोडीफार हालचाल केली ; तोच लोखंडी साखळीचा आवाज आला कारण त्यांचे हात साखळदंडाने बांधलेले होते.

“ब्राइडवेल!” कर्नल डेंट लगेच ओरडले. ब्राइडवेलचा तुरुंग बरोबर ओळखला गेला होता आणि शेराड् संपले.

कलाकार त्यांचे नेहमीचे पोशाख करून तेव्हा ते जेवणाच्या खोलीत परतले; मिस्टर रोचेस्टर आणि मिस इंग्राम एकत्र चालत होते; त्यांच्या अभिनयाची तिने तारीफ केली.

ती म्हणाली, "तुला माहीत आहे का, मला तुमची शेवटची भूमिका आवडली. तुमचा जन्म काही वर्षांपूर्वी झाला असता, तर तुम्ही एक शूर डाकू बनला असता."

"मी माझ्या चेहऱ्यावरचा मेकअप नीट पुसला आहे काय?" त्याने तिच्याकडे वळून विचारले.

"होय, त्यामुळे तुम्ही हुबेहुब गुन्हेगार दिसत होतात."

"मग, तुम्हाला रस्त्यावरचे हिरो आवडतात का?"

"होय, इटालियन डाकू नंतर मी त्यांनाच पसंत करेन; आणि त्याहीपेक्षा जास्त फक्त भुमध्य सागराच्या पुर्वेकडील समुद्री चाचे."

"ठीक आहे, मी जो कोणी आहे, ते लक्षात आहे ना? तू माझी पत्नी आहेस; या सर्व साक्षीदारांच्या उपस्थितीत एक तासापूर्वी आपले लग्न लागले होते."

ती लाजली आणि हसायला लागली.

"आता, कर्नल डेंट," मिस्टर रोचेस्टर म्हणाले, "तुमची पाळी आहे."

कर्नल डेंट आणि त्याच्या टीमने प्रेक्षकातील जागा सोडल्या. त्या रिकाम्या जागांवर रोचेस्टरचे सदस्य बसले; मिस इंग्राम रोचेस्टरांच्या उजव्या बाजूला उभी राहिली आणि प्रत्येकाने त्यांची जागा निवडली. मी नवीन कलाकारांकडे लक्ष दिले नाही; यापुढे पडदा वर जाण्यात आणि सादरीकरण पहाण्यात मला काही स्वारस्य राहिले नव्हते; माझे सर्व लक्ष प्रेक्षकांनीच वेधून घेतले होते. माझे डोळे वेळोवेळी अर्धगोलाकार ठेवलेल्या खुर्च्यांकडे वळत होते. कर्नल डेंटच्या टीमने कोणते शेराड् सादर केले, कोणता शब्द निवडला आणि कलाकारांनी त्यांच्या भूमिका कोणत्या

a

पद्धतीने साकारल्या होत्या, यातील आता काही आठवत नाही पण प्रत्येक प्रवेशानंतर, रोचेस्टर आणि मिस इंग्राम यांच्यात झालेली चर्चा मात्र अजूनही माझ्या डोळयासमोर घडत असल्यासारखी वाटते: मि. रोचेस्टर, मिस इंग्राम कडे वळून पहातांना; मिस इंग्राम झुकून त्यांच्याशी बोलताना; त्यांच्या खांद्यापर्यंत आलेले तिचे केस, त्यांच्या गालाला स्पर्श करताना; त्यांची आपापसातील कुजबुज, मला अजूनही ऐकू येते, त्या दोघांमधील नेत्रपल्लवी; हे सर्व पहातांना माझ्या मनात उठलेले भावनांचा कल्लोळ, याक्षणी सुध्दा माझ्या आठवणीत आहे.

मला नि:संकोचपणे कबूली द्यायला आवडेल, की माझी प्रीती आता मि. रोचेस्टरवर जडली होती: आता मी अप्रीती करू शकत नव्हते, ते माझ्याकडे दुर्लक्ष करत, मी त्या्च्या अवतीभवती असले तरी एखाद्यावेळी सुद्धा माझ्या दिशेला नजर वळवून बघत नसत कारण त्यांचे सर्व लक्ष मिस इंग्रामकडे वेधले गेले होते. मिस इंग्राम, शेजारून जाताना, तिच्या गाऊनचा मला, ओझरता स्पर्श जरी झाला तरी ती माझा तिरस्कार करत असे. चुकून तिची नजर माझ्यावर पडली, तर तात्काळ दुसरीकडे वळवत असे जणू तेव्हढी सुध्दा माझी लायकी नाही. मी त्यांच्यावर अप्रीती करु शकत नव्हते कारण लौकरच त्यांचे, त्या सरदार कन्येशी लग्न होईल असे वाटत होते कारण तिच्या नजरेत त्यांच्या आदबशीर वागण्याबद्दल अभिमान आणि खात्री दिसून येत होती. मी रोचेस्टरांच्या प्रेमरंजनाचे अवलोकन केले पण मला त्यात त्यांनी फारसे प्रयत्न न करता, यश मिळवल्याचे दिसत होते. हा निष्कळजीपणा जितका मोहक होता तितकाच आकर्षक आणि अभिमानास्पद होता.

मात्र या सर्व गोष्टी माझ्या प्रेमाला हद्दपार करू शकल्या नाहीत किंवा माझ्या प्रेमाची धग थंडही करू शकल्य नाहीत; निराशा, मत्सर निर्माण होणे शक्य होते: माझ्यासारख्या सामान्य मुलीला, मिस इंग्राम सारख्या सरदार कन्येचा मत्सर वाटणे सहाजिकच आहे पण मला मत्सराची बाधा झाली नाही आणि थोडीफार झाली

a

असेल तर अगदी क्वचित. ज्या प्रकारच्या वेदना मी सहन करत होते, त्या शब्दात व्यक्त करणे शक्य नाही. मुळात मिस इंग्राम मत्सर करावा अशी व्यक्तीच नव्हती. मत्सर वाटण्यायोग्य तिचे व्यक्तित्व उत्तुंग नव्हते कदाचित हा विरोधाभास वाटेल पण तिचे वागण्यात दिखाऊपणा होता. तिच्यामध्ये खरेपणा नव्हता. ती सुंदर होती, अनेक उत्तमोत्तम कौशल्ये संपादन केलेली होती, पण मनाने दरिद्री होती. तिचे हृदय कोरडे होते. तिथे काही, चांगले रुजणे, फुलणे, फळणे शक्य नव्हते. ती चांगली नव्हती, तिच्यामध्ये स्वत्व नव्हते, ती जे काही वागायची, बोलायची ते पुस्तकी पांडित्य होते. ना तिला स्वतःचे मत होते ना तिने कधी ते मांडले. वेगवेगळ्या भावनांवर उच्चरवाने भाष्य करणे तिला जमत असे पण सहानुभूती, दया या भावनांचा तिच्यापाशी अभाव होता. ती प्रेमळ, सत्यवादी तर नव्हतीच पण फसवणूक करणारी होती. हा तिचा स्वभाव छोट्या अँडेलच्याबाबत खोट्यानाट्या गोष्टी रचून सुडबुध्दीने तिरस्कार निर्माण करताना दिसून आला. अँडल तिच्या जवळपास फिरकल्यास, काहीतरी अपमानास्पद विशेषण लावून तिला तेथून पळवून लावत असे. खोलीतून आज्ञा सोडत असे. तिच्याबरोबर वागताना अत्यंत थंडपणे आणि खवचटपणे बोलत असे. माझ्याशिवाय इतर लोकांच्या पण लक्षात तिचे हे वागणे आले होते. मुख्य म्हणजे तिचे भावी पती, रोचेस्टरांचे यावर बारीक लक्ष असे. त्यांची अँडेलच्या संरक्षकाची भुमिका जरी त्यांच्या विचारशक्तीची परिपक्वता दाखवत असली तरी, त्यामुळे त्यांना त्यांच्या भावी पत्नीच्या दोषांची जाणीव आहे हे स्पष्ट होत होते. त्यामुळे की काय रोचेस्टरांच्या भावनांमध्ये उत्कटतेचा अभाव होता आणि तेच मला सदैव छळणाऱ्या वेदनांचे कारण होते.

रोचेस्टर, मिस इंग्राम बरोबर लग्न करणार असल्याचे माझ्या लक्षात आले. त्याची काही कौटुंबिक अथवा राजकीय कारणे असावीत कारण तिचा दर्जा आणि नातेसंबंध त्यांना अनुकूल होते परंतु मला असे वाटत होते की त्यांनी आपले प्रेम

तिला दिलेले नसून, तिने आपली कौशल्ये हुषारीने वापरून मोठ्या खुबीने त्यांच्या प्रेमाचा खजिना त्याच्यापासून जिंकून घेतला होता. हाच एक मुद्दा मला खटकत होता आणि त्याचेच दु:ख होत होते: ती त्यांना रिझवू शकत नाही त्याचा मला त्रास होत होता.

जर तिने खऱ्या प्रेमाने त्यांना जिंकले असते आणि त्यांनी, त्याचा प्रामाणिकपणे स्विकार करून आपले हृदय तिच्या पायावर अर्पण केले असते तर मी स्वतः त्यांच्या मार्गातून दूर झाले असते. जर मिस इंग्राम खरोखरच नीतिमान आणि उदात्त स्त्री असती आणि वागण्याबोलण्यातून, तिच्या मनाचा, बुध्दीचा, स्वभावाचा, प्रामाणिक कौल, जर रोचेस्टरांची पती म्हणून निवड दर्शवीत असता तर मला मत्सर आणि निराशा या दोन्हींचा सामना करावा लागला असता: हृदय भग्न झाले असते; पण, तरीसुद्धा मी तिची प्रशंसाच केली असती, तिचे श्रेष्ठत्व मान्य केले असते आणि उर्वरित आयुष्य समाधानाने व्यतीत केले असते. जेव्हढे तिचे श्रेष्ठत्व उच्च असेल, तेव्हढी जास्त मी तिची प्रशंसा केली असती आणि मी खऱ्या अर्थाने स्वस्थचित्त झाले असते. पण वास्तवात चित्र उलटे होते. मिस इंग्रामचे रोचेस्टरना आकर्षित करण्याचे जेव्हढे म्हणून प्रयत्न चालले होते, त्यात तिला सातत्याने अपयश पदरी पडताना दिसत होते पण तिच्या ते लक्षात येत नव्हते उलट आपला प्रत्येक प्रयत्न यशस्वी होत आहे या भ्रमात ती होती. त्यामुळे तिचा अभिमान आणि आत्मसंतुष्टता एव्हढी वाढली की, त्याचा उलटा परिणाम, तिचा त्यांना आकर्षित करण्याच्या प्रयत्नांवर झाला. त्यांची सततची चिडचिड आणि आत्मनियमन, हे त्याचे साक्षीदार होते.

तिच्या प्रयत्नांना अपयश येतांना मी पहात होते कदाचित ती यशस्वी होऊ शकली असती. जे बाण ती रोचेस्टरांच्या हृदयाचा वेध घेण्यासाठी सोडत होती, ते हृदय वेधण्याऐवजी त्यांच्या पायापाशी पडत होते. माझ्यामते तिने स्थिर हातानी वेध

घेतला असता तर कदाचित त्यांचे गर्विष्ठ हृदय खोलवर भेदले गेले असते; त्यांच्या डोळ्यात प्रेम व चेहऱ्यावर मृदुता आणू शकले असते: किंवा त्याहीपेक्षा, शस्त्राविना अबोलपणे वश करून, विजय मिळवता आला असता.

मिस इंग्राम, सतत त्याच्या सानिध्यात राहून देखील, “त्याच्यावर प्रभाव का टाकू शकत नाही,” मी विचार केला, “नाही, ती त्याच्यावर खऱ्या अर्थाने प्रेम करत नसावी; अन्यथा तिला वाजवी पेक्षा जास्त हसण्याची सतत नेत्रकटाक्ष टाकून त्यांचे लक्ष वेधून घेण्याची, मुद्दाम वातावरण निर्मिती करून कृपावर्षाव करण्याची गरज पडली नसती: त्यापेक्षा, मला वाटते की शांतपणे त्यांच्यासोबत बसून कमी बोलून आणि कमी लक्ष वेधण्याचे ठरवले असते तरी तेव्हढे तिच्यासाठी पुरेसे झाले असते, हा त्यांच्या हृदयापर्यंत थेट पोहोचण्याचा मार्ग होता. मी त्यांच्या वेगळा चेहरा पाहिला होता, मंद स्मित, मृदु भावना दर्शवीणारा मात्र मिस इंग्राम सतत त्यांच्याबरोबर लाडेलाडे बोलताना, मला त्यांचा चेहरा कठोर झालेला दिसत होता. त्यांना प्रसन्न करण्यासाठी बौध्दिक कसरत वा योजून ठेवलेल्या क्लुप्त्या वापरण्याची गरज नव्हती, ते त्याशिवायही प्रसन्न राहू शकत होते; त्याकरिता, त्यांनी विचारलेल्या प्रश्नांची खरीखुरी उत्तरे देणे, ते काही तिरसटपणे बोलले तर, त्यांच्याबरोबर बोलताना कडवटपणा येणार नाही याची काळजी घेणे आणि जरी जास्तच रागात असले तरी स्वतः शांत मैत्रीपूर्ण वागणे गरजेचे होते. आपल्या वागण्याने एखाद्याला सुर्यकिरणांसारखे उबदार वाटले पाहिजे. लग्न झाल्यावर ती त्यांना कशी काय संतुष्ट करेल? मला वाटत नाही की ती करू शकेल, पण करणे अशक्य नाही, मला असा विश्वास वाटत होता की त्यांची पत्नी, जगातील आनंदी स्त्रियांपैकी एक असेल.”

a

मी आतापर्यंत मि. रोजेस्टरांचा मिस इंग्राम बरोबर लग्न ठरवण्या मागील हेतू, तिचे सामाजिक स्थान आणि उच्चभ्रू समाजातील संबंध याला महत्त्व दिल्याबद्दल दोष दिला नाही पण जेव्हा मला त्यांचा हेतू लक्षात आला तेव्हा मात्र आश्र्चर्य मात्र वाटले. मला ते पत्नीची निवड करतांना या गोष्टींना महत्व देतील असे वाटले नव्हते, पण नंतर विचार केल्यावर माझ्या लक्षात आले, जोडीदार निवडतांना, सामाजिक स्थान, शिक्षण या गोष्टींचे महत्व त्यांच्या जडणघडणीत लहानपणापासून रुजले गेले असावे, त्यामुळे मला त्यांना त्याबद्दल दोष देणे योग्य वाटले नाही. उच्चभ्रू समाजात ही तत्वे सर्वमान्य आहेत आणि त्याची त्यांची अशी विशिष्ट कारणे असू शकतील, जी माझ्या आकलनाच्या पलीकडे आहेत. त्यांच्या जागी जर मी असते तर पत्नी म्हणून निवड करतांना या अशा बाबी हिशोबात धरण्याऐवजी मी फक्त तिच्यावरील प्रेमाला महत्त्व दिले असते, परंतु प्रेमाच्या परिपुर्ती ऐवजी, इतर गोष्टी समाजात महत्त्वाच्या असतात ह्याबद्दल मी अनभिज्ञ होते: अन्यथा सर्व जग माझ्याच इच्छेनुसार चालले असते.

या व्यतिरिक्त इतर अनेक बाबींविषयी, माझे मन बरेसे मि. रोजेस्टरांच्या बाजुला झुकले होते. त्यांच्या चुका ज्यापुर्वी मला खटकत होत्या, त्या मी विसरत चालले होते, त्यांच्या स्वभावाचा सर्व बाजूंनी विचार करण्याचा माझा प्रयत्न होता. चांगल्याबरोबर वाईट बाजू पण विचारात घ्यायला हवी होती, योग्य पारख करण्यासाठी, दोन्ही बाजूंचा विचार करणे आवश्यक होते पण आता मला त्यांच्यामध्ये काहीही वाईट दिसेनासे झाले. त्यांचे उपहासात्मक बोलणे, त्यांचा निष्ठूरपणा ज्यामुळे मी अस्वस्थ होत होते, त्याला आता जेवणाची लज्जत वाढवणारा मसालेदार घटक समजू लागले: झणझणीतपणा नसल्यास जेवण मिळमिळीत लागते.

काहीतरी अस्पष्ट अशी जाणीव मला होत होती--- ती अशुभ अथवा दु:खदर्शक होती की निराशामुळे प्रगटली होती?---- काळजीपूर्वक पहाणाऱ्याच्या नजरेला क्वचित जाणवली असती आणि तिच्या व्याप्तीचा अंदाज येण्यापूर्वी नाहीशी होत असे. त्यामुळे मी भीतीने गोठून गेले जणू काही मी ज्वालामुखीच्या डोंगरातून भटकत आहे आणि अचानक पायाखालची जमीन खचून पायथ्याशी भीतीने थरथर कापत आहे असे घडत आहे असा भास झाला, माझे हृदय जोरजोराने धडधडत होते पण जाणीवा शाबूत होत्या, तेथून पलायन करून सुटका करून घेण्याऐवजी मी धाडस करायची इच्छा बाळगली होती. मला वाटले मिस इंग्राम सुदैवी आहे कारण एके दिवशी ती निवांतपणे त्या अथांग डोहात डोकावू शकते, त्यातील रहस्ये शोधू शकते आणि त्याचे स्वरूप जाणून घेऊ शकते.

दरम्यानच्या काळात मी फक्त रोचेस्टर आणि त्यांच्या भावी पत्नीचा विचार केला.

त्यांना पहाणे त्यांच्यातील संवाद ऐकणे आणि त्यांच्या हालचालींकडे माझी नजर अभावीतपणे जात होती. रोचेस्टरचे इतर पाहुणे त्यांच्या त्यांच्या आवडीनुसार वागण्यात दंग होते. लेडी लिन आणि लेडी इंग्राम यांच्या गप्पा रंगल्या होत्या. बोलण्याच्या विषयांनुसार त्यांचे हातवारे भावभावना बदलताना दिसत होत्या; मिसेस डेंट आणि मिसेस एश्टन कधीकधी माझ्याशी हसून एकदोन वाक्ये बोलत असत. सर जॉर्ज लिन, कर्नल डेंट आणि मिसेस एश्टन, राजकारण, न्याय किंवा काऊंटीतील प्रकरणांवर चर्चा करत; लॉर्ड इंग्राम, एमी एश्टनशी गप्पा मारत; लुईसा आणि मि. लीन यांनी एकत्र गायन, वादन केले आणि मेरी इंग्राम निरुत्साहाने इतरांनी सांगितलेल्या शौर्यगाथा ऐकताना दिसली. काहीवेळा जणू काही ठरवून सर्वजण मि. रोचेस्टर आणि मिस इंग्राम यांच्या कलागुणांना दाद देण्यासाठी एकत्र येत. मिस इंग्राममुळे कार्यक्रमात चैतन्य सळसळत असे तर मि. रोजेस्टर थोड्या वेळासाठी जरी

a

अनुपस्थित असले तर सर्वत्र शांतता पसरत असे, आणि जेव्हा परत येत, तेव्हा परत कार्यक्रम सुरू होत.

त्यादिवशी रोचेस्टरना काही कामानिमित्त मिलकोटला जायचे होते आणि परतण्यास उशीर होणार होता. इतर सर्व मंडळींनी जवळच असलेल्या जिप्सी लोकांच्या तांड्याला भेट देण्याचे ठरवले पण पावसाने या बेतावर पाणी फिरवले. काही पुरुष मंडळी घोड्यांच्या तबेल्याकडे गेली. तरूण मंडळी बिलीयर्डस् खेळण्यासाठी पळाली. लेडी इंग्राम आणि लेडी लिन शांतपणे पत्ते खेळत बसल्या; ब्लाँचे इंग्राम, मिसेस डेंट आणि मिसेस एश्टन गप्पा मारत बसल्यानंतर त्यांनी थोडावेळ पियानोच्या साथीने गाणी गायली. मिस इंग्राम शेवटी कंटाळून एक कादंबरी वाचत सोफ्यावर जाऊन बसली आणि रोचेस्टरांची अनुपस्थिती मनोरंजक काल्पनिक कथांनी थोडीफार सुसह्य करण्याचा प्रयत्न केला. घरभर शांतता होती; फक्त बिलियर्ड रूममध्ये वेळोवेळी आनंदी हास्याचा आवाज ऐकू येत होता.

संध्याकाळ जवळ येत होती; रात्रीच्या जेवणासाठी कपडे बदलण्याची वेळ आली आहे याची आठवण करून देण्यासाठी बेल आधीच वाजली होती, अॅडेल लिव्हिंग रूमच्या खिडकीसमोर उभी होती ती ओरडली:

“ मिस्टर रोचेस्टर येत आहेत.”

मी मागे फिरले; मिस इंग्राम उठून उभी राहिली आणि सर्वांनी खिडकीकडे पाहिले कारण त्याच क्षणी त्यांना वाड्याच्या मार्गावर घोडागाडीच्या चाकांचा आवाज ऐकू आला; आणि एक घोडागाडी पुढे येताना दिसली.

“तो घोडागाडीतून कसा परत आला?” मिस इंग्राम म्हणाली; तो त्याच्या

मेसरूरवरून गेला होता आणि पायलट त्याच्यासोबत होता; त्यांना सोडून गाडीतून कसा आला?”

हे शब्द बोलून ती खिडकीजवळ गेली, त्यामुळे मला मागे सरकणे भाग पडले: प्रथम तिचे माझ्याकडे लक्ष गेले नाही पण जेव्हा तिने मला पाहिले तेव्हा तिने तिरस्काराने तोंड वाकडे केले आणि दुसऱ्या खिडकीकडे गेली. घोडागाडी थांबली. गाडीवानाने बेल वाजवली आणि एक गृहस्थ प्रवासी कपडे घालून बाहेर पडले. मिस्टर रॉचेस्टरच्याऐवजी, मी एक अद्ययावत पद्धतीचा पोशाख केलेला उंच अनोळखी गृहस्थ पाहिला.

"खोटारडी कुठली!" मिस इंग्राम अँडेलला उद्देशून ओरडली; खोटी माहिती देण्यासाठी तुला या खिडकीवर बसवले आहे काय?"

तिने माझ्याकडे नाराजीपूर्ण कटाक्ष टाकला, जणू काही मीच या चुकीचे कारण आहे.

भल्या मोठ्या सभागृहात चर्चा झाली आणि नवोदिताची ओळख झाली; त्याने लेडी इंग्रामला सलाम केला कारण ती सर्वात वयस्कर महिला वाटत होती.

"असे दिसते की मी चुकीच्या वेळी आलो, मॅडम," तो म्हणाला; माझा मित्र मिस्टर रोचेस्टर अनुपस्थित आहे; पण मी आत्ताच लांबच्या प्रवासातून आलो आहे आणि तो परत येईपर्यंत इथे राहू शकतो काय? आमच्या जुन्या मैत्रीवर विश्वास ठेवावा."

त्याची वागणूक सभ्य होती; त्याच्या उच्चारात काहीतरी वेगळेपण खास होते; तो मला परदेशी किंवा इंग्रज वाटत नव्हता; तो तीस ते चाळीस वर्षांचा मिस्टर रोचेस्टर एव्हढाच दिसत होता. जर त्याचा रंग इतका रापलेला नसता तर नवोदित व्यक्ती विशेषतः पहिल्या दृष्टीक्षेपात सुंदर दिसली असती; रात्रीच्या जेवणानंतर मला पुन्हा तो अनोळखी माणूस दिसला; आता त्यांचे अवघडलेपण थोडे कमी झाल्यासारखे वाटले परंतु चेहरेपट्टी सुरवातीला वाटली इतकी चांगली वाटली नाही;

ती अस्थिर आणि निर्जीव वाटत होती. डोळे इतस्ततः निरर्थकपणे भिरभिरत होते त्यामुळे तो विचित्र वाटत होता. मला तो दिसायला देखणा असले तरी आवडला नाही. अगदीच शक्तीहीन आणि निसत्व असे व्यक्तिमत्त्व होते.

माझ्या नेहमीच्या जागी बसून मला तो सहज दिसत होता, कारण शेकोटीच्या मेणबत्तीने त्याचा चेहरा पूर्णपणे उजळला होता; तो शेकोटीच्या सर्वात जवळच्या खुर्चीवर बसले होते, बहुधा त्याला जास्त थंडी वाजत असावी. मी त्याची तुलना मिस्टर रोचेस्टरशी केली; मला असे वाटते की, त्या दोघांमधील फरक मोहक हंस आणि जंगली बहिरी ससाणा किंवा गरीब मेंढी आणि मेंढ्यांच्या कळपाचे रक्षण करणारा शिकारी कुत्रा यापेक्षा फार मोठा असू शकत नाही.

त्याने मिस्टर रोचेस्टरांचा जुना मित्र म्हणून ओळख सांगितली होती; परस्परविरोधी व्यक्तींची मैत्री! जुन्या समजूतीचे उत्तम उदाहरण: दोन वरवरच्या विरुद्ध भासणाऱ्या व्यक्तींमध्ये स्पष्ट फरक असूनही प्रत्यक्षात काही साम्य किंवा समानता असू शकते.

दोन-तीन सद्गृहस्थ त्याच्यासमवेत बसून बोलू लागले, माझ्या कानावर अधूनमधून त्यांच्यामधील संभाषण पडत होते, त्यातून मला फारसा अर्थबोध झाला नाही.

माझ्याजवळ बसलेल्या लुईसा एश्टन आणि मेरी इंग्राम सतत त्या परदेशी माणसाविषयी बोलत होत्या, दोघींनी त्याच्या वागणूकीची प्रशंसा केली. एकंदरीत दोघींना तो खूप देखणा वाटला.

मि. लिनने लुईसा व मेरीला, नियोजित सहलीबद्दल सांगण्यासाठी बोलावले आणि त्या निघून गेल्या. त्यामुळे मला बरे वाटले. मी निवांतपणे त्या अनोळखी माणसाचे व इतर लोकांचे अवलोकन करू लागले. मला कळले की त्याचे नाव 'मेसन' आहे. तो नुकताच वेस्ट इंडीजहून इंग्लंडमध्ये आला होता. मला कळले

a

की तिथेच त्याने मिस्टर रोचेस्टरला पहिल्यांदा पाहिले होते, तेव्हा रोचेस्टर म्हणाला की त्याला वेस्ट इंडीजमधील तापणारी उष्णता, चक्रीवादळे आणि पावसाळी ऋतू आवडत नाहीत. त्याचा रापलेला रंग, घरातसुध्दा कोट घालून आगीच्या जास्त जवळ बसण्याची पद्धत यावरून त्याला थंड वातावरणाची सवय नाही हे उघड होत होते. मला मिसेस फेअरफॅक्सकडून माहित होते की मिस्टर रोचेस्टरने खुप प्रवास केला होता परंतु मला वाटले की ते फक्त युरोपला फिरले असतील. युरोपच्या बाहेर दूरच्या किनाऱ्यावर पण भटकंती केली असेल याची मला कल्पना नव्हती.

या साऱ्या गोष्टींचा मी विचार करत होते पण एका पूर्णपणे अनपेक्षित घटनेने माझ्या विचारमाला तुटली. मिस्टर मेसनना खुपच थंडी वाजत होती. त्यांनी शेकोटीच्यासाठी आणखी कोळसा मागितला. एक नोकर कोळसा घेऊन आल्यानंतर मिस्टर एश्टनजवळ थांबला आणि त्यांना हळू आवाजात काहीतरी सांगितले; मी फक्त हे शब्द ऐकले: “एक त्रासदायक वृद्ध स्त्री.”

“तिला सांगा की ती निघून जात नसेल तर आम्ही तिला तुरुंगात टाकू,” मि. एश्टन म्हणाले.

“नाही, थांबा,” कर्नल डेंटनी थांबवले, “तिला बाहेर काढू नका, एश्टन, आपण तिचा सल्ला घेऊ शकतो; चला प्रथम महिलांचा सल्ला घेऊया.” आणि ते मोठ्याने पुढे म्हणाले: “सर्व स्त्री वर्गाने इकडे लक्ष द्यावे, आपण जिप्सींच्या तांड्याला भेट देणार होतो, त्यापैकी एकवृद्ध भविष्यवेत्ती थॉर्नफिल्डमध्ये आली आहे असे सॅमने आम्हाला नुकतेच सांगितले आहे. आपणापैकी कोणाला तिला भविष्य विचारण्यासाठी भेटायचे आहे काय?”

“नक्कीच नाही, कर्नल,” लेडी इंग्राम ओरडली, “तुम्ही अशा गोष्टींना प्रोत्साहन देऊ नये; त्या महिलेला काहीतरी करून हाकलून लावा.”

a

“पण मी तिला बाहेर काढू शकत नाही मॅडम,” सॅम म्हणाला, “किंवा इतर नोकरही करू शकणार नाहीत; मिसेस फेअरफॅक्सनी तिला घालवून देण्यासाठी खुप प्रयत्न केले, परंतु ती शेकोटीच्या कोपऱ्यात बसली आहे आणि म्हणते की ती ज्यासाठी येथे आली आहे ते केल्याशिवाय ती येथून जाणार नाही.

“आणि तिला काय हवे आहे?” मिसेस एश्टनला विचारले.

“तिला भविष्य सांगायचे आहे मॅडम, तिने शपथ घेतली की ती त्यात यशस्वी होईल.”

“ती कशी आहे?” मिस एश्टनला विचारले.

“अत्यंत कुरूप, स्त्री, मिस; जवळजवळ काजळीसारखी काळी.”

“म्हणजे ती खरी जादूगरीण असेल,” मिस लिन म्हणाली; चला तिला आत बोलावू!”

“नक्कीच, तिच्या भावाने उत्तर दिले, हा आनंद आपण गमावता कामा नये.”

“मुलांनो, तुमचा काय विचार आहे?”, लेडी लिनने विचारले.

“ या गोष्टीला माझा कधीही होकार नसेल,” लेडी इंग्राम म्हणाल्या.

“खरं, आई, पण तुला होकार द्यावा लागेल आणि तू देशील, “ब्लाँचे, थोड्या उद्धटपणे पियानोच्या स्टुलवरून उठत म्हणाली; “मी माझे भविष्य ऐकायला उत्सुक आहे, “सॅम, जा, त्या बाईला आत आण.”

“पण, माझे जरा ऐकतेस काय?”

“तू मला काय सांगणार आहेस, ते मला माहीत आहे, पण या लोकांनी माझी आज्ञा पाळावी अशी माझी इच्छा आहे. चल सँम घाई कर.”

“हो, होय, होय,” सर्व तरुणांनी होकार दिला; “तिला आत आणा, ते आम्हालाही आनंद होईल.”

नोकर थोडा वेळ संकोचला.

a

“ती एक असंस्कृत स्त्री दिसते!” तो म्हणाला.

“असू दे, तू लौकर बोलावून आण” मिस इंग्राम ओरडली; आणि सॅम निघून गेला.

दिवाणखान्यात लगेच खळबळ उडाली; जेव्हा सॅम परतला तेव्हा एकमेकांची चेष्टा मस्करी सुरू होती.

“ती आत येणार नाही,” तो म्हणाला; ती असे म्हणत आहे की, “अशा उद्धट लोकांसमोर येण्याचा तिचा उद्देश अजिबात नाही,” तिने असे सांगितले, “मला तिला अशा खोलीत घेऊन जावे लागेल जिथे तिचा सल्ला घ्यायला येणारे लोक एकामागून एक येतील.”

“पाहतेस ना मुली, तिच्या मागण्या आता वाढायला लागल्या आहेत, तरी मी तुला सांगत होते,” लेडी इंग्राम वैतागून म्हणाल्या.

“तिला लायब्ररीत घेऊन जा,” मिस इंग्राम म्हणाली, “मला सुध्दा भविष्य सर्वांसमोर ऐकायचे नाही: म्हणजे मला एकटीलाच भेट घ्यायची आहे. लायब्ररीत शेकोटी पेटलेली आहे ना?”

“होय मॅडम; पण ती खूप विचित्र दिसते!”

“अरे, तुझी बडबड थांब आणि माझी आज्ञा पाळ.”

सॅम बाहेर गेला आणि रहस्य, उत्साह, उत्सुकता यांनी पुन्हा एकदा लोकांच्या मनाचा ठाव घेतला.

“ती तयार आहे,” नोकर सांगत आला, “आणि तिला जाणून घ्यायचे आहे की पहिली व्यक्ती कोण आहे.”

“मला वाटतं, मीच त्या बाईशी बोलायला हवे होते, “कर्नल डेंट ओरडले; सॅंम, तिला सांग, सॅम, एक गृहस्थ येत आहे.”

सॅम बाहेर गेला आणि लवकरच परतला.

“ती पुरुष मंडळींशी बोलणार नाही,” ती म्हणाली; “तिला फक्त अविवाहित तरुणींशीच बोलायचे आहे.”

हेन्री लिन ओरडले, “आता तिच्या अटी वाढतच चालल्या आहेत.”

मिस इंग्राम उभी राहिली. “मी आधी जाईन,” ती गंभीर स्वरात म्हणाली.

“परत एकदा विचार कर!” तिची आई म्हणाली.

पण ब्लाँचे शांतपणे लेडी इंग्रामच्या जवळून गेली, कर्नल डेंटने उघडलेल्या दरवाजातून आम्ही तिला लायब्ररीत प्रवेश करताना पाहिले.

एक प्रकारची शांतता पसरली; लेडी इंग्राम लेकीवर नाराज झाल्या होत्या. मिस मेरीने सांगितले की ती कधीही असले धाडस करणार नाही; एमी आणि लुईसा शांतपणे हसत होत्या पण थोड्या घाबरल्यासारख्या दिसत होत्या.

खुप वेळ गेल्यासारखा वाटत होता; पंधरा मिनिटानी लायब्ररीचा दरवाजा उघडला; शेवटी मिस इंग्राम परतली.

सगळ्यांच्या नजरा तिच्याकडे कुतूहलाने खिळल्या होत्या. तिने थंड नजरेने सर्वांकडे पाहिले; ती आनंदी किंवा चिडलेली नव्हती; ती तिच्या जागी गेली आणि शांत बसली.

“बरं! ब्लाँच काय झाले?” लॉर्ड इंग्राम म्हणाले.

“त्या जादुगरीणीने तुला काय सांगितले?” मेरीला विचारले.

“तुला तिच्याबद्दल काय वाटते? ती खरी भविष्यवेत्ती आहे का?” मिस एश्टन्स चौकशी केली.

“सर्वजण असे मला प्रश्न विचारून भंडावून सोडू नका, तुम्हाला उत्सुकता वाटणे सहाजिकच आहे, अगदी आईला सुध्दा. स्पष्टपणे सांगायचे तर ती एक खरीखुरी जादूटोणा करणारी जिप्सी स्त्री आहे, म्हाताऱ्या माणसासारखी दिसणारी;

जिने हस्तरेषाशास्त्राचा अभ्यास केला आहे; असे लोक नेहमी काय जे सांगतात ते तिने मला सांगितले; माझे कुतूहल शमले, मला वाटते आता तिला जरी श्री एश्टननी उद्या तिला तुरुंगात टाकले तरी माझी हरकत नाही.”

मिस इंग्रामने एक पुस्तक चाळत बसली, मी अर्धा तास पाहिले तरी तिने पुस्तकाचे एकही पान उलटवले नव्हते; तिचा चेहरा काळवंडला होता. ती नाराज होती आणि तिच्या चेहऱ्यावर निराशा स्पष्टपणे दिसत होती. तिला भविष्य ऐकून नक्कीच चांगले वाटले नसावे हे तिच्या मौनातून आणि वाईट मनस्थिती वरून कळत होते तरीही तिने नुकत्याच केलेल्या खुलाशांवरून ती त्याला खूप महत्त्व देते हे सिद्ध होत होते.

मेरी इंग्राम, एमी आणि लुईसा एश्टन यांनी सांगितले केले की त्या एकट्याने जाण्याचे धाडस करणार नाहीत आणि तरीही त्यांना तिला पाहायचे आहे; सॅमने वाटाघाटी केल्या. येरझाऱ्या घालून त्याचे पाय नक्कीच दुखले असावेत. शेवटी अनेक अडचणींनंतर जादुगरीण तिन्ही मुलींचे भविष्य एकत्र सांगण्यास तयार झाली.

त्यांची भेट मिस इंग्राम सारखी शांत नव्हती: वेळोवेळी आम्ही हसण्या खिदळण्याचे आवाज ऐकले; वीस मिनिटांनंतर त्यांनी पटकन दार उघडले. सर्वजणी खोलीत पळत आल्याने खोलीतील सर्वजण गोंधळले होते.

“हे फारसे चांगले नाही,” त्या एकत्र ओरडल्या; तिने आम्हाला खूप गोष्टी सांगितल्या! तिला आमच्याबद्दल सर्व काही माहित आहे!” हे शब्द ऐकल्यावर, तरुणांनी घाईघाईने आणलेल्या खुर्च्यांवर त्या बसल्या आणि त्यांनी सुटकेचा निश्वास टाकला.

त्यांना तिथे काय घडले हे विचारल्यावर त्यांनी सांगितले की जादुगरीणीला अगदी त्यांच्या लहानपणीच्या गोष्टी पण माहिती आहेत. त्यांची आवडती पुस्तके, दागिने, मित्र मैत्रिणींनी दिलेल्या भेटवस्तू एव्हढेच नाही तर त्यांचे विचार देखील

a

माहिती आहेत. तिने प्रत्येकाच्या कानात तिला सर्वात जास्त हव्या असलेल्या गोष्टी आणि जगातील सर्वात प्रिय व्यक्तीचे नाव सांगितले होते.

येथे तरुणांनी शेवटच्या दोन मुद्द्यांवर आणखी स्पष्टीकरण मागितले: परंतु त्या फक्त लाजेने लालेलाल झाल्या आणि हसत हसत वेळ सावरून नेली; त्यांच्या मातांनी पुन्हा पुन्हा मुलींची काळजी वाटून सल्ले दिले आणि सांगितले की त्यांच्या सल्ल्याचे पालन न करणे कसे चुकीचे आहे; वडीलधारे लोक हसले आणि तरुणांनी अस्वस्थ तरुण मुलींना त्यांची सेवा देऊ केली.

या गदारोळात मी समोरच्या दृश्य पहाण्यात गढून गेले असतानाच कोणीतरी माझ्या कोपराला स्पर्श केला; मी मागे वळून पाहिले तो सॅम होता.

“जादुगरीण म्हणते की खोलीत अजून एक मुलगी आहे जिच्याशी ती अद्याप बोलली नाही आणि तिला पाहील्याशिवाय ती तिथून हलणार नाही अशी शपथ तिने घेतली आहे. मला वाटले त्या तुम्हीच असाव्यात, कारण इथे दुसरे कोणी नाही; मी तिला काय सांगू?”

“ठिक आहे! मी जाईन!” मी उत्तर दिले.

अशा प्रकारे माझी उत्सुकता भागवता आल्याने मला आनंद झाला, मला कोणीही न पाहता मी खोलीतून बाहेर पडले, कारण प्रत्येकजण त्या तीन थरथरणाऱ्या तरुण मुलींमध्ये गुंतलेले होते.

“तुमची इच्छा असल्यास, मिस,” सॅम मला म्हणाला, “मी खोलीत तुझी वाट पाहीन, जर तिने तुला घाबरवले तर; तू मला बोलव, मी लगेच येईन.”

“नाही, सॅम, स्वयंपाकघरात परत जा; मी घाबरत नाही.”

हे खरे होते, मी घाबरलो नव्हते; उलट मला हे सर्व आवडले होते आणि माझी उत्सुकता वाढली होती.

a

## प्रकरण 19

लायब्ररी शांत होती; शेकोटीच्या कोपऱ्यात आरामखुर्चीवर भविष्यकथन करणारी स्त्री बसली होती. तिने लाल कोट, काळी टोपी आणि तागाच्या रुमालाने डोके झाकून त्याची गाठ हनुवटीच्या खाली बांधली होती; टेबलावर एक न पेटलेली मेणबत्ती होती; जिप्सी चूलीकडे झुकली होती आणि ज्वाळांच्या प्रकाशात छोटेसे प्रार्थनापुस्तक वाचत होती; वाचताना ती मोठ्याने पुटपुटली, जसे वृद्ध स्त्रिया करतात. तिने मला प्रवेश करताना पाहिले होते तरी तिने आपले वाचन थांबवले नाही. असे दिसले की तिला तो परिच्छेद पूर्ण करायचा होता.

लिव्हिंग रूममध्ये मी शेकोटी पासून बरीच दुर बसल्यामुळे, माझे हात पाय थंड झाले होते. गालीच्यावर शेकोटीच्याजवळ उभे राहिल्याने हातपाय थोडे गरम झाले आणि माझा नेहमीचा चिकित्सक स्वभाव जागृत झाला. तसेही मला जिप्सीला पाहून घाबरण्याचे काही कारण वाटले नाही. तिने तिचं पुस्तक बंद केलं आणि हळूच माझ्याकडे पाहिलं; तिचा चेहरा टोपीच्या काठाने अर्धवट लपला गेला होता; तथापि, जेव्हा तिने आपले डोके वर केले तेव्हा मला तिचा चेहरा विचित्र वाटला: तो काळसर तपकिरी होता; तोंडाला बांधलेल्या रूमालातून केसांची झुलपे गालावर आली होती. तिने तिची थेट आणि धीट नजर माझ्याकडे वळवली.

“बरं! तुला तुझे भविष्य जाणून घ्यायचे आहे का?” ती विचारले, तिच्या नजरेप्रमाणे तिचा आवाज तीक्ष्ण होता.

“मला त्याची फारशी पर्वा नाही, बाई; तुम्हाला आवडत असल्यास तुम्ही मला सांगू शकता, परंतु मी तुम्हाला आधीच सांगते की माझा भविष्यकथनावर विश्वास नाही.”

"या उद्धटपणाचे आश्चर्य वाटत नाही, तू खोलीत आत आलीस तेव्हाच मला समजले होते,"

"खरचं? तुझे कान तीक्ष्ण दिसतात."

"होय, आणि दृष्टी भेदक आणि मेंदू बुध्दीमान सुध्दा आहे"

"तुमच्या धंध्यासाठी या तीन अत्यंत आवश्यक गोष्टी आहेत."

"विशेषतः तुमच्यासारख्या लोकांशी व्यवहार करताना; तू का थरथरत नाहीस?"

"मला थंडी वाजत नाही."

"तू फिकट का होत नाहीस?"

"मी आजारी नाही."

"तुला माझा सल्ला का नको आहे?"

"मी मूर्ख नाही म्हणून."

वृद्ध स्त्रीने आपले स्मित लपवले, नंतर एक लहान काळा पाईप तिने पेटवला आणि धुम्रपान करू लागली. दोन चार झुरके मारल्यावर तिने तिचे वाकलेले शरीर सरळ केले, तिच्या ओठातून पाईप काढला आणि आगीकडे पाहत ती मुद्दामहून म्हणाली: "तू थंड आहेस, तू आजारी आणि मूर्ख पण आहेस."

"सिद्ध करा," मी म्हणाले.

"मी ते नक्कीच करीन, आणि काही मोजक्या शब्दांत: तू थंड आहेस, कारण तू अजून एकटी आहेस; अद्याप कोणी तुझ्यामधील आग कोणी चेतवली नाही: तू आजारी आहेसच, कारण माणसाला मिळालेल्या सर्वोत्तम, उदात्त आणि गोड भावना तुझ्यापासून दुर आहेत: तू मुर्ख आहेस, कारण तू त्रास सहन करशील पण त्याला

a

भेटण्यासाठी संमती दर्शवणार नाहीस किंवा जिथे तो तुमची वाट पाहत असेल तिथे भेटण्यासाठी तू एक पाऊलही पुढे टाकणार नाहीस.”

तिने पुन्हा तिच्या ओठांमध्ये काळा पाईप ठेवला आणि पुन्हा जोमाने धुम्रपान करू लागली.

“तुम्ही सांगितलेले भविष्य, जे कोणी एकटे आहेत आणि मोठ्या घरावर अवलंबून आहेत अश्या कोणालाही हे लागू पडेल.”

“होय, पण हे जवळजवळ प्रत्येकासाठी खरे असेल का?”

“का नाही? माझ्या सारखी परिस्थिती असणाऱ्या प्रत्येकासाठी खरे असेल.”

“होय; अगदी तसंच, तुझ्या परिस्थितीत: पण तू आहेस तशी मला आणखी एक व्यक्ती शोधून सांग.”

“एकच काय, हजार मिळतील.”

“मी तुला सांगते की तुला एक शोधण्यात अडचण येईल. तुला माहिती आहे, तुझी परिस्थिती असाधारण आहे: आनंदाच्या अगदीजवळ, ते कोणत्याही क्षणी साध्य होण्याची शक्यता आहे; सर्व घटक तयार आहेत; फक्त त्यांना एकत्र आणण्याची गरज आहे: नशीबाने त्यांना वेगळे केले आहे; त्यांना एकत्र येऊ द्या आणि परिणाम सुंदर होईल.”

“मला कोडी समजत नाहीत; त्यांचा अंदाज कसा लावायचा हे मला कधीच कळले नाही.”

“ मी अधिक स्पष्टपणे बोलायला हवे काय? मला तुझ्या हाताचा तळवा दाखव.”

“मला वाटते की आपणाला त्यासाठी फी द्यायला लागेल ना?”

“नक्कीच.”

मी तिला एक शिलिंग दिले; तिने खिशातून काढलेल्या जुन्या स्टॉकिंगमध्ये ठेवले आणि ते बांधल्यानंतर तिने मला माझा हात उघडण्यास सांगितले. मी तिची आज्ञा पाळली; तिने हाताला स्पर्श न करता नुसते पाहिले.

“हात खूप छान आहे;” ती म्हणाली. “अशा हातावर रेषांच्या शिवाय काहीही नसते: नशिबात काय आहे ते तळहातावर लिहिलेले नाही.”

“मी तुझ्यावर विश्वास ठेवते,” मी म्हणाले.

“नाही;” ती पुढे म्हणाली, “ते तुझ्या चेहऱ्यावर, कपाळावर आणि डोळ्यांमध्ये स्वच्छ दिसत आहे, गुडघे बस आणि डोके वर कर.”

मी तिच्यापासून अर्धा मीटर अंतरावर गुडघे टेकले; तिने आग विझवली आणि फक्त कोळशाचा प्रकाश पडला. तिच्या चेहऱ्यावर सावली पडली होती; आणि माझा चेहरा उजळला होता.

“मला जाणून घ्यायचे आहे की तू माझ्याकडे कोणत्या भावनेने आली आहेस,” क्षणभर माझ्याकडे पाहून तिने विचारले; “या दिवाणखान्यात, या बड्या बड्या मंडळींसोबत वावरताना तुझ्या मनात नेमके कोणते विचार येतात, हे मला जाणून घ्यायचे आहे.”

“मी अनेकदा थकलेली असते, कधी कधी कंटाळते, क्वचितच दुःखी असते.”

“मग तुला काही आशा आहे काय, तुला हवा असणारा आनंद मिळेल आणि तुला भविष्यातील चिंता मिटेल?”

“नाही; मला फक्त एवढीच आशा आहे की एक दिवस मी छोट्या घरात शाळा काढू शकेन इतके पैसे कमवावेत.

“या कल्पना केवळ खिडकीच्या कोपऱ्यात बसून तुमची लक्ष विचलित करण्यासाठी योग्य आहेत; मला तुझ्या सवयी माहित आहेत.”

“तुम्ही नोकरांकडून विचारून घेतले असेल.”

“अहो! तुला वाटते की तू खूप चाणाक्ष आहेस. ठिक ते बरोबर आहे असे धरून चालू ; खरे सांगायचे तर, मी इथे एका व्यक्तीला ओळखते, ती म्हणजे मिसेस पूल.”

ते नाव ऐकून मी चमकून उठायला लागले.

“तरीच! मला वाटलं ते खरे आहे, या सगळयात खरंच काहीतरी फसवेगिरी आहे.”

“घाबरू नको, ती विचित्र जिप्सी पुढे म्हणाली, “मिसेस पूल एक विश्वासार्ह, विवेकी आणि शांत स्त्री आहे; तू सुध्दा तिच्यावर विश्वास ठेवू शकतेस, पण खिडकीच्या कोपऱ्यात बसलेली असताना फक्त भावी शाळेचा विचार करण्याऐवजी, दिवाणखान्यात इतके लोक आहेत त्यापैकी कोणाचे तुला निरिक्षण करावेसे वाटले नाही?”

“मला सर्व चेहरे पाहून सर्व लोकांचे निरीक्षण करायला आवडते.”

“असे निरिक्षण किती वेळा केले?”

“खूप वेळा; जेव्हा दोन लोक बोलत असतांना मला त्यांच्या गोष्टी ऐकायला करायला आवडते.”

“तुला कोणत्या प्रकारच्या गोष्टी आवडतात?”

“माझ्याकडे जास्त पर्याय नाहीत; ते जवळजवळ सर्व एकाच विषयाभोवती फिरतात: प्रेम आणि त्याची परिणती: आणि लग्न”

“आणि तुम्हाला हा नीरस विषय आवडतो?”

“या विषयाला मी काहीच महत्त्व देत नाही”

a

“हे तुझ्यासाठी महत्त्वाचे का नाही? जेव्हा तुझ्यासारखी एखादी तरुण सुंदर स्त्री, आयुष्य आणि आरोग्याने परिपूर्ण, सौंदर्याने मोहक, नशीबाने भाग्यवान, एखाद्या पुरुषाकडे पाहून हसते, तेव्हा ..”

“कोण मी?”

“तुला माहिती आहे---कदाचित, विचार कर.”

“मी इथल्या कोणत्याही गृहस्थांना ओळखत नाही; मी त्यांच्यापैकी कोणाशीही एका शब्दानेही बोलले नाही आणि मला त्यांच्याबद्दल काय वाटते, हे सांगणे अगदी सोपे आहे: त्यापैकी काही प्रतिष्ठित, आदरणीय आणि वडीलधारे आहेत; इतर तरुण, तेजस्वी, सुंदर आणि जीवनाने परिपूर्ण आहेत; ते त्यांच्या मर्जीनुसार, त्याना आवडेल त्या मुलीशी हसू बोलू शकतात, पण मला त्यांच्याशी काहीच देणेघेणे नाही.”

“वाड्यात राहणाऱ्या गृहस्थांना तू ओळखत नाहीस? त्यांच्याशी एका शब्दाचीही देवाणघेवाण केली नाही, असे तू म्हणू शकतेस काय? हे उत्तर कायम आहे आहे काय?”

“सध्या ते येथे नाहीत.”

“अगदी यथायोग्य उत्तर, की शब्दाचा खेळ? तो आज सकाळी मिलकोटला निघाला आणि आज संध्याकाळी किंवा उद्या परत येईल; ही परिस्थिती तुला त्याला ओळखण्यापासून नक्कीच आडवी येणारी नाही.”

“नाही, पण या सगळ्याशी रोचेस्टरांचा काय संबंध?”

“मी तरुण मुलींना पाहुन तरुणांच्या आनंदी, हसऱ्या डोळ्यांविषयी बोलत होते, अलीकडे मि. रोचेस्टरांच्या डोळ्यात ओसंडून जाणारा आनंद तुला दिसला नाही काय?”

“मि. रोचेस्टरला त्यांच्या

a

“पाहुण्यांच्या समवेत नक्कीच आनंद व्यक्त करण्याचा अधिकार आहे.”

“मी तुला त्याच्या अधिकारांबद्दल विचारत नाही; पण तुझ्या हे लक्षात आले नाही का की लग्नाच्या संदर्भात इथे बोललेल्या गोष्टी सातत्याने रोचेस्टरांच्या बाजूला झुकत आहेत?”

“ऐकणाऱ्याची उत्सुकता, बोलणाऱ्याच्या जिभेला शक्ती देते.” हे माझे बोलणे, जिप्सी पेक्षा जास्त स्वतःशीच होते.

जिप्सी स्त्रीचे विचित्र बोलणे, वागणे, आवाज मला स्वप्नांच्या जाळ्यात अडकवत गेले. तिच्या तोंडून एकामागून एक अनपेक्षित वाक्ये माझ्या कानावर पडत होती. शेवटी माझी मती गुंग झाली.

मला आश्चर्य वाटले की कोण हा अदृश्य आत्मा आहे, जो जवळ राहून, माझ्या हृदयाची स्थिती आणि माझ्या नाडीची स्पंदने याची नोंद ठेवत आहे.”

“ऐकणाऱ्याची उत्सुकता? तिने पुनरावृत्ती केली; होय, आनंददायी संवाद साधणाऱ्या उत्सुक ओठांमधून बाहेर पडणारे शब्द, मि. रोचेस्टर तासनतास लक्षपूर्वक ऐकत असत, आणि ते या खेळात सहभागी होण्यासाठी कृतज्ञ दिसल्याचे तुझ्या लक्षात आले का?”

“कृतज्ञ! त्यांच्या चेहऱ्यावर कधी कृतज्ञता व्यक्त झाल्याचे मला आठवत नाही.”

“तर तुम्ही त्याचे विश्लेषण केले? जर मग कृतज्ञता नव्हती तर मग काय व्यक्त होत होते?”

मी उत्तर दिले नाही.

“तू तिथे प्रेम पाहिले, नाही का?” आणि भविष्याकडे पाहताना, तुला मि. रोचेस्टरचे लग्न झाल्याचे आणि त्यांची पत्नी आनंदी असल्याचे दिसले का?”

“नाही, तंतोतंत नाही; तुमचे ज्ञान कधीकधी तुम्हाला अपयशी ठरवते.”

“मग काय बघितलंस?”

“काहीही; मी तुला प्रश्न करायला आले आहे कबुली देण्यासाठी नाही; मिस्टर रोचेस्टर लग्न करणार आहेत हे सर्वज्ञात आहे.”

“होय, सुंदर मिस इंग्राम बरोबर.”

“लौकरच?”

“बाह्य स्वरूपावरून काढलेला निष्कर्ष आहे, जरी तुला याबद्धल संदेह असला तरी ते एक आनंदी जोडपे असेल; तो तिच्यासारख्या सुंदर, उच्चकुलीन आणि कर्तृत्ववान स्त्रीच्या नक्कीच प्रेमात आहे.

तिच्यासाठी हे शक्य आहे की तिला मि. रोचेस्टर किंवा किमान त्यांचे पैसे आवडतात; मला माहित आहे की मिस्टर रोचेस्टरची इस्टेट कर्जात बुडालेली आहे, देवा मला माफ कर. मी तिला आत्ताच तासाभरापुर्वी हे सांगितले त्यामुळे ती विशेष गंभीर बनली; मी तिला त्यांच्याऐवजी दुसरी कोणी श्रीमंत व्यक्ती मिळाल्यास यांचा नाद सोडून देण्याचे सुचवले,” जिप्सी म्हणाली.

“पण बाई”, मी विचारले, “मला मि. रोचेस्टरचे भविष्य ऐकायचे नाही, मी माझे नशीब जाणून घेण्यासाठी आले आहे आणि तुम्ही मला त्याबद्दल काहीही सांगितले नाही.”

“तुझे नशीब संशयास्पद आहे; जेव्हा मी तुझ्या चेहऱ्याचे परीक्षण करते, तेव्हा एक गोष्ट दुसऱ्या गोष्टीला विरोध करते असे दिसते. दैवाने तुझ्यासाठी आनंदाचा खजिना लपवून ठेवला आहे; मला हे, तू येथे येण्यापूर्वीच चांगले माहित होते: कारण मी स्वतः तो खजिना तुझ्यासाठी बाजूला ठेवताना पाहिले आहे. आता हात पुढे करून तो घ्यायचा की नाही हे तुझ्यावर अवलंबून आहे आणि तू काय करशील हे पाहाण्यासाठी तुझ्या चेहऱ्याचा अभ्यास करायला हवा. पुन्हा एकदा चटईवर गुडघे टेकून बस.”

a

“मला असे जास्त काळ बसायला सांगू नका; शेगडीची धग भाजत आहे.”

मी गुडघे टेकले. ती माझ्याकडे आली नाही, पण तिच्या खुर्चीवर टेकून माझ्याकडे समाधानाने पहात होती; मग ती कुजबुजत बोलायला लागली:

“तेज:पुंज डोळे, पहाटेच्या दवबिंदूप्रमाणे चमचमणारे; सौम्य आणि भावुक, माझ्या बोलण्यावर हसणारे, संवेदनक्षम, ते ज्यांच्या सहवासात येतात त्या लोकांवर आपली छाप सोडतात; जेव्हा ते हसणे थांबवतात तेव्हा ते दुःखी दिसतात: थकलेले असतात पण त्याची जाणीव देखील त्यांना नसते, पापण्या झुकून खाली वळलेल्या असतात; हे सर्व एकाकीपणामुळे उद्भवणारी उदासीनता दाखवते: जेव्हा माझ्याकडे बघण्याचे टाळले जाते, तेव्हा मी करत असलेले परिक्षण नावडल्याचे दर्शवणारी उपहासात्मक नजर, मी शोधलेले सत्य नाकारते आणि त्याचे दुःखही नाकारते; त्यात दिसणारा अभिमान आणि संयम, माझ्या मताची पुष्टी करत आहेत. एकंदरीत डोळे अनुकूल आहेत.

“बुद्धीगम्य अनुभव सांगण्यासाठी ती तयार आहे, परंतु हृदयाने जे अनुभवले आहे त्याबद्दल ती गप्प राहते; तिला एका ठिकाणी रमायला आवडत नाही. प्रसंगानुरूप आवश्यक ते बदल स्विकारण्याची तयारी असते आणि एकटेपणाच्या शांततेमुळे ती दबली जाता कामा नये; ही नेहमीच हसरी, बोलकी रहायला हवी. तिच्याबरोबर संभाषणात भाग घेणाऱ्या व्यक्तींबरोबर ती प्रेमाने वागते आणि हा गुण अनुकूल आहे.”

आतापर्यंत मला आनंदी होण्याच्या मार्गात काही अडचण सापडली नाही, पण तिच्या कपाळावर काय लिहिले आहे ते पाहू,----' मी आत्मसन्मानासाठी, वेळ आलीच तर प्रसंगी एकटे रहाण्याची माझी पुर्ण तयारी आहे, आनंद विकत घेण्यासाठी आत्मा कदापिही विकणार नाही, माझ्यापाशी एक आंतरिक खजिना आहे, जो माझ्या बरोबरच जन्माला आला आहे, इतर सर्व आनंद जरी पासून दुरावले, तरी

a

मला जिवंत रहाण्यास तो एकटा पुरेसा आहे किंवा आपण असे म्हणू, कोणत्याही किंमतीला माझा आंतरिक खजिना देण्याची, माझी तयारी नाही. कपाळाने घोषित केले आहे, "विचारांची बैठक पक्की आहे, भावनांनी कितीही उधळायचा आटोकाट प्रयत्न केला, त्यांना लगाम घालून ताब्यात ठेवले आहे. भलभलत्या इच्छांनी कितीही भुरळ घातली तरी, योग्य/अयोग्य याविषयीचा निर्णय करताना न्यायाचीच बाजू उचलून धरेल, कितीही जोराचे वादळ आले, धरणीकंप झाला वा अग्नीप्रलय आला, तरी त्याला सामोरे जातांना, विवेकबुद्धीच्या आदेशानुसार मार्गक्रमण करेन."

"कपाळाने चांगले सांगितले, त्यावरील सूचनांचे जरूर पालन होईल, मी काही योजना बनवल्या आहेत, विवेकाचे दावे, तर्कशुद्ध पध्दतीने हाताळले आहेत, आनंदाच्या पेल्यात, एक थेंबभर अपकीर्ती अथवा पश्च्याताप मिसळला तर तारुण्य कोमेजून जाईल, फुललेला मोहोर करपून जाईल. हे मला माहिती आहे; मला त्याग नको, नासाडी नको, ते मला आवडत नाही. मला प्रोत्साहन द्यायचे आहे, अडथळा आणायचा नाही. मला धन्यवाद मिळवायचे आहेत, दु:खाचे अश्रु द्यायचे नाहीत. माझे पिक प्रेमाने हसत डौलाने डुलायला हवे आणि मी ते करून दाखवेन. मला वाटते मी स्वतःला एका आल्हाददायक मोहात हरवून बसलो आहे. मला हा क्षण अनिश्चित काळासाठी लांबवायचा आहे, पण माझी हिम्मत नाही, आतापर्यंत मी स्वतःवर पूर्णपणे वर्चस्व गाजवले आहे; मला अभिनय करायचा होता म्हणून मी असे वागलो; पण आता हे अजून चालू ठेवणे माझ्या ताकदीच्या बाहेरचे असू शकते. उठ, मिस आयर उठ; ' आता नाटक संपले आहे.' "

मी झोपले होते की जागी होते? की मी स्वप्न पाहात होते आणि माझे स्वप्न अजूनही चालू आहे? वृद्ध स्त्रीचा आवाज आता बदलला होता; त्यांचे उच्चारण, त्यांचे हावभाव मला माझ्या स्वतःच्या चेहऱ्याइतकेच परिचित होते; मला ती भाषाही

a

माहीत होती तशी की ती माझी स्वतःची होती. मी उठले पण निघाले नाही. मी तिच्याकडे पाहिले; मी तिला चांगले पाहण्यासाठी शेकोटीच्या लाकडांना हालवून जाळ मोठा केला आणि परत एकदा निरखून पाहिले: पण तिने तिची टोपी आणि रुमालने चेहरा झाकायचा प्रयत्न केला आणि मला निघून जाण्याची खूण केली; तिच्या हातावर प्रकाश पडला; माझ्या शंका जागृत झाली; मी परत तो हात निरखून पाहिला: तो वृध्द स्त्रीचा वाळलेला अंग नव्हता, तर गुबगुबीत कोमल हात होता, गोलाकार मऊ बोटे असलेला; तिच्या करंगळीत एक मोठी अंगठी चमकली. मी ते पाहण्यासाठी पुढे गेले आणि मला एक रत्न दिसले जे मी आधीच शंभर वेळा पाहिले होते; मी पुन्हा त्या व्यक्तीचा विचार केला जी यावेळी माझ्यापासून दूर गेली नव्हती जवळ होती. तिने टोपी आणि रुमाल मागे फेकला आणि डोके माझ्याकडे वळवले.

"बरं, जेन, तू मला ओळखलेस?" ओळखीच्या आवाजाने विचारले.

"तो लाल कोट काढा सर, आणि मग..."

"एक गाठ आहे, मला मदत कर."

"दोर तोडा, सर."

"ठीक आहे मग!, उधार घेतलेले कपडे!" असे म्हणून, मिस्टर रोचेस्टर त्यांचा वेशांतर काढून पुढे आले."

"पण, सर, तुम्हाला ही कोणती विचित्र कल्पना आली?"

"मी माझी भूमिका चांगली बजावली; असे तुला वाटते काय?"

"हे शक्य आहे की आपण इतर स्त्रियांना चांगले फसवले."

"आणि तुझ्याबरोबर फसवणूक झाली नाही?"

"माझ्याबरोबर, तुम्ही जिप्सीची भूमिका केली नाहीस."

"मग मी कोणती भूमिका केली? मी स्वतः राहिलो का?"

“नाही, तुम्ही एक विचित्र भूमिका केली; तुम्ही मला गोंधळात टाकण्याचा प्रयत्न केलात; मलाही ते सांगायला लावण्यासाठी तुम्ही काही अर्थ नसलेल्या गोष्टी बोललात; हे सर्व फारसे चांगले नव्हते, सर.”

“तू मला माफ करतेस का? जेन.”

“मी याबद्दल विचार करेपर्यंत मी तुम्हाला सांगू शकत नाही; जर काळजीपूर्वक चिंतन केल्यावर मला दिसले की तुम्ही मला खूप मोठ्या मूर्खपणाकडे नेले नाही, तर मी विसरण्याचा प्रयत्न करेन: परंतु हे करणे तुमच्यासाठी योग्य नव्हते.”

“अरे! तू खूप शहाणी, खूप सावध आणि खूप संवेदनशील होतीस.”

मी घडलेल्या प्रत्येक गोष्टीबद्दल विचार केला आणि स्वतःला धीर दिला; कारण मुलाखतीच्या सुरुवातीपासूनच मी सावध होते: मला काहीतरी संशय आला; मला माहित होते की जिप्सी आणि भविष्य सांगणारे, या तथाकथित वृद्ध स्त्रीसारखे स्वतःला व्यक्त करत नाहीत; त्यांचा खोटा आवाज, त्यांची वैशिष्ट्ये लपवण्याची त्यांनी घेतलेली काळजी माझ्या लक्षात आली होती; माझ्या मनात ज्या ग्रेस पूल विषयी संशय होता, ती एक जिवंत गूढ होती; पण मी एका क्षणासाठीही मिस्टर रोचेस्टरचा विचार केला नाही.

“बरं! ते मला म्हणाले, तू कशाचे स्वप्न पाहत आहेस? या गंभीर हसण्याचा अर्थ काय आहे?”

“जे घडले त्याबद्धल मला आश्चर्य वाटते आणि स्वतःच्या वागणुकीबद्दल मी स्वतःचेच अभिनंदन करते, सर; पण मला असे वाटते की तुम्ही मला जाण्यासाठी परवानगी दिली आहे.”

“नाही, थोडा वेळ थांब आणि मला सांग की लिव्हिंग रूममधील माणसे काय करत आहेत?”

“मला वाटते की जिप्सी संदर्भात बोलत होती.”

a

"खाली बस आणि लोक याबद्दल काय म्हणाले ते मला सांग."

"मी जास्त वेळ न थांबणे चांगले आहे, सर, जवळपास अकरा वाजले आहेत; आज सकाळी येथे एक अनोळखी माणूस आल्याचे तुम्हाला माहीत आहे का?"

"एक अनोळखी! तो कोण असू शकतो? मला कोणाच्याच येण्याची अपेक्षा नव्हती. तो निघून गेला का?"

"नाही; तो म्हणतो की तो तुम्हाला बऱ्याच काळापासून ओळखतो आणि तुम्ही परत येईपर्यंत तो वाड्यात राहण्याचे स्वातंत्र्य घेऊ शकतो."

"त्याने त्याचे नाव सांगितले काय?"

"त्याचे नाव मेसन आहे, सर; तो वेस्ट इंडिजमधून आला आहे, जमैकाहून असावा, असा माझा विश्वास आहे."

मिस्टर रोचेस्टर माझ्याजवळ उभे होते; त्यांनी माझा हात धरला, जणू काही मी खुर्ची असावी असे त्यांनी मला पकडले होते: त्यांच्या ओठावरचे हसणे थांबले; ते अचानक स्तब्ध आल्यासारखं वाटत होते.

"मेसन, वेस्ट इंडीज!" ते एका यांत्रिक स्वरात म्हणाले, जे फक्त एकाच वाक्याचा उच्चार करू शकते; "मेसन, वेस्ट इंडिज!" त्यांनी तीन वेळा पुनरावृत्ती केली. त्यांनी हेच शब्द परत परत गुणगुणले, क्षणोक्षणी त्यांचा चेहरा फिकट होत गेला; ते काय करत आहेत हे त्यांना क्वचितच कळत असावे.

"सर, तुम्ही आजारी आहात का?" मी विचारले.

"जेन! जेन! मला झटका मिळाला, मला धक्का बसला!" आणि ते स्तब्ध झाले.

"मग माझ्या बाजूला झुका, सर."

"जेन, एकदा तू मला तुझा खांदा दिला होतास; तसा आज पुन्हा मला दे."

“होय, सर आणि माझा हातही.”

ते खाली बसले आणि मला त्यांच्याशेजारी बसवले; त्यांनी माझा हात त्यांच्या हातात घेतला आणि माझा हात कुरवाळत माझ्याकडे पाहू लागले; त्यांचे रूप उदास आणि अस्वस्थ होते.

“माझ्या प्रिय सखे,” ते म्हणाले, “मला तुझ्याबरोबर एका अतिशय शांत बेटावर एकटे रहायला आवडेल, जिथे यापुढे कोणताही त्रास होणार नाही, कोणताही धोका नाही, कोणत्याही भयानक आठवणी नाहीत.”

“सर, मी तुम्हाला काही मदत करू शकते का? तुमच्या सेवेसाठी मी माझा जीव देखील देईन.”

“जेन, जर मला तुझी गरज असेल तर मी तुझीच मदत घेईन. मी तुला वचन देतो.”

“धन्यवाद सर ; काय करायचे ते मला सांगा, आणि मी किमान प्रयत्न तरी करेन.”

“बरं, जेन, जेवणाच्या खोलीतून माझ्या साठी एक ग्लास वाइन घेऊन ये. सर्वजण रात्रीच्या जेवणासाठी तेथे असतील; मेसन इतरांसोबत आहे काय आणि तो काय करत आहे हे तू मला सांग.”

मी तिथे गेले, तिथे असे दिसले की, सर्वजण जेवणासाठी जमले आहेत, जसे मिस्टर रोचेस्टरने मला सांगितले होते. पण कोणीही टेबलावर बसले नव्हते; बुफेवर रात्रीच्या जेवणाची व्यवस्था करण्यात आली होती. पाहुण्यांनी त्यांना जे हवे होते ते घेतले होते आणि हातात प्लेट्स आणि ग्लासेस घेऊन ते एका गटात जमले होते. सगळे हसत होते; संभाषण नेहमीचे खेळीमेळीचे होते. शेकोटीजवळ बसलेले मिस्टर मेसन, कर्नल आणि मिसेस डेंट यांच्याशी गप्पा मारत होते; तेही इतरांसारखेच आनंदी दिसत होते. मी वाइनचा ग्लास भरला; मिस इंग्रामने माझ्याकडे कठोरपणे पाहिले;

कदाचित मी हे स्वातंत्र्य घेण्याचे धाडस करत आहे असे तिला वाटले असेल; त्यानंतर मी लायब्ररीत परतले.

मिस्टर रॉचेस्टरचा फिकटपणा नाहीसा झाला होता; पण ते उदास दिसत होते, पण खंबीर होते; त्यांनी माझ्या हातातून ग्लास घेतला आणि उद्गारले: "तुझ्या आरोग्यासाठी, परोपकारी स्त्री!"

वाइन प्यायल्यानंतर, त्यांनी मला ग्लास परत केला आणि म्हणाले: "बरं, जेन, ते सर्वजण काय करत आहेत?"

"ते आनंदात गप्पा मारत आहेत, सर."

"सर्वजण गंभीर आणि रहस्यमय तर दिसत नाहीत, जसे की त्यांनी काहीतरी विचित्र ऐकले आहे?"

"अजिबात नाही ; त्याउलट, सर्वजण आनंदाने भारलेले आहेत."

"आणि मेसन?"

"ते सुद्धा इतरांसारखे हसत आहेत."

"आणि जर, मी लिव्हिंग रूममध्ये प्रवेश केला, आणि सर्वजण माझा अपमान करण्यासाठी माझ्याकडे धावले, जेन, तू काय करशील?"

"मला जमले तर मी त्यांना खोलीबाहेर पाठवीन, सर."

ते थोडेसे हसले.

"पण," ते पुढे म्हणाले, "जर मी माझ्या पाहुण्यांकडे त्यांचे स्वागत करण्यासाठी गेलो, आणि ते माझ्याकडे थंडपणे पाहून, मला कमी लेखून आणि थट्टा करण्याच्या स्वरात बोलत, शेवटी ते सर्व मला सोडून, एकामागून एक सोडून गेले तर, जेन, तूही त्यांच्यामागे जाशील का?"

"नाही सर ; मला तुमच्यासोबत राहण्यात मला अधिक आनंद मिळेल."

"माझे सांत्वन करण्यासाठी?"

“होय सर ; माझ्या सामर्थ्याप्रमाणे तुमचे सांत्वन करण्यासाठी.”

“आणि मला चिकटून राहिल्याबद्दल त्यांनी तुम्हाला बंदी घातली तर?”

“मला, बहुधा, त्यांच्या बंदीने मला काहीही फरक पडणार नाही.”

“मग, तू माझ्या साठी त्यांच्यावर टिका करण्याचे धाडस करू शकता का?”

“माझ्या निष्ठेला पात्र असलेल्या कोणत्याही मित्राच्यासाठी मी हे धाडस करू शकेन; जसे तुम्ही, मी नक्की धाडस करू शकते.”

“आता परत खोलीत जा; शांतपणे मेसनकडे जा आणि त्याच्या कानात सांग की मिस्टर रोचेस्टर आले आहेत आणि त्याला भेटण्याची इच्छा आहे: त्याला येथे घेऊन ये आणि नंतर इथून जा.”

“होय सर.”

त्यांनी जे सांगितले त्याप्रमाणे मी केले.

दिवाणखान्याच्या मध्यभागी मला असे जाताना पाहून सर्वांनी माझ्याकडे निरखून पाहिले; मी मिस्टर मेसनना निरोप पोहोचवला आणि त्यांना मिस्टर रोचेस्टरकडे नेल्यानंतर मी माझ्या खोलीत परतले.

उशीर झाला होता आणि मी काही काळ अंथरुणावर नुसतीच पडले होते. पाहुणे मंडळी त्यांच्या खोल्यांमध्ये परतत असल्याचे आवाजावरुन समजले आणि नंतर मी मिस्टर रोचेस्टरचा आवाज ऐकला: “या मार्गाने, मेसन; ही तुमची खोली आहे.”

ते आनंदाने बोलत होते, ज्यामुळे मला पूर्णपणे धीर आला आणि मी लवकरच झोपी गेले.

# प्रकरण 20

झोपण्यापुर्वी मी खिडकीचा पडदा बंद करायचे विसरून गेले होते. खिडकी उघडीच राहिली. रात्र सुंदर होती. चंद्राचा तेजस्वी प्रकाश खिडकीतून थेट माझ्या खोलीत आला आणि मला जाग आली. मी डोळे उघडले आणि चंद्राकडे पाहिले, चांदीसारखा पांढरा पुर्णचंद्र तेजाने तळपत होता: मी अर्धा तास उभी राहिले आणि मग पडदा बंद करण्यासाठी पुढे झाले.

पण, “अरे देवा!” अचानक मला एक भीतीदायक किंकाळी ऐकू आली.

थॉर्नफिल्डच्या एका टोकापासून दुस-या टोकापर्यंत ऐकू जाईल असा तीक्ष्ण, जंगली आवाज रात्रीची शांतता भंग करत होता.

माझ्या अंगातील बळ एकदम सरल्यासारखे झाले. काळजाचे पाणी पाणी झाले आणि छातीचा ठोका चुकला. पण परत तो आवाज ऐकू आला नाही. अशा प्रकारची किंकाळी परत फोडणे माणसाला शक्य नव्हते अगदी हिंस्त्र गिधाडला देखील असे ओरडणे जमले नसते.

तिसऱ्या मजल्यावरून काही आवाज ऐकू येत होते. माझ्या खोलीच्या बरोबर वरच्या खोलीत काहीतरी झटापट सुरु असल्याचे जाणवले. गडबड गोंधळात कुणाची तरी मदतीसाठी केलेली याचना कानावर पडली.

“कोणी येणार नाही काय?” कोणी तरी ओरडले, धडपडण्याचे आणि मोडतोडीचे आवाज वाढले. माडीवरच्या लाकडी फळ्यांमधून भिंतीमधून काही बोलणे ऐकू आले, “रॉचेस्टर, रोचेस्टर, कृपा करून लौकर या.”

खोलीचा दरवाजा उघडला आणि कोणीतरी गॅलरीतून गडबडीत धावत गेले. ज्या खोलीत गडबड चालली होती, तिथून मी, नवीन व्यक्तीच्या पावलांचा आवाज ऐकला. काहीतरी जमिनीवर पडले आणि सर्व काही शांत झाले.

माझे हातपाय भीतीने थरथरत होते. कसेबसे मी कपडे घातले आणि खोलीच्या बाहेर आले. सर्वजण जागे होऊन कॉरिडॉर मध्ये जमले होते.

"अहो! हे काय चालले आहे? कोणी जखमी झाले आहे काय? काय झालं ? मेणबत्ती आणा. आग तर लागली नाही ना? की ते चोर आले आहेत? आपण घराबाहेर जावे काय?" असे अनेक प्रश्न ते एकमेकांना विचारत होते. अंधार बराच होता, त्यामुळे खुपच गोंधळ माजला होता.

"रोचेस्टर कुठे आहे?" कर्नल डेंट ओरडले; "मला ते त्यांच्या खोलीत दिसले नाहीत."

"मी इथे आहे," रोचेस्टर कडून उत्तर आले; काळजी करू नका, मी येत आहे."

हॉलचा दरवाजा उघडला आणि मिस्टर रोचेस्टर मेणबत्ती घेऊन पुढे आले; ते वरच्या मजल्यावरून खाली येत होते; तेव्हढ्यात मिस इंग्राम त्याच्याकडे धावत गेली आणि त्यांचा हात पकडून म्हणाली, "आत्ताच नेमकी काय भयानक घटना घडली? बोला आणि आमच्यापासून काहीही लपवू नका."

"काहीही नाही!" तो ओरडला; "एका लहान गोष्टीवर खूप गोंधळ चालवला आहे; तेव्हा शांत रहा मी अगोदरच वैतागून गेलो आहे."

खरं तर ते चिडलेले दिसत होते, त्यांचे काळे डोळे रागाने संतप्त झाले होते; स्वतःला शांत करण्याचा प्रयत्न करत ते पुढे म्हणाले: "एका नोकराणीला भयानक स्वप्न पडले एवढेच; ती शीघ्रकोपी आणि चिंताग्रस्त आहे; तिने स्वप्नाला सत्य मानले आणि ती घाबरली. पण आता तुमच्या खोलीत परत जा. सर्व काही व्यवस्थित

a

आणि शांत होण्यापूर्वी मी जाऊन तिचे काय झाले ते पाहू शकत नाही. मित्रांनो कृपा करा इथला गोंधळ शांत झाल्याखेरीज मला तिकडे लक्ष देणे कठीण आहे. मिस इंग्राम, मला खात्री आहे की आता तुमची भीती गेली असेल."

वडिलधाऱ्या मंडळींना त्याने सांगितले की थंड कॉरिडॉरमध्ये आणखी जास्त थांबल्यास तब्बेती बिघडतील असे म्हणून कधी खुशामत करून तर कधी आदेश देऊन त्यांनी प्रत्येकाला त्यांच्या खोलीत परत पाठवले. मी तशीच खोलीत परत आले.

पण मी परत झोपले नाही; त्याउलट, मी पुर्ण कपडे केले, रडण्याचा आवाज आणि त्यामागचे शब्द बहुधा मलाच ऐकू आले असावेत; कारण ते माझ्या वरच्या खोलीतून आले होते आणि मला चांगले माहित होते की हे एका नोकराचे दुःस्वप्न नव्हते, ज्याने संपूर्ण घरात भीती पसरवली होती: मला माहित होते की मिस्टर रॉचेस्टरने दिलेल्या स्पष्टीकरणाचा उद्देश त्यांच्या पाहुण्यांना धीर देणे हाच होता. मी कोणत्याही परिस्थितीसाठी तयार राहण्यासाठी कपडे करुन खिडकीसमोर बराच वेळ बसले. ते विचित्र रडणे आणि या संघर्षाच्या मागे काय असावे याचा विचार करत होते.

हळूहळू शांतता पसरली; तासाभरानंतर थॉर्नफिल्ड पुन्हा शांत झाले; रात्रीने आणि झोपेने पुन्हा आपले वर्चस्व मिळवले होते.

चंद्र मावळणार होता; थंडीत आणि अंधारात यापुढे बसण्याची माझा इच्छा नसल्यामुळे मी खिडकीपासून दुर झाले, आणि कार्पेटवर शक्य तितक्या हळूवारपणे चालत, मी तशीच झोपण्यासाठी माझ्या बेडवर गेले; मी माझे बूट काढणार इतक्यात कोणीतरी माझ्या दारावर हलकेच ठोठावले.

"माझी गरज लागणार आहे का?" मी विचारले.

a

“तू उठली आहेस का?' मिस्टर रॉचेस्टरचा आवाज मला ऐकण्याची अपेक्षा होती.

“होय सर,” मी उत्तर दिले.

“रात्रीचे कपडे बदलून तयार आहेस?”

“होय.”

“मग लवकर बाहेर ये.”

मी बाहेर आले. मिस्टर रोचेस्टर कॉरिडॉरमध्ये उभे होते, त्यांच्या हातात एक दिवा होता.

“मला तुझी गरज आहे,” ते म्हणाले, “या मार्गाने हळू ये; आणि अजिबात आवाज करू नको.”

माझी चप्पल पातळ होती, आणि कार्पेटवर माझ्या पावलांचा आवाज मांजरीच्या पायांपेक्षा जास्त ऐकू येत नव्हता. मि. रोचेस्टर दुसऱ्या मजल्याचा कॉरिडॉर ओलांडून, पायऱ्या चढून तिसऱ्या मजल्यावर चढताना थांबले, मला ते खूप उदास वाटले; मी त्याच्या मागे गेले आणि त्याच्या शेजारी उभी राहिले.

“तुझ्या खोलीत स्पंज आहे का?” त्याने मला अतिशय शांतपणे विचारले.

“होय सर.”

“आणि स्मेलींग सॉल्ट ?

“होय.”

“परत जा आणि या दोन्ही गोष्टी घेऊन ये.”

मी माझ्या खोलीत परतले; मी स्पंज आणि स्मेलींग सॉल्ट घेतले आणि पुन्हा पायऱ्या चढले; ते माझी वाट पाहत होते आणि त्यांच्या हातात एक चावी होती. एका छोट्याशा दारापाशी जाऊन त्याने चावी कुलपात अडकवली; मग थांबून त्यांनी मला पुन्हा उद्देशून म्हटले:

“तू रक्ताचे दृश्य सहन करू शकतेस?”

“होय असे मला वाटते,” मी उत्तर दिले; पण मी अजून त्याची चाचणी केलेली नाही.”

जेव्हा मी त्याला उत्तर दिले तेव्हा मला माझ्या शक्ती संचारल्या सारखे वाटले.

“मला तुझा हात दे,” ते म्हणाले; कारण मी तुला बेशुद्ध पाहण्याची जोखीम घेऊ शकत नाही.”

मी माझी बोटे त्यांच्या बोटांमध्ये गुंतवली.

“हात उबदार आणि दृढ आहेत,” ते म्हणाले; मग चावी फिरवत त्यांनी दार उघडले.

मिसेस फेअरफॅक्सने मला घर दाखवले, ते मला आठवले. तेव्हा मिस्टर रोचेस्टर उघडत असलेली खोलीच्या पुढे वेलबुट्टीदार कापडाचा भला मोठा पडदा टांगलेला होता, आणि त्याआड खोलीचे दार लपलेले होते. रोचेस्टरनी दार उघडले, आत उजेड पडला होता. आतून गुरगुरल्यासारखे ओरबाडून हिसकावून घेतल्यासारखे आवाज येत होते जणू दोन कुत्री एकमेकांवर गुरकावत असल्यासारखे वाटले.

मिस्टर रोचेस्टरनी मेणबत्ती माझ्याशेजारी ठेवली आणि मला एक मिनिट थांबायला सांगून ते खोलीत गेले. ते आत गेल्यावर प्रथम थोडा गोंगाट वाटला, नंतर ग्रेस पूलचे 'हा!हा!' असे हसणे ऐकू आले, म्हणजे ती दुष्ट चेटकीण तिथेच होती तर. मिस्टर रोचेस्टर न बोलता काही कामाची व्यवस्था करत होते; त्यांच्याबरोबर कोणी तरी हळू आवाजात बोलत असल्याचे ऐकले. ते बाहेर आले आणि त्यांनी मागचे दार बंद करून घेतले.

"इकडे जेन," रोचेस्टर मला म्हणाले, मी त्यांच्या मागून एका मोठ्या पलंगाच्या दुसऱ्या बाजूला गेले. मोठ्या पडद्यांनी खोलीचा भाग लपवला होता. पलंगाच्या डोक्याकडच्या बाजूला आराम खुर्चीवर एक माणूस बसला होता. त्याचा पोशाख उत्तम होता पण कोट मात्र घातला नव्हता.

त्याचे डोके मागे झुकलेले होते; डोळे बंद होते. मिस्टर रोचेस्टरनी त्याच्याजवळ मेणबत्ती धरली; मी त्याच्या फिकट गुलाबी निर्जीव चेहऱ्याला ओळखले - अनोळखी गृहस्थ मि. मेसन: मी पाहिले की त्याची एक बाजू आणि एक हात जवळजवळ रक्ताने भिजलेला होता.

"मेणबत्ती धर!" मिस्टर रोचेस्टर म्हणाले, आणि मी तसे केले; ते पाण्याने भरलेले भांडे आणायला गेले आणि ते मला धरायला सांगितले. मी त्याप्रमाणे ते धरले, मग त्यानी स्पंज घेतला, तो पाण्यात बुडवला आणि मेसनच्या चेहरा पुसला, तो मला निर्जीव वाटला. नंतर त्यांनी माझ्याकडे स्मेलींग सॉल्ट मागितले आणि मिस्टर मेसनला श्वास घ्यायला लावला. त्यांनी थोड्या वेळाने डोळे उघडले आणि त्यांचे कण्हणे ऐकू आले. मिस्टर रोचेस्टरने जखमी माणसाचा शर्ट बाजूला केला, त्याचा हात आणि खांदा बँडेजमध्ये गुंडाळला होता, रोचेस्टरनी स्पंजने वाहणारे रक्त टिपून घेतले.

"काही तात्काळ धोका आहे का?" मेसन पुटपुटले.

"छे! एक साधा ओरखडा आहे! इतके निराश होऊ नका, तुम्ही शुर आहात हे दाखवून द्या. मी स्वत: एक सर्जनला बोलावायला जाईन आणि मला आशा आहे की तुम्ही उद्या सकाळी निघून जाल, जेन!" ते पुढे बोलू लागले.

"सर?

"मला तुला एक किंवा दोन तासांसाठी येथे एकटे सोडणे भाग आहे; तेव्हा तू मी केले तसे रक्त जर पुन्हा वाहू लागले तर पुसून टाक आणि तो मूर्च्छित झाला

a

तर तो पाण्याचा पेला त्याच्या ओठांजवळ आणून त्याला स्मेलींग सॉल्ट हुंगायला लाव. तू कोणत्याही परिस्थितीत त्याच्याशी एक शब्दही बोलणार नाहीस आणि तू, रिचर्ड जर तू एक शब्द जरी बोललास तर तू तुझा जीव धोक्यात घालशील. जर तू तुझे तोंड उघडलेस तर मात्र मी यापुढे कुठलेही उत्तर देण्यास बांधील नाही."

तो बिचारा परत कण्हला; त्याला हलण्याची हिंमत नव्हती. मृत्यूची भीतीने किंवा कदाचित आणखीन कशाने तरी त्याला शक्तीहीन बनवले होते. मिस्टर रोचेस्टरनी स्पंज माझ्या हातात ठेवला आणि मी त्याच्याप्रमाणे रक्त थांबवण्याचा प्रयत्न करू लागले; त्यांनी एक मिनिट माझ्याकडे पाहिले आणि मला म्हणाले:

"लक्षात ठेव: एकही शब्द बोलू नको!"

मग ते खोलीतून निघून गेले.

कुलूप लावून घेतल्याचा आवाज झाला आणि मला चमत्कारिक भावना जाणवली, मला त्यांच्या सावध व हलक्या पावलांचा आवाज ऐकू आला नाही.

म्हणजे मी रात्रीच्या वेळी तिसऱ्या मजल्यावरच्या एका गूढ खोलीत बंद होते. माझ्या डोळ्यांसमोर एक फिकट पडत चाललेला, रक्तने माखलेला माणूस होता. मारेकरी आणि माझ्यामध्ये, संरक्षणासाठी एक साधे दार होते; हे सर्वात भयानक होते: बाकी काही, मी सहन करू शकले असते; पण परत परत माझ्या मनात ग्रेस पूल विषयी विचार येत होते त्यामुळे मी हादरुन गेले.

तरीही मला माझ्या कामावर दक्ष रहाणे आवश्यक होते. मि. मेसन यांचे ओठ निळे पडत चालले होते. रोचेस्टरनी बाहेर जाताना बोलण्याची मनाई केली होती. मि. मेसन डोळे मिटून निपचीत पडले होते, मधेच ते अर्धवट उघडलेल्या डोळ्यांनी खोलीभर नजर फिरवत तर कधी माझ्याकडे पहात होते. त्या नजरेत भय होते. मेणबत्तीच्या मंद प्रकाशात मला सारखी पाण्याने जखम पुसून घ्यावी लागत होती.

a

जुन्या वेलबुट्टीच्या मोठ्या पडद्यावर आणि पलंगाच्या वर टांगलेल्या मच्छरदाणीवर गडद सावल्या पडल्या होत्या तसेच माझ्या समोर असलेल्या मोठ्या कपाटाच्या दारावर पण विचित्रपणे तरंगत होत्या. हे दार बारा चौकटीमध्ये विभागले गेले होते. प्रत्येक चौकटीत एक असे येशूच्या बारा शिष्यांची चित्रे कोरलेली होती. सर्वात वरती वधस्थंभावर चढवलेल्या ख्रिस्ताची एबनीच्या लाकडाची बनवलेली मुर्ती ठेवली होती.

हालत्या सावल्या आणि दिव्याच्या प्रकाशाचा जणू खेळ चालला होता, त्यामुळे येशूच्या शिष्यगणांची चित्रे वेगळीच दिसत होती, लांब दाढी असलेल्या सेंट ल्यूकचे कपाळ खाली झुकल्यासारखे वाटत होते आणि सेंट जाँनचे केस वाऱ्याने उडत आहेत असा भास होत होता. जूडासच्या सैतानी चेहऱ्यावर, जणू खरोखरच सैतान प्रगट झाल्यासारखे दिसत होते.

सर्व दृश्यांमध्ये, मी मात्र शेजारच्या खोलीतील स्त्रीची काही हालचाल ऐकू येते की नाही याचा कानोसा घेत होते. असे वाटत होते की मिस्टर रॉचेस्टरनी त्या खोलीत जाऊन जादूने तिला शांत केले असावे. रात्रभर मला थोड्या थोड्या अंतराने फक्त तीनच आवाज ऐकू आले: पावलांचा आवाज, कुत्र्यासारखे गुरगुरणे आणि जखमी मेसनचे कण्हणे.

मला स्वतःच्याच विचारांनी भारावून गेले होते: या घरात बंदिस्त हा गुन्हेगार कोण असू शकतो आणि वाड्याचा मालक कसा काय त्याला हाकलून देऊ शकत नाही किंवा त्याच्यावर अंकुश ठेऊ शकत नाही? हे रहस्य काय होते जे यापुर्वी आगीच्या स्वरूपात प्रगट झाले होते आणि आता मि. मेसन रक्तबंबाळ होऊन मरणाच्या दारी उभा होता. हा कोण प्राणी होता जो स्त्रीचे रूप आणि आवाज धारण करून सैतान बनून शिकारी पक्षी भक्ष्याच्या मागे लागल्यासारखा हिंस्त्रपणे मघाशी ओरडत होता?”

हा शांत अनोळखी माणूस या भयानक जाळ्यात कसा अडकला?

कुणाचा रोष याच्यावर ओढवला असेल? या क्षणी तो अंथरुणावर झोपलेला असायला हवा होता, मग तो घराच्या या भागात का आला होता? रोचेस्टरनी त्याला खालच्या मजल्यावर एक खोली दिल्याचे मी ऐकले होते. तो वर कशासाठी आला होता? त्याला इथे कोणी आणले आणि त्याने हिंसाचार किंवा विश्वासघात इतक्या शांतपणे का सहन केला? मिस्टर रॉचेस्टरनी त्याच्यावर लादलेले मौन त्याने इतक्या सहजतेने का स्वीकारले आणि मुळात मिस्टर रोचेस्टरने त्याच्यावर मौन लादलेच का? त्यांच्या पाहुण्या व्यक्तीवर जवळजवळ खुनाचा प्रयत्न झाला, काही काळापूर्वी त्यांच्या स्वतःच्या जीवावर एक कट रचला गेला होता आणि तरीही हे दोन हल्ले गुप्त राहावेत अशी त्यांची इच्छा होती. मी नुकतेच मिस्टर मेसनला मिस्टर रोचेस्टरानी केलेली आज्ञा, त्यांनी आत्यंतिक जखमी अवस्थेत सुध्दा नम्रपणे स्विकारल्याचे पाहिले होते. त्याचे कारण त्यांच्या पूर्वीच्या संबंधांमध्ये नक्कीच दडलेले असणार. मिस्टर मेसनच्या आगमनाची बातमी ऐकून मिस्टर रोचेस्टरला त्रास का झाला? हा माणूस येईल अशी त्यांना अजिबात अपेक्षा नव्हती आणि तरीसुद्धा त्यांनी एखाद्या लहान मुलाला आई रागवते तसे वागवले होते.

जेव्हा ते कुजबुजले: "जेन! जेन! मला झटका मिळाला, मला धक्का बसला!" आणि त्यांची मान, माझ्या खांद्यावर विसावली तेव्हा त्यांच्या हाताचा झालेला थरकाप मी विसरू शकले नाही. रॉचेस्टरचा दृढ निश्चयी सशक्त असणाऱ्या माणसाला कमकुवत करणारी, 'मेसन येणे' ही गोष्ट नक्कीच काही साधी घटना नव्हती.

"रोचेस्टर कधी परत येतील?" मी स्वतःला विचारले; कारण रात्र बरीच झाली होती आणि माझ्या पेशंटचे रक्त कमी होत होते. त्यामुळे त्याचे कण्हणे आणि अशक्तपणा वाढला होता; कोणतीही मदत अजून पोहोचली नव्हती आणि लौकरच

a

दिवसाचा मंद प्रकाश पडायची वेळ जवळ आली होती. मी अनेक वेळा मेसनना स्मेलींग सॉल्ट हुंगायला भाग पाडले होते; पण मला माझे प्रयत्न व्यर्थ होत आहेत असे वाटायला लागले: शारीरिक दुःख, मानसिक दुःख आणि अंगातील कमी होणारे रक्त या तीन गोष्टी एकत्रित झाल्याने त्याची शक्ती क्षणोक्षणी कमी होत होती; ते पाहून मला भीती वाटली. शेवटी मेणबत्ती विझली, बाहेरचा अंधुक प्रकाश खिडकीतून येत असल्याचे जाणवले: सकाळ जवळ येत होती. त्याच क्षणी मी अंगणात पायलटच्या भुंकण्याचा आवाज ऐकला आणि मला पुनर्जन्म झाल्यासारखे वाटले. माझी आशा पल्लवीत झाली; पाच मिनिटांनंतर कुलूपात चावी सरकवल्याचा आवाज आला; ही एक रात्र मला वर्षासारखी वाटली.

मिस्टर रोचेस्टर सर्जनबरोबर दाखल झाले.

“आता कार्टर, घाई करा,” मिस्टर रोचेस्टर डॉक्टरांना म्हणाले; जखमेवर मलमपट्टी करण्यासाठी, बँडेज घालण्यासाठी आणि रुग्णाला खाली नेण्यासाठी तुमच्याकडे फक्त अर्धा तास आहे.

“पण तो इथून हलवण्याच्या परिस्थितीत आहे का?”

“यात फार काही गंभीर नाही, तशी काळजी करण्याचे कारण नाही; तो जास्त घाबरला आहे, आपल्याला त्याला धीर द्यावा लागेल. चला कामाला लागूया.”

मिस्टर रोचेस्टरनी खिडकीचा जाड पडदा बाजूला केला. पहाटेचा प्रकाश आता आत आला; एव्हढ्यात पहाट होत आलेली पाहून मला आश्चर्य आणि आनंद वाटला. गुलाबी किरणे पूर्वेला उजळू लागली; मि.रोचेस्टर, मि. मेसनशी बोलू लागले, सर्जन आधीच कामाला लागले होते.

“माझ्या मित्रा, तू आता कसे वाटते?” त्यांनी विचारले.

“मला वाटलं तिने माझा जीवच घेतला,” तो क्षीणपणे उत्तरला.

a

"अजिबात नाही; धीर धर, पंधरवड्यात तू पहिल्यासारखा तंदुरुस्त होशील; थोडे रक्त गमावले इतकेच. डॉ.कार्टर, त्याला सांगा की कोणताही धोका नाही."

"अरे होय! मी ते पूर्ण खात्रीपूर्वक सांगू शकतो," कार्टर म्हणाले, त्यांनी नुकतेच बँडेज पूर्ण केले होते; "फक्त जर मी इथे थोडाआधी आलो असतो, तर त्याचे इतके रक्त वाया गेले नसते. पण हे काय आहे? खांद्याचे मांस फाटले आहे. हे फक्त कापलेले नाही; ही जखम चाकूने केलेली नाही: येथे दातांनी चावा घेतला असावा बरोबर?."

"हो, ती मला चावली," तो पुटपुटला; रॉचेस्टरने तिच्या हातातून चाकू हिसकावून घेतला तेव्हा ती वाघिणीसारखी मला फाडून टाकत होती.

"तुम्ही हार मानायला नको होती," मिस्टर रोचेस्टर म्हणाले, "तुम्ही लगेच तिच्याशी लढायला हवे होते."

"पण अशा परिस्थितीत मी काय करू शकत होतो? मेसनने उत्तर दिले. "बापरे! ते भयंकर होते," तो थरथरत पुढे म्हणाला, "आणि मला त्याची अपेक्षा नव्हती; ती सुरुवातीला खूप शांत वाटली!"

"मी तुला सावध रहायला सांगितले होते," रोचेस्टर म्हणाले; "जेव्हा तू इथे आलास तेव्हाच मी तुला इथल्या परिस्थितीची कल्पना दिली होती; शिवाय तू दुसऱ्या दिवसापर्यंत थांबू शकला असतास तर मी पण तुझ्याबरोबर आलो असतो: रात्रीच्यावेळी एकट्याने मुलाखत घेण्याचा प्रयत्न करणे हा वेडेपणा होता."

"मला वाटले काहीतरी चांगले होईल हाच विचार करून मी आलो होतो."

"तुला वाटलं! तू विचार केलास! होय; तुझे विचार ऐकायला मी अधीर झालो आहे: परंतु, तथापि माझ्या सल्ल्याकडे दुर्लक्ष केल्यामुळे तू पुरेसे दु:ख सहन केले आहेस आणि तुला यापुढेही सहन करावे लागणार आहे. त्यामुळे मी अधिक

a

काही बोलणार नाही, डॉ.कार्टर, त्वरा करा, लवकरच सूर्य उगवेल आणि आपल्याला त्याला बाहेर घेऊन जायचे आहे.”

“लगेच सर. मी खांद्यावरचे काम पूर्ण केले आहे; पण मला हातावरची जखम पहावी लागेल; तिथेही मला त्याच्या दातांची खूण दिसली.”

“तिने माझे रक्त शोषले,” मेसनने उत्तर दिले; तिने दावा केला की तिला माझ्या हृदयातून सर्व रक्त काढायचे आहे.”

मी मिस्टर रोचेस्टरला थरथर कापताना पाहिले; त्याच्या चेहऱ्यावर तिरस्कार, भय आणि द्वेषाची तीव्र अभिव्यक्ती दिसत होती. पण ती क्षणार्धात लुप्त पावली, ते लगेच स्वतःला सावरले आणि म्हणाले,

“शांत राहा, रिचर्ड; तिने काय केले ते कधीच विसरू नको आणि त्याबद्दल कधीही बोलू नको.”

“मी कसा विसरू शकेन?” त्याने उत्तर दिले.

“जेव्हा तू हा देश सोडून वेस्ट इंडिजला परत जाशील तेव्हा विसरशील; एकतर ती मेली आहे असे गृहीत धरून किंवा त्याऐवजी तिच्याबद्दल अजिबात विचार न करणे चांगले होईल.”

“ही रात्र विसरणे अशक्य आहे!”

“नाही, हे शक्य आहे. थोडी हिंमत आण; दोन तासांपूर्वी तुला वाटले होते की तू मरणार आणि आता तू जिवंत आहेस आणि इतरांशी तू बोलत आहेस. डॉ. कार्टरनी कमी वेळात योग्य उपाययोजना केलेली आहे, लगेच तू कपडे घाल.

“जेन,” आल्यापासून पहिल्यांदा माझ्याकडे वळून म्हणाले, “ही चावी घे, माझ्या खोलीत जा, माझ्या कपाटाचा वरचा ड्रॉवर उघड आणि एक स्वच्छ शर्ट आणि टाय घेऊन ये, लगेच घाई कर.”

a

मी निघाले; त्यांनी सांगितलेले कपाट शोधून त्यातील सांगितले कपडे घेऊन मी लगेच परत आले.

“आता त्याचे कपडे बदलेपर्यंत पलंगाच्या दुसऱ्या बाजूला जा,” मिस्टर रोचेस्टर म्हणाले; “पण खोली सोडून जाऊ नकोस; आम्हाला अजूनही तुझी गरज लागू शकते.”

मी त्याप्रमाणे केले.

“जेन, तू खाली गेल्यावर तुला काही कोणी उठल्याचा आवाज आला का?” रोचेस्टरनी विचारले.

“नाही सर ; सर्व काही शांत होते.”

“आता तुला आम्हाला निरोप द्यावाच लागणार आहे; तुमच्या सुरक्षेसाठी आणि तिथे बंदिस्त असलेल्या त्या प्राण्याच्या सुरक्षेसाठी ते चांगले होईल. काहीही कळू नये म्हणून मी बराच काळ लढलो आहे आणि माझे सर्व प्रयत्न व्यर्थ गेले हे मला आवडणार नाही. कार्टर, त्याला शर्ट घालण्यास मदत करा. तुझा फर-लाइन असलेला कोट कोठे आहे? मला माहित आहे की आमच्या थंड वातावरणात तू त्याशिवाय एक मैल जाऊ शकत नाही. तो तुमच्या खोलीत असेल. जेन, माझ्या शेजारी असलेल्या मिस्टर मेसनच्या खोलीत जा आणि तेथून कोट घेऊन ये.”

मी पुन्हा धावले आणि कोट घेऊन लवकरच परत आले.

“आता तुझ्याकडे अजून एक काम बाकी आहे,” रोचेस्टर म्हणाले. “जेन, तुझ्याकडे मखमली शूज आहेत, त्यामुळे पावलांचा आवाज येत नाही; बरं, मग परत माझ्या खोलीत जा आणि माझ्या ड्रेसिंग टेबलचा मधला ड्रॉवर उघड, तिथे तुला एक छोटी कुपी आणि एक लहानसा ग्लास मिळेल तो मला आणून दे.”

मी निघाले आणि मला जे सांगितले होते ते घेऊन आले.

a

“ते चांगले झाले. आता डॉक्टर, मी आमच्या रुग्णाला एक औषध देणार आहे ज्याची सर्व जबाबदारी मी स्वतःवर घेतो. मला हे रोममध्ये एका इटालियन भोंदूबाबाने भेट म्हणून दिले होते. याने जबरदस्त किक येते; गोष्ट हलक्या हाताने वापरली जाऊ नये परंतु अशा प्रसंगी चांगली असते. जेन, थोडे पाणी आण.”

मी अर्धा छोटा ग्लास पाण्याने भरला.

त्यांनी मेसनला दिलेल्या ग्लासमध्ये लाल वाईनचे बारा थेंब ओतले.

“हे पी, रिचर्ड,” ते म्हणाले; “यामुळे तुला किमान तासभर शक्ती मिळेल.”

“पण मला त्रास होईल; हे एक त्रासदायक मद्य आहे.”

“औषध म्हणून पी, एकदम पिऊन टाक.”

मिस्टर मेसनने आज्ञा पाळली कारण त्याला प्रतिकार करणे अशक्य होते. त्याने कपडे घातले होते; तो अजूनही मला खूप फिकट दिसत होता; पण आता तो रक्ताने माखलेला नव्हता. मिस्टर रोचेस्टरने त्याला काही मिनिटे बसायला लावले. त्याने लाल वाईन संपवल्यानंतर त्याला हाताला धरून उठवले.

“आता,” ते म्हणाले, “मला खात्री आहे की तू उभे राहू शकतोस; प्रयत्न करून पहा.”

आजारी माणूस उठण्याचा प्रयत्न करू लागला.

“डॉ. कार्टर, त्याला दुसऱ्या हाताखाली आधार द्या. उठ रिचर्ड काळजी करू नकोस आणि चालण्याचा प्रयत्न कर. छान चांगला प्रयत्न आहे.”

“आता मला बरे वाटते,” मेसन म्हणाला.

“मला याची खात्री होती. आता, जेन, आमच्याबरोबर खाली ये; बाजूचा दरवाजा उघड; गाडीवानाला अंगणात किंवा बाहेर थांबायला सांग, फरशीवर चाकांचा आवाज येता कामा नये. त्याला तयार राहण्यास सांग. आम्ही येत आहोत;

a

जर कोणी आधीच पाहुणे तिकडे असतील, तर पायऱ्यांवर खोकल्याचा आवाज करून आम्हाला सावध कर.”

साडेपाच वाजले होते. सूर्योदय होण्याची वेळ आली होती; तरीही स्वयंपाकघरात अजूनही अंधार होता, सगळीकडे शांतता होती; बाजूचा दरवाजा बंद होता; मी तो शक्य तितक्या शांतपणे उघडला आणि अंगणात प्रवेश केला. तिथे पण शांतता होती: परंतु दरवाजे सर्व उघडे होते आणि बाहेर एक बंद घोडागाडी उभी होती. गाडीवान आत बसलेला दिसला. मी त्याच्याजवळ जाऊन त्याला सांगितले की मालक येत आहेत; मी सगळीकडे लक्षपूर्वक पाहिले. सगळीकडे पहाटेची शांतता पसरली होती; नोकरांच्या खोलीतील खिडक्यांचे पडदे अजूनही बंद होते; बागेतील झाडांवर फुललेल्या पांढऱ्या शुभ्र मोहरावर छोट्या पक्षांचा किलबिलाट सुरु झाला होता. झाडांच्या लहान डहाळया जवळच्या भिंतीवर पसरल्या होत्या. त्या पांढऱ्या फुलांच्या माळांसारख्या दिसत होत्या. तबेल्यात घोड्यांच्या टापांचे आवाज ऐकू येत होते. तेव्हढ्यात मि. मेसन, मिस्टर रोचेस्टर आणि डॉक्टरांच्या मदतीने येत असतांना दिसले. चालतांना त्यांना विशेष त्रास होत असल्याचे जाणवत नव्हते, त्या गाडीत बसवले आणि मग डॉ. कार्टर पण चढले.

“त्याची काळजी घ्या,” मिस्टर रोचेस्टर सर्जनना म्हणाले; तो पूर्णपणे बरा होईपर्यंत त्याला घरी ठेवा; मी एक-दोन दिवसांत येवून त्याची खुशाली जाणून घेईन. आता तू कसा आहेस, रिचर्ड?

“ताज्या हवा मुळे मला थोडे बरे वाटत आहे.”

“त्याच्या बाजूची खिडकी उघडा, कार्टर; तिथे वारा येत नाही. अलविदा, रिचर्ड.”

रोचेस्टर!”

तुला काय हवे आहे?”

“तिची चांगली काळजी घ्या; तिला शक्य तितक्या प्रेमळपणे वागवा; करा… “ तो थांबला त्याच्या डोळ्यात अश्रु उभे होते.

“आतापर्यंत मी माझ्याकडून शक्य ते सर्व केले आहे आणि मी पुढेही चालू ठेवीन,” रोचेस्टरनी उत्तर दिले; मग त्याने दरवाजा बंद केला आणि घोडागाडी निघून गेली.

“हे सर्व कधी संपणार, एक त्या परमेश्वराला माहीत,” रोचेस्टर मागचे दार बंद करत म्हणाले.

मग ते बागेत जाणाऱ्या दाराकडे हळू हळू चालत गेले; त्यांना यापुढे माझी गरज नाही असे समजून मी परत जाणार होते, तेव्हढ्यात त्यांनी हाक मारली: ते दार उघडून माझी वाट पाहत होते.

“ये, काही क्षण जिथे ताजी मोकळी आहे तिथे चल,” ते म्हणाले, “हा वाडा म्हणजे तुरुंग आहे; असे तुला वाटत नाही काय?”

“तो मला खूप देखणा वाटतो, सर.”

“अनुनभवी आहेस म्हणून असे तुला वाटते,” ते म्हणाले, “भारावून गेल्यामुळे त्याची तुला भुरळ पडली आहे. त्यामुळे तुला पारख करता येत नाही. वास्तविक या मुलामा दिलेल्या गोष्टी चिखलाच्या बनल्या आहेत, हे रेशमी पडदे म्हणजे कोळयाच्या जाळयांची जळमटे आहेत, हा संगमरवर नसून घाणेरडा पांढरट रंगाचा दगड आहे, हे लाकडाचे कोरीव काम म्हणजे निव्वळ लाकडाचे तुकडे आणि झाडाची खडबडीत साल आहे.”

इथे आम्ही नुकतेच आत शिरलो होतो त्या वेलिच्या कुंपणाकडे बोट दाखवत ते म्हणाले, “इथली प्रत्येक गोष्ट ताजी, गोड आणि शुद्ध आहे.”

बोलण्याच्या नादात, रोचेस्टर लहान, लहान झाडांचे कुंपण असलेल्या बागेतील रस्त्यावरून चालायला लागले, एका बाजूला पेअर, सफरचंद आणि

चेरीची झाडे होती तर दुसऱ्या बाजूला कार्नेशन, प्राइमरोसेस, पॅन्सी, हॉथॉर्न आणि सुवासिक औषधी वनस्पती होत्या. वसंत ऋतुतल्या सुंदर सकाळी सुर्याची कोवळ्या किरणांत पानावर दवबिंदू चमकत होते.

"जेन, तुला एक फूल दिलेले आवडेल का?" मिस्टर रोचेस्टरनी मला विचारले.

आणि त्यांनी झाडावर पहिलाच, अर्धवट उमललेला गुलाब उचलला आणि मला दिला.

"धन्यवाद, सर" मी उत्तर दिले.

"तुला सूर्योदय आवडतो का, जेन? हे आकाश आता ढगांनी झाकलेले आहे ते उन्हे पडल्यावर मोकळे होईल. तुला ही प्रसन्न आणि आल्हाददायक हवा आवडते का?"

"होय, सर, मला खुप आवडते."

"जेन, कालची रात्र तुझ्यासाठी फार विचित्र गेली."

"हो खूपच विचित्र होती सर."

"त्यामुळे तू खुपच थकलेली दिसत आहेस; जेव्हा मी तुला मेसनबरोबर एकटीला सोडले तेव्हा तू घाबरलीस काय?"

"होय, मागच्या बेडरूममधून कोणीतरी बाहेर येईल म्हणून मला भीती वाटली."

"पण मी दार बंद केले होते आणि चावी माझ्या खिशात होती; जर मी माझ्या मेंढरापैकी आवडती मेंढी लांडग्याच्या सानिध्यात सोडली असती तर मी खूप निष्काळजी मेंढपाळ झालो असतो; तू सुरक्षित होतीस."

"सर, ग्रेस पूल तिथेच राहते काय?"

"होय; त्याची काळजी करू नको, हे सर्व विसरून जा."

a

“परंतु मला असे वाटते की ती तिथे आहे तोपर्यंत तुमचे जीवन सुरक्षित नाही.”

“काळजी करू नको, मी ते स्वतः बघेन.”

“आणि काल रात्री तुम्हाला जो धोका वाटत होता तो आता दूर झाला आहे का सर?”

“मेसन इंग्लंडमध्ये असताना किंवा तो निघून गेल्यावरही मी निश्चितपणे सांगू शकत नाही; माझ्यासाठी जगणे म्हणजे ज्वालामुखीच्या तोंडावर उभे राहणे आहे. ज्याचा कधीही उद्रेक होऊ शकतो.”

“पण मिस्टर मेसन तुमच्या सांगण्यातील माणूस दिसतो: तुमचा त्याच्यावर सर्व अधिकार आहे असे वाटले; तो तुमच्या विरोधात कधीही धाडस करणार नाही किंवा जाणूनबुजून तुमचे नुकसान करणार नाही.”

“नाही! मेसन माझ्या विरोधात धाडस करणार नाही किंवा जाणूनबुजून माझे नुकसान करणार नाही; पण इच्छा नसताना तो अगदी निष्काळजीपणाने एखादा शब्द बोलून मला आयुष्यापासून नाही पण आनंदापासून वंचित करू शकतो.”

“त्याला काळजी घेण्याचा सल्ला द्या, सर, त्याला तुमची भीती सांगा आणि त्याने धोका कसा टाळावा हे त्याला सांगा.”

मी त्यांच्या ओठांवर एक व्यंग्यपूर्ण हास्य पाहिले; त्यांनी माझा हात पकडला, मग पटकन सोडूनही दिला. ते पुढे म्हणाले, “हे शक्य झाले असते तर कोणताही धोका नसता; मी मेसनला ओळखत असल्याने आता मला फक्त त्याला म्हणायचे होते, “हे कर,” आणि त्याने ते केले. पण या प्रकरणात मी त्याला कोणतेही आदेश देऊ शकत नाही; मी त्याला म्हणू शकत नाही: “रिचर्ड, मला इजा होणार नाही याची काळजी घ्या!” कारण त्यामुळे मला हानी पोहोचवण्याची शक्यता आहे

हे त्याला माहीत नसावे. मी तुला कोड्यात टाकलेले दिसते; बरं, मी अजून एका कोड्यात टाकणार आहे. तू माझी मैत्रीण आहेस, आहेस ना?"

"सर, मला तुमच्यासाठी उपयोगी पडायचे आहे आणि ते सर्वकाही, जे योग्य असेल त्याची तुमची आज्ञा पाळेन."

"अगदी तंतोतंत, तू नक्की करशील, मला ते लक्षात आले; मला तुझ्या चेहऱ्यावर, तुझ्या डोळ्यात आणि तुझ्या हावभावातून मला आत्मीयता दिसली. तू जेव्हा मला मदत करायला, मला खुष करायला---माझ्यासाठी, माझ्याबरोबर काम करायला, आता तू जे सांगितलेस,'ते सर्वकाही, जे योग्य असेल': म्हणजे,मी काही सुचना केली आणि ती तुझ्या मते चुकीची वाटली तर लगेच हलक्या पावलांनी जावून नीटनेटके काम करायला तयार नाहीस. सजीव दृष्टीक्षेप नाहीत की उजळलेला चेहरा नाही. माझी मैत्रीण शांतपणे माझ्याकडे येऊन सांगेल, नाही सर; ते अशक्य आहे: मी ते करू शकत नाही, कारण ते चुकीचे आहे;" आणि तू ध्रुवताऱ्या प्रमाणे आपल्या मतावर स्थिर रहाशील. तुझ्याकडे माझ्यावर प्रभाव टाकण्याची शक्ती आहे आणि मला कदाचित दुखावण्याची देखील": "पण तरीसुद्धा माझ्याकडे तेव्हढे धाडस नाही की माझी कमजोरी तुला अवगत करून द्यावी. नाहीतर तुझ्यासारखी विश्र्वासू, प्रेमळ मैत्रीण, हतबुद्ध होऊन निघून जाईल."

"जर तुम्हाला मि. मेसनकडून वाटणारी भीती माझ्याकडून वाटणाऱ्या भीतीपेक्षा, कमी असेल, तर तुम्ही सुरक्षित असाल."

"देव करो आणि तसेच होवो! जेन, इथे एक लतामंडप आहे; तिथे थोडावेळ बसूया."

भिंतीतल्या कमानीखाली लतामंडप होता. त्यावर वेली चढवलेल्या होत्या. त्याखाली बसण्यासाठी दगडी कट्टा होता. मिस्टर रोचेस्टर माझ्यासाठी पुरेशी जागा सोडून तिथे बसले; पण मी त्याच्यासमोर उभी राहिले.

a

“बस,” ते मला म्हणाले; “दोघांना बसण्यासाठी पुरेशी मोठी जागा आहे, मला वाटतं, तू माझ्या बाजूला बसायला संकोच करणार नाहीस, बरोबर ना?”

मी तिथे बसून त्यांच्या प्रश्नाचे उत्तर होकारार्थी दिले, कारण मी पाहिले की यापुढे नकार देणे चुकीचे आहे.

“जेन,” मिस्टर रॉचेस्टर पुढे म्हणाले, “जेव्हा सुर्याची किरणे दवबिंदू पिऊन घेतात, जेव्हा या बागेतील सर्व फुले जागी होऊन उमलू लागतात आणि पक्षी आपल्या पिलांसाठी चारा थॉर्नफिल्डच्या शेतातून चारा घेऊन येतात, भल्या सकाळी, मधमाश्या कामाला लागतात----जेन मी तुला एक गोष्ट सांगणार आहे, कल्पना कर की त्यातील मुख्य पात्र तू आहेस, प्रथम माझ्याकडे बघून सांग, तुला काही अवघडल्यासारखे वाटत नाही ना? मी तुला इथे थांबायला सांगितले, यात तुला काही चुकीचे वाटत नाही ना, की तू थांबून चुक केली आहेस असे वाटते?”

“नाही, सर, मी आनंदी आहे.”

“बरं!; कल्पना कर की तू एक चांगले संगोपन झालेली शिस्तबद्ध अशी तरुण मुलगी नसून लहानपणापासून बिघडलेला, एक असंस्कृत तरुण आहेस; समज तू एखाद्या दूरच्या देशात आहेस आणि तिथे तुझ्या हातून एक गंभीर घोडचूक झाली. त्याचे नेमके स्वरूप काय किंवा त्यामागील हेतू कोणता याने फरक पडत नाही पण त्याचे परिणाम आयुष्यभर भोगावे लागणार. तो कलंक तुमच्या सर्व अस्तित्व व्यापून रहातो. लक्षात घे मी ‘गुन्हा' केला असे म्हणत नाही जसे, खून, रक्तपात अथवा इतर गुन्हे जे, कायद्याच्या अंतर्गत गुन्हेगारी स्वरुपाचे असून शिक्षेस पात्र आहेत. मी 'चुक' या शब्दाचा वापर केला आहे, चुक, पण जिचे परिणाम नंतर असह्य होतात. त्यापासून सुटका करून घेण्यासाठी जर काही उपाययोजना केली: अपवादात्मक उपाय, जे बेकायदेशीर अथवा आक्षेपार्ह नाहीत, तरीही तू दु:खीच राहिलात. आयुष्यातून आशा सोडून गेली आणि तुमच्या सुर्याला भर मध्यान्ही ग्रहण लागले

a

आणि सुर्यास्तापर्यंत ते ग्रहण संपण्याची शक्यता नसेल. कडवट आणि खारट या दोनच चवींची ओळख तुमच्या स्मरणात असतील. विश्रांतीसाठी तू वणवण भटकत आहेस, सुखात आनंद शोधत आहेस---मला म्हणायचे आहे की वासनामय इंद्रियजन्य सुख ज्यात हृदयांतील भावनांना बिल्कुल स्थान नाही.

"बुद्धीला न पटणारे, भावनांवर अनिष्ट परिणाम करणारे जीवन जगून तुम्ही थकलेल्या अंतःकरणाने, कोमेजलेल्या आत्म्याने अनेक वर्षांच्या स्वेच्छा वनवासानंतर तुमच्या मायदेशी परतता; तिथे तुम्ही कोणाला भेटता कसे किंवा कुठे यामुळे काही फरक पडत नाही; पण या व्यक्तीमध्ये तुम्हाला ते सुंदर, तल्लख गुण सापडतील ज्यांच्या शोधात तुम्ही वीस वर्षांपासून आहात, एक निरोगी आणि उत्फुल्ल स्वभाव जो अद्याप कोमेजलेला नाही; तिच्यामुळे तुमचा पुनर्जन्म झाला आहे, तुम्हाला चांगले ते दिवस आठवतात. तुम्हाला उच्च आशा आकांक्षा, शुद्ध भावना अनुभवायची इच्छा होते. तुम्हाला नवीन जीवनाची सुरुवात करायची आहे आणि उर्वरित आयुष्यात एक शाश्वत अस्तित्व टिकवून ठेवण्यासाठी उचित मार्ग चोखाळण्याचा निश्चय तुम्ही करत आहात. हे ध्येय साध्य करण्यासाठी, एक परंपरागत अडथळा, जो तुमच्या विवेकाला नामंजूर आहे आणि न्यायाला धरून नाही, ती सामाजिक रुढी, नाकारण्याचे समर्थन कराल काय?"

मिस्टर रोचेस्टर थांबले आणि उत्तराची वाट पाहू लागले.

मी काय उत्तर देऊ शकते असते? अरेरे! जर काही चांगले अर्थपूर्ण, शहाणपणाचे, प्रामाणिक आणि समाधानकारक उत्तर मला आले असते तर? प्रश्न अवघड होता आणि योग्य उत्तर देणे पण कठीण होते. माझ्या सभोवतालच्या वेलींतून, वारा कुजबुजत होता, पण त्यात मला विचारलेल्या प्रश्नाचे उत्तर नव्हते. पक्षी झाडांवर गात होते, पण त्यांच्या गाण्यांतून काहीच अर्थबोध होत नव्हता.

मिस्टर रोचेस्टरनी पुन्हा प्रश्न विचारला:

a

ते म्हणाले, “जर, एक बहकलेला पापी मनुष्य, आता पश्र्चातापाने पोळून, विसावा घेऊ इच्छित आहे, जगाच्या मताला आव्हान द्यायचे धाडस करत एका सौम्य, दयाळू, विनयशील अशा अनोळखी व्यक्तीशी कायमचे जोडून घेऊन, स्वतःची मन:शांती सुनिश्चित करून, जीवन नव्याने निर्माण करु शकेल काय?”

“सर,” मी उत्तर दिले, “बहकलेला आणि पापी सुधारण्याची क्रिया त्याच्याबरोबरच्या माणसावर अवलंबून असू नये. मनुष्य हा मर्त्य प्राणी आहे; तत्वज्ञानी व्यक्तींमध्ये शहाणपणाचा आणि ख्रिश्चनांमध्ये चांगुलपणाचा, अभाव दिसून येतो. जर तुमच्या ओळखीच्या कुणाकडून चुक झाली असेल आणि त्याने दु:ख सहन केले असेल,तर त्याने त्याच्या बरोबरीच्या लोकांपेक्षा स्वतःला उच्च बनवले पाहिजे. यासाठी अगोदर स्वतःला सुधारण्यासाठी अधिकाधिक प्रयत्न आणि दु:ख निवारण्यासाठी योग्य उपाय करणे गरजेचे आहे.”

“सापडली! या सर्व चमत्कारिक परिस्थितीत परिणामकारक उपाययोजना करण्याची युक्ती, मला सापडली जी देवाच्या कायद्याचे पालन करून योग्य मार्गदर्शन करू शकेल. मी तुला अधिक त्रास न देता सांगेन की तो सांसारिक, उधळलेला आणि अस्वस्थ माणूस मीच आहे; मला विश्वास आहे की मला सुधारण्याचा उपाय मला सापडला आहे…”

मग ते बोलायचे थांबले. पक्षी गातच राहिले आणि पाने वाऱ्याबरोबर कुजबुजतच होती; मला वाटले की हा कबुलीजबाब ऐकण्यासाठी हे सर्व आवाज थांबतील: परंतु त्यांना बराच वेळ प्रतीक्षा करावी लागली असती---इतका वेळ शांतता होती; शेवटी मी त्या स्तब्ध झालेल्या वक्त्याकडे पाहिले, ते माझ्याकडे उत्सुकतेने पाहत होते.

“माझ्या प्रिय सखे,” ते पूर्णपणे वेगळया स्वरात म्हणाले, त्यांचा चेहरा देखील आता बदलला होता: सौम्य आणि गंभीरपणा नाहीसा होऊन, तो पुन्हा कठोर

आणि उपरोधिक बनला होता; “मिस इंग्रामबद्दलची माझी आवड तुझ्या लक्षात आली आहे; जर मी तिच्याशी लग्न केले तर ती पुर्ण ताकदीनिशी, माझे आयुष्य नव्याने निर्माण करु शकेल काय?”

ते पटकन उठले, शांतपणे रस्त्याच्या दुसऱ्या टोकाला गेले आणि परत येताना काही गुणगुणत आले.

“जेन, जेन,” ते माझ्यासमोर थांबून म्हणाले, “तू जागरणाने तुला थकली आहेस; तुला विश्रांतीच्या वेळी अशा प्रकारे त्रास दिल्याबद्दल तू मला दोष देत नाहीस?”

“दोष आणि तुम्हाला?नाही सर.”

“मला ह्याची खात्री करुन घेण्यासाठी, तुझा हात हातात घेऊ देत. तुझी बोटं किती थंड आहेत! काल रात्री ती जास्त उबदार होती, जेव्हा मी खोलीच्या दाराशी त्यांना स्पर्श केला होता. जेन, तू माझ्याबरोबर पुन्हा कधी असशील?”

“सर, कधीही जेव्हा माझा तुम्हाला उपयोग होऊ शकेल.”

“उदाहरणार्थ, माझ्या लग्नाच्या आदल्या रात्री? मला खात्री आहे की मी त्या रात्री झोपू शकणार नाही; तेव्हा तू माझ्यासोबत असण्याचे वचन देशील का? तुझ्याबरोबर मी माझ्या प्रिय व्यक्तीबद्दल बोलू शकतो; तू तिला पाहिले आहेस आणि ओळखत पण आहेस.”

“होय सर.”

“ती असामान्य आहे, जेन, खरे आहे ना?”

“खरं आहे सर.”

“ती सुंदर, मजबूत, गव्हाळ रंगाची आणि कोमल आहे; कार्थेजच्या स्त्रियांना तिच्यासारखे केस असणे आवश्यक होते. पण इथे मि. डेंट आणि मि. लिन हे तबेल्यात आले आहेत; इथे या दारातून आत ये.”

a

मी एका वाटेने आत गेले आणि ते दुसऱ्या वाटेने; मी त्यांना अंगणात कुणाशी तरी आनंदाने बोलताना ऐकले.

“मेसन,” ते म्हणाले, “तुम्ही लोक उठण्यापुर्वी त्याने आवरले; तो सूर्योदयाच्या आधी निघून गेला; त्याला निरोप देण्यासाठी मी चार वाजता उठलो होतो.”

a

# प्रकरण 21

एखाद्या गोष्टीची चाहूल लागणे, एखाद्या व्यक्ती विषयी सहानुभूती वाटणे आणि एखाद्या प्रसंग घडण्यापुर्वी काहीतरी संकेत मिळणे या तिन्हीही गोष्टी विचित्र आहेत आणि जेव्हा त्या एकाचवेळी संभवतात, तेव्हा एक रहस्य बनून रहातात, जे अजूनही माणसाला उलघडणे शक्य झालेले नाही. ‘चाहूल' या गोष्टींचा मला स्वतःला अनुभव आल्यामुळे मी, ती गोष्ट हसण्यावारी नेऊ शकत नाही.

सहानुभूती असण्यावर माझा विश्र्वास आहे. उदाहरणार्थ दूरच्या नात्यातील, बऱ्याच काळापासून न भेटलेल्या आणि कुटुंबापासून दुरावलेल्या नातेवाईकांना कुटुंबातील व्यक्तींविषयी सहानुभूती वाटणे ही सामान्य बाब आहे. या सगळ्या मागचा कार्यकारणभाव समजणे मानवाच्या आकलनशक्तीच्या पलिकडे आहे.

संकेत अथवा सुचना या निसर्गाची माणसाच्या प्रती असलेल्या सहानुभूतीचे उदाहरण म्हणून समजता येईल.

मी फक्त सहा वर्षांची असताना एका रात्री मी बेसीला, मार्था ॲबॉट बरोबर बोलताना असे ऐकले की तिला लहान बाळाचे स्वप्न पडले; असे स्वप्न पडणे म्हणजे एकतर स्वतः त्या व्यक्तीसाठी अथवा तिच्या जवळच्या नातेवाईकांसाठी आगामी संकटाचा संकेत असू शकतो. ही गोष्ट मी कदाचित पार विसरून गेले असते पण दुसऱ्याच दिवशी बेसीला तिच्या घरी जावे लागले, तिची लहान बहिण मृत्यूशय्येवर होती.

अलीकडे बरेच दिवस माझ्या मनात या घटनेबद्दल वारंवार विचार येऊ लागला होता कारण गेला संपूर्ण आठवडाभर मला स्वप्नात एक लहान मुल दिसत होते. कधी ते माझ्या मिठीत असे तर कधी मी त्याला मांडीवर घेऊन जोजवत असे, कधी ते मुल, गवताळ कुरणात फुलाबरोबर किंवा वाहत्या पाण्यात खेळत असे. एके रात्री ते रडताना दिसले तर दुसऱ्या दिवशी हसताना, कधी मला लघटून असे तर कधी माझ्यापासून दूर पळून जाई. सतत सात रात्री या ना त्या स्वरूपात ते स्वप्नात येत होते. मी अस्वस्थ झाले, झोपायची वेळ झाली की मला रोज पडणाऱ्या स्वप्नाची भयंकर भीती वाटू लागली. ज्या रात्री, रात्री मला भयंकर रडण्याचा आवाज आला आणि लगेच मेसनच्या बाबतीत दुर्घटना घडली त्या रात्री सुध्दा मला या स्वप्नामुळेच जाग आली होती आणि दुसऱ्या दिवशी दुपारी मला समजले की मिसेस फेअरफँक्सच्या खोलीत कोणीतरी माझी वाट पाहत आहे; मी तिथे गेले, तिथे एक माणूस दिसला जो मला चांगल्या घरचा नोकर वाटत होता; तो खुप दुःखात असल्याचे दिसत होते, त्याने हातात काळ्या क्रेपने वेढलेली टोपी धरली होती.

मी खोलीत प्रवेश करताच तो उठून उभा राहिला आणि म्हणाला, “मला वाटते, मिस आपण मला ओळखले नसावे, माझे नाव लेवेन: मी मिसेस रिड बाईसाहेबांचा कोचमन, तुम्ही आठ, नऊ वर्षांपूर्वी तिथे होतात, तेव्हापासून मी गेट्सवुडला असतो.”

“अरे! रॉबर्ट, तू कसा आहेस? मी तुला अजिबात विसरले नाही; मला आठवते की तू कधी कधी मला मिस जॉर्जियानाच्या पोनीवर बसायला देत होतास आणि बेसी कशी आहे? तुझे बेसीशी लग्न झाले आहे ना?”

“होय मिस. माझी पत्नी खूप छान आहे धन्यवाद; दोन महिन्यांपूर्वी, आम्हाला बाळ झाले, आता आम्हाला तीन मुले आहेत; सर्वजण उत्तम आहेत.”

"रॉबर्ट, आपल्या वाड्यात कसे चालले आहे?"

"चांगली बातमी नाही, याबद्दल मला माफ करा; गोष्टी काही ठीक चालल्या नाहीत आणि कुटुंबावर नुकतेच मोठे दुर्दैव कोसळले आहे."

"कुणाचा मृत्यू तर नाही ना ओढवला?" मी त्याच्या काळया कपड्यांकडे पाहत म्हणाले.

त्याने त्याच्या टोपीभोवती असलेल्या क्रेपकडे पाहिले आणि उत्तर दिले: "आठ दिवसांपूर्वी मिस्टर जॉन लंडनमधील त्यांच्या अपार्टमेंटमध्ये मरण पावले."

"मिस्टर जॉन?"

"होय."

"आणि त्यांच्या आईने हा धक्का कसा सहन केला?"

"त्या पार कोसळून गेल्या आहेत. हे काही साधेसुधे दुर्दैव नाही, तसेही गेली तीन वर्षे मि. जॉंन, फारच विचित्र पद्धतीने जगत होता, त्यांची वागणूक रानटी बनली होती."

"बेसीने मला सांगितले होते की तो चांगले वागत नाही."

"तो यापेक्षा वाईट वागूच शकत नव्हता. त्याने त्याची तब्येत गमावली आणि वाईट माणसांच्या संगतीने सर्व वाईट गोष्टींवर पैसे उधळले. वाईट स्त्रियांच्या नादाने, कर्जबाजारी झाला. त्याला तुरुंगात टाकण्यात आले. दोनदा त्याची आई मदतीला गेली; पण मोकळा होताच परत जुने मित्र, जुन्या सवयी सुरु झाल्या. त्यांचे डोके ठिकाणावर नव्हते. त्याच्या हलकट मित्रांनी त्याची पुरेपुर फसवणूक केली. सुमारे तीन आठवड्यांपूर्वी तो गेटशेडला आला होता आणि त्याने संपूर्ण कुटुंबाची मालमत्ता त्याच्या हातात सोपवावी म्हणून आईकडे मागणी केली. मिसेस रीडनी नकार दिला कारण मुलाच्या उधळपट्टीमुळे मालमत्ता आधीच कमी झाली होती

a

म्हणून तो तिथून निघून लंडनला गेला आणि लवकरच त्याच्या मृत्यूची बातमी समजली. कसे काय देव जाणे! लोक म्हणतात की त्याने आत्महत्या केली.''

मी गप्प झाले, ही बातमी खूप भयानक होती. रॉबर्ट पुढे म्हणाला: ''मॅडम अगोदरच खूप आजारी होत्या; सहन करण्याची ताकद त्यांच्याकडे उरली नव्हती: जमीन जुमला,पैसाआडका गमावल्याने गरिबीच्या भीतीने त्या पार मोडून पडल्या. मिस्टर जॉनच्या आकस्मिक मृत्यूची बातमी हा शेवटचा धक्का होता; त्यामुळे त्यांचे अर्धे अंग लुळे पडले आणि वाचा गेली. गेल्या मंगळवारी त्या थोड्या बऱ्या होत्या, त्यांना काहीतरी बोलायचे आहे असे दिसले. त्या माझ्या पत्नीला सतत खुणेने सांगायचा प्रयत्न करत होत्या होत्या; पण काल सकाळी बेसीने त्यांना तुमचे नाव घेताना ऐकले, कारण ती शेवटी एव्हढेच शब्द बोलू शकली: ''जेनला बोलाव, जा आणि जेन आयरला घेऊन ये, मला तिच्याशी बोलायचं आहे.'' ती शुध्दीवर असतांना बोलली आणि तिला खरोखरच गंभीरपणे तुम्हाला भेटायचे आहे याबद्दल बेसीला खात्री नाही. पण तिने मिस रीड आणि मिस जॉर्जियाना यांना घडलेला प्रकार सांगितला आणि त्यांना तुम्हाला बोलावून घ्यायचा सल्ला दिला. सुरुवातीला त्यांनी नकार दिला; पण त्यांची आई अधिकाधिक चिडली आणि सारखे ''जेन, जेन'' म्हणू लागली, म्हणून शेवटी त्यांनी संमती दिली. मी काल गेटशेड सोडले, आणि जर तुम्ही तयार असाल तर मिस, आपल्याला उद्या सकाळी लवकर निघायला लागेल.

''होय, रॉबर्ट, मी तयार आहे; मला यायला लागेल असे वाटते.''

''माझाही विश्वास आहे, मिस; बेसीने मला सांगितले की तिला खात्री आहे की तू नकार देणार नाहीस. पण मला वाटतं जाण्यापूर्वी तुम्हाला परवानगी घ्यावी लागेल.''

''होय, आणि मी ते लगेच करीन.''

a

त्याला नोकरांच्या दालनात नेऊन जॉन आणि त्याच्या बायकोकडे त्याची व्यवस्था केल्यावर मी मिस्टर रोचेस्टरच्या शोधात निघाले.

रोचेस्टर खाली खोल्यांमध्ये किंवा अंगणात दिसले नाहीत; मी मिसेस फेअरफॅक्सला विचारले की तिने त्यांना पाहिले आहे काय, तिने उत्तर दिले की ते मिस इंग्रामसोबत बिलियर्ड्स खेळत आहेत. मी बिलियर्ड रूमच्या दिशेने निघाले, तिथे मिस्टर रोचेस्टर, मिस इंग्राम, एश्टॉन भगिनी खेळत होत्या आणि त्यांचे प्रशंसक खेळ पहाण्यात मग्न होते. ऐन खेळ सुरू असतांना विचारण्यासाठी मला थोडे धाडस करावे लागणार होते पण माझ्याकडे जास्त वेळ नव्हता म्हणून मी मिस इंग्रामच्या शेजारी असलेल्या रोचेस्टरांच्या जवळ गेले. तिने मागे वळून माझ्याकडे तिरस्काराने पाहिले. या मुर्ख मुलीला काय हवे आहे असे तिचे डोळे जणू विचारत होते. मी हळू आवाजात हाक मारली : "मिस्टर रोचेस्टर!" तिने मला निघून जाण्यासाठी आदेश दिल्यासारखी मान हालवली. ती सुंदर दिसत होती. तिचे दिसणे मला अजूनही आठवते,—ते खूप सुंदर आणि अतिशय आकर्षक होते: तिने आकाशी-निळ्या रंगाचा फ्रॉक घातला होता; तिने केसात एक चमकदार निळसर स्कार्फ गुंफलेला होता. खेळातील आनंदात रंगून गेली होती, मला पाहून तिचा अभिमान दुखावला गेला असावा त्यामुळे चेहऱ्यावरचे गर्विष्ठ भाव अजून वाढलेले वाटले.

"या व्यक्तीला तुमची गरज आहे का?" मिस इंग्रामने मि. रोचेस्टरना विचारले आणि मिस्टर रोचेस्टर ती व्यक्ती कोण आहे हे पाहण्यासाठी मागे वळले. खेळात आलेल्या व्यत्यय आल्यामुळे त्यांच्या चेहऱ्यावर त्रासिक भाव होते. मला पाहिल्यावर त्यांनी हातातील स्टिक खाली ठेवली आणि माझ्याबरोबर खोलीच्या बाहेर आले.

"बरं, जेन?" त्यांनी नुकत्याच बंद केलेल्या स्टडी रूमच्या दाराकडे पाठ टेकवत विचारले.

a

"सर, मी एक किंवा दोन आठवड्यांची रजा देण्यासाठी तुम्हाला विनंती करत आहे."

"काय कारण? कुठे जायचे?"

"एका आजारी स्त्रीने मला भेटायला बोलावले आहे."

"कोणती आजारी बाई? ती कुठे राहते?"

"गेट्सहेड येथे, काउंटीमधील..."

"पण इथून शंभर मैल आहे; एवढ्या अंतरावर तुला पाहण्यासाठी बोलावणारी ही बाई कोण असू शकते?"

"तिचे नाव मिसेस रीड आहे, सर."

"रीड, गेट्सहेडकडून? गेटशेडचे एक मिस्टर रीड म्हणून दंडाधिकारी होते."

"ही त्यांची विधवा आहे, सर."

"आणि तुझा तिच्याशी काय संबंध आहे? तू तिला कसे ओळखतेस?"

"मिस्टर रीड माझे मामा, माझ्या आईचे भाऊ होते."

"तू मला यापूर्वी कधीच सांगितले नाहीस; तू नेहमी असा दावा केला आहे की, तुला आई-वडील नव्हते."

"खरेच, माझे असे कोणी नाही; मिस्टर रीड मरण पावले आणि त्यांच्या पत्नीने माझा त्याग केला."

"कशासाठी ?"

"गरीब असल्यामुळे मी तिच्यावर अवलंबून होते आणि ती माझा तिरस्कार करत असे."

"पण मिस्टर रीड यांना मुले आहेत; ती मामे भावंडे असावीत. सर जॉर्ज लिन, काल माझ्याशी गेटशेडच्या एका रीडबद्दल बोलले, ते म्हणाले, तो शहरातील

सर्वात मोठा धूर्त आहे आणि इंग्राम माझ्याशी जॉर्जियाना रीडबद्दलही बोलली होती. सौंदर्यासाठी लंडनमध्ये, एक-दोन हिवाळ्यापूर्वी तिची खूप प्रशंसा झाली होती."

"जॉन रीड मेला आहे, सर; त्याने स्वतःला उध्वस्त केले आणि त्याचे कुटुंब पण उध्वस्त झाले; असे मानले जाते की त्याने आत्महत्या केली; या बातमीने त्यांच्या आईला एवढा त्रास झाला की तिला अर्धांगवायूचा झटका आला."

"जेन, तू त्याला काय करू शकणार आहेस? तुझ्या तिकडे पोहोचण्यापुर्वी कदाचित त्या मरण पावल्या असण्याची शक्यता आहे. अशा स्त्रीला पाहण्यासाठी शंभर मैलांचा प्रवास करण्याचा तुझा हेतू म्हणजे मूर्खपणा आहे; शिवाय, तू म्हणतेस की तिने तुझा त्याग केला."

"होय सर ; पण ते फार पूर्वी घडून गेले आहे आणि तेव्हा त्याची स्थिती वेगळी होती; जर मी त्यांच्या इच्छेला मान दिला नाही तर मला दु:ख होईल."

"तू किती दिवस रहाणार आहेस?"

"शक्य तितका कमी वेळ, सर."

"मला वचन दे की तू फक्त एक आठवडा राहशील."

"मी वचन न देणे चांगले आहे, कारण मी माझे शब्द पाळू शकत नाही."

"पण कोणत्याही परिस्थितीत तू परत येशील ना? मामीकडे कायमचे तर रहाणार नाहीस?"

"हो नक्कीच परत येईन, सर्व काही ठीक झाल्यावर मी परत येईन."

"आणि तुझ्याबरोबर कोण आहे? हा लांबचा प्रवास तू एकट्याने करणार?"

"नाही, सर, तिने तिचा गाडीवान पाठवला आहे."

"तो एक विश्वासू माणूस आहे का?"

"होय सर ; तो दहा वर्षांपासून कुटुंबात आहे."

a

मिस्टर रोचेस्टरने विचार केला.

“तुला कधी निघायचे आहे?” त्यांनी विचारले.

“उद्या सकाळी लवकर.”

“तुला पैशाची गरज आहे, पैश्याशिवाय प्रवास कसा करणार? मला वाटत नाही की तुझ्याकडे जास्त पैसे असतील ; तू इथे आल्यापासून मी तुला अजून पैसे दिलेले नाहीत. त्यानी मला हसत विचारले तुझ्याकडे एकूण किती पैसे आहेत?”

मी माझी पर्स काढली; ते फार पैसे नव्हते.

“सर, पाच शिलिंग,” मी उत्तर दिले.

त्यांनी माझी पर्स घेतली, मोकळी केली एव्हढे कमी पैसे पाहून त्याला आनंद झाल्यासारखे वाटले; त्यांनी त्याचे पाकीट काढले.

“हे घे,” मला एक नोट देत ते म्हणाले. ते पन्नास पौंड होते आणि त्यानी मला फक्त पंधरा पौंड देणे बाकी होते.

मी त्यांना सांगितले की माझ्याकडे परत करण्यासाठी काही सुट्टे पैसे नाहीत.

“मला त्यांची गरज नाही; हे घे, हा तुझा पगार आहे.”

माझ्यावर देय असलेल्या रकमेपेक्षा जास्त रक्कम स्वीकारण्यास मी नकार दिला. आधी त्यांना माझ्यावर जबरदस्ती करायची होती; मग अचानक, काहीतरी आठवल्याने ते मला म्हणाले:-

“तुझे बरोबर आहे: मी तुला पन्नास पौंड दिले तर तू सहा महिने राहू शकशील; पण इथे दहा पौंड आहेत. ते पुरेसे आहे का?”

“होय, सर, आता तुमच्याकडून मला फक्त पाच पौंड देणे आहेत.”

“मग परत आल्यावर ते घे; मी चाळीस पौंडांसाठी तुमचा बँकर आहे.”

“मिस्टर रोचेस्टर, मला तुमच्याशी आणखी एका महत्त्वाच्या गोष्टीबद्दल बोलायचे आहे, ते मी आता बोलू शकते काय?”

"ही गोष्ट काय आहे? मी ते जाणून घेण्यासाठी उत्सुक आहे."

"तुम्ही मला सांगितले होते की, सर, तुमचे लवकरच लग्न होणार आहे."

"होय. बरं! मग?"

"अशा परिस्थितीत, सर, ॲडेलला बोर्डिंग स्कूलमध्ये जावे लागेल; मला खात्री आहे की तुम्हाला स्वतःला याची गरज वाटेल."

"माझी पत्नी तिच्याबरोबर अविचारीपणे वागेल, तेव्हा मला तिच्या मार्गापासून दूर ठेवण्यासाठी, ॲडेलला बोर्डिंग स्कूलमध्ये टाकावे लागेल आणि तू कोठे जाशील मसणात?"

"मला आशा ती नाही सर; पण मला दुसरी नोकरी शोधावी लागेल."

"वेळ आल्यावर," त्यांच्या आवाज तार सप्तकात गेला, चेहऱ्यावर एक विलक्षण अस्वाभाविक भाव दिसत होते. काही मिनिटे त्यांनी माझ्याकडे पाहिले आणि म्हणाले, "तुम्ही मिसेस रीड किंवा त्यांच्या मुलींना तुमच्यासाठी नोकरी शोधायला सांगाल, मला वाटतं"

"नाही सर; मामी आणि मामे भावंडांसोबत माझे नाते असे नाही की मी त्यांच्याकडे मदत मागू शकेन. मी वृत्तपत्रात स्वतःची जाहिरात करेन."

"होय होय; तू जाहिरात करून कोणता धोका पत्करत आहे, याची काळजी न करता, तू इजिप्तच्या पिरॅमिडवर पण चालत जाशील; माझी इच्छा आहे की मी तुला दहा पौंडांच्या ऐवजी फक्त एक पौंड द्यायला हवा होता, मला नऊ पौंड परत दे, जेन, मला त्यांची गरज आहे."

"आणि मला पण सर," मी माझी पर्स लपवत उत्तर दिले, "मी या पैशाशिवाय काहीही करू शकत नाही."

ते म्हणाले, "तू कंजूष आहेस, मला काहीही देण्यास नकार देणारी! बरं, मला फक्त पाच पौंड परत दे, जेन."

a

“पाच शिलिंग काय पाच पेन्स सुध्दा नाही, सर.”

“फक्त तुझी पर्स मला क्षणभर दे, जेणेकरून मी ते पाहू शकेन.”

“नाही, सर, मी तुमच्यावर विश्वास ठेवू शकत नाही.”

“जेन?”

“सर.”

“जेन मला एका गोष्टीचे वचन देशील काय?”

“होय, सर, मी पाळू शकत असलेले वचन द्यायला तयार आहे.”

“ठीक आहे, मला वचन दे की तू जाहिरात देणार नाहीस; माझ्यावर विश्र्वास ठेव. मी वेळ आल्यावर तुला नोकरी शोधून देईन.”

“सर, मी हे आनंदाने करेन, जर तुम्ही मला वचन दिले की ॲडेल आणि मी तुमची पत्नी येण्यापूर्वी घराबाहेर पडू आणि सुरक्षित राहू.”

“खूप चांगले, खूप चांगले, मी तुला वचन देतो; तू उद्या निघणार आहेस ना?”

“होय, सर, उद्या सकाळी.”

“आज संध्याकाळी जेवणानंतर लिव्हिंग रूममध्ये येशील का?”

“नाही सर ; मला प्रवासाची तयारी करायची आहे.”

“मग मला काही काळासाठी तुझा निरोप घ्यावा लागेल.”

“मला असे वाटते, सर.”

“हा निरोप समारंभ कसा केला जातो? जेन, मला सांग, मला ते नीट माहीत नाही.”

“आम्ही अलविदा म्हणतो, किंवा तुम्हाला इच्छा असल्यास दुसरे काहीतरी.”

“बरं! बोल ते.”

a

“अलविदा, मिस्टर रोचेस्टर, आत्ताच आपला निरोप घेते.”

“आणि मी काय बोलू?”

“तुम्हाला हवे असलेले काहीतरी, सर.”

“अलविदा, मिस आयर, आत्तासाठी निरोप. एवढंच ?”

“होय.”

“ते माझ्यासाठी खूप कोरडे आणि अप्रिय वाटते; मी दुसरे काहीतरी पसंत करेन, उदाहरणार्थ, जर आपण हस्तांदोलन केले तर? पण नाही, ते माझ्यासाठी पुरेसे होणार नाही; म्हणून, मी असे म्हणण्यातच समाधानी राहीन: अलविदा, जेन!”

“पुरे झाले सर; मनापासून बोललेल्या शब्दात खूप चांगली इच्छा असू शकते.”

“हे खरे आहे; पण हा निरोप हा शब्द खूप कोरडा आहे!”

“असे किती वेळ दाराशी पाठ टेकून राहणार?” मी स्वतःला विचारले; कारण माझी पॅकींग सुरू करण्याची वेळ आली होती.

जेवणाची बेल वाजली आणि ते एकही शब्द न उच्चारता अचानक बाहेर गेले; दिवसभर मी त्यांना पाहिले नाही आणि दुसऱ्या दिवशी ते उठण्यापूर्वीच मी निघाले.

मी मे महिन्याच्या पहिल्या दिवशी संध्याकाळी पाचच्या सुमारास गेटशेडला पोहोचले.

मी प्रथम आऊटहाऊस मध्ये थांबले: ते मला खूप स्वच्छ आणि खूप छान वाटले. खिडक्या लहान पांढऱ्या पडद्यांनी सजवल्या होत्या; फरश्या स्वच्छ होत्या, चांगले पॉलिश केलेले शेगडी, फावडे आणि चिमटे चमकत होते आणि शेकोटीमध्ये आग पेटली होती; चूलीसमोर बसलेली बेसी तिच्या धाकट्या मुलाला दूध पाजत होती; रॉबर्ट आणि त्याची बहीण एका कोपऱ्यात शांतपणे खेळत होते.

a

"देव तुला आशीर्वाद देईल, मला माहित होते की तू येणार आहेस!" मला आत जाताना मिसेस बेसी लीव्हन रडत म्हणाली.

"होय, बेसी," मी तिला किस करून उत्तर दिले. मला आशा आहे की मला खूप उशीर झाला नाही. मिसेस रीड कशी आहे? ती अजूनही जिवंत आहे नाही का?"

"होय, ती जिवंत आहे, आणि तिला तिच्या आजूबाजूला काय घडत आहे याची जाणीव आहे; डॉक्टर म्हणतात की ती एक किंवा दोन आठवड्यात फिरू शकते; पण ती बरी होईल असे त्यांना वाटत नाही."

"ती अलीकडे माझ्याबद्दल बोलली आहे का?

"ती आज सकाळी तुझ्याबद्दल बोलत होती, आणि तुला आलेले पाहायचे होते; पण ती आता झोपली आहे किंवा किमान दहा मिनिटांपूर्वी ती झोपली होती. ती सहसा दुपारभर एक प्रकारच्या तंद्रीत असते आणि फक्त सहा किंवा सात वाजताच उठते: मिस, तुला इथे एक तास आराम करायला आवडेल का? आणि मग मी तुझ्याबरोबर येईन."

या क्षणी रॉबर्टने प्रवेश केला; बेसीने तिच्या झोपलेल्या मुलाला पाळणामध्ये ठेवले आणि तिच्या पतीचे स्वागत केले; मग तिने मला माझी टोपी काढून चहा पिण्यास सांगितले कारण ती म्हणाली, मी फिकट दिसत होते आणि थकल्यासारखी वाटत होते. तिचे आदरातिथ्य स्वीकारण्यात मला आनंद झाला आणि जेव्हा तिने माझे प्रवासाचे कपडे काढून टाकायला लावले, तेव्हा मी माझ्या लहानपणीची आठवण आली.

तिने माझ्यासाठी, तिचा सर्वात सुंदर ट्रे आणि तिचा सर्वात सुंदर चायना सेट काढला होता. तिला टोस्ट कापताना, चहासाठी केक टोस्ट करताना आणि वेळोवेळी छोट्या रॉबर्टला थोपटताना, पाहून माझ्या भूतकाळातील आठवणी जाग्या झाल्या.

मला ती लहान बहिणी सारखी वागवत असे; बेसी तल्लख बुद्धीची होती. कामाला चटपटीत आणि दिसायला चांगली होती.

चहा तयार झाला, मी टेबलाजवळ जाणार होते; पण तिची इच्छा होती की मी शांत बसावे. तिच्या पुर्वीप्रमाणे, मला ठणकावून सांगितले की चहा शेकोटीच्या जवळच घ्यावा लागेल; आणि तिने एका छोट्याशा गोल स्टँडवर माझा कप आणि टोस्टच्या प्लेट ठेवली, अगदी तसे ती मला चोरून रुचकर खाऊ नर्सरीच्या खुर्चीवर आणून देत असे आणि मी हसले आणि पूर्वीच्या दिवसांप्रमाणे तिच्या आज्ञेचे पालन केले.

तिला मी थॉर्नफिल्डमध्ये खुष आहे काय, हे जाणून घ्यायचे होते, तिथल्या मालकीणबाई कशा आहेत; मी तिला सांगितले की तिथे फक्त मालक आहेत. ते चांगले सदगृहस्थ आहेत काय, मला ते आवडतात की नाहीत हे विचारले. तिला मी सांगितले की ते दिसायला फारसे चांगले नाहीत, परंतु तो एक खरा सज्जन माणूस आहे; माझ्याशी दयाळूपणे वागतात आणि मी समाधानी आहे. नंतर मी सध्या वाड्यात आलेल्या पाहुण्या मंडळींविषयी सांगितले. तिथल्या मेजवान्या, करमणूकीचे कार्यक्रम, नाच गाणे यांचे वर्णन तिने मन लावून ऐकले: तिला या सर्व गोष्टी मनापासून आवडत असत.

जवळजवळ तासभर आम्ही गप्पा मारत होतो. नंतर कपडे बदलून मी बेसी बरोबर वाड्यात जाण्यासाठी निघाले. नऊ वर्षांपूर्वी त्याच रस्त्याने मी बाहेर पडले होते, तेव्हा फक्त बेसी माझ्यासोबत आली होती. जानेवारी महिन्यातील एका भल्या पहाटे, धुक्याने वेढलेल्या वातावरणात, अंधुक प्रकाशात मी माझ्या विरोधात असलेले हे घर, जिवावर उदार होऊन अत्यंत कटू अंतःकरणाने सोडून, लोवुडच्या थंडगार अनाथाश्रमाच्या आश्रयास गेले होते. इथे मला मिळालेली तीव्र नापसंती हेच माझी इथून हकालपट्टी होण्याचे मुख्य कारण होते. अजूनही मला माझ्या आयुष्याचे

ध्येय मला सापडले नव्हते. तेच घर आता माझ्या समोर होते: माझे भवितव्य अजून शंकास्पद होते; माझे हृदय अजूनही दुःखी होते. अजून मला या पृथ्वीतलावर एक भटकंती करणारा उपरा प्रवासी असल्यासारखे वाटत होते: पण माझा, माझ्या सामर्थ्यावरचा विश्वास वाढला होता आणि दडपशाहीची भीती कमी झाली होती. माझ्या जुन्या जखमा पूर्णपणे बऱ्या झाल्या होत्या आणि माझा संतापाची आग विझली होती.

"तू प्रथम डायनिंग रूममध्ये गेलेले बरे", वाड्याकडे जात असताना बेसी मला म्हणाली; "दोघी बहिणी बहुधा तिथे असतील."

थोड्या वेळात मी आत प्रवेश केला. याच डायनिंग रुममध्ये, माझी मि. ब्रोकलहर्ट बरोबर माझी ओळख करून देण्यात आली होती. तेव्हापासून आज देखील डायनिंग रूमची रचना बदलली नव्हती. ज्यावर मी उभी होते तोच गालिचा अजून होता; लायब्ररीकडे नजर टाकल्यावर मला वाटले की बर्विकचे दोन खंड त्यांच्या नेहमीच्या जागी तिसऱ्या शेल्फवर आणि त्यांच्या वर गुलिव्हर ट्रॅव्हल्स आणि अरेबियन टेल्स अजूनही त्याच ठिकाणी सापडतील; निर्जीव वस्तू बदलल्या नव्हत्या, परंतु सजीव व्यक्ती मात्र पुर्णपणे बदलल्या होत्या.

माझ्यासमोर दोन तरुणी आल्या; एक अतिशय उंच, जवळजवळ मिस इंग्राम इतकी उंच,--आणि सडपातळ सुध्दा, निस्तेज आणि गंभीर चेहरा, तिच्यामध्ये संन्यस्त वृती दिसत होती. पोशाख अगदी साधा होता, काळ्या रंगाचा साधा स्कर्ट, स्टार्च केलेली लिननची कॉलर, घट्ट विंचरलेले केस, अजिबात कपाळावर येऊ दिलेले नव्हते, एकमेव अलंकार म्हणजे एबनी पासून बनवलेली माळ ज्यामध्ये क्रुस होता. उभट आणि निस्तेज चेहरा, लहानपणीपेक्षा वेगळा वाटला ती एलिझा असावी असे मला वाटले.

a

दुसरी नक्कीच जॉर्जियाना होती. माझ्या आठवणीतील जाँर्जियाना अकरा वर्षांची छोटी परीसारखी सुंदर आणि नाजुक होती: आता ती पुर्ण विकसित स्त्री झाली होती. शरीरयष्टी गोंडस होती. सुंदर मेणाच्या बाहुली सारखी दिसणारी, गोरा रंग, निळे डोळे, सोनेरी केस, कपाळावर कुरळया बटा झेपावत होत्या. तिचा पण पोशाख बहिणीसारखा काळा होता, पण फँशनेबल होता. एक बहिण अद्ययावत दिसत होती, तर दुसरी कर्मठ.

दोन्ही बहिणींनी, त्यांच्या आईची एक एक वैशिष्ट्ये घेतली होती. एलिझाचे डोळे, मिसेस रीड सारखे होते, राखाडी आणि कठोर; जाँर्जियानाने आईसारखा जबडा आणि हनुवटी घेतली होती मिसेस रीडच्या तुलनेत, जॉर्जियानाची ठेवण थोडी सौम्य भासत होती. तरीही एरव्ही आकर्षक आणि आनंदी असणाऱ्या जाँर्जियानाच्या चेहऱ्यावर मिसेस रीडच्या चेहऱ्याप्रमाणे निष्ठूरपणा कायम वास करत होता.

मी आत गेल्यावर दोघीजणी "मिस आयर" असे म्हणत भेटायला उठून उभ्या राहिल्या. एलिझाचा स्वर तुटक होता, पटकन हँलो म्हणून ती खाली बसली. तिचे डोळे शेकोटीकडे होते, जणू ती मला क्षणार्धात विसरून गेली की काय असे वाटले. जॉर्जियानाने, मी कशी आहे हे विचारल्यानंतर, मला माझ्या प्रवासाबद्दल हवामानाबद्दल आणि इतर सामान्य प्रश्न विचारले. ती आवाज ओढल्यासारखी हळूहळू बोलत होती. बोलताना तिने मला डोक्यापासून, पायापर्यंत न्याहाळले. माझ्या लांब झग्याच्या बारीक चुण्यांपासून, डोक्यावरच्या साध्यासुध्या टोपीपर्यंत, एकही गोष्ट तिच्या नजरेतून सुटली नाही. मला ती काहीही न बोलता एखादे कोडे सोडवत असावी अशी भासली. शब्दातून अथवा कृतीतून उद्धटपणा व्यक्त करण्याऐवजी कांही लोक नजरेत तुच्छता, वागण्यातून जाणवेल एवढा थंडपणा आणि स्वरामध्ये बेपर्वाई या साऱ्या गोष्टीद्वारे व्यक्त करत असतात: जाँर्जियाना पण अशा लोकांपैकी एक होती.

कुत्सितपणा, भले उघड उघड केलेला असो अथवा लपून, तो आता मला पुर्वी सारखा नाउमेद करू शकला नाही: जसे दोन्ही मामेबहिणींबरोबर बसताना माझे मलाच आश्चर्य वाटले, की किती सहजपणे, एकीने केलेले दुर्लक्ष आणि दुसरीने थोड्याफार उपरोधिकपणे दिलेले लक्ष, मी दोन्हीही स्विकारले. एलिझा मला निराश करू शकली नाही किंवा जॉर्जियाना मला अस्वस्थ करू शकली नाही. गेल्या काही महिन्यात, माझ्या भावना इतक्या वेळा उचंबळून आल्या होत्या की माझे अंत:करण जसे तीव्र वेदनेने पिळवटून गेले तसेच सर्वोत्कृष्ट आनंदात न्हाऊनही निघाले होते. परिणामतः मला आता चांगले किंवा वाईट याने काही फरक पडत नव्हता.

“मिसेस रीड कशा आहेत?” मी शांतपणे जॉर्जियानाकडे पाहत विचारले. एकदमच मी मुद्द्यावर येईन अशी तिची अपेक्षा नव्हती, त्यामुळे काहीतरी खोडा घालावा या विचाराने ती म्हणाली, “मिसेस रीड? ओहो! तुला आईबद्दल बोलायचे आहे; तिची परिस्थिती अगदी वाईट आहे; आज तू तिला पाहू शकशील असे वाटत नाही.”

“जर तुम्ही वर जाऊन त्यांना, मी भेटायला आले आहे, असे सांगितलेत तर बरे होईल.”

जॉर्जियानाला आश्चर्याचा धक्का बसला आणि तिचे निळे डोळे मोठे झाले.

“मला माहित आहे की तिला खरोखर मला भेटायचे आहे,” मी पुढे म्हणाले, “आणि मी आवश्यकतेपेक्षा जास्त वेळ मी इथे थांबू इच्छित नाही.”

“आईला संध्याकाळी अस्वस्थ व्हायला आवडत नाही,” एलिझाने उत्तर दिले.

काही मिनिटांनंतर, मी उठले, माझी टोपी आणि हातमोजे शांतपणे काढले आणि अनपेक्षितपणे, त्यांना सांगितले की बेसी बहुतेक किचन मध्ये असेल मी तिला बोलावून घेते आणि मिसेस रीड आज रात्री मला भेटू शकतील काय हे विचारायला

a

सांगते. नंतर मी स्वतःच्या रहाण्याची सोय बघायचे ठरवले. यापूर्वी अहंकारी माणसांसमोर मी नेहमीच कच खात असे. एक वर्षापूर्वी माझे याप्रमाणे स्वागत झाले असते, तर मी मी दुसऱ्याच दिवशी गेटशेड सोडण्याचा संकल्प केला असता: परंतु आता मला स्पष्टपणे जाणवले की तो मूर्खपणा झाला असता. मी मामीसाहेबांना शेवटचे भेटण्यासाठी शंभर मैलांचा प्रवास करून आले होते आणि त्यांचे बरेवाईट काय ते होईपर्यंत तिथे रहायचे ठरवले होते. त्यांच्या मुलींच्या दुराभिमान आणि मूर्खपणाकडे दुर्लक्ष करून, मला स्वतःला स्वतंत्रपणे तिथे रहाण्याची व्यवस्था करण्यासाठी, घरकाम करणाऱ्या नोकरमाणसाशी बोलले आणि त्याला माझ्यासाठी खोली तयार करण्यास सांगितले आणि मी त्याला सांगितले की मी कदाचित एक दोन आठवडे तिथे राहीन. माझी ट्रंक तिथे नेऊन ठेवल्यावर मी माझ्या खोलीत गेले जिन्यावर बेसी भेटली.

"मॅडम जाग्या आहेत," ती मला म्हणाली; मी त्यांना तुझ्या आगमनाची माहिती दिली; माझ्या मागून ये आणि तुला ओळखते का ते आपण पाहू."

मला या खोलीचा रस्ता दाखविण्याची गरज नव्हती. तिथे मला पूर्वी अनेकदा बोलावले जायचे, एकतर शिक्षा करण्यासाठी किंवा रागे भरण्यासाठी; मी बेसीच्या मागे गेले आणि हळूच दरवाजा उघडला. रात्र जवळ येत होती, टेबलावर एक दिवा ठेवण्यात आला होता; मी पुर्वी पाहिलेली खोली अजून तशीच होती. मोठा छपरी पलंग, त्यावर सोडलेले सोनेरी रंगाचे पडदे, ड्रेसिंग टेबल, आर्मचेअर, पाय ठेवण्याचे स्टुल ज्यावर मी कितीतरी वेळा गुडघे टेकून मला केलेल्या चुकांसाठी क्षमा मागायला भाग पाडले होते. मी माझी नजर एका विशिष्ट कोपऱ्यावर टाकली, तिथे भिंतीवर टांगलेला चाबूक दिसण्याची अपेक्षा होती. असे वाटले अचानक सळसळत येईल आणि माझ्या थरथरणाऱ्या हातावर किंवा आकसून गेलेल्या मानेवर प्रहार करेल; मी पलंगाचे पडदे सरकवले आणि थोडी पुढे झुकले.

मला मिसेस रीडचा चेहरा आठवला आणि मी माझ्या ओळखीचा चेहरा मी पाहण्यासाठी पुढे झाले. सुदैवाने जसा जसा काळ पुढे जातो तशी सूडाची भावना मंदावते, संताप आणि तिटकारा कमी होतो. जेव्हा मी, या बाईना सोडून गेले होते, तेव्हा माझे हृदय तिरस्काराने आणि कटुतेने भरलेले होते आणि आता मी परत त्यांच्यापाशी आले होते. त्यांच्या वाट्याला आलेल्या दु:खाबद्दल, भोगत असलेल्या शारीरिक आणि मानसिक यातनांबद्दल माझा मनात फक्त कणव दाटून आली. पुर्वीचे सर्व विसरून, मैत्रीचा हात पुढे करून त्यांना दिलासा देण्याची तळमळ माझ्या मनात होती.

चेहरा ओळखीचा होता: कडक शिस्तीचा, कठोर--तेच विलक्षण डोळे ज्यामध्ये हळुवारपणा येणे कदापिही शक्य नव्हते, उंचावलेल्या दाट भुवया, कित्येक वेळा मला त्यांच्या या रागीट मुद्रेची दहशत वाटली होती. त्याचा विचार करताना, मला माझ्या बालपणीची भीती आणि दुःख आठवले; तरीही, मी वाकून त्यांचे चुंबन घेतले; आणि त्यांनी माझ्याकडे पाहिले.

“ही कोण? जेन आयर आली आहे काय?” त्यांनी विचारले.

“होय, मामीसाहेब, तुम्ही कशा आहात?”

पुन्हा कधी त्यांना मामी म्हणणार नाही अशी मी प्रतिज्ञा केली होती; पण आता ती शपथ मोडण्यात काही गैर आहे, असे मला वाटले नाही. पलंगावरून लटकत असलेला त्यांचा हात माझ्या हातात होता आणि त्या क्षणी त्यांनी प्रेमाने माझा दाबला असता तर मला आनंद झाला असता; पण असंवेदनशील स्वभाव इतक्या सहजासहजी मृदु होत नाही किंवा रक्तात भिनलेला दुस्वास, लवकर नष्ट होत नाही: मिसेस रीडने हात मागे घेतला आणि माझ्यापासून तोंड फिरवून, म्हणाल्या की वातावरण बरेच उबदार आहे. त्यांनीने माझ्याकडे थंडपणे पाहिले: या नजरेत, मला लगेच समजले की त्यांचे माझ्याबद्दलचे मत आणि माझ्याबद्दलच्या भावना

बदललेल्या नाहीत आणि कधीही बदलणार नाहीत. त्यांच्या निष्ठूर डोळ्यांकडे पाहून मी समजून चुकले होते, की तिथे माझ्या प्रती कोमलता प्रगट होणे दुर्लभ आहे. त्या डोळयात अश्रु तरळणे असंभव होते. मला माहित होते की तिने मला शेवटपर्यंत वाईट समजण्याचा निर्धार केला होता; त्यामुळे मला चांगले समजण्याने त्याना आनंद वाटण्याऐवजी दु:खच वाटले असते.

मला आधी दु:ख वाटले, मग राग; नंतर मी अधिकार हातात घेऊन, तेथील परिस्थितीतून मार्ग काढण्याचा निर्धार केला. त्यांच्या इच्छेला आणि स्वभावाला ही गोष्ट खचितच मानवली नसती; लहानपणीसारखे माझ्या डोळ्यात अश्रु उभे राहिले: पण मी त्यांना परतवून लावले.

मी एक खुर्ची पलंगाच्या जवळ आणली, त्यावर बसले आणि उशी जवळ वाकून म्हणाले, “तुम्ही मला बोलावले म्हणून मी आले आहे, आणि तुम्हाला बरे वाटेपर्यंत, इथेच राहण्याचे ठरवले आहे.”

“काही हरकत नाही. तू माझ्या मुलींना भेटलीस काय?”

“होय.”

“बरं, त्यांना सांग की, तू इथे रहावेस अशी माझी इच्छा आहे, मला तुला काही सांगायचे आहे, आता उशीर झाला, आणि मला काय ते आठवायला वेळ लागेल, शिवाय, ते नेमके काय आहे ते मला खरोखर आठवत नाही ...”

एकाएकी, ती खूप चिडली; तिला पांघरूण स्वतःवर ओढायचे होते; पण ती करू शकली नाही, कारण माझा हात रजईच्या एका कोपऱ्यावर होता; तिला लगेच राग आला:

“उभे रहा ! ती म्हणाली; “तू मला असे पांघरूण धरून त्रास का देत आहेस. तू जेन आयर आहेस काय?”

“होय, मी जेन आयर आहे.”

“कुणाला विश्र्वास बसणार नाही, पण या मुलीमुळे मला सर्वात जास्त त्रास झाला. केव्हढे मोठे ओझे माझ्यावर येऊन पडले--- दिवसरात्र, तिचे अनाकलनीय वागणे, सततची चिडचिड, इतर लोक काय करतात याकडे टक लावून पहात बसणे, एकदा तर माझ्याशी, रागाने बघत, त्वेषाने बोलली, कुठल्याही मुलाने तिच्याप्रमाणे बोलले किंवा बघीतले नसेल: तिला घरातून बाहेर काढताना मला आनंद झाला. लोवुड येथे तिच्यासोबत काय झाले? तेथे तापाची साथ आली आणि अनेक मुलांचा मृत्यू झाला. तथापि, ती मेली नाही: परंतु मी म्हणाले, ती सुध्दा, ती मरायला हवी अशीच माझी इच्छा होती!”

“विचित्र इच्छा, मिसेस रीड! तू तिचा तिरस्कार का केलास?”

“मी नेहमी तिची आई आवडत नव्हती; माझ्या पतीची ती एकुलती एक बहीण होती, त्यांचे तिच्यावर जिवापाड प्रेम होते; जेव्हा जेनच्या आईला, त्यांच्या लग्नामुळे कुटुंबातील सर्वांनी नाकारले, कुटुंबाच्या विरोधात ते उभे राहिलेले आणि जेव्हा त्यांना तिच्या मृत्यूबद्दल कळले तेव्हा ते मोठ्याने रडले. त्यांनी मुलीला घरी आणले, मी त्यांना सल्ला दिला की त्याऐवजी तिला नर्सकडे देऊन टाका आणि तिच्या संगोपनासाठी पैसे द्या; पण त्यांनी ऐकले नाही. जेव्हा सर्वप्रथम मी तिला पाहिले, तेव्हाच माझ्या मनात तिच्या विषयी तिरस्कार उत्पन्न झाला. रात्रभर पाळण्यात रडत असायची; इतर मुलांप्रमाणे मोकळेपणाने रडण्याऐवजी, सतत दबलेल्या आवाजात रडत, कण्हत असायची. आजारी, रडकी, खुरटी पोर, पण मि. रीडना तिची दया आली आणि ते स्वतःचे मुल असल्यासारखी तिची काळजी घ्यायचे. कदाचित जास्तच, कारण तिच्या एव्हढे असतांना आपल्या मुलांकडे त्यांनी लक्ष दिले नव्हते. त्या भिक्कारडीशी माझ्या मुलांना मैत्री करायला लावायचा त्यांनी प्रयत्न केला. माझ्या लाडक्या मुलांना ते सहन झाले नाही. त्यानी तिला झिडकारून

a

दिले, तर मि. रीड, मुलांवर क्रोधीत झाले. त्यांच्या शेवटच्या आजारपणात, ती सतत त्यांच्या पलंगाजवळ होती. मरण्यापुर्वी तासभर अगोदर, त्यांनी माझ्याकडून तिचा सांभाळ करायचे वचन घेतले.

जॉन त्याच्या वडिलांसारखा दिसत नाही आणि मी त्याबद्दल आनंदी आहे. तो माझ्यासारखा आहे आणि माझ्या भावांसारखा आहे; तो खरा गिब्सन आहे.

अरे, माझी इच्छा आहे की त्याने मला पैशासाठी पत्रे देऊन त्रास देणे थांबवले असेल! त्याला देण्यासाठी माझ्याकडे आणखी पैसे नाहीत: आम्ही गरीब होत आहोत. मी अर्ध्या नोकरांना पाठवून घराचा काही भाग बंद केला पाहिजे. किंवा विकून टाकला पाहिजे. माझ्या मिळकतीपैकी दोन तृतीयांश रक्कम गहाणखतांचे व्याज भरण्यात जाते. जॉन भयंकर जुगार खेळतो आणि नेहमी हरतो - गरीब मुलगा! तो कर्जदारांनी घेरला आहे: जॉन बुडाला आहे आणि खराब झाला आहे-त्याची अवस्था भयावह आहे-जेव्हा मी त्याला पाहते तेव्हा मला त्याच्याबद्दल लाज वाटते."

ती खूप उत्तेजित होत होती. "मला वाटतं आता तिला सोडून जाणंच बरं होतं," मी बेडच्या पलीकडे उभ्या असलेल्या बेसीला म्हणाले.

"माझा विश्वास आहे, मिस; रात्र जवळ आली की तो अनेकदा असे बोलत असे; सकाळी ती शांत होते."

मी उठले.

"थांब," श्रीमती रीड ओरडल्या; मला तुला आणखी काही सांगायचे होते; तो सतत मला किंवा स्वतःला मारण्याची धमकी देतो; कधी कधी, माझ्या स्वप्नात, मी त्याला जमिनीवर पडलेले पाहते, त्याच्या मानेवर मोठी जखम किंवा सुजलेला चेहरा; मी विचित्र अवस्थेत आहे; मला खूप त्रास होत आहे. काय करायचं ? मला पैसे कसे मिळतील?"

a

बेसीने त्यांना शामक औषध दिले. थोड्याच वेळात, मिसेस रीड शांत झाल्या आणि त्यांना एकप्रकारे तंद्री लागली. मी त्यांच्या खोलीतून बाहेर पडले.

दहा दिवसांहून अधिक काळ माझा तिच्याशी संवाद होऊ शकला नाही; ती नेहमी एकतर बेभान किंवा सुस्त झोपेत असायची आणि डॉक्टरांनी तिच्या मनाला धक्का बसले असे काही करण्यास मनाई केली होती. या काळात मी एलिझा आणि जॉर्जियानासोबत शक्य तितक्या चांगल्या अटींवर राहण्याचा प्रयत्न केला. सुरुवातीला त्या खूप थंड होत्या; एलिझा अर्धा दिवस वाचन, लेखन आणि शिवणकामात घालवत असे. माझ्याशी किंवा तिच्या बहिणीशी एक शब्दही बोलत नसे. जॉर्जियाना तिच्या कॅनरी पक्षांशी तासनतास निरर्थक बडबड करत असे, पण माझ्याशी बोलण्यास फारशी उत्सुक नसे. मी स्वतःला गुंतवून ठेवून आनंदी रहाण्याचे ठरवले होते, त्यासाठी येतांना मी बरोबर ड्रॉइंगचे सामान घेऊन आले होते. त्यांने माझे दोन्ही उद्देश साध्य झाले.

मी कागद, पेन्सिल घेऊन, खिडकीजवळ एकटीच बसून, माझ्या डोळ्यासमोर क्षणभरासाठी, तरळून जाणारी दृश्ये, मी कल्पनेच्या सहाय्याने रेखाटू लागले: दोन खडकांमध्ये समुद्र, उगवता चंद्र आणि त्यांच्या पार्श्वभूमीवर चालत असलेले जहाज, वेळूचे बन, डोक्यावर कमळफुलांचा मुकुट घातलेली जलपरी, कुंपणावरील चिमणीच्या घरट्याजवळ बसलेला बटुबैंगण अशी अनेक चित्रे मी रेखाटली.

एका सकाळी, मी एका चेहऱ्याचे स्केच करायला सुरवात केली. सॉफ्ट काळी पेन्सिल घेतली, ठळक बिंदू काढून मी कामाला लागले, विस्तृत आणि भव्य कपाळ आणि चौरस चेहरेपट्टी, ठळक भुवया, रुंद नाकपुड्यांसह सरळ नाक, तोंडावर नम्रपणा, दुभंगलेली हनुवटी, काळाभोर मिश्या, दाट काळे केस आणि समोरच्या बाजूला केसांचा कोंबडा, काही केस कपाळावर झेपावत होते. आता डोळे, ते जास्त

काळजीपूर्वक काढणे आवश्यक होते, डोळे मोठे केले; मी त्यांना चांगला आकार दिला: पापण्या लांब, काळया काढल्या; डोळयाच्या बाहुल्या चमकदार आणि मोठ्या काढल्या. त्यात अधिक शक्ती आणि जिवंतपणा आणण्यासाठी मी छटा अधिक काळया केल्या, जेणेकरून डोळे अधिक तेजस्वीपणे चमकतील.

"हे तुमच्या ओळखीच्या एखाद्याचे पोर्ट्रेट आहे का?" एलिझाला विचारले, माझ्याकडे लक्ष न देता, ती चित्राकडे पहात होती. नाही एक सहजपणे रेखाटन केले आहे असे म्हणत ते इतर चित्रा्च्या मध्ये ठेवून दिले. मी खोटे बोलत होते यात काही शंका नाही कारण ते मिस्टर रोचेस्टरचे आकर्षक पोर्ट्रेट होते; पण तिला किंवा इतरांना कसे समजणार होते?

त्याक्षणी जॉर्जियानाही चित्र बघायला पुढे आली; तिला माझी इतर रेखाचित्रे त्याला खूप आवडली; पण, नुकतेच काढलेले चेहऱ्याचे चित्र, तिने ते कुरूप चेहरा म्हणून बाजूला ठेवले. माझे चित्रकलेतील कौशल्य पाहून, दोघीनांही आश्चर्य वाटले. मी त्यांचे पोर्ट्रेट काढण्याची तयारी दाखवली. दोघीही पेन्सिल स्केचसाठी तयार झाल्या. जॉर्जियानाने मला तिचा अल्बम दाखवला, मी काही वॉटर कलर मध्ये चित्रे काढून देण्याचे कबूल केले. त्यामुळे तिला आनंद झाला आणि शेतात फिरायला जायला तिने बोलावले. जवळजवळ दोन तास आम्ही भटकत होतो. बऱ्याच खाजगी गप्पा झाल्या. दोन वर्षांपूर्वी तिच्या लंडनच्या ट्रिपची साद्यंत माहिती तिने मला सांगितली. मी पण तिचे कौतुक केले, जे तिला अपेक्षित होते. लंडनच्या मुक्कामात तिच्या सौंदर्याने तिथल्या युवकांचे लक्ष वेधून घेतल्याचा तिला गर्व वाटत होता. त्या दिवसापासून आम्हा दोघींमधील संबंध बऱ्यापैकी मैत्रीपूर्ण झाले. तिचे बोलणे मात्र नेहमीच तिचे प्रेम, तिचे दु:ख यांच गोष्टींभोवती फिरत असे, एकदाही तिच्या बोलण्यात, आईचे आजारपण, भावाच्या मृत्यूबद्दल किंवा घरच्या खालावलेल्या परिस्थिती, हे विषय आले नाहीत. कायम ती पुर्वीचे उत्साहाचे वातावरण आणि

तिच्या इच्छा, आकांक्षा सफल होण्यासाठी होत असलेला विलंब यावरच बोलत असे. ती तिच्या आजारी आईच्या खोलीत दररोज पाच, दहा मिनिटे जात असे त्या व्यतिरिक्त इतर काहीही नाही.

अजूनही एलिझा मोजकेच बोलत असे. खरं पाहिले तर तिला बोलत बसायला वेळच नव्हता. तिच्या एव्हढी कामात व्यग्र व्यक्ती मी पाहिली नव्हती; ती नेमके काय करत असायची हे सांगणे कठीण आहे: किंवा तिच्या परिश्रमाचे फळ काय हे समजणे अवघड होते असे म्हटले तरी चालेल. सकाळी लौकर घड्याळाला गजर लावून उठत असे. सकाळी ब्रेकफास्ट पुर्वी ती काय करायची याची मला कल्पना नाही. पण त्यानंतर तिने कामाची विभागणी केलेली होती. दिवसातून तिनदा प्रार्थनेचे पुस्तक वाचत असे. मी तिला त्यात काय आहे हे विचारल्यावर, तिने चर्चची सेवा नियमावली असल्याचे सांगितले. तीन तास ती शिवणकाम व भरतकामात करण्यात घालवत असे. सोनेरी धाग्याने, कार्पेटच्या आकाराच्या लाल रंगाच्या कापडावर भरतकाम करत असे. गेटशेडजवळ नवीन बांधलेल्या चर्चच्या वेदीला झाकण्यासाठी तिला द्यायचे होते. दोन तास डायरी लिहण्यात जात. दोन तास एकट्याने परसबागेत काम करत असे आणि सर्व हिशोब वगैरे लिहायला एक तास लागे. तिला कुणाशी बोलायची अथवा सोबतीची आवश्यकता नव्हती. माझा असे वाटले की ती तिच्या स्वत:च्या मार्गाने आनंदी होती. तिची दिनचर्या तिच्यासाठी पुरेशी होती आणि कोणत्याही कारणांमुळे त्यात व्यत्यय आला तर मात्र ती चिडत असे.

एका संध्याकाळी, एलिझा नेहमीपेक्षा जास्त बोलत राहिली. तिने मला सांगितले की जॉनच्या वागण्यामुळे आणि तिच्या कुटुंब धुळीला मिळण्याच्या भीतीने ती खूप व्यथित झाली होती. पण आता पुढे काय करायचे, याचा विचार पक्का झाला आहे. ती म्हणाली, “आईच्या मृत्यूनंतर मी माझ्या भवितव्यासाठी

पुढील तरतूद केली आहे.” या बोलण्याचा रोख असा होता, की आई आता बरी होण्याची अथवा जास्त दिवस जिवंत रहाण्याची शक्यता तिने गृहित धरली नव्हती. तिने पुढील जीवन चर्च साठी समर्पित करण्याचे ठरवले होते. मी तिला विचारले की, “जॉर्जियाना सोबत येईल का? “

“नक्कीच नाही.” तिच्यात आणि जॉर्जियानामध्ये कोणतीही गोष्ट समान नाही: आणि कधीही नव्हती; आता कोणत्याही कारणाने, जॉर्जियानाचे ओझे वहायला तिची तयारी नव्हती; जॉर्जियानाला आता स्वतः चा मार्ग स्वतः निवडावा लागेल; आणि एलिझा, तिच्या मार्गाने जाईल.

जॉर्जियाना ज्यावेळी माझ्याकडे तिच्या मनातील चिंता सांगत नसे, तेव्हा सोफ्यावर लोळत पडलेली असायची. घरातील कंटाळवाण्या वातावरणाचा त्रागा करत असे. इच्छा होती की तिची मावशी गिब्सन तिला गावी बोलावून घेईल. ती म्हणाली, “सर्व काही संपेपर्यंत इथून एक किंवा दोन महिने दूर राहणे माझ्यासाठी खूप चांगले होईल.” मी तिला या शब्दांचा अर्थ काय हे विचारले नाही; पण मला वाटतं ती तिच्या आईच्या मृत्यूचा आणि अंत्यसंस्काराच्या सेवेचा संदर्भ देत असावी. एलिझा सामान्यत: तिच्या तक्रारी आणि आळशीपणाकडे लक्ष देत नसे. जणू ती तिच्या लेखी अस्तित्वातच नव्हती. तथापि, एके दिवशी, तिचे हिशेब आणि तिची भरतकाम पुर्ण झाल्यावर तिने आपल्या बहिणीला अश्या प्रकारे फैलावर घेतले:- “जॉर्जियाना, पृथ्वीतलावर तुझ्यापेक्षा व्यर्थ आणि मूर्ख प्राणी कोणीही नसेल; जन्माला येऊन तुझा काहीच उपयोग नाही. स्वतः च्या हिंमतीवर जगण्याऐवजी तू दुसऱ्याच्या जीवावर उड्या मारत असतेस. तुझ्यासारख्या आळशी, रिकामटेकड्या आणि निरुपयोगी प्राण्याची जबाबदारी घेण्यास कोणी, तयार नसेल तर तू रडतेस आणि लोक आपल्याकडे दुर्लक्ष करतात मुद्दाम वाईट वागवतात, दु:ख देतात, म्हणून कांगावा करतेस. तुला कायम तुझे अस्तित्व सतत वैविध्यपूर्ण आणि

a

आनंदांनी भरलेले हवे आहे अन्यथा तुला जग एक तुरुंग वाटेल. सर्वानी तुझी प्रशंसा केली पाहिजे. तुला संगीत, नृत्य आणि मेजवान्या हव्या आहेत नाहीतर तुम्ही तुझ्या लेखी जगणे, हे मरणासारखे असेल. तुला तुझ्या स्वतःच्या प्रयत्नांनी, तुझ्या इच्छेनुसार जगण्याचा काही मार्ग सापडत नाही काय? दिवसभराचे नियोजन कर, काय कामे करायची याची यादी कर. अगदी पाच दहा मिनिटे सुध्दा विचारात घे, वेळेचा सदुपयोग केलास तर दिवस कधी उजाडला आणि कधी मावळला कळायचे सुध्दा नाही आणि तुला तुझ्या मदतीसाठी कोणाच्या तोंडाकडे पहायची गरज उरणार नाही. कोणाची तरी सोबत, संभाषण, सहानुभूती जगण्यासाठी आवश्यक नसते. तुझी तू स्वतंत्रपणे जग, सक्षम हो, हा माझा तुला पहिला आणि शेवटचा सल्ला आहे. मग तुला, काहीही झाले तरी, माझी किंवा इतर कोणाची गरज लागणार नाही. या कडे दुर्लक्ष केलेस आणि आतापर्यंत जसे वागत आहेस तसेच चालू ठेवलेस तर तुझ्या मुर्खपणाचे परिणाम तुला भोगावे लागतील: कितीही वाईट आणि असहनीय असले तरी, तुला एकदाच स्पष्टपणे सांगते, मी परत सांगणार नाही. आईच्या मृत्यूनंतर मी तुला कोणत्याही गोष्टीत मदतीचा हात देणार नाही. ज्यादिवशी तिची शवपेटी चर्चकडे सोपवली जाईल, त्यादिवशी तू आणि मी स्वतंत्र असू जणू एकमेकींना पुर्णपणे अनोळखी. आपण एकाच आईच्या मुली असलो तरी मी तुझ्या बरोबर फरफटत जाणार नाही: मी तुला सांगते, जरी पृथ्वीतलावर आपण दोघीच उरलो तरी मी तुला जुन्या जगात सोडून, मी नवीन जगात जाईन.”

एलिझा बोलता बोलता थांबली.

जॉर्जियानाने उत्तर दिले, “तू स्वत:ला हा शिव्याशाप देण्याचा त्रास टाळू शकली असतीस. सर्वांना माहित आहे की तू जगातील सर्वात स्वार्थी आणि निर्दयी प्राणी आहेस. तू माझा तिरस्कार करतेस, लॉर्ड एडविन विरबद्दल तू माझ्याबरोबर जी युक्ती खेळली होतीस, त्याचा माझ्याकडे त्याचा पुरावा आहे. तुला मी तुझ्यापेक्षा

a

उच्चपदावर विराजमान व्हायला नको आहे. मला समाजात प्रतिष्ठा, उच्चभ्रू वर्गात, जिथे तुला तोंड दाखवायला पण लाज वाटली असती, तिथे मिळू शकणारा प्रवेश, बघवला नसता, म्हणून तू पाळत ठेऊन चाहाडी केलीस आणि माझे भवितव्य कायमचे नष्ट केलेस.” जॉर्जियाना नंतर तासभर, स्पुंदत, हुंदके देत बसली, एलिझा थंड डोक्याने, अलिप्तपणे आपला उद्योग करत राहिली.

खऱ्या मित्रत्वाच्या भावनेने, दुसऱ्याच्या उपयोगी पडणे आणि एखाद्या व्यक्तीमध्ये किंवा कशातही, चांगले गुण पाहण्यास इच्छुक असणे, या गोष्टींना, काही लोकांच्या लेखी, फारसे महत्त्वाचे नसते: पण माझ्या पुढ्यात दोन परस्परविरोधी स्वभाव होते, एक कमालीचा तिखटजाळ तर दुसरा बेचव म्हणून खाण्यास अयोग्य.

नातेसंबंध समजून घेताना, चांगले अथवा वाईट याचा निर्णय घ्यायची वेळी जर भावना विचारात घेतल्या गेल्या नाहीत तर त्याला पाणचट बियरची चव येईल, या उलट असा निर्णय, अनियंत्रित भावनांच्या आधारे घेतला गेला, तर त्याचा कटू आणि नि:सत्व घास घशाखाली उतरणे कठीण होईल.

ती पावसाळी आणि वादळी दुपार होती.

जॉर्जियाना कादंबरी वाचताना सोफ्यावर झोपी गेली होती; एलिझा नवीन चर्चमध्ये सेवा ऐकण्यासाठी गेली होती, कारण ती धर्माच्या बाबतीत कर्मठ होती; तिची धार्मिक कर्तव्ये वक्तशीरपणे पूर्ण होण्यापासून उन, वारा पाऊस तिला रोखू शकत नव्हते; ती रविवारी तीन वेळा चर्चमध्ये जात असे आणि आठवड्याभरात जेव्हा जेव्हा प्रार्थना असे तेव्हा हजेरी लावत असे..

माझ्या मनात जाऊन आजारी मिसेस रीड यांना पाहून यावे, असा विचार आला, त्यांच्याकडे, आपुलकीने लक्ष दिले जात नसे. नोकरमंडळींना फारसे काही पडले नव्हते, तशी वेगळी नर्स ठेवली होती, ती जेव्हढी काही काळजी घ्यायची तेव्हढेच पण वेळ मिळतांच ती सुध्दा खोलीतून बाहेर येत असे. बेसी तशी विश्र्वासू

होती, पण तिला, तिच्या कुटुंबाची काळजी घ्यावी लागत असे त्यामुळे ती अधूनमधून घरी जात असे. खोलीत गेल्यावर माझ्या अंदाजाप्रमाणे तिथे कोणी दिसले नाही; नर्स पण तिथे नव्हती. मामीसाहेबांचा अर्धवट डोळा लागल्या सारखा वाटत होता, त्या थोड्या सुस्तावल्यासारख्या दिसत होत्या; त्यांचा चेहरा उशीमध्ये दबल्यासारखा वाटला, म्हणून मी उशी सारखी केली; शेकोटीतील आग विझली होती, मी ती पुन्हा पेटवली, अंगावरील चादर व्यवस्थित केली, मी क्षणभर त्यांच्याकडे पाहिले, त्या मला पाहण्याच्या परिस्थितीत नव्हत्या, मग मी खिडकीकडे गेले.

खिडकीच्या काचेवर पाऊस जोरात पडत होता, त्याला वादळी वाऱ्यांची साथ होती. माझ्या मनात विचार आला: “पलंगावरची व्यक्ती आता बहुधा, या जगाचा निरोप घेण्याच्या स्थितीत असावी, भौतिक जगाचा निरोप घेण्यासाठी, तो आत्मा कोणाशी झगडत असेल? त्याची सुटका कधी बरे होईल?”

अचानक मला हेलेन बर्न्सची आठवण आली; मला तिचे शेवटचे शब्द आठवले, तिचा विश्वास, एकदा शरीरातून मुक्त झालेल्या आत्म्यांच्या समानतेबद्दलचा तिचा सिद्धांत; तिचे शेवटचे शब्द माझ्या कानात घुमू लागले, आणि ते दृश्य नजरे समोर आले, मलुल पडलेला, मरणासन्न चेहरा, उदात्त नजर, शेवटी कुजबुजत्या स्वरात प्रगट केलेली इच्छा: त्याच प्रेमळ पित्याची मुलगी म्हणून, परत जन्म घ्यायची, सारे सारे मला आठवत होते, तोच अचानक बिछान्यातून एक दुबळा आवाज आला:

“कोण आहे इथे ?”

मला माहित होते, बरेच दिवसांत मिसेस रीड काहीच बोलत नव्हत्या. कदाचित आता त्यांची तब्येत ठिक होत असेल का? मी त्यांच्या जवळ गेले.

“मामी मी आहे,” मी म्हणाले.

“मी कोण? तिने विचारले; “तू कोण आहेस ?” मग तिने आश्चर्यचकित नजरेने माझ्याकडे पाहिले. “मी तुला ओळखत नाही ; बेसी कुठे आहे?”

“मामी, ती तिच्या घरी गेली आहे.”

“मामी,” तिने पुनरावृत्ती केली; मला कोण मामी म्हणत आहे? तू गिब्सन नक्कीच नाहीस आणि तरीही मी तुला कशी ओळखते? हा चेहरा, हे डोळे, हे कपाळ माझ्या ओळखीचे आहेत; तू दिसतेस... पण तू जेन आयरसारखी कशी दिसतेस?”

मी काहीच बोलले नाही; मी कोण आहे हे सांगून त्या दुखावल्या जातील अशी भीती मला वाटत होती.

“तरीच,” त्या म्हणाल्या, “मला भीती वाटते काही तरी चूक असावी; माझे चुकले ; मला जेन आयरला पहायचे होते, आता ती कशी दिसत असेल? आठ वर्षात तिच्यामध्ये बराच फरक पडला असणार.”

मी तिला हळुवारपणे आश्वस्त केले की, मी जेन आयरच आहे, जिला तिला पाहायचे आहे; तिने मला ओळखल्याचे समजले आणि ती पूर्ण शुध्दीवर आहे हे लक्षात आल्याने मी तिला सांगितले की बेसीचा नवरा मला थॉर्नफिल्डवरून घ्यायला कसा आला होता.

“हो, मला माहीत आहे की मी खूप आजारी आहे,” ती थोड्या वेळाने पुढे म्हणाली, “काही वेळापुर्वी, मी कुशीवर वळण्याचा प्रयत्न केला, आणि मला जरा सुध्दा हालता आले नाही; मरण्यापुर्वी मला मनावरचे ओझे दूर करायचे आहे: या क्षणी मला माझ्या आजारापेक्षा, हे ओझे जास्त त्रासदायक झाले आहे. येथे नर्स आहे का? खोलीत तू एकटीच आहेस काय ?”

मी त्याना खात्री दिली की मी एकटीच आहे.

“बरं! ती म्हणाली, मी तुझे दोनदा नुकसान केले आहे आणि आता मला पश्चात्ताप होतो आहे: पहिले, तुला, माझ्या मुलांप्रमाणे वाढवण्याचे, माझ्या पतीला

दिलेले वचन, मी पूर्ण केले नाही; दुसरे…" ती थांबली. "आता, कदाचित काही फरक पडणार नाही," ती पुटपुटली, "त्यामुळे मला बरे वाटू शकेल; तिच्यासमोर स्वतःची चुक मान्य करणे, हे माझ्यासाठी, खूप वेदनादायी आहे."

त्यांनी हलण्याचा प्रयत्न केला, परंतु त्या करू शकल्या नाहीत; त्यांचा चेहरा बदलला होता, आतून त्यांना काहीतरी वेगळा अनुभव येत असावा, कदाचित जात्या जीवाला लागलेल्या अंतकाळच्या वेदना असाव्यात.

त्या म्हणाल्या, "ये, मला हे करावंच लागेल, अंतकाळ माझ्यासमोर आहे; मला तिला सांगितलेच पाहिजे. माझे ड्रेसिंग टेबल उघड, त्या पुढे म्हणाल्या, आणि तिथे तुला एक पत्र दिसेल, ते घेऊन ये."

मी त्याची आज्ञा मानली.

"आता वाच," त्या म्हणाल्या.

ते लहान पत्र होते आणि त्यात अशा प्रकारे मजकूर होता:

"मॅडम, तुम्ही मला माझी भाची जेन आयरचा पत्ता पाठवा. ती कशी आहे ते मला सांगावे. थोडक्यात लिहिण्याचा माझा हेतू आहे आणि तिला मला मडेरा इथे आणण्याची इच्छा आहे. देवाच्या कृपेने माझ्या प्रयत्नांना यश आले. मी काहीतरी पुंजी जमा करू शकलो आहे; मला पत्नी किंवा मुले नाहीत; मला माझ्या तिला दत्तक घ्यायचे आहे आणि मी मेल्यावर माझ्या मालकीचे सर्व काही तिच्यासाठी सोडायचे आहे."

"जॉन आयर . मडेरा." पत्र तीन वर्षांपूर्वीचे होते.

"मी या विषयी कधीच का ऐकले नाही? मी विचारले.

"कारण मी तुझा खूप तिरस्कार केला की तुझ्या उन्नतीसाठी आणि समृद्धीसाठी मी कधीच हातभार लावला नाही. जेन, तुझे माझ्याबद्दलचे वागणे मी कधीच विसरू शकत नाही. ज्या रागाने तू माझ्यावर चिडून उलटून बोललीस की तू

a

जगातल्या कोणाहीपेक्षा जास्त, माझा तिरस्कार करतेस, तुझा तो स्वर, तुझे स्वरूप, तुझी नजर, त्यात लहान मुलीसारखे काहीच नव्हते, माझा नुसता विचार सुध्दा तुला अगदी नकोसा झाला आहे आणि मी तुझ्याबरोबर अत्यंत उपेक्षेने, क्रुरपणे वागवले हे माझ्या तोंडावर अगदी ठासून सांगितलेस. तुझ्या मनातील जहरी सापाचे विषच तू माझ्या अंगावर ओकलेस, त्यावेळच्या माझ्या संवेदना मी विसरू शकत नाही. मला भयंकर भीती वाटली, जणू मी मारलेले, एखादे जंगली श्वापद, माणसाचा नजरेने मला पहात आहे आणि माणसाच्या आवाजात शापवाणी उच्चारत आहे असे मला वाटले-- थोडे पाणी आणा! लौकर!"

"प्रिय मिसेस रीड," तिला गरज असलेली थोडी बियर देत, मी तिला म्हणाले, "या सर्व गोष्टींचा आता विचार करू नका, त्या गोष्टी तुमच्या आठवणीतून पुसून टाका; मी चिडखोरपणे तुमच्याबरोबर ज्या भाषेत बोलले त्याबद्दल मला माफ करा; तेव्हा मी लहान होते, आता त्या घटनेला आठ, नऊ वर्षे उलटून गेली आहेत."

तिने माझ्या बोलण्याकडे लक्ष दिले नाही; पण जेव्हा तिने बियरचे सेवन केले आणि परत मोठा श्वास घेत पुढे असे म्हणाली:

" मी विसरू शकत नाही, आणि मी त्याचा बदला घेतला; तुला तुझ्या काकांनी दत्तक घेतलेले आणि तू आरामात जगलेले, मला मान्य नव्हते. मी त्याला लिहिले, की त्याची योजना पूर्ण होऊ शकत नाही याची मला खंत आहे, जेन आयरचा लॉवुडमध्ये टायफसने मृत्यू झाला! आता तुला काय हवे ते कर, माझ्या बोलण्याचे खंडन करण्यासाठी त्याना पत्र लिहून, माझा खोटेपणा उघड कर, तुला जे वाटेल ते बोल. तुझा जन्म मला यातना देण्यासाठी झाला आहे: माझ्या अखेरच्या घटकेला मला माझ्या त्या कृत्याची आठवण आली, जे तुझ्या खेरीज इतर कुणाबाबत करण्याचा मोह मला झाला नसता."

a

"मामी, तुम्ही याबद्दल विचार करणे थांबवा आणि माझ्याकडे माझ्याकडे दयाळूपणाने आणि क्षमाशीलतेने पहा ----"

"तुझा स्वभाव वाईट आहे," त्या मला म्हणाल्या, "एक असा स्वभाव जो मला आतापर्यंत समजला नाही. नऊ वर्षे तू शांतपणे माझ्या वागण्याचा निमुटपणे स्विकार केलास, मला समजत नाही, दहाव्या वर्षी कशी काय एव्हढी आग, एव्हढा त्वेष उफाळून वर आला?"

"माझा स्वभाव वाईट आहे असे मला वाटत नाही," मी पुढे म्हणाले; मला त्वेष आला असू शकतो, पण बदला घेणारी मी नाही; माझ्या लहानपणी अनेकवेळा मला तुमच्यावर प्रेम करण्यात आनंद झाला असता, जर तुम्हाला मान्य असते तर आणि आता माझी तुमच्याशी समेट करण्याची खूप इच्छा आहे. मामी, माझे चुंबन घ्या."

मी माझा गाल त्यांच्या ओठांच्या जवळ आणला, पण त्यांनी त्याला स्पर्श केला नाही; त्यांनी मला सांगितले की मी त्यांच्या पलंगावर वाकून त्यांना चिरडून टाकत आहे आणि मग आणखी पाणी मागितले; ते पीत असताना मी त्यांना माझ्या हाताने धरून उठवले होते, तेव्हा मी त्यांचे थंड हात माझ्या हातात घेतले; पण त्याच्या कमकुवत बोटांनी माझ्या हातातून सोडवून घेण्याचा प्रयत्न केला, त्याच्या राखाडी डोळ्यांनी माझ्याकडे बघण्याचे टाळले.

"बरं! मी शेवटी म्हणाले, तुम्ही माझ्यावर प्रेम करा किंवा माझा तिरस्कार करा, आजवर झालेल्या प्रत्येक गोष्टीत आणि या प्रकरणातही मी तुम्हाला पूर्णपणे क्षमा करत आहे; देवाचे स्मरण करा आणि शांत रहा."

बिचाऱ्या मामीसाहेब! आता त्यांच्या मनाची धारणा बदलण्यासाठी उशीर झाला होता: जिवंतपणी, त्यांनी माझा द्वेष केला होता; मरतानाही त्यांनी माझा द्वेष करणे सोडून दिले नाही.

नर्स आत आली, तिच्या पाठोपाठ बेसी; मिसेस रीडकडून काही आपलेपणाची झलक सापडेल या आशेने मी आणखी अर्धा तास थांबले; पण त्यांनी तसे काही दर्शवले नाही, त्या परत सुन्न झाल्या होत्या; त्यांची गेलेली जाणीव परत आली नाही, त्याच रात्री, त्यांचा मृत्यू झाला; त्यावेळी मी तिथे नव्हते आणि त्यांच्या मुलीही नव्हत्या. दुसऱ्या दिवशी, ते आम्हाला सांगण्यासाठी आले की रात्री सर्वकाही संपले आहे. एलिझा आणि मी त्यांचे दर्शन घ्यायला गेलो. ही बातमी ऐकून जॉर्जियाना मोठ्याने रडू लागली आणि म्हणाली की तिची आमच्याबरोबर येण्याची हिंमत नाही. सारा रीड, एकेकाळी मजबूत, सक्रिय, कठोर आणि ताठ स्त्री , तिच्या मृत्यूशय्येवर पडली होती; त्याचे राखाडी डोळे त्यांच्या थंड पापण्यांनी झाकलेले होते; त्याच्या कपाळावर आणि चेहऱ्यावर कठोरपणाची छटा अजूनही दिसून येत होती. माझ्यासाठी त्यांचा मृत्यू एक गंभीर गोष्ट होती. मी त्यांच्याकडे खिन्न आणि दुःखी नजर टाकली; त्यातून आशा, दया अशी भावना झाली नाही. मला दु:ख वाटले ते त्यांच्या दुर्दैवा बद्दल माझी वैयक्तिक काही हानी झाली नव्हती आणि अशा स्वरूपातील भीतीदायक मृत्यूविषयी धास्ती आणि खेद वाटला.

एलिझाने तिच्या आईकडे शांतपणे पाहिले, काही मिनिटांच्या शांततेनंतर म्हणाली:

“तिच्या तब्बेतीच्या मानाने ती जास्त वर्षे जगायला हवी होती; दु:खाने तिचा जीव घेतला.”

एलिझाला हुंदका दाटून आला आणि क्षणार्धात निघून गेला; मग ती खोलीतून निघून गेली आणि मी तिच्या मागे गेले. मामीसाहेबांसाठी आम्हा दोघींपैकी कोणीही अश्रू ढाळले नव्हते.

# प्रकरण 22

मिस्टर रोचेस्टरनी मला फक्त एक आठवडा दिला होता आणि तरीही एक महिना उलटून जाईपर्यंत, मी गेटशेड सोडले नव्हते. मला अंत्यसंस्कारानंतर लगेच निघायचे होते; पण जॉर्जियानाने मला ती लंडनला जाईपर्यंत थांबण्याची विनंती केली: कारण तिला नुकतेच तिच्या मामानी मिस्टर गिब्सन यांनी तिला तिकडे बोलावले होते, जे मिसेस रीडच्या अंत्यसंस्कारासाठी आणि कौटुंबिक व्यवहार मिटवण्यासाठी आले होते. जॉर्जियाना मला म्हणाली की तिला एलिझाबरोबर एकटे राहण्याची भीती वाटत होती, कारण तिला तिच्याकडून तिच्या औदासिन्याविषयी सहानुभूती किंवा तिच्या भीतीबद्दल आधार मिळू शकला नसता; तिच्या प्रवासाच्या तयारीसाठी एलिझा मदत करू इच्छित नव्हती; जाँर्जियानाच्या सततच्या तक्रारी आणि स्वार्थी शोकप्रदर्शन याला मी कंटाळून गेले, तरीपण मी तिच्या कपड्यांची चांगल्याप्रकारे शिलाई करून दिली आणि सामान बांधण्यात मदत केली. हे खरे आहे की मी काम करत असताना ती विश्रांती घेत होती. मी स्वतःशी विचार केला: तिला आणि मला नशीबाने जर कायमचे एकत्र रहायला लागणार असते, तर मला तिला सांगावे लागले असते की, “आपण वेगळ्या पद्धतीने कामाची विभागणी करू; अशा पध्दतीने मी तुझे सर्व काम स्वतःच्या शिरावर घेणार नाही, तुला तुझ्या वाटणीचे काम केलेच पाहिजे, आणि तू जर केले नाहीस, तर मी किंवा इतर कोणी त्याला हात लावणार नाहीत. तुझ्या दांभिक तक्रारी ऐकायची माझी अजिबात तयारी नाही, सध्या आपला सहवास तात्पुरता आहे आणि प्रसंग दु:खाचा आहे म्हणून मी नमते घेऊन शांतपणे होईल तेव्हढी मदत करत आहे.”

शेवटी जॉर्जियाना निघाली; त्यानंतर एलिझाने मला आणखी आठवडाभर राहण्यास सांगितले; तिने सांगितले की, तिला योजनांसाठी सर्व वेळ आणि लक्ष देणे आवश्यक आहे; तिला एका अनोळखी ठिकाणी जायचे होते. तिने स्वत:ला खोलीत कोंडून घेतले होते आणि दिवसभर सामानाची बांधाबांध करत, ड्रॉवर रिकामे करून निरूपयोगी कागद जाळत राहिली; तिचा कोणाशीही संवाद नव्हता; तिने मला घराकडे लक्ष देण्यास, भेटायला आलेल्या लोकांशी बोलण्यास आणि शोक पत्रांना उत्तर देण्यास सांगितले.

एका सकाळी, तिने मला थॉर्नफिल्डला परत जाण्यासाठी मुभा दिली आणि ती पुढे म्हणाली:

"तुझी सेवेबद्दल आणि विवेकी वागण्याबद्‌ल मी आभारी आहे; तुझ्या सोबत राहण्यात आणि जॉर्जियानासोबत राहण्यात मोठा फरक आहे; तू स्वावलंबी आयुष्य जगत आहेस. तू कोणावरही ओझे बनून रहात नाहीस." ती पुढे म्हणाली, "मी उद्या अमेरिकेत जात आहे; मी लायल जवळ एका ननरीमध्ये स्थायिक होईन; तेथे मला कोणी त्रास देणार नाही आणि शांती मिळेल; काही काळ मी कॅथोलिक मताचा अभ्यास करीन आणि या धार्मिक व्यवस्थेचे काळजीपूर्वक परीक्षण करेन; जर, माझ्या विश्वासाप्रमाणे, सर्व गोष्टी योग्य प्रकारे पार पडल्या, तर मी रोमचे तत्वज्ञान स्वीकारेन आणि कदाचित नन बनण्याचे नक्की करेन."

मी या ठरावावर आश्चर्य व्यक्त केले नाही किंवा तिला त्यापासून परावृत्त करण्याचा प्रयत्न केला नाही. "हे तुझ्यासाठी अगदी योग्य आहे," मी विचार केला: "याने तुझे खूप चांगले होईल!"

जेव्हा आम्ही वेगळे झालो तेव्हा ती मला म्हणाली:

a

"अलविदा जेन; तुझे सर्व चांगले होऊ देत, तुझ्याकडे बऱ्यापैकी शहाणपण आहे."

मी म्हणाले, "तुझ्याकडे पण शहाणपणाची कमतरता नाही आहे एलिझा, पण तुझ्याकडे जे काही आहे, ते मला वाटते की आणखी एका वर्षात फ्रेंच कॉन्व्हेंटमध्ये जिवंत भिंतीत गाढले जाईल. तथापि, या गोष्टिंशी माझा संबंध नाही आणि म्हणून ते तुला योग्य वाटत असेल - मला काही काळजी नाही."

"तू बरोबर आहेस," ती म्हणाली: "आणि आपल्यापैकी प्रत्येकाने वेगळा मार्ग स्वीकारला आहे."

मला यापुढे तिच्या किंवा तिच्या बहिणीबद्दल बोलण्याची संधी मिळणार नाही, म्हणून सांगत आहे की, जॉर्जियानाने एका अतिशय श्रीमंत पण वयाने मोठ्या असलेल्या रुबाबदार व्यक्तीशी लग्न केले आणि एलिझा नन झाली; ती आता त्या कॉन्व्हेंट मध्ये मोठ्या पदावर आहे जिथून तिने सुरवात केली होती, तिला नशिबाने त्याच ठिकाणी उच्च पद बहाल केले.

लोक जेव्हा कमी अथवा मोठ्या कालावधीनंतर त्यांच्या घरी परत येतात, तेव्हा त्यांना कसे वाटते, याची मला कल्पना नव्हती. लहानपणी एकदा बऱ्याच दूरवर चालून जेव्हा गेटशेडला परतले तेव्हा मी थकलेली, उदास दिसल्यामुळे मला बोलणी खावी लागली होती. त्यानंतर जेव्हा चर्चमधून लॉवुडला परत आले, तेव्हा मला पोटभर जेवण आणि शेकोटीची उब हवी होती, जी मला मिळू शकली नाही. हे दोन्हीही अनुभव फारसे सुखद अथवा आनंददायी नव्हते. चुंबक कसे लोखंडाला आकर्षून घेते, तसे या वास्तूंनी मला खेचून घेतले नव्हते; थॉर्नफिल्डवर परतण्याचा माझ्यावर काय परिणाम होईल हे अजून कळायचे होते.

माझा प्रवास फारच कंटाळवाणा झाला. पहिल्या दिवशी पन्नास मैल, रात्री खानावळीत मुक्काम, दुसऱ्या दिवशी उरलेला प्रवास करावा लागला. पहिल्या

a

दिवशी, प्रवासात मिसेस रीडचे शेवटची भेट आठवत होती. मरणासन्न निस्तेज चेहरा, विचित्र आवाज, माझ्यावरच्या तिरस्काराचे कारण आणि साऱ्या गोष्टींची परिणती, सर्व न विसरण्याजोग्या गोष्टी होत्या. मला अंत्यसंस्काराचा दिवस, शवपेटी, शेतकरी आणि नोकरांची लांबलचक रांग, नातेवाईकांची कमी संख्या, शोकाकुल वास्तू, मूक चर्च, गंभीर सेवा आठवली. आणि मग मी, एलिझा आणि जॉर्जियानाचा विचार केला. मला जाँर्जियाना, बाँल रुममधील जिच्यावर सर्वांचे लक्ष खिळून रहाते, अशा स्त्रीच्या रुपात दिसली आणि एलिझा काँन्व्हेंटच्या कोठडीत बंद असलेली, डोळयासमोर आली. दोघींमधील उल्लेखनीय स्वभावविशेष, मी परत एकदा पडताळून पाहिले. संध्याकाळी मुक्कामाच्या गावी हे सर्व विषय मागे पडले आणि अंथरुणावर पडल्यावर मी भुतकाळ मागे सारुन भविष्याचा विचार करु लागले.

मी थॉर्नफिल्डला परत जात होते, पण अजून किती दिवस मी तिथे राहू शकेन?

माझा तिथला मुक्काम जास्त काळ राहणार नाही याची मला खात्री होती. मला मिसेस फेअरफॅक्सचे पत्र आले होते. तिने मला सांगितले की मिस्टर रोचेस्टरचे पाहुणे नुकतेच वाड्यातून निघून गेले आहेत; श्री रॅचेस्टर तीन आठवडे लंडनमध्ये होते परंतु पंधरवड्यानंतर परत येणार होते; मिसेस फेअरफॅक्सने मला सांगितले की ते त्यांच्या लग्नाची तयारीसाठी गेले होते आणि नवीन घोडागाडी खरेदी करण्याविषयी त्यांच्याकडे बोलले होते. त्यांनी पुढे लिहिले होते की मिस इंग्रामसोबतचा हा विवाह त्यांना अजूनही आश्चर्यकारक वाटत होता; परंतु, त्यांनी जे ऐकले आणि स्वतः जे पाहिले त्यावरून, त्यांना समारंभ, लौकरच जवळ येईल याबद्दल शंका वाटत नाही.

a

"अजूनही खात्री पटत नसेल तर मात्र मुर्खपणा होईल," ही माझी मानसिक टिप्पणी होती. "मला हा, विवाह संपन्न होण्याविषयी अजिबात शंका नव्हती."

पुढचा प्रश्न होता, "मी कोठे जायला हवे?" मला रात्रभर मिस इंग्रामचे स्वप्न पडले; स्वप्नात मी तिला थॉर्नफिल्डचे दरवाजे माझ्यासाठी बंद करताना आणि मला बाहेरचा रस्ता दाखवताना पाहिले; मिस्टर रॉचेस्टर हाताची घडी घालून, आम्हा दोघींकडे आपले नेहमीचे व्यंग्यपूर्ण स्मित करत उभे होते.

मी कधी परत येणार या विषयी मिसेस फेअरफॅक्सला पत्र लिहिले नव्हते, कारण मला त्यांनी, माझ्यासाठी मिलकोटला गाडी पाठवावी, अशी माझी इच्छा नव्हती; हा छोटासा प्रवास शांततेत करण्याचा माझा मानस होता आणि माझी ट्रंक सरायाच्या देखरेखीखाली ठेवून मी संध्याकाळी सहा वाजता जॉर्जच्या सरायातून निघाले आणि थॉर्नफिल्डकडे जाणारा रस्ता पकडला. रस्ता काही प्रमाणात शेतांच्या मधोमध होता आणि फारसा वर्दळीचा नव्हता.

ही एक उन्हाळी संध्याकाळ होती जी ढगाळ किंवा वादळी नसून आणि शांत आणि सुखकर होती. आजूबाजूच्या शेतात गवत कापणीचे काम अजूनही सुरु होते. निरभ्र आकाश चांगल्या हवामानाचा संकेत देत होते. आकाशाचा निळा मृदु आणि निर्मळ दिसत होता. ढग हलके असून, उंचावर होते; पश्चिम दिशा तांबूस रंगाने रंगली होती, जणू एक ज्वलंत वेदीसारखी दिसत होती आणि ढगांमधून, मावळत्या सुर्याची सोनेरी लाल रंगाची किरणे बाहेर पडत होती.

माझ्यासमोरचा रस्ता जवळजवळ संपत आल्याचे लक्षात आले, मला खूप आनंद झाला, इतका आनंद झाला की मी स्वतःला, या आनंदाचा अर्थ काय हे विचारायला थांबले आणि स्वतःला आठवण करून द्यायला विसरले नाही की, मी माझ्या स्वतःच्या घरी परतत नाही आहे किंवा त्या ठिकाणी मला नेहमी राहायचे

आहे असेही नाही अथवा जिथं माझे, स्नेही, मित्रमंडळी, मी येण्याची वाट पहात असतील.

"मिसेस फेअरफॅक्स," मी स्वतःला म्हणाले, "शांतपणे माझे स्वागत करतील, छोटी ॲडेल टाळया वाजवून मला पाहून आनंदाने उडी मारेल; पण मी, त्या तिसऱ्या व्यक्तीचा विचार करत आहे जी माझा विचार करत नाही."

काय तारुण्य एव्हढे हट्टी असते? की अनुनभव, आंधळा असतो? दोन्ही प्रश्नाचे उत्तर होकारार्थी आले आणि माझे मन मला म्हणाले, "परत एकदा मि.रोचेस्टरना पहाण्याचा आनंद मिळणे ही चांगली गोष्ट आहे, भले त्यांनी माझ्याकडे पाहिले किंवा नाही, याने काही फरक पडत नाही. त्यांच्याकडे पोहोचण्यासाठी लौकर घाई कर, शक्य असेल तेव्हा त्याच्याबरोबर राहण्याचा प्रयत्न कर; आणखी काही दिवस किंवा जास्तीत जास्त काही आठवडे नंतर तू त्याच्यापासून कायमची वेगळी होशील!" या नवजात वेदनेचा मी गळा घोटला, इतकी विद्रूप गोष्ट मी जन्माला घातली असेल याची, माझी मलाच खात्री नव्हती--- आणि मी जवळजवळ पळत थॉर्नफिल्डच्या दिशेने निघाले: रोचेस्टर, जे माझे होऊ शकत नाहीत, त्यांच्या विषयी माझ्या मनात निपजलेली प्रेमभावना मला वेदनादायी वाटत होती, ती नष्ट करण्यावाचून अन्य पर्याय माझ्यापाशी नव्हता.

थॉर्नफिल्डच्या कुरणात गवत कापणी चालू होती, काही कामगार काम थांबवून, घराकडे परतत होते, त्यांच्या खांद्यावर शेतीची अवजारे होती, मी चालायला लागून एक तास होऊन गेला होता, आता फक्त एक दोन शेते ओलांडून, रस्ताच्या पलिकडे थॉर्नफिल्डचे गेट लागणार होते. रस्त्याच्या कडेला कुंपणावर गुलाब फुलले होते, पण त्याना तोडून घेण्यासाठी माझ्याकडे अजिबात वेळ नव्हता. मला लौकर घर गाठायचे होते. वाटेत एक गुलाबाची, फुलांनी लगडलेली मोठी डहाळी रस्त्यात आडवी आली होती. कुंपणालगत एका अरूंद चौकटीत

बसण्यासाठी दगडी पायऱ्या होत्या, तिथे मि. रोचेस्टर बसले होते, हातात पुस्तक आणि पेन्सिल होती, बहुतेक काहीतरी लिहत असावेत.

ते काही भुत नव्हते पण त्यांना पाहिल्यावर, माझ्या सर्वांगाला झिणझिण्या आल्या: क्षणभर माझा, स्वतःवरचा ताबा सुटला. हे नेमके काय होते? त्यांना पाहून मी अशी थरथर कापेन आणि तोंडातून शब्द फुटणे अशक्य होऊन, अंगातील बळ नाहीसे होईल, असे मला कधी वाटले नव्हते. थोडेसे सावरल्यावर, आल्या पावली मागे फिरावे असा मी विचार केला. मला मुर्ख बनायचे नव्हते, थॉर्नफिल्डला जाणारा दुसरा एक रस्ता मला माहिती होता. एकच का अजून दहा पाच रस्ते माहिती असले तरी काही उपयोग नव्हता, रोचेस्टरनी मला पाहिले होते.

"हॅलो ! पुस्तक आणि पेन्सिल खाली ठेवून ते ओरडले; तर तू इथे आहेस तर! कृपया इकडे ये."

मला पुढे जायला हवे होते, कसे ते मला समजत नव्हते, मी बावरून गेले होते मी मला वरकरणी शांत दिसण्याची इच्छा होती, सर्वात महत्त्वाचे म्हणजे, माझ्या मनातील खळबळ मला चेहऱ्यावर दाखवून द्यायची नव्हती, त्यासाठी मला डोक्याला बांधलेल्या स्कार्फची मदत झाली, तो थोडा खाली ओढून घेतला.

"ओहो! ही जेन आयर आहे तर," मिस्टर रोचेस्टरने विचारले; तू मिलकोटहून चालत येत आहेस वाटते? बरोबर आहे, तुझी नेहमीची पध्दत आहे: गाडी बोलावून घेण्याऐवजी, संध्याकाळच्या वेळी, एकाकी रस्त्यावर चालत, आपल्या घराच्या आजुबाजुला लपून येताना, मी स्वप्नात पहात आहे की तिचे इथे भुत आले आहे? गेल्या महिनाभर तू काय करत होतीस?"

"सर, माझ्या मामी निवर्तल्या, मी तिकडेच होते."

"हे उत्तर खरेच तुझे आहे; आकाशातील देवदूतांनो माझ्या मदतीला या! ती दुसऱ्या जगातून आली आहे जिथे मृत माणसे रहातात; आणि हे मला ती एकट्याने

येऊन या कातरवेळी सांगत आहे! मला धीर एकवटून, तिला स्पर्श करून खात्री करून घ्यायला हवी ती खरोखरच मनुष्य आहे की, तिचे रुप धारण करून आलेली मायावी आत्मा जो मला भुरळ पाडून विचलित करण्यासाठी आला आहे. उनाड मुली, गेला महिनाभरापासून तू माझ्यापासून दूर आहेस, आणि मला विसरली आहेस यात शंका नाही.''

मला माहित होते, की माझ्या धन्याला पुन्हा भेटून मला आनंद होईल, मला धास्ती होती, की लवकरच मी त्यांच्या चाकरीत असणार नव्हते: मि. रोचेस्टरांकडे, संवाद साधण्याची विलक्षण हातोटी होती, त्यांनी हातातून विखुरलेला ब्रेडचा चुरा, माझ्यासारख्या भटक्या, परदेशी पक्ष्यांना, पंचपक्वानांसारखा होता आणि त्याचा आस्वाद घेणे, ही मोठी मेजवानीच होती. त्यांचे शेवटचे शब्द माझ्यासाठी अमृतासमान होते: त्यातून असे ध्वनित होत होते, की मी त्यांना विसरले तर नाही, हे जाणून घेणे, त्यांच्यासाठी महत्त्वाचे होते. आणि त्यांनी थॉर्नफिल्डला माझे घर असे संबोधले----''ते खरेच माझे घर असेल?''

ते पायरी वरून उठले नाहीत आणि माझासुद्धा तेथून पाय निघत नव्हता, मी ते लंडनला गेले होते काय या विषयी चौकशी केली.

``होय,'' मला वाटते तुला दुरदृष्टी प्राप्त असावी.''

``मिसेस फेअरफॅक्सने मला ते पत्रात लिहिले होते.''

``पण तिने तुला का सांगितले?''

``अरे! सर, सर्वांना ते माहीत होते.''

``बरं! जेन, मला तुला गाडी दाखवावी लागेल, आणि तू मला सांग की ती मिसेस रोचेस्टरना शोभेलशी आहे काय. हे पहा, जेन, माझी इच्छा आहे की मी तिला

a

शोभेल असा दिसायला हवा; माझा कायापालट होण्यासाठी काही दिव्यौषधी अथवा जादूचा ताईत वगैरे असेल तर सांग.”

“हे जादूच्या सामर्थ्याच्या पलीकडे आहे सर,” आणि मनात विचार केला, “प्रेममय डोळे, हेच सर्वात मोठे आकर्षण आहे; तुमच्याकडे हे आकर्षण आहे आणि तुमच्या चेहऱ्यावरील कठोर भाव, सौंदर्यापेक्षा अधिक सामर्थ्यवान आहेत.”

मि रॉचेस्टरनी कधीकधी माझ्या मनातील विचार, आपल्या अगम्य बुद्धीने वाचले होते: सध्याच्या प्रसंगात त्यांनी माझ्या बोलण्याची दखल घेतली असे वाटले नाही; पण त्यांनी माझ्याकडे पाहून नुसतेच स्मितहास्य केले, जे खास प्रसंगी, कधीकधीच उमटत असे आणि आजचा प्रसंग, त्यापैकी एक असावा: रोचेस्टर भावनांचा खरा सूर्य होते - आणि त्याची तेजस्वी किरणे माझ्यावर विखुरलेली गेली होती.

“ये, जेनेट,” रोचेस्टर माझ्यासाठी रस्ता मोकळा करत म्हणाले: वरती घरी जा, चालून चालून थकलेली तुझी पावले आता तुझ्या मित्राच्या उंबरठ्यावर थांबू देत.”

मला आता शांतपणे फक्त त्यांचे आज्ञापालन करायचे होते: पुढे काही बोलायची मला गरज नव्हती, मी एकही शब्द न बोलता पुढे निघाले आणि त्यांना शांतपणे एकटे सोडण्याचा संकल्प केला. पण एकाएकी एक वेगळा आवेग प्रगटला, एका शक्तीने मला मागे वळायला भाग पाडले: मी म्हणाले--- की माझ्या मधील दुसरेच कोणी, माझ्यासाठी म्हणाले:-

“धन्यवाद, मिस्टर रोचेस्टर, तुमच्या महान दयाळूपणाबद्दल धन्यवाद; तुमच्याकडे परत आल्याचा मला खूप आनंद झाला आहे, तुम्ही जिथे असाल तेच माझे घर, माझे एकमेव घर!”

मग मी इतक्या वेगाने चालायला लागले की, जर त्यांना मला पकडायचे असते तर पकडणे मुश्किल झाले असते. मला पाहून छोट्या अँडेलला खुप आनंद झाला.

मिसेस फेअरफॅक्सनी त्यांच्या नेहमीच्या दयाळूपणाने माझे स्वागत केले, लेआ माझ्याकडे पाहून हसली आणि सोफी आनंदाने गुड इव्हनिंग म्हणाली; हे सर्व खूप आनंददायी होते. तुमचे सहकारी तुमच्या वर प्रेम करतात आणि तुमची उपस्थिती त्यांच्यासाठी आनंददायी आहे असे वाटणे यापेक्षा मोठा आनंद नाही.

त्या संध्याकाळी, भविष्याचा विचार करायचा नाही, या निर्धाराने डोळे मिटले; मी माझे कान झाकून घेतले की मला लौकरच होऊ घातलेल्या वियोगाची आणि पर्यायाने दु:खाची वार्ता ऐकू येऊ नये.

चहा झाल्यावर, मिसेस फेअरफॅक्सनी त्यांचे विणकाम सुरु केले, मी तिच्या जवळच्या एका छोट्या खुर्चीवर बसले आणि ॲडेल, कार्पेटवर गुडघे टेकून, मला लघटून बसली; परस्पर स्नेहाच्या भावनेने आम्ही सोनेरी शांततेने वेढले गेलो; मग, मी देवाला प्रार्थना केली की आम्हाला इतक्या लवकर एकमेकांपासून वेगळे करू नको. तेव्हढ्यात रॉचेस्टरनी प्रवेश केला तेव्हा आम्हाला एकत्र पाहून ते समाधानी दिसत होते.

“मॅडम फेअरफॅक्स,” ते म्हणाले, “तुमची दत्तक मुलगी सापडल्याने तुम्हाला खूप आनंद झाला असेल आणि ॲडेल तिची छोटी इंग्लिश आई खूप खाऊ देणार आहे.”

त्यांचे असे बोलणे ऐकून मला थोडीशी आशा वाटली की, त्यांच्या लग्नानंतरही ते कदाचित आम्हा सर्वांना एकत्र ठेऊ शकतील, आमच्या रहाण्या खाण्याची सोय करतील, आणि वेळोवेळी त्यांचा आनंदी सहवास लाभेल.

a

त्यानंतर पंधरवडाभर थॉर्नफिल्डला अगदी शांतता होती, रोचेस्टरांच्या लग्नाच्या संदर्भात कोणी काही बोलताना ऐकू आले नाही किंवा लग्नाची तयारी पण कुठे चाललेली दिसत नव्हती. मी जवळपास रोज मिसेस फेअरफॅक्सना लग्नाच्या संदर्भात विचारत असे, पण त्यांचे उत्तर नकारार्थी येत असे. शेवटी एकदा त्यांनी मला सांगितले, की त्यांनी रोचेस्टरना स्पष्टपणे विचारले की नववधू घरी कधी येणार? यावर नेहमीच्या विचित्र नजरेने पाहून, त्यांनी तो प्रश्न हसण्यावारी नेला. त्यामुळे त्यांना पण रोचेस्टरचा नक्की काय विचार आहे हे समजत नव्हते.

आणखी एक गोष्ट होती ज्याचे मला खूप आश्चर्य वाटले: इंग्राम कुटुंबातील कोणीही वाड्यात आले नाही आणि मि. रोचेस्टर कधीही इंग्राम पार्कला गेले नाहीत. तसे पाहिले तर फक्त वीस मैलाचे अंतर होते, थॉर्नफिल्ड आणि इंग्राम पार्क मध्ये. उत्कट प्रेमाला अंतराची फिकीर असायला नको होती आणि रोचेस्टरांसारख्या पट्टीच्या घोडेस्वारासाठी सकाळचा एक फेरफटका पुरेसा होता. माझ्या आशा पल्लवीत झाल्या, खरे तर तसा विचार करण्याचा, मला अधिकार नव्हता: की लग्न मोडले आहे; लग्ना विषयी चुकीची अफवा पसरली होती; दोन्ही बाजूंनी किंवा एका बाजूचा विचार बदलला आहे. मी मि. रोचेस्टरांच्या चेहऱ्यावर काही दु:खाचे किंवा चिडल्याचे भाव दिसतात काय याचा अंदाज घेत होते, पण मला तसे काहीच जाणवले नाही, उलट मी आणि अँडेल त्यांच्या बरोबर असताना मी कधी उदास अथवा दु:खी दिसले तर ते, मला आनंदीत करण्याचे प्रयत्न करत असत. मला त्यांच्या बरोबर वेळ घालवण्यासाठी, त्यांनी पुन्हा मला जास्त वेळा बोलावणे पाठवले नाही, पण मी जेव्हा कधी त्यांच्या समवेत असायची, तेव्हा ते माझ्याबरोबर चांगले वागले, एव्हढे चांगले या अधी कधीच वागले नव्हते. अरेरे! मी त्याच्यावर इतके प्रेम कधीच केले नव्हते.

# प्रकरण 23

सुंदर उन्हाळाचे मधले दिवस होते. स्वच्छ आकाश आणि तेजस्वी सूर्य क्वचितच ग्रेट ब्रिटनला उजळतो, यावेळी मात्र बरेच तो दिवस आनंद लाभला होता: असे म्हटले तरी चालले असते, परदेशी पक्ष्यांचे थवे, जसे दक्षिणेकडून येऊन, अल्बियनच्या उंच कड्यावर विश्रांतीसाठी विसावतात, तसे इटलीतून इतके प्रसन्न उन्हाळयातील दिवस इंग्लंडमध्ये आले असावेत. थॉर्नफिल्डच्या सभोवतालची हिरवीगार शेतं नुकतीच कापली गेली होती; रस्ते टणक झाले होते, झाडावरची पालवी जुन होऊन आता फळे पक्व होऊ लागली होती. कुंपणाची झुडपे, मोठ्या झाडांचा गडद हिरवी रंग आणि नुकत्याच गवत कापलेल्या कुरणांचा सोनसळी रंग, एकमेकाशी विरोधी छटेमुळे जास्त उठून दिसत होता.

एका संध्याकाळी ॲडेल अर्धा दिवस बेरीज् गोळा करून दमली आणि सुर्यास्ताच्या वेळेस झोपी गेली. ती झोपल्यावर मी बागेत फिरायला म्हणून बाहेर पडले. संपूर्ण दिवसभरातील सर्वात सुखद वेळ होती. उन्ह मावळून, सुकलेल्या मैदानांवर आणि कोरड्या डोंगरांवर ताजे दव पडले होते; आज दिवस स्वच्छ, कोरडा होता. सूर्य नुकताच समोरच्या डोंगराच्या शिखराच्या आड गेला होता.

मावळत्या सुर्याच्या लाल सोनेरी किरणांनी, डोंगरमाथ्यावर वरचे आकाशात आगीची भट्टी पेटल्याचा भास होत होता. थोड्या वेळाने रंग फिके पडत गेले आणि आकाश किरमिजी रंगाचे झाले. पूर्वेला, सुंदर गडद निळ्या आकाशात एकुलती एक चांदणी लुकलुकत होती; चंद्र, अजूनही क्षितिजाच्या आड लपलेला होता, त्याचे आगमन होण्याची वेळ जवळ आली होती.

मी फरसबंदीवर चालायला सुरुवात केली, तेव्हढ्यात परिचयाच्या सिगारचा वास आला. माझे लक्ष त्यादिशेने गेले. लायब्ररीची खिडकीच्या उघडी होती. तेथून रोचेस्टर मला पहात असतील याचा मला अंदाज आला. म्हणून मी बागेच्या दिशेने निघाले. था ॅर्नफिल्डमधील बाग स्वर्गातील ईडनसारखी सुंदर आणि विरंगुळा देणारी होती: वेगवेगळया प्रकारच्या झाडांनी आणि फळाफुलांनी बहरलेली होती. बागेच्या एका बाजुला उंच भिंत होती आणि त्यापलीकडे खेळण्याचे मैदान होते. तर दुसऱ्या बाजूला बीच वृक्षांची रांग होती. बाग आणि शेती या मध्ये कुंपण होते. एक नागमोडी वाट दोन्ही बाजूला लाॅरेन्सच्या झुडपांनी वेढलेली होती. तिच्या शेवटाला एक मोठे चेस्टनटचे झाड होते. त्याखाली बसण्यासाठी बाक ठेवले होते; बागेच्या भागात कोणाच्या लक्षात न येता फिरणे शक्य होते. अशा या शांत, दवभरल्या, मधाळ वातावरणात, संधीप्रकाशात वारंवार यायला मला आवडत असे. मी बागेच्या वरच्या भागात असलेल्या फुलांच्या आणि फळांच्या झाडांमध्ये फिरले, तो भाग उगवत्या चंद्राच्या किरणांनी इतरांपेक्षा जास्त उजळला होता; मी अचानक थांबले, ते मी काही पाहिले किंवा ऐकले म्हणून नाही, तर मला पुन्हा एकदा तोच वास आला होता.

हॉथॉर्न, ऑरोन्स, चमेली, कार्नेशन आणि गुलाब यांचा सुगंध वातावरणात दरवळत होता, पण हा वास झाडांनी किंवा फुलांनी निर्माण केला नव्हता; तो मिस्टर रोचेस्टरच्या सिगारमधून आला होता, हे मला चांगलेच माहीत होते; मी आजूबाजूला पाहिलं, मी पिकलेल्या फळांनी भरलेली झाडे, झाडावर बुलबुल गाणारे बुलबुल दिसले, परंतु मला रोचेस्टर दिसले नाहीत किंवा त्यांच्या पावलांचा आवाजही ऐकू नाही; तथापि, सिगारचा वास वाढल्याने मी परत फिरण्याचा निर्णय घेतला आणि श्रुबेरीच्या झुडपाजवळच्या छोट्या दरवाजाकडे मी निघाले आणि तेव्हा, रोचेस्टर येताना दिसले. झटकन मी एका वेलीच्या आडोशाला गेले; "ते काही जास्त वेळ

थांबणार नाहीत: जसे आले तसेच लौकर परत गेले, तर ते मला पहाणार नाहीत," असा विचार करून मी शांत राहिले.

पण माझी ती चूक होती; संध्याकाळची वेळ आणि जुनी बाग, त्यांना माझ्याइतकीच आकर्षक वाटली. ते आजूबाजूला फिरत होते, कधी आवळयाच्या झाडाच्या मोठ्या आकाराच्या आवळ्यांनी लगडलेल्या फांद्यावर करून पाहत होते तर कधी भिंतीजवळच्या झुडपावरच्या पिकलेल्या चेरी तोंडात टाकणे असे चालले होते. फुलांना जवळ जाऊन निरखून पहाण्यात, वास घेतांना, पाकळ्यांना स्पर्श करण्यात ते रमून गेले होते. तेव्हढ्यात एक मोठा पतंग पंख फडफडवत माझ्या जवळून उडाला आणि मि. रोचेस्टरांच्या पायाजवळच्या एका लहान रोपट्यावर जाऊन बसला. त्यांचे तिकडे लक्ष गेले आणि त्याला ते पाहण्यासाठी वाकले.

मला वाटले, "ते पाठमोरे आहेत आणि पतंग पहाण्यात व्यस्त आहेत, त्यामुळे कदाचित मी त्यांच्या लक्षात न येता तेथून बाहेर पडू शकेन."

मी गवतावरुन चालू लागले, जेणेकरून आवाज येऊन मी तिथे असल्याचे त्यांना कळू नये; मिस्टर रॉचेस्टर मी ज्या ठिकाणी होते तेथून एक-दोन यार्डावर, पतंग निरखून पहाण्यात गढलेले दिसत होते. मी विचार केला की त्यांच्या नजरेस न पडता सहज परत जाऊ शकेन. चंद्राच्या प्रकाशात त्यांची सावली बरीच लांबवर पडली होती, मी हळूच ती ओलांडून बाजूला झाले, तेव्हढ्यात ते मागे वळून न पहाता, ते शांतपणे म्हणाले: "जेन, इकडे ये आणि हे काय आहे बघ."

मी आवाज केला नव्हता; त्यांच्या पाठीला तर डोळे नव्हते, त्यांच्या सावलीला तर माझे अस्तित्व जाणवले नसेल? मी मागे वळून आणि त्यांच्यापाशी गेले. "याचे पंख बघ," ते मला म्हणाले; "हा किटक, मला वेस्ट इंडीजच्या कीटकांची आठवण करून देतो. एवढा मोठा आणि सुंदर रंगाचा पतंग इंग्लंडमध्ये दिसणे दुर्मिळ आहे;ओहो! तो बघ उडून गेला."

a

कीटक निघून गेला. मी पण त्याचं अनुकरण करणार होते, मी दारापाशी पोहोचताच रोचेस्टर मला म्हणाले: “परत ये; अशा सुंदर रात्री, घरात राहणे अरसिकपणा असेल आणि जेव्हा मावळतीचा सूर्य उगवत्या चंद्राला मार्ग दाखवतो त्या क्षणी कोणीही झोपू शकत नाही.”

माझी जीभ बऱ्याचदा अशा बोलण्याला उत्तर देण्यास तत्पर असते, परंतु काही काही वेळा ती असमर्थ बनते, तेव्हा बहुधा जेव्हा मी अवघड परिस्थितीतून सुटका करून घेण्यासाठी एखादी वाजवी सबब शोधत असते. त्या क्षणी, मला मिस्टर रोचेस्टरसोबत अंधारलेल्या बागेत फिरण्याची इच्छा नव्हती, परंतु मला निघून जाण्यासाठी सयुक्तिक कारण सापडले नाही. सुटकेसाठी कारण शोधत असताना मी हळू हळू त्यांच्या मागे गेले; पण ते स्वतः इतके शांत आणि गंभीर होते, की मला माझ्या अस्वस्थतेबद्दल ओशाळल्यासारखे झाले. माझ्या मनात संशयाचा किडा वळवळत होता, पण रोचेस्टरचा विवेक जागा होता, ते पूर्णपणे शांत दिसत होते.

आम्ही लॉरेल्सच्या रांगेत प्रवेश केल्यावर, कुंपणाकडेच्या, मोठ्या चेस्टनटच्या झाडाकडे निघालो, ते म्हणाले “जेन, थॉर्नफिल्ड हे उन्हाळ्यात खुपच हवेशीर आणि आनंददायी निवासस्थान आहे, नाही का?”

“होय सर.”

“तुला निसर्ग सौंदर्याची आवड आहे, तुला थॉर्नफिल्डबद्दल आत्मीयता वाटत असेल ना?”

“खरंच सर, मी थॉर्नफिल्डशी जोडली गेले आहे.”

“यातील गुढ जरी, माझ्या लक्षात आलेले नाही तरी तुला त्या छोट्या ॲडेलबद्दल आणि अगदी साध्यासुध्या मिसेस फेअरफॅक्सबद्दलही विशेष प्रेम आहे याची मला चांगलीच कल्पना आहे.”

“होय, सर, त्या दोघींवर माझे प्रेम आहे, ही गोष्ट खरी आहे.'

"त्यांना सोडून जाताना तुला वाईट वाटेल?"

"नक्कीच."

"अरेरे!" असे म्हणून त्यांनी सुस्कारा सोडला आणि थोडे थांबून पुढे म्हणाले, "जीवनात अशा गोष्टी घडतच असतात, जरा कुठे तू एखाद्या आनंददायी ठिकाणी रमलीस आणि नेमक्या त्यावेळी तुला आदेश मिळतो की चला विश्रांती संपली, आता इथून जावे लागेल."

"मला आता जायला लागेल काय सर?" मी विचारले; "मी थॉर्नफिल्ड सोडू का?"

"होय जेन, आता सोडून जाण्याची वेळ आली आहे, असे असे मला वाटते; मी त्याबद्दल दिलगीर आहे, परंतु मला वाटते की ते आवश्यक असेल."

तो एक जबरदस्त धक्का होता; पण मी माझा पराभव होऊ दिला नाही.

"ठीक आहे सर, हुकूम मिळाल्यावर मी तयार असेन मार्चला."

"ती वेळ आता आली आहे; मला आताच तसा हुकूम देणे भाग आहे."

"मग तुम्ही लग्न करणार आहात, सर?"

" अगदी बरोबर, नक्की; नेहमीप्रमाणे तुझा अंदाज बरोबर आहे."

"आणि ते लवकरच होईल का सर?"

"खुप लौकर, त्याचे काय आहे---मिस आयर, जेन तुला आठवत असेल, पहिल्यांदा तुला समजले की माझ्यासारखा घोडनवरा, लौकरच विवाहासारख्या पवित्र बंधनात बध्द होणार आहे होणार आहे आणि माझी नियोजित वधू मिस इंग्राम आहे, तिच्या सौंदर्याने मला पुरते जिंकून घेतले आहे; पण मी काय बोलतो तिकडे तुझे लक्ष कुठे आहे? अजून काही पतंग दिसतात का बघत आहेस? तो एकच होता आणि उडून गेला. मला तुला फक्त आठवण करून द्यायची होती, तू सर्वात अगोदर माझे या गोष्टीकडे लक्ष वेधून घेतलेस, मला तुझा आदर वाटतो, तू दुरदृष्टीने, सारासार

a

विचार करून नम्रपणे मला, तुझ्यावरील जबाबदारी व तुझे या नोकरीवर अवलंबून असणे याची कल्पना दिली होतीस, तर माझा आणि मिस इंग्रामचा विवाह संपन्न झाला तर तुझी आणि अँडेलची, दुसरी व्यवस्था करायला लागेल. या मुळे अप्रत्यक्षपणे, माझ्या होणाऱ्या पत्नीला दोष दिला गेला, पण या विषयी मी आता काही जास्त बोलणार नाही, तू इथून निघून गेल्यावर मी ते विसरून जाण्याचा प्रयत्न करेन. मी फक्त तुझे शहाणपण लक्षात ठेवेन, त्याप्रमाणे मला आता ॲडेलला बोर्डिंग स्कूलमध्ये दाखल करायचे आहे; आणि तू, मिस आयर तुला नवीन नोकरी मिळायला हवी."

"होय, सर, मी ताबडतोब वर्तमानपत्रात जाहिरात देते. दरम्यान, मला वाटतं..." मी पुढे बोलण्याचा विचार केला: "मला वाटते की मला नवीन नोकरी मिळेपर्यंत मी येथे राहू शकेन": पण एवढे मोठे वाक्य बोलण्याचे धाडस मी केले नाही, माझा आवाज धोका देण्याचा संभव होता.

"सुमारे एका महिन्याभरात आमचे लग्न होईल अशी आशा आहे," रॉचेस्टर पुढे म्हणाले; "या दरम्यान मी तुझ्यासाठी रोजगार आणि निवारा शोधण्यासाठी प्रयत्न करेन."

"मी तुमचे आभार मानते सर; मी तुम्हाला त्रास देण्याबद्दल मी दिलगीर आहे"

"छे! त्यात एवढे आभार मानण्याची गरज नाही, तू तुझे काम व्यवस्थित पार पाडले आहेस, ज्यांच्याकडे तू सेवेत होतीस, त्याच्याकडून थोडीफार मदत मागण्याचा तुला अधिकार आहे. माझ्या भावी सासूबाईंच्या माहितीत एक नोकरी आहे, मला वाटते तुला करायला हरकत नसावी. आयर्लंडमधील बेटरनट-लॉजच्या श्रीमती डायोनिसियस ओ'गॉल यांच्या पाच मुलींना शिक्षण देण्यासाठी शिक्षिका

हवी आहे; मला वाटते तुला आयर्लंड आवडेल; तिथले लोक मनाने उदार व प्रेमळ आहेत असे म्हणतात.

"पण सर, खूप दूर आहे."

"त्याने काय फरक पडतो? तुझ्यासारख्या मुलीला आक्षेप घेण्यासारखे काहीच नाही ."

"मला जल प्रवास किंवा जास्त अंतर याची काळजी नाही; पण समुद्र आणि मधला अडथळा..."

"कशा मधील, जेन?

"आयर्लंड, आणि इंग्लंड, आणि थॉर्नफील्ड, आणि…

"आणि काय बर!

"आणि तुम्ही सर!"

मी हे शेवटचे वाक्य जवळजवळ अभावितपणे उच्चारले आणि नकळत अश्रू वाहू लागले; तरीसुद्धा, मी त्यांना ऐकू जाईल म्हणून मी रडले नाही; श्रीमती ओ'गॉलच्या विचारांनी माझे हृदय दु:खाने सुन्न झाले होते, त्याहीपेक्षा जास्त दु:ख नुसत्या या विचाराने, होत होते की, जे रोचेस्टर, आता माझ्या समवेत आहेत, त्यांची आणि माझी ताटातूट होणे हे नियतीने लिहून ठेवले असावे, फेसाळणारा विशाल समुद्र आम्हा दोघांच्या दरम्यान असणार होता; आम्हा दोघांमधील, सामाजिक आणि आर्थिक असमानता आणि रूढी परंपरांची असलेली भक्कम तटबंदी, यांच्यामुळे, माझे ज्यांच्यावर आत्यंतिक प्रेम आहे, ते रोचेस्टर मला कायमचे दुरावले जाणार, ही जाणीवच सर्वात वेदनादायक होती.

"हे ठिकाण खूप दूर आहे," मी पुन्हा म्हणाले.

"नक्कीच; आणि जेव्हा तू आयर्लंडमध्ये असशील तेव्हा मी तुला पुन्हा भेटणार नाही, जेन, हे निश्चित आहे: कारण मला आयर्लंड हा देश फारसा आवडत नाही. आपण मित्र होतो, जेन, नाही का?"

“होय सर.”

“बरं, जेव्हा मित्र ताटातूट होण्याच्या मार्गावर असतात, तेव्हा त्यांना थोडा वेळ एकमेका समवेत घालायला नेहमीच आवडते, ये आपण या प्रवासाबद्दल आपल्या वियोगाविषयी मन मोकळे बोलू या. त्या मोठ्या चेस्टनटच्या झाडाखाली बाकावर बसून शांतपणे बोलू, या पुढे आपल्याला अशी संधी मिळणे कठीण आहे.”

त्यांनी मला बसायला भाग पाडले आणि नंतर बोलू लागले, “येथून आयर्लंडचा प्रवास खूप लांबचा आहे आणि माझ्या छोट्या मैत्रीणीला इतका थकवणारा प्रवास करायला लागणार याचे मला वाईट वाटते; पण जर मला दुसरी चांगली, नोकरी सापडत नाही, तर मी काय करू?... जेन, तू माझ्याशी सहमत आहेस का?”

मी काहीच उत्तर दिले नाही. माझे हृदय भरून आले होते.

ते म्हणाले, “कधीकधी माझ्या मनात तुझ्याबद्दल एक वेगळीच भावना उत्पन्न होते, विशेषत: जेव्हा तू माझ्या जवळ असतेस, जसे की आता, असे वाटते की तू माझ्या हृदयाशी, एका अदृश्य पण मजबूत दोरीने जोडली गेली आहेस, मला भीती वाटते की, आपल्या मध्ये येऊ घातलेला समुद्र आणि जमिनीवरचे दोनशे मैलाचे अंतर एव्हढे ताणले गेले तर ही मजबूत वाटणारी दोरी तुटून जाईल आणि माझे हृदय भंगून जाईल, तुझ्या बाबतीत म्हणायचे तर तू मला विसरून जाशील.”

“कधीच नाही, सर! आणि हे तुम्हाला पण माहीत आहे...”

पुढे चालू हे संभाषण सुरु ठेवणे माझ्यासाठी अशक्य होते.

“जेन, तुला जंगलात बुलबुल पक्षी गाताना ऐकू येत आहे काय ? ऐक!”

मी ऐकत असताना, मला रडू आवरेना, मी हुंदके देऊ लागले, यापुढे मला माझ्या भावना दडपून टाकणे अशक्य होते, माझ्या भावनांचा बांध फुटला, दु:खाने

a

मी नखशिखांत थरथर कापू लागले, “मी या जन्मात थॉर्नफिल्डला यायलाच नको होते,” भावनेच्या भरात माझ्या तोंडून शब्द बाहेर पडले.

“तुला त्याबद्दल पश्चात्ताप होत आहे?” मिस्टर रोचेस्टरने विचारले.

माझ्या मनात दु:ख आणि प्रेम या दोन्ही भावनांचा उद्रेक झाला आणि पुर्णपणे अंतरंग ढवळून निघाले, वर्चस्व मिळवण्यासाठी पुर्ण ताकदीने झगडू लागले: मात करण्यासाठी, जगण्यासाठी, उठण्यासाठी, शेवटी जिंकून घेण्यासाठी; आणि ---होय बोलण्यासाठी सुध्दा.

“थॉर्नफिल्ड सोडताना मला दु:ख होत आहे. मी थॉर्नफिल्डवर प्रेम करते; मला ते आवडते, कारण, काही काळ का होईना, मी इथे परिपूर्ण आणि आनंदी जीवन जगले. इथे माझ्या भावना कोणी पायदळी तुडवल्या नाहीत. मला कोणी भयभीत केले नाही. मला कोणी कमी दर्जाची समजून, उच्च दर्जाच्या तात्विक, बौद्धिक, अर्थपूर्ण चर्चेतून वगळले नाही. मी समोरासमोर माझे मत आदरपूर्वक मांडू शकत होते; मला त्यात आनंद मिळत होता, ---एका अस्सल, उत्साही आणि विशाल मना बरोबर. रोचेस्टर, मी तुम्हाला जाणले आहे, मला तुमच्यापासून कायमचे वेगळे व्हायला हवे या विचाराची मला भीती वाटते आणि दु:ख होत आहे; पण मला आता इथून निघणे गरजेचे आहे, त्यामुळे माझ्या जीवाची घालमेल होत आहे.”

“यात तुला निघून जाण्याची गरज कुठे दिसते?” त्यांनी अचानक विचारले.

“कुठे ? सर, आताच तुम्ही स्वतः मला ते सांगितले नाही का?

“नेमके कसे ?'

“मिस इंग्राम आपली होणारी वाग्दत्त वधू: एक सुंदर आणि थोर घराण्यातील युवती.”

“माझी ! वाग्दत्त वधू कोणती? माझी कोणी वाग्दत्त वधू नाही.”

“पण होऊ शकेल.”

a

"नक्कीच होऊ शकेल," त्यांच्या बोलण्यात निर्धार दिसून येत होता.

"तर मग मी निघून जाणेच योग्य आहे; तसे आपणच मला सांगितले."

"नाही, तुला राहावे लागेल; मी शपथ घेतो, आणि मी माझी शपथ पाळीन!"

"मी तुम्हाला सांगते की मला गेलेच पाहिजे," झटकन माझ्या तोंडून उत्तर गेले, माझ्या मनातील मळमळ बाहेर पडली, "तुम्हाला असे वाटते काय, मी तुमची कोणीही लागत नसतांना मी इथे थांबेन? तुम्ही मला काय समजता, कठपुतळी की भावना नसलेले मशीन? माझ्या तोंडचा घास हिसकावून घेतला असता, मी कसे काय सहन करावे? मी गरीब, साधीसुधी, दिसायला बेताची, अल्लड आहे, म्हणून मला तुम्ही हृदयशून्य अथवा निर्जीव समजला काय? देवाने मला थोडे सौंदर्य आणि थोडी श्रीमंती दिली असती तर, आज तसे मला तुम्हाला सोडून जाताना कठीण वाटत आहे तसे उलटे तुम्हाला मला सोडायला कठीण वाटले असते. मी आता तुमच्याशी प्रथा, परंपरा किंवा या नश्वर देहाच्या माध्यमातून बोलत नाही: - हा माझा आत्मा आहे जो तुमच्या आत्म्याला संबोधित करत आहे;

आपण हे जग सोडून उद्या परमेश्वराच्या दरबारात गेलो, तर देवाच्या पायाशी आपण एकसारखे असू ,---समान, जसे आपण आहोत."

"होय, समान, जसे आपण आहोत," मिस्टर रोचेस्टरने पुनरावृत्ती केली; मग त्यांनी मला मिठीत घेतले आणि हलकेच आपले ओठ माझ्या ओठावर ठेकवले: "आणि, देवाच्या पायाशी आपण एकसारखे असू ,---समान, जसे आपण आहोत."

"होय सर," मी उत्तर दिले. आणि तरीही नाही बराच फरक पण आहे; कारण तुम्ही विवाहित पुरुष आहात, किंवा किमान लग्न करणार आहात, आणि तेही जिच्याशी, जी तुमच्या बरोबरीची नाही, जिच्याबद्दल तुम्हाला सहानुभूती नाही, जिच्यावर तुम्ही खरोखर प्रेम करत नाही, कारण मी तुम्हाला, तिचा उपहास करताना

ऐकले आहे! अशा लग्नबंधनाला मी तुच्छ मानते, मी तुमच्यापेक्षा जास्त चांगली आहे. मला जाऊ द्या."

"कुठे, जेन? आयर्लंडसाठी?"

"होय, आयर्लंडसाठी; मी स्वतः स्वतःची मालक आहे, आता मी कुठेही जाऊ शकते."

"जेन, शांत राहा; जंगली पक्षी पिंजऱ्यात अडकल्यावर, निराशेने स्वतःची पिसे उपटून टाकतो तसा संघर्ष करू नको."

"मी पक्षी नाही, आणि मी जाळ्यातही सापडणार नाही; मी स्वतंत्र इच्छा असणारी मुक्त माणूस आहे आणि तीच इच्छा, मी तुम्हाला सोडण्यासाठी वापरत आहे."

त्यांच्यापासून स्वतःला सोडवून घेऊन मी त्यांच्या समोर उभी राहिले.

"तुझ्या भविष्याचा निर्णय तू स्वत:च घेणार आहेस," ते मला म्हणाले.

"मी तुझा हात मागत आहे, माझे सर्वस्व तुझ्या चरणी अर्पण करायला तयार आहे."

"तुम्ही विनोदी नाटक करत आहात, त्यावर मला हसू येत आहे."

"मी तुझी जीवनभरासाठी साथ मागत आहे, माझी अर्धांगिनी, माझी सहचारिणी होण्यासाठी मी तुला विचारत आहे."

"तुम्ही तुमची निवड आधीच केली आहे आणि तुम्ही त्यालाच चिकटून राहावे."

"जेन, शांत हो; तू खूप रागावलेली आहेस. मी पण काही क्षण शांत बसेन."

चेस्टनटच्या झाडाच्या फांद्यांमध्ये वाऱ्यामुळे शीळ घुमत होती. हळूहळू ती विरली. अजून बुलबुल गात होता. त्यांचे बोलणे ऐकून मला रडू फुटले.

मिस्टर रोचेस्टर शांतपणे बसले. ते गंभीर पण सौम्य नजरेने माझ्याकडे पहात होते; ते काही काळ गप्प राहिले; शेवटी ते मला म्हणाले:

a

“माझ्या बाजूला ये, जेन; आपण एकमेकांना समजावण्याचा आणि समजून घेण्याचा प्रयत्न करूया.”

“मी पुन्हा कधी तुमच्या शेजारी बसणार नाही; मी पुर्णपणे विदीर्ण झाले आहे, मी आता परत येणार नाही.”

“पण, जेन, मी तुला माझी बायको म्हणून बोलावत आहे; ती तुच होतीस जिच्याबरोबर मला लग्न करायचे आहे.”

मी गप्प राहिले; मला वाटले की ते माझी चेष्टा करत आहेत.

“ये, जेन, इकडे ये.”

“तुमची वाग्दत्त वधू आपल्या दोघांमध्ये आहे.”

ते उठले आणि माझ्याकडे आले.

“माझी वाग्दत्त वधू ही इथे आहे,” असे म्हणून त्यांनी मला जवळ ओढले, “माझ्या बरोबरीची आणि माझ्यासारखी, माझी सहचारिणी इथे आहे. जेन, तू माझ्याशी लग्न करशील का?”

मी त्यांना उत्तर दिले नाही आणि त्याच्यापासून सुटण्याचा पुन्हा प्रयत्न केला, कारण माझा त्यांच्यावर विश्वास नव्हता.

“तुला माझ्यावर शंका आहे, जेन?”

“होय, मला तुमची खात्री वाटत नाही.”

“तुझा माझ्यावर विश्वास नाही?”

“अजिबात नाही.”

“तुझ्या नजरेत मी खोटारडा आहे काय?” त्यांनी उत्कटतेने विचारले; “थोडा संशयी असू शकेन, पण नंतर तुझी खात्री होईल. माझे मिस इंग्रामवर प्रेम आहे का? नाही; आणि तुला ते माहित आहे. तिचं माझ्यावर प्रेम आहे का? नाही; माझ्याकडे त्याचे पुरावे आहेत. जितक्या संपत्तीचा मी मालक आहे, यासंदर्भात लोकांचे काही

a

अंदाज आहेत, त्यापैकी एक तृतीयांश सुध्दा आता माझ्या मालकीची नाही, अशी अफवा मी पसरवली आणि ही अफवा तिच्यापर्यंत पोहोचेल अशा पद्धतीने मी बातमी पेरली; मग माझ्या प्रयत्नांचे परिणाम पाहण्यासाठी मी स्वतः तिच्या वाड्यात गेलो: तिने आणि तिच्या आईने माझे अतिशय थंडपणे स्वागत केले; मी मिस इंग्रामशी लग्न करणार नाही, करूच शकत नाही. तू एकटीच या जगात अनोखी व्यक्ती आहेस, जिच्यावर माझे, जीवापाड प्रेम आहे; गरीब, साधीसुधी, दिसायला बेताची, अल्लड अशी तू, तुला मी विनवणी करतो की, तुझा पती म्हणून माझा स्वीकार कर.''

''काय? मी?'' मी उद्गगारले,'' त्यांच्या स्वरातले गांभीर्य, कोणत्याही शिष्टाचाराची तमा न बाळगता केलेले बोलणे ऐकून, मला त्यांच्या प्रामाणिकपणावर विश्र्वास वाटू लागला, ''माझा या जगात, कोणीही मित्र नाही जर, तुम्ही माझे मित्र असाल: मी पैशाची गोष्ट करत नाही पण मित्र म्हणून तुम्ही मला काय दिले आहे?''

''तू, जेन; मला, तू पुर्णपणे माझी व्हायला हवी आहेस, तू माझी होशील का? मला पटकन होकार देऊन टाक.''

''मिस्टर रोचेस्टर, चंद्राकडे वळा आणि मला तुमचा चेहरा पाहू द्या.''

''कशासाठी ?''

''कारण मला तुमच्या चेहरा, वाचायचा आहेत; वळा पाहू''

''तुला माझा चेहऱ्यावर सुवाच्य अक्षरात लिहलेले असे काही नाही, खाडाखोड केलेला, चोळामोळा झालेला माझा चेहरा आहे, वाच ; पण घाई कर कारण मला त्रास होत आहे.''

त्यांच्या चेहऱ्यावर व्यग्रता दिसत होती आणि भावनांचा उद्रेक स्पष्टपणे दिसून येत होता; एखाद्या प्रश्नाची उकल करण्याचे काम सुरू असावे असे दिसून येत होते, डोळयात वेगळीच चमक होती.

"अरे! जेन," ते मोठ्याने म्हणाले, "तू माझा छळ चालवला आहेस, तुझ्या शोधक नजरेत जरी विश्र्वास आणि औदार्य दिसत आहे तरी तू मला छळत आहेस."

"आणि का, जर तुम्ही म्हणता ते खरे असेल, जर तुमची लग्नाची मागणी खरी असेल तर, तुम्हाला चांगले माहीत आहे की मला तुमच्याबद्दल फक्त कृतज्ञता आणि भक्तीची भावना आहे; यात छळ असा काय आहे?"

"कृतज्ञता!" ते चिडलेल्या स्वरात म्हणाला: "जेन, मला लवकर स्वीकार हवा आहे. म्हण, एडवर्ड--- माझे नांव घेऊन सांग---एडवर्ड मी लग्नाला तयार आहे."

"तुम्ही खरोखरच गंभीरपणे बोलत आहेत का? तुमचे माझ्यावर खरे प्रेम आहे आणि मी तुमची पत्नी व्हावे अशी मनापासून इच्छा आहे का?"

"होय, तुझे समाधान करण्यासाठी शपथ घ्यायला हवी असेल तर, मी शपथ घेतो!"

"मग, सर, मी तुमच्याशी लग्न करेन."

"बाईसाहेब मला एडवर्ड म्हणा."

"प्रिय एडवर्ड!"

"अशी जवळ ये; पुर्णपणे माझ्याकडे," मग ते कानात बोलले, माझ्या गालाला त्यांच्या गालाचा स्पर्श झाला: "राणी मला आनंदी कर, मी तुला सुखात ठेवेन." देवा तुझी कृपा अशीच असू दे. परत कानात कुजबुजले, "इतर कोणाही तरुणांनी आमच्या मध्ये येऊ नये. ही माझी आहे, आणि माझीच राहील."

"इतर कोणा तरुणांनी दखल देण्याची गरजच नाही, कारण अशी कोणतीही व्यक्ती नाही आहे. आणि सर माझे नातेवाईक नसल्याने, तुम्हाला कोणाचाही विरोध असणार नाही."

"हीच सर्वोत्तम गोष्ट आहे," ते म्हणाले.

a

माझे त्यांच्यावरचे प्रेम, जर का कमी असते, तर मला त्याच्या बोलण्याचा ढंग, त्यांची नजर, त्यांना झालेला अत्यानंद, शिष्टाचारांशी विसंगत वाटला असता. पण, संभाव्य वियोगाचे संकट टळले गेले असतांना, स्वर्गसुखाचा प्रस्ताव आणि सोबत बसून बोलण्याची संधी, यामुळे वाळवंटात भटकणाऱ्या तृषार्त प्रवाश्याला पाण्याचा झरा सापडावा, तशी मी आनंदीत झाले. मि. रोचेस्टरनी मला परत परत विचारत होते की मी आनंदी आहे काय? आणि 'होय' हेच माझे उत्तर होते. ते हळूच कानात कुजबुजले, “याची भरपाई केली जाईल, नक्कीच भरपाई केली जाईल. मला ती एकाकी, उदास, त्रासलेली दिसली, मी तिचे रक्षण करून, तिला हृदयात जतन करून, तिला समाधान देऊ शकणार नाही काय? माझ्या हृदयात प्रेम आणि माझ्या निर्णयावर माझी निष्ठा नाही आहे काय? देवाच्या दरबारात नक्कीच ते क्षम्य असेल, मी काय करत आहे ते परमेश्वर जाणतो, जगाच्या न्याय मी मानत नाही, लोकांची मतांची मला पर्वा नाही.”

रात्र नुकतीच पडली होती; चंद्र अजून उगवला नव्हता आणि आम्ही दोघे अंधारात होतो. मी रोचेस्टरच्या कितीही जवळ असले तरी मला त्याचा चेहरा क्वचितच दिसत होता; वारा लॉरेल्सच्या झाडामधून घोंघावत होता, चेस्टनटच्या झाडाच्या फांद्यां वाऱ्याच्या झोताने जोरात हालू लागल्या.

“आपण परत जावे,” मि. रोचेस्टर मला म्हणाले, “हवामान बदलणार आहे; नाहीतर मी सकाळपर्यंत तुझ्याबरोबर राहिलो असतो, जेन.”

“आणि मी सुध्दा,” हे उत्तर मी देण्याच्या बेतात होते तोच, वीज चमकली, लखलखीत प्रकाशात भरून आलेल्या आभाळाचे क्षणार्धात दर्शन झाले आणि कडकड असा आवाज करत प्रकाशाचा लोळ आमच्या जवळपास कोसळल्याचे जाणवले. मी भीतीने घाबरून डोळे मिटून घेतले आणि रोचेस्टरांच्या खांद्यावर डोके टेकले.पाऊस जोरात कोसळू लागला होता; आम्ही चटकन रस्ता, शेतं ओलांडली

a

आणि घरात प्रवेश केला; पण जेव्हा आम्ही पायऱ्यांवर पोहोचलो तेव्हा आमच्या कपड्यांवरून पाणी वाहत होते. मिस्टर रोचेस्टरनी माझी शाल काढली आणि त्यातून वाहणारे पाणी झटकले. मी केस झटकत होते, त्यावेळी मिसेस फेअरफँक्स त्यांच्या खोलीतून बाहेर आल्या पण आम्हा दोघांच्या ते लक्षात आले नाही. दिवा पेटवला तेव्हा घड्याळात बाराचे ठोके पडत होते.

रोचेस्टर मला म्हणाले, "लवकर कपडे बदल, गुड नाईट डार्लिंग!" असे म्हणून अनेक वेळा चुंबन घेतले. ते त्यांच्या खोलीत जाण्यासाठी वळणार, त्यावेळी मी आजूबाजूला पाहिले आणि मला आश्चर्यचकीत झालेल्या मिसेस फेअरफँक्स दिसल्या. त्यांच्या चेहऱ्यावर गंभीर भाव होते. मी मनाशीच हसले आणि पायऱ्यांकडे निघाले, "लवकरच सर्व काही स्पष्ट करता येईल," मी विचार केला. मात्र, जेव्हा मी माझ्या खोलीत पोहोचले, तेव्हा त्यांनी पाहिलेल्या गोष्टींमुळे, त्यांचा गैरसमज झाला असेल, या विचाराने मला वाईट वाटले; परंतु, थोड्या वेळाने, आनंदाने इतर सर्व भावना पुसून टाकल्या; जोरदार वारा, ढगांचा गडगडाट आणि कडाडणाऱ्या विजांचा लखलखाट पाऊस जवळजवळ दोन तास कोसळत होता पण मला भीती वाटत नव्हती, मी जागीच होते. मी घाबरून तर गेले नाही ना हे विचारण्यासाठी मि. रोचेस्टर दारावर ठकठक करून तीन वेळा विचारून गेले, तेव्हढी गोष्ट मला धीर देण्यासाठी पुरेशी होती.

दुसऱ्या दिवशी सकाळी, मी उठण्यापूर्वी, छोटी अॅडेल मला सांगण्यासाठी माझ्या खोलीत धावत आली की बागेच्या शेवटी असलेले चेस्टनटच्या मोठ्या झाडावर वीज पडली आणि अर्धेअधिक नष्ट झाले.

# प्रकरण 24

सकाळी उठल्यावर मनात पहिला विचार आला काल रात्री जे घडले ते स्वप्न होते का सत्य? जेव्हा रोचेस्टरना पुन्हा पाहीले आणि त्यांच्याकडून माझ्यावरच्या प्रेमाचा आणि दिलेल्या वचनांचा पुनरुच्चार ऐकला, तेव्हा माझी खात्री पटली.

स्वतः जेव्हा आरशात पाहिले, तेव्हा माझी मलाच ओळख पटली नाही. माझा चेहरा आशेने फुललेला होता. डोळे आनंदाने लकलकत होते. ओठावर हलके हसू रेंगाळले होते. देहबोलीत एक प्रकारची सहजता जाणवत होती. यापूर्वी मला रोचेस्टरना पाहताना मनातून एक भीती वाटत असे की माझा चेहरा त्यांना सुंदर वाटणार नाही पण आज त्यांनी दिलेल्या प्रेमाच्या कबुलीने मनातील सर्व किल्मिश धुवून गेले. आज त्यांच्याकडे पहातांना मला प्रसन्न वाटत होते. मी स्वच्छ फिक्या रंगाचे उन्हाळी कपडे परिधान केले, मला इतके चांगले कपडे कधी घातलेच नाहीत असे वाटले, खरचं, इतक्या आनंदाने मी कधी कपडे वापरले नव्हते.

मी खाली हॉल मध्ये गेले. बाहेर रात्रीच्या वादळाचा मागमूसही दिसत नव्हता. प्रसन्न सकाळ होती, उघड्या दारातून थंड ताजी हवा आत येत होती, तिची शीतलता मी अनुभवली. निसर्ग पण माझ्या आनंदात सामील झाला होता. दारावर एक गरीब बाई, तिच्या अशक्त लहान मुलाला घेऊन भीक मागायला आली होती. तिची दया येऊन मी माझ्या पर्समध्ये असलेले तीन-चार शिलिंग देऊन टाकले. मला त्यांना आनंदी पाहायचे होते. पक्षी गात होते: पण माझ्या हृदयातील संगीतापेक्षा आनंदी संगीत, दुसरे कोणतेच नव्हते.

मिसेस फेअरफँक्स, मला खिडकीच्या बाहेर पहात असताना पाहून आश्चर्यचकीत झाल्या. गंभीरपणे त्यांनी मला बेक्रफास्टसाठी येणार काय, असे विचारले.

ब्रेकफास्ट करतांना त्या शांत आणि विचार करत असल्याचे दिसत होते. आमचे फारसे बोलणे झाले नाही. त्यांना कालच्या गोष्टींविषयी अंधारात ठेवणे मला चुकीचे वाटत होते पण मि. रोचेस्टरनी, स्वतः त्यांच्याकडे खुलासा करेपर्यंत मी बोलणे योग्य नव्हते. घाईघाईने मी ब्रेकफास्ट केला आणि तेथून बाहेर पडले. जिन्यावरून जाताना अँडेल, शाळेच्या खोलीतून बाहेर पडताना दिसली.

"तू कुठे जात आहेस? आता अभ्यासाची वेळ झाली आहे," मी तिला विचारले.

"मिस्टर रोचेस्टरनी मला नर्सरीत जाण्यास सांगितले."

"ते कोठे आहेत ?

तिने खोलीकडे बोट दाखवले, मी खोलीत गेले ते तिथे उभे होते, "ये आणि मला गुड मॉर्निंग म्हण," मी आनंदाने पुढे गेले, त्यांनी मला मिठीत घेऊन, चुंबन घेतले. मला यात काही वावगे वाटले नाही, त्यांची प्रेम करण्याची पद्धत मला मोहक वाटली.

"जेन, तू टवटवीत, हसरी आणि सुंदर दिसत आहेस," ते म्हणाले, "खरोखरच आज वेगळीच दिसत आहेस. हीच का माझ्या ओळखीची गोड गुलाबी परी आहे? गालावर खळी, गुलाबी ओठ, पिंगट केस आणि चमचमणारे पिंगट डोळे!"

खरे तर माझे डोळे हिरवे आहेत, पण त्यांच्या नजरेत ते पिंगट दिसले असावेत.

"होय, सर, ही तीच जेन आयर आहे."

a

“आणि लवकरच जेन रोचेस्टर होईल,” ते म्हणाले; फक्त चार आठवडे, जेन, त्यापेक्षा एकही दिवस जास्त नाही, तुला ऐकू येत आहे का?”

खरचं मला काही समजत नव्हते, मी गोंधळून गेले होते. एकदम गरगरल्यासारखे वाटले, त्यांचे बोलणे ऐकून, आनंद वाटण्यापेक्षा कुणीतरी एखादा जोरदार प्रहार केल्यासारखे वाटले आणि मी स्तब्ध झाले. मला वाटते मी घाबरून गेले होते.

“तू पांढरीफटक पडली आहेस, जेन काय झाले?”

“कारण तुम्ही मला जेन रोचेस्टर म्हणालात आणि ते मला विचित्र वाटतं.”

“होय, तरुण मिसेस रोचेस्टर, फेअरफॅक्स रोचेस्टरची बालीका वधू.”

“हे कधीच होऊ शकत नाही, सर: मला ते शक्य वाटत नाही. मानवाला या जगात कधीही पूर्ण आनंद मिळत नाही. मी माझ्यासारख्या इतर अनाथ मुलींपेक्षा वेगळे नशीब घेऊन मी जन्माला आलेली नाही. माझ्या बाबतीत हे घडत आहे यावर विश्र्वास ठेवणे अशक्य आहे-ही एक परीकथा किंवा दिवास्वप्न असू शकते.”

“आणि मी ते खरे करु शकतो आणि ते करणार आहे. आज सकाळी मी लंडनमधील माझ्या बँकरला पत्र लिहून त्यांच्याकडे असलेले काही दागिने मला पाठवण्यास सांगितले; ते नेहमी आमच्या घराण्यातील स्त्रियांच्या वापरात असत; एक-दोन दिवसांत, मी ते तुझ्या हातात ठेवू शकेन अशी आशा आहे: मला तुला प्रत्येक विशेषाधिकार, सन्मान बहाल करायचा आहे, एखाद्या सरदारकन्याशी माझा विवाह संपन्न होत आहे असे भासले पाहिजे.”

“बापरे! सर, दागिन्यांचा विचार करू नका, मला त्याबद्दल ऐकायला आवडत नाही; जेन आयरसाठी दागिने! हे देखील मला विचित्र आणि कृत्रिम वाटते; मी कोणतेही दागिने नसणे पसंत करेन.”

a

“मला स्वत: तुझ्या गळयात हिऱ्याची साखळी घालायची आहे आणि तुझ्या डोक्यावर सोन्याचा मुकुट ठेवायचा आहे: कारण तो आपल्या कुलीन घराण्याचा बहुमान आहे. मला या नाजूक मनगटात बांगड्या आणि या पाची बोटात, हिऱ्या माणकांच्या अंगठ्या घालायच्या आहेत.”

“नाही, सर नाही, काहीतरी वेगळा विचार करा; अशा प्रकारे माझ्याशी बोलू नका, आणि विशेषत मी सुंदर आहे असे मला संबोधू नका; मी एक साधीसुधी गव्हर्नेस आहे.”

“तू माझ्या नजरेत सुंदर आहेस; तूच माझी हृदयसुंदरी आहेस-- नाजुक, चपळ.”

“म्हणजेच अशक्त आणि अस्थिर, सर, एकतर तुम्ही स्वप्न पहात आहात किंवा माझा उपहास करत आहात, कृपा करून उपरोधिक बोलू नका.”

“मी जगालासुध्दा तुझा सौंदर्यवती म्हणून स्वीकार करायला भाग पाडीन,” त्यांच्या बोलण्यात एक प्रकारचा मानसिक ताण जाणवत होता, ते पाहून मी अस्वस्थ झाले, मला वाटले ते आत्मवंचना करत असावेत अथवा माझी खोटी समजूत घ्यालण्याचा प्रयत्न करत असावेत. ते पुढे म्हणाले,” मी माझ्या जेनसाठी उंची रेशमी आणि सँटिनचे पोशाख आणेन, तिच्या केसात सुंदर गुलाब असतील, अमुल्य असा जाळीदार पडदा तिच्या डोक्यावर असेल.”

“तर तुम्ही मला ओळखू शकणार नाही, सर; मी यापुढे तुमची जेन आयर उरणार नाही, तर विदुषकाच्या वेशातील माकड किंवा मोराचा पिसारा उधार घेतलेली लांडोर दिसेन. सर जरी मी तुमच्यावर नितांत प्रेम करत असले तरी, तुमची खुशामत करण्यासाठी मी तुम्हाला देखणे म्हणणार नाही, तुम्हीसुद्धा माझी खोटी स्तुती करु नका.”

माझ्या नापसंतीकडे दुर्लक्ष करून ते पुढे बोलतच राहिले, “आजच आपण दोघे मिलकोटला जाऊन तुझ्यासाठी कपडे खरेदी करू. मी तुला सांगितले होते की आपले चार आठवड्यात लग्न होणार आहे. लग्न शांतपणे जवळ असलेल्या चर्चमध्ये होणार आहे; आणि मग मी तुला लगेच गावात नेईन. तेथे थोडा वेळ राहिल्यानंतर, आपण फ्रान्स आणि इटलीला जाऊ. तेथील सर्व प्रसिद्ध स्थळे आपण पाहू. तुला मोठ्या शहरात रहायचा अनुभव मिळेल, इतर स्त्रीयांना पाहून, तुलना करून तुला स्वतःचे मूल्य समजेल.”

“सर, आपण प्रवासाला जायचे?”

“होय, आपण पॅरिस, रोम, नेपल्स, फ्लॉरेन्स, व्हेनिस, व्हिएन्ना येथे थोडे दिवस घालवणार आहोत; मी प्रवास केलेले सर्व देश तुझ्याबरोबर मला परत एकदा पहायचे आहेत. दहा वर्षे मी माझ्यासोबत तिरस्कार, द्वेष, क्रोध घेऊन वेड्यासारखा युरोप फिरलो. आता त्या सर्वांचा त्याग करून शुध्द अंत:करणाने सोबतीला दया, क्षमा आणि प्रिती घेऊन पुर्वी पाहिलेल्या सर्व ठिकाणी माझ्या देवदूताबरोबर भेट देईन.”

त्याचं असं बोलणं ऐकून मला हसू आलं.

“मी देवदूत नाही,” मी ठासून सांगितले, “आणि मी जिवंत असेपर्यंत होऊ शकणार नाही; मी फक्त मीच असेन. तुम्हाला, माझ्यामध्ये दैवी, स्वर्गीय असे काही सापडणार नाही, मलासुध्दा आपल्या कडून तसे मिळण्याची शक्यता नाही आणि माझी तशी अपेक्षाही नाही.”

“तुला, माझ्याकडून काय मिळेल अशी अपेक्षा आहे?”

“तुमची ही मनधरणी हे प्रियाराधन फार काळ असणार नाही. एकदा का लग्न झाले की तुम्ही गंभीर व्हाल मग थोडे लहरी, नंतर मूळ स्वभाव जागा होईल, कठोर, दुराग्रही, मला तुम्हाला प्रसन्न करायला खूप त्रास होईल. जेव्हा तुम्हाला माझे वागणे

a

सवयीचे होऊन जाईल तेव्हा तुम्हाला माझी आवड उत्पन्न होईल. नीट ऐका, मी आवड म्हणत आहे, प्रेम असे मी म्हटलेले नाही. चार सहा महिन्यात तुमचा हा प्रेमाचा बहर ओसरेल.पुरुष लेखकांच्या कथा कादंबरीत, पत्नी विषयी प्रेमाचा उत्साह इतपतच टिकतो असे वाचले आहे. तरीही, शेवटी, एक मित्र आणि सहचर म्हणून, मला आशा आहे की मी आपल्याला कधीच अप्रिय वाटणार नाही."

"अप्रिय! परत आवड! मला वाटते तू मला आवडशील, पुन्हा पुन्हा नव्याने आवडायला लागशील, मी कबूल करतो की मी, तू मला फक्त आवडतेस असे नसून, मी तुझ्यावर प्रेम करतो, खरेखुरे प्रेम, उत्कट आणि दृढ."

"तरीही तुम्ही लहरी नाही आहात का सर?"

"काही स्त्रिया केवळ त्यांच्या सौंदर्याने मला संतुष्ट करतात पण जेव्हा त्यांच्या दृष्टीकोनातील फोलपणा, मनाचा क्षुद्रपणा, बुद्धीचे जडत्व, असभ्य वागणूक, आणि वाईट स्वभाव माझ्या निदर्शनास येतो, तेव्हा त्यांच्याकडे मन किंवा हृदय यापैकी काही अस्तित्वात नाही याची जाणीव होते आणि मी संतापाने वेडा होऊन जातो. पण ज्या स्त्रियांपाशी, स्वच्छ नजर, प्रभावी वक्तृत्व, प्रखर व्यक्तिमत्व आणि असे चारित्र्य की जे प्रसंगी वाकू शकते पण मोडणार नाही. एकाच वेळी लवचिक आणि स्थिर, आज्ञाधारक आणि सुसंगत दिसून येते, त्यांच्यासाठी मी नेहमीच हळवा आणि अस्सल माणूस असणार आहे."

"सर तुम्ही कधी असा स्वभाव अनुभवला आहे का? तुम्ही कधी अशा स्त्रीवर प्रेम केले आहे का?"

"मी आता तिच्यावर प्रेम करतो."

"मी माझ्या अगोदर कोणी स्त्री होती काय विचारत आहे आणि जरी मी असले तरी खरच, कोणत्याही बाबतीत त्या अवघड मानकापर्यंत पोहोचणे मला शक्य आहे?"

“जेन, तुझ्यासारखी कोणीही स्त्री मला भेटली नाही; तू मला संतुष्ट करतेस आणि तू माझ्यावर वर्चस्वही गाजवतेस; तुझे शालीनतेने स्वतःला सादर करणे मला आवडते. तुझा मऊ रेशमी स्पर्श, थेट माझ्या हृदयात आनंदाची कंपने निर्माण करतो. तू मला प्रभावित केले आहेस, मला जिंकून घेतले आहेस, तुझा प्रभाव इतका सुमधुर आहे की मला व्यक्त करणे शक्य नाही. तू माझ्यावर चेटुक केले आहेस. तू का हसत आहेस, जेन? तुझ्या चेहऱ्यावर जे विलक्षण भाव दिसत आहेत, त्यामागील गुढ काय आहे?”

“मी विचार करत होते, सर, माफ करा, मी हर्क्युलस आणि सॅमसन यांचा विचार करत होते.”

“माझ्या प्रिये ...”

“सर शांतपणे ऐकून घ्या, आपण आता हे, जे वागत बोलत आहात ते, हर्क्युलस किंवा सँमसन यांच्यासारखे. प्रियकराने प्रेयसीशी बोलण्यासारखे आहे. ज्या हळुवारपणे ते, त्यांच्या प्रेयसी बरोबर लग्नाआधी वागत होते, त्या वागण्याला, लग्नानंतर नक्कीच छेद गेला असणार.

“मला हे जाणून घ्यायचे आहे की एका वर्षाने मी तुमच्याकडे, तुम्हाला न आवडणारी किंवा तुमच्या गैरसोयीची मागणी केली, तर तुमचा काय प्रतिसाद असेल?”

“जेन, आताच मला काहीतरी विचार, निदान एखादी तरी गोष्ट, माझी तुझ्याकडे विनंती आहे.”

“सर, माझा अर्ज तयार आहे.”

“बोल, पण तू ज्या तऱ्हेने माझ्याकडे हसून बघत आहेस, तर मला मागणी ऐकण्यापुर्वीच पुर्तता करण्याचे वचन देणे भाग पडेल आणि मागाहून मला त्याचा पश्चाताप करावा लागेल.”

“अजिबात पश्चाताप करावा लागणार नाही सर; मला तुम्हाला फक्त इतकेच सांगायचे आहे: तुमचे दागिने मागवून घेऊ नका आणि माझ्यावर गुलाबांचा मुकुट घालू नका: तसे तर तुम्ही तुमच्या खिशातील रूमाल सोन्याच्या लेसने सजवू शकता, पण मला आवड नाही.”

“थोडक्यात, ‘मी स्वतः शंभर नंबरी सोने आहे', त्याची मला कल्पना आहे, या वेळेपुरती तुझी विनंती मान्य आहे. तसे मी बँकरला कळवतो. पण तू अजून काही मागितले नाहीस; तुझी इच्छा काय ते सांग, पुन्हा एकदा प्रयत्न कर.”

“बरं, सर, मला एका गोष्टीबद्दल कुतूहल वाटत आहे, कृपया आपण खुलासा केल्यास उपकार होतील.”

ते थोडे त्रासल्यासारखे वाटले.

“कसे, कसे?” त्यांनी पटकन विचारले; याचिकाकर्तीचे कुतूहल धोकादायक बाब असू शकते; सुदैवाने मी तुझी प्रत्येक इच्छा पुरवेन, शपथ घेतली नाही.”

“मला उत्तर देण्यात कोणताही धोका नाही, सर.”

“बोल, जेन बोल ; परंतु या साध्या चौकशीमागे, ज्याच्याशी कदाचित एक रहस्य जोडलेले असू शकेल, त्याऐवजी, तू माझी अर्धी संपत्ती मागितलीस तरी मी द्यायला तयार आहे.”

“आपण जणू किंग अहाझुओरस आहात, तुमची अर्धी संपत्ती घेऊन मी काय करू? तुम्ही मला काय जमीन, संपत्ती साठी हपापलेला ज्यू सावकार समजलात? तुम्ही माझ्यावर मनापासून प्रेम करत आहात, तर तुमच्या विश्र्वासाला मी अपात्र ठरणार नाही.”

“जेन, माझे कोणतेही रहस्य जाणून घेण्यासाठी तुझे स्वागत आहे जे तुझ्यासाठी योग्य असेल; पण कृपा करून, अनावश्यक ओझे वाढवू नको; तुझे ओठ

विषाच्या प्याल्याला लावू नकोस आणि मला खूप कठोर परीक्षा द्यायला लावू नकोस.”

“का नको, सर? तुम्ही मला नुकतेच सांगितले आहे की तुम्हाला माझ्याकडून, पराभूत व्हायला आवडते आणि तुम्हाला गोड मनधरणी करायला खूप छान वाटते. तुमच्या या कबुलीजबाचा मी लाभ करून घेणे, हे सहाजिकच नाही काय? त्यासाठी मला लाडीगोडी, आर्जवे, विनंती, फुरंगुटणे अगदी चिडणे, रडणे सर्व अजमावून बघायला हरकत नसावी, असे तुम्हाला वाटत नाही काय?”

“तर मग मी तुझ्या अशा परीक्षेला आव्हान देतो; मर्यादाभंग झाल्यास, माझे उत्तर तयार असेल आणि मग खेळ खलास होईल.”

“मग, सर, तुम्ही सहज हार मानता. पण तुम्ही खूपच कठोर दिसत आहात! उंचावलेल्या भुवया, कपाळावर आठ्यांचे जाळे, चेहऱ्यावर त्रासीक भाव, लग्न झाल्यावर तुम्ही असेच दिसाल, सर, असे मी समजू काय?”

“आणि तू लग्नानंतर कशी दिसशील माहीत आहे? रंग बदलणाऱ्या सरड्यासारखी किंवा मायावी रूप धारण करणाऱ्या चेटकीणीसारखी. आपले लग्न काही जास्त दिवस टिकणे अशक्य आहे, कारण ख्रिश्चन धर्माप्रमाणे अशी जोड अमान्य आहे. बरे ते राहू दे, पण तुला काय विचारायचे आहे?”

“बघा, आता तुम्ही शिष्टाचाराला सोडून वागत आहात मी खुशामत करण्यापेक्षा कठोरपणाला प्राधान्य देते; मला देवदूता होण्यापेक्षा हाडामांसाची व्यक्ती होणे जास्त पसंत आहे. मला तुम्हाला हे विचारायचे होते,-- तुम्हाला, मिस इंग्राम बरोबर लग्न करायचे आहे, या गोष्टीवर माझा विश्र्वास बसावा म्हणून एव्हढे कष्ट घेण्यामागे, काय कारण होते?”

“हात्तीच्या! एवढंच ? देवाची कृपाच म्हणायची! फारशी काही गंभीर गोष्ट नाही. उंचावलेल्या भुवया पुर्ववत झाल्या, कपाळावरचे आठ्यांचे जाळे लोप पावले,

a

हसत हसत खाली बघून त्यांनी, माझ्या डोक्यावरून हात फिरवला, जणू काही एखादी मोठी आपदा टळली असावी, ते म्हणाले, “जेन मी तुझ्यासमोर माझी कबुली देऊ शकतो, जर मी तुला राग येण्यास कारणीभूत झालो असलो तरी, जेव्हा तू रागावतेस तेव्हा, धगधगत्या आगीसारखी दाहक असतेस.

“काल रात्री चंद्रप्रकाशात, तू आवेशाने भारली होतीस जेव्हा, नियतीच्या विरोधात बंड पुकारलेस आणि स्वत:ला माझ्या बरोबरीचे घोषित केलेस: इतके नाही तर तू स्वतः हून मला प्रस्ताव दिलास.”

“नि: संशय; “पण कृपया, मी तुम्हाला मिस इंग्रामबद्दल विचारलेला प्रश्नाचे उत्तर द्या, सर.”

“बरं! मी मिस इंग्रामच्या खोटे खोटे प्रेमात असल्याचा बहाणा केला, कारण मी जसे तुझ्यावर वेड्यासारखा प्रेम करतो तसेच प्रेम तू, माझ्यावर करण्यासाठी मला तुला भाग पाडायचे होते, तुझा मत्सर जागृत करण्यासाठी, मिस इंग्रामशी प्रेमाचे नाटक करणे भाग होते.”

“उत्कृष्ट! अश्या प्रकारे तुम्ही स्वतःला खुजे बनवलेत. अशा प्रकारे वागणे ही एक ज्वलंत, लाजिरवाणी आणि निंदनीय बदनामी होती. तुम्हाला मिस इंग्रामच्या भावनांबद्दल काहीच वाटले नाही का सर?”

“तिच्यापाशी फक्त एकच भावना आहे आणि ती म्हणजे अभिमान; त्याबरोबर नम्रता हवी. जेन, तुला तिचा हेवा वाटला का?”

“मला काही फरक पडत नाही सर; हे जाणून घेणे तुमच्यासाठी मनोरंजक नाही. मला पुन्हा एकदा स्पष्टपणे उत्तर द्या: मिस इंग्रामला तुमच्या अप्रामाणिक कृत्याचा त्रास होणार नाही, असे तुम्हाला वाटते काय? तिला फसवून दुष्टपणाने सोडून दिले असे वाटणार नाही का?”

a

"हे अशक्य आहे, कारण मी तुला सांगितले आहे की, तिनेच मला सोडून दिले आहे; मी श्रीमंत नाही हे समजल्यावर तिची प्रेमाची ज्योत विझून गेली."

"तुमच्या अजूनही काही धाडसी योजना आहेत काय? मि. रोचेस्टर, मला भीती वाटते की तुमची तत्त्वे कधीकधी विक्षिप्त असतात."

"जेन, मला कोणी तत्वज्ञान शिकवले नाही त्यामुळे माझी तत्वे अनेकदा भरकटत जात असावीत."

"बरं! गांभीर्याने मी जशी काही वेळापुर्वी दु:खी होते, तसे कोणी इतर दु:खी असतांना तुम्ही मला मोठ्या औदार्याने देऊ केलेल्या भाग्याचा मी आनंदाने स्वीकार करू शकेन काय?"

"होय, तू नक्कीच करू शकतेस. माझ्या प्रिये, या जगात, दुसरे कोणीही माझ्यावर, तुझ्यासारखे शुद्ध प्रेम करणारे नाही आहे. जेन, तुझ्या प्रेमावरचा विश्वास माझ्या आत्म्याला संपन्न करत आहे."

माझ्या खांद्यावर ठेवलेल्या त्यांच्या हातावर मी माझे ओठ टेकले. माझे त्यांच्यावर किती प्रेम आहे हे मी शब्दात मांडू शकत नाही, माझा स्वतःपेक्षा जास्त त्यांच्यावर विश्र्वास आहे.

"तुला आणखीही काही विचारायचे असेल तर, तुझी इच्छापुर्ती करण्याचे भाग्य मला मिळू देत."

"माझी दुसरी मागणी अशी आहे की, तुम्ही आपला हेतू मिसेस फेअरफॅक्सला कळवणे आवश्यक आहे. काल रात्री त्यांनी मला तुमच्याबरोबर मोठ्या हॉलमध्ये पाहिले आणि त्यांना आश्चर्याचा धक्काच बसला असे वाटले. मी त्यांना पुन्हा भेटण्यापुर्वी, तुम्ही त्यांना स्पष्टीकरण द्या: अशा चांगल्या स्त्रीचा आपल्या दोघांसंदर्भात गैरसमज होणे, ही माझ्याकरीता वेदनादायी बाब आहे."

a

“तू खोलीत जा आणि तयार हो,” त्यांनी उत्तर दिले; “मला आज सकाळी तुला घेऊन मिलकोटला जायचे आहे. तू तयार होईपर्यंत मी त्यांच्या ज्ञानात भर घालतो. तू माझ्या प्रेमात हरवून गेली आहेस असे त्यांना वाटते का?”

“मी माझा दर्जा विसरून, माझी पायरी सोडून वागत आहे असा त्यांचा समज झाला असावा.”

“तुझे स्थान माझ्या हृदयात आहे; आणि जे कोणी तुझा कधी अपमान करतील, त्यांची मी मानगुट पकडल्याशिवाय रहाणार नाही. जा लौकर आवर.”

आणि ते मिसेस फेअरफँक्स यांच्या खोलीकडे गेले.

जेव्हा मी मिस्टर रोचेस्टर, मिसेस फेअरफॅक्सच्या खोलीतून बाहेर पडल्याचे ऐकले तेव्हा मी घाईघाईने खाली उतरले. नेहमी प्रमाणे त्या बायबल वाचत होत्या. त्यांनी चष्मा पुस्तकावर ठेवला होता; मिस्टर रोचेस्टरच्या बोलण्यानंतर परत वाचायचे विसरल्या असाव्यात; एखादी लोकविलक्षण बातमी कळाल्यासारख्या त्या स्तब्धपणे समोरच्या भिंतीकडे पहात होत्या, मला पाहून त्या उभ्या राहिल्या, हसण्याचा प्रयत्न करत आणि अभिनंदनाचे काही शब्द उच्चारले, पण त्यांच्या चेहऱ्यावरती हास्य नव्हते. शेवटचे वाक्य अर्धवट सोडत त्यांनी चष्मा लावला, बायबल बंद केले आणि टेबलापासून दूर होत मला म्हणाल्या, “मिस आयर, मी खूप आश्र्चर्यचकीत झाले आहे. तुमच्याबरोबर नेमके काय बोलायचे हे मला कळत नाही. खरोखरच मी स्वप्नात तर नाही ना? कारण मी एकटीच बसलेली असतांना, कधीकधी अर्धवट झोपेत असते तेव्हा बऱ्याच अघटित गोष्टी घडतात असा भास होतो. अनेकवेळा मी पेंगत असते आणि माझे स्वर्गीय पती जे पंधरा वर्षांपूर्वी निवर्तले, ते शेजारी बसून मला अँलीस, अशी हाक मारत असल्याचे भासते. आता मला सत्य गोष्ट सांगता काय, की खरोखरच मि. रोचेस्टरनी तुम्हाला, लग्नाची मागणी

घातली आहे? माझ्यावर हसू नका. आता पाच मिनिटांपुर्वी ते इथे येऊन गेले आणि महिन्याभरात तुम्ही त्यांची पत्नी असाल, असे सांगून गेले."

"त्यांनी मला देखील तेच सांगितले," मी उत्तर दिले.

"खरंच! आणि त्यांनी तुम्हाला जे सांगितले त्यावर तुमचा विश्वास आहे का? आपण स्वीकार केला?"

"होय."

त्यांनी माझ्याकडे आश्चर्याने पाहिले.

"मी कधीच विश्वास ठेवला नसता. ते एक गर्विष्ठ गृहस्थ आहेत, तसेच सर्व रोचेस्टर होते; त्यांच्या वडिलांना पैसा प्रिय होता, पैशाच्या बाबतीत ते कवडीचुंबक होते. त्यांना, तुमच्याशी लग्न करायचे आहे का?"

"त्यांनी मला तसे सांगितले."

त्यांनी मला आपादमस्तक न्याहाळले: त्यांच्या डोळयात, त्यांना पडलेले गूढ सोडवण्यासाठी काही माग मिळाल्याचे दिसले नाही.

"मला ते समजत नाही," त्या पुढे म्हणाल्या; पण तुम्ही म्हणता तेव्हा ते खरे आहे यात शंका नाही. हे सर्व कसे शक्य आहे? मला माहित नाही. लग्नाच्या बाबतीत समान सामाजिक दर्जा आणि संपत्ती यांचा विचार केला जातो. आणि दोघांच्या वयाचा विचार केल्यास तुमच्या दोघांच्या वयामध्ये वीस एक वर्षांचे अंतर असेल, तुझ्या वडीलांच्या वयाचे रोचेस्टर असतील."

"खरंच नाही, मिसेस फेअरफॅक्स," मी ओरडले; "ते माझ्या वडिलांच्या वयाचे दिसत नाहीत. आम्हा दोघांना एकत्र पाहील्यावर कोणी असे ते क्षणभरही समजू शकणार नाहीत; मिस्टर रोचेस्टर दिसायला पंचवीशीचे वाटतात."

"आणि खरंच प्रेमामुळे त्यांना तुझ्याशी लग्न करायचं आहे का?" त्यांनी मला विचारले.

a

त्यांच्या थंडपणाने आणि संशयाने मी इतके दुखावले की माझे डोळे भरून आले.

त्या पुढे म्हणाल्या, “तुला वेदना झाल्याबद्दल मला माफ कर; पण तू वयाने लहान आहेस आणि तुला पुरुषांबद्दल फार कमी माहिती आहे! तुला सावधगिरी बाळगायला हवी. एक जुनी म्हण आहे 'जे चमकते ते सर्व सोने नसते'; आणि या प्रकरणात मला भीती वाटते की तुमच्या किंवा माझ्या अपेक्षेपेक्षा यात काहीतरी वेगळे आढळेल.”

“कसे! मग मी काय राक्षस आहे का? मी रडत म्हणाले. मिस्टर रोचेस्टरना माझ्याबद्दल प्रामाणिक प्रेम असणे हे अशक्य आहे का?”

“नाही, तू खूप चांगली आहेस आणि नंतर तू बऱ्यापैकी सुधारलीस सुध्दा; मला विश्वास आहे की मिस्टर रोचेस्टर तुमच्यावर प्रेम करतात; माझ्या नेहमी लक्षात आले की तू त्याची नेहमीच आवडती आहेस; रोचेस्टरची पसंती समजल्यावर तुझ्या काळजीपोटी मी थोडी साशंक झाले होते, तरीही तुला सावध रहायला हवे. काहीतरी वाईट घडण्याची शक्यता मी बोलून दाखवली नाही, मला कल्पना आहे की माझ्या तशा बोलण्याचे तुला दु:ख होईल, कदाचित तुला अपमानास्पद वाटेल; तू तशी दुरदर्शी आहेस शिवाय विनम्र आणि सुज्ञ पण आहेस. मला आशा आहे की तू स्वतःच्या रक्षणासाठी समर्थ आहेस यावर मला विश्र्वास ठेवला पाहिजे. काल रात्री मला किती त्रास झाला याची सांगूनसुध्दा कल्पना येणार नाही, मी संपूर्ण घरभर शोधले पण तू कुठे दिसली नाहीस, मि. रोचेस्टर पण त्यांच्या खोलीत नव्हते, आणि जेव्हा मी तुला मध्यरात्री एकत्र येताना पाहिले...”

“बर, आता हरकत नाही,” मी गडबडीने विषय संपवण्याचा प्रयत्न केला, “सर्व काही चांगले झाले हे पुरेसे आहे.”

a

“आणि मला आशा आहे की शेवटपर्यंत सर्व काही ठीक होईल,” त्या म्हणाल्या, “पण, माझ्यावर विश्वास ठेव, तू खूप सावधगिरी बाळगू शकणार नाहीस; प्रयत्न कर आणि मिस्टर रोचेस्टरना दूर ठेव; त्यांच्यावर आणि अगदी स्वतःवर देखील विश्वास ठेऊ नको. त्यांच्यासारख्या उच्च कुळातील पुरुषांनी, त्यांच्या गव्हर्नेसबरोबर लग्न करण्याचा रिवाज नाही.”

आता माझी खरोखरच चिडचिड होत होती; सुदैवाने ॲडेल धावत आली.

“मला तुमच्याबरोबर मिलकोटला यायचे आहे,” ती ओरडली; मिस्टर रोचेस्टर नको म्हणतात, आणि नवीन घोडागाडीत भरपूर जागा आहे; त्यांना सांगा ना मला पण न्यायला मिस.”

“नक्कीच, ॲडेल.”

आणि मी घाईघाईने बाहेर पडले, मिसेस फेअरफँक्स सारख्या, कठोर सल्लागारापासून वाचण्यात आनंद झाला. गाडी तयार होती, घरासमोर आणली होती; मि. रोचेस्टर तिच्याकडे गेले आणि पायलट त्यांच्याबरोबर आला.

“ॲडेल आमच्याबरोबर येऊ शकते, नाही का सर?” मी विचारले.

“मी तिला नाही सांगितले आहे; मला बरोबर कोणी नको आहे; मला तुझ्यासोबत एकटे जायचे आहे.”

“कृपया तिला येऊ द्या, मिस्टर रोचेस्टर; ते अधिक चांगले होईल.”

“नाही, ती एक अडथळा असेल.”

त्यांच्या आवाजात आणि चेहऱ्यावर हुकुमत स्पष्ट दिसून येत होती: मिसेस फेअरफॅक्सनी दिलेला इशारा आणि उपस्थित केलेल्या शंकांचे सावट माझ्या मनावर होते. काल्पनिक भीती आणि अनिश्चित भवितव्य यामुळे माझी आशा झाकोळून गेली होती. त्यांच्यावर, माझा अधिकार गाजवण्याची निम्मी शक्ती मी गमावून बसले. आता विना तक्रार, यांत्रिकपणे, एकही शब्द न बोलता मी त्यांची आज्ञा पाळणार

a

होते पण मला गाडीत बसायला मदत करतांना, रोचेस्टरनी माझ्या चेहऱ्याकडे पाहिले, आणि विचारले, “काय झाले? चेहरा एव्हढा पडलेला का आहे? तुला खरोखरच अँडेलने यावे असे वाटते का? आणि मी तिला इथे सोडले तर तुला त्रास होईल का?”

“सर, तिने यायला मी पसंती देईन.”

“बरं! जा, तुझी टोपी घेऊन, विजेप्रमाणे लवकर परत ये,” ते ॲडेलला ओरडून बोलले.

तिने लगेच त्याचे पालन केले.

“एखाद्या सकाळी आपल्यामध्ये अँडेलमुळे थोडा व्यत्यय आल्याने फारसा फरक पडत नाही, आता लवकरच आयुष्यभरासाठी तुझे विचार, संभाषण आणि सहवास या सर्वांवर फक्त माझाच हक्क असणार आहे.”

ॲडेल खुषीत होती, माझ्या मध्यस्थीने तिला घोडागाडीतून यायला मिळाल्याबद्दल. तिने मला चुंबन दिले, मला बिलगून बसली आणि चिवचिव करू लागली, मिस्टर रोचेस्टरनी तिला त्यांच्या पलीकडे एका कोपऱ्यात बसायला लावले, बिचारी हिरमुसली आणि गप्प बसली.

“तिला माझ्याजवळ येऊ दे,” मी विनंती केली; “ती कदाचित तुम्हाला त्रास देईल सर; या बाजूला भरपूर जागा आहे.”

त्यांनी एखाद्या लहान कुत्र्याच्या पिलासारखे उचलून तिला माझ्याकडे दिले आणि हसत हसत मला म्हणाले, “मी तिला लवकरच बोर्डिंग स्कूलमध्ये पाठवीन.”

अँडेलने ते ऐकले आणि तिने माझ्याशिवाय तिला एकटीला बोर्डिंग स्कूलमध्ये जावे लागेल काय, याविषयी चौकशी केली.

“होय,मिस शिवाय” त्यानी उत्तर दिले, “मी तिला माझ्यासोबत चंद्रावर घेऊन जाणार आहे, तेथे मी ज्वालामुखीच्या पर्वतांनी वेढलेल्या खोऱ्यात गुहा शोधीन आणि तेथे ती माझ्याबरोबर एकटीच राहील.”

“पण तिकडे खायला काही नसेल, ती उपाशी राहील.” अँडेलने आपले मत नोंदवले.

“चंद्रावरच्या टेकड्या, मैदानात, देवाने 'मन्ना' नावाचे स्वर्गीय अन्न ठेवले आहे ते मी आणून देईन.”

“तिथे थंडी पडल्यावर आग कशी लावणार?”

“चंद्रावरच्या पर्वतांमधून आग येते; तिला थंडी पडल्यावर मी तिला ज्वालामुखीच्या शिखरावर घेऊन जाईन आणि तिला विवराच्या काठावर बसवून देईन.”

“अरे! ते चढून जाणे किती अवघड असेल कपडे फाटतील, मग तुम्ही तिला नवीन कसे द्याल? “

मिस्टर रॉचेस्टरने गोंधळून गेल्याचे नाटक केले.

“हम्म! ते म्हणाले, तू काय करशील, ॲडेल? विचार कर, ड्रेससाठी निळ्या किंवा गुलाबी ढगाबद्दल तुला काय वाटते आणि इंद्रधनुष्याच्या तुकड्याने खरोखरच सुंदर स्कार्फ बनवता येणार नाही का?”

“ती इथे खूप चांगली आहे,” विचार करून तिने सांगितले; “शिवाय चंद्रप्रकाशात तुझ्यासोबत एकटी राहून तिला कंटाळा येईल. जर मी मिस जेन असते, तर मी तुमच्यासोबत जाण्यास कधीच तयार झाले नसते.”

“पण तिने त्यास संमती दिली आहे; तिने मला वचन दिलेआहे.”

“पण तुम्ही तिला तिथे नेऊ शकणार नाही, चंद्रावर जाण्याचा कोणताही मार्ग नाही; तिकडे फक्त हवा आहे, आणि तिला किंवा तुम्हाला कसे उडायचे हे माहित नाही.”

“ॲडेल, ती शेते बघ.”

आम्ही थॉर्नफिल्ड पोस्ट पार केले होते आणि मिलकोट सुंदर रस्त्याने गाडी हळू चालली होती; वाऱ्याने धूळ उडत होती; ताज्यातवान्या चमकदार बेरीज् कुंपणावर लगडल्या दिसत होत्या, रस्त्याच्या दोन्ही बाजूला मोठमोठे डेरेदार उंच झाडे शोभून दिसत होती.

“ॲडेल, त्या शेतामध्ये पंधरा दिवसांपूर्वी मी संध्याकाळी फिरत होतो, त्यादिवशी तू मला बागेत मदत केली होतीस ना, त्या दिवशी; मी दमून त्या पायरी वर बसलो होतो, माझ्या जवळच्या वहीत मी माझ्या बाबतीत झालेल्या जुन्या एका दुर्दैवी घटनेविषयी लिहीत होतो आणि यापुढे सर्व चांगले व्हावे असा विचार करत असता अंधार पडू लागला. मला बुरखा घातलेली एक लहान आकृती दिसली, ती माझ्याजवळ आली, ती बोलली काहीच नाही, फक्त आम्ही एकमेकांना पाहिले मात्र, पुढे काय झाले ती गोष्ट तुला ऐकायची आहे?”

“लौकर गोष्ट सांगा, परीराणीची!”

“खरच ती परीराणीच होती. आकाशातून उतरून आली होती माझे दु:ख दूर करायला. तिच्या डोक्यावर आकाशात चंद्राची कोर चमकत होती. तिने मला संकेत दिला, मला सुखी होण्यासाठी तिच्याबरोबर चंद्रावर जावे लागेल, तिथल्या दऱ्या खोऱ्यात रहावे लागेल. पण मी सांगितले मला तिच्यासारखे पंख कुठे आहेत? तिने मला एक ताईत दाखवला, तो घातल्यावर चंद्रावर जाता येते म्हणाली तशीच, एक सुंदर सोन्याची अंगठी दाखवली आणि तिच्या डाव्या हाताच्या चौथ्या बोटावर घातली म्हणजे ती माझी होईल आणि आपण दोघे चंद्रावर रहायला जाऊ कायमचे.

खरच तर आता ती अंगठी माझ्या खिश्यात एका सोन्याच्या नाण्याच्या रूपात आहे, मी आता परत त्याची अंगठी बनवणार आणि परीराणीच्या बोटात घालून आम्ही कायमचे चंद्रावर रहायला जाणार.”

“पण या गोष्टीचा मिस जेनशी काय संबंध आहे? मला परी माहीत नाही; तुम्ही मला सांगितलेत की मिस जेनला घेऊन चंद्रावर घेऊन जाणार आहे.”

“अग मिस जेन एक परी आहे,” त्याने उलघडा केला.

त्यानंतर मी अँडेलला सांगितले की ते तिची गंमत करत आहेत. तिने तिच्या बालबुध्दीला साजेसा निष्कर्ष काढला,की रोचेस्टर खोटे बोलतात, त्यांना काही परी भेटली नाही की तिने अंगठी दिली नाही आणि कोणी सुध्दा चंद्रावर राहू शकत नाहीत.

मिलकोटमध्ये घालवलेला वेळ मला खूपच कंटाळवाणा वाटला. रोचेस्टरनी हट्टाने रेशमी कपड्यांच्या दुकानात जायला भाग पाडले, तिथे निदान अर्धा डझन तरी कपडे खरेदी करण्यासाठी हट्ट धरला. मला ते पसंत नव्हते, कशीबशी मी त्यांना फक्त दोन ड्रेस घेण्यासाठी तयारी दाखवली मग त्यांच्या पसंतीने कापड खरेदी असेल तर कबूल झाले. त्यांना अत्यंत महागडे रेशमी, भरजरी कापड घ्यायचे होते. मी त्यांना सांगितले जरी त्यांनी तसे कापड खरेदी केले, तर मी काही ते घालणार नाही. त्यापेक्षा एक खऱ्या सोन्याच्या गाऊन आणि चांदीचा स्कार्फच बनवून घ्या.

त्यांनी एक काळ्या सँटीनचे आणि मोत्याच्या राखाडी रंगाच्या रेशमाचे असे दोन तागे खरेदी केले.

“आतापुरते ठिक आहे, लग्नानंतर मी तुला फुललेल्या फुलांच्या शोभिवंत ताटव्यासारखे सजायला लावणार आहे,” असे माझ्या कानात गुणगुणले.

रेशमी कपड्यांच्या आणि सराफांच्या दुकानातून एकदाचे बाहेर पडल्यानंतर मला थोडे हायसे वाटले. माझ्यासाठी त्यांनी जेव्हढी जास्त वस्त्रप्रावरणे आणि

a

दागदागिने खरेदी केले, तेव्हढी जास्त मला माझीच शरम वाटू लागली, माझा निकृष्ट दर्जा, त्यांच्या बरोबरीला यावा म्हणून माझ्यावर पैश्याची उधळण केली जात आहे, या विचाराने मला खूप त्रास झाला. परत निघतांना तापाने थकल्यासारखे वाटत होते. एक एक बऱ्यावाईट गोष्टी आठवू लागल्या, घटनांची उजळणी चालू असताना, मी माझे काका, जॉन आयर यांनी मिसेस रीडला लिहिलेले पत्र आणि मला दत्तक घेऊन त्यांच्या संपत्तीचा वारस म्हणून नेमण्याचा हेतू, पूर्णपणे विसरून गेले होते ही गोष्ट आठवली. “माझे स्वतःचे असे काहीतरी उत्पन्न असणे माझ्यासाठी एक दिलासा असेल,” मी स्वतःशी म्हणाले. रोचेस्टरनी मला बाहुली सारखे चांगले, चांगले कपडे घालून दागदागिन्यांनी मढवून काढावे हे अजिबात आवडले नसते. सोन्याच्या पिंजऱ्यातील मोत्याचा चारा खाणारी मैना बनण्याची माझी तयारी नव्हती. थॉर्नफिल्डला परतताच, मडेरा येथे जॉन काकांना पत्र लिहून मी कोणाबरोबर लग्न करणार आहे हे कळवायचे आणि त्यांच्याकडून मला काही संपत्तीचा वारसा मिळणार असेल तर आत्ताचे रोचेस्टरांचे वागणे सहन करणे शक्य होईल. या विचाराने मला थोडा दिलासा मिळाला. मी रोचेस्टरांकडे हळूच एक नजर टाकली. त्यांच्या ते बरोबर लक्षात आले, ते हसले, त्यांचे हास्य, एखादा सुलतान अत्यानंदाने आपल्या आवडत्या गुलामाला धनदौलत देऊन स्वत: संतुष्ट झाल्यासारखे मला वाटले. ते माझा हात हातात घेण्यासाठी आतुर झाले होते, पण मी तो झिडकारून टाकला आणि म्हणाले, तुम्ही अशा नजरेने माझ्याकडे पाहू नका. नाहीतर मी शेवटी माझ्या याच लोवुडच्या फ्रॉकमध्ये लग्नाला उभी राहीन. तुम्ही स्वतः मोतिया रंगाच्या रेशमाचे ड्रेसिंग गाऊन आणि काळ्या सॅटिनपासून डझनभर जाकीट शिवून घेऊ शकता.”

यावर गालातल्या गालात हसत रोचेस्टरनी कॉलर ताठ केली आणि म्हणाले, “ऐका हो ऐका, ही छोटीशी वाटणारी इंग्रज मुलगी, काय म्हणत आहे, तिला पाहण्याची आणि ऐकण्याची संधी भाग्यवंतानाच मिळते. ती खरीखुरी त्रिभुवनसुंदरी

आहे. जीभेने थोडी तिखट आहे, मी तर बुवा मला कोणी हिच्या बदल्यात, तुर्कस्तानच्या सम्राटांचे सुंदर ललनांनी गजबजलेला जनानखाना जरी दिला, तरी मी हीला देणे शक्य नाही.”

“तुमच्या जागी मी असते, तर मुळात मी जनानखान्यांतील सुंदरींचा विचार देखील माझ्या मनात आला नसता. आणखी एक गोष्ट---माझी तुलना इतर कोणाशीही केलेली मला चालणार नाही; आपली अशीच आवड असेल तर आपण खुशाल इस्तंबूलच्या बाजारात वेळ न घालवता निघा आणि हव्या तेव्हढ्या गुलाम स्त्रिया विकत घ्या. नाहीतरी इथे आपल्याला मनासारखी खरेदी करता न आल्याने उरलेले पैसे तिकडे वापरता येतील.”

“जेन, मी तिकडे गुलाम स्त्रियांचा सौदा पटवत असताना, तू काय करणार आहेस?”

“तुमच्या जनानखान्यांतील गुलामांच्या सुटकेसाठी मी मिशनरी बनून प्रयत्न करेन, त्याना बंड करायला उद्युक्त करेन.

आपण तर, तीन स्टार मिरवणारे, मानाचे सरदार, तुम्हाला झटक्यात बेड्या ठोकल्या जातील आणि जोपर्यंत तुम्ही, उदारमतवादी सनदेवर स्वाक्षरी करत नाही, तोपर्यंत मी तुमची सुटका करणार नाही.”

“मी तुला माझ्यावर दया करण्याची विनंती करेन.”

“तुम्ही दया मागत आहात, पण तुमच्या नजरेत काही वेगळेच दिसत आहे, मी मुळीच दया दाखवणार नाही. तुम्ही फक्त

वरकरणी दया मागत असाल आणि एकदा का सुटका झाली की तुमचे पहिले काम असेल, ते म्हणजे दया मागताना मान्य केलेल्या अटींचे उल्लंघन करणे.”

a

"जेन, मला सांग, तुझ्या अटी काय असतील? चर्चमधील विवाहसमारंभातील विधीं व्यतिरिक्त वेगळ्या काय अटी असतील, हे मला जाणून घ्यायचे आहे."

"मला आपल्याकडून प्रांजळपणा अपेक्षित आहे. आपले मन पत्नीच्या प्रती असलेल्या कर्तव्याच्या ओझ्याखाली दबलेले नसावे; तुम्हाला आठवते काय, तुम्ही मला सेलीन व्हॅरेन्सविषयी सांगितले होते, की तुम्ही तिला जडजवाहीर, उंची वस्त्र प्रावरणे यांनी मढवून काढले होते पण मी दुसरी सेलीन व्हॅरेन्स होऊ इच्छित नाही; पूर्वी प्रमाणे मी अँडेलच्या गव्हर्नेसचे काम करून आणि रहाण्या खाण्यासह वर्षाला तीस पौंड नक्कीच कमाई करेन त्यातूनच मी माझे सर्व खर्च भागवेन. तुम्ही मला त्याशिवाय काहीही देण्याची गरज नाही, शिवाय---"

"ठिक, हे 'शिवाय' काय आहे?"

"आदर, तर मला तुम्ही आदर देणे, अपेक्षित आहे, मी तुमचा आदर आधीपासूनच करत आहे त्यामुळे हिशोब बरोबर होईल."

"ठिक आहे, जन्मजात हेकेखोरपणा आणि दुराभिमान यात कोणीच तुझी बरोबरी करू शकणार नाही, बरे आता थॉर्नफिल्ड जवळ येत आहे. तुला माझ्याबरोबर जेवायला आवडेल काय?" आम्ही गेट मधून आत येतांना त्यांनी विचारले.

"नाही, सर, धन्यवाद."

"आणि मला तुमच्या नकाराचे कारण कळेल का?"

"सर, मी तुमच्यासोबत कधीच जेवण केले नाही आणि तोपर्यंत मला तसे करण्याचे कोणतेही कारण दिसत नाही..."

"कधीपर्यंत? तुम्हाला अर्धी वाक्ये आवडतात वाटते."

"जोपर्यंत मी मदत करू शकत नाही."

"तुम्हाला असे वाटते का की मी भूत आहे ? तुला खाऊन टाकेन म्हणून माझ्याबरोबर जेवायची भीती वाटते?"

"मला असे कधीच वाटले नव्हते सर; पण मला माझ्या जुन्या सवयी अजून महिनाभर चालू ठेवायच्या आहेत."

"तू, तुझे गव्हर्नेसचे काम त्वरीत सोडू शकतेस."

"मला क्षमा करा, सर; मी पूर्वीप्रमाणेच माझे काम चालू ठेवीन. मी आजपर्यंत जसे केले तसे दिवसभर तुमच्यापासून लांबच राहीन; जेव्हा तुम्हाला मला भेटायचे असेल तेव्हा तुम्ही मला भेटायला बोलवू शकता आणि मग मी येईन, परंतु इतर वेळी नाही."

"जेन मला आता सिगार ओढायची तलफ आली आहे, तुझ्या एव्हढ्या जुलमी अटी मान्य करायला भाग पाडल्यामुळे, मी बेचैन झालो आहे. ठिक आहे आता तुझा हेका चालवत आहेस. लौकर माझी पाळी आहे. जेव्हा माझ्या हातात सापडशील, तेव्हा मी बांधून ठेवेन. माझा मौल्यवान दागिना गमावण्याच्या भीतीने मी तुला माझ्या हृदयाच्या जवळ बांधून ठेवेन."

त्यांनी मला गाडीतून बाहेर पडण्यास मदत केली आणि ॲडेलला घेऊन मी घाईघाईने घरात शिरले.

संध्याकाळी त्यांनी मला बोलावून घेतले. मी त्यांच्या साठी काही गोष्टी योजून ठेवल्या होत्या. मला जास्त वेळ त्यांच्या बरोबर समोरासमोर बोलणे, बसणे टाळायचे होते. मला त्यांचा चांगला आवाज आणि संगीताची आवड आठवली. मी त्यांना गाण्याची विनंती करायचे ठरवले. तसा माझा आवाज बेताचा आहे आणि मी पियानो पण उत्तम प्रकारे वाजवू शकत नाही. संध्याकाळ झाली, तसा मी पियानो उघडला आणि त्यांना गाण्याची विनंती केली, त्यांनी सुरवातीला पुन्हा कधीतरी म्हणून नकार दिला, मी आता खूपच छान वेळ आहे म्हणून आग्रह सुरू ठेवला.

त्यांनी मला त्यांच्या आवाज आवडतो काय म्हणून विचारले. मला कोणाची जास्त खुशामत करणे आवडत नाही, तरी त्यांना गायला राजी करण्यासाठी खुशामत करणे भाग होते. शेवटी मी पियानोवर साथ करण्याच्या बोलीवर गायला तयार झाले. मी माझ्या परीने साथ देण्याचा प्रयत्न केला, पण तो काही त्यांच्या मनाला आला नाही. त्यांनी मला बाजूला सारून स्वतः गायन आणि पियानो वादन सुरू केले. मला तेच हवे होते. त्यांनी गायला सुरुवात केली, मी खिडकीतून बाहेर झाडे, लांबवर पसरलेली कुरणे पहातांना त्यांचे गाणे ऐकत होते; गाणे असे होते:

खरे प्रेम
‘‘हृदयाला फुंकर घालणारे खरे प्रेम
माझ्या प्रत्येक नसामध्ये उधाण आणते.
तिचं येणं रोज माझी आशा होती,
तिचे वेगळे होणे माझ्या वेदना होती
तिच्या पावलांना उशीर झालेला उशीर,
माझ्या रक्तवाहिनीतला बर्फ होता.
मी पाहिले स्वप्नात, एक अनोखा आनंद होता
प्रेमाच्या बदल्यात प्रेम हा चांगला सौदा होता
दोघांमधले अंतर महासागरा एव्हढे विस्तीर्ण होते,
मी धोके झेलले, धाडस केले;
मी अडथळा पार केला

उदात्त निष्ठेने, ज्याच्यावर मी प्रेम करतो तिने तिचा छोटासा हात माझ्या हातात ठेवला आणि शपथ घेतली की लग्नाचे पवित्र बंधन आम्हा दोघांना एकत्र करेल.

a

माझ्या प्रियेने माझ्यासोबत जगण्याचे आणि मरण्याचे वचन दिले होते; त्याच्या शपथेवर चुंबनाने शिक्कामोर्तब झाले. म्हणून शेवटी मला असीम आनंद मिळाला ज्याचे मी स्वप्न पाहिले होते: माझे जसे तिच्यावर प्रेम आहे तसे माझ्यावर प्रेम आहे."

गाणे संपल्यावर रोचेस्टर उठून माझ्याकडे आले. त्यांच्या चेहऱ्यावरचे कोमल भाव पाहून मला क्षणभर लाज वाटली, मग मी सावरले; मला भावनांवर मात करायची होती. स्वतःच्या बचावासाठी मार्ग योजायला हवा होता. जेव्हा ते माझ्याकडे आले तेव्हा मी त्यांना कडवटपणे विचारले की त्यांनी कोणाशी लग्न करण्याचा विचार केला आहे.

"माझ्या प्रिय जेनकडून हा एक विचित्र प्रश्न येत आहे," ते मला म्हणाले.

मी सांगितले माझा प्रश्न अतिशय योग्य आणि अगदी आवश्यक आहे. गाण्यात ते म्हणाले होते की त्यांच्या पत्नीने त्याच्यासोबत मरण्याचे वचन दिले: याचा नेमका अर्थ काय? माझा त्याच्याबरोबर मरण्याचा, कोणताही हेतू नाही हे त्यांनी लक्षात घ्यावे.

त्यांनी मला उत्तर दिले की, मी त्यांच्याबरोबर राहावे एव्हढीच त्यांची इच्छा होती म्हणून त्यांने प्रार्थना केली होती! ते मृत्यूचे वचन माझ्याकडून घेणे अपेक्षित नव्हते."

"होय, खरे आहे," मी उत्तर दिले: "त्यांना जसा त्यांची वेळ येईपर्यंत जगण्याचा अधिकार आहे, तसाच मला, माझी वेळ येईल तोपर्यंत मला जगण्याचे स्वातंत्र्य नक्कीच आहे. आणि त्या क्षणाची मी वाट पाहीन, मला त्यांच्याबरोबर सती वगैरे जाण्याची इच्छा नाही."

"तू मला, माझ्या स्वार्थी विचारांबद्दल क्षमा करून आणि एक चुंबन देऊन त्यावर शिक्कामोर्तब करावेस अशी मी विनंती करतो."

a

“नाही, आपण मला क्षमा करावी.”

मग ते म्हणाले की मी एक कणखर प्राणी आहे. कोणत्याही स्त्रीची गाण्यातून एव्हढी स्तुती केल्यावर तिला आनंदाने अश्रू अनावर झाले असते.

मी त्यांना सांगितले की मी स्वभावाने कठोर आणि लवचिक आहे. हे त्यांना पाहण्याच्या अनेक संधी मिळतील आणि त्याशिवाय, मी त्यांना येत्या चार आठवड्यांमध्ये माझ्या स्वभावाच्या अनेक विचित्र बाजू दाखवण्याचा निर्धार केला आहे, जेणेकरुन त्यांना कळेल की ते काय करत आहेत आणि माघार घेण्यासाठी अजून वेळ आहे.”

त्यांनी मला शांत राहण्यास आणि तर्कसंगत बोलण्यास सांगितले.

मी उत्तर दिले की, “हवे तर मी इथून निघून जाते, पण मी तर्कसंगतच बोलत आहे आणि त्याचा मला अभिमान आहे.”

रोचेस्टर माझ्या बोलण्यावर चिडले, आणि म्हणाले, “तुला हवे तर तू मला चिडवू शकतेस, रागावू शकतेस, पण मला तुझ्या बरोबर कसे वागायचे याचा सर्वोत्तम मार्ग सापडला आहे. खरे तर मी तुझ्यावर केव्हढे प्रेम करतो, हे शब्दात सांगणे अवघड आहे, पण मी आता भावनांच्या गुंत्यात अडकणार नाही. तुझ्या आत्ताच्या मार्मिक बोलण्यातून माझ्या लक्षात आले आहे की सध्या आपल्याला मध्ये अंतर राखणे, आपल्या दोघांसाठी फायदेशीर आहे.”

नंतर त्यांचा रागाचा पारा चढत गेला, थोड्यावेळाने शांत झाल्यावर ते खोलीच्या दुसऱ्या टोकाला गेले, नेहमीच्या आवाजात खोलीबाहेर पडताना मी गुड नाईट म्हणून निरोप घेतला.

पुढील चार आठवडे मी माझी वर्तणुक याच प्रकारे ठेवली आणि ती यशस्वी पण झाली. बऱ्यादा ते उद्धटपणे, दोष शोधत असत पण वेळप्रसंगी नमते घेऊन,

मनाचा हळवेपणा जपत, कळत नकळत त्यांच्यातील हुकूमशाही वृतीला धक्का पोचणार नाही याची खबरदारी घेत, मी माझे आचरण सुरू ठेवले.

दुसऱ्या लोकांसमोर, मी पुर्वीप्रमाणेच शांत आणि मर्यादशील वागत असे. फक्त संध्याकाळच्या भेटी दरम्यान मी मी वाद घालून, प्रत्युत्तर देऊन त्यांच्या चिडचिडीला कारणीभूत होत असे. एकदा संध्याकाळी सात वाजता त्यांनी बोलावून घेतले. मी समोर आल्यावर मात्र लाडीगोडीचे नेहमीच्या बोलणे विसरून हस्तोलंदन करतांना मला चिमटा काढला. गालावर चुंबन घेण्यासाठी म्हणून पुढे झाले आणि कान ओढला. नाहीतरी अतिरिक्त प्रेमापेक्षा, हा चिडखोरपणा बरा असे माझे मत होते. मिसेस फेअरफॅक्स माझ्या वागण्यावर समाधानी होत्या.

माझ्याबद्दलची त्याची चिंता नाहीशी झाली; मला खात्री होती की माझे वागणे त्यांना चांगले वाटत होते. मिस्टर रोचेस्टरनी कबूल केले की ते आता थकले आहेत, पण, ते लवकरच बदला घेतील. त्यांच्या धमक्या ऐकून मी हळुवार हसले:

“मी त्यांना आता वाजवी राहण्यास भाग पाडू शकते, मला वाटले, आणि मी नंतरही करू शकते याची खात्री पटली; जर एकादी क्लुप्ती, अयशस्वी ठरली तर नवीन क्लुप्ती शोधायला हवी याची मला जाणीव होती.”

मात्र, माझे काम सोपे नव्हते; बऱ्याचदा मी त्यांना चिडवण्यापेक्षा संतुष्ट करणे पसंत केले असते. रोचेस्टर माझे जग बनले होते, नव्हे जगापेक्षाही मोठे झाले होते. ते जणू माझ्या आशेचा स्वर्ग होते. मी आणि धार्मिक विचारांच्यामध्ये रोचस्टर उभे होते आणि मी, त्यांच्यामध्ये परमेश्वराची मुर्ती पहात होते.

a

## प्रकरण 25

लग्न ठरून एक महिना उलटत आला होता. आता लग्नाला फक्त काही तास बाकी होते. सर्व तयारी पुर्ण झाली होती. मला निदान अजून काही करायचे नव्हते. मी खोड्या करणे बंद केले होते. ट्रंका सामान भरुन तयार होत्या. त्यावर चिकटवायच्या, नाव पत्त्याच्या चिठ्ठ्या, स्वतः रोचेस्टरनी, 'मिसेस रोचेस्टर, हॉटेल ऑफ... लंडन', अशा बनवून ठेवल्या होत्या. उद्या यावेळी सामान लंडनच्या वाटेवर असणार होते, ड्रावरमधील नाव पत्याच्या चिठ्ठ्या तेव्हढ्या लावायच्या राहिल्या होत्या.

'मिसेस रोचेस्टर'! ती अस्तित्वात नव्हती आणि दुसऱ्या दिवशी सकाळशिवाय, तिचा जन्म होणार नव्हता, तोपर्यंत मला तिच्या वस्तू देण्यासाठी वाट पहायला लागणार होती. माझ्या ड्रेसिंग टेबलच्यासमोर असलेल्या कपाटातील कपड्यांमधून अगोदरच मी माझा लोवूडचा काळा फ्रॉक आणि स्ट्रॉ बोनेट बाजूला काढून ठेवले होते. तिला त्याची जरूरी पुन्हा कधीच, भासणार नव्हती. कपाटात असलेले लग्नाचे कपडे, मोतिया रंगाचा ड्रेस, झरझरीत बुरखा कपाटात टांगलेले पाहून मला विचित्र बुजगावणे असल्याचा भास झाला आणि भीती वाटली म्हणून कपाटाचे दार बंद केले. रात्रीचे नऊ वाजले होते. रात्रीच्या अंधारात लग्नाचा जडावाचा पोशाख चमकत होता. त्याला उद्देशून मी स्वतःशी म्हणाले, “तुला आता एकट्याला खोलीत राहू दे, मला ताप आल्यासारखे वाटत आहे, मी बाहेर जरा वाऱ्यात बरे वाटते काय पहाते.”

मी केवळ निव्वळ लग्नाच्या तयारीच्या कामाने दमून अथवा उद्यापासून सुरू होणाऱ्या नवीन आयुष्याच्या विचाराने अस्वस्थ झाले नव्हते अर्थात या दोन्ही बाबींनी माझा मानसिक ताण निश्र्चितच वाढवला होता पण तिसरे एक कारण सर्वात जास्त जबाबदार होते ते म्हणजे माझ्या मनातील विचित्र आणि चिंताजनक विचार हे होते. काहीतरी घडले होते, ज्याचे मला नीट आकलन होत नव्हते. काल रात्री घडलेली गोष्ट, जी माझ्या शिवाय कोणी ऐकली वा पाहिली नव्हती. काल संध्याकाळी रोचेस्टर कामानिमित्त तीस मैलावरच्या त्यांच्या शेतकऱ्यांकडे गेले होते. त्यांना लग्नानंतर प्रवासाला निघण्यापूर्वी महत्वाची कामे पुर्ण करायची होती. अजूनही ते परतले नव्हते. माझे मन मोकळे करण्यासाठी मी त्यांची वाट बघत होते. त्यांना माझ्या काळजीचे कारण सांगून त्यावर काही उपाय मला त्यांना विचारायचा होता.

पाऊस नव्हता पण वादळी वारे वाहत होते. मी वाऱ्यांपासून आडोसा शोधायला बागेत गेले. वाऱ्याने मोठी झाडेसुध्दा हलत होती. एकमेकांना भिडणाऱ्या फांद्या कडाकडा वाजत होत्या.

माझ्या मनात पण विचारांचे वादळ घुमत होते त्यामुळे बाहेरच्या वादळात गेल्यावर मला थोडे बरे वाटले. लॉरेलच्या झाडांच्या रांगेकडून पुढे वीज पडून जळलेले चेस्टनटचे झाड दिसले. वीज कोसळून त्याचा बुंधा निम्याच्यावर दुभंगला होता परंतु पुर्णतः वेगळा झाला नव्हता. जमिनीलगतचे खोड आणि मुळे अजून एकत्रच होती. दोन्ही बाजूच्या फांद्यामोठ्या फांद्या सुकून गेल्या होत्या. पुढील वादळात झाड उभे राहण्याची शक्यता नव्हती; कदाचित एक बाजू किंवा दोन्ही

बाजूदेखील उन्मळून पडतील पण म्हणताना एक झाड पडले असेच म्हटले जाईल---- विनाश; संपूर्ण विनाश.

"तुम्ही एकमेकांना जवळ ठेवले हे बरे झाले," मी झाडाला उद्देशून म्हणाले, "तुम्ही एकमेकांच्या पासून तोडले गेलेले आहात, तरीही तुमची मुळे एकत्र जोडली असल्याने तुमच्यामध्ये थोडेसे जीवन असले पाहिजे. तुमची पाने आता पुन्हा हिरवी होणार नाहीत; पक्षी यापुढे तुमच्या फांद्यांवर गाण्यासाठी आणि घरटी बनवण्यासाठी येणार नाहीत. प्रेम आणि आनंदाची वेळ निघून गेली आहे; पण तुम्ही एकटे नाही आहात, तुम्हाला प्रत्येकाला एक जीवाभावाचा साथीदार आहे, जो मुळांच्या द्वारे अखंड जोडला गेला आहे आणि तुमच्यातील प्रत्येकाला त्याच्या नाशाच्या दिवशी त्याच्याबद्दल सहानुभूती दाखविणारा साथीदार आहे."

त्याक्षणी ढगांच्या आड गेलेला चंद्र बाहेर आला आणि चेस्टनटच्या झाडावर प्रकाश पडला. अर्धवट विलग झालेला बुंधा चंद्रप्रकाशात स्पष्ट दिसून येत होता. आज चंद्रबिंब लालसर रंगाचे होते. लालसर चंद्र पाहून थोडी भीती, थोडी निराशा दाटून आली. वादळ थोडे शमले होते पण तरीही लांबवरच्या जंगलातून, जवळ वहाणाऱ्या नदीच्या प्रवाहातील आवाज ऐकून उदासवाणे वाटत होते.

मी तेथून फळबागेत गेले. झाडाखाली, वादळाने झोडपल्याने सफरचंद पडली होती. ती गोळा करून घरात घेऊन गेले. लायब्ररीत जाऊन शेगडी पेटवली गेली आहे याची खात्री करून घेतली. अशा उदासवाण्यावेळी, बाहेरून आल्यावर रोचेस्टरना आनंद वाटायला हवा असे मला वाटत होते.

मिस्टर रॉचेस्टरची खुर्ची शेकोटीच्या बाजूला कोपऱ्यात ठेवली आणि तिच्या बाजूला टेबल फिरवून ठेवले; पडदे खाली केले आणि मेणबत्त्या पेटवायला तयार ठेवल्या. ही तयारी पूर्ण केल्यावर मी नेहमीपेक्षा जास्त अस्वस्थ झाले होते. मी शांत बसू शकत नाही किंवा घरी राहू शकत नाही असे काहीसे झाले होते. बेडरूममधल्या एक लहानश्या घड्याळात आणि हॉलमधल्या मोठ्या घड्याळात एकाच वेळी दहा वाजले.

“यांना यायला किती उशीर झाला!” मी स्वतःशी बोलले; चंद्प्रकाशात थॉर्नफिल्डच्या गेटवरून, लांबून कोणी येत असेल तर दिसते कदाचित रोजेस्टर आता येतच असतील कधी एकदा त्यांना भेटते असे मला झाले होते.

गेटजवळच्या मोठ्या झाडांमधून वारा, जोराने वाहत होता. चंद्राचा मंद प्रकाश रस्तावर पडला होता. संपूर्ण रस्ता शांत आणि एकाकी होता. अचानक माझ्या मनात निराशा दाटून आली आणि डोळे भरून आले. तोपर्यंत जोरात पावसाची सुरुवात झाली.

“ते यायला हवेत, लौकर यायला हवेत,” माझे मन त्यांना पहाण्यासाठी तळमळत होते. संध्याकाळपर्यंत येतील असे वाटले होते, आता तर रात्र झाली उशिर का झाला असेल? त्याचा काही अपघात झाला नसेल ना?”

आदल्या रात्रीचा प्रसंग वारंवार माझ्या मनात येऊ लागला; माझ्यासाठी तो पुढच्या धोक्याचा इशारा होता. अलीकडे मला आनंदाच्या शिखरावर विराजमान झाल्यासारखे वाटत होते परंतु त्यामुळे घसरण सुरू होईल याचे भय वाटून डोळ्यातून नकळतपणे अश्रुधारा वाहू लागल्या. सोबत पाऊसही सुरूच होता.

“मी परत घरी जाऊ शकत नव्हते; रोचस्टर या खराब हवामानात बाहेर असताना घरी शेकोटीजवळ बसू शकणार नाही. मला त्यांना भेटायला जाताना थकायला झाले तरी हरकत नाही, मी त्यांना भेटायला पुढे जाणार हे नक्की,” असा

a

विचार करून मी गेट बाहेर पडले; पण फार दूर जावे लागले नाही. मी अर्धा मैलही गेले नव्हते, तेव्हढ्यात घोड्याच्या टापांचा आवाज ऐकू आला; एक स्वार घोड्यावरून येत होता; सोबत एक कुत्रा धावत आला. रोचेस्टर मेसरूरवर बसून येत होते. त्याच्यामागे पायलट आला. आता चंद्र ढगातून बाहेर पडून चांगलाच चमकत होता. त्यांनी मला पाहिले आणि त्यांनी त्याची टोपी काढून हलवली; मी त्यांना भेटायला धावले.

"अरेच्या!" घोड्यावरुन खाली वाकत त्यांनी हात पुढे केला आणि माझ्याकडे वाकून म्हणाले, "तू माझ्या मदशीशिवाय चढू शकत नाहीस, हे उघड आहे; तुझा पाय माझ्या बुटावर ठेव आणि मला तुझे दोन्ही हात माझ्या हातात देवून वर चढ."

मी आज्ञा पाळली. आनंदाने मला चपळ बनवले होते. मी उडी मारली आणि त्यांच्या पुढ्यात स्वार झाले. मला एक चुंबन मिळाले. मला पाहून त्यांना आनंद झाला होता. ते उद्गारले: "काय झाले जेन? एवढ्या रात्रीच्या वेळेला तू मला भेटायला कशी आलीस? काही वाईट बातमी आहे का?"

"नाही; पण मला वाटलं की तुम्ही कधीच परत येणार नाही आणि मी घरी शांतपणे, तुमची वाट पाहू शकत नाही विशेषत: या पावसात आणि अशा वाऱ्यात."

"वारा आणि पाऊस, खरंच? तू ओलेत्या अप्सरेसारखी दिसत आहेस; अगोदर माझा कोट घाल पण मला असे वाटते की तुला ताप आला असावा. जेन, तुझे गाल आणि तुझे हात चांगलेच तापले आहेत. मी तुला पुन्हा विचारतो, तसे काही नाही ना?"

"नाही, सर,आता नाही; मी घाबरलेली नाही किंवा दु:खीही नाही."

"म्हणजे तू दोन्ही होतीस?"

a

“थोडी फार; पण त्याबद्दल मी नंतर सांगेन, सर; मला खात्री आहे की तुम्ही माझ्या काळजीवर हसाल.”

“उद्याचा दिवस संपल्यानंतर मी मनापासून हसेन; तोपर्यंत माझी हिम्मत नाही. मला अजून माझ्या शिकारीची खात्री नाही. ईल माश्यासारखी सुळकन हातातून निसटून जात होतीस आणि गुलाबाच्या वेलीसारखी काटेरी, मी बोट सुध्दा लावले नाही तरी काटे टोचत होते. आता मात्र वेडं कोकरू माझ्या हातात आले आहे, तुझ्या मेंढपाळाला शोधायला कळपापासून दूर गेलीस, नाही का जेन?”

“मला तुमची गरज होती; जास्त स्तुती करू नका. आपण थॉर्नफील्ड येथे आलो आहोत; मला खाली उतरू द्या.”

त्यांनी मला जमिनीवर ठेवले; जॉन घोडा घ्यायला आला आणि मिस्टर रोचेस्टर मला माझे कपडे बदलून लायब्ररीत भेटायला सांगण्यासाठी मोठ्या हॉलमध्ये माझ्यामागे आले. मी पायऱ्या चढून वर जात असताना, त्यांनी मला थांबवले आणि मला लौकरात लौकर यायला सांगितले आणि पाच मिनिटांनंतर मी त्यांना सामील झाले; ते रात्रीच्या जेवण करत होते.

“तू पण बस माझ्या सोबत, जेन.” यानंतर बरेच दिवस आपल्याला थॉर्नफिल्ड हॉलमध्ये जेवण करायला मिळणार नाही.”

मी त्यांच्या शेजारी बसले, त्यांना सांगितले की मी जेवू शकत नाही.

“आपल्या उद्याच्या लंडन बघण्याच्या विचारानेच तुझी आज भूक भागली असेल.”

“उद्याची गोष्ट दूर राहिली, सर मला आजच्या रात्रीचा पण भरवसा वाटत नाही. माझ्या डोक्यात काय काय विचार घुमत आहेत हे मी सांगू शकत नाही. सगळे जग मला खोटे वाटू लागले आहे.”

"फक्त मला सोडून: मी एकटा पुरेसा महत्त्वाचा आहे:-मला स्पर्श करून खात्री करून बघ."

"सर, तुम्ही तर मायावी आहात: प्रत्यक्षात तुम्ही अस्तित्वात नाही आहात."

हसत हसत त्यांनी हात पुढे केला.

"हे स्वप्न आहे का?" माझ्या डोळ्यांवर ठेवत ते म्हणाले.

एका सामर्थ्यवान हाताचा स्नेहल स्पर्श मला झाला.

"होय, जरी मी स्पर्श करु शकत कसले तरी हे स्वप्नच आहे," माझ्या चेहऱ्यावरून त्यांचा हात दूर करत मी म्हणाले, "सर, तुम्ही रात्रीचे जेवण पूर्ण केले का?"

"हो, जेन."

मी बेल वाजवली आणि ट्रे घेऊन जाण्यासाठी नोकराला सांगितले, नंतर मी शेकोटीची आग पुन्हा लावली आणि रोचेस्टरांच्या पायाजवळ खाली असलेल्या खुर्चीवर बसले.

"आता मध्यरात्र होत आली आहे," मी म्हणाले."

"होय; पण जेन, तुझ्या लक्षात आहे काय? तू माझ्या लग्नाच्या आदल्या रात्री माझ्यासोबत राहण्याचे वचन दिले होतेस."

"होय, आणि मी माझे वचन पाळीन, किमान एक किंवा दोन तासांसाठी तरी मी झोपायला जाणार नाही."

"तुझी सर्व तयारी पूर्ण झाली का?"

"होय, सर."

"माझी पण तयारी पुर्ण झाली आहे; मी सर्व व्यवस्था केली आहे आपण उद्या चर्चमधून परतल्यानंतर अर्ध्या तासाने थॉर्नफिल्ड सोडू."

a

“खूप छान सर.”

“किती प्रसन्नपणे तू तो शब्द उच्चारलास तुझा रंगच पालटला आहे, डोळे हसत आहेत, ही खरोखरच जेन तुच आहेस ना?”

“मला विश्वास आहे की मी तीच जेन आहे.”

“विश्वास! हा काय प्रकार आहे? तुला नेमके काय वाटतेय ते सांग.”

“सर, मला जे वाटते ते मी शब्दात व्यक्त करू शकत नाही, ही घडी अशीच रहावी कधीच संपू नये; उद्या पुढ्यात काय वाढून ठेवले आहे देव जाणे.”

“हे उदासवाणे बोलणे आहे, जेन; एक तर तू खूप उत्साही आहेस किंवा खूप थकलेली असावीस.”

“सर, तुम्हाला शांत आणि आनंदी वाटते का?”

“शांत, नाही, परंतु माझ्या हृदयाच्या तळाशी आनंदी आहे.”

“मी पाहिलं आणि त्यांच्या चेहऱ्यावरचा आनंद वाचायचा प्रयत्न केला; त्यांच्या चेहऱ्यावरचे उत्कट भाव मला दिसले.”

“जेन, माझ्यावर विश्वास ठेव”

ते म्हणाले, “तुझ्या मनात जे काही आहे, ते बोलून मन मोकळे कर. तुला कशाची भीती वाटते? तुला मी चांगला नवरा बनू शकणार नाही, याची भीती वाटते का?”

“माझ्या मनात असा कोणताही विचार नाही.”

“तू ज्या नवीन जगात प्रवेश करणार आहेस, त्याची तुला भीती वाटते का?”

“नाही.”

“जेन,तू मला कोड्यात टाकत आहेस, तुझा हताश चेहरा आणि रडवेला आवाज, यामुळे मला दु:ख होत आहे, मी गोंधळून गेलो आहे. मला स्पष्टपणे कारण सांगशील काय?”

“तर मग सर, ऐका, काल रात्री तुम्ही घरी होतात?”

“नाही, पण मला समजले, मघाशी तू काहीतरी म्हणत होतीस माझ्या अनुपस्थित काही गोष्टी घडल्याचे, त्यात फारसे काही गंभीर नसावे पण थोडक्यात सांगायचे तर त्याचा तुला त्रास झाला असणार. मला सांग मिसेस फेअरफँक्स तुला काही बोलल्या की नोकर मंडळी बोलताना तू काही ऐकलेस? आधीच तू हळवी आहेस, तुझा स्वाभिमान दुखावला गेला काय?”

“नाही सर.”

त्याच वेळी घड्याळात बाराचे ठोक पडू लागले. घंटेचा चंदेरी आवाज आणि घड्याळाचे ठोके बंद होईपर्यंत मी थांबले, मग मी पुढे म्हणाले:

“काल दिवसभर मी कामात व्यस्त होते, आणि खूप आनंदात होते. तुम्हाला वाटते तशी नवीन जीवनाला सामोरे जाताना भीती वाटण्याऐवजी तुमच्याबरोबर जगण्याची मधुर स्वप्ने बघत होते. अशी आशा बाळगणे ही माझ्यासाठी खूप आनंदाची गोष्ट आहे कारण मी तुमच्यावर प्रेम करते. नाही, सर, माझी काळजी करू नका, मला व्यत्यय न आणता बोलू द्या. कालपर्यंत माझा ईश्वरी योजनेवर विश्वास होता की तुमच्या आणि माझ्या चांगल्या भवितव्यासाठी घटना घडून येत आहेत. कालचा दिवस सुंदर होता जर तुम्हाला आठवत असेल तर हवा इतकी शांत, आभाळ एव्हढे स्वच्छ होते की मला तुमचा प्रवास सुरक्षित आणि आरामात होईल असा विश्वास वाटत होता. तुमच्या विचारात मी अंगणात थोड्या फेऱ्या मारल्या. तुम्हीदेखील माझ्याबरोबर आहात असे वाटत होते. त्यामुळे तुमची अनुपस्थिती विशेष जाणवली नाही. तुमच्याबरोबर सुरू होणाऱ्या आयुष्याचा विचार मनात आला. माझ्या आयुष्यात प्रचंड उलथापालथ होणार होती. साधे सरळ आयुष्य मागे पडून तुमच्या विस्तृत आयुष्याचा मी एक भाग बनणार होते. सूर्यास्त झाल्यावर हवा थंड झाली आणि आकाश ढगांनी झाकले; मी घरात परतले. नुकताच आणलेला

माझा लग्नाचा पोशाख पाहण्यासाठी सोफीने मला बोलावले आणि बॉक्सच्या तळाशी मला तुम्ही दिलेली भेटवस्तू, बुरखा सापडला जो तुम्ही लंडनहून आपल्या राजेशाहीला शोभून दिसावा म्हणून आणला होतात. मला असे वाटते की मी दागिने नाकारले होते म्हणून तुम्ही मला इतके मौल्यवान असे काहीतरी स्वीकारण्यास भाग पाडले होते. जेव्हा मी तो उलगडून पाहिला तेव्हा मला हसू आले. माझ्या सारख्या सामान्य मुलीला, तुम्ही खानदानी, राजेशाही थाटाने सजवून सरदारीणबाई बनवण्यासाठी चाललेल्या खटाटोपाबद्दल तुमची फिरकी घ्यायला मला आवडले असते. मला तुम्हाला विचारायचे होते की मी स्वतः बनवलेला साधा बुरखा घातला तर तुम्हाला का बरे चालणार नाही? माझ्यासारखी रंग, रुप, संपत्ती, आणि समाजातील दर्जा सर्वच बाबतीत कनिष्ठ स्त्रीसाठी एव्हढा पैसा उधळणे योग्य नाही शिवाय ती सोबत काही पैसा अडका घेऊन येण्यास असमर्थ आहे. आता मी तुमच्या चेहऱ्यावर दिसत असलेले भाव वाचून तुमच्या मनात चाललेले विचार वाचू शकते. तुम्हाला तुमच्या संपत्तीमध्ये भर घालण्यासाठी अथवा पत्नी द्वारे समाजातील प्रतिष्ठा वाढविण्यासाठी, मोहरांच्या थैलीबरोबर किंवा

राजमुकुटाबरोबर लग्न करण्याची आवश्यकता नाही."

"छोटी जादूगारीण, तू माझ्या मनातले किती चांगले वाचतेस!" मिस्टर रोचेस्टर ओरडले, "पण बुरख्यात नक्षीकामाशिवाय काय सापडले? विष की खंजीर? तू एव्हढी दुःखी का दिसत आहेस?"

"नाही, नाही, सर, त्या वस्त्रामध्ये नाजूकता, उच्च दर्जाची कारागिरी आणि रोचेस्टर्सच्या अभिमानाशिवाय इतर काहीही सापडले नाही; मला पण आता या सर्वाची सवय झाली आहे. अंधार पडू लागला आणि वारा वाहू लागला आणि मला पुन्हा उदास वाटू लागले. असे वाटू लागले की तुम्ही घरी असायला हवे होता. मी या खोलीत आले, तुमची रिकामी खुर्ची आणि विझलेली शेकोटी पाहून मी अजून

निराश झाले. शेवटी काही वेळाने झोपायला गेले पण झोप आता माझ्यावर रुसली होती. एक अनाकलनीय चिंता मला सतावत होती. मला एक अस्पष्ट असा वेदनेने भरलेला रडण्याचा आवाज ऐकू आला. वाऱ्याच्या आवाजात तो मिसळून गेल्याने, तो बाहेरून येत आहे की घरांमधून हे कळत नव्हते. शेवटी बाहेर कुत्रे रडण्याचा आवाज असावा अशी माझी समजूत झाली. तो आवाज कधीतरी थांबला आणि मला बरे वाटले. नंतर केव्हातरी डोळा लागला. स्वप्नातसुध्दा काळोखी वादळी रात्र आली होती. तुमच्या भेटीची तगमग स्वप्नात पण जाणवत होती. आपल्या दोघांना वेगळे करणारा अडथळा दिसत नव्हता पण एक विचित्र, दुःखाची भावना जाणवत होती.

माझ्या झोपेच्या सुरुवातीच्या काळात मला वाटत होते की मी अंधारात, वळणावळणाच्या अज्ञात रस्त्याने पावसात भिजत एका लहान बाळाला घेऊन चालत होते. थंडीने कुडकुडत ते बाळ मोठ्याने रडू लागले. मला वाटले, सर, तुम्ही खूप पुढे निघून गेला आहात आणि मी तुम्हाला गाठण्याचा जीवापाड प्रयत्न केला. थांबण्याची विनंती करायला बघितली पण शब्द फुटले नाहीत. पाय जागच्या जागी जखडून गेले आणि तुम्ही अजून दूरदूर निघून गेलात.”

“जेन आता मी तुझ्याजवळ आहे तरी तू स्वप्नांच्यामध्ये अडकून पडली आहेस. चिंता करायचे सोडून काल्पनिक दुःखातून बाहेर पडून खऱ्या आनंदाचा विचार कर. तू माझ्यावर प्रेम करतेस हे कबूल केले आहेस, जेन, मी ते विसरणार नाही आणि तू यापुढे ते नाकारू शकत नाहीस. तुझ्या ओठांवर हेच शब्द कायम रहातील. मी ते स्पष्टपणे ऐकले आहेत. शांत, गंभीर पण मृदू , कानाला मंजुळ वाटणारे, तुझे शब्द ‘सर, मी तुमच्याबरोबर एकत्र जगण्याची मधुर स्वप्ने बघत होते अशी आशा बाळगणे ही माझ्यासाठी खूप आनंदाची गोष्ट आहे, कारण मी तुमच्यावर प्रेम करते.'---जेन तू माझ्यावर प्रेम करतेस ना? मला परत एकदा ऐकव.”

“होय सर, मी तुमच्च्यावर मनापासून प्रेम करते.”

“तसेच असेल, तुझे शब्द, माझ्या अंत:करण्यात खोलवर शिरले. मला वाटते की तू खऱ्या मनाने आणि विश्र्वासपुर्ण श्रद्धेने सांगितलेस, तुझ्या नजरेत विश्र्वास, सत्य आणि भक्ती दिसत आहे: पण माझ्याजवळ कोणी वेगळीच व्यक्ती उभी असल्यासारखे वाटत आहे. जेन तू खूपच भयप्रद दिसत आहेस. तुला चांगले कसे दिसायचे यांची कल्पना आहे. तुझे नेहमीचे उपरोधिक, लबाड, आव्हान देणारे हास्य कुठे गायब झाले? तू खुशाल मला सांग की तू माझा तिरस्कार करतेस म्हणून, माझी चेष्टा कर, मला त्रास दे, मला धक्का दे, अगदी तुला पाहिजे ते कर, मला तू रागावलेली चालेल पण दु:खी झालेली नाही.”

“माझे सर्व सांगून झाल्यावर मी तुम्हाला हवे तेव्हढे चिडवेन; पण शेवटपर्यंत माझे म्हणणे ऐकून घ्यावे.”

“मला वाटले, जेन, तू मला सर्व काही सांगितले आहेस आणि तू फक्त स्वप्नामुळे दु:खी झाली होतीस.”

मी मान नकारार्थी हलवली.

“काय ! तो ओरडला, “अजून काही बाकी आहे का? पण मला विश्वास असा आहे की ते काही महत्त्वाचे नसावे; तुझ्यावर अविश्वास दाखवल्याबद्दल मी तुझी अगोदरच माफी मागतो.”

त्यांचे चिंताग्रस्त रूप, त्यांनी ज्या पद्धतीने मला जाणवलेली भीती, अधीरतेने अमान्य केली याचे, मला आश्चर्य वाटले; तरीही, मी माझे कथन पुढे चालू ठेवले.

“सर, मला आणखी एक स्वप्न पडले; थॉर्नफिल्ड हॉल भग्नावस्थेत दिसला. वटवाघळे आणि घुबडे यांच्या व्यतिरिक्त तिथे काही उरले नव्हते. समोरची भिंत तेव्हढी ढासळत्या अवस्थेत उभी दिसत होती. वाड्याच्या जागेवर गवत उगवले होते.

चंद्रप्रकाशात मी त्यावरून चालत होते. कधी शेकोटीच्या संगमरवरी चिमणीचे तुकडे तर कधी खिडक्यांचे नक्षीदार गज वाटेत पडलेले होते. अजून मी त्या लहान मुलांला शालीमध्ये गुंडाळून चालत होते. थकले होते, वजन पेलवत नव्हते पण त्याला खाली ठेवता येत नव्हते. घोड्यांच्या टापांचा आवाज आला, मी ओळखले तुम्हीच येत असणार. तुम्ही दूरदेशी चालला होतात, तुम्हाला शेवटचे पाहण्याच्या इच्छेने मी, कशीबशी भिंतीवर चढले: माझ्या पायाखालचे दगड सरकले; ज्या आयव्हीच्या फांद्या मी पकडल्या होत्या त्या तुटल्या. घाबरलेल्या मुलाने मला गच्च पकडले शेवटी मी भिंतीच्या वरती पोहोचले. तुम्ही अगदी लहान दिसत होतात. वारा इतका जोरात वाहत होता की मला उभे राहता येत नव्हते. मी भिंतीवर बसले आणि दुध पाजून बाळाला शांत केले. मी तुम्हाला रस्त्याच्या एका बाजूला वळताना पाहिले. तुम्हाला पाहण्यासाठी खाली झुकले. भिंत थोडीशी हलली; मी घाबरले, बाळ माझ्या मांडीवर घसरले आणि माझा तोल गेला. मी खाली पडले आणि मला जाग आली.

“जेन, हेच कारण आहे ना?”

“नाही सर, ही प्रस्तावना आहे, खरी गोष्ट पुढे आहे. मला जाग आली तेव्हा एक प्रकाशाचा झोत माझ्या डोळयासमोरून गेला. “अरे! उजाडले वाटते,” मी विचार केला; पण मी चूक होते: तो मेणबत्तीचा प्रकाश होता. मी गृहीत धरले की सोफी आली असावी; ड्रेसिंग टेबलवर एक मेणबत्ती होती आणि लहानशा कपाटाचा दरवाजा जिथे झोपण्यापूर्वी मी माझा लग्नाचा पोशाख आणि बुरखा टांगला होता, तो उघडा होता. मला एक आवाज ऐकू आला; मी लगेच विचारले: “सोफी, तू तिथे काय करत आहेस?” कोणीही उत्तर दिले नाही; पण कोणीतरी तिथून बाहेर आले, मेणबत्ती घेऊन रॅकवर लटकलेल्या लग्नाच्या पोशाखातील तपासणी करत होते, “सोफी, सोफी! मी पुन्हा ओरडले, आणि सर्व काही शांत होते. मी माझ्या पलंगावर उठले आणि पुढे जाऊन पाहिले; मला प्रथम आश्चर्य वाटले पण नंतर माझी मती गुंग

झाली. रक्त गोठून गेले, मिस्टर रोचेस्टर, ती व्यक्ती ना सोफी होती, ना लेआ, ना मिसेस फेअरफॅक्स; मला खात्री आहे की, तुमच्याकडे आज असलेली ती विचित्र स्त्री ग्रेस पूल पण नव्हती.''

''त्यापैकीच ती एक असणार,'' रोचेस्टरनी व्यत्यय आणला.

''नाही, सर, मी तुम्हाला खात्री देते की नाही; थॉर्नफिल्डमध्ये मी कधीही तिला पाहिले नव्हते. माझ्यासाठी ती सर्वस्वी वेगळी व्यक्ती होती.''

''मला वर्णन करून सांग, जेन.''

''ती मला उंच आणि मजबूत वाटत होती; तिचे दाट काळे केस तिच्या पाठीवर मोकळे सोडले होते. तिने कोणते कपडे घातले हे मला माहीत नाही: पण ते पांढरे आणि सरळ होते; पण तो गाउन होता, चादर पांघरून घेतली होती की हे मी सांगू शकत नाही.''

''तू चेहरा पाहिलास का?''

''सुरुवातीला नाही; पण लवकरच तिने कपाटातील माझा बुरखा खालीवर केला आणि उचलला, बराच वेळ त्याकडे पाहिले आणि स्वतःच्या डोक्यावर टाकून आरशाकडे वळली; मग मी तिचा चेहरा आरशात उत्तम प्रकारे पाहिला.''

''आणि ती कशी होती?''

''मला ती भयावह वाटली; बापरे! सर, मी असा चेहरा कधीच पाहिला नाही: तिचा क्रुर चेहरा काळवंडला होता; डोळे सुजलेल्या होते.''

''भूते सहसा पांढरी असतात, जेन.''

''हे सर, ती जांभळ्या रंगाची होती; तिचे ओठ काळे आणि सुजलेले होते, कपाळावर आठ्या होत्या, डोळे लालसर होते, भुवया काळ्या आणि जाड, होत्या. तिला पाहून मला व्हॅम्पायरची आठवण झाली.''

''बरं! तिने काय केले?''

"सर, तिने डोक्यावरून माझा बुरखा काढला, त्याचे दोन तुकडे करून, जमिनीवर फेकले आणि पायाखाली तुडवले."

"नंतर?"

"तिने खिडकीचा पडदा उचलून बाहेर पाहिले; कदाचित उजाडलेले पाहिले असावे, कारण ती मेणबत्ती घेऊन दाराकडे निघाली होती; पण जाताना माझ्या पलंगासमोर थांबली. तिची चमत्कारिक नजर माझ्यावर स्थिरावली. तिने मेणबत्तीचा प्रकाश माझ्या चेहऱ्याच्या अगदी जवळ आणला आणि माझ्या डोळ्यांसमोर मेणबत्ती विझविली; मला वाटले की तिचा भयानक चेहरा माझ्या अगदी जवळ आहे आणि माझे भान हरपले; माझ्या आयुष्यात फक्त दुसऱ्यांदा मी भीतीने बेशुद्ध झाले होते.

"जेव्हा तू शुद्धीवर आली तेव्हा तुझ्या सोबत कोण होते?"

"कोणीही नाही, सर, दिवस उजाडल्यावर मी उठले; मी डोक्यावरून आंघोळ केली; कॉफी घेतली तरी मला अशक्त वाटत होते पण तशी मी आजारी नाही. तुमच्या नजरेस सर्व गोष्टी आणून देणे मला आवश्यक वाटते. आता सर मला सांगा, ती बाई कोण होती?"

"तुझ्या अती उत्तेजीत मेंदूची निर्मिती आणि दुसरे तिसरे काही नाही. हे निश्चित आहे; माझ्या लाडके, मला तुझी खूप काळजी घ्यायला हवी: तुझ्या तरल आणि संवेदनशील मनाची काळजी घेणे आवश्यक आहे."

"सर, माझ्या संवेदनांचा आणि मेंदूचा या घटनेशी काहीही संबंध नाही हे लक्षात घ्या; जी घटना घडली: ती खरी आहे, आणि तेच मी तुम्हाला सांगितले आहे."

"पण तुझी पूर्वीची स्वप्नेही खरी होती काय? थॉर्नफील्ड वाडा भग्नावस्थेत आहे काय? अडथळयांमुळे आपल्यामध्ये अनुल्लंघनीय अंतर पडले आहे काय?

a

मी डोळयात पाण्याचा थेंबही न आणता, तुझे चुंबन सुध्दा न घेता, मुकपणे तुझा निरोप घेत आहे काय?

"अजून तरी नाही."

"तसे मी कधीतरी करू शकेन? आपल्याला सार्वकालिक दृढ बंधनात बांधून ठेवणारा दिवस आधीच सुरू झाला आहे, आणि एकदा का आपण जन्मभरासाठी एकत्र येऊ, तेव्हा मी तुला खात्री देतो की, यापुढे तुझा मनात कसलीही भीती राहणार नाही."

"सर, तुम्हाला फक्त माझ्या मनाची भीती वाटत आहे, पण माझ्यासाठी हे निखळ सत्य आहे: आणि आता त्यावरचा विश्र्वास पक्का झाला आहे. कारण तुम्ही स्वतः त्या भयानक पाहुणीचे गूढ उलगडून मला सांगू शकत नाही."

"आणि मी सांगू शकत नाही, कारण जेन, ते नक्कीच काल्पनिक आहे."

"पण, सर, आज सकाळी उठल्यावर मी स्वतःशी तेच बोलले आणि माझे धैर्य वाढविण्यासाठी मी त्या सर्व वस्तूंकडे पाहिले ज्या माझ्या ओळखीच्या होत्या, त्यावेळी उजेडात त्या चांगल्या दिसत होत्या. दिवसाच्या प्रकाशात मला रात्री काय घडले याचा स्पष्ट पुरावा दिसला: माझा बुरखा जमिनीवर फेकला गेला आणि त्याचे दोन तुकडे झाले होते डोक्यापासून पायापर्यंत."

मला मिस्टर रोचेस्टर धक्का बसल्याचे जाणवले ते थरथरत होते; पटकन मला उराशी कवटाळून घेत म्हणाले, "परमेश्वराची कृपा म्हणायची. काल रात्री काही विखारी शक्ती तुझ्याजवळ आली होती असेल, पण फक्त बुरखा नष्ट झाला, अरे देवा, नाहीतर काय झाले असते?"

त्याचे हृदय धडधडत होते, त्यांनी मला इतके घट्ट आवळून धरले होते की माझा श्वास गुदमरला. काही मिनिटांच्या शांततेनंतर, ते आनंदाने पुढे म्हणाले: "आता, जेन, मी तुला हे सर्व समजावून सांगेन: हे अर्धे स्वप्न आहे आणि अर्धे

a

वास्तव; मला शंका नाही की एक स्त्री तुझ्या खोलीत आली आणि ती स्त्री, ग्रेस पूल असावी; तू स्वत: एकदा तिला एक विचित्र प्राणी म्हटले होतेस आणि, मला माहीत आहे की, तू तिला असे म्हणणे योग्य आहे. तिने माझ्या बरोबर आणि मेसन बरोबर काय केले, हे तुला चांगलेच माहीत आहे. तू अर्धवट झोपेत असणार तेव्हा तू तिला आत जाताना पाहिले असशील आणि ती काय करत आहे हे तुझ्या लक्षात आले: परंतु, तापाने अर्धजागृतावस्थेत तुला ती ओळखू आली नसावी आणि सुजलेला चेहरा, मोकळे झालेले केस, लालसर डोळे, हे सर्व फक्त तुझ्या कल्पनेचा आविष्कार आहे. तुझ्या अगोदरच्या दुःस्वप्नांचा पुढील भाग आहे: फाटलेला बुरखा, हेच खरे आहे आणि त्यासाठी तिला जबाबदार धरणे योग्य आहे. तू मला विचारशील की मी या बाईला माझ्या घरात का ठेवले आहे? जेव्हा आपल्या लग्नाला एक वर्ष आणि एक दिवस होईल, तेव्हा मी तुला सर्व उलगडून सांगेन, पण आता नाही. बरं! जेन, तुझे समाधान झाले आहे काय? माझे स्पष्टीकरण तुला मान्य आहे का?''

मी त्याबद्दल विचार केला आणि मला ती एक शक्यता वाटली पण माझे समाधान झाले नाही; पण मिस्टर रोचेस्टरच्या समाधानासाठी, मी तसे भासवण्याचा प्रयत्न केला: नक्कीच मला थोडा आराम मिळाला. मी त्यांना हसतमुखाने उत्तर दिले आणि एक वाजून होता मी तिथून जाण्यासाठी निघाले.

''जेन सोफी मुलांच्या खोलीत ॲडेलसोबत झोपत नाही का?'' त्यांनी मेणबत्ती पेटवत मला विचारले.

''होय सर,'' मी उत्तर दिले.

''मग, ॲडेलच्या लहान पलंगावर तुझ्यासाठी पुरेशी जागा आहे; आज रात्री तू तिच्यासोबत झोप, जेन यात आश्चर्य वाटण्यासारखे काहीच नाही, मला सांगितलेल्या घटनेने तू चिंताग्रस्त झाली आहेस. तू एकटी झोपू नको; मला वचन दे की तू ॲडेलच्या खोलीत झोपायला जाशील.''

a

"मी तर खूप आनंदाने जाईन, सर."

"दरवाजा आतून सुरक्षितपणे बंद कर. तू वरच्या मजल्यावर जाताना सोफीला तुला लवकर उठवायला सांग; कारण तुला सकाळी लग्नासाठी तयार व्हायचे आहे आणि आठ वाजण्यापूर्वी नाश्ता करायला पाहिजे. आणि आता आणखी वाईट विचार नकोत; दु:खी आठवणींचा पाठलाग बंद. जेन, वारा बघ कसा वाहत आहे, ऐकू येतंय का? अगदी मंद मंद वारा आहे ,जास्त नाही; पाऊस सुध्दा थांबला आहे. ते बघ, पडदा उचलत ते म्हणाले, किती सुंदर ही रात्र आहे."

ते खरच होते, आकाश पूर्णपणे निवळले होते; पश्चिमेचा वारा वाहत होता आणि ढग पूर्वेकडे पळत होते. चंद्र शांतपणे चमकत होता.

"बरं! मिस्टर रोचेस्टर म्हणाले, "माझी लाडकी जेन आता कशी आहे?"

"रात्र शांत आहे, सर, आणि मीही शांत आहे."

"आणि या रात्री तू विचित्र आणि दुःखी स्वप्न पाहणार नाहीस, तुला स्वप्नात आपले आनंदी प्रेम आणि प्रेमळ मिलन दिसेल."

भविष्यवाणी फक्त अर्धी पूर्ण झाली: मला कोणतीही वेदनादायक स्वप्ने दिसली नाहीत किंवा एकही आनंदी स्वप्न पडले नाही: कारण मला अजिबात झोप आली नाही. शेजारी छोटी ॲडेल गाढ झोपली होती. तिला मी पहात होते, ती खूप शांत आणि निरागस दिसत होती. मी उद्याच्या दिवसाची वाट पहात होते. सुर्योदय होताच मी उठले. ॲडेल मला चिकटून झोपली होती. माझ्या गळ्यात तिने तिचे चिमुकले हात टाकले होते. ते सोडवून मी तिचा गोड पापा घेतला. मला एक विचित्र संवेदना जाणवली आणि मला रडू आले. तिला जाग येईल म्हणून मी तिथून निघाले. निरागस ॲडेल माझ्या भुतकाळाचे प्रतिक होती, जो मी आता त्यागणार होते, मला उद्याच्या दिवसाची भीती वाटत होती, तरीही यापुढील आयुष्यात प्रेम आणि आदर यांचा लाभ होणार म्हणून अज्ञात भविष्यकाळाची ओढ वाटत होती.

a

## प्रकरण 26

सात वाजता सोफी मला तयार करण्यासाठी खोलीत आली. माझे प्रसाधन बराच काळ चालले इतके की मला उशीर झाल्यामुळे अधीर झालेल्या मिस्टर रोचेस्टरनी मी खाली का आले नाही हे विचारायला लेआला पाठवले. सोफी माझ्या केसांना माझा साधा सोनेरी बुरखा जोडण्यात व्यस्त होती; मी तिथून निसटून जाण्यासाठी पटकन उठले. "थांबा", सोफी फ्रेंच मध्ये ओरडली, "एकदा स्वतःला आरश्यात तर पहा तर खरे; तुम्ही अजून त्याकडे ढुंकूनही पाहिले नाही."

मी परत आरशाकडे आले, एक बुरखा घातलेली स्त्री दिसली जी माझ्यापेक्षा खूप वेगळी दिसत होती की मला वाटले की मी एक अनोळखी व्यक्ती पहात आहे.

"जेन!" रोचेस्टरांची हाक ऐकू आली आणि मी घाईघाईत खाली निघाले.

जिन्याच्या सुरवातीला रोचेस्टर स्वागतासाठी उभे होते.

ते मला म्हणाले, "किती वेळ लावलास, वाट बघून आता माझा धीर सुटत चालला होता."

त्यांनी मला डायनिंग रुममध्ये नेले आणि माझे लक्षपूर्वक निरीक्षण केले; मी लिलीच्या फुलासारखी सुंदर दिसत आहे असा अभिप्राय दिला. सगळे जग त्यांच्या भाग्याचा हेवा करेल अशी बायको मिळाल्याचा त्यांना अभिमान वाटत आहे अशी त्यांनी आनंदाने कबुली दिली; फक्त दहा मिनिटात ब्रेकफास्ट आवरण्याची सूचना दिली. नोकराला हाक मारली आणि जॉन घोडागाडी तयार करत आहे काय याबद्दल चौकशी केली. सर्व सामान खाली आणण्याच्या सूचना केली. चर्चमध्ये जाऊन फादर मि. गुड आणि त्यांचे कारकून आलेत काय याची खात्री करून घेऊन परत येऊन त्यांना कळवायला सांगितले. चर्च थॉर्नफिल्डच्या शेजारीच होते. नोकर लवकरच परतला. ते दोघे चर्चमध्ये आले असल्याचे सांगितले.

घोडागाडी तयार झाली होती पण चर्चला जाण्यासाठी आम्हाला तिची गरज भासणार नव्हती पण आम्ही परतल्यावर लगेच प्रवासाला निघणार होतो.

"जेन, तू तयार आहेस?"

मी उठले. आमच्या दोघांच्याबरोबर करवला अथवा करवली नव्हती. कोणी नातेवाईक मंडळीही नव्हती, आम्ही दोघेच लग्न समारंभासाठी निघालो. मिसेस फेअरफॅक्स मोठ्या हॉलमध्ये होत्या. मला त्यांच्याबरोबर थोडे बोलायचे होते पण माझ्या एक हात रोचेस्टरांनी पकडला होता आणि ते अगदी जलद चालत होते. मी आपोआप त्यांच्याबरोबर ओढली जात होते. माझी नजर क्षणभर त्यांच्या चेहऱ्यावर गेली एका क्षणाचा उशीर सुध्दा चालणार नाही हे चेहऱ्यावर स्पष्टपणे दिसत होते. क्वचितच एखादा नवरदेव त्यांच्या प्रमाणे गंभीर आणि दृढनिश्चयी दिसला असता. त्यांच्या तेजस्वी डोळयात उत्साह ओसंडून वाहत होता.

आजचा दिवस ढगाळ आहे की स्वच्छ, याकडे माझे लक्ष नव्हते. चर्चकडे जाताना ना माझे लक्ष आकाशाकडे होते, ना जमिनीवर. माझे हृदय आणि डोळे, दोन्ही रोचेस्टरांच्या ताब्यात होते. मी त्यांच्या चेहऱ्यावरचा उत्कट भाव समजून घ्यायला मी उत्सुक होते. त्यांचे मानसिक द्वंद्व सुरू असल्याचे दिसून येत होते. मला त्यामागची कारणे जाणून घ्यायला आवडले असते.

चर्चलगत स्मशानभूमीच्या छोट्या गेटजवळ आल्यावर, मला भरभर चालून दम लागल्याचे, रोचेस्टरच्या ध्यानात आले. "मी प्रेमात निर्दयपणे वागत आहे काय?" त्यांनी थांबून विचारले. "आपण थोडे सावकाश जाऊ," त्यांनी सुचवले.

ते जुने राखाडी रंगाचे चर्च अजूनही मला आठवते. एक कावळा उडून चर्चच्या मनोऱ्यांना बसला. आजुबाजुला थडगी होती. दोन अनोळखी व्यक्ती थडग्यावरील शिलालेख वाचत होती. माझे त्यांच्याकडे लक्ष गेले कारण त्यांनी आम्हाला पाहिले आणि मग ते चर्चच्या मागे गेले. मला वाटले ते बाजूच्या दारातून

आत येतील आणि लग्न सोहळा पाहतील. मिस्टर रोचेस्टरचे लक्ष त्यांच्याकडे नव्हते. ते माझ्याकडे बघण्यात गुंतले होते. त्यांच्या रोखून पहाण्याने माझा चेहरा लाल झाला होता. कपाळ घामेजले होते. गाल आणि ओठ थंड पडले होते. जरा वेळाने मी सावरले आणि आम्ही सावकाश चर्चमध्ये गेलो.

आम्ही नम्रपणे चर्चमध्ये प्रवेश केला. फादर तयार होते. कारकून उठून त्यांच्या शेजारी उभा राहिला. सगळं शांत होतं. दूरच्या कोपऱ्यात फक्त दोन सावल्या पुढे सरकल्या. माझा अंदाज अचूक होता: त्या अनोळखी व्यक्तींनी आमच्या आधी प्रवेश केला होता आणि ते रोचेस्टर कुटुंबाच्या मालकीच्या जागेतील थडग्यांच्याजवळ उभे होते. त्यांची आमच्याकडे पाठ होती. काळाचा हात जुन्या संगमरवरी थडग्यावर फिरला होता. थोरले डॅमर डी रोचेस्टर, जे मार्स्टन मार्शेसमध्ये गृहयुद्धाच्या वेळी मारले गेले होते आणि त्यांची पत्नी एलिझाबेथ दोघे तिथे चिरविश्रांती घेत होते.

आम्ही विवाह वेदीवर उभे राहिलो. पाठीमागे पावलांचा आवाज आला, मी हलकेच मागे वळून पाहिले. त्या दोन व्यक्तींपैकी एक आमच्या दिशेने चालत होता. विधी सुरू झाले, विवाहाच्या हेतूचे स्पष्टीकरण पार पडले आणि मग पाद्री एक पाऊल पुढे येऊन, मि. रोचेस्टरांच्या दिशेने किंचित वाकून पुढे म्हणाले:

“मी तुम्हा दोघांना विचारतो आणि शपथ देतो ज्याचा न्यायाच्या दिवशी त्याचा योग्य न्याय होईल, जर तुम्हाला विवाहात कायदेशीररित्या एकत्र येण्यात काही अडथळा असेल तर ते येथे कबूल करावे, कारण हे निश्चित आहे की जर देवाचे वचन अनुमती देत नसतांना जे एकत्र जोडले जातील तर त्यांचा विवाह कायदेशीर होत नाही.”

प्रथेप्रमाणे ते थांबले, ही शांतता कदाचित शतकातून एकदाही खंडित झाली नसावी. फादर पुस्तकात पहात होते त्यांनी क्षणभर श्वास रोखून धरला होता, त्यांनी

रोचेस्टरांच्या कडे हात पुढे केला आणि विचारले, "तुम्ही या तरुण मुलीला तुमची कायदेशीर पत्नी म्हणून घोषित करता?"

"हे लग्न होऊ शकत नाही एक अडथळा आहे." कोणीतरी मोठ्या आवाजात स्पष्टपणे बोलले.

फादर आणि कारकून दोघांनी बोलणाऱ्या व्यक्तीकडे पाहिले आणि ते अवाक झाले. मि. रोचेस्टर किंचित हलले जणू काही त्याच्या पायाखाली भूकंप झाला असावा: एक पाऊल पूढे उचलून मान न वळवत ते म्हणाले, "फादर, पुढे सुरू करा."

खोल पण खालच्या स्वरात बोलले गेलेले हे शब्द त्यानंतर प्रचंड शांतता पसरली. मिस्टर वुड पुढे म्हणाले: "जे काही ठासून सांगितले गेले आहे आणि त्यातील सत्य किंवा असत्य याचा पुरावा मिळाल्याशिवाय मी पुढे जाऊ शकत नाही."

"हा, लग्न समारंभ मोडला आहे," आमच्या मागून आवाज आला.

"मी माझा आरोप सिद्ध करू शकतो: या विवाहासाठी एक कायद्याची अडचण आहे."

मिस्टर रॉचेस्टरनी संभाषण ऐकले, परंतु त्यांनी लक्ष दिले नाही: ते हट्टीपणे ठाम उभे राहिले: त्यानी फक्त एकच हालचाल केली आणि ती म्हणजे माझा हात घट्ट पकडला. त्यांची पकड घट्ट आणि मजबूत होती. स्पर्श उष्ण होता त्यातून त्यांच्या अंतरंगातील दाहकता जाणवत होती. खाणीतून काढलेल्या संगमरवरी खडकासारखे निश्चल, टणक आणि भव्यदिव्य असे ते दिसत होते. त्यांचे डोळे संतापाने धगधगत होते. मिस्टर वुड गोंधळलेल्यासारखे वाटत होते.

"नेमका काय अडथळा काय आहे?" ते पुढे म्हणाले: "आपण कदाचित अडथळ्यावर मात करू शकू; आपण स्पष्ट करा."

“असे होणे कठीण आहे; ही अडचण अनुल्लंघनीय आहे असा माझा सल्ला आहे.”

बोलणारी व्यक्ती पुढे आली आणि बाकावर टेकत दृढपणे शांत पण हळू आवाजात ती पुढे म्हणाली:

“अडथळा फक्त पहिल्या लग्नाचा आहे; मि. रोचेस्टरांची पत्नी अजूनही जिवंत आहे.”

हलक्या आवाजात बोलले गेलेल्या ह्या शब्दांनी, माझ्या मेंदूला विजेच्या कडकडाटासारखे हादरवून सोडले. रक्तात आग पेटल्यासारखे झाले. माझी विचारशक्ती गोठून गेली; पण मी माझे धैर्य एकवटले. मला माझी शुध्द हरपून देऊन चालणार नव्हते. मी मिस्टर रोचेस्टरांकडे पाहिले आणि त्यांना माझ्याकडे बघायला लावले: त्यांचा चेहरा रंगविहीन खडकासारखा दिसत होता, कठोर डोळ्यात अंगार पेटलेला होता, त्यांनी कोणतीही गोष्ट नाकारली नाही: ते जणू प्रती आव्हान देत असल्यासारखे वाटले. एकही शब्द न उच्चारता, न हसता, अनोळखी प्राणी असल्याप्रमाणे मला त्यांच्याकडे खेचून घेतले.

“तू कोण आहेस ?” त्यांनी अनोळखी व्यक्तीला विचारले.

“माझं नाव ब्रिग्ज आहे, आणि मी लंडनमधला स्ट्रीट ॲटर्नी आहे...,” त्याने उत्तर दिलं.

“आणि तुम्ही माझ्यावर पत्नी असल्याचा आरोप करता?”

“होय सर; मी तुम्हाला तुमच्या पत्नीच्या अस्तित्वाची आठवण करून देण्यासाठी आलो आहे, तुम्ही तिला ओळखत नसाल, तरी कायदा तिला ओळखतो.”

“कृपया मला तिच्याबद्दल सांगा; मला तिचे नाव, तिच्या पालकांचे नाव आणि ती जिथे राहते ते सांगा.”

"नक्कीच."

मिस्टर ब्रिग्जने शांतपणे खिशातून एक कागद काढला आणि अधिकार वाणीने खालील गोष्टी वाचल्या:

"मी खात्री देतो आणि सिद्ध करतो की, पंधरा वर्षांपूर्वी, नोव्हेंबरच्या वीस तारखेला, थॉर्नफिल्ड कॅसल आणि मॅनोर ऑफ फर्न्डियर इंग्लड येथे रहाणारे, एडवर्ड फेअरफॅक्स,

यांनी,

माझी बहीण बर्थे अंटोनेट मेसन,

व्यापारी जोनास मेसन आणि त्याची पत्नी, यांची मुलगी यानी स्पॅनिश शहरातील जमैकाच्या चर्चमध्ये लग्न केले;

विवाह प्रमाणपत्र चर्च रेकॉर्डमध्ये आढळेल. माझ्याकडे एक प्रत आहे. त्यावर रिचर्ड मेसनने स्वाक्षरी केली आहे."

"जर हा पेपर अस्सल असेल तर हे सिद्ध होऊ शकते की मी विवाहित होतो; परंतु येथे उल्लेख केलेली महिला अद्याप जिवंत असल्याचे सिद्ध होत नाही."

"ती तीन महिन्यांपूर्वी जिवंत होती," वकील म्हणाला.

"तुम्हाला कसे माहीत?"

"माझ्याकडे एक साक्षीदार आहे, सर, आणि तुम्हाला त्याला नाकारणे कठीण होईल."

"त्याला आणा, नाहीतर मसणात जा!"

"मी त्याला प्रथम घेऊन येईन, तो येथे आहे. मिस्टर मेसन, कृपया पुढे या."

हे नाव ऐकल्यावर, मिस्टर रॉचेस्टरनी दात ओठ चावले. निराशेने ते थरथरत होते; मी त्याच्या अगदी जवळ असल्यामुळे मला त्यांच्या रागाच्या किंवा निराशेच्या हालचाली जाणवल्या. दुसरी अनोळखी व्यक्ती जी तोपर्यंत तोंड लपून होती, ती पुढे

a

आली. होय, ते स्वतः मिस्टर मेसन होते. मि. रोचेस्टरने वळून त्यांच्याकडे पाहिले. त्यांचे काळे डोळे काळे, संतापाने अंगार ओकत होते. त्यांचा चेहरा तांबडालाल झाला होता, जणू काही त्याच्या हृदयात पेटलेली आग त्यांच्या गालांवर आणि कपाळावर पसरली आहे. त्यांनी आपला मजबूत हात वर केला; जणू ते अंगावर धावून, मेसनला ठोसा मारून त्याला चर्चच्या दगडांवर फेकणार होते. हे पाहून मेसन घाबरून मागे सरकले आणि क्षीणपणे ओरडले: "देवा मला वाचव!"

मि. रोचेस्टरांचा आवेग ओसरला त्यांनी स्वतःवर ताबा मिळवत सहज विचारले: "तुला काय म्हणायचे आहे?"

मेसनच्या ओठांमधून अस्पष्ट असे शब्द बाहेर पडले.

"तुम्ही स्पष्टपणे उत्तर देऊ शकत नसाल तर नक्कीच त्यात काळेबेरे असणार, मी तुम्हाला पुन्हा विचारतो: तुम्हाला काय म्हणायचे आहे?"

"सर, सर, तुम्ही पवित्र ठिकाणी आहात हे विसरू नका." फादर पुढे होत रोचेस्टरना, म्हणाले,

मग, मेसनला उद्देशून, फादर हळूवारपणे बोलले:

"सर, जर मि. रोचेस्टरची बायको अजूनही जिवंत असेल तर तुम्ही आम्हाला त्याविषयी सांगू शकता का?"

"घाबरू नका! वकील पुढे म्हणाला, "खरे काय ते सांगून टाका."

"ती थॉर्नफिल्ड कॅसलमध्ये राहते, "मेसनने थोड्या स्पष्ट आवाजात सांगितले; एप्रिलमध्ये मी तिला तिथे पाहिले होते, मी तिचा भाऊ आहे."

"थॉर्नफिल्ड कॅसल येथे?" फादर ओरडले; "हे अशक्य आहे; मी बरेच दिवस शेजारी राहतोय सर आणि मी थॉर्नफिल्ड कॅसलमधील कोणत्याही लेडी रोचेस्टरबद्दल ऐकले नाही."

मि. रोचेस्टरच्या ओठांवर एक कडवट हास्य होते आणि ते पुटपुटले:

a

“नाही, मी काळजी घेतली की तिच्याबद्दल कोणालाही समजू नये.”

ते सुमारे दहा मिनिटे थांबले मग स्वतःशीच विचार केला, आणि म्हणाले, “आता तोफेतून बाहेर पडणाऱ्या गोळ्याप्रमाणे सत्य समोर येईल.”

त्यांनी कारकुनाला पुस्तक बंद करून ठेवायला आणि फादरना त्यांचा पोशाख बदलण्यास सांगितले, “आपण चर्च मधून बाहेर निघू शकता, आज लग्न होणार नाही.” कारकुनाने पुस्तक बंद केले.

मिस्टर रोचेस्टर पुढे म्हणाले: “द्विभार्या हा शब्द तुमच्या कानाला ऐकायला चांगला वाटत नाही आणि तरीही मला दोन स्त्रियांचा पती व्हायचे होते. नियतीने मला मला फसवले किंवा ईश्र्वराला ते मंजूर नव्हते. मात्र या क्षणी मी सैतानापेक्षा थोडा चांगला आहे आणि फादरनी सांगितल्याप्रमाणे मी देवाच्या सर्वात कठोर न्यायास पात्र आहे. मी नरकातील लवलवत्या ज्वालामध्ये फेकले जाण्यासाठी अथवा नरकातील वळणाऱ्या किड्यांचे भक्ष्य बनवण्यासाठी तयार आहे. माझी योजना फसली आहे. या वकिलांने आणि त्याच्या पक्षकाराने सत्य सांगितले आहे: माझे लग्न झाले होते आणि माझी पत्नी अजूनही जिवंत आहे. मि. वुड तुम्ही म्हणालात की तुम्ही मिसेस रॉचेस्टर वाड्यात असल्याचे कधीच ऐकले नाही; परंतु एका गूढ वेड्या स्त्रीबद्दल तुमच्या अनेकवेळा कानावर आले असेल याबाबत शंका नाही. ती माझी अनौरस सावत्र बहीण किंवा माझी टाकून दिलेली अथवा ठेवलेली स्त्री आहे, असे अनेकांनी तुम्हाला सांगितले असेल. मी आता जाहीर करतो की ती माझी पत्नी आहे. जिच्याशी मी पंधरा वर्षांपूर्वी लग्न केले होते; तिचे नाव बर्थे मेसन आहे आणि ती या माणसाची बहीण आहे जो आता पांढराफटक पडला आहे आणि थरथर कापत आहे. त्यांने एक धीरोदात्त पुरूष काय काय सहन करू शकतो हे दाखवून दिले आहे. घाबरू नकोस डिक मी तुझ्यासारख्या भित्र्या माणसाला जास्त काही मारणार नाही. बर्थे मेसन वेडी आहे; ती अशा कुटुंबातून आली आहे ज्या

a

कुटुंबात तीन पिढ्यांपासून वेडे किंवा मूर्ख जन्मले आहेत. तिची आई एक मद्यपी आणि वेडी होती. मला माझ्या लग्नानंतर सत्य कळाले कारण कौटुंबिक रहस्य म्हणून त्यांची वाच्यता केली नव्हती. बर्थे, आपल्या आईच्या वळणावर गेली.

माझी बायको कशी मोहक, शुद्ध, शहाणी आणि नम्र आहे. मी कसा एक आनंदी माणूस असून सुखाच्या राशीवर लोळत असतो, मला संसारात किती स्वर्गीय आनंद लाभला आहे, यांचे तुम्हाला कुतूहल नक्कीच असणार. मी तुम्हाला आणखी स्पष्टीकरण देत नाही. ब्रिग्ज, वुड, मेसन मी तुम्हा सर्वांना घरी मिसेस पूलच्या पेशंटला आणि माझ्या पत्नीला भेटायला येण्याचे आमंत्रण देतो.

तुम्ही पाहाल कशाप्रकारे मला लग्नाच्या वेळी फसवले गेले. असा विवाह तोडण्याचा आणि अशी एखादी व्यक्ती, जी निदान मनुष्यप्राणी आहे तिच्याशी मैत्री करण्याचा मला अधिकार आहे की नाही यांचा न्याय आपण करू शकाल.''

''ही मुलगी,'' ते माझ्याकडे बघत पुढे म्हणाले, ''मि. वुड, हिला तुमच्याप्रमाणे या तिरस्करणीय गोष्टीची काहीही माहिती नव्हती: तिचा विश्वास होता की सर्वकाही सुंदर आणि कायदेशीर आहे. तिने कधीच असा विचार केला नव्हता की ती एका वेड्या आणि मूर्ख स्त्रीशी आधीच जोडलेल्या दुष्ट व्यक्तीशी जोडली जाईल. प्रत्येकजण या, माझ्या मागे या!''

त्यांनी मला घट्ट धरत चर्च सोडले. बाकीचे तिघे आमच्या मागे होते. वाड्याच्या मुख्य गेटसमोर तयार केलेली घोडागाडी दिसली.

''जॉन, गाडी परत तिच्या जागी घेऊन जा,'' मिस्टर रोचेस्टर थंडपणे म्हणाले; आज आम्हाला तिची गरज भासणार नाही.''

आम्ही आत गेल्यावर, मिसेस फेअरफॅक्स, ॲडेल, सोफी, लेआ आमचे स्वागत करण्यासाठी पुढे आल्या.

“मागे, मागे व्हा, तुम्ही सगळे!” रोचेस्टर ओरडले, “तुमच्या अभिनंदनाची गरज कुणाला आहे? मला तर नाही! लग्न होऊन पंधरा वर्षे झाली आता उशिरा झाला.”

ते पुढे गेले तरीही माझा हात हातातच धरला होता. त्या तीन माणसांना त्यांनी त्याच्यामागे येण्यास सांगितले. आम्ही पहिला जिना चढून वर गेलो. कॉरिडॉर ओलांडला, शेवटी आम्ही तिसऱ्या मजल्याच्या पायरीवर आलो. मि. रोचेस्टरनी थोडेसे होऊन खालचे दार उघडले आणि आम्ही टेपेस्ट्रीच्या मागच्या सुसज्ज खोलीत प्रवेश केला जिथे मी आधीच पाहिलेला मोठा बेड आणि वॉर्डरोब होता.

“तुला ही खोली माहीत आहे, मेसन,” रोचेस्टर म्हणाले; इथेच तिने तुला सुरीने मारले आणि चावा घेतला होता.”

त्यांनी दुसऱ्या दाराचा पडदा उचलला आणि एक दरवाजा उघडला. एक खिडकीविरहित खोली होती; फायरप्लेसच्या समोर एक अतिशय उंच फायर गार्ड होता. छतावरून लटकलेल्या एका दिव्याने खोली उजळली होती; आगीवर ग्रेस पूल काहीतरी शिजवत असल्यासारखे वाटत होते. खोलीच्या सर्वात अंधेऱ्या कोपऱ्यात मागे पुढे हलताना एक आकार दिसला. पहिल्या दृष्टीक्षेपात तो मनुष्य आहे की प्राणी हे कोणी सांगू शकले नाही; ती रांगत आहे असे वाटले आणि तिने जंगली श्वापदासारखी गर्जना केली. पण तिने कपडे घातले होते. काळ्या केसांच्या झिपऱ्या तोंडावर आलेल्या दिसत होत्या.

“हॅलो, मिसेस पूल,” मिस्टर रोचेस्टर म्हणाले; “आज तुम्ही कशा आहात आणि तुमचा पेशंट कसा आहे?”

“मी ठिक आहे, सर, धन्यवाद,” ग्रेसने तिचे उकळते भांडे काळजीपूर्वक उचलत म्हटले; “पेशंट थोडा उतावीळ आहे, पण बेफाम नाही.”

एक भयावह आरडाओरडा, या अनुकूल अहवालाच्या विरोधात असल्याचे दिसून आले; ती तरसासारखी आकृती उभी राहिली.

“अरे! सर, ती तुम्हाला पहात आहे; तुम्ही निघून जाणे चांगले होईल,” ग्रेस ओरडली.

“फक्त काही क्षण, ग्रेस; आम्हाला काही वेळ थांबू द्यावे.”

“मग, सर, सावधगिरी बाळगा!”

वेडी स्त्री जोरात ओरडली. तिने तिच्या चेहऱ्यावरून केस बाजूला केले आणि पाहुण्यांकडे पाहिले.

मी लाल डोळे आणि सुजलेला चेहरा ओळखला.

मिसेस पूल पुढे आल्या, “बाजूला उभे राहा” मिस्टर रोचेस्टर म्हणाले आणि त्यांना बाजूला केले; “आज तिच्याकडे चाकू नसावा, मला वाटतं? आणि मी माझे रक्षण करू शकतो.”

“ती काय करते हे कुणाला कधीच कळत नाही, सर; ती खूप धूर्त आहे: तिची कला जाणून घेणे माणसाच्या आकलनशक्तीच्या बाहेरची गोष्ट आहे.”

“आम्ही तिला सोडून निघायला पाहिजे,” मेसन कुजबुजला.

“ताबडतोब नाहीसे व्हा! त्याच्या मेहुण्याने उत्तर दिले.

“सावध!” ग्रेस ओरडली. तिन्ही गृहस्थ एकत्र बाजूला गेले.

मि. रोचेस्टरनी मला त्याच्यामागे केले; त्या स्त्रीने त्यांच्यावर झेप घेतली आणि त्यांचे मानगुट पकडले. त्यांच्या गालाचा चावा घेण्याचा प्रयत्न केला. त्या दोघांची जणू लढाई चालू होती. ती एक मजबूत स्त्री होती. जवळजवळ तिच्या पतीएवढी उंच आणि चांगलीच गलेलठ्ठ. दोन तीन वेळा ती त्यांचा गळा दाबणार होती. त्यांनी चटकन जोराचा फटका मारून तिच्यावर मात केली असती पण त्यांना तिला मारायचे नव्हते. त्यांना फक्त लढायचे होते. शेवटी त्यांनी त्या वेडीचे हात

धरले. ग्रेसने त्यांना दिलेल्या दोरीने त्यांनी ते तिच्या पाठीमागे बांधले. दुसऱ्या दोरीने त्यांनी तिला खुर्चीला बांधले. हे सर्व सुरू असताना जंगली ओरडणे आणि भयंकर झटापट झाली, मग मि. रोचेस्टर प्रेक्षकांकडे वळले त्यांनी कडवट आणि दुःखी हास्य केले.

"ही माझी बायको आहे!" ते म्हणाले; या आलींगनातील सुख फक्त मला माहित आहे. अशा या प्रेमळ गोष्टी आहेत ज्या माझ्या विश्रांतीच्या वेळी मला आराम देतात. मला हेच हवे होते याचसाठी मी विवाह केला होता." माझ्या खांद्यावर हात ठेवत ते म्हणाले, "ही तरुण मुलगी या नरकाच्या दारात त्या कैदाशिणीची लढाई गंभीर राहून आणि शांतपणे पहात आहे. मी हिच्यावर प्रेम करतो आणि त्या कैदाशिणीचा तिरस्कार करतो याचे कारण त्यांच्यामध्ये फार मोठा फरक हे आहे. या स्वच्छ सौम्य डोळयांची तुलना, त्या लालभडक काचेच्या गोट्यांबरोबर करून पहा. हा धीरोदात्त चेहरा, सडपातळ अंगकाठी आणि तो राक्षसी मुखवटा, आडदांड शरीर यातील फरक पहा. फादर तुम्ही आणि वकील महाशय तुम्हीसुध्दा, मला योग्य न्याय द्या. फक्त लक्षात ठेवा की तुम्ही जो न्याय कराल त्यांचा पण न्याय शेवटी होणार आहे. तुम्ही आता निघा मला माझा बहुमोल पुरस्कार कडीकुलपात ठेवायला पाहिजे."

सर्वजण निघून गेले. मि. रोचेस्टर ग्रेस पूलला काही ऑर्डर देण्यासाठी क्षणभर आमच्या मागे राहिले; आम्ही पायऱ्यांवरून खाली आलो तेव्हा वकील माझ्याशी बोलले.

"तुमच्याबद्दल, मॅडम," ते मला म्हणाले, "तुम्ही निर्दोष आहात. मिस्टर मेसन, मेडीराला परतल्यावर तुमच्या काकांना हे समजेल आणि त्यांना ऐकून खूप आनंद होईल."

"माझे काका! तुम्हाला त्याच्याबद्दल काय माहिती आहे? तुम्ही त्यांना ओळखता काय?"

"मिस्टर मेसन त्यांना ओळखतात; मिस्टर आयर फंचल येथील वार्ताहर असतांना काही वर्षे, त्यांच्या घरात रहात होते. जेव्हा तुमच्या काकांना तुमच्याकडून पत्र मिळाले, तेव्हा त्यांनी, मि. मेसनना तुमच्या आणि मि. रोचेस्टरशी होणाऱ्या लग्नाची माहिती दिली. त्यावेळी, मि. मेसन मेडिरा येथे आले होते. तिथून ते जमैकाला परतण्यापूर्वी त्यांची तब्येत सुधारण्यासाठी थांबले होते. मिस्टर आयर यांनी तुमचे पत्र त्यांना दाखवले कारण त्यांना माहित होते की मि. मेसन, रोचेस्टर नावाच्या एका गृहस्थाला ओळखतात. मि. मेसनना हे समजल्यावर ते आश्चर्यचकित आणि भयभीत झाले. तुम्ही समजू शकता आता सत्य प्रकट झाले आहे. मला सांगण्यास खेद वाटतो तुमचे काका सध्या अंथरुणावर पडून आहेत; म्हणून तुमच्या मदतीला त्यांना इंग्लंडला येता आले नाही. परंतु त्यांनी मि. मेसनला वेळ वाया घालवू नये आणि हे लग्न रोखण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करण्याची विनंती केली.

त्यांनी मेसनना माझे नाव सुचवले. मी शक्य तितके प्रयत्न केले. देव दयेने आम्ही वेळेवर पोहोचलो आणि तुमची फसवणूक टळली. तुमच्या

काकांच्याबद्दल माझ्याकडे सध्या जास्त माहिती नाही. जर ते मरण पावले असतील तर तुम्ही मि. मेसन सोबत मेडीराला जाणे योग्य झाले असते. मला वाटते की मि. आयर यांच्या संदर्भात काही पुढील माहिती मिळेपर्यंत तुम्ही इंग्लंडमध्येच राहणे चांगले होईल."

वकील महाशयांनी मि. मेसनना विचारले आपले अजून काही काम बाकी आहे काय? मि. मेसननी आता निघू या असे सांगितले आणि ते दोघे मि. रोचेस्टरांचा निरोप न घेता निघून गेले. फादर सुध्दा मि. रोचेस्टरना शहाणपणाच्या चार गोष्टी ऐकवून सल्ला देऊन कर्तव्य पूर्ण झाले असे समजून निघून गेले.

मी माझ्या खोलीत आले. सर्व बाहेरची माणसे गेल्यावर घर रिकामे झाले होते.

मी स्वतःला खोलीत बंद केले कोणीही आत येऊ नये म्हणून मी कडी लावली. मी दुःखाने उन्मळून पडले नाही. मी अजून खूप शांत होते. यंत्रवत लग्नाचा पोशाख उतरवला. त्या अगोदर घातलेले कपडे अंगावर चढवले आणि मग थोडी टेकले: आता मला दमल्यासारखे वाटू लागले होते. मी दोन्ही हात टेबलावर ठेवून त्यात डोके खुपसले: आणि माझ्या मनातील विचारचक्र सुरू झाले. आतापर्यंत मी फक्त ऐकण्याचे, पहाण्याचे आणि चालण्याचे काम केले होते. ज्याने मला पुढे नेले किंवा मागे खेचले, त्याचे मी अनुसरण केले; घटनांमागून घटना घडल्या, रहस्या मागून रहस्ये उघड झाली पण आता मी विचार करत होते.

रोचेस्टरांच्या वेड्या पत्नीने केलेल्या आक्रमक पवित्र्याव्यतिरिक्त, सकाळ तशी बऱ्यापैकी शांत गेली. चर्चमध्ये सर्व काही शांतपणे घडले होते; कुठे भावनांचा स्फोट झाला नाही की मोठमोठ्याने भांडण किंवा बाचाबाची झाली नाही. विरोध नाही, आव्हान नाही, अश्रू नाही, रडणे नाही: काही शब्द बोलले गेले होते, लग्नाला शांतपणे आक्षेप घेतला गेला.

मि. रोचेस्टरनी काही कठोर आणि छोटे प्रश्न विचारले, त्याची उत्तरे दिली गेली, स्पष्टीकरण आणि पुरावे जोडले गेले आणि रोचेस्टरनी सत्याची उघड कबुली दिली. सर्वांनी जिवंत पुरावा पाहिला आणि फिर्यादी पक्ष निघून गेला. आता सर्वकाही संपले.

नेहमीप्रमाणे मी इथे माझ्या खोलीत होते; मला दुखापत किंवा मार लागला नव्हता; आणि तरीही पुर्वीची जेन कुठे होती? तिचे आयुष्य कुठे होते? तिच्या आशा कुठे होत्या?

जेन आयर, सौभाग्यकांक्षिणी जेन आयर, जी सौभाग्यवती होता होता कुमारी राहिली. आता ती एक दुःखी आणि एकटी तरुण मुलगी बनली आहे: तिचे आयुष्य उद्ध्वस्त झाले आणि तिची स्वप्ने नष्ट झाली! जणू उन्हाळ्याच्या सुंदर दिवसांत हिवाळ्यातील बर्फवृष्टी व्हावी, डिसेंबरात वादळाने, पिकलेल्या सफरचंदचा सडा संपूर्ण बागेत पडावा, काल रात्री फुललेल्या गुलाबांचा सुगंध आज मातीत मिसळावा, कापणीला आलेल्या शेतावर बर्फाची चादर पसरावी असे अघटीत आज घडीला घडले होते. बारा तासांच्या अंतरात उष्ण कटिबंधातील सदाहरित घनदाट जंगले आता नॉर्वेच्या जंगलांसारखी बर्फाने उद्ध्वस्त होऊन पांढरीखड्ड पडल्यासारखी झाली होती. देवाच्या आज्ञेनुसार एका रात्रीत प्लेगच्या साथीत इजिप्तमधील मनुष्य आणि प्राण्यांच्या प्रथम जन्मलेल्यांचा सर्वांचा मृत्यू झाला त्याप्रमाणे माझ्या सर्व नव्याने उमलून आलेल्या आशा आकांक्षा मृत झाल्या.

काल मी पाहिलेल्या स्वप्नांची आज कलेवरे झाली होती ती पुन्हा जिवंत होणे अशक्य होते. मी माझ्या प्रेमाचा विचार केला, ही भावना जी माझ्या प्रियतमाची होती जी त्यांनेच निर्माण केली होती, ती माझ्या हृदयातील थंड पाळणामध्ये आजारी मुलासारखा थरथर कापत होती. दुःख आणि वेदनेने तिला ग्रासले होते, आणि ती आता रोचेस्टरांच्या हातापर्यंत पोहोचू शकला नव्हती. थॉर्नफिल्डच्या मालकांची उब तिला आता मिळणे अशक्यप्राय होते. अरेरे! आता मी त्यांच्याकडे परत कधीही जाऊ शकत नाही. माझा त्यांच्यावर विश्वास आता उरला नाही. माझा आत्मविश्वास नष्ट झाला. मिस्टर रॉचेस्टर आता माझ्यासाठी, पुर्वीचे रोचेस्टर राहिले नव्हते. मला त्यांच्या सानिध्यातून दूर व्हावेच लागणार आहे हे मला स्पष्टपणे दिसत होते, पण केव्हा आणि कसे? कुठे जायच हे मला अजून माहित नव्हते: रोजेस्टर, स्वतःच मला थॉर्नफिल्ड सोडून जायला सांगतील या बद्दल मला संदेह उरला नव्हता. त्यांना माझ्याबद्दल खरे प्रेम वाटत नव्हते, तो एक भावनांचा क्षणिक आवेग होता: तो आवेग

a

आता ओसरला होता. आता त्यांना मी थॉर्नफिल्डमध्ये नको असणार होते. आता मला त्यांच्या जीवनात प्रवेश करण्याचे धाडस माझ्यापाशी नव्हते: मी त्यांचा द्वेष करायला हवा होता. अरेरे, माझे डोळे किती आंधळे झाले होते! माझा स्वभाव किती दुबळा बनला आहे. माझे डोळे मिटले गेले: काळोखाच्या नदीमध्ये मी बुडाले, माझे प्रतिबिंब पण काळेशार आणि गोंधळलेले दिसत होते. सर्वस्वाचा त्याग करून सहजपणे मी त्या काळोख्या नदीमध्ये माझ्या कोरड्या पलंगावर झोपले होते. दूरच्या डोंगरातून वाहत्या पाण्याचा आवाज ऐकू येत होता. मला वाटले की जोराचा प्रवाह माझ्या दिशेने येत आहे. माझ्यात उठण्याची इच्छा किंवा स्वतःला वाचवण्याची ताकद नव्हती. मी आशा सोडून दिल्या होत्या. मी फक्त मरणाची इच्छा करत होते. जिवंत असण्याचा एकच विचार माझ्यामध्ये अजून धडधडत होता--परमेश्र्वराचे आठवण: एक प्रार्थना मनात स्फुरली पण ती उच्चारण्याची ताकद माझ्यात नव्हती: “माझ्या देवा! माझ्यापासून दूर जाऊ नको, कारण धोका माझ्याजवळ आला आहे आणि कोणीही माझ्या मदतीला येऊ शकत नाही.”

खरंच, धोका जवळ आला होता आणि तो दूर ठेवण्यासाठी मी देवाकडे काहीही मागितले नव्हते, कारण मी गुडघे वाकवले नाहीत, हात जोडले नाहीत किंवा माझे ओठही हलवले नाहीत---तो आला. एक जोरदार प्रवाह माझ्यावर येऊन आदळला. माझ्या संपूर्ण आयुष्यातील चैतन्य अनाथ झाले, माझे प्रेम हरवून गेले, माझी आशा विझून गेली, माझा विश्वास मरणपंथाला लागला आणि मी त्या मातकट पाण्याच्या प्रवाहात खाली वर गटांगळ्या खात होते: या वेदनादायक तासांचे वर्णन करणे शक्य नाही: सत्य गोष्ट अशी आहे, पाणी माझ्या आत्म्यापर्यंत आले; मी खोल चिखलात रुतून बसले: मला उभे रहाणे अशक्य झाले; मी खोल पाण्यात शिरले आणि पुराचे पाणी माझ्या डोक्यावरुन गेले.

# प्रकरण 27

उन्हे ढळत आली, मी डोके वर करून आजूबाजूला पाहिले, समोर भिंतीवर उन्हाचे कवडसे नाचत होते. मी स्वतःला प्रश्न विचारला, "०आता पुढे काय?"

"ताबडतोब थॉर्नफिल्ड सोडून निघून जा," झटकन उत्तर आले, मला ते सहन झाले नाही. हताशपणे मी कानावर हात ठेवले.

मी काही रोचेस्टरांची पत्नी झालेली नव्हते, ही त्यातल्यात्यात दिलासा देणारी गोष्ट होती. एका सुंदर स्वप्नातून मला जाग आली आणि सत्याची जाणीव झाली. माझे जगणे व्यर्थ आणि शुन्यवत झाल्यासारखे वाटत होते. रोचेस्टरांना, ताबडतोब सोडून जाण्याचा विचार, माझ्यासाठी असह्य होता.

पण माझ्यातील अंत:शक्तीने, मी असे करु शकते अशी ग्वाही दिली आणि मला केलेच पाहिजे याची जाणीव करून दिली. माझ्याच संकल्पाविरूद्ध माझा झगडा सुरू झाला. येऊ घातलेले दुःख टाळण्यासाठी मला दुर्बल राहणे आवडले असते. माझ्या सद्सद्विवेकबुद्धीचे, भावनेबरोबर युध्द सुरू झाले. सद्सद्विवेकबुद्धीने, भावनेचा् गळा आवळला आणि तंबी दिली की तिचे पाय अगोदरच चिखलात बुडले आहेत आणि ती लौकरच भावनेला दुःखाच्या दरीत लोटून देईल.

"त्यापेक्षा माझेच कुणीतरी तुकडे करा," मी काकुळतीला येऊन म्हणाले.

"नाही, कोणीही तुझ्या मदतीला येणार नाहीत, तुझे तुलाच स्वतःला संपवायला हवे. तुलाच धर्मगुरू बनून तुझ्या हृदयाचा बळी द्यावा लागेल."

या निर्मम न्यायदानाच्या विचार वारंवार मनात येऊन, मला माझ्या एकाकीपणाचे भय वाटले आणि मी उठून उभी राहिले. माझे डोके गरगरत होते, मला भुकेने आणि अशक्तपणामुळे मूर्च्छित झाल्यासारखे वाटले. मी दिवसभर काही

खाल्ले प्याले नव्हते. त्या दिवशी सकाळी मी नाश्ताही केला नव्हता. एक तीव्र वेदना मला जाणवली. मी खोलीत स्वतःला बंद करून घेतल्यापासून, कोणीही माझी विचारपूस केली नव्हती, ना मिसेस फेअरफॅक्सनी मला खाली बोलवायला आल्या, ना छोट्या ॲडेलने दार ठोठावले. “नशीबाने, ज्यांची साथ सोडलेली असते, त्यांना मित्र, नेहमीच विसरून जातात”, मी पुटपुटले, दाराचा बोल्ट काढला आणि खोलीबाहेर पडले. माझे पाय कशाला तरी अडखळले, अजून माझे डोके गरगरतच होते, माझा तोल गेला, पण मी जमिनीवर पडले नाही, एका हातांनी मला आधार दिला. मी पाहिलं, मिस्टर रोचेस्टर माझ्या बेडरूमच्या दरवाजासमोर खुर्चीत बसलेले दिसले.

“शेवटी तू खोलीबाहेर आलीस तर,” ते म्हणाले, बराच वेळ मी तुझी इथे वाट पहात आहे. आतून ना रडण्याचा आवाज येत नव्हता, ना काही हालचाल जाणवत होती. आणखी पांच मिनिटे वाट पाहून मी दरवाजा तोडून आत येणार होतो. मला टाळण्यासाठी, एकटीच बंद दाराआड, शोक करत बसली होतीस, त्यापेक्षा संतापाने तोंडावर माझी निर्भत्सना केली असतीस तर फार बरे झाले असते. तू मनस्वी मुलगी आहेस, उष्ण अश्रूंचा पूर येईल असे मला वाटत होते पण ते अश्रू माझ्या बाहीवर सांडायला हवे होते: ते जमिनीवर पडले किंवा तू रुमालाने पुसले असणार. नाही, माझी समज चुकीची होती, तू अजिबात रडली नाहीस. तुझे तोंड कोमेजून गेले आहे, डोळे थकलेले आहेत, पण अश्रू दिसत नाहीत. मला वाटते तुझे हृदय रक्ताचे अश्रू ढाळत असणार.”

“जेन, तू माझा धिक्कार केला नाहीस की तिरस्कार पण केला नाहीस किंवा काही कडवटपणे टोचून बोलली नाहीस. मन दुखावणारे किंवा मर्मभेदी असे बोलण्याऐवजी तुझ्या खोलीत तू शांत कशी काय बसली होतीस? एव्हढा

धक्कादायक प्रसंग आला तरी तू करीत थकलेल्या डोळ्यांनी तटस्थपणे माझ्याकडे पाहात आहेस. जेन मला, तुला असे कधीच दुखवायचं नव्हतं. एखाद्या माणसाचे आवडते कोकरू, जे त्यांच्या घासातला घास खात असे, अंगाखांद्यावर खेळत असे, त्याचा चुकीने कत्तलखान्यात बळी दिला, तर त्यांचा मालक जेव्हढा आपल्या भयंकर घोडचूकीवर पश्चात्ताप करेल त्यापेक्षा जास्त मला पश्र्चाताप मला होत आहे. तू मला कधीतरी माफ करशील काय?"

"त्या क्षणीच मी त्यांना तिथल्या तिथे माफ केले. त्यांचे डोळे पश्चातापदग्ध दिसत होते. त्यांच्या स्वरात खरी करुणा होती. त्यांच्या वागण्यात खंबीरपणा होता. चेतना जागृत होती; आणि, आणि याशिवाय, त्यांच्या दृष्टीक्षेपात निर्विवादपणे प्रेम होते. - मी त्यांना संपूर्ण क्षमा केली: पण शब्दातून व्यक्त केली नाही किंवा बाह्यतः दर्शवली नाही; पण माझ्या हृदयाच्या गाभ्यात त्यांच्यासाठी फक्त क्षमा होती."

"मी एक अत्यंत नीच माणूस आहे, हे तुला माहीत आहे काय, जेन?" त्यांनी खंतावून विचारले. मी काहीच उत्तर न दिल्याने आणि परिस्थितीसमोर मान तुकवल्याने ते आश्चर्यचकित झाला होते: त्याकरिता माझ्या इच्छेपेक्षा माझा दुबळेपणा कारण होता."

"होय सर," मी उत्तर दिले.

"मग तसे स्पष्टपणे आढेवेढे न घेता सांग" ते पुढे म्हणाले; "माझी गय करू नकोस."

"मी करू शकत नाही ; मी थकले आहे आणि आजारी आहे; मला थोडे पाणी हवे आहे."

ते नखशिखांत थरथरले, एक दीर्घ उसासा टाकला आणि मला उचलून जिन्यावरून खाली नेले. त्यांनी मला कोणत्या खोलीत नेले हे मला आधी कळले नाही. माझ्या डोळ्यासमोर अंधेरी आली. उन्हाळा असला तरी मी बर्फासारखी थंड

पडले होते. मिस्टर रोचेस्टरनी माझ्यासाठी वाइन आणली. ती मी चाखली आणि थोडा जीवात जीव आला. मग मला त्यांनी मला काहीतरी खायला दिले आणि मी भानावर आले. मी लायब्ररीत होते,

मि. रोचेस्टरांच्या खुर्चीवर बसले होते, ते माझ्या जवळच होते. "आता याक्षणी मला वेदनेशिवाय मृत्यू आला तर ती एक चांगली गोष्ट होईल," मी विचार केला,

"असे झाले तर मग, रोचेस्टरांच्या हृदयाशी माझ्या हृदयाच्या जुळलेल्या तारा तोडून टाकण्याचे प्रयत्न करावे लागणार नाहीत. मला आता त्यांना सोडून जावेच लागणार आहे पण मला त्यांना सोडून जायची इच्छा नाही, मी त्यांना सोडून जाऊ शकत नाही."

"तू आता कशी आहेस, जेन?" मिस्टर रोचेस्टरने मला विचारले.

"बरीच चांगली, सर; मी लवकरच पूर्णपणे बरी होईन."

"पुन्हा वाइनचा घोट घे, जेन."

मी आज्ञा पाळली; मग त्यांनी ग्लास टेबलावर ठेवला. माझ्यासमोर उभे राहिले आणि माझ्याकडे लक्षपूर्वक पाहिले; अचानक ते मागे वळले आणि पटकन खोलीत जाऊन लगेच परत आले; त्यांना माझे चुंबन घ्यायचे होते पण मला आठवले की ते निषिद्ध होते: मी माझे तोंड फिरवले आणि त्यांना दूर लोटले.

"काय! हे कसे शक्य आहे? ते पटकन मोठ्याने म्हणाले; "हं! आता मला समजले, तुला बर्थे मेसनच्या पतीचे चुंबन घ्यायचे नाही तरीही मी तुला मिठीत घेऊन तुझे चुंबन घेऊ शकतो?"

"काहीही झाले तरी, माझ्यासाठी ना ती जागा आहे, ना हक्क सर."

"का बरं, जेन? मी तुला बोलायला लावत नाही, मीच तुझ्या वतीने उत्तर देतो: "माझी पत्नी आहे, असे तू म्हणशील. बरोबर आहे ना?"

a

“होय, सर.”

“तू असाच विचार करत असशील, तर माझ्याबद्दल तुझे मत विचित्र आहे: तू मला पाताळयंत्री माणूस समजतेस, मुद्दाम सापळा रचून, तुझी फसवणूक करण्यासाठी, तुझा सन्मान हिरावून घेण्यासाठी आणि तुझा स्वाभिमान लुटण्यासाठी मी निःस्वार्थी प्रेमाचा आव आणत आहे, असे तुला वाटते. तू काहीच बोलत नाहीस: एक म्हणजे तू बोलण्याच्या परिस्थितीत नाहीस, तुझी शारीरिक आणि मानसिक अवस्था नाजुक झालेली आहे दुसरे म्हणजे माझ्यावर आरोप करण्याची, माझी निंदा करण्याची तुला अजून सवय नाही आणि शेवटचे म्हणजे तुला तुझे अश्रू ओघळू द्यायचे नाहीत. तू एखादा जरी शब्द बोललीस तरी त्यांचा बांध कधीही फुटू शकतो, तुला ते टाळायचे आहे आणि स्वतःची अजून जास्त शोभा करून घ्यायची नाही: आपण नेमकी काय भुमिका घ्यावी याचा तू विचार करत आहेस कारण बोलून काही उपयोग होणार नाही असे तुला वाटते. मी तुला बरोबर ओळखतो, माझे तुझ्याकडे लक्ष आहे.”

“सर,” मी म्हणाले, “मला तुम्हाला त्रास द्यायचा नाही आहे.”

माझा आवाज कंप पावत होता, मला थोडे थांबायला हवे होते.

“तू काय बोलत आहेस हे तुझ्या लक्षात येत नाही, तू मला उध्वस्त करण्याचा विचार करत आहेस. तू म्हणालीस की मी लग्न झालेला माणूस आहे म्हणून मला टाळायला हवे. तू माझ्या जवळ रहाणार नाहीस, माझे प्रेम तू नाकारत आहेस, माझ्यासाठी अनोळखी बनण्याचा तुझा विचार आहे, फक्त अँडेलची गव्हर्नेस बनून रहाण्याचा: जर मी कधी मित्रत्वाच्या भावनेने तुझ्याबरोबर काही बोललो आणि तुला माझ्यासाठी मैत्रीपूर्ण आस्था वाटली तर तू म्हणशील ---या माणसाने आपल्याला जवळजवळ ठेवलेली बाई बनवले आहे: मला बर्फ बनून या खडकापासून स्वतंत्र रहायला हवे आणि त्याप्रमाणे तू बर्फ बनशील.”

a

मी घसा साफ केला आवाजावर ताबा मिळवला आणि उत्तर दिले: “सर, माझ्यासाठी सर्व काही बदलले आहे आणि मलाही बदलले पाहिजे यात काही शंका नाही: भावनांविरुद्धची लढाई, आठवणींविरुद्धची लढाई टाळण्याचा एकच मार्ग आहे; ॲडेलसाठी दुसरी गव्हर्नेस असणे आवश्यक आहे, सर.”

“ॲडेल बोर्डिंग स्कूलमध्ये जाईल, हे मी अगोदरच ठरवले आहे. थॉर्नफिल्ड एक शापित वास्तू आहे. अचनच्या तंबूमध्ये जसे युध्दातील बळींची लूट भरली होती तसा हा एक तंबू आहे. इथे दिवसाढवळ्या जिवंतपणी मुठमाती दिली जाते. या दगडी नरकात एका भूताचे वास्तव्य आहे ते भूत सैतानाच्या सर्व सैन्यापेक्षा अधिक भयंकर आहे.

जेन तू इथे रहाणार नाहीस आणि मीसुध्दा. हा वाडा भुताने बाधीत आहे हे माहित असूनही तुला इथे आणले ही माझी चुक झाली. तुला या संदर्भात काहीही माहिती द्यायची नाही असा आदेश मी सर्वांना दिला होता. जर हे माहित असते की वाड्यात असे कोणी रहात आहे तर मला भीती वाटत होती की कोणीही गव्हर्नेस ॲडेलबरोबर रहाण्यास तयार झाली नसती आणि माझ्या योजनेप्रमाणे मला माझ्या वेड्या बायकोला इतरत्र कुठेही ठेवायचे नव्हते. तसे माझ्याकडे अजुनही जुने घर 'फर्न्डियर मॅनोर' आहे मात्र ते यापेक्षा अधिक निर्जन आणि जंगलात लपलेल्या ठिकाणी आहे. तिथे मी तिला सुरक्षितपणे बंद करू शकलो असतो; पण तेथील थंडगार, दमट वातावरण, तिच्या आरोग्यासाठी हानिकारक आहे, असे मला वाटले, म्हणून मी त्यासाठी नकार दिला: प्रत्येक खलनायकामध्ये त्यांचे स्वतःचे असे दुर्गुण असतात आणि माझ्याबाबतीत सांगायचे झाले तर मी कुणाच्याही जीवावर उठू शकत नाही भले मग तो माझा हाडवैरी का असेना.”

मला तुझ्यापासून तिचे अस्तित्व लपवायचे म्हणजे चांदकुडाच्या विषवृक्षावर लहान बाळाला कपड्यात गुंडाळून ठेवल्यासारखे होते. ते विष त्याला बाधल्याशिवाय थोडेच रहाणार होते? सैतानाच्या आजुबाजुला विष पसरलेले होते. यापुढे मी थॉर्नफिल्ड कॅसल बंद करेन. मुख्य दरवाजा टोकेरी खिळे मारुन बंद करेन. खालच्या खिडक्यांना फळया मारेन. मिसेस पूलला, माझ्या बायकोला सांभाळण्यासाठी, वर्षाकाठी दोनशे पौंड देईन. याला तू उधळपट्टी म्हणशील शिवाय तिच्या सोबतीला तिचा मुलगा ग्रिम्स्बी पण असेल पुन्हा कधी माझी बायको कुणाच्या जीवावर उठली तर त्यांच्या रक्षणासाठी.''

''सर,'' मी व्यत्यय आणला, ''तुम्ही या दुर्दैवी स्त्रीबाबत कठोर बनत आहात. तिच्याबद्दल द्वेषाने आणि हाडवैऱ्यासारखे खुनशीपणाने बोलत आहात: हा क्रूरपणा आहे. ती तिच्या वेडेपणासाठी जबाबदार नाही.''

''प्रिय जेन, तू कोणाबद्दल बोलत आहेस हे तुला ठाऊक नाही आणि मला पुन्हा वाईट ठरवित आहेस. ती वेडी आहे म्हणून मी तिचा तिरस्कार करतो असे नाही. तू वेडी असतीस तर मी तुझा तिरस्कार केला असता असे तुला वाटते का?''

''होय सर मी जर वेडी असते तर तुम्ही माझ्याशी असेच वागले असता.''

''तर मग तुझा समज चुकीचा आहे; तू मला ओळखत नाहीस आणि माझे प्रेम काय आहे हे तुला माहीत नाही. तुझ्या अणु रेणूंवर माझे प्रेम आहे. दुःखात, वेदनेत माझे प्रेम सतत तुझ्याबरोबर असेल. तुझे मन हा माझा खजिना आहे आणि ते तुटला फुटला तरी तो माझा खजिनाच असेल. तू संतापाने वेडीपिशी झालीस तर तुला जवळ करायला अंगावरील कोट नाही, तर माझे हात असतील. तू जरी माझ्या मिठीमध्ये रागावलेली असलीस, तरीही तू माझ्यासाठी मोहक असशील: काल, बर्थेने केल्याप्रमाणे तू माझ्यावर हल्ला जरी केलास तरी, मी प्रेमाने भरलेल्या माझ्या मिठीत तुझे स्वागत करेन. कधीही कुठेही तिरस्काराने मी दूर जाणार नाही: तू जेव्हा

प्रक्षुब्ध नसशील तेव्हा पहाऱ्याला नोकर, सेवेला नर्स ऐवजी फक्त मीच असेन. तू माझ्याकडे हसून पाहिले नाहीस तरी मी तुला कोमलतेने कुरवाळताना मी थकणार नाही. तुझ्या नजरेत माझी ओळख जरी पुसली गेली तरी तुझ्या डोळ्यात बघताना मी कंटाळणार नाही. पण मी असा विचार का करत आहे? थॉर्नफिल्ड मधून तुला बाहेर जायला का सांगत आहे? आणखी एक रात्र या ठिकाणी काढ आणि इथल्या दु:खाला, भीतीला कायमचा निरोप दे!

माझ्याकडे अशी जागा आहे जी अप्रिय आठवणी, छळ, कपट, निंदानालस्ती या साऱ्यांपासून दूर एक सुरक्षित अभयारण्य असेल."

"सर, ॲडेलला घेऊन जा," मी व्यत्यय आणला; ती तुम्हाला सोबत करेल."

"तुला काय म्हणायचे आहे, जेन? ॲडेल बोर्डिंग स्कूलमध्ये जाईल असे मी तुम्हाला सांगितले नव्हते का? आणि मला सोबतीला लहान मुलीची काय गरज आहे, जी मुलगी माझी नाही, एका फ्रेंच नर्तकीची अनौरस मुलगी आहे. तू मला परत परत तेच का सांगत आहेस? का तू मला ॲडेलची सोबत का सुचवत आहेस?"

"सर, तुम्ही निवृत्ती घेण्याबद्दल बोलत आहात; निवृत्ती आणि एकटेपणा तुमच्यासाठी खूप दुःखी असेल."

"एकटेपणा, एकटेपणा! त्यांनी चिडून पुनरावृत्ती केली. मी म्हणतो की आपण मुद्द्यावर यायला हवे. तुझ्या चेहऱ्यावरील गूढ भावनांचा मी अंदाज लावू शकत नाही. तू माझ्या सोबत माझा एकटेपणा वाटून घेण्यासाठी असणार आहेस. तुला समजते काय मी काय बोलत आहे?"

मी मान हलवली: या निःशब्द नकाराचा धोका पत्करण्यासाठी मला धैर्य गोळा करायला लागले. मिस्टर रोचेस्टर खूप उत्साहात होते. खोलीमध्ये भरभर चालत होते. अचानकपणे थांबले आणि एका जागी खिळल्यासारखे उभे राहिले. ते

माझ्याकडे बराच वेळ कठोरपणे पाहत होते. मी त्यांच्या चेहऱ्यावरून नजर हटवली आणि मी समोर शेगडीतील आगीवर केंद्रीत करत स्वतःला शांत करण्याचा प्रयत्न केला.

"जेनचा स्वभावाचा हिसका बघायचा असेल तर," शेवटी ते बोलले, त्यांच्या बोलण्यात माझ्या अपेक्षेपेक्षा जास्त शांतपणा होता, "रेशमाची गुंडी आतापर्यंत व्यवस्थित गुंडाळली जात होती पण मला कल्पना होती की गांठ पडेल आणि सर्व गुंतागुंत होईल, आता मनस्ताप होईल, चिडचिड होईल ज्याचा काही अंत नसेल, देवा ही गुंतागुंत सोडवण्याचा मार्ग मला दाखव."

ते पुन्हा चालू लागले; पण लवकरच ते पुन्हा माझ्यासमोर थांबले.

"जेन," ते मला म्हणाले, "तुला कारण ऐकायचे आहे का? " मग, माझ्या कानाजवळ आणून ते पुढे म्हणाले: "कारण, जर तुझी ऐकायची तयारी नसेल तर मी जबरदस्तीने ऐकायला भाग पाडेन."

त्यांचा स्वर कठोर होता, त्यांचा आविर्भाव, सगळे धरबंध तोडून हिंसेवर उतरण्याच्या सीमेवर होता. मी त्यांच्याकडे पाहिले अजून थोडे जरी उन्मादाला उत्तेजन मिळाले असते तर मग त्यांना सावरणे मला कठीण झाले असते. त्याच क्षणी त्यांना रोखणे गरजेचे होते: जरा जरी झिडकारण्याची, पलायन करण्याची अथवा घाबरण्याची क्रिया घडली असती तर सर्वच संपून गेले असते. मी आणि ते केले सुद्धा पण मी घाबरले नव्हते: थोडीसुद्धा घाबरले नव्हते, माझी आंतरिक शक्ती जागृत झाली, मला समजले की माझा त्यांच्यावर प्रभाव पडेल आणि या विचाराने मला धीर दिला. संकट धोकादायक होते पण त्या धोक्याचे मला आकर्षण वाटले. छोटी होडी वादळात वरखाली होतांना जसे हृदयात भरून येते तशी खळबळ मला जाणवली. मी मिस्टर रोचेस्टरचे हात घट्ट पकडले. आवळलेल्या मुठी सोडवल्या आणि हळूवारपणे म्हणाले: "खाली बसा; जोपर्यंत तुमची इच्छा आहे तोपर्यंत मी

a

तुमच्याबरोबर बोलेन आणि तुम्हाला जे काही सांगायचे आहे ते मी ऐकेन मग ते वाजवी असो वा नसो.”

ते बसले, पण शांत राहिले. मी मात्र अश्रू ढाळत होते. त्यांना रोखण्याचा मी खूप प्रयत्न केला कारण मला माहीत होते की रोचेस्टरना मला रडताना बघायला आवडणार नाही पण आता मला अश्रूंना रोखायचे नव्हते, मुक्तपणे त्यांना वाहताना पाहणे रोचेस्टरांसाठी कितीही त्रासदायक असले तरी त्यांना ते सोसणे भाग होते आणि मी हमसाहमशी रडू लागले.

लवकरच त्यांनी मला शांत होण्यासाठी कळकळीची विनंती केली. मी सांगितले जोपर्यंत ते रागावलेले आहेत तोपर्यंत मला अश्रू आवरता येणार नाहीत.

“पण मी रागावलेलो नाही, जेन,” ते मला म्हणाले, “मी फक्त तुझ्यावर खूप प्रेम करतो आणि आत्ताच तुझ्या चेहऱ्यावर इतके थंड आणि दृढ भाव होते की मला ते सहन होत नव्हते. आता शांत हो आणि डोळे कोरडे कर.”

त्यांच्या मृदू आवाजाने मला समजून आले की ते शांत झाले आहेत आणि मी पुन्हा शांत झाले. त्यांनी माझ्या खांद्यावर डोके टेकवण्याचा खूप प्रयत्न केला पण मी ते नाकारले. त्यांनी मला जवळ ओढले; मी त्यांना स्वतःला दूर केले.

“जेन, जेन,” त्यांनी साद घातली, त्यातील आर्तता मला अंतर्बाह्य हादरवून गेली, “माझ्यावर प्रेम करत नाहीस? माझे समाजातील स्थान, माझ्या बायकोला मिळणारा दर्जा, एव्हढा महत्त्वाचा होता? आता मी तुझा नवरा होण्यासाठी पात्र नाही, असे तुला वाटते? माझा स्पर्श सुद्धा तुला नकोसा झाला आहे?”

त्यांच्या या शब्दांनी माझे काळीज चिरत गेले; पण काय बोलू? काय करू? मी कदाचित काहीच बोलले नाही आणि काहीही केले नाही: त्यांच्या भावना अशा प्रकारे दुखावल्याबद्दल मला इतका पश्चात्ताप झाला होता की मी नुकत्याच केलेल्या जखमेवर लेप लावण्याची मला तीव्र इच्छा झाली.

“मी तुमच्यावर प्रेम करते,” मी म्हणाले, “पुर्वी पेक्षा खूपच जास्त: पण मला ते दाखवून द्यायचे नाही किंवा माझ्या भावनांना लाडावून ठेवायचे नाही; त्यांना व्यक्त करण्याची ही शेवटची वेळ आहे.”

“काय? शेवटची वेळ? जेन तू माझ्याबरोबर रहाणार आहेस. रोज भेटणार आहेस, आणि हो तू माझ्यावर प्रेम करतेस, आताच कबुली दिली आहेस, तरीही मग कायम थंड आणि दूर रहाणार?”

“नाही सर ; मला खात्री आहे की मी करू शकणार नाही. तसेच मला फक्त एक गोष्ट शक्य दिसते पण मी तुम्हाला ते काय आहे हे सांगितले तर तुमची चिडचिड होईल.”

“मग सांगून टाक; मला जरी राग आला तरी तुला रडण्याची कला अवगत आहे.”

“मिस्टर रोचेस्टर, मला तुम्हाला सोडून द्यायला पाहिजे.”

“किती काळ ? जेन, काही मिनिटांसाठी? तुझे विस्कटलेले केस सारखे करण्यासाठी की तापाने आजारी असलेला चेहरा धुऊन थोडे ताजेतवाने होण्यासाठी?”

“मला, ॲडेल आणि थॉर्नफिल्ड सोडून जायलाच पाहिजे. मला तुमच्यापासून कायमचे वेगळे झाले पाहिजे. मला नवीन ठिकाणी, अनोळखी लोकांच्या बरोबर, नवीन अस्तित्व सुरू करायला हवे.”

“नक्कीच, आणि मी तुला आधीच सांगितले आहे. माझ्यापासून वेगळे होण्याच्या तुझ्या वेड्या कल्पनेकडे मी दुर्लक्ष करीन. नाही, उलट, तू माझा एक भाग बनशील. तू ज्या नवीन अस्तित्वाबद्दल बोलत आहेस ते बरोबर आहे. तू अजूनही माझी पत्नी होशील: मी विवाहित नाही. तू मिसेस रोचेस्टर होशील—वास्तविक आणि नाममात्र दोन्ही. जोवर तू आणि मी जिवंत अस तोवर मी तुझाच असेन. माझा

दक्षिण फ्रान्समध्ये भूमध्य समुद्राच्या सानिध्यात एक पांढरा व्हिला आहे, तिथे आपण आनंदाने राहूया. मी तुझी फसवणूक करेन किंवा पत्नीचा दर्जा देणार नाही, अशी शंका देखील मनात आणू नकोस. जेन तू मान का हलवत आहेस? शहाण्यासारखा विचार कर, तू मला पुन्हा वेडा बनवणार आहेस काय?''

त्यांचा आवाज कंप पावत होता. हात पाय थरथरत होते, श्वासोच्छवास जलद चालला होता, डोळे चमकत होते: आणि तरीही मी बोलण्याचे धाडस केले.

"सर," मी म्हणाले, "तुमची बायको जिवंत आहे; आज सकाळी तुम्ही स्वतः हे घोषित केले आहे; तुमच्या इच्छेप्रमाणे मी तुमच्याबरोबर राहिले तरी मी तुमची धर्मपत्नी असणार नाही: या सत्याला काही वेगळे नाव दिले तर तो खोटेपणा ठरेल."

"जेन, तू विसरलीस की मी शांत आणि उदात्त स्वभावाचा माणूस नाही: माझ्याकडे सहनशक्ती कमी आहे, कृपा करून माझ्या हाताच्या नाडीवर बोट ठेवून ऐक, कशी थडाथड उडत आहे, सावध हो."

त्यांनी शर्टाची बाही वर केली आणि मनगट माझ्या हातात दिले. त्यांचा चेहरा क्षुब्ध झाला होते. मी सर्वच बाजूंनी अडचणीत आले होते. इतक्या टोकाच्या विरोधाला, त्यांची प्रतिक्रिया नक्कीच तीव्र असणार होती: पण त्यांची मागणी पूर्ण करण्याचा प्रश्नच उद्भवत नव्हता. अशा संकटाच्या वेळी प्रत्येक मनुष्यप्राणी जे करतो ते मी केले--आपल्यापेक्षा सामर्थ्यवान असणाऱ्याकडे मदत मदतीची याचना, मी माणसापेक्षा महान व्यक्तीकडून मदत मागितली: "देवा मला मदत कर." हे शब्द, माझ्या ओठातून स्वाभाविकपणे बाहेर पडले.

"मी मूर्ख आहे," मिस्टर रोचेस्टर अचानक मोठ्यांदा म्हणाले, "मी विवाहित नाही हे तिला सांगत राहिलो आहे पण कसा यांचे कारण दिले नाही. मी विसरून गेलो, की तिला या स्त्रीचे चारित्र्य माहिती नाही आणि आमच्या या घृणास्पद

a

विवाहाला कारणीभूत असणारी परिस्थितीची तिला काहीच कल्पना नाही. मला खात्री आहे जेन तुला माझी बाजू तेव्हा पटेल, जेव्हा तुला सर्व गोष्टी ज्ञात होतील. तुझा हात माझ्या हातात असू दे. तू माझ्या नजरेच्या टप्प्यात माझ्या जवळ आहेस याची मला खात्री होईल; मला माझी परिस्थिती थोडक्यात तुला सांगायची आहे; तू माझे ऐकून घेतेस का?"

"होय सर ; तुम्हाला हवे तेव्हढे तास मी ऐकायला तयार आहे."

"जेन, मी फक्त काही मिनिटांसाठी विचारत आहे. मी माझ्या कुटुंबातील सर्वात मोठा मुलगा नाही, मला एक मोठा भाऊ होता, असे तू ऐकले आहेस काय?"

"होय सर ; मिसेस फेअरफॅक्स मला बोलल्या होत्या."

"माझे वडील लालसी आणि कंजूष होते, या विषयी तू काही ऐकले होतेस काय?"

"होय सर."

"बरं! जेन, माझ्या वडिलांना त्यांच्या मालमत्तेचे विभाजन करून माझ्या वाट्याला काही भाग द्यावा, ही गोष्ट मान्य नव्हती; त्यांनी ठरवले होते की संपूर्ण इस्टेट माझ्या भावाच्या, रसेलच्या नावाने असेल आणि तरीही आपला एक मुलगा गरीब होईल हा विचार त्यांना सहन होत नव्हता. त्यांना माझे लग्न श्रीमंत मुलीशी लावून देऊन मला श्रीमंत बनवायचे होते आणि ते माझ्यासाठी एक मुली शोधू लागले. मिस्टर मेसन वेस्ट इंडीजमधील मोठे जमिनदार आणि व्यापारी त्यांचे जुने मित्र होते. माझ्या वडिलांना माहित होते की मिस्टर मेसन खूप मोठे प्रस्थ आहे. त्यांनी चौकशी केली त्यांना कळाले की मेसनना एक मुलगा आणि एक मुलगी आहे आणि ते जावयाला तीस हजार पौंड स्टर्लिंगचा हुंडा देतील. तेव्हढे माझ्यासाठी त्यांच्या दृष्टीने पुरेसे होते. मी कॉलेज सोडल्यावर माझ्यासाठी निवडलेल्या या वधूशी लग्न करण्यासाठी, मला जमैकाला पाठवण्यात आले. माझे वडील माझ्याशी हुंड्याबद्दल

a

बोलले नाहीत; पण त्यांनी मला सांगितले की मिस मेसन ही स्पॅनिश शहराची सौंदर्य सम्राज्ञी होती: ते खरे होते. ती ब्लाचे इंग्राम सारखी सुंदर होती; उंच, निमगोरी, मजबूत आणि देखणी. माझ्या सरदार घराण्यामुळे तिच्या कुटुंबीयांची आणि तिची लग्नला मान्यता होती; एका मोठ्या पार्टीमध्ये आमची भेट करण्यात आली. तिने अतिशय सुंदर कपडे घातले होते. मी तिला क्वचितच एकटे पाहिले आणि आमचे खूप कमी वेळा एकमेकांशी जिव्हाळ्याचे बोलणे झाले. तिच्या सौंदर्याने मी प्रभावित झालो होतो. तेथील उच्चभ्रू तरुण तिच्यावर फिदा होते आणि ते माझा हेवा करू लागले. मी चकित झालो, उत्तेजित झालो: माझ्या संवेदना उत्तेजित झाल्या आणि मी अज्ञानी आणि अननुभवी असल्याने मला वाटले की मी तिच्यावर प्रेम करतो.

समाजातील वेडी इर्षा, वागण्यातील उतावळेपणा, तारूण्यातील विषयासक्ती, विचारातील आंधळेपणा यापेक्षा मोठा, कोणता मुर्खपणा नाही जो माणसाला आततायी आणि अविचारी काम करायला भाग पाडतो. बर्थेच्या पालकांनी मला प्रोत्साहन दिले. तिच्यासाठी झुरणाऱ्या तरूणांवर मला विजय मिळवण्यासाठी मी इर्षा पणाला लावली, तिने मला आकर्षून घेतले आणि अशा प्रकारे मला स्वतःला तिला ओळखण्याची वेळ येण्यापूर्वीच आमचा विवाह संपन्न झाला. होय, जेव्हा मी या कृतीबद्दल विचार करतो तेव्हा मला स्वतःचा तिरस्कार वाटतो. मी तिच्यावर कधीही प्रेम केले नाही, तिचा आदर केला नाही, मी तिला साधे ओळखू शकलो नाही. मला खात्री नव्हती की तिच्यामध्ये एखादा सद्गुण आहे. मला तिच्या वागण्यात बोलण्यात, नम्रता, दया, प्रांजळपणा दिसून आला नाही-- आणि तरीही मी लग्न केले:-- मी मुर्खासारखे डोळे मिटून तिच्या बाह्य सौंदर्यावर भाळून लग्न केले; थोडे जरी मला भान असते---पण आता बोलून काय उपयोग आणि मी कुणाला सांगत आहे हे ध्यानात घेतले पाहिजे.”

a

“मी तिच्या आईला कधीही पाहिले नव्हते. मला वाटले त्या जिवंत नसाव्यात. हनिमूननंतर मला माझी चूक कळली. त्यांना वेड लागले होते, त्या एका वेड्यांच्या इस्पितळात होत्या. एक धाकटा भाऊ आईसारखा होता. ज्याला तू पाहिलेस आहेस तो मोठा भाऊ, त्याचे मात्र बहिणीवर प्रेम दिसते पण तोही मनाने कमकुवत आहे कदाचित एक दिवस त्याची पण अवस्था आईसारखी होऊ शकेल. तिच्या सर्व कुटुंबियांचा मी तिरस्कार करतो. माझ्या वडिलांना आणि माझ्या भावाला हे सर्व माहीत होते पण त्यांनी फक्त तीस हजार पौंडांचा विचार केला आणि माझ्याविरुद्ध रचलेल्या कटात सामील झाले.”

“हे धक्कादायक होते, माझ्यापासून लपवून माझा विश्वासघात केला. अजून मी माझ्या पत्नीचे अस्वाभाविक वर्तन सांगितलेले नाही: जेव्हा माझ्या लक्षात आले की आमचे स्वभाव भिन्न आहेत, तिचे मन अतिशय क्षुद्र आणि कोते आहे, काही उदात्त, उच्च मुल्ये समजून घेण्यास असमर्थ आहे, मग ती धारण करणे, त्यांचा विस्तार करणे ही गोष्ट तर अशक्यप्राय आहे. एखादी संध्याकाळ किंवा दिवसभरातील एखादा तास सुध्दा, तिच्यासोबत आनंदाने घालवणे अशक्य आहे. तिचा स्वभाव माझ्यापेक्षा वेगळा आहे. तिच्या आवडीनिवडी मला किळसवाण्या वाटतात. आमच्या मध्ये कोणतेही संभाषण अशक्य आहे, कारण मी कोणताही विषय निवडला, तरी मला लगेचच गावंढळ आणि बिनडोक सारखे उत्तर मिळत असे. उलट उत्तर देणे, मुर्खासारखी हुज्जत घालणे, यांने मी कंटाळलो. माझ्या नशिबात संसार सुख तर नव्हते. घरदार व्यवस्थितपणे ठेवायला नोकर मंडळी पण तिच्या सततच्या, रागाच्या, संतापाच्या उद्रेकामुळे आणि काहीतरी निरर्थक, विरोधाभासी, हुकूम काढण्याने कंटाळून सोडून गेली. मी सावरून घ्यायचा प्रयत्न करत होतो. मी वादविवाद टाळले, आक्षेप कमी केले. मान अपमान गिळून टाकला, मला वाटणारा तिटकारा, विरोधी भावना दाबून टाकली.

a

"जेन, मी तुला सर्व भयानक तपशील सांगून त्रास देऊ इच्छित नाही. मला जे म्हणायचे आहे त्यासाठी काही शब्द पुरेसे आहेत. तू पाहिलेल्या त्या स्त्रीसोबत मी चार वर्षे राहिलो आणि मी तुला खात्रीपूर्वक सांगतो, तिने माझ्या संयमाची चांगलीच परीक्षा घेतली. तिचे विसंगत वागणे दिवसागणिक वाढतच गेले त्याबरोबरच तिचे दुर्गुण उसळून वर आले. दुर्गुण इतके वाढले की त्यांना वठणीवर आणायला बळाचा वापर करणे भाग होते. पण मला क्रुरकर्मा व्हायचे नव्हते. अल्प बुध्दी आणि अत्यंत वाईट प्रवृत्ती, दोन्ही मला विनाशाच्या मार्गावर नेणाऱ्या होत्या. बर्थे मेसन तिच्या वेडसर आई प्रमाणे बनली होती. सर्व प्रकारच्या अपमानकारक आणि भयंकर वेदना, वागण्याचा धरबंध नसलेल्या उच्छृंखल स्त्रीशी विवाह केल्यामुळे माझ्या नशिबी आल्या होत्या.

"दरम्यान माझा भाऊ मरण पावला आणि माझे वडील लवकरच त्याच्यामागे गेले. एव्हाना आमच्या लग्नाला चार वर्षे झाली होती; आता मी श्रीमंत होतो आणि तरीही माझी अवस्था खूप दयनीय होती. एका ओंगळ, गलिच्छ, भ्रष्ट स्वभावाच्या स्त्रीशी माझे लग्न लागले होते. कायद्याच्या आणि समाजाच्या मान्यतेनुसार ती माझ्या जीवनाचा भाग होती. मी कोणत्याही कायदेशीर मार्गाने तिच्यापासून, सुटका करून घेऊ शकलो नाही: डॉक्टरांना समजले की माझी पत्नी वेडी होती:- जेन, तुला मी सांगतो आहे त्याचा तुला त्रास होत आहे असे दिसते; तू अस्वस्थ दिसत आहेस, उरलेले मी दुसऱ्या दिवशी सांगू काय?"

"नाही, सर, आपण पूर्ण करा; मला तुमची दया येते, मला तुमची मनापासून दया येते."

"जेन, काही लोकांसाठी दया ही इतकी अप्रिय आणि अपमानास्पद गोष्ट आहे की जे तुम्हाला दया दाखवतात, त्यांना ती त्यांच्यापाशी राहू दे असे सांगावेसे वाटते; कारण ज्यांच्यावर दु:खाचा प्रसंग आला आहे, त्यांच्या दु:खाची, त्यांना

कल्पना देखील नसते शिवाय अशा वेदनेचा ते तिरस्कार करतात. पण जेन, तुझी दया अशा प्रकारची नाही, तुझ्या संपूर्ण चेहऱ्यावर दयेची भावना दिसत आहे आणि तुझ्या डोळयातून ओसंडून वाहत आहे. माझे दुःख ऐकून तुझे हृदय भरून आलेले दिसत आहे, हात थरथरत आहेत: माझ्या प्रिये, तुझी दया जणू ख्रिस्ताची आई मदर मेरी आहे, जी पुत्रशोकाने दुःखी आहे मात्र तिने देखील सर्व मातांप्रमाणे, प्रसव वेदना सोसल्या होत्या. माझे दुःख ऐकून तुला होणाऱ्या वेदना, या माझ्या वरच्या प्रेमाचा जन्म होण्याच्या वेळेच्या प्रसव वेदनाच आहेत, लौकरच प्रेमाचा जन्म होईल, मी त्याचे हात पसरून स्वागत करतो.''

''सर, आपण थांबू नका. तुमची बायको वेडी आहे हे समजल्यावर तुम्ही काय केले?''

''जेन, मी निराशेच्या अगदी काठावर होतो पण अजून थोडाफार स्वाभिमान जिवंत होता. जगाच्या दृष्टीने माझ्या प्रतिष्ठेला काजळी फासली गेली होती पण मी स्वतःच्या नजरेत शुद्ध राहण्याचा संकल्प केला. शेवटी मी तिची हिंसक प्रवृत्ती आणि मानसिक अवस्था या दोषांचे स्वतःवरचे उत्तरदायित्व नाकारले पण समाजाच्या दृष्टीने आम्ही एकच होतो. रोज तिला पाहत होतो, ऐकत होतो: माझ्या सभोवतालच्या हवेत तिचे दूषित श्वास मिसळले होते याशिवाय मी तिचा कधीकाळी नवरा होतो आणि या गोष्टी आठवण तेव्हा आणि आताही माझ्यासाठी किळसवाणी आहे: मला याचीही जाणीव आहे की, ती जिवंत असेपर्यंत मला इतर कोणत्याही चांगल्या स्त्रीशी विवाह करणे अशक्य आहे शिवाय ती माझ्यापेक्षा पाच वर्षांनी मोठी आहे ही गोष्ट सुध्दा तिच्या घरच्यांनी आणि प्रत्यक्ष माझ्या वडिलांनी माझ्या पासून लपवली होती. जरी तिची मानसिक अवस्था नाजुक असली तरी तरी शारीरिक दृष्ट्या भक्कम आहे त्यामुळे ती माझ्यापेक्षा जास्त जगण्याची शक्यता आहे. त्यामुळे वयाच्या सव्विसाव्या वर्षी मी हताश झालो होतो.

a

“एका रात्री, बर्थे मेसनच्या किंचाळण्याने मला जाग आली; डॉक्टरांनी तिला वेडी घोषित केल्यापासून तिला कोंडून ठेवले होते. ती वेस्ट इंडिजमधील उष्ण रात्र होती, चक्रीवादळाची चाहुल देणारी, हवा गंधकाच्या वाफेसारखी वाटत होती, कुठेही थंडावा नव्हता, खिडकी उघडली तर डास आत आले, समुद्राच्या गाजेमुळे, हवेत भुकंपासारखी कंपने जाणवत होती, काळ्या ढगांनी आकाशात आक्रमण केले होते; तोफेच्या तप्त गोळ्याप्रमाणे लाल चंद्र, लाटांच्या वर चमकत होता आणि वादळापूर्वीची शेवटची नजर टाकून काळ्याकुट्ट ढगात लुप्त झाला. या जड वातावरणाने आणि या भयंकर दृश्याने मी शारीरिकदृष्ट्या भारावून गेलो होतो. कानात वेडीचे रडणे ओरडणे आणि शिव्याशाप घुमत राहिले होते. आता त्यात माझे नाव घेऊन ती माझा उद्धार करत राहिली. वेश्यांच्या तोंडी येणार नाही इतक्या गलिच्छ शिव्या तिच्यापाशी होत्या. माझी खोली तिच्यापासून बरीच लांब होती, तरी प्रत्येक शब्द माझ्या कानावर पडत होता. वेस्ट इंडिजमधील भिंती फारशा जाड नसतात. त्यामुळे तिचे लांडग्यासारखे गळा काढून ओरडणे ऐकायला येत होते.

“हे जीवन म्हणजे नरक आहे, मी म्हणालो. मला यातून सुटका करून घेण्याचा अधिकार आहे. या मर्त्य जीवनातील दुःखानी माझा आत्मा गुदमरत आहे. काही धर्मवेड्या लोकांच्या समजूतीप्रमाणे, अनंतकाळ पर्यंत धगधगत्या आगीत होरपळून जाण्याच्या शिक्षेची मला भीती वाटत नाही: माझ्या सद्यस्थितीपेक्षा भयंकर अशी कोणतीही स्थिती नरकातसुध्दा असणार नाही---मला हे देहाचे बंध तोडून देवाच्या घरी जाऊ दे.

“हे शब्द बोलून मी गुडघे टेकून एक बॉक्स उघडला ज्यामध्ये लोडेड पिस्तुलांची जोडी होती. मला स्वतःला मारायचे होते. पण ही इच्छा फक्त एक क्षण टिकली; कारण मी वेडा नव्हतो, असीम निराशेने, आत्महत्येचा विचार आला होता तसा निघून गेला.

a

“युरोपचा ताजा वारा महासागर ओलांडून वाहत होता.

तो उघड्या खिडकीतून आत शिरला. वादळ सुरू झाले आणि नंतर पाऊस, ढगांचा गडगडाट आणि विजांच्या कडकडाट बराच वेळ चालू होता नंतर आकाश पुन्हा स्वच्छ झाले. मी बागेत फेरफटका मारायला बाहेर पडलो. सर्वत्र पाणी साचले होते. संत्री, डाळिंबाच्या झाडांमधून पाणी ठिबकत होते. अननस भिजले होते. पहाट होत होती. माझे मन प्रसन्न झाले आणि मी एक संकल्प केला. जेन तू ऐकत आहेस ना? निसर्गाच्या सान्निध्यात, खऱ्या शहाणपणानेच मला मार्ग दाखवला.

“युरोपचा मंद वारा कुजबुजत होता. झाडांची पाने ताजेतवानी झाली होती आणि अटलांटिक महासागराच्या लाटा जोरजोराने उसळत होत्या: बऱ्याच काळापासून माझे मन कोमेजून गेले होते ते महासागराच्या आवाजाने पुन्हा फुलून आले. अंगात नव्याने शक्ती संचारत आहे असे वाटू लागले. माझा तहानलेला आत्मा शुध्द पाण्याच्या थेंबासाठी तळमळत होता. माझी आशेला नवचैतन्य लाभले. पुन्हा नव्याने जीवन सुरू करणे शक्य होईल असा विश्र्वास वाटू लागला. बागेतील फुलांच्या कमानीतून समुद्राकडे नजर टाकली. आकाशापेक्षा नीळा समुद्र: माझे जुने जग त्याच्या पलिकडे होते.

“युरोपला परत जावे अशी इच्छा बळावली: तिकडे कुणालाही इथे घडलेल्या घटना, माझ्यावर लादल्या गेलेल्या वेड्या पत्नीच्या ओझ्यासंदर्भात काहीही कल्पना नाही. तिला इंग्लंडला नेणे शक्य आहे. एकदा का तिला इंग्लंडला नेऊन आवश्यक ती खबरदारी आणि काळजी घेऊन थॉर्नफिल्डमध्ये बंद केले की मी पाहिजे तिकडं हिंडू फिरू शकेन आणि हवे असल्यास नवीन बंध जुळवता येतील.

ही स्त्री जिने तुला इतके दिवस त्रास दिला, तुझ्या नावाची बदनामी केली, तुझी इज्जत मातीला मिळवली, तुझे तारुण्य कलंकित केले, ती तुझी पत्नी नाही आणि तू तिचा नवरा नाहीस तरीही तिच्या गरजेनुसार आवश्यक ती योग्य काळजी

घेण्यासाठी व्यवस्था करून मानवतेच्या दृष्टीने योग्य असलेल्या सर्व गोष्टी करायला हव्यात. मात्र ती काय आहे याबद्दल मौन बाळग, कोणालाही ते रहस्य सांगू नको. तिला सुरक्षित आणि सोयीस्कर ठिकाणी ठेव. तिची अधिक अवनती होणार नाही याची काळजी घे आणि तिला तिच्या नशिबावर सोडून दे.

" त्यानुसार मी योजना आखली आणि तिचे तंतोतंत पालन केले. माझे वडील आणि मोठा भाऊ माझ्या लग्नाबद्दल त्यांच्या ओळखीच्या लोकांशी बोलले नव्हते कारण ज्या पहिल्या पत्रात मी त्यांना माझ्या लग्नाची माहिती दिली होती, त्या अगोदरच मला माझ्या लग्नाच्या परिणामांचे घृणास्पद अनुभव येऊ लागले होते. बर्थे मेसनच्या कुटुंबाबद्दल मला जे काही समजले होते, त्या सर्व गोष्टींवरून, मला माझ्यासमोर एक भयानक भवितव्य दिसले. मी माझ्या वडिलांना आणि भावाला ते गुप्त ठेवण्याची विनंती केली.

"लवकरच माझ्या वडिलांनी माझ्यासाठी निवडलेल्या पत्नीचे वागणे असे बेफाम झाले की त्यांना स्वतःला तिला आपली सून म्हणून ओळखण्यास लाज वाटली असती. हे लग्न उघड करण्याऐवजी, त्यांनी माझ्या इतकीच खबरदारी लपविण्यासाठी घेतली.

"नंतर मी तिला इंग्लंडला घेऊन आलो. जहाजात अशी कैदाशीण असणे, माझ्यासाठी खूप भयंकर होते. थॉर्नफिल्डमध्ये तिसऱ्या मजल्यावरील खोलीत तिची सोय केल्यानंतर, मला मोठा दिलासा मिळाला. गेली दहा वर्षे ती जागा जंगली श्र्वापदाची गुहा बनली आहे. मला तिची काळजी घेण्यात अडचण आली: मला अशा व्यक्तीची गरज होती जिच्यावर आपला पूर्ण विश्वास असेल अन्यथा, वेड्या स्त्रीचे उन्मादातील बरळणे उघड झाल्यास माझे रहस्य अपरिहार्यपणे उघडे झाले असते शिवाय काही दिवस ती शुध्दीत असायची तर काही आठवडेच्या आठवडे मला शिव्यांची लाखोली वाहत असायची. ज्यामुळे मला फसायला व्हायचे. शेवटी

मला ग्रिम्सबी-रिट्रीट येथे ग्रेस पूल सापडली. ती आणि डॉ. कार्टर, ज्यांनी मेसनवर त्यादिवशी मलमपट्टी केली होती, ह्याच दोन व्यक्ती आहेत, ज्यांना माझे रहस्य माहित आहे. मिसेस फेअरफॅक्सला काहीतरी संशय आला असावा पण त्यांना कधीच काही नेमके कळू शकले नाही. शेवटी ग्रेस समजूतदार आहे परंतु दुर्दैवाने अनेक वेळा त्यांची दक्षता अयशस्वी झाली आहे: त्यात त्यांचा थोडाफार दोष आहेच पण त्यांचे काम एव्हढे कठीण आहे की एखादी क्षुल्लक चुक महाग पडू शकते शिवाय ती वेडी स्त्री दुष्ट आणि धूर्त दोन्ही आहे. तिला सांभाळणाऱ्या मिसेस पूलच्या चुकांचा फायदा घेण्यात ती कधीही अपयशी ठरली नाही. एकदा तिने सुरा हिसकावून घेऊन स्वतःच्या भावावर हल्ला केला. दोनदा तिच्या खोलीची चावी हातोहात लांबवली: पहिल्या वेळी तिने मला माझ्या पलंगावर जाळण्याचा प्रयत्न केला, दुसऱ्या वेळी ती तुला भेटायला आली. देवानेच तुझे रक्षण केले. तुझ्या वरचा राग तिने लग्नाच्या बुरख्यावर काढला. कदाचित तिला तिच्या लग्नाची अस्पष्ट आठवण झाली असावी.

अन्यथा काय प्रसंग ओढवला असता याच्या कल्पनेने मला थरथरायला होते. आज सकाळी ती जशी माझ्याबरोबर झटापट करत होती तशी माझ्या प्रेयसीच्या जीवावर उठली असती तर या विचाराने माझे रक्त गोठते.”

“एकदा थॉर्नफिल्डमध्ये तुमच्या बायकोची व्यवस्था लावल्यावर तुम्ही काय केले? कुठे गेला?” मी विचारले.

“मी काय केले ? जेन, मी एकांड्या भुतासारखा भटकायला लागलो. देश विदेश पालथे घातले अगदी अमेरिकेत सुध्दा गेलो. मला माझ्यावर प्रेम करू शकेल अशी चांगली, हुशार स्त्री, पत्नी म्हणून हवी होती: जिला मी थॉर्नफिल्ड येथे सोडले होते तिच्या विरुद्ध स्वभावाची स्त्री मला हवी होती.

“सर, तुम्ही लग्न करू शकत नाही.”

“पण मी ते करण्याचा निर्धार केला होता. मला खात्री होती की मी करू शकतो आणि मला करायचे होते. जशी तुझी माझ्याकडून फसवणूक झाली तसा प्रथमतः माझा उद्देश कुणाची फसवणूक करण्याचा नव्हता. मला माझा भूतकाळ सांगायचा होता आणि माझे प्रस्ताव उघडपणे मांडायचे होते. मला हे स्पष्ट दिसत होते की मी प्रेम करण्यास आणि माझे प्रेम स्विकारण्याची तयारी असणारी स्त्री नक्कीच कोणीतरी आहे याविषयी मला कोणतीही शंका नव्हती. माझा शापित भुतकाळ समजून देखील, मला समजून घेणारी, स्विकारणारी, सक्षम स्त्री मला भेटेल असा माझा विश्वास होता.

“होय काय? “

“जेन, जेव्हा तू आस्थेने विचारपूस करतेस तेव्हा मला आनंद होतो. तुझ्या प्रश्नांची उत्तरे अपेक्षेपेक्षा संथ मिळाली तर तू अस्वस्थ होतेस जणू तुला समोरच्या माणसाचे मन वाचायचे असते. पुढे सांगण्यापूर्वी मला एक गोष्ट सांग, “तू नेहमी 'होय काय?' असे विचारत असतेस, त्यांचा नेमका अर्थ काय?”

“म्हणजे: पुढे काय झाले? तुम्ही नेमका कोणता मार्ग निवडला? याचे परिणाम झाले?”

“बरोबर; आणि तुला आता नेमके काय जाणून घ्यायचे आहे?

“अशी कोणी स्त्री तुम्हाला भेटली काय? तुम्ही तिला तुमच्या बरोबर लग्न करण्यासंबंधी विचारले काय? तिने काय उत्तर दिले?”

“मी तुला, मला आवडणारी एखादी भेटली काय आणि मी तिला लग्नासाठी विचारले काय ह्या बद्दल सांगू शकेन पण तिने मला काय उत्तर दिले ते अजून नियतीच्या पुस्तकात लिहायचे आहे. दहा वर्षे मी देशी विदेशी भटकत राहिलो. रशिया, इटली, फ्रान्स, कधी पीटर्सबर्गमध्ये तर कधी नेपल्स किंवा फ्लॉरेन्स पण बहुतेक वेळा पॅरिसमध्ये राहिलो. देवाने मला पैसाही भरपूर दिला. उच्चभ्रू

a

समाजातील सर्व लोकांमध्ये माझी उठबस होती. माझी हवी असलेली स्त्री मी इंग्लिश लेडीज्, फ्रेंच काउंटेस, इटालियन सिग्नोरास आणि जर्मन ग्रॅफिनेनमध्ये शोधली. पण मला सापडली नाही. काही वेळा एखादी ओझरती झलक, अनोखा आवाज अथवा दिलखेचक बांधा पाहून, मला माझ्या स्वप्नातील सुंदरी मिळाली असे वाटले पण तसे घडले नाही. लौकरच मी निराश झालो. तू असे समजू नकोस की मी शारीरिक सौंदर्य, बौद्धिक उंची, समाजातील स्थान किंवा संपत्ती या सर्वच दृष्टीने परिपूर्ण स्त्री शोधत होतो. मला फक्त अशी व्यक्ती हवी होती जी बर्थेच्या विरुद्ध असावी: मी शोधले पण मला जगात अशी एकही मुलगी सापडली नाही जी मला पत्नी म्हणून हवी असेल कारण मला वाईट लग्नाचे धोके आणि त्रास माहित होते. निराशेने मला बेपर्वा केले. मी उधळपट्टी केली पण दुर्व्यसन केले नाही. मला त्याचा तिरस्कार आहे: बर्थे या दुर्व्यसनाचे उदाहरण आहे. तिरस्कारामुळे अनेकदा माझ्या आनंदावर मर्यादा येत होत्या. मी बर्थेशी साम्य असलेल्या सर्व उपभोगांपासून स्वतःला दूर केले कारण असे केल्याने मी बर्थे आणि तिच्या दुर्गुणांच्या जवळ जाईन अशी माझी खात्री होती.

“तरीही मी एकटा राहू शकलो नाही. माझ्या उपपत्न्या होत्या.

पहिली सेलिन वारेन्स होती. आयुष्यात झालेल्या अनेक चुकांपैकी आणखी एक चूक, जी लक्षात आल्यावर माणूस स्वतःच्या नजरेतून उतरतो. ही कोण होती आणि आमचे प्रेमसंबंध कसे संपले हे तुला आधीच माहित आहे. त्यानंतर आणखी दोघी जणी आल्या: जियासिंटा नावाची एक इटालियन आणि क्लारा नावाची जर्मन. दोघीही अतिशय सुंदर मानल्या जात होत्या. काही आठवड्यामध्ये जियासिंटा, तत्वशून्य आणि हिंसक आहे हे लक्षात आले. तीन महिन्यांतच मी तिला कंटाळलो. क्लारा प्रामाणिक आणि सौम्य होती, परंतु, निर्बुद्ध, थंड आणि प्रभावहीन होती: जरा देखील माझ्या अपेक्षेप्रमाणे नव्हती. तिला पुरेशी रक्कम देऊन सभ्यपणे सुटका झाल्याने मला आनंद झाला. पण जेन, तुझ्या चेहऱ्यावरून असे दिसते आहे की तुझे

माझ्याबद्दल फारसे अनुकूल मत बनलेले नाही. तुला मी एक निष्ठूर,तत्त्वहीन, अनैतिक व्यक्ती आहे असे वाटत आहे: नाही का?"

"तुम्ही मला कधीकाळी मला तुम्ही आवडायचा आता मात्र माझा भ्रमनिरास झाला आहे. खरोखरच सर, तुम्हाला स्वतःला अशा प्रकारे, जगणे किमान गैर सुध्दा वाटत नाही: कधी एका स्त्री बरोबर तर कधी दुसऱ्या स्त्री बरोबर? शिवाय अगदी किरकोळ बाब असल्याप्रमाणे आपण कबुली देत आहात."

"जे काही माझ्याकडून घडले आहे, ते मला स्वतःला आवडले नाही. पण ते माझे अस्तित्व टिकवून ठेवण्यासाठी, परिस्थितीपुढे घातलेले लोटांगण होते. मला परत तिकडे वळायचे नाही. असा स्त्रियांसंबंधी व्यवहार म्हणजे, गुलाम विकत घेण्यापेक्षा वाईट आहे. दोन्हीही परिस्थिती पुढे लाचार असतात आणि अशा लोकांसोबत परिचित राहणे अपमानास्पद आहे. सेलीन, जियासिंटा आणि क्लारा यांच्यासोबत मी घालवलेल्या वेळेची आठवण आता मला आवडत नाही."

मला मिस्टर रोचेस्टरच्या शब्दांची सत्यता जाणवली आणि मी असा निष्कर्ष काढला की जर मी स्वतःला कधी स्वतःच्या मर्यादा विसरले असते आणि माझ्या लहानपणी शिकलेल्या तत्त्वांकडे कधी दुर्लक्ष करून कोणत्या तरी प्रलोभनाला बळी पडून अथवा फसवणूक होऊन, रोचेस्टरांच्या, या दुर्दैवी मुलींच्या पंक्तीला जाऊन बसले असते, तर माझी आठवण पण मिस्टर रोचेस्टरना या दुर्दैवी मुलींच्या आठवणी सारखी भ्रष्ट वाटली असती. अशी माझी धारणा झाली ती बोलून दाखवणे गरजेचे नव्हते. मी माझ्या पुरते ते जाणून घेणे महत्त्वाचे होते. शेवटच्या निवाड्याच्या वेळी मला त्याचा उपयोग झाला असता.

"जेन, आता तू ,पुढे काय झाले? असे का बरे विचारत नाही आहेस? मी अजून पूर्ण केले नाही. तू गंभीर दिसत आहेस, मला स्पष्टपणे दिसत आहे की तू अजूनही मला नाकारत आहेस; मी परत विषयाकडे येतो. गेल्या जानेवारीत, माझ्या

सर्व उपपत्न्यांपासून सुटका झाली. सततची भटकंती, निरुपयोगी व एकाकी जीवनामुळे माझे मन उदास आणि कठोर झाले आहे होते. माझा संपुर्ण स्त्रीजातीविषयी भ्रमनिरास झाला होता. खऱ्या दुनियेत विश्वासू, हुशार आणि प्रेमळ स्त्रिया अस्तित्वात आहेत यावर माझा विश्वास उरला नव्हता. काही कामानिमित्त मी इंग्लंडला परतलो.

‘‘एका संध्याकाळी मी थॉर्नफिल्ड हॉलकडे निघालो होतो. थॉर्नफिल्ड, तिरस्करणीय जागा जिथे मला शांती किंवा आनंद मिळण्याची अजिबात अपेक्षा नव्हती. अचानक मला एक छोटी आकृती गवताच्या मार्गावर काही पायऱ्यांवर शांतपणे बसलेली दिसली. मी बेपर्वाईने तिच्या समोरून गेलो: ती माझ्यासाठी काय असेल याची मला चाहूल लागली नव्हती. आपल्या अलौकिक बुद्धिमत्तेच्या जोरावर माझ्या चांगल्या/वाईट वर्तनाचा न्यायाधिश म्हणून न्याय करणारी, ती लहान आकृती साध्या वेशात तिथे वाट पहात होती. मेसरौरच्या अपघातानंतर ती आली आणि गंभीरपणे मला मदत देऊ केली. त्यावेळी सुध्दा मला तिची ओळख लागली नाही. लहान वय, सडपातळ बांधा, एखाद्या बुलबुल पक्षासारखा आवाजात गोडवा होता. मी संकटात असताना माझ्या समोर उभी राहिली. अधिकार वाणीने मला आपली मदत देऊ केली आणि दिली सुध्दा. ही छोटी परी जवळच असलेल्या, माझ्याच घरात रहात आहे, ती मला परत भेटेल हे जेव्हा मला समजले, ते चांगले वाटले नाहीतर तिला कुंपणाच्या मागे अदृश्य होतांना पाहणे मला दुःखदायक वाटले असते. जेन त्या संध्याकाळी मी तुला आलेले पाहिले, त्यावेळी तुला कल्पना नसेल की मी तुझाच विचार करत होतो. तुला पाहत होतो. दुसऱ्या दिवशी मी लपून तुला ॲडेलबरोबर खेळताना अर्धा तास तुमचे निरीक्षण करत होतो. मला आठवते की त्या दिवशी बर्फ पडत होता आणि तुम्ही बाहेर जाऊ शकत नव्हतात. मी माझ्या खोलीत होतो, मी दरवाजा अर्धवट बंद ठेवला होता: मी तुम्हाला पाहत होतो, तुमचे

बोलणे मला ऐकायला येत होते. तुझे लक्ष बाहेर होते, ॲडेल तुला काही सांगत होती, तरी तू बराच वेळ तिच्याबरोबर हसत खेळत होतीस, शेवटी ॲडेल तिथून निघून गेली. तुला परत तंद्रीत लागली: नंतर तू गॅलरीच्या दिशेने निघालीस, खिडकीतून बाहेर पडणारा हिमवर्षाव बघत, जोरदार वाऱ्याचा आवाज ऐकत तू हळुहळू चालत परत तुझ्या स्वप्नांच्या दुनियेत हरवून गेलीस. तुझा चेहरा प्रसन्न दिसत होता. सुंदर भविष्याची स्वप्ने, आशेच्या पंखावर बसून आकाशात झेप घेण्याची स्वप्ने, उधाणलेल्या लाटांनी मस्ती करायची स्वप्ने तू पहात असावीस. तेव्हढ्यात मिसेस फेअरफॅक्स, नोकरांशी बोलताना तुला ऐकू आले आणि तू स्वप्नांच्या दुनियेतून जागी झालीस. अतीव उत्सुकतेने तू स्वतःशीच हसलीस, ते हसणे तुझ्या मनात रेंगाळणाऱ्या अमुर्त संकल्पना स्वच्छ प्रकाशात पाहत, त्यातील अडथळयांवर मात करणारे होते: त्यातून असे जाणवत होते, माझ्या संकल्पना खूपच चांगल्या आहेत, पण त्या पुर्णतः अशक्यप्राय आहेत, हे विसरता कामा नये. माझ्या स्वप्नात जरी गुलाबी आकाश, पाना फुलांनी बहरलेली ईडनची बाग असली, तरी माझ्या मार्ग खडतर आहे; संकटांच्या वादळांशी मला झुंजावे लागेल. आणि तू लगबगीने खाली गेलीस आणि मिसेस फेअरफॅक्स कडे रिकाम्या वेळी काहीतरी काम करायला मागितलेस: मिसेस फेअरफॅक्सनी तुला बहुधा हिशोब लिहिण्याचे काम दिले असावे, नंतर तू माझ्या नजरेआड झालीस.

“ संध्याकाळची मी अधीरतेने वाट पाहत होतो, निदान तुला मला जवळ बोलावता आले असते. तुझ्या मध्ये एक लोकविलक्षण व्यक्तिमत्व दडलेले आहे असा मला संशय होता म्हणून मला त्याचा शोध घ्यायचा होता. जेव्हा तू खोलीत प्रवेश केलास तेव्हा एकाचवेळी थोडीसा लाजाळू पण स्वतंत्र बाणा तुझ्या दिसण्यातून आणि वागण्यातून जाणवत होता. आजच्याप्रमाणे, तेव्हाही तू जुन्या

a

पद्धतीचा पोशाख घातला होतास. मी तुला बोलते करण्याचा प्रयत्न केला: तुझ्यामध्ये विरोधाभास दिसत होता: तुझा पोशाख आणि शिष्टाचार अतिशय नियमबद्ध होते, स्वभाव विनम्र पण थोडा साशंक होता आणि एकंदरीत वर्तन मूलतः सुसंस्कृत होते परंतु समाजासाठी पुर्णपणे न रुळले गेल्याने काहीवेळा एखाद्या चुकीमुळे अडचणीत सापडण्याची शक्यता होती.

पण जेव्हा कोणी तुझ्याशी थेट बोलते, तेव्हा तुझ्या नजरेत उत्सुकता आणि धीटपणा असतो. बोलणाऱ्याच्या चेहऱ्यावर तुझी नजर खिळलेली असते: तुझी सामर्थ्यवान नजर अंत:करण्याचा ठाव घेते. लहान लहान प्रश्नांची उत्तरे तू पटकन आणि अचूक देतेस. लवकरच तुला माझी सवय झाली. मला विश्वास आहे, जेन, तुला, तुझ्या दु: खी आणि शीघ्रकोपी मालकाबद्दल सहानुभूती वाटली असावी, कारण खूप लौकरच तुझे वागणे आनंदी, मोकळे आणि प्रसन्न बनले: मी कधी गुरगुरत असलो तरी तू त्यावर आश्चर्य, भीती, कंटाळा किंवा नाराजी दर्शविली नाहीस. तू माझ्याकडे पाहून काही वेळा स्मितहास्य करायचीस, त्यामध्ये एकप्रकारची सहजसुंदरता होती.

“ते पाहून मला आनंद झाला. माझी उत्सुकता ताणली गेली. मला तुझा सहवास हवाहवासा वाटू लागला होता तथापि मी तुला बराच काळ तुझ्यापासून लांब राहिलो अगदी क्वचितच तुझ्या सोबत राहण्याचे मी ठरवले होते. माझी पारख उत्तम आहे. तुझ्याशी अती परिचित होऊन, सहवासातील माधुर्य कमी करण्यापेक्षा, मला आनंदाचा काळ लांबवायचा होता. शिवाय मला भीती वाटली की, या फुलाला अगदी मोकळेपणाने हाताळून, त्याचे तेज कोमेजून जाईल, त्याच्या ताजेपणाची गोड मोहिनी नाहीशी होईल. पण मला कल्पना नव्हती की हा नाशवंत बहर नाही, अविनाशी हिऱ्याप्रमाणे याचे तेज शाश्वत आहे.

a

“मला हे देखील जाणून घ्यायचे होते की, मी तुला टाळले, तर तू माझा शोध घेशील काय? माग काढशील काय?---पण तू तसे काही केले नाहीस, तू अभ्यासाच्या खोलीत तुझ्या टेबलाप्रमाणे शांत राहिलीस. जर कधी योगायोगाने मी तुला भेटलो तर तू माझ्या समोरून चालत जाताना, फक्त आदर म्हणून मला थोडासे झुकून अभिवादन करायचीस. हे सर्व करताना तू नेहमीपेक्षा थोडी गंभीर दिसत होतीस: तू निराश किंवा आजारी दिसत नव्हतीस पण आनंदी सुध्दा दिसत नव्हतीस कारण भविष्याबद्दल फारसे आशादायक चित्र दिसत नव्हते आणि वर्तमानात खरा आनंद नव्हता. जर तू कधी माझ्याबद्दल विचार करत असशील तर नेमका काय विचार करतेस, हे मला जाणून घ्यायला आवडले असते: त्यासाठी मी परत तुझ्याकडे लक्ष देण्यास सुरुवात केली. आपण बोलत असताना तुझ्या दृष्टीक्षेपात आनंद दिसत होता, वागण्यात प्रेमळपणा डोकावत होता. तुझा स्वभाव मनमिळाऊ होता हे मला कळाले. निःशब्द शाळेची खोली आणि तुझ्या आयुष्यातील एकसुरीपणा यांनी तू उदास होतीस. मी तुझ्याबरोबर दयाळूपणा वागण्याचे ठरवले आणि त्यात मला देखील आनंद मिळत होता आणि तू सुद्धा समाधानी दिसू लागली होतीस. चेहऱ्यावरचा गंभीर भाव लुप्त होऊन मृदू भाव उमटले, डोळे हसरे झाले.

“मला 'मि. रोचेस्टर', हे नाव तुझ्या, कृतज्ञ आणि आनंदी आवाजात ऐकताना खूप आवडू लागले. जेन, तुला भेटण्यात मला आनंद वाटायला लागला होता: मात्र माझ्या विसंगत वागण्याविषयी शंका आल्याने तू सावध भुमिका घेतली होतीस.

माझा लहरी स्वभाव, माझा नेमका हेतू, माझी नेमकी भुमिका याविषयी तुझ्या मनात प्रश्नचिन्ह उभे होते. मी कडक शिस्तीचा मालक असेन की उदार मित्र हयाचे तुला कोडे पडले होते. पण मला आता तू फारच आवडू लागली होतीस, अनेकदा मला कडक शिस्तीचा मालक बनण्याचे ढोंग करावे लागत होते आणि,

जेव्हा मी मनापासून माझा हात पुढे करत असे, तेव्हा तुझ्या चेहरा ताज्या फुलासारखा टवटवीत होऊन, आनंदाने आणि तेजाने उजळून निघत असे, अशा वेळी तुला मिठीत घेण्याचा मोह टाळण्यासाठी मला खूपच त्रास होत होता.''

''त्या दिवसांबद्दल माझ्याशी पुन्हा बोलू नका, सर,'' मी आडवे येत अश्रू पुसले.

त्यांच्या शब्दांनी मला छळले, कारण मला माहित होते की लवकरच मला काय करायचे आहे. या सर्व आठवणी आणि मिस्टर रोचेस्टर काय अनुभवत होते, या सर्व खुलाशांमुळे माझे कार्य अधिक कठीण झाले.

''तू बरोबर आहेस, जेन,'' त्यांनी उत्तर दिले; वर्तमान सुरक्षित आणि भविष्य अधिक सुंदर असताना भूतकाळात का राहायचे?''

हे अभिमानास्पद विधान ऐकून मी हादरून गेले.

''तुला परिस्थिती चांगली समजते, नाही का? ते पुढे बोलत राहिले. गेली अनेक वर्षे असह्य दु:ख आणि उदासवाण्या एकांतवासात काढल्यावर आता कुठे मला मला माझे खरे प्रेम सापडले आहे. मला तू मिळालीस. तुला माझ्याबद्दल सहानुभूती आहे, तू माझ्या जीवनात चांगला देवदूत बनून आली आहेस. मी तुझ्याशी प्रेमाच्या मजबूत धाग्यानी जोडला गेलो आहे. तू सुंदर आहेस, प्रतिभासंपन्न आहेस: माझ्या मनातील उत्कट प्रेम, गंभीरपणे तुझ्यावर एकवटले आहे. माझ्या जीवनाच्या केंद्रस्थानी फक्त तूच आहेस, तूच माझ्या जीवनातील वसंत आहेस. माझे सर्व अस्तित्व तुझ्याशी जोडले गेले आहे: खऱ्या प्रेमाच्या, पवित्र आणि दिव्य ज्योतीने

a

आपल्या दोघांचे अस्तित्व एक बनवले आहे, याची मला जाणीव झाली आणि हे लक्षात आल्यावर मी तुझ्या बरोबर लग्न करण्याचा निर्णय घेतला: माझ्यासाठी, मला अगोदरच एक पत्नी आहे हे सांगणे, म्हणजे एक क्रूर चेष्टा होती: तुला आता माहित आहे की माझ्याकडे फक्त एक भयानक भूत आहे.

तुला फसवण्याचा प्रयत्न करणे ही माझी चुक होती पण मला तुझ्या हट्टी आणि दुराग्रही स्वभावाची भीती वाटली. तुझ्या मनात फार पुर्वी पासून रुजलेल्या संकल्पनांची भीती वाटली: तुझ्या विश्र्वासाला धक्का देण्यापेक्षा, मला तुझी सुरक्षितता महत्त्वाची वाटत होती. पण हा माझा भित्रेपणा होता: सर्वात आधी, मला तुझ्या कुलीन आणि विशाल मनाला आवाहन करायला हवे होते, जसे मी आता करत आहे---काहीही आडपडदा न ठेवता माझे दुःख तुला सांगायला हवे होते. मी उच्च आणि सन्मानजनक आयुष्यासाठी भुकेला आहे, हे तुला समजावून सांगण्याची गरज होती. लग्नाची मागणी घालण्यापूर्वी, मी तुझ्यावर, कुठल्याही अटी शर्ती विना, पुर्ण निष्ठेने प्रेम करतो, हे सांगणे गरजेचे होते. मी तुला विचारायला हवे होते, माझ्या तुझ्या प्रती असलेल्या निष्ठेच्या वचनाचा स्विकार कर आणि तू मला तसे वचन दे : जेन--आता तू वचन देशील काय?”

क्षणभर शांतता पसरली.

“तू गप्प का आहेस, जेन?” त्यांनी मला विचारले.

माझ्यासाठी या प्रश्नाचे उत्तर देणे म्हणजे एक अग्नीदिव्य होते, जळत्या आगीतून लोखंडाची तप्त कांब उचलण्यासारखे. एक भयंकर क्षण: संघर्ष, भय, वेदना आणि दुःखाने भरलेला! कुणीही हेवा करावा, असे प्रेम मला लाभले होते. ज्यांनी माझ्यावर एव्हढे प्रेम केले, त्यांची मी मनोभावे पूजा करत होते: आता मात्र माझी पूजा, मुर्तीसह विसर्जित करण्याची वेळ आली होती. आता एकच कटू कर्तव्य उरले होते—”निर्गमन!”

“जेन, तुला समजले? मला तुझ्याकडून काय हवे आहे? फक्त एक वचन—‘मी तुमचीच आहे, मि. रोचेस्टर’”

“मि. रोचेस्टर, मी तुमची होणार नाही.”

आणखी मोठी शांतता.

“जेन,” रोचेस्टरनी पुन्हा सुरुवात केली, त्यातील हळुवारपणाने मी पुरती तुटून गेले, काहीतरी विपरीत घडण्याच्या भीतीने, काळीज दगडासारखे गार पडले, कारण त्या शांत आवाजाच्या आड सिंहाची गर्जना लपली होती; “जेन, तुला असे म्हणायचे आहे, या जगात तू एका मार्गाने जाणार आणि मी दुसऱ्या मार्गाने जायचे?”

“होय सर.”

“जेन,” खाली वाकून त्यांनी मला मिठीत घेतले.

“तुला आताही हेच म्हणायचे आहे?”

“होय सर.”

“आणि आता?” हळूवारपणे माझ्या कपाळाचे आणि गालाचे चुंबन घेतले.

“होय,” संयमाने स्वतःला सोडवून घेत मी म्हणाले.

“अरे! जेन, हे क्रूर आहे! ते वाईट आहे ! माझ्यावर प्रेम करणं चुकीचं ठरणार नाही.”

“तुला आज्ञा पाळावी लागेल.”

त्यांच्या उंचावलेल्या कपाळावर रानटीपणा दिसू लागला: ते उठले पण थोडा स्वतःवर ताबा मिळवला. मी आधारासाठी खुर्चीची पाठ धरून ठेवली: मी थरथरले, मला भीती वाटली—पण मी भीतीवर मात केली.

“एक मिनिट थांब, जेन. तू गेल्यावर, माझ्या दुःखी जीवनाकडे एक नजर टाक; सर्व आनंद तुझ्याबरोबर निघून जाईल. मग इथे काय उरेल? बायको म्हणून माझ्याकडे माडीवर एक वेडी आहे: तू कदाचित चर्चयार्डच्या स्मशानातील एखादे

प्रेत दाखवशील. मी काय करावे जेन? मी सहचरी कुठे शोधावी? माझी आशा कशी परत मिळवायची?”

“सर तुम्ही माझ्यासारखे करा; देवावर आणि स्वतःवर विश्वास ठेवा: स्वर्गावर विश्वास ठेवा आणि आशा करा की तिथे आपली भेट होईल.”

“मग तू माघार घेणार नाहीस?”

“नाही सर.”

“मग तू मला दुःखी जगण्याची, शापित मरण्याची शिक्षा देत आहेस?” त्यांचा आवाज चढला होता.

“मी तुम्हाला शुद्ध जगण्याचा सल्ला देते, आणि मला तुम्हाला शांतपणे मरताना पहायचे आहे.”

“तू माझ्यापासून माझे प्रेम आणि निर्दोषपणा ओरबाडून टाकत आहेस : परत मला वासनेच्या मार्गावर वळायला आणि व्यसनांच्या आहारी जायला भाग पाडत आहेस.”

“सर, जसे मी माझ्या नशीबाला स्वतःहून कवटाळले नाही तसेच तुमचे नशीब, मी तुमच्यावर लादले नाही. आपण सारे दुःख सहन करण्यासाठी आणि प्रयत्नांशी पराकाष्ठा करण्यासाठी जन्माला आलो आहोत, त्यात तुम्हीही आहात आणि मी सुद्धा: त्यानुसार वागा. मी तुम्हाला विसरून जाण्या अगोदरच तुम्ही मला विसरून जाल.”

“अशा बोलण्याने तू मला खोटारडा ठरवत आहेस, तू माझ्या सन्मानाला गालबोट लावत आहेस. मी म्हणतो मी बदलू शकत नाही: तू मला माझ्या तोंडावर सांगितलेस तर मी मी लवकरच बदलेन; तुझा न्याय, माझ्यासाठी अन्यायकारक आहे आणि तुझ्या कल्पना किती दुराग्रही आहेत, हे तुझेच आचरण सिद्ध करते. जो कायदा थोडासा मोडल्याने, कुणाचेही फारसे नुकसान होत नसेल, तर आपल्याच एका

सहकाऱ्याची घोर निराशा करण्यापेक्षा असा कायदा मोडणे चांगले नाही काय? तुझे तर कोणी जवळचे नातेवाईक नाहीत किंवा कोणी परिचित पण नाहीत, तरी तू त्यांच्या भीतीने घाबरून, तू माझ्यासोबत रहाण्यास नकार देत आहेस."

ते खरे होते; आणि ते बोलत असताना, माझी सद्सदविवेकबुद्धी आणि तर्कशक्ती दोन्हीही माझ्या विरोधात बंड करून उठल्या; माझ्या भावनांना सामिल होऊन मला समजावू लागल्या, "थोडातरी त्यांच्या दु:खाचा विचार कर. तू त्यांना सोडून गेल्यावर, त्यांच्यावर कोसळणाऱ्या संकटांचा विचार कर: त्यांचा अविचारी स्वभाव लक्षात घे; निराशेनंतरच्या त्यांच्या बेपर्वाईचा विचार कर--त्यांना शांत कर; त्यांना वाचव; त्यांच्यावर प्रेम कर: त्यांना सांग, तू त्यांच्यावर प्रेम करतेस आणि तू त्यांची होशील. जगाला तुझे काय घेणेदेणे पडले आहे? किंवा तुझ्या वागण्याने कोण दुखावले जाणार आहे?"

तरीही माझा निर्धार पक्का होता, मी स्वतःला समजावले, "माझी मी काळजी घेईन. मी अत्यंत एकाकी आहे, कोणी सुहृद माझ्यासोबत नाही, अशा परिस्थितीत माझा निभाव लागणे कठीण गोष्ट आहे, म्हणून अशा वेळी मी स्वतः, स्वतःचा आदर करेन. माणसांना मंजूर असलेला, देवाचा कायदा मी मानेन. जी तत्वे मला मी शहाणी असतांना शिकले आहे, त्यांचे मी पालन करेन. असे वेड्यासारखे वागणार नाही. जेव्हा प्रलोभन नसते, तेव्हा कायद्यांची, तत्वांची फारशी गरज नसते: ते यासारख्या परिस्थितीत, महत्वाचे ठरतात. जेव्हा शरीर आणि आत्मा त्यांच्या शिष्टसंमत आचारांविरुद्ध युध्द पुकारतो तेव्हा मात्र ते कठोर असतात. त्यांचे उल्लंघन करणे शक्य नसते."

माझ्या वैयक्तिक सोयीनुसार मी त्यांना तोडले तर त्यांची किंमत काय राहिल? त्यांची किंमत आहे - म्हणून मी नेहमीच त्यावर आजवर विश्वास ठेवला आहे जर आता माझा यावर विश्वास बसत नसेल तर मी वेडी आहे असे समजणे भाग

आहे: माझे रक्त तापलेले आहे आणि माझ्या हृदय जोरजोराने जास्त धडधडत आहे. या क्षणी माझ्या मदतीला फक्त यापुर्वी घेतलेला निर्णय आणि त्याबाबतचा निर्धार या दोनच गोष्टी होत्या: मी माझ्या निर्णयावर ठाम होते.

होय, माझा निर्णय झाला होता; मिस्टर रोचेस्टर माझा चेहरा वाचत होते. माझा निर्णय त्यांच्या लक्षात आला. त्यांच्या रागाने परमावधी गाठली: काही क्षणांसाठी त्यांना तो सोडणे भाग होते. ते माझ्याजवळ आले माझा हात घट्ट पकडला आणि कमरेला धरून जवळ ओढले. त्यांच्या जळजळीत नजरेने मला खाऊन टाकतात की काय असे वाटत होते. माझ्या अंगातील बळ निघून गेले, पेटलेल्या भट्टी समोर, दुष्काळाने वाळलेल्या काडी कचऱ्यात सारखी माझी अवस्था झाली होती. पण मनाने मी खंबीर होते. माझा अंतरात्मा, माझ्या बरोबर होता आणि त्यामुळे माझ्या सुरक्षिततेची मला खात्री होती. सुदैवाने अंतरात्मा दुभाषाचे काम करतो, बाह्यतः त्याची जाणीव होत नाही पण डोळ्यावाटे सत्य कथन करतो. माझी नजर त्यांच्या डोळयांना भिडली. त्यांच्या संतापलेल्या चेहऱ्याकडे पहाताना, नकळतपणे एक उसासा माझ्या तोंडून निघून गेला: त्यांची पकड वेदनादायी होती आणि माझी होती नव्हती तेव्हढी शक्ती जवळजवळ संपत आली होती.

"कधीच नाही," दात ओठ खात रोचेस्टर म्हणाले, "एवढी दुबळी पण हटवादी व्यक्ती मी कधीच पाहिली नाही." असे म्हणत त्यांनी मला गदागदा हलवले, आणि पुढे म्हणाले, "मी तिला माझ्या एका बोटाने वाकवू शकतो: आणि जर मी तिला वाकवले, मोडून, तोडून टाकले, तर ती माझे काय वाकडे करू शकणार आहे?"

"तिच्या डोळे काय सांगतात पहा: पहा एक प्रखर दृढनिश्चय आणि स्वतंत्र वृत्ती त्यात डोकावत आहे आणि मला आव्हान देत आहे, त्यात धैर्यापेक्षा आणखी काहीतरी आहे--दुर्दम्य विजयाची खूण. हा सुंदर जंगली पक्षी जर मी पिंजऱ्यात बंद

a

करून ठेवला तर मी फक्त पिंजऱ्याचा मालक असेन, म्हणून रागाने पिंजरा तोडला मोडला तर कैदी सुटून जाईल. मी विजेता असेन जिंकलेले घर माझ्यापाशी असेल पण त्यातील जीव मी त्या घरावरील मालकी जाहीर करण्यापूर्वी स्वर्गात उडून जाईल आणि तो पक्षी म्हणजे, तूच आहेस. जेन, मी तुझे शरीर नष्ट करु शकेन पण तुझ्या आत्म्याला मला स्पर्श सुद्धा करता येणार नाही. तुझा आत्मा, तुझी इच्छा आणि शक्तीसह, सद्गुण आणि शुद्धतेसह मला हवा आहे: फक्त तुझा नाजुक देह नको आहे. तुला हवे असल्यास एक नाजुक गिरकी घेऊन तू माझ्याकडे येऊन माझ्या हृदयाजवळ उबदार घरट्यात राहू शकतेस: तुझ्या इच्छेविरुद्ध तुला पकडले तर तू आल्याची जाणीव होण्यापूर्वीच तू निसटून जाशील---पुन्हा कधीच न परतण्यासाठी. ओ! ये, जेन ये!"

हे शब्द बोलून त्यांनी मला त्यांच्या घट्ट मिठीतून सोडून दिले आणि फक्त माझ्याकडे पाहिले. त्या दृष्टिक्षेपाला प्रतिकार करणे त्यांच्या वेड्यापिश्या मिठीपेक्षा कठीण होते: आता फक्त एखादी मूर्ख व्यक्तीच त्यांच्या आविर्भावाला बळी पडू शकली असती. मी हिंमत दाखवली होती. त्यांचा राग गोंधळून गेला होता. मला आता त्यांचे दु:ख त्यांच्यापाशी ठेऊन तिथून जायला हवे होते--आणि मी निघाले.

"तू जात आहेस, जेन?"

"मी जात आहे सर."

"तू मला सोडून जात आहेस?"

"हो."

"तू परत येणार नाहीस?—माझे दुःख हलके करण्यासाठी, मला वाचवण्यासाठी?--माझे अथांग प्रेम, माझे भयंकर दु:ख, माझी वेडी प्रार्थना, हे सर्व तुझ्यासाठी काहीच नाही काय?"

शब्दातून व्यक्त करणे अशक्य, असे कारुण्य त्यांच्या स्वरात होते.

“मी जात आहे,” असे, पुन्हा एकदा ठामपणे सांगणे अत्यंत अवघड गोष्ट होती.

“जेन!”

“मिस्टर रोचेस्टर.”

“निघून जा--माझी संमती आहे-- पण लक्षात ठेव, तू मला इथे दु:खात सोडून जात आहेस. जा आपल्या खोलीत जा; एकदा मी काय बोललो त्यावर नीट विचार कर, आणि जेन, माझ्या दु:खावर एकदा नजर टाक--माझा विचार कर.”

त्यांनी पाठ फिरवली आणि सोफ्यावर तोंड टेकवले, . “ओह, जेन! माझी आशा - माझे प्रेम - माझे जीवन!” दुःखाने व्याकूळ शब्द त्यांच्या तोंडातून फुटले. तेवढ्यात एक खोल, मोठा हुंदका ऐकू आला.

मी आधीच दारापाशी पोहोचले होते, पण मी मागे फिरले--मी माघार घेतल्यासारखा दृढनिश्चय करून माझी पावले मागे घेतली. मी त्यांच्या बाजूला गुडघे टेकले. मी त्यांचा चेहरा वर करून माझ्या बाजूला वळवला, मी त्यांच्या गालाचे चुंबन घेतले आणि माझ्या हाताने त्याचे केस सारखे केले.

“प्रिय रोचेस्टर, देवाचे कृपाशीर्वाद तुम्हाला मिळोत! मी रडू लागले, देव तुम्हाला कुठल्याही हानीपासून आणि चुकीच्या गोष्टींपासून दूर ठेवेल - तुम्हाला योग्य मार्गदर्शन करेल, तुमचे सांत्वन करेल - तुम्ही माझ्यावर केलेल्या तुमच्या पूर्वीच्या दयाळूपणाबद्दल तुम्हाला चांगले फळ देईल.”

. . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . .

a

त्या रात्री मला झोप येईल असे वाटले नव्हते; पण पलंगावर पडल्यापडल्या झोप आली आणि मला स्वप्न पडले: मी गेट्सशेडच्या लाल खोलीत होते. अंधेरी रात्र होती, मनात एक विचित्र भीती वाटत होती. खूप वर्षांपूर्वी इथे मी एक प्रकाशझोत पाहिला होता आणि माझी शुध्द हरपली होती तसाच प्रकाश, भिंतीवरून सरकत सरकत छतावर थरथरतांना दिसला. मी पाहण्यासाठी डोके वर केले: छताच्या जागी उंचावर ढग दिसत होते त्यामागे चंद्र लपला होता. त्यांचा मंद प्रकाश ढगाआडून जाणवत होता. म्हणून मी आतुरतेने चंद्र ढगामागून बाहेर पडण्याची वाट पाहत होते; एक हात दिसला, त्याने ढगांना बाजूला सारले पण चंद्र दिसण्याऐवजी एक पांढरी मानवी आकृती प्रगट झाली. तिचा चेहेरा पृथ्वीकडे झुकला होता. ती एकटक माझ्याकडे पाहत राहिली. तिने माझ्या आत्म्याशी संवाद साधला: खूप दुरून आवाज आल्यासारखे वाटत होते तरीही अगदी जवळ माझ्या हृदयाशी हळू, पण स्पष्टपणे सांगितले,

"माझ्या मुली, मोहापासून पळून जा."

"हो आई मी जाईन," मी उत्तर दिले.

आणि मला स्वप्नातून जाग आली. बाहेर अजून अंधार होता पण जुलैमध्ये रात्री लहान असतात, मध्यरात्रीनंतर लगेचच पहाट होऊ लागते. "आता आवरायला सुरू केले, तर खूप लौकर सुरुवात केली असे होणार नाही," मी असा विचार केला.

उठले; मी कपडे घातले होते कारण जेव्हा मी झोपायला गेले तेव्हा मी फक्त माझे बूट काढले होते. मी माझ्या ड्रॉवरमधून काही लिनेन, एक लॉकेट आणि अंगठी घेतली. या वस्तूंचा शोध घेत असताना एक मोत्यांचा नेकलेस मिळाला जो काही दिवसांपूर्वी मिस्टर रोचेस्टरनी मला स्वीकारण्यास भाग पाडले होते. मी तो तिथेच सोडला: तो माझ्या मालकीचा नव्हता; दूर उडून गेलेली काल्पनिक वधू त्याची मालकीण होती.

a

माझ्या इतर सर्व गोष्टी एकत्र केल्या. खिश्यात माझी पर्स ठेवली ज्यामध्ये फक्त वीस शिलिंग होते. माझी शाल पांघरली, टोपी बांधली; मी माझे पॅकेज आणि माझे शूज घेतले, जे मला अजून घालायचे नव्हते मग मी माझी खोली सोडली.

“अलविदा, माय गुड मिसेस फेअरफॅक्स,” त्यांच्या दारासमोरुन जाताना मी कुजबुजले. “अलविदा, माय डिअर लिटल ॲडेल,” मी तिच्या बेडरूमकडे एक नजर टाकत मी म्हणाले; मी तिचे चुंबन घेण्यासाठी आत गेले नाही. तिथून रोचेस्टरांना चाहूल लागली असती.

मला न थांबता मिस्टर रोचेस्टरच्या खोलीसमोरून जाणे आवडले असते; पण जेव्हा मी त्याच्या दारासमोर गेले तेव्हा मला वाटले की माझ्या हृदयाचे ठोके नुकतेच थांबले होते आणि मला एक क्षण थांबावे लागले होते; तिथेही मि. रोचेस्टर झोपलेले दिसत नव्हते. एखाद्या बंदीवानासारखे खोलीच्या एका टोकापासून दुसऱ्या टोकापर्यंत अस्वस्थपणे फेऱ्या मारत होते आणि सतत उसासे टाकत होते. मला त्यांनी सोडलेला उसासा ऐकू आला. या खोलीत माझ्यासाठी एक स्वर्ग होता, मला फक्त आत जाऊन म्हणायचे होते, “मिस्टर रोचेस्टर, मी तुमच्यावर प्रेम करेन आणि मरेपर्यंत तुझ्यासोबत राहीन;” आणि मग माझे ओठ मधाळ आनंदात भिजले असते. मी क्षणभर विचार केला.

“मि. रोचेस्टर, आता झोपू शकलेले नाहीत, ते दिवस उजेडाची आतुरतेने वाट पाहत असणार,” मी स्वतःला म्हणाले; उद्या सकाळी ते मला बोलावून घेतील आणि मी निघून गेलेले समजल्यावर माझा शोध घेतील आणि व्यर्थ आहे हे समजल्यावर त्यांना मी त्यांचा त्याग केला असे वाटेल, त्यांना वाटेल की मी त्याचे प्रेम नाकारले आहे, त्याचा त्यांना त्रास होईल आणि कदाचित ते निराश होतील.”

a

या सगळ्याचा विचार करून माझा हात दार लोटण्यासाठी पुढे गेला; पण मी पटकन तो मागे घेतला आणि तेथून निघाले.

मी खिन्नपणे पायऱ्या उतरून गेले; मला काय करायचे आहे हे माहित होते आणि मी ते यांत्रिकपणे केले. मी किचनमध्ये बाजूच्या दाराची चावी, किल्ली आणि कुलूप ग्रीस करण्यासाठी थोडे तेल घेतले; मी थोडा ब्रेड आणि पाणी घेतले कारण मला बरेच लांब चालायला लागणार होते. मला माझी शक्ती राखून ठेवायची होती. या सर्व गोष्टी मी काहीही आवाज न करता केल्या. मी दरवाजा उघडला, बाहेर पडले आणि हळूच बंद केला. अंगणात सकाळ उजाडायला लागली होती. मोठे दरवाजे कुलूपबंद होते. सुदैवाने त्यापैकी एकाची खिडकी फक्त कडीने बंद होती: मी बाहेर जाण्याची संधी घेतली, मग तीही बंद केली: मी आता थॉर्नफिल्डच्या बाहेर होते.

शेतांच्या पलीकडे एक मैल अंतरावर एक रस्ता आहे जो मिलकोटच्या विरुद्ध दिशेने जात होता. मी अनेकदा हा रस्ता पाहिला होता पण कधी प्रवास केला नव्हता. तो कुठे जात होता याची मला कल्पना नव्हती: त्या दिशेने मी निघाले. मी आता मागचा पुढचा विचार करणार नव्हते: भूतकाळ जितका स्वर्गीय सुखाचा होता---तितकाच तो प्राणांतिक दु:खाचा पण होता--- त्यांची कणभर जरी आठवण झाली तरी माझे एकवटलेले धैर्य आणि उरलीसुरली शक्ती नष्ट झाली असती. भविष्यकाळ भयानक रिक्त होता. महापूर ओसरल्यानंतर उरणाऱ्या उध्वस्त जगासारखा. वधस्तंभाकडे निघालेला कैदी रस्त्यावर उमललेल्या फुलांचा विचार करत नाही तर तो त्याच्या पुढ्यात वाढून ठेवलेल्या भयंकर प्राक्तनाच्या विचारात गढलेला असतो: मी केलेल्या धाडसी पलायनाचा आणि दिशाहीन, अंतहीन भटकंतीचा विचार मनात आला-- मी काय सोडून आले त्याचे दु:ख होते आणि रोचेस्टरांचा विचार मनात आला--आता ते त्यांच्या खोलीतील खिडकीतून सुर्योदय पहात असतील. मी लौकरच येऊन मी कायमची त्यांच्या सोबत राहीन असे येऊन सांगेन, याची वाट

पाहत. माघार घेण्याचा पण विचार मनात आला अजून वेळ निघून गेलेली नव्हती, अजूनही त्यांना माफ करून मी त्यांचे दु:ख नाहीसे करून शकले असते. अजूनपर्यंत त्यांना मी थॉर्नफिल्ड सोडून गेल्याचे कळले नसणार अशी माझी खात्री होती. मी परत जाऊन, त्यांच्या दुखावलेलेल्या स्वाभिमानाला दिलासा देऊ शकते, त्यांचे दु:ख नाहीसे करून त्यांचा विनाश रोखू शकते. त्यांनी स्वतःहून, स्वतःचा परित्याग करण्याचा विचार मला सांगितलेले मला आठवले, तो माझ्या पोरकेपणाच्या जाणीवेपेक्षा अधिक दु:खदायक होता नुसत्या आठवणीने काळजात कुणी तीर मारल्यासारखी कळ उठली, तो ओढून काढण्याच्या प्रयत्नात, मी स्वतः रक्तबंबाळ झाले. या प्रयत्नात तीर बाहेर पडण्याऐवजी अधिकाधिक आत रुतत चालला होता. आजुबाजुला पक्ष्यांची किलबिल ऐकू येत होती: पक्षीगणांचा त्यांच्या जोडीदारावर विश्र्वास होता, हे छोटेसे पक्षी, प्रेमाचे प्रतीक होते. पण मग मी काय होते? माझ्या हृदयातील वेदना आणि माझी आत्यंतिक टोकाची तत्वे यांच्यामुळे मला स्वतःचा तिरस्कार वाटू लागला. माझ्या कृतींना मान्यता देऊन आणि माझ्या हेतू आणि परिस्थितीचा आदर करून सुद्धा, मला काही स्वतःकडून सांत्वन मिळू शकले नाही. मी माझ्या प्रियकराचा अपमान केला, मी त्यांना जखमी केले आणि तशा अवस्थेत एकटे सोडून आले. मी माझ्या स्वतःच्या नजरेतून पार उतरले होते. पण तरीही मी एक पाऊलही मागे हटले नाही.

देवाने मला पुढे नेले असावे. माझी इच्छा आणि विवेक पराभूत झाले होते. वेड्यासारखी रडत रडत अर्धजागृतावस्थेत मी वेगाने चालतच राहिले. आतून अशक्तपणा जाणवू लागला, हळुहळू हातापायाची हालचाल मंदावली आणि मी जमिनीवर कोसळले. ओल्या गवतात तोंड खुपसून तशीच पडून राहिले. तिथेच मरण येईल अशी भीती--किंवा आशा--वाटली पण मी परत उभी राहिले. हाता पायावर रांगत, सरपटत कशीबशी उठले आणि पुढे जाण्याचा दृढनिश्चय केला.

a

जेव्हा मी वेगळ्या रस्त्यावर पोहोचले, तेव्हा कुंपणाजवळच्या दगडावर थोडी टेकले. एका घोडागाडीचा आवाज ऐकू आला. पुढे जाऊन मी गाडी थांबवली आणि गाडीवानाला कुठे जात आहेस याची चौकशी केली. त्याने मला एका दुर्गम ठिकाणाचे नाव सांगितले आणि त्याविषयी, मिस्टर रोचेस्टरना, काहीच माहिती नसेल याची मला खात्री होती. मी त्याला विचारले की गाडीभाडे किती आहे हे विचारून घेतले; त्याने मला तीस शिलिंग असे उत्तर दिले. मी त्याला सांगितले की माझ्याकडे फक्त वीस शिलिंग आहेत; तेव्हढ्यात त्याने समाधानी राहण्याचे मान्य केले. मी गाडीत बसले, गाडी रिकामी होती; दरवाजा बंद झाला आणि आम्ही निघालो.

मी जे अनुभवले ते कुणाच्याही वाट्याला कधीच येऊ नये. कुणाच्याही डोळ्यातून असे हृदयद्रावक अश्रू वाहू नयेत. त्या शेवटच्या तासाभरात जशी मी देवाकडे हतबल आणि व्यथित होऊन प्रार्थना केली तशी प्रार्थना करण्याची कुणावरही वेळ येऊ नये: माझ्यासारखे त्यांचे, ज्या कुणावरही पुर्ण प्रेम असेल, त्यांना दुःखाच्या सागरात लोटण्यासाठी, सैतानाच्या हातचे बाहुले बनण्याची वेळ न येवो.

## प्रकरण 28

प्रवासात दोन दिवस उलटून गेले आणि उन्हाळयाच्या संध्याकाळी, गाडीवानाने मला व्हिटक्रॉस येथे उतरवले. मी दिलेल्या पैशामध्ये यापेक्षा जास्त तो मला नेऊ शकणार नव्हता. आता माझ्याजवळ एक शिलिंग पण उरला नव्हता. घोडागाडी मैलभर पुढे निघून गेली. मी अगदी एकटी होते. त्या क्षणी मला जाणवले माझी थोड्याफार सामानाची थैली गाडीमध्ये राहिली होती. आता ती परत मिळणे अशक्यप्राय होते. मी पुर्णतः निष्कांचन झाले होते. व्हिटक्रॉस हे धड छोटे खेडगाव देखील नव्हते. तो एक चार रस्त्यांच्या मध्ये उभा केलेला दगडी खांब होता. त्याला पांढऱ्या रंगाने रंगवले होते, बहुधा तो अंधारात दुरून पाहणे शक्य व्हावे म्हणून. या स्तंभाच्या शीर्षस्थानी आपल्याला चार हात दिसतात जे आपण वेगवेगळया शहरांपासून किती दूर आहोत, हे दर्शवत होते.

त्यानुसार सर्वात जवळचे शहर दहा मैल दूर होते आणि सर्वात लांबचे शहर वीस मैलावर होते. या शहरांच्या सुप्रसिद्ध नावावरुन मला समजले की मी देशाच्या कोणत्या भागात येऊन पोहोचले होते: तो देशाच्या मध्यवर्ती भागांपैकी एक भाग होता. दलदलीने झाकलेला आणि पर्वतांनी वेढलेला, सगळीकडे दलदल होती. मी दरीच्या जवळ होते पलीकडे डोंगररांग पसरलेली होती. लोकसंख्या जास्त नसावी. चारी दिशांना धावणाऱ्या रस्त्यांवर मला कोणी कोणीही दिसले नाही. तो सर्व प्रदेश दलदलीच्या अगदी मध्यभागी होता. सगळीकडे हिथरची हिरवीगार झुडपे जंगलासारखी वाढली होती. एखादा प्रवासी रस्त्यावर भेटण्याची शक्यता होती पण मला कुणाच्याही नजरेला पडू नये असे वाटत होते. अशा निर्जन ठिकाणी निरुद्देशपणे

मी काय करत असेन असा प्रश्न कुणालाही पडला असता ज्याचे उत्तर माझ्याकडे नव्हते. याक्षणी माझा समाजातील कोणाशीही काहीही संबंध उरला नव्हता. कोणी मदतीला येईल असा एक एकही आशेचा किरण डोळयापुढे दिसत नव्हता. आता धरणीमातेशिवाय कोणी तारणहार दिसत नव्हता. तिच्याच कुशीत रात्र काढायचे ठरवून मी ओसाड जमिनीकडे निघाले. दलदलीच्या काठावर दाट झाडीतील गुहेसारखी कपारीची जागा होती. झुडपांमधून वाट काढत मी त्या शेवाळ्याने काळ्या पडलेल्या ग्रॅनाईटच्या खडकातील कपारी पाशी गेले. जेमतेम अंग टेकण्यापुरती जागा होती. डोक्यावर आभाळाचे पांघरूण घेऊन झोपण्याची तयारी केली. मनात चिंतेची पाल चुकचुकत होती. आजुबाजुला असलेली जंगली गुरे येण्याची शक्यता होती किंवा एखादा चोर लुटारु तिथे येणे अशक्य नव्हते. वाऱ्याच्या आवाजाची, पक्ष्यांच्या किलबिलाटाची सुध्दा मला भीती वाटत होती पण माझी भीती निराधार होती हे पाहून थोडा धीर आला आणि आता मी पुन्हा विचार करू लागले.

मी काय करू? मी कुठे जाऊ? अरेरे! माझ्याभोवती असंख्य प्रश्न नुसते रिंगण घालत होते, ज्यांचे उत्तर माझ्यापाशी नव्हते. थकलेल्या माझ्या शरिराला जवळपासच्या वस्ती पोहचेपर्यंत अजून बरीच दरमजल करायला लागणार होती. अजून आश्रय मिळवण्यासाठी अनोळखी लोकांच्याकडे मदत मागायला लागणार होती, अजून माझी कथा ऐकल्यानंतर लोकांचे नकार पचवायची तयारी ठेवायला हवी होती.

मी जमिनीला स्पर्श केला, जमीन कोरडी आणि उबदार होती. आकाश स्वच्छ होते, चांदणे पडले होते, हवा स्तब्ध होती, वातावरण शांत आणि सुखद होते: मला वाटले, आज मी बहि:ष्कृत अवस्थेत आहे. माणसांकडून फसवणूक, नकार आणि अपमान मिळाला आहे पण निसर्गाने मला आपले म्हटले आहे. आज मी

त्याचा पाहुणचार घेईन. थोडासा ब्रेड शिल्लक होता त्यासाठी माझ्या कमाईतील शेवटची पेनी खर्च झाली होती. जवळ पिकलेल्या ब्लूबेरीज् झाडावर दिसल्या त्यातल्या मूठभर बेरीज बरोबर ब्रेड खाल्ला. माझी भूक जरी भागली नाही तरी पोटाला थोडा आधार मिळाला. मी माझी संध्याकाळची प्रार्थना म्हणून आणि झोपण्यासाठी जागा आले.

कपारी शेजारचा खडक जाड होता. जेव्हा मी आडवी झाले तेव्हा माझे पाय पूर्णपणे झाकलेले होते आणि हवा आत येण्याइतपत जागा होती. मी माझी शाल अंथरूण म्हणून पसरली आणि तीच पांघरुण म्हणून जेमतेम अंगावर घेतली. शेवाळाने झाकलेले एक लहान दगड उशी म्हणून कामाला आला. अशा प्रकारे झोपण्याची व्यवस्था केल्याने मला किमान रात्रीच्या सुरूवातीस थंडी जाणवली नाही.

तशी विश्रांती चांगली मिळाली. माझे हृदय मात्र जखमी होते, घाव अगदी मर्मावर बसला होता, त्या जखमांकडे पाहून हृदय दु:ख करत होते. मि. रोचेस्टरांच्या दुर्दैवाकडे पाहून भीतीने मी हतबुद्ध झाले होते. त्यांच्या विषयी कणव दाटून आली होती. त्यांची अखंड सोबत लाभावी म्हणून तळमळत होते. पंख तुटलेल्या पक्षाप्रमाणे, त्यांच्याकडे झेपावण्याचे प्रयत्न व्यर्थ होऊन परत परत जखमी होत होते.

विचारांनी हैराण होऊन मी उठून गुडघे टेकले. टिपूर चांदण पडले होते, सर्वत्र शांतता होती, मंद रानवारा गारव्यासोबत सुगंधही वाहून आणत होता. वातावरण सुखद आणि प्रसन्न होते. जळी, स्थळी, काष्टी, पाषाणी परमेश्वर वास करतो हे जरी सत्य असले तरी त्याच्या निर्मितीचे दर्शन विशाल पटलावर झाल्यास त्याच्या अस्तित्वाची तात्काळ अनुभुती येते. निरभ्र रात्री, जग शांततेत बुडालेले असताना, परमेश्वराची असीमता, सर्वशक्तीमानता, सर्वव्यापकता, यांची स्पष्टपणे

a

प्रचिती येते. मिस्टर रोचेस्टरांकरिता प्रार्थना करण्यासाठी मी गुडघे टेकले: अश्रूंनी डबडबलेल्या डोळयांनी वर पाहिले तो आकाशात फिक्कट पांढऱ्या दुधाळ रंगाची आकाशगंगा दिसली. तिचे स्वरूप ध्यानात घेता, अगणित ग्रह, तारे पोटामध्ये सामावून घेणारी आकाशगंगा, एक सौम्य प्रकाशाची मंद लकीर भासत होती. त्यावरून मला परमेश्वराची शक्ती आणि सामर्थ्य जाणवले. त्याने जे निर्माण केले होते ते तोच वाचवू शकतो याची मला खात्री होती: तो या जगाचा नाश करणार नाही किंवा त्यामधील अमोल ठेवा असलेल्या एकाही आत्म्याचा नाश होऊ देणार नाही. मी परमेश्वरापाशी कृतज्ञतेने प्रार्थना करू लागले: जीवनाचा जो मूलस्त्रोत आहे, तोच आत्म्याचा रक्षणकर्ता ही आहे. त्याच्या हाती मि. रोचेस्टर सुरक्षित होते: देवा कडून त्यांचे रक्षण होणार होते. पुन्हा मी डोंगराच्या कपारीतील माझ्या निवाऱ्यात लवंडले आणि थोड्याच वेळात झोपेच्या आहारी गेले आणि दुःखाचा विसर पडला.

दुसऱ्या दिवशी जेव्हा परत जाणीव आली तेव्हा पक्षी पिलांसाठी चारा आणायला घरट्यातून बाहेर पडले होते. फुलांतील मध गोळा करायला, मधमाश्यांनी सुरुवात करून बराच वेळ झाला होता. सूर्य आकाशात बराच वर आला होता. मी उठले आणि आजुबाजुला पाहिले.

किती शांत, सुंदर आणि उबदार दिवस होता! दलदल माझ्यासमोर सोनेरी वाळवंटासारखी पसरली होती. सगळीकडे सुर्य प्रकाश पसरला होता. खडकांच्या जवळ एक सरडा पळताना दिसला. मधमाश्या फुलांमधील मध गोळा करत होत्या. मला सरडा किंवा मधमाशी बनायला आवडले असते त्या दलदलीच्या प्रदेशात उदरनिर्वाहाची सोय झाली असती. पण मी माणूस होते आणि मला माणसांच्या जीवनाची गरज होती. तिथे रेंगाळून माझा निभाव लागणार नव्हता. मी उठले, मी

a

रात्री झोपलेल्या पलंगाकडे पाहिले, भविष्यात कोणतीही आशा उरली नव्हती. माझी इच्छा होती --पण परमेश्वराने झोपेमध्ये माझ्या आत्म्याबद्दल चांगला विचार केला होता. या पुढे नशीबातील संघर्षांशी, दोन हात करताना, आधीच थकलेला हा देह, धारातीर्थी पडून या वाळवंटातील मातीत मिसळणे फक्त बाकी होते. तथापि अजून जीवन, त्याच्या सर्व गरजा, वेदना आणि जबाबदाऱ्यांसह, माझ्या ताब्यात होते. त्यांचे ओझे वाहणे, गरजांसाठी तरतूद करणे भाग होते; वाट्याला आलेले दुःख सोसायला हवे आणि जबाबदाऱ्या पूर्ण करायला हव्यात याची मला जाणीव होती आणि मी तिथून निघाले.

परत एकदा व्हिटक्रॉस आला आणि सूर्य ज्या दिशेला होता त्या रस्त्यावरुन मी चालायला सुरुवात केली. बराच वेळ चालल्यावर मी थोडे थांबावे असा विचार केला. थकल्या भागल्या शरीराला थोड्या विश्रांती गरजेची होती. मी जवळच्या एका मोठ्या दगडावर बसले. तनामनात दाटून राहिलेल्या उदासीनतेशी आता मला प्रतिकार करणे शक्य नव्हते.

अचानक मला घंटेचा आवाज आला: ती चर्चची घंटा असावी.

मी आवाजाच्या दिशेने निघाले. टेकडीच्या परिसरात मला एक लहानशी वस्ती आणि एक निमुळता मनोरा दिसला. तिथून घंटेचा आवाज येत होता. माझ्या उजवीकडे संपूर्ण दरीमध्ये गवताची कुरणे, मक्याची शेते यांची लागवड केलेली दिसत होती. विपुल वनसंपदा, हिरवाई मध्ये भर घालत होती. यामधून एक पाण्याचा प्रवाह नागमोडी वळणाने जात होता. तेव्हढ्यात गाडीच्या चाकांचा खडखडाट कानावर पडला. मोठे ओझे लादलेली गाडी कष्टाने टेकडीचा चढ चढत होती. थोडे पुढे गेल्यावर दोन गाई आणि गुराखी दिसले. मनुष्य वस्ती आणि मानवी श्रम माझ्या जवळपास होते. मला संघर्ष करायला लागणार होता: मला इतरांप्रमाणे जगण्यासाठी, प्रयत्नांची पराकाष्ठा करून भरपूर अंगमेहनत करावी लागणार होती.

a

दुपारी दोनच्या सुमारास गावात पोहोचले. गावातील एकमेव गल्लीच्या शेवटी एका छोट्या दुकानात ब्रेड दिसला. मला आता भुकेची जाणीव झाली. काहीतरी पोटाला आधार हवा होता. थोडेफार माणसांच्या सानिध्यात आल्याने भुकेची जाण आली. नवख्या ठिकाणी भुकेने मूर्च्छित झाले असते तर माझा खूप अपमानकारक वाटले असते. पण ब्रेड विकत घेण्यासाठी माझ्याकडे काहीच पैसे नव्हते. ब्रेडच्या बदली काही वस्तू देण्यासाठी मी शोध घेतला. गळयात रेशमी स्कार्फ आणि हातात हातमोजे होते. यापैकी एकही गोष्ट स्वीकारली जाईल की नाही हे मला माहीत नव्हते आणि तशी शक्यता पण वाटत नव्हती. कोणत्याही परिस्थितीत प्रयत्न करणे आवश्यक होते. निराधार अवस्थेत जगणे कसे कठीण आहे याची जाणीव काळीज कुरतडू लागली.

मी दुकानात शिरले. एक स्त्री दुकान चालवत होती. मला पाहून तिने नम्रपणे काय हवे आहे याची चौकशी केली. माझ्या कपड्यांवरून तिचा मी चांगल्या घरची स्त्री असावी असा समज झाला असणार. तिच्याकडे मला वापरलेले हातमोजे अथवा चुरगळलेल्या स्कार्फच्या बदल्यात ब्रेड मागण्याचे धाडस झाले नाही. ते विचित्र दिसले असते. मी तिच्याकडे फक्त काही वेळ बसायला परवानगी मागितली कारण मी थकले होते. गिऱ्हाईकाबद्दल तिची अपेक्षा चुकल्याने तिने थंडपणे मला बसायला जागा दाखविली. मी तिथे जाऊन बसले. मला रडावेसे वाटत होते पण परक्या ठिकाणी स्वतःची शोभा होईल असे वाटून मी भावनांना आवर घातला. थोड्या वेळाने मी तिला विचारले, “गावात कोणी शिवणकाम, घरकाम करणाऱ्या स्त्रिया आहेत काय?”

“होय; फक्त दोन तीन स्त्रिया असे काम करतात, त्यापेक्षा जास्त काम गावात उपलब्ध नाही.”

a

मला परिस्थितीची अपरिहार्यता लक्षात आली. मी अशा परिस्थितीत उभी होते की माझ्याकडे उदरनिर्वाहाचे काही साधन नव्हते. रहायला आसरा आणि हातात काही पैसाअडका नव्हता. अनोळखी ठिकाणी कुणाची ओळख देखील नव्हती, अशा परिस्थितीत कसे जगायचे? काय करायचे? कुठे जायचे? प्रश्न संपत नव्हते.

मी दुकानातील महिलेला तिच्या माहितीत कोणाला नोकरांची गरज असल्यास सांगण्याची विनंती केली. पण तिला त्याबद्दल काही माहिती नव्हती.

त्या भागात लोकांचे उदरनिर्वाहाचे साधन कोणते हे मी विचारले. बहुतेक सर्व शेती आणि मि. ऑलिव्हरच्या फाउंड्री आणि सुईच्या कारखान्यात काम करतात असे मला सांगितले.

मिस्टर ऑलिव्हर महिलांना कामावर ठेवतात काय याची पण चौकशी केली पण तसे नसल्याचे कळले. स्त्रिया काही एखादे दुसरे काम करतात आणि अगदी गरीबांना जे मिळेल ते करावे लागते असे तिने उत्तर दिले. पण माझ्या चौकशीला ती कंटाळलेली दिसली कारण एकतर मी काही खरेदी केली नव्हती आणि दुसरे तिची जागा अडवल्याने दुसऱ्या गिऱ्हाईकांचा खोळंबा होत होता. मी तिकडून निघाले. तासभर गावात फिरत होते पण कोणत्याही घरात शिरून चौकशी करण्याचे धाडस झाले नाही. भुकेने व्याकूळ झाले होते. चालून चालून थकले होते वाटेत थोडी बसले आणि थोडी हुशारी वाटल्यावर परत पुढे निघाले. काही कामधंदा मिळतो काय याची माहिती काढणे गरजेचे होते. शेवटी मला एक सुंदर छोटेसे घर दिसले. ज्याच्या समोर एक छोटी फुलांनी बहरलेली बाग होती. मी धीर एकवटून दरवाजा वाजवला. नीटनेटके कपडे घातलेली एका तरुणीने दार उघडले. मी हळू आणि थरथरत्या आवाजात आपल्याकडे जर नोकराची गरज आहे काय याबद्दल चौकशी केली. माझे हृदय निराश झाले होते आणि माझे शरीर थकले होते.

“नाही,” तिने उत्तर दिले, “आम्ही नोकर ठेवत नाही.

"तुम्ही मला सांगू शकाल काय दुसरीकडे कुठे काम मिळू शकेल? मी इथे नवखी आहे आणि इथे कोणाला ओळखत नाही. मला कुठलेही काम करायला आवडेल."

माझ्या प्रश्नांची दखल घेण्याची तिला काही गरज नव्हती शिवाय अनोळख्या स्त्रीवर विश्वास कसा ठेवणार, हे पण कारण असेल तिने दिलगिरी व्यक्त केली आणि दरवाजा हळू बंद केला. जर तिने तो अजून थोडे उघडा ठेवला असता तर मला वाटते की मी तिच्याकडे थोडा ब्रेड मागितला असता. माझ्या आत्मसन्मानाचा पार चोळामोळा झाला होता.

परत वस्तीकडे परतण्याची माझी इच्छा नव्हती तसेही तिथे काही मदत मिळण्याची शक्यता दिसत नव्हती. त्यापेक्षा जवळच्या जंगलाकडे गेल्यास निदान दाट सावलीत थोडीफार विश्रांती मिळाली असती पण मी खूप आजारी होते, अशक्तपणाने अंगात त्राण उरले नव्हते, भुकेल्या पोटी, दारोदार भटकले होते तरी काही सोय झाली नव्हती. पोटात कावळे ओरडतच राहिले त्यामुळे परत एकदा मागे टाकलेल्या घरांकडे वळणे भाग होते. इथे तिथे वाट चुकलेल्या, भुकेल्या कुत्रा सारखी अवस्था झालेली होती. एक शेत ओलांडून जाताना चर्चचा मनोरा दिसला. त्या दिशेने चालू लागले, चर्च जवळच्या बागेत एक छोटे टुमदार घर दिसले. नक्कीच तिथे चर्चचे पाद्री रहात असणार म्हणून तिकडे जाण्याचे ठरवले. मला आठवले की गावात रहायला आलेले नवीन लोक त्यांच्यापाशी जाऊन आपली ओळख सांगून नोकरी धंद्यासाठी मदत मागू शकतात. कशीबशी तिकडे पोहोचले आणि दरवाजा ठोठावला. एका वृद्ध स्त्रीने दरवाजा उघडला. मी पाद्री महाशय आहेत काय याची चौकशी केली, पण ते बाहेरगावी गेल्याचे समजले. त्यांचे वडील निवर्तले होते त्यामुळे ते निदान 15 दिवस तरी परत येणार नव्हते. सध्या घरात ती एकटीच असून ती तिथे घरकाम करत होती. तिच्याकडे मदत मिळणे शक्य नव्हते आणि अजून मी

अन्नासाठी भीक मागू शकत नव्हते. आल्यापावली परतण्याखेरीज दुसरा उपाय सुचला नाही.

मी माझा रेशमी स्कार्फ परत घेतला आणि पुन्हा छोट्या दुकानातील ब्रेडचा विचार करू लागले, “अरेरे! माझ्या काय ही वेळ आली आहे?” एका ब्रेडच्या तुकड्यासाठी मला इतकी लाचारी पत्करावी लागत आहे!” पुन्हा मी त्या दुकानात शिरले. दुकानदार महिलेच्या आजुबाजुला काही माणसे होती तरी मी तिला स्कार्फच्या बदल्यात ब्रेडची विचारणा केली. तिने माझ्याकडे संशयाने पाहिले आणि तिने असा व्यवहार कधीही केला नसल्याचे स्पष्ट सांगितले. जवळजवळ निराश होऊन मी तिला फक्त अर्धा रोल मागितला. तिने मला नकार दिला. परत एकदा हातमोज्यांच्या बदल्यात विचारून पाहिले तिला हातमोज्यांची गरज नव्हती.

हा प्रसंग आठवला की आजही मला त्रास होतो. ज्यांनी मला मदत नाकारली त्यांचा मला राग येत नाही. त्यांच्या दृष्टीने ती माणसे बरोबरच होती. माझ्या स्कार्फचा वा हातमोज्याचा त्या दुकानदार महिलेला उपयोग नसेल तर का म्हणून तिने तो व्यवहार करावा? सामान्य भिकाऱ्याकडे नेहमीच संशयास्पद दृष्टीने पाहिले जाते मग एक चांगल्या घरातील वाटणारी तरूण मुलगी त्याला कशी अपवाद असू शकेल? भले मी नोकरीसाठी विचारणा केली असली तरी अनोळखी व्यक्तींना माझी खात्री कशी काय पटावी? तेव्हा यावर विचार करून दु:खी होण्यापेक्षा जास्त विचार न केलेलाच बरा.

अंधार पडण्यापूर्वी एका शेतकरी चिज आणि ब्रेड खाताना दिसला, त्याच्या जवळ जाऊन मी त्याला विचारले, “तुम्ही मला ब्रेडचा तुकडा द्याल काय?” मला खूप भूक लागली आहे.”

त्याने माझ्याकडे आश्चर्याने पाहिले; पण काहीही उत्तर न देता, त्याने ब्रेडचा एक मोठा तुकडा कापून मला दिला. नक्कीच तो मला भिकारीण समजला नाही,

कोणीतरी विक्षिप्त स्त्री, जिला त्याच्या डब्यातील ब्राऊन ब्रेड खाण्याची इच्छा झाली असावी असेच त्याला वाटले असावे.

कोणाच्या घरांमध्ये निवारा मिळेल याची शक्यता नव्हती, अगोदरच सांगितल्याप्रमाणे मी जंगलाचा आश्रय घेतला. पण जमीन ओली होती, हवा थंड होती. थोडी फार माणसांची जाग होती, म्हणून दोनतीनदा जागा बदलायला लागली. सकाळी पाऊस पडला आणि संपुर्ण दिवसभर थोडाफार सुरूच होता. आजचा दिवस पण कालच्याप्रमाणे काम मागण्यात आणि नकारघंटा मिळण्यात गेला. आदल्या दिवसासारखी प्रचंड भूक लागली. दिवसभरात मी फक्त एकदाच काय ते खाल्ले. शेताच्या बांधावरून जात असताना एक लहान मुलगी उरलेली शिळी लापशी डुकरांना खाण्यासाठी ठेवत होती, मी तिला ती तिच्याकडे मागितली. तिने आईला सांगितले की इथे एक बाई लापशी मागत आहे. आईने सांगितले की ती जर भिकारीण असेल तर देऊन टाक डुकरांना आता घातले नाही तरी चालेल. मुलीने तो घट्टसर साका माझ्या हातात टाकला आणि मी तो अधाश्यासारखा खाल्ला.

संध्याकाळी होत आली, हवा पावसाळी होती. एका निर्जन रस्त्यावर चालून चालून मी थकून गेले आणि थोडी थांबले.

“यापुढे मी जाऊ शकणार नाही”, मी स्वतःशी बोलले. “आजची रात्र उघड्यावर काढायला लागली तर ओल्याचिंब जमीनीवर गारठ्यात निभाव लागणे अशक्य आहे: जर कुणाला माझ्यासारखा अनुभव आला असेल तर तो अतिशय भीतीदायक अनुभव होता असेल: पोटात भुकेची आग, अंगात अशक्तपणा, बाहेर पाऊस, थंडी आणि मनात सर्वनाश झाल्याची भावना ---सर्व आशा संपुष्टात आल्या होत्या. उद्या सकाळ होण्यापूर्वीच मृत्यू ओढवेल आणि तरीही हे सत्य स्विकारण्याची माझी का तयारी नाही? का अशा कवडीमोल जगण्यासाठी मी संघर्ष करत आहे? कारण मला माहिती होते आणि माझा विश्र्वास होता की मि. रोचेस्टर जिवंत आहेत:

तर मग, हे इच्छाशक्तीचे मरणे, ही थंडी आणि हे प्राक्तन, ह्यांना निसर्गाची मान्यता मिळणे शक्य नाही. देवा! मला अजून थोडावेळ तग धरून राहू दे --मला मार्ग दाखव, मला मदत कर!”

माझी विझत चाललेली नजर आजुबाजुच्या अंधुक, धूसर जगावरून फिरत होती. मी पाहिले की मी गावापासून दूर आले आहे. ते गाव, ती शेते दिसेनाशी झाली होती. परत ग्रॅनाईटच्या खडकाळ भागात मी आलेली होते. डोंगराच्या आणि माझ्यामध्ये फक्त ओसाड खडकाळ जमीन आणि जंगल होते.

“बरे झाले”, मी स्वत:शी म्हणाले,

“एकाकी, अनोळखी रस्त्यावर मरण येण्यापेक्षा या ओसाड जागी मेलेले बरे. घारी, गिधाडे या नश्वर देहाचा फडशा पाडतील आणि निसर्गच या देहाला मुठमाती देईल. गरीबांची कबर अशीच असणार.”

डोंगराच्या बाजूला मी निघाले. मला माझ्या चिरविश्रांतीसाठी एक सुरक्षित जागा, थोडासा आडोसा हवा होता: पण तशी कुठे मला दिसत नव्हती. माझी नजर, खडकाळ जमीनीवर, डोंगरावर फिरत होती. दूर डोंगराच्या पायथ्याशी मला प्रकाश दिसला. मला वाटले भास असावा किंवा पेटलेला वणवा असावा. पण तो मोठा न होता एकाच जागी मंदपणे तेवताना दिसला. “ती एखाद्या घरातील मेणबत्ती असू शकते,” मी अनुमान काढले: “पण तसे असल्यास मी कधीही त्या प्रकाशापर्यंत पोहोचू शकत नाही. तो खूप दूर आहे: आणि जरी अगदी जवळ असला तरी आता उपयोग काय? बंद दार तरी उघडलेच तरी माझ्या तोंडावर परत बंद केले जाईल.” असा विचार करून मी जिथे होते तिथेच झोपले. थोड्या वेळात गार वाऱ्याच्या जोर वाढला, सोबतीला पाऊस आला. मी पावसाने, थंडीने गारठून गेले. मरणाच्या दारात असूनही माझ्या शरीरातील संवेदना अजून शाबूत होत्या. थंडीने थरथरत मी उठले. तो प्रकाश अजून दिसतच होता. मी थकलेल्या शरीराने त्या दिशेने निघाले. मार्ग

a

दलदलीचा आणि निसरडा होता. एक दोनदा घसरून पडले, परत उठून परत सावरले आणि चालायला लागले: तो प्रकाश माझी एकुलती एक आशा होती आणि मी तिला गाठणार होते.

दलदल पार केल्यावर खडकाळ भागातून जाणारी वाट दिसली. कशीबशी मी त्या प्रकाशाच्या जवळ पोहोचले. आजूबाजूला थोडी झाडी होती. काटेरी कुंपण ओलांडून आत शिरले. एक बैठे घर होते. पण आत सामसूम दिसत होती. घरातील मंडळी झोपली असावीत अशी शंका आली. दरवाजा शोधण्यासाठी मी थोडी वळले आणि एका छोट्या खिडकीतून उजेड येताना दिसला. आत डोकावून पाहिले असता एक नीटनेटकी खोली दिसली, आता अक्रोडाच्या लाकडाच्या कपाटात काटे, चमचे, प्लेट्स ठेवलेल्या दिसत होत्या. एक मोठे पांढरे टेबल आणि खुर्च्या होत्या. शेकोटीच्या आगीचा उजेड पसरला होता. एक मोठी मेणबत्ती पेटत होती. बहुदा तिच्याच उजेडाच्या दिशेने मी इथवर येऊन पोहोचले होते. मेणबत्तीच्या उजेडात एक

एक वृद्ध स्त्री विणकाम करत बसली होती. चेहऱ्यावरून थोडी रागीट वाटत होती.

शेकोटीजवळ काही व्यक्ती होत्या. दोन सुंदर तरुणी, एक खुर्चीवर व दुसरी छोट्या स्टुलावर बसली होती. त्यांनी शोक दर्शक काळे कपडे घातले होते. एक भला मोठा कुत्रा एका मुलीच्या पायाजवळ डोके ठेवून झोपला होता. तर एक मांजर दुसऱ्या मुलीच्या मांडीवर वर बसले होते.

एव्हढ्या निर्जन ठिकाणी अशा साधारण घरात त्या सुसंस्कृत मुलींना पाहून मला आश्र्चर्य वाटले. त्या कोण होत्या? टेबलाजवळ विणकाम करणाऱ्या स्त्रीच्या मुली तर त्या नक्कीच वाटत नव्हत्या. ती स्त्री शेतकऱ्यासारखी दिसत होती. त्या मुली नाजुक होत्या, प्रतिष्ठीत घरातील वाटत होत्या. मी त्यांना कधीच पाहिले नव्हते पण का कुणास ठाऊक त्याची ठेवण उगाचच ओळखीची वाटली. त्या खूप सुंदर होत्या

असे काही नाही पण शिकलेल्या वाटत होत्या. दोघींच्या मध्ये टेबलावर दोन जाडजूड ग्रंथ होते. त्यांच्या हातात पुस्तकातील संदर्भ त्या मोठ्या ग्रंथांमध्ये शोधत असाव्यात. सर्व गोष्टींवरून त्या अनुवादासाठी शब्दकोश वापरत असाव्यात असे वाटले.

खोलीत खूपच शांतता होती. शेकोटीत पेटणाऱ्या लाकडांचा कडकड आवाज ऐकू येत होता. घड्याळाची टिक टिक ऐकू येत होती. तेव्हढ्यात त्या दोघींपैकी लहान मुलगी मोठ्याने बोलली, “वृद्ध डॅनियल आणि फ्रांझ एका रात्री बोलत बसले असताना, फ्रांझ त्याला एका स्वप्नाची हकीकत सांगतो. ऐका!”

मग ती हळू आवाजात पुस्तक वाचू लागली. मला ते ऐकू येत होते पण भाषा कोणती ते समजले नाही. ती परकीय भाषा होती पण फ्रेंच किंवा लॅटिन नव्हती कदाचित जर्मन किंवा ग्रीक असू शकेल.

“तुम्ही जे बोलत आहात ते कोठे बोलले जाते?” त्या वृद्ध स्त्रीने विचारले.

“इंग्लंडपेक्षा मोठा देश आहे, जर्मनी, तिथे ही जर्मन भाषा बोलली जाते. पण हन्ना आम्हाला जर्मन बोलता येत नाही. आम्ही फक्त शब्दकोशाच्या मदतीने वाचू शकतो.”

“आणि जेव्हा तुम्हाला ते पूर्णपणे समजेल तेव्हा तुम्हाला काय फायदा होईल?” हन्नाने विचारले.

“आम्ही ते नंतर दुसऱ्या लोकांना शिकवू शकतो, त्यावेळी आता पेक्षा जास्त पैसे कमावता येतील.” .

“हे शक्य आहे. पण आता अभ्यास थांबवा, बरीच रात्र झाली आहे.”

“होय, पण सेंट जॉन कधी येणार?

“आता एव्हढ्यात येईलच, तिने आपले सोन्याचे घड्याळ काढून वेळ बघितली,

a

“बाहेर पाऊस पडत आहे, हन्ना जेवणाच्या खोलीतील शेकोटी पेटलेली आहे का बघून येशील काय?”

ती स्त्री उठली आणि एका खोलीत जाऊन आग पेटली असल्याची खात्री करून आली आणि मुलींना म्हणाली, ““मला त्या खोलीत गेल्यावर रिकामी खुर्ची बघून खूपच दु:ख होत आहे.”

त्या मुलींचे चेहरे पण दु:खी झाले.

“पण ते आता चांगल्या ठिकाणी असतील, त्यांनी इथे असावे अशी कल्पना करणे चुकीचे आहे. अगदी शांतपणे त्यांनी जगाचा निरोप घेतला.” हन्ना म्हणाली.

“शेवटी त्यांनी आमची आठवण काढली काय?”

“तेव्हढा वेळच मिळाला नाही, बिचारे तुमचे वडील! एका मिनिटात डोळे मिटले. आदल्या दिवशी ते थोडासे आजारी होते, फारसे विशेष काळजी करण्यासारखे नव्हते, तरी मिस्टर जॉनने त्यांना विचारले की तुम्हाला तुमच्यापैकी एकीला बोलावून घ्यायचे काय तर हसायला लागले. पंधरवड्यापूर्वी त्यांचे डोके अजून थोडे जड होते; झोपायला गेले, पण उठले नाहीत; तुमचा भाऊ आत गेला, तेव्हा सर्व कारभार आटोपला होता. मागच्या पिढीतील शेवटचा माणूस होते. तुम्ही तिन्ही भावंडे वेगळी आहात. तुमची आई, तुमच्यासारखी खूप शिकलेली होती. दिसण्यात ती मेरी सारखी होती; डायना मात्र वडिलांची आठवण करून देते.”

मला मात्र दोघी इतक्या सारख्या वाटल्या. त्यांच्यामधला फरक समजला नाही. दोघीही गोऱ्या होत्या, सडपातळ बांधा, चेहऱ्यावर बुद्धीचे तेज दिसत होते. एकीचे केस थोडे जास्त पिंगट रंगाचे होते. डायनाच्या कपाळावर, कुरळया केसांची बटा होत्या तर मेरीची मान, कुरळया केसांनी झाकली होती. घड्याळात दहा वाजले.

“मला वाटते तुम्ही जेवण करावे, मि. जाॅन आल्यावर जेवतील.” हॅन्ना म्हणाली.

आणि ती जेवण मांडण्याची तयारी करू लागली.

मी त्यांना पहाण्यात आणि त्यांचे बोलणे ऐकण्यात एव्हढी गुंतले होते की मी माझी दुःखाची स्थिती जवळजवळ विसरले होते

पण आता मला ते आठवले आणि जास्त वेदनादायक आणि हताश वाटले. या घरातील माणसांच्या मनात माझे दुःख सांगून मदत मागणे मला अवघड वाटत होते. थरथरत्या हाताने मी दरवाजा वाजवला. हन्ना दरवाजा उघडायला आली. मेणबत्तीच्या उजेडात तिने मला संपूर्ण न्याहाळले आणि काय हवे आहे असे विचारले.

“मी तुमच्या मालकांशी बोलू शकते का?” मी विचारले.

“तुला त्यांच्याकडून काय हवे आहे ते तुम्ही मला सांगा. तू कुठून आली आहेस?”

“मी परदेशी आहे.”

“तू या क्षणी इथे काय करत आहेस?”

“मला आज रात्री शेडमध्ये किंवा इतरत्र निवारा हवा आहे आणि माझी भूक भागवण्यासाठी ब्रेडचा तुकडा हवा आहे.”

“मी ब्रेड देईन पण रहाण्यास मिळणार नाही.” तिच्या चेहऱ्यावर अविश्र्वास होता.

“मला तुमच्या मालकांशी बोलू दे.”

“नाही. ते तुझ्यासाठी वेगळे काय करू शकतात? या वेळी तू रस्त्यावर भटकू नको; हे चांगल नाही.”

“पण तू मला घालवून दिले तर मी कुठे जाऊ? मी काय करणार?”

a

"अरे! मला खात्री आहे की तुला कुठे जायचे आहे आणि काय करावे हे माहित आहे. मी तुम्हाला एवढाच सल्ला देते की काहीही चुकीचे करू नको. येथे दोन पैसे आहेत ते घे ; आता निघ."

"पैसा माझी भूक भागवू शकणार नाही आणि माझ्याकडे पुढे जाण्याची ताकद नाही. माझ्यासाठी दार बंद करू नका, मी तुम्हाला विनंती करते, दया करा !"

"तुला बाहेर व्हायलाच लागेल, पाऊस घरात येत आहे."

"फक्त त्या तरुण स्त्रियांना सांगा की मला त्यांच्याशी बोलायचे आहे; त्यांना मला पाहू द्या."

"नक्कीच नाही; जास्त गोंधळ करू नको, येथून निघून जा."

"पण तू हाकलून लावलेस तर मी मरेन!

"मला खात्री नाही, तुझे कोणी साथीदार , चोर, दरवडेखोर तुझ्या मागून येतील. त्यांना एवढेच सांग की आम्ही घरात एकटे नाही आहोत; की आमच्याकडे माणसे, कुत्रे आणि बंदुका आहेत. "

आणि दार बंद करून घेतले.

माझ्या दु:खाची ती परिसीमा होती. दु:ख आणि निराशेने मी पुरती ढासळून गेले होते. मी दमले होते, एक पाऊलही पुढे टाकण्याचे अंगी त्राण उरले नव्हते; दाराच्या ओल्या पायरीवर पडून मी ढसाढसा रडू लागले. शेवटची घटका जवळ आली होती आणि, मी एकटी समाजाकडून बहिष्कृत अवस्थेत भर पावसात उघड्यावर पडले होते. माझी केवळ आशा पार संपून गेली नव्हती तर मनोधैर्य पार खचून गेले होते. पण लौकरच मी परत मिळविण्याचा प्रयत्न केला.

"मी फक्त मरेन, मी स्वतःशी म्हणाले, "माझा देवावर विश्वास आहे. त्याच्या इच्छेची पूर्तता करण्यासाठी मी शांतपणे वाट पाहण्याचा प्रयत्न करीन"

a

माझ्या मनातले शब्द, नकळतपणे तोंडून बाहेर पडले: माझे दुःख, माझी निराशा अंतःकरणात खोलवर ढकलून मी तिला तेथे निःशब्द, शांत राहण्यास भाग पाडले.

"सर्व माणसांना एक ना एक दिवस मरावे तर लागणारच आहे," हाताच्या अंतरावरून आवाज कानावर पडला; "पण सर्वांना अशी अपराधीपणाची न संपणारी भावना आणि अकाली मृत्यूची शिक्षा मिळत नाही जशी तुम्हाला आज या दारात उपासमारीने आणि आजाराने त्रस्त होऊन, मिळत आहे."

"कोण बोलल आहे?" मी विचारले, या अनपेक्षित आवाजाला घाबरले होते आणि कोणत्याही मदतीची अपेक्षा आता मी सोडून दिली होती.

जवळच एक आकृती जाणवली, पण अंधारात मला काही दिसले नाही. त्या नवख्या माणसाने मोठ्या आवाजात दारावर जोरात आवाज दिला.

"ते तुम्ही आहात का, मिस्टर जॉन?" हन्ना आतून ओरडली.

"होय, होय, पटकन उघडा."

"अशा रात्री तुम्ही भिजलेले असाल! आत या, तुमच्या बहिणी तुमची काळजी करत आहेत. मला वाटते की आजूबाजूला काही संशयास्पद लोक आहेत; थोड्या वेळापूर्वी येथे एक भिकारी होती, आणि ती अजूनही तिथेच पडून आहे; पहा.ए बाई चल, उठ, मी सांगते, आणि जा," हन्ना दार उघडत म्हणाली.

"शांत, हन्ना! मला या महिलेशी बोलायचे आहे; तिला हाकलून तू तुझे कर्तव्य केले आहेस, तिला आत आणून मला माझे कर्तव्य पूर्ण करू दे. मी खूप जवळ होतो. मी तुझा तिच्याशी झालेला संवाद ऐकला. माझा विश्वास आहे की हे एक अतिशय वेगळे प्रकरण आहे आणि किमान चौकशी करणे आवश्यक आहे. अहो बाई, उभ्या राहा आणि माझ्यापुढे आत चला."

मी कष्टाने आज्ञा पाळली. मी आधी पाहिलेल्या चमकदार, स्वच्छ स्वयंपाकघराच्या फायरप्लेससमोर लवकरच आले. मी अशक्त होते, थरथर कापत होते आणि मला माझ्या भयावह स्वरूपाची जाणीव झाली. माझा अवतार, कमालीचा आजारी, पावसापाण्यात भिजलेला, दगड धोंडात धडपडत अंग खरचटलेला, चिखलाने माखलेला असा दिसत होता. दोन तरुण मुली, त्यांचा भाऊ मिस्टर सेंट-जॉन आणि वृद्ध नोकराणी हन्ना या सर्वांची नजर माझ्यावर खिळली होती.

कुणीतरी विचारले, "सेंट-जॉन, ही कोण आहे?"

"मी तुम्हाला सांगू शकत नाही; मला ती दारात सापडली, त्यांनी उत्तर दिले."

"ती अशक्त आहे," हन्ना म्हणाली.

"अगदी मरणाच्या दारात आहे," कोणीतरी बोलले; "तिला आधी खाली बसवा नाहीतर ती पडेल."

खरे तर मला चक्कर आल्यासारखे वाटले; मग मी खुर्चीत बसले. माझ्या आजूबाजूला काय घडतंय याची मला अजूनही जाणीव होती; फक्त मला बोलता येत नव्हते.

"तिला थोडेसे पाणी देऊन पहा; हन्ना, जा थोडे पाणी आण. तिची परिस्थिती अतिशय गंभीर वाटत आहे."

"ती आजारी आहे की तिला भूक लागली आहे?"

"तिला भूक लागली आहे, मला वाटते. हन्ना, दूध आणि ब्रेड दे."

डायनाने थोडे ब्रेडचे तुकडे करून, दुधात बुडवले आणि माझ्या ओठाजवळ आणले; तिच्या चेहऱ्यावर सहानुभूती दिसत होती, ती मला म्हणाली: "खाण्याचा

प्रयत्न करा", तेव्हा मला या साध्या शब्दांमध्ये प्रेमळपणा वाटला, त्यामुळे खूप धीर आला.

"हो, प्रयत्न करा," मेरीने पण हळूवारपणे सांगितले.

आणि माझी टोपी काढून, तिने माझे डोके वर केले. त्यांनी मला जे दिले ते मी खाल्ले, सुरुवातीला क्षीणपणे नंतर मनापासून.

"एकाच वेळी जास्त देणे योग्य नाही; उरलेले बाजूला ठेवा, भाऊ म्हणाला. तेव्हढे तिला पुरेसं होईल."

आणि त्याने दूध आणि ब्रेड काढून बाजूला ठेवला.

"थोडेसे अधिक, सेंट-जॉन; तिला अजून भूक आहे."

"आता नाही; ती आता बोलू शकते का ते पहा; तिला तिचे नाव विचारा."

मला वाटले की मी बोलू शकते आणि मी उत्तर दिले: "माझे नाव जेन इलियट आहे."

माझा शोध लागेल भीतीने मी ते नाव घेण्याचा निश्चय केला.

"आणि तू कुठे राहतेस? तुमचे परिचित कुठे असतात?"

मी गप्प राहिले.

"आम्ही तुमच्या ओळखीच्या कोणाला बोलावणे पाठवू का?"

मी मान हलवली.

"तू कोण? काय करतेस? इथे कशी आलीस याविषयी काही सांगू शकतेस काय?"

या घराच्या आत, या सर्वांच्या समोर, मला संपूर्ण जगाने नाकारल्याची भावना मावळली तशी भिक्षेकऱ्याची भुमिका लुप्त होऊन माझे चारित्र्य आणि वागणूक स्वाभाविक स्वरूपात आपोआप झाली. जेव्हा सेंट जॉननी मला प्रश्न

a

विचारले तेव्हा मी थोडी दुर्बल होते, थोडे थांबून मी त्यांना नम्रपणे सांगितले, “सर, मी आताच तुम्हाला तपशील देऊ शकत नाही.”

“पण मग,” ते पुढे म्हणाले, “तुला आमच्याकडून काय अपेक्षा आहेत?”

“काही नाही,” मी उत्तर दिले. फार मोठे उत्तर देण्यासाठी माझ्याकडे शक्ती नव्हती.

“आम्ही तुला आवश्यक ते सर्व दिले आहे आणि या पावसाळी रात्री तुला निरोप देऊ शकतो काय?” डायनाने विचारले.

मी तिच्याकडे पाहिले; तिच्या चेहऱ्यावरचे भाव उल्लेखनीय होते ते धैर्य आणि दयाळूपणा दाखवत होते. मला धीर आला, तिच्या करुणेने भरलेल्या नजरेला हसून प्रतिसाद देत मी तिला म्हणाले: “मी तुझ्यावर विश्वास ठेवीन; जरी मी मालक नसलेला भटका कुत्रा असते तरी मला माहित आहे की आज रात्री तू मला तुझ्या घरापासून दूर पळवून लावणार नाहीस; तुला पाहिजे ते माझ्याशी कर; पण आज मी तुमच्याशी जास्त बोलू शकत नाही, मला माफ करा. मला दम लागत आहे आणि प्रत्येक वेळी मी बोलते तेव्हा मला उबळ जाणवते.”

तिघेही माझ्याकडे पाहून गप्प राहिले.

“हेन्ना,” मिस्टर सेंट-जॉन शेवटी म्हणाले, “तिला इथेच बसू द्या आणि तिला काही प्रश्न विचारू नका. दहा मिनिटांत तिला उरलेले दूध आणि ब्रेड द्या. मेरी आणि डायना, पार्लरमध्ये माझ्या मागे या आणि आपण या सर्व गोष्टींबद्दल बोलू.”

त्यांनी माघार घेतली; लवकरच एक जण परत आली, शेकोटीच्या उबेने मला चांगले वाटत होते. त्या मुलीने हन्नाला हळू आवाजात काही आदेश दिले आणि थोड्या वेळाने मला तिच्या मदतीने जिन्यावरून मांडीवर नेले. माझे ओले कपडे बदलून एका उबदार, कोरड्या पलंगावर झोपण्याची व्यवस्था केली गेली.

मी देवाचे आभार मानले आणि कृतज्ञता व्यक्त केली.

a

## प्रकरण 29

या घरात आल्यानंतरचे तीन दिवस आणि तीन रात्री मला स्पष्टपणे आठवत नाहीत. जाणवलेल्या संवेदनांविषयी थोडेफार सांगता येईल. थोडे विचार मनात येत पण त्यापलीकडे काही नाही. ती एक छोटी खोली होती, पलंग पण अरूंद होता: एखाद्या दगडासारखी, हालचाल न करता पडून होते. जवळजवळ मेल्यातच जमा होते. आजुबाजूचे कसलेही भान नव्हते. अगदीच जवळ कुणी बोलत असले तर मला कळत होते पण बोलायची ताकद नव्हती. हन्ना तेथील नोकराणी, सर्वात जास्त वेळा ये जा करत असे. मला तिला जवळ पाहणे आवडत नव्हते; ती मला समजू शकली नव्हती किंवा माझी परिस्थिती तिला समजली नाही. एकदा मेरी, डायना आणि तिला बोलताना मी ऐकले.

“आपण तिला घरात घेतले हे चांगले झाले.”

“खरोखरच ती रात्रभर पावसात बाहेर राहिली असती तर नक्कीच जीवंत राहिली नसती.”

“बिचारीने खूपच हाल अपेष्टा काढल्या आहेत.”

“तिच्या बोलण्यावरून ती चांगली सुशिक्षित दिसते. उच्चार शुद्ध आहेत. तिचे कपडे जरी भिजलेले, मळलेले होते तरी मूळात चांगले होते.”

“तिचा चेहरा विलक्षण आहे. सध्या जरी अशक्त, आजारी असली तरी, मूळ बांधा चांगला आहे.”

एकदाही त्यांच्या बोलण्यात, माझ्यासाठी त्यांना होत असलेला त्रास, ओझे किंवा उपकार केल्याची भावना दिसली नाही, यांचा मला आनंद झाला.

मिस्टर सेंट-जॉन मला एकदाच भेटायला आले होते; त्यांनी माझ्याकडे पाहिले, आणि म्हणाले की माझी सुस्त अवस्था ही एक अपरिहार्य प्रतिक्रिया आहे जी कोणत्याही अति थकव्याने येऊ शकते, याला उपाय म्हणजे फक्त विश्रांती हाच आहे. डॉक्टरांचा फारसा उपयोग होणार नाही. त्यांची खात्री होती की मला निव्वळ विश्रांतीने बरे वाटेल. माझ्या शारीरिक लक्षणांवरून त्यांनी मला सदाचारी असल्याचे आणि मी कधीही अधोगतीच्या वाटेने जाण्याची शक्यता नसल्याचे त्यांचे मत दिले.

माझ्याबद्दल प्रेम वाटून अथवा दयाबुद्धीने डायनाने मला कायमचा आश्रय देण्याचा विषय काढला.

परंतु ते शक्य होईल असे वाटत नाही असे सेंट जॉन यांनी सांगितले. ते म्हणाले, "ही मुलगी काही प्रसंगाने अथवा गैरसमजातून आपल्या आप्तेष्टांना, मित्रमैत्रिणींना, एका क्षणात अविचारीपणे सर्व बंध तोडून, सर्वत्याग करून आली आहे असे वाटते. कदाचित तिची समजूत पटली तर आपण पुन्हा तिला तिच्या माणसांकडे सुपूर्त करू शकतो. पण मला तिच्या चेहऱ्यावरच्या रेषा असे दर्शवतात की तिची दुर्दम्य इच्छाशक्ती सहसा असे करु देणार नाही. तिचा चेहरा संवेदनशील आहे, पण सुंदर आहे असे म्हणता येणार नाही."

"ती खूप आजारी आहे, सेंट-जॉन!"

"आजारी असो किंवा निरोगी, ती नेहमीच सालस आणि सरळमार्गी असेल, अभिजात लावण्य आणि सर्व ज्ञानेंद्रियांचा मेळ घालणारे सौंदर्य तिच्यापाशी दिसत नाही."

तिसऱ्या दिवशी मला थोडे बरे वाटले; चौथ्या दिवशी मी उठून बसायला, घरातल्या घरात फिरायला सुरवात केली.

हन्नाने टोस्ट आणि पेज खाण्यासाठी आणली. सुरवातीला भीत भीत खाल्ली नंतर चवीने खाल्ली. कालपर्यंत काही खाल्ले तरी कडवट लागत होते. आज

a

मला गेल्या काही दिवसांच्या मानाने खूपच बरे वाटू लागले होते. मला उठायचे होते. माझे स्वतःचे कपडे घालायचे होते. त्यादिवशी कपड्यांची झालेली अवस्था मला आठवली आणि खंत वाटली. आता तेच कपडे आता घालावे लागणार याची लाज वाटत होती. पण मी या अपमानापासून वाचले. बेडच्या पायथ्याशी असलेल्या खुर्चीवर मला माझे सर्व स्वच्छ आणि वाळलेले कपडे दिसले. माझा काळा रेशमी पोशाख भिंतीवर लटकत होता; चिखलाच्या सर्व खुणा काढल्या गेल्या होत्या; माझे स्टॉकिंग्ज आणि शूज, चांगले स्वच्छ दिसत होते, पुन्हा वापरता येण्याजोगे बनले होते. खोली लहान असली तरी सुसज्ज होती. थोडी थोडी थांबून विश्रांती घेत घेत मी स्वतःचे आवरले. माझे कपडे आता ढीले होत होते: आजारपणात वजन घटले होते आणि अशक्तपणा पण होता म्हणून शाल पांघरली. आता मला खूप प्रसन्न वाटत होते; कपड्यांबरोबर माझा आत्मा पण स्वच्छ झाला असा विश्र्वास वाटला. कठड्याला धरत धरत दगडी जिना उतरून मी थेट स्वयंपाकघरात गेले.

हेन्ना ब्रेड भाजत होती, त्यांचा खमंग वास सगळीकडे दरवळत होता. तिचा माझ्याविषयी पुर्वग्रह दुषित झाला होता याची मला जाणीव होती. ती अडाणी स्त्री होती, जुन्या समजुतींना कवटाळून बसली होती. सुरवातीला दारात उभे सुध्दा न करून घेणारी हेन्ना नंतर बरीच सौम्य झाली. आतासुद्धा हासत पुढे आली आणि म्हणाली, “हे काय? तू उठलीस देखील? म्हणजे थोडे बरे वाटत असणार. इथे ये आणि माझ्या खुर्चीत आगीजवळ बस, बरे वाटेल.” मी खुर्चीत बसले. हन्ना ब्रेड भाजत होती, अधूनमधून माझ्याकडे बघत होती, अचानक तिने मला विचारले, “इथे येण्यापुर्वी तू कधी भीक मागितली होतीस काय?”

मला राग आला पण तो जास्त वेळ टिकून राहिला नाही, तिला मी खरोखरीची भिकारीण वाटली असावी असे समजून मी शांतपणे पण दृढतेने उत्तर दिले, “तुम्ही मला भिकारीण समजत आहात ही चुकीची गोष्ट आहे. मी सुध्दा

आपल्यासारखी किंवा आपल्या मालकिणींसारखी दुसऱ्याच्या दयाधर्मावर जगणारी स्त्री नाही आहे.''

हे ऐकून ती पुढे म्हणाली, ''पण तुझ्याकडे घरदार, पैसाअडका पण नसावा अशी माझी खात्री आहे.''

''घरदार, पैसाआडका असणारा भिकारी असूच शकत नाही असे कसे तुम्हाला वाटत वाटते?''

''तुझे शिक्षण झाले आहे?'' तिने थोड्या वेळाने विचारले.

''होय''

''पण तू बोर्डिंग स्कूलमध्ये गेली नसशील.''

''मी आठ वर्षे बोर्डिंग स्कूलमध्ये होते.''

तिचे डोळे विस्फारले, ''मग तेव्हढे शिक्षण तुला स्वावलंबी होण्यासाठी पुरेसे नाही?''

''मी आतापर्यंत स्वावलंबीच होते आणि यानंतरही मी स्वतःच्या पायावरच उभी असणार आहे; या आवळयाचे तुम्ही काय करणार आहात?'' तिला आवळयाची टोपली आणतांना पाहून मी विचारले.

''पाई''

''माझ्याकडे द्या मी मदत करते.''

''मी तुला मला मदत करायला सांगत नाही आहे.''

''पण मला काहीतरी काम करायचे आहे, मला काम करू द्या.''

''तुला नोकर माणसांची कामे जमणार नाहीत, तुझ्या हाताकडे बघून असे वाटते. तू शिवणकाम करत होतीस काय?''

''नाही, तुमची समजूत चुकीची आहे; पण मी कोण आहे याविषयी जास्त विचार करून स्वतःचे डोके शिणवून घेऊ नका: या घराचे नांव काय आहे?''

"मार्श-एंड किंवा मूर-हाऊस असे म्हणतात."

"आणि घराच्या मिस्टर सेंट-जॉन या घराचे मालक आहेत?"

"नाही, ते इथे राहत नाहीत; ते फारच कमी वेळा इथे असतात; त्यांचे घर, मॉर्टन येथे आहे."

"इथून काही मैलांवर असलेल्या गावी?"

"होय."

"आणि ते काय करतात?"

"ते एक पाद्री आहेत."

मला त्यांना मॉर्टनच्या चर्चमध्ये भेटायला गेले असता, तिथल्या घरकाम करणाऱ्या महिलेने ते गावी गेल्याचे सांगितलेले आठवले.

"तर," मी पुढे म्हणाले, "हे त्यांच्या वडिलांचे घर आहे का?"

"होय, म्हातारे मिस्टर रिव्हर्स येथे राहत होते; आणि त्यांचे वडील, आजोबा आणि पणजोबांपासून सर्व इथे राहत होते."

"तर, मिस्टर सेंट-जॉन रिव्हर्स असे नांव असेल?"

"होय, सेंट-जॉन हे त्यांच्या बाप्तिस्म्याचे नाव आहे."

"आणि त्यांच्या बहिणी डायना आणि मेरी रिव्हर्स आहेत?"

"होय."

"त्यांचे वडील वारले आहेत?"

"तीन आठवड्यापूर्वी. त्यांचा अचानक मृत्यू झाला."

"त्यांना आई नाही?"

"काही वर्षांपूर्वी त्यांचा मृत्यू झाला."

"तुम्ही बऱ्याच वर्षांपासून या कुटुंबात राहिला आहात काय?"

"होय, तीस वर्षे. मी तिघांनाही वाढवले."

"तुम्ही मला तरी असभ्यपणे भिकारीण समजला असला तरी तुम्ही या कुटुंबात इतकी वर्षे काम करता आहात यावरून तुम्ही एक प्रामाणिक आणि विश्वासू सेवक आहात हे सिद्ध होते."

तिने पुन्हा आश्चर्याने माझ्याकडे पाहिले.

ती म्हणाली, "माझे तुझ्याबद्दलचे मत पूर्णपणे चुकीचे होते: पण या भागात अनेक जण फसवणूक करणारे आहेत: मला माफ कर."

"आणि तरीही," काहीशी कठोरपणे मी म्हणाले, "तुम्हाला मला पिटाळून लावायचे होते, अशा वेळी दारात आलेल्या कुत्र्याला देखील हाकलून दिले जात नाही."

"होय, तो माझा कठोरपणा होता. पण मी तरी काय करणार? मी माझ्यापेक्षा जास्त मुलांचा विचार केला; मला फक्त त्यांची काळजी असते, म्हणून मला कडक वागणे भाग आहे."

मी काही मिनिटे गप्प बसले.

"तू माझ्याबद्दल, मी कठोर आहे असा गैरसमज करून घेऊ नको," ती म्हणाली.

"पण मला तुमच्याबद्दल कठोर विचार करणे भाग आहे," मी पुढे म्हणाले, "तुम्ही मला आसरा नाकारला, मला खोटारडी समजला, माझ्याकडे घरदार, पैसाअडका नाही म्हणून माझी अवहेलना केलीत, या जगात अनेक पुण्यवान लोक, जीवनभर सर्वसंग परित्यक्त अवस्थेत जगतात, आणि जर तुम्ही ख्रिश्चन असाल तर तुम्ही गरिबीला गुन्हा मानणार नाही."

"हे खरे आहे," तिने उत्तर दिले; मिस्टर सेंट-जॉननी मला हेच सांगितले. मी समजले की माझी चूक झाली होती, परंतु आता माझे तुझ्याबद्दलचे मत पुर्णपणे बदलले आहे, कारण तू एक चांगली आणि सभ्य तरुण मुलगी आहेस."

"माझ्यासाठी ते पुरेसे आहे, मी तुला माफ करते; मला आपला हात द्या."

मी तिचा कष्टाने खरबरीत झालेला हात माझ्या हातात घेतला: तिच्या चेहऱ्यावर एक प्रेमळ हास्य पसरले आणि त्या क्षणापासून आम्ही एकमेकांच्या मैत्रीणी झालो.

हन्नाला बडबड करायची सवय होती बोलत बोलत मी पाईसाठी तयारी करून दिली, तिने पीठ बनवले, तिने घरच्या मंडळींची माहिती सांगायला सुरुवात केली.

"म्हातारे मिस्टर रिव्हर्स," ती म्हणाली, "एक प्रतिष्ठित घराण्यातील सद्गृहस्थ होते. मार्श एंड हा वाडा सुमारे दोनशे वर्षं जुना आहे, पण मॉर्टन व्हॅलीमधील मिस्टर ऑलिव्हियरच्या भव्य वाड्याच्या तुलनेत खूपच साधा आणि लहान आहे. मला आठवते श्री ऑलिव्हियरचे वडील, एक शेतकरी होते आणि सुईच्या कारखान्यात काम करत होते. रिव्हर्स घराणे खूप जूने आणि नामांकित घराणे आहे. सर रिव्हर्सनी कधीही त्यांच्या रयतेबरोबर दुजा भाव केला नाही. स्वतः त्यांच्या बरोबर शेतीची कामे करत. त्यात त्यांना खूप रस होता. मालकीण बाई वेगळ्या होत्या. त्यांचे खूप शिक्षण झाले होते. लिहणे वाचणे यात त्यांच्या इतके हुषार कोणी या भागात नव्हते. त्यांची मुले त्यांच्याच वळणावर गेली आहेत.

"सर रिव्हर्सनी बरीच मोठी रक्कम त्यांच्या विश्र्वासातील या माणसाला दिली होती, पण काही कारणांमुळे तो माणूस दिवाळखोरीत गेला आणि त्यांनी दिलेली रक्कम बुडाली म्हणून मिस्टर जॉन मोठे झाल्यावर त्यांना पाद्री होण्यासाठी महाविद्यालयात पाठवण्यात आले आणि दोन्ही मुलींचे शाळेचे शिक्षण पूर्ण

झाल्यावर त्यांना गव्हर्नेसची नोकरी शोधायला सांगितले कारण त्यांच्या भवितव्याच्या दृष्टीने पैसे शिल्लक नव्हते. आता त्यांचे त्यांनाच त्यांचे भवितव्य घडविण्यासाठी पैसे मिळवायला लागणार आहेत. त्यामुळे त्यांच्यापैकी कोणीच इथे जास्त राहत नाहीत. सध्या त्यांचे वडील गेल्यामुळे सर्वजण घरी आले आहेत.

"त्यांना सर्वांना मार्श-एंड, मॉर्टन, ग्रॅनाइट खडक आणि आसपासचे पर्वत खूप आवडतात. जरी मुली लंडन आणि इतर अनेक मोठ्या शहरांमध्ये राहत असल्या तरी त्यांना त्यांची जन्मभूमी जास्त आवडते. बहिण भावाच्या मध्ये अतिशय प्रेम आणि जिव्हाळा आहे. असे कुटुंब पाहायला मिळणे अवघड आहे."

माझे आवळे सोलण्याचे काम झाल्यावर मी विचारले, "दोन तरुण मुली आणि त्यांचा भाऊ कुठे आहेत?"

"ते मॉर्टनला फिरायला गेले होते," तिने उत्तर दिले, "पण ते चहासाठी अर्ध्या तासात परत येतील."

हन्नाने सांगितल्याप्रमाणे सर्वजण लौकरच घरी परतले. ते सर्व स्वयंपाकघरातून आतल्या भागात गेले तेव्हा मिस्टर सेंट-जॉन यांनी मला पाहिले आणि हसून फक्त मान डोलावून निघून गेले. त्यांच्या बहिणी मात्र थांबल्या: मेरीने माझी चौकशी केली आणि मी खाली आल्याबद्दल आनंद व्यक्त केला; डायनाने माझा हात हातात घेतला आणि म्हणाली, "तू उठण्यापूर्वी माझी परवानगी घ्यायला हवी होतीस, तू अजूनही खूप अशक्त आणि थकलेली दिसत आहेस."

डायनाच्या आवाजात आत्मीयता आणि गंभीरपणा होता. डोळ्यात चमक होती, चेहरा मोहक होता. मेरी सुंदर होती, चेहऱ्याची ठेवण वैशिष्ट्यपूर्ण होती. तिचे वागणे बोलणे सौम्य होते पण डायनाच्या तुलनेत हातचे राखून ठेवल्यासारखे होते. डायनाच्या दिसण्यात आणि बोलण्यात एक प्रकारचा अधिकार आणि दुसऱ्याला मदत करण्याची इच्छा दिसत असे. अशा प्रेमळ आग्रहापुढे मान तुकवायला मला

आनंद वाटला असता: माझ्या सद्सद्विवेकबुद्धीला आणि आत्मसन्मानाला मान्य असेल तर मी, अशा सदिच्छांचा मान राखत असते.

"तू इथे काय करतेस? आम्ही दोघी सुध्दा इथे क्वचितच येतो. तू तर पाहुणी आहेस. तू लिव्हिंग रुममध्ये चल."

"मी येथे खूप आरामात आहे."

"अजिबात नाही," हन्ना म्हणाली.

"तुला इथे गरम होणार," मेरी बोलली.

"नक्कीच," डायनाने म्हणाली, चल तुला माझी आज्ञा पाळली पाहिजे."

आणि माझा हात धरून तिने मला उठवले आणि आतल्या खोलीत नेले.

"तिथे बस," तिने मला सोफ्यावर बसायला लावले आणि म्हणाली, "आम्ही कपडे बदलून चहा बनवतो; या आमच्या घरात आम्ही आमच्या मनाप्रमाणे वागतो, कधी जेवण बनवतो, हन्ना इतर कामात मदत करते," असे बोलून ती निघून गेली. खोलीत मि. सेंट जॉन आणि मी दोघेच उरलो. ते काहीतरी वाचत होते. मी प्रथम दिवाणखान्याची आणि नंतर तिथे असणाऱ्या मि. सेंट जॉन यांची पाहणी केली.

दिवाणखाना लहानच पण स्वच्छ सुसज्ज, स्वच्छ आणि आरामदायक होता. जुन्या पद्धतीच्या खुर्च्या, घासून पुसून इतक्या चकचकीत केलेले होत्या की टेबल, आरसा म्हणून काम करू शकले असते. भिंतीवर घराण्यातील स्त्री पुरूषांची पोर्ट्रेट्स टांगलेली होती. काचेच्या कपाटात पुस्तके व्यवस्थितपणे रचून ठेवलेली होती शिवाय उच्च प्रतीच्या चिनी मातीची क्रोकरी जपून ठेवलेली दिसत होती. जुने रोझवुडच्या डेस्क शिवाय, इतर कोणतेही आधुनिक फर्निचर नव्हते. कार्पेट आणि पडदे यासह सर्व काही जुने असून, उत्तमप्रकारे जतन केलेले होते.

मिस्टर सेंट-जॉन, न बोलता शांतपणे पुस्तक वाचनात मग्न होते. वय अठ्ठावीस ते तीस असू शकेल; बांधा, उंच आणि सडपातळ, सरळ आणि प्रमाणबद्ध

नाक, एकंदर चेहरा ग्रीक पुतळ्यासारखा, जुन्या अस्सल इंग्रजी माणसाप्रमाणे दिसत होते. मोठे निळे डोळे, संगमरवरा सारखे तुकतुकीत भव्य कपाळ त्यावर सोनेरी केसांची झुलपे शोभून दिसत होती.

पण त्यांच्याकडे पाहतांना त्यांच्या स्वभावाबद्दल अंदाज बांधला तर निश्चितच सौम्य, संवेदनशील असावा असे वाटले असते पण मला त्यांच्या चेहऱ्यावर कठोरपणा आणि चिंता असावी असे वाटले. बहिणी परत येईपर्यंत ते माझ्याशी बोलले नाही किंवा माझ्याकडे पाहिले देखील नाही. डायना चहाबरोबर माझ्यासाठी छोटा केक घेऊन आली.

"आता हे खा," ती मला म्हणाली; "तुला भूक लागली असली पाहिजे; हन्नाने मला सांगितले की दुपारच्या जेवणात फक्त थोडा दलिया खाल्ला आहेस."

मी केक खायला सुरुवात केली कारण मला भूक लागली होती. मग मिस्टर रिव्हर्सने त्यांचे पुस्तक बंद केले आणि माझ्याकडे रोखून पाहिले. त्यांच्या शोधक नजरेत अनौपचारिक प्रांजळपणा आणि खंबीरपणा दिसत होता. आतापर्यंत ते अंतर राखून राहिले होते ते, संकोच किंवा अविश्र्वासाने नसून त्यामागे निश्चितच वेगळा हेतू होता.

"तुला खूप भूक लागली आहे का?" त्यांनी मला विचारले. "होय सर," मी उत्तर दिले. थेटपणे विचारलेल्या प्रश्नांना साधे सरळ थोडक्यात उत्तर देणे, हा माझा स्वभाव होता.

ते पुढे म्हणाले, "हे चांगले आहे, तापाने तुला आपोआप लंघन झाले, सुरवातीला जास्त खाण्याने अपाय झाला असता, आता तुम्ही थोडे थोडे खाऊ शकता. तरीही खातांना अद्याप संयम आवश्यक आहे."

माझे उत्तर थोडे मर्यादाभंग करणारे होते.

"मला आशा आहे, सर," मी म्हणाले, "मी तुमच्यावर भार टाकणार नाही."

a

“नाही,” त्याने थंडपणे उत्तर दिले; “तुमचे आप्तेष्ट इष्ट मित्र कुठे राहतात हे तुम्ही आम्हाला सांगितल्यावर आम्ही त्यांना पत्र पाठवून विचारू आणि मगच तुम्हाला त्यांच्याकडे पाठवून दिले जाईल.”

“मी तुम्हाला स्पष्टपणे सांगते की मला असे करणे शक्य दिसत नाही, कारण माझे घर नाही किंवा कोणी मित्र नाहीत.”

तिघांनीही माझ्याकडे आश्चर्याने पाहिले, त्यांच्या नजरेत कुतूहल होते पण अविश्र्वास नव्हता, विशेषतः डायना आणि मेरी बद्दल मी बोलत आहे. सेंट-जॉनच्या डोळ्यांवरून अंदाज बांधणे अवघड होते. ते डोळ्यांचा उपयोग आपले विचार प्रगट करण्याऐवजी दुसऱ्यांच्या विचारांचा ठाव घेण्यासाठी करतांना दिसत होते.

“तुला असे म्हणायचे आहे का की तुझे पालक नाही आहेत?” त्यांनी विचारले.

“होय सर; मी अनाथ आहे. मला कोणाचाही आश्रय घेण्याचा अधिकार नाही.”

“तुमच्या वयात ही एक अतिशय वेगळी परिस्थिती आहे.”

मिस. रिव्हर्स माझ्या हातांकडे पाहत असल्याचे मला जाणवले आणि मला त्याचे आश्चर्य वाटले. पण त्यांनी विचारलेल्या प्रश्नांवरून मला त्यांना काय जाणून घ्यायचे होते हे समजले.

“तुझं कधीच लग्न झालं नाही?” त्याने मला विचारले.

डायना हसायला लागली.

“हे कसे शक्य आहे? सेंट जॉन अरे ती फक्त सतरा किंवा अठरा वर्षांची असेल.”

“मी जवळजवळ एकोणीस वर्षांची आहे, पण माझे लग्न झालेले नाही.” मी सांगितले .

लग्न या शब्दाने माझे रक्त तापले, सर्व कटू आठवणींनी मन व्याकूळ झाले. त्यांच्या लक्षात माझी स्थिती लक्षात आली. डायना आणि मेरीने, माझ्याकडे बघायचे टाळून नजर दुसरीकडे वळवली पण मि. जॉन शांतपणे माझ्याकडे पाहत होते. माझ्या डोळ्यात अश्रू आले.

“इथे येण्यापुर्वी तुम्ही कोठे रहात होतात?” त्यांनी विचारले.

“ जॉन तू जरा जास्तच चौकशी करत आहेस” मेरी हळू आवाजात बोलली.

पण, मिस्टर रिव्हर्सची खंबीर आणि भेदक नजर माझ्याकडे उत्तर मागत होती.

“मी ज्या ठिकाणी आणि ज्या लोकांबरोबर राहत होते, ते मला गुप्त ठेवायचे आहे,” मी थोडक्यात ठामपणे सांगितले.

“आणि माझ्या मते तुला ते गुप्त ठेवण्याचा आणि सेंट-जॉन किंवा इतर लोकांच्या प्रश्नांना उत्तर न देण्याचा अधिकार आहे,” डायनाने टिप्पणी केली.

“आणि तरीही जर मला तुमच्याबद्दल किंवा तुमच्या पुर्वेतिहासाबद्दल काहीही माहिती नसेल तर मी तुमच्या मदतीला येऊ शकणार नाही,” ते म्हणाले, “आणि तुम्हाला मदत हवी आहे, नाही का?”

“होय मला मदतीची गरज आहे. मी कामाच्या शोधात आहे. माझा उदरनिर्वाह भागू शकेल एव्हढे पैसे मिळतील अशी नोकरी कोणी परोपकारी व्यक्ती मला मिळवून मिळवून देईल तर माझ्यावर उपकार होतील.”

“मी एक खरा परोपकारी आहे की नाही हे मला माहीत नाही परंतु असे प्रामाणिक ध्येय साध्य करण्यासाठी माझ्या सामर्थ्यानुसार मी तुम्हाला मदत करू इच्छितो. पण आधी मला सांगा तुम्ही काय तुम्ही काय करू शकता?”

माझा चहा संपला होता आणि मला थोडी तरतरी आली होती. मी त्यांना खंबीरपणे संबोधित केले, “मि. रिव्हर्स, मी त्यांच्याकडे वळून म्हणाले, “तुम्ही आणि

तुमच्या बहिणींनी माझ्यावर मोठे उपकार केले आहेत, जे फक्त महान माणसेच करू शकतात: तुम्ही मला आपल्या उत्तम आदरातिथ्याने मरणापासून वाचवले आहे. त्याबद्दल मी आपली सदैव कृतज्ञ राहीन परंतु माझ्या मनाच्या शांतीसाठी आणि माझ्या व माझ्या आयुष्यात आलेल्या माणसांच्या सुरक्षिततेशी तडजोड न करता शक्य होईल तेवढी माझ्या याअगोदरच्या आयुष्याविषयी माहीती देईन."

"मी एका धर्मोपदेशकाची मुलगी आहे. मी अगदी लहान असताना माझे आईवडील मरण पावले. लॉवुड, ऑर्फन्स इन्स्टिट्यूशन, या धर्मादाय संस्थेत माझे शिक्षण झाले. तिथे मी सहा वर्षे विद्यार्थी म्हणून आणि दोन वर्षे शिक्षिका म्हणून राहत होते. तुम्ही ते ऐकले असेल, मिस्टर रिव्हर्स; रेव्ह. रॉबर्ट ब्रोकलहर्स्ट तिथे खजिनदार होते."

"होय, मी मिस्टर ब्रोकलहर्स्टबद्दल ऐकले आहे आणि शाळा पाहिली आहे."

"एक वर्षापूर्वी मी एक गव्हर्नेसचे काम स्विकारण्यासाठी लोवुड सोडले. मला चांगली नोकरी मिळाल्याने मी आनंदी होते इथे येण्यापुर्वी चार दिवस आधी मी ती नोकरी सोडली. ती सोडण्याचे कारण मी सांगू शकत नाही: ते सांगून काही उपयोग नाही--ज्याचा परिणाम निश्चितपणे सांगता येणे अशक्य आहे; हे आपणास अविश्र्वसनीय वाटेल परंतू मी निर्दोष आहे हे खात्रीपूर्वक सांगु शकते: आपण तिघांएव्हढीच मी, निरपराधी आहे; ज्या आपत्तीजनक परिस्थितीत मला माझी सोन्यासारखी नोकरी, घर आणि तेथील माणसे सोडून जावे लागले ते कारण, विचित्र आणि भयंकर होते. मला हा निर्णय त्वरित आणि कुणाच्याही नजरेस येण्यापुर्वी घ्यावा लागला, त्या घाईघाईत मी माझ्या एका छोट्या पिशवी व्यतरिक्त माझे सर्व सामान तिकडेच सोडून आले: जे मी माझ्या घाई गोंधळात मी ज्या गाडीतून व्हिटक्रॉस येथे उतरले त्या गाडीत विसरले. संपूर्ण निराधार स्थितीत मी दोन रात्री

उघड्यावर रानात काढल्या. व्हिटक्रॉसच्या जवळच्या गावात दोन दिवस कामाच्या, आसऱ्याच्या, दोन घास अन्नाच्या शोधात वणवण भटकत होते. थंडीने गारठून गेले, पावसात भिजले, फक्त दोनदा थोडेसे अन्न पोटात पडले. भूक, थकवा आणि निराशेने, पूर्णपणे कोसळले आणि आपल्या दारात भीक मागितली. पण मि. रिव्हर्स आपल्याला आपल्या दारात मला मरू द्यायचे नव्हते, तुम्ही मला घरात घेतलेत आणि पुढचे सर्व आपल्याला विदितच आहे. आपल्या बहिणींनी माझ्यासाठी काय काय केले आहे हे मी जाणून आहे. बेशुद्ध अवस्थेत पण मला आजुबाजुला काय घडत होते याची जाणीव होती. आपण उदार अंतःकरणाने, उत्स्फूर्तपुणे धर्माला जागून, माझ्यासाठी जे काही केले आहे, त्याबद्दल, मीआपल्या सर्वांची ऋणी आहे.''

''तिला आता बोलायला लावू नकोस, सेंट-जॉन,'' मला बोलायची थांबलेले पाहून डायना म्हणाली; ''ती यापेक्षा जास्त काही सांगू शकत नाही, चल सोफ्यावर बस, मिस इलियट.''

हे ऐकून मला मी कापरे भरले: मी माझे नवीन नाव विसरलो होते. मिस्टर रिव्हर्स यांच्या ते लवकरच लक्षात आले.

''तू म्हणाली होतीस तुझे नाव जेन इलियट आहे?'' त्यांनी माझ्या लक्षात आणून दिले.

''मी म्हणाले, सध्या मला त्या नावाने ओळखणे योग्य ठरेल असे मला वाटते पण ते माझे खरे नांव नाही म्हणून मला ऐकताना विचित्र वाटले.''

'' आपण आपले खरे नाव सांगू इच्छित नाही?''

'' नाही; मला सर्वात जास्त भीती वाटते की मी कोण आहे हे लोक शोधून काढतील आणि मला ते गुप्त ठेवायचे आहे.''

''तुझे बरोबर आहे,'' डायना म्हणाली, जाॅन तिला थोडा वेळ एकटे सोड!''

a

पण सेंट-जॉननी काही वेळ काळ विचार केला आणि परत मूळ विषयाकडे वळले, "तुम्हाला आमचा पाहुणचार फार काळ स्वीकारायचा नाही आहे असे दिसते; माझ्या बहिणींची दया आणि विशेषत: माझ्या उपकारांतून, तुम्हाला शक्य तितक्या लवकर सुटका करून घ्यायची आहे, हे मला स्पष्टपणे लक्षात आले आहे: मी तुम्हाला दोष देत नाही, ते योग्य आहे; तुम्हाला स्वतंत्र व्हायचे आहे."

"होय, मी तुम्हाला आधीच सांगितले आहे; मला काय करावे लागेल किंवा मला काम कसे मिळवावे लागेल ते मला दाखवा: मी तुम्हाला एवढेच विचारते आहे. आवश्यक असल्यास, मला शेतात काम करू द्या; पण तोपर्यंत मला इथेच राहू दे. परत एकदा निराधार अवस्थेतील दु:खाला सामोरं जाण्याच्या कल्पनेची मला भीती वाटत आहे."

"तू इथे नक्कीच राहशील," डायना तिचा हात माझ्या डोक्यावर ठेवत मला म्हणाली.

"अरे! होय" मेरीने पण सहमती दर्शविली.

सेंट-जॉन मला म्हणाले, " ते तुमचे तुम्ही पाहा; माझ्या बहिणींना तुमची काळजी घेण्यात आनंद आहे, जसे की थंडीने गारठून गेलेल्या पक्ष्याला उबदार घरटे द्यावे पण मी तुम्ही स्वावलंबी होण्याच्या मताचा आहे. त्यासाठी मी आवश्यक ती सर्व मदत करेन. पण माझ्याही काही मर्यादा आहेत. मी एक गरीब भागातील चर्चचा पाद्री आहे. माझी मदत फारशी मोठी असणार नाही, आपली अपेक्षा मोठी असेल तर आपल्याला दुसरा कोणी माझ्यापेक्षा अधिकाराने, पैश्याने मोठा शक्तीशाली दाता शोधावा लागेल."

डायनाने उत्तर दिले, "तिने तुला आधीच सांगितले आहे की ती प्रामाणिकपणे आणि तिच्या सामर्थ्यानुसार सर्वकाही करण्यास तयार आहे; आणि

तुला माहीत आहे, सेंट-जॉन, ती तिला मदत करू शकणारी व्यक्ती निवडू शकत नाही: तिला बिचारीला तुझ्यासारख्या तुसड्या माणसांकडे मदत मागणे भाग आहे.''

''मी शिवणकाम, साधे घरकाम करू शकते, काहीच मिळाले नाही तर हरकाम्या नोकर किंवा आया अगर नर्सचे काम करायची माझी तयारी आहे.''

''ते चांगले आहे,'' सेंट-जॉन म्हणाले. ''तुझी एव्हढी तयारी असेल तर मी तुला माझ्या वेळेत आणि माझ्या पद्धतीने मदत करण्याचे वचन देतो.''

त्यानंतर चहाच्या आधी वाचत असलेले पुस्तक त्यांनी हातात घेतले; मी तेथून बाहेर पडले, कारण इतका वेळ मी तशीच उभी राहिले होते आणि माझ्या शक्तीनुसार माझी बाजू मांडली होती.

# प्रकरण 30

मूर-हाऊस मधील मंडळींचा जेव्हढा म्हणून जास्त परिचय झाला, तेव्हढा माझा त्यांच्यावरील लोभ वाढला. थोड्याच दिवसांत मी पूर्णपणे बरी होऊन चांगली हिंडू फिरू लागले. मेरी, डायना यांच्याबरोबर गप्पा मारायला, त्यांनी परवानगी दिली तर त्यांच्या कामात मदत करायला सुरुवात केली. अशा प्रकारच्या नातेसंबंधातील आनंद मी प्रथमच अनुभवला आणि आमच्या भावना, अभिरुची आणि तत्वे समान होती त्यामुळेच आनंद द्विगुणित झाला.

त्यांना जे आवडतं होते, ते मी वाचायचे ठरवले: त्यांना ज्यात गोडी वाटत होती ते करण्यात मला आनंद मिळाला. त्यांच्या पसंतीच्या गोष्टींबद्दल मला आदर वाटत होता. आजुबाजुच्या वस्तीपासून लांब असणारे त्यांचे घर, त्यांच्या प्रमाणे माझ्याही आवडीचे बनले. जुन्या पद्धतीचे दगड मातीचे बांधकाम असलेले, कमी उंचीचे उतरले छप्पर, ग्रिल केलेल्या खिडक्या, शेवाळयाने झाकलेल्या भिंती आणि समोर पाईन वृक्षांची ओळ असे ते घर, पर्वतावरून घोंगावत येणाऱ्या वाऱ्याचा मारा सोसत उभे होते. बागेत होली आणि यूव ची झाडांखेरीज अन्य नाजुक फुला, फळांची झाडे नव्हती. मागच्या बाजूस दलदलीत निळया जांभळया रंगाची रानफुलांची जंगली झुडपे वाढलेली होती.

समोरच्या बाजूने एक वाट छोट्या दरीकडे जात होती. त्या मार्गावर फर्नची झाडे होती. त्यांच्या पुढे चराईची कुरणे आणि हीथची झुडपे, करड्या रंगाच्या मूरलॅंड

मधील मेंढ्यांचे भरण पोषण करत असत. ही वाट मेरी आणि डायनाची आवडती होती आणि मी त्यातील सौंदर्याने भारावून गेले.

या सर्व जगापासून अलिप्त असलेले हे निसर्ग सौंदर्यात एक प्रकारचे पावित्र्य जाणवत होते. डोंगरावरचा रानवारा, मोकळे आकाश, आकाशात रंगाची उधळण करणारा सुर्योदय आणि सुर्यास्त, टपोरे चांदणे, ढगाळ रात्री या साऱ्याची एक जबरदस्त मोहिनी, आम्ही तिघी अनुभवत होतो.

मेरी आणि डायना, दोघीही माझ्यापेक्षा कर्तबगार आणि जास्त शिकलेल्या होत्या.

त्यांचा पुस्तकांचा मी फडशा पाडला. दिवसभरात जे वाचन होई त्याची संध्याकाळी चर्चा करण्यात आनंद मिळत असे. आमचे विचार, आमची मते एकसारखी होती.

आमच्या तिघींपैकी डायना सर्व गोष्टींमध्ये सरस होती. दिसायला सुंदर, स्वभावाने खंबीर, शारिरीक दृष्ट्या मजबूत होती. तिच्या सानिध्यात एकप्रकारची सुरक्षितता जाणवत असे. सुरवातीला मी संध्याकाळच्या चर्चांमध्ये हिरीरीने भाग घेतला, पण नंतर त्या दोघींचे सर्वच विषयांतील प्रभुत्व लक्षात आले. मला ज्या विषयांची साधारण कल्पना होती ते विषय त्यांनी कोळून प्यायले होते. हे लक्षात आल्यावर मी आपली डायनाच्या पायापाशी बसून श्रवणभक्ती साधत असे.

डायनाने मला जर्मन शिकवण्याची ऑफर दिली. मला तिच्याकडून शिकायला खूप आवडत होते; तिला शिक्षिकेचे काम करणे आवडत असे. मला नवीन भाषा शिकण्याची संधी मिळाली याचा आनंद झाला. माझे ड्राईंग चांगले आहे हे त्यांना कळले, ताबडतोब त्यांच्या पेन्सिल आणि कलरिंग बॉक्स माझ्या स्वाधीन

केल्या. याबाबतीत माझे नैपुण्य त्यांच्यापेक्षा निश्चितच जास्त होते. त्यामुळे त्या आश्चर्यचकित झाल्या. मेरी माझ्या शेजारी बसायची आणि तासनतास माझ्याकडे टक लावून पाहायची; नंतर तिने माझ्याकडून ड्राईंगचे धडे घेतले. ती एक विनम्र, हुशार आणि मेहनती विद्यार्थिनी होती. अशा प्रकारे आम्ही हिंडणे, फिरणे, शिकणे, शिकवणे, वाचन, चर्चा, ड्राईंग या सारख्या गोष्टी करण्यात गुंतून गेलो होतो. त्यामुळे शिक्षणाबरोबरच मनोरंजन पण होत असे. दिवस कधी संपला ते कळत नसे.

माझ्यात आणि मिस रिव्हर्समध्ये लवकर जवळीक निर्माण झाली होती. मात्र मि. सेंट जॉन अलिप्त असायचे, फार क्वचित ते घरी असत. त्याचा बराचसा वेळ, त्यांच्या भागातील दूरवर पसरलेल्या गरीब आणि आजारी लोकांना भेटण्यास जात असत. कोणत्याही हवामानात ते त्यांच्या कामासाठी बाहेर पडत. सकाळचे काही तास ते अभ्यासात घालवत. त्यानंतर, आपली टोपी घेऊन, उन असो वा पाऊस, ते त्यांच्या वडिलांच्या म्हातारा कुत्रा, कार्लोला घेऊन आवड म्हणून अथवा कर्तव्य म्हणून बाहेर पडत. कधीकधी हवामान खूप खराब असले तर त्यांच्या बहिणींनी त्यांना रोखण्याचा प्रयत्न करत तेव्हा ते हसत हसत म्हणत,

“जर वाऱ्याच्या झुळूकेने किंवा पावसाच्या शिडकाव्याने मी माझे काम करण्यात कसूर करत असेन, तर मी भविष्यात जे काम करायचे ठरवले आहे ते काम मी अशा आळशीपणाने कसे काय करु शकेन?”

या प्रश्नाच्या उत्तरादाखल डायना आणि मेरी सामान्यतः उसासा टाकत आणि काही मिनिटे दु:खी चेहरा करून शांत बसत असत.

मि. सेंट जॉन वारंवार अशा रितीने घरी थांबत नसत याशिवाय आमची जास्त मैत्री न होण्याचे कारण म्हणजे, त्यांचा स्वभाव मनमोकळा नव्हता ते थोडे स्वकेंद्रित

होते. त्यांनी स्वतःला पाद्री म्हणून करण्याच्या कामात पूर्णपणे झोकून दिले होते. त्यांची जीवनशैली आणि सवयी निर्दोष होत्या तरीसुद्धा त्यांना मानसिक शांती आणि आंतरिक समाधान लाभल्याचे दिसत नव्हते, ज्याचा लाभ, प्रत्येक सदाचारी, परोपकारी आणि प्रामाणिक ख्रिश्चन व्यक्तीला होत असतो.

अनेकदा संध्याकाळी खिडकीसमोर विमनस्क स्थितीत बसल्याचे दिसून येत. त्यांच्या मनात काय विचार घोळत असतील याचा अंदाज करता येत नसे. पण एकंदर चेहऱ्यावरचे भाव आणि एकदम विस्फारले गेलेल्या डोळ्यांवरून त्यांना मन:स्ताप होत असावा असे वाटत असे.

एकंदरीत त्यांचा स्वभाव, त्यांच्या बहिणींसारखा आनंदी आणि उत्फुल्ल नव्हता. एकदाच त्यांच्या बोलण्यात भोवतालच्या डोंगरांबद्दल, त्यांच्या जुन्या दगड मातीच्या घराबद्दल, त्यांना वाटणाऱ्या आपुलकीचा उल्लेख आला होता. परंतु त्यांच्या स्वरात, आनंदापेक्षा उदासपणा अधिक होता. शांततेचा अनुभव घेण्यासाठी ते कधीच फिरताना दिसले नाहीत: निसर्गात शोधला असता अथवा नुसते जरी रमले असते, तर त्यांना भरपूर आनंद मिळाला असता.

मिस. सेंट जॉन इतके अबोल होते की त्यांच्या मनाचा अंदाज मला येण्यासाठी बराच काळ निघून गेला. मॉर्टन येथे त्यांच्या स्वतःच्या चर्चमधील प्रवचन ऐकल्यावर, मला पहिल्यांदा त्याची कल्पना आली. त्या प्रवचनाचे वर्णन करणे माझ्या शक्ती पलीकडचे आहे; त्याचा माझ्यावर झालेला परिणाम पण मला नीटसा सांगता येणे अशक्य आहे.

प्रवचन शांतपणे सुरू झाले आणि आवाजातील चढ उतारांचा विचार केला असता, शेवटपर्यंत त्याच आवाजात संपले. ते ऐकून मला असे वाटले जरी त्यांनी आवाज प्रयत्नपुर्वक नियंत्रित केला असला, तरी त्यांच्या उच्चारातून आवेश प्रगट होत होता, त्यांची भाषा प्रभावशाली बनली होती. त्यातून शक्ती जागृत झाली--- संकीर्ण,संक्षिप्त आणि नियंत्रित.

उपदेशकाच्या सामर्थ्याने, हृदय स्फुरण पावले, मन आश्चर्यचकित झाले: पण मृदू किंवा शांत झाले नाही. त्यामध्ये एक विचित्र कडवटपणा भरलेला होता; दु:खपरिहार करणारा दिलासा दिसत नव्हता, सांत्वन नव्हते, सौम्यता पण नव्हती:

कॅल्व्हिनवादी सिद्धांतांचे कठोर संकेत—

देवाची निवड, नियती, तीव्र नापसंती यांच्यावर ते वेळोवेळी भाष्य करत होते. या प्रत्येक मुद्यांचा संदर्भ नशिबासाठी उच्चारलेल्या सारखा वाटत होता. जेव्हा त्यांचे प्रवचन समाप्त झाले तेव्हा शांत, प्रसन्न, ज्ञानसंपन्न वाटण्याऐवजी, मी एक अव्यक्त दुःख अनुभवले; इतरांचा अनुभव असाच होता की नाही, याची मला कल्पना नाही.

जे वक्तृत्व मी ऐकत होते, ते अतृप्त इच्छा, आकांक्षा आणि निराशेतून प्रगट झाल्याचे वाटत होते. माझी खात्री होती की सेंट-जॉन रिव्हर्स यांचे जीवन शुद्ध असून, त्यांचा आवेश विवेकपूर्ण होता तरीही त्यांना त्याचे योग्य आकलन न झाल्याने शरीर, मन यांचा अंतरात्म्याशी होणारा सुसंवाद आणि त्यायोगे मिळणारी देवाची शांती, माझ्याप्रमाणेच त्यांना अजून गवसली नव्हती: माझा हरवलेला स्वर्ग आणि माझ्या देवाची भंगलेली मुर्ती, हे माझ्या दु:खाचे आणि अशांतीचे कारण होते, ते मी जगापासून लपवून ठेवले होते, अगदी त्याचा विषय देखील टाळला होता, पण ते दु:ख उफाळून वर आले, त्याने माझ्या ताबा घेतला आणि निर्दयीपणे छळवाद मांडला.

दरम्यान, एक महिना उलटून गेला होता. डायना आणि मेरी लवकरच मूर हाऊस सोडून दूरच्या भागात परतणार होत्या. इंग्लंडच्या दक्षिणेकडील एका मोठ्या शहरात गव्हर्नेसचे काम त्यांची वाट पाहत होते. त्या दोघी, श्रीमंत कुटुंबात गव्हर्नेस म्हणून राहत होत्या. त्या कुटुंबातील गर्विष्ठ सदस्य त्यांना गरीब आश्रित समजत, त्यांचे जन्मजात सद्गुण त्यांच्या लेखी महत्त्वाचे नव्हते, केवळ त्यांनी प्राप्त केलेली कौशल्याची प्रशंसा करत: त्यांच्या अंगभूत उच्च मुद्द्यांची फारशी कदर नव्हती.

मिस्टर सेंट-जॉन यांनी मला काम मिळवून देण्याचे वचन दिले होते. त्या संदर्भात ते काहीच बोलले नव्हते: आता माझ्यासाठी एखादे काम मिळवणे गरजेचे झाले होते. एके दिवशी सकाळी त्यांची भेट झाली. मला नोकरीचा विषय कसा काढावा, असा पेच पडला होता. पण मला पाहून त्यांनी विचारले, “तुला माझ्याबरोबर काही बोलायचे आहे काय?”

“होय सर, तुम्हाला माझ्यासाठी एखादे काम मिळाले आहे का हे मला जाणून घ्यायचे आहे.”

“सुमारे तीन आठवड्यांपूर्वी मी तुझ्यासाठी विचार केला होता; पण तुझी इथे मदत होत होती आणि तू आनंदी दिसत होतीस, माझ्या बहिणींची तुझ्याबरोबर चांगलीच मैत्री झाली, तुझ्या उपस्थितीने त्यांना एक विलक्षण आनंद मिळाला होता त्यामुळे, त्या मार्श-एंड येथून निघून जाईपर्यंत तुमचा सहवास तसाच रहावा असे मला वाटले.”

“पण त्या तीन दिवसात निघून जातील,” मी म्हणाले.

a

"होय, आणि जेव्हा त्या जातील तेव्हा मी मॉर्टनच्या चर्चमध्ये परत जाईन; हन्ना माझ्याबरोबर येईल आणि आपल्याला हे जुने घर बंद करावे लागेल."

एक वेगळाच विषय सुरू झाला होता. त्यांना पुन्हा आठवण करून देण्यासाठी मी विचारले, "मिस्टर रिव्हर्स, तुमच्या मनात माझ्यासाठी योग्य असा कोणता व्यवसाय होता काय? मला आशा आहे की विलंब झाल्याने मुळे तो मिळवणे अधिक कठीण होणार नसावा."

"अरे! नाही, कारण मला ते तुमच्यासाठी ठरवले आहे आणि तुला ते स्वीकार करण्यासाठी पुरेसे आहे."

ते पुन्हा थांबले आणि बोलणे पुढे चालू ठेवण्यास नाखूष दिसत होते; मी अधीर झाले होते. माझी अस्वस्थता त्यांच्या लक्षात आली आणि ते म्हणाले, "अरे! चला, ते काय आहे हे जाणून घेण्यासाठी इतकी उत्सुक होऊ नको. मी तुला स्पष्टपणे सांगतो की मला तुझ्यासाठी काहीही आनंददायी किंवा फायदेशीर असे आढळले नाही. माझी मदत आंधळ्याने लंगड्याला मदत केल्यासारखी होईल. मी गरीब आहे; कारण जेव्हा मी माझ्या वडिलांचे सर्व कर्ज फेडले, तेव्हा माझ्याकडे फक्त हे उद्ध्वस्त झालेले शेत, पाईन वृक्षांचा हा मार्ग आणि खडकाळ जमिनीचा हा छोटासा तुकडा एव्हढेच शिल्लक आहे. मी दुर्बल आहे. रिव्हर्स हे मोठ्या घराण्याचे नाव आहे; परंतु या वंशातील फक्त तीन वंशजांपैकी दोघी जणी दुसऱ्याची चाकरी करून पोट भरतात आणि तिसरा आपल्या जन्मभूमीत स्वतःला परका समजतो, केवळ जीवनासाठीच नाही तर मृत्यूसाठी देखील, आणि होय तो स्वतःचा सन्मान झाला असे मानतो आणि तसे मानण्यास बांधील आहे. माझी अशी महत्त्वाकांक्षा आहे, की एखादे दिवशी येशू येऊन मला म्हणेल, "स्वतः, स्वतःचा वधस्तंभ उचलून आणि स्वतःसह सर्व ऐहिक

गोष्टी नाकारून माझ्यामागे आलास तर अनंतकाळचे जीवन मिळेल, उठ आणि माझ्यामागे ये! “

संत-जॉनने शांत आणि खोल आवाजात प्रवचन देताना देखील हेच शब्द उच्चारले होते, ते पुढे म्हणाले:- “मी स्वतः गरीब आणि दुर्बल आहे, मी तुला गरिब आणि दुर्बल लोकांच्या सेवेचे काम देऊ शकतो, कदाचित तुला ते कमीपणाचे वाटेल--तुझे आचरण शुद्ध आहे, अभिरुची आदर्श आहे आणि तू स्वतः सुशिक्षित आहेस-- पण मी असे मानतो असे कोणतेही काम, जे समाजाच्या उन्नतीचे कारण बनू शकते, ते कमीपणाचे असू शकत नाही. मी असे मानतो. ओसाड नापीक जमीन, खरा ख्रिश्चन घोर परिश्रमाने जेव्हढी सुपीक बनवू शकेल, तेव्हढा तो जास्त सन्मानास पात्र असेल: येशू, स्वतः या जगाचा तारणहार होता.”

“बरं!” त्यांना पुन्हा थांबलेले पाहून मी म्हणाले, “पुढे चालू ठेवा.”

त्यांनी माझ्या चेहऱ्यावरील भाव अचूकपणे वाचले, “मी तुला जे काम देणार आहे ते तू नक्कीच स्वीकारशील पण काही काळासाठी, कायमचे नाही. ज्याप्रमाणे मी माझ्या या छोट्याशा भागात अल्प प्रमाणात असलेले काम करण्यात समाधानी राहू शकत नाही, तसेच तुझे सुध्दा आहे: कारण तुझ्या स्वभावाला माझ्यासारखी विश्रांती मान्य नाही, परंतु आपला प्रतिसाद एकाच प्रकारचा असणार नाही.”

“मला समजावून सांगाल काय?” ते थांबलेले पाहून मी विचारले.

“होय, मी सुचवत असलेले काम, तसे अगदीच क्षुल्लक आहे हे तुझ्या लक्षात येईल. मी मॉर्टनमध्ये जास्त काळ राहणार नाही. आता माझे वडील मरण पावले आहेत आणि मी माझा मालक आहे. मी कदाचित बारा महिन्यांच्या कालावधीत हे ठिकाण सोडेन: परंतु जोवर मी इथे राहीन, तोवर इथल्या सुधारणेसाठी

a

पूर्ण प्रयत्न करेन. मॉर्टन मध्ये मी दोन वर्षांपूर्वी आलो होतो, तेव्हा इथे शाळा नव्हती: गरीबांच्या मुलांना प्रगतीची आशा खुंटली होती. मी मुलांसाठी एक शाळा स्थापन केली: मला आता मुलींसाठी दुसरी शाळा उघडायची आहे. मी या हेतूने एक इमारत भाड्याने घेतली आहे, त्यात दोन खोल्यांचे कॉटेज मुख्याध्यापिकेच्या घरासाठी जोडलेले आहे. तिचा पगार वर्षाला तीस पौंड असेल: तिचे घर पण अगदी साधे आहे आणि पुरेसे सुसज्ज आहे. मि.ऑलिव्हर या भागातील एकमेव श्रीमंत व्यक्ती आहेत, ते सुई-फॅक्टरी आणि लोखंडी फाऊंड्रीचा मालक असून त्यांची एकुलती एक मुलगी मिस ऑलिव्हर हिने दयाळूपणाने अनाथ मुलांच्या शिक्षण आणि कपड्यांचा खर्च कारखान्यात तर्फे करण्याचे आणि शाळेतील इतर कामात मुख्याध्यापिकेला मदत करण्याचे आश्वासन दिले आहे ज्यामुळे शिकवण्याच्या कामात अडथळा येणार नाही. तू हे मुख्याध्यापिकेचे काम करण्यास तयार आहेस काय?"

त्यांनी हा प्रश्न इतक्या घाईत विचारला की त्यांना मी हे काम करण्यास तयार होईन की नाही याची खात्री वाटत नव्हती. मला त्यात काही वावगे वाटले नाही, शक्य तितक्या लौकर मला सुरक्षित आश्रयस्थान हवे होते. श्रीमंत घरातील गव्हर्नेसच्या नोकरीपेक्षा जास्त स्वतंत्रपणे काम करण्याची संधी होती. मला आता अनोळखी लोकांवर अवलंबून रहाण्याची कल्पनाही सहन होत नव्हती. मला देऊ केलेली नोकरी अयोग्य किंवा कमीपणाची निश्चितच नव्हती. माझा निर्णय झाला.

"मिस्टर रिव्हर्स, आपण देऊ केलेल्या नोकरीबद्दल, मी आपली मनापासून आभारी आहे,आणि मी मनापासून ती स्वीकारते," मी म्हणाले.

"पण तू मी काय सांगितले ते व्यवस्थित समजले आहे काय?" ते पुढे म्हणाले: ही खेडेगावची शाळा आहे; तुमच्या शाळेत गरीब शेतकऱ्यांच्या लहान मुली असतील, तुला त्यांना फक्त विणकाम, शिवणकाम, वाचन आणि अंकगणित शिकवावे लागेल. तू तुझ्या कलागुणांचे काय करशील,

ज्यामध्ये तू पारंगत आहेस? तुझी आवड आणि अभिरुची यांना हे मान्य होईल काय?"

"माझे कलागुण, माझी आवड आणि अभिरुची यांची जोपासना सध्या मला आवश्यक नाही, जोवर मला त्यांची गरज उत्पन्न होत नाही, तोवर ते सुप्तावस्थेत राहतील."

"तर तुला माहित आहे की तू काय करणार आहेस?"

"होय."

ते हसले; त्यांचे स्मित दुःखी किंवा कडवट नव्हते, उलट आनंदी आणि समाधानी वाटत होते.

"आणि तुला कधी सुरूवात करायची आहे?"

"मी उद्या घर बघायला जाईन आणि जर तू मला परवानगी दिलीत तर मी पुढच्या आठवड्यात शाळा उघडेन."

"खूप चांगले, मी यापेक्षा चांगले काहीही मागू शकत नाही."

ते उठले आणि खोलीत फेऱ्या मारायला लागले; मग थांबून त्यांनी माझ्याकडे पाहत मान नकारार्थी हालवली.

"सर, तुम्ही कोणत्या गोष्टींसाठी नाराज आहात?" मी विचारले.

"तू मॉर्टनमध्ये जास्त काळ राहणार नाही: नाही, नाही !"

"कशावरून? असा विचार करण्याचे तुमच्याकडे काय कारण आहे?"

"मी तुझ्या डोळ्यांत ते पाहू शकतो; तू दीर्घकाळ तेच नीरस जीवन स्वीकारू शकणार नाहीस."

"मी महत्वाकांक्षी नाही."

ते थबकले.

“महत्त्वाकांक्षी,” त्यांनी पुनरावृत्ती केली, “कशामुळे तू महत्त्वाकांक्षेचा विचार केलास? महत्वाकांक्षी कोण आहे? मला माहित आहे की मी महत्वाकांक्षी आहे: पण तुला त्याचा अंदाज कसा आला?”

“मी माझ्याबद्दल बोलत होते”.

“बरं! जर तू महत्वाकांक्षी नसशील तर मग तू…”

त्यांनी स्वतःला थांबवले.

“काय?”

“मी उत्कट म्हणणार होतो; पण कदाचित, अर्थ नीट न समजल्यास, तुला तो आवडणार नाही. मला तुझ्यामध्ये मानवी स्नेह, आत्मीयता, सहानुभूती या भावना प्रबळपणे जाणवतात. तुला इथे फुरसतीचा वेळ एकलकोंडेपणात घालवायला लागेल तसेच कामातील एकसुरपणामुळे, काम करण्यातील तुझी प्रेरणा संपेल आणि तू समाधानी राहणार नाहीस; ज्याप्रमाणे मला स्वतःला डोंगराळ भागात कोंडून घेण्यास किंवा या दलदलीत बुडून जाण्यास स्वारस्य नाही ---माझा स्वभाव व माझी आवड, जे मला देवाने दिले आहे, त्याच्या विरोधात आहे. देवाकडून मला लाभलेल्या माझ्या निसर्गदत्त क्षमता इथे अक्षम बनल्याने निरूपयोगी झाल्या आहेत. तुला हे ऐकून माझ्या बोलण्यात विरोधाभास जाणवेल: मी स्वतः प्रवचनामध्ये उपदेश करतो, कोणतेही काम, भले मग ते देवासाठी पाणी भरण्याचे काम असो वा लाकडे तोडण्याचे असो, त्यामध्ये समाधानी रहायला हवे--आणि मी स्वतः त्याचा नियुक्त सेवक असूनसुद्धा माझ्या अस्वस्थेवर प्रचंड रागावलो आहे. बऱ्याच वेळा अंत:प्रेरणा आणि तत्त्वे यांचा काहीतरी मेळ घालणे आवश्यक असते.”

ते खोलीतून निघून गेले. त्या एका तासात मी त्यांच्याबद्दल आधीच्या संपूर्ण महिन्यापेक्षा जास्त शिकले होते आणि तरीही मला कोडे पडले होते.

जसजसा मेरी व डायना याच्या घर आणि भावाला सोडून जाण्याचा दिवस जवळ येत चालला, तसतशा त्या अबोल आणि दु:खी झाल्या. वरकरणी त्या स्वतःला नेहमीसारखे दिसण्याचा प्रयत्न करीत होत्या पण ते लपवणे अथवा त्यावर मात करणे शक्य नव्हते. डायना म्हणाली, “की हे प्रस्थान, यापुर्वीच्या सर्व प्रस्थानांपेक्षा वेगळे असेल.” कदाचित त्या त्यांच्या भावापासून कदाचित आयुष्यभरासाठी वेगळ्या होणार होत्या.

ती म्हणाली, “जेन, बऱ्याच वर्षांपासून त्याने केलेला संकल्प पुर्ण करण्यासाठी तो सर्वकाही त्यागणार आहे, पण तरीसुद्धा त्याच्यामध्ये अजून नैसर्गिक आपुलकी आणि प्रेम प्रभावीपणे जागृत आहे.

सेंट जॉन वरवर पाहिले तर शांत दिसतो पण तो त्याचा मन:स्ताप लपवत आहे. त्याला पाहिल्यावर त्याची मनोवृत्ती सौम्य, अंत:करण मृदू भासते, पण ती चुकीची धारणा आहे, तो काही काही बाबतीत, अत्यंत कर्तव्य कठोर आणि प्रसंगी मृत्यूसमान अटळ आणि निर्दयी आहे आणि सर्वात वाईट गोष्ट म्हणजे माझी विवेकबुद्धी त्याला त्याच्या या कठोर निर्णयापासून परावृत्त करण्याची परवानगी देत नाही: निश्चितपणे, मी त्याला एका क्षणासाठीही दोष देऊ शकत नाही. तो एक खरा ख्रिश्चन असून तो त्याच्या निर्णयावर ठाम आहे: तरीही माझे जीव त्याच्यासाठी तीळतीळ तुटतो.”

तिच्या डोळ्यांतून अश्रू वाहत होते आणि मेरीने तिच्या खांद्यावर डोके टेकवले.

“आम्हाला आता वडील नाहीत आणि लवकरच आम्हाला घर किंवा भाऊ पण राहणार नाही,” ती मुसमुसत म्हणाली.

दु:ख कधी एकटे येत नाही या म्हणीची प्रचिती येण्यासारखी एक दु:खद घटना घडली. एक पत्र वाचत मि. सेंट जॉन आत आले आणि म्हणाले, "आमचे मामा, जॉन मरण पावले आहेत."

दोघी बहिणींना धक्का बसला असे वाटले पण त्यांना फारसे दुःख झाल्याचे वाटले नाही. त्यांना ही बातमी दुःखदायक वाटण्यापेक्षा महत्त्वाची वाटली.

"आणि मग काय?" तिने हळू आवाजात विचारणा केली.

"मग काय? काही नाही. वाचा."

जॉनने ते पत्र डायना कडे दिले.

तिने वाचल्यानंतर मेरीला दिले. मेरीने ते वाचून आपल्या भावाला परत केले; तिघांनीही एकमेकांकडे पाहिले आणि एक उदास, विचारपूर्वक स्मितहास्य केले.

"आमेन!" डायना म्हणाली; "तरीही आपण जगू शकू."

"कोणत्याही परिस्थितीत, आमची परिस्थिती पूर्वीपेक्षा वाईट तर होणार नाही," मेरी म्हणाली.

मिस्टर रिव्हर्स म्हणाले, "आपल्याला जे मनातून वाटत होते त्यापेक्षा खचितच विरूद्ध परिस्थिती आहे."

त्याने पत्र दुमडले, त्याच्या डेस्कवर ठेवले आणि निघून गेला.

काही मिनिटे कोणीच बोलले नाही; शेवटी डायना माझ्याकडे वळली.

"जेन," ती म्हणाली, "आमच्या या गूढ बोलण्याचे आणि मामासारख्या जवळच्या नातेवाईकाच्या मृत्यूमुळे आम्हाला खूप दुःख न झाल्याचे पाहून तुला आश्चर्य वाटले असेल. पण आम्ही त्याला पाहिले देखील नाही. माझ्या आईचा तो भाऊ होता; त्यांचे आणि आमच्या वडिलांचे बऱ्याच वर्षांपूर्वी भांडण झाले होते. त्याच्या सल्ल्याने माझ्या वडिलांनी सर्व संपत्ती सट्ट्यावर लावली आणि शेवटी सर्व

a

गमावली होती. त्यामुळे ते त्याच्यापासून वेगळे झाले. पण पुढे मामांनी यशस्वी धंदा केला आणि भरपूर पैसा मिळवला. असे दिसते की त्याने वीस हजार पौंडची संपत्ती कमावली; त्याने कधीही लग्न केले नाही. आमच्याशिवाय त्यांचे कोणीही नातेवाईक नव्हते फक्त आणखी एक व्यक्ती होती जी, त्याच्याशी संबंधित होती. माझ्या वडिलांना नेहमी अशी आशा होती की माझे मामा आमच्या भवितव्यासाठी काही तरतूद करतील.

या पत्रात आम्हाला कळवले आहे की त्याने तीन शोक रिंग खरेदीसाठी सेंट जॉन, डायना आणि मेरी रिव्हर्समध्ये तीस गिनींचा अपवाद वगळता सर्व काही त्याच्या दुसऱ्या नातेवाईकाच्या नावे केले आहे. त्याच्या इच्छेप्रमाणे वागण्याचा त्याला नक्कीच अधिकार होता आणि तरीही या बातमीने आम्हाला क्षणिक दुःख दिले. मला आणि मेरीला प्रत्येकी एक हजार पौंड जर मिळाले असते तर आम्हाला त्या पैशाचे पाठबळ लाभले असते आणि सेंट-जॉनला तेव्हढीच रक्कम मिळाली असती तर त्याला त्याचा चांगला उपयोग करता आला असता.

एकदा हे स्पष्टीकरण दिल्यानंतर तो विषय बाजूला ठेवला गेला. मिस्टर रिव्हर्स किंवा त्यांच्या बहिणींनी त्याबद्दल दुसरे काहीही भाष्य केले नाही. दुसऱ्या दिवशी मी मॉर्टनला जाण्यासाठी मार्श एंड सोडले आणि डायना आणि मेरी दूरच्या गावी जाण्यासाठी निघाल्या, जिथे त्या गव्हर्नेसचे काम करत होत्या. पुढच्या आठवड्यात मिस्टर रिव्हर्स आणि हन्ना चर्चने दिलेल्या घरी परतले आणि जुने फार्महाऊस बंद केले.

# प्रकरण 31

'माझं घर', शेवटी, मला जेव्हा घर सापडले, ती एक छोटेखानी कॉटेज होती. शाळेच्या शिक्षिकेला राहण्यासाठी म्हणून दोन खोल्या दिल्या होत्या. एक लहान खोली, पांढऱ्या रंगाने रंगवलेली होती. जमीन चुना आणि वाळूने बनवलेली होती. फर्निचर म्हणून चार रंगवलेल्या लाकडी खुर्च्या, एक टेबल, एक घड्याळ, एक साइडबोर्ड जिथे दोन किंवा तीन प्लेट्स, काही डिश आणि चिनी मातीचा चहाचा सेट होता. माडीवर किचन एव्हढ्या आकाराची दुसरी खोली होती. तिथे एक बेड आणि एक कपाट होते, तसे माझ्याजवळील कपड्यांसाठी बरेच मोठे होते. पण माझ्या उदार मैत्रीणींमुळे आवश्यक त्या गोष्टींची भर पडून माझे सामान बऱ्यापैकी वाढले होते.

संध्याकाळ झाली. मला घरकामात मदत करण्याऱ्या छोट्या अनाथ मुलीला मी एक संत्रे खायला देऊन तिच्या घरी पाठवून दिले होते. मी शेकोटी जवळ एकटी बसले होते. त्यादिवशी सकाळी मी गावातील शाळा उघडली होती. माझ्याकडे वीस विद्यार्थीनी होत्या: त्यांपैकी तिघींना वाचायचे माहित होते, पण कोणालाही लिहणे आणि अंक ओळख नव्हती. बऱ्याच जणी विणकाम आणि काही थोड्या जणी शिवणकाम करु शकत होत्या. या भागातील लोकांची बोलण्याची आणि उच्चार करण्याची पद्धत बरीच वेगळी होती त्यामुळे सध्या आम्हाला एकमेकांची भाषा समजण्यात अडचण येत होती. त्यांपैकी काही जणींची वागण्या बोलण्याची रीत

अगदीच असंस्कृत होती. अडाणीपणा आणि बुरसटलेले विचार यामुळे त्यांना शिक्षणाचे महत्त्व समजत नव्हते. पण काही जणींना शिकण्याची इच्छा होती, त्या आज्ञाधारक होत्या, याचा मला आनंद झाला. मला वाटले या गरिब बिचाऱ्या मुली अडाणी असल्या तरी माणूस म्हणून सर्वजणी सारख्याच आहेत. आपल्यासारख्या शिक्षीत नसल्या तरी बुध्दीमत्ता, दयाळूपणा, विवेक आणि अंगभूत कौशल्ये त्यांच्या मध्येही नक्कीच असणार आणि या गुणांचा विकास करणे हे माझे कर्तव्यच आहे, असे मी मनापासून ठरवले होते. माझ्या जीवनापासून मी खूप आनंदाची अपेक्षा करत नव्हते: तरीही जर मी माझ्या मनाचे जास्त लाड न करता माझ्या आंतरिक शक्तींचा पुरेपूर वापर केला तर माझे तर जगणे सुसह्य होईलच पण इतरांच्या जीवनामध्ये चांगला बदल घडवून आणणे शक्य होईल, या विचाराने माझ्या मनाला उभारी आली परंतु या माझ्या शाळेत सकाळ दुपार शिकवण्याच्या कामात मी आनंदी होते काय? या प्रश्नाचे उत्तर नक्कीच नाही असे होते. मला हताश वाटत होते, ही नोकरी स्विकारून मी स्वतःचे समाजातील स्थान उंचावण्याऐवजी होते ते स्थान गमावल्यासारखे वाटत होते. माझ्या सभोवतालचे अज्ञान, दारिद्र्य आणि गांवढळपणा पाहून मी निराश झाले होते.

तथापि यासर्व गोष्टींसाठी स्वतःला दोषी समजून स्वतःचा राग राग करणे योग्य नाही हे मला समजत होते: या गोष्टीची जाणीव मला स्वतःला दिलासा देऊन गेली आणि मी माझ्या निराशेतून बाहेर पडण्यात यशस्वी होईल, याची खात्री वाटू लागली. एक दोन महिन्यातच माझे हे ध्येय गाठता येईल आणि मग माझ्या विद्यार्थीनींमधील बदल व त्यांची प्रगती पाहून आताचा विषाद, समाधानात बदलेल अशी आशा वाटू लागली.

a

दरम्यान मला स्वतःला एक प्रश्न विचारायचा होता, "काय चांगले आहे?---मोहाला बळी पडून, भावनेच्या लाटेत वाहून जाणे की काहीही प्रयत्न न करता, संघर्षाला सामोरे न जाता, रेशमाच्या जाळयात गुरफटून, फुलांच्या पाकळयांवर गाढ झोपत, फ्रान्सच्या दक्षिणेकडील सुखासीन राजेशाही व्हिला मध्ये जागे होणे: एव्हाना मि. रोचेस्टरांची रखेल म्हणून मी त्यांच्या प्रेमात स्वतःला हरवून बसले असते---त्यांनी देखील काही काळ माझ्यावर प्रेमाची बरसात केली असती, त्याचं माझ्यावर प्रेम होतं---दुसरे कोणी माझ्यावर असे प्रेम कधीच करू शकणार नाही. माझ्या सौंदर्याला, तारुण्याला आणि मोहकतेला मिळालेली गोड दाद आता परत लाभणार नाही---कारण हे आकर्षण मी कधीही कोणाला दाखवणार नाही. त्यांनी माझ्यावर प्रेम केले आणि त्यांना माझा अभिमान होता; आणि त्यांच्यासारखा दुसरा कोणीही असू शकत नाही.--- अरे पण मी कुठे भरकटत चालले आहे, आणि काय म्हणते आहे: सर्वात महत्वाचे म्हणजे भावनांचे काय? हे खरेच चांगले आहे काय? मला विचारायचे आहे एका क्षणी फसव्या आनंदात उत्कंठेची पराकोटी गाठणे आणि दुसऱ्या क्षणी, लाज आणि पश्चातापाच्या सर्वात कटू अश्रूंनी गुदमरून जाणे---मुर्खपणाच्या नंदनवनात, मार्सेलीस मध्ये गुलाम बनून रहाणे चांगले किंवा इंग्लंड मधील एका थंड डोंगराच्या कुशीतील खेड्यात, एक स्वतंत्र आणि प्रामाणिक, शाळा मुख्याध्यापिका बनून स्वावलंबी होणे चांगले?"

होय; मला आता असे वाटते की मी नीतीनियम आणि कायद्याला चिकटून राहीले ते योग्यच होते. एका उन्मादी क्षणी चुकीच्या सल्ला नाकारून योग्य निर्णय घेण्यासाठी परमेश्वरानेच मला मार्गदर्शन केले होते, त्यासाठी मी परमेश्वराची आभारी आहे.

a

या निष्कर्षाप्रत आल्यावर, मी उठले, दारापाशी जाऊन, सुर्यास्त न्याहाळू लागले; समोर कापणीला आलेली शेते दिसत होती. माझी कॉटेज आणि शाळा गावापासून अर्धा मैल अंतरावर होती. पक्ष्यांचा किलबिलाट आणि संध्याकाळी घरट्यात परतायची लगबग सुरू होती.

मंद वारा वाहत होता, वातावरणात एकप्रकारचा सुगंध दरवळत होता.

हे सर्व दृश्य पाहताना मला आनंद वाटत होता, पण अचानक मला रडू फुटले---पण कशासाठी? माझ्या नशिबाने मला माझ्या प्रियकरापासून दूर केले होते: मी आता त्यांना पाहू शकत नव्हते; माझ्या जाण्याने त्यांची घोर निराशा होऊन जीवघेणा संताप उफाळून वर आला असणार---परिणामी ते पुन्हा एकदा योग्य मार्गापासून खूप दूर भटकतील आणि पुन्हा कधीच सावरणार नाही, अशी मला भीती वाटत होती. ज्या सुंदर संध्याकाळचे आकाश आणि एकाकी मॉर्टन व्हॅलीचे निरिक्षण मी करत होते, तिकडून तोंड फिरवले. एकाकी मॉर्टन व्हॅली म्हणण्याचे कारण म्हणजे, चर्च आणि पाद्री यांच्या घराव्यतिरिक्त कोणतीच इमारत नव्हती. अगदी टोकाला अर्धवट झाडांमध्ये लपलेले, व्हॅले-हॉलचे छत दिसत होते. तिथे श्रीमंत कारखानदार, मि. ऑलिव्हर आणि त्यांची मुलगी राहत होते. मी डोळे झाकून घेतले आणि माझे डोके माझ्या दाराच्या दगडी चौकटीवर टेकवले: लौकरच माझ्या छोट्या बागेच्या गेटचा आवाज ऐकू आला. मी डोके वर केले, मि. रिव्हर्स यांचा म्हातारा कुत्रा कार्लो, गेट ढकलत होता. तेव्हढ्यात स्वत: सेंट-जॉन गेटजवळ आलेले दिसले. त्यांचा चेहरा गंभीर वाटत होता, कपाळावर आठ्या दिसत होत्या. मी त्यांना आत येण्यास सांगितले.

“नाही, मी थांबू शकत नाही,” ते मला म्हणाले, “मी फक्त तुमच्यासाठी एक लहान पॅकेज देण्यासाठी आलो आहे जे माझ्या बहिणींनी तुमच्यासाठी सोडले आहे. मला वाटते की त्यात रंग पेटी, पेन्सिल आणि कागद आहेत.”

मी ते घेण्यासाठी पुढे आले; ही भेट मला आवडली. जशी मी पॅकेज घ्यायला पुढे गेले तसा सेंट जॉन यांच्या पहाण्यात माझा चेहरा आला असावा; कदाचित माझ्या अश्रूंच्या खुणा अजूनही तिथे दिसत होत्या.

“पहिल्या दिवसाचे काम बघून, तुझ्या अपेक्षेपेक्षा कठीण वाटत आहे काय?” त्यांनी मला विचारले.

“अरे! नाही, उलट मला विश्वास आहे की थोड्याच दिवसात, मी आणि माझ्या शाळकरी मुलींचे चांगले जमेल.”

“पण कदाचित तुझी राहण्याची सोय, कॉटेज, फर्निचर पाहून अपेक्षाभंग असेल, ते खरे तर फारच कमी आहेत पण—”

मी म्हणाले, “माझी कॉटेज स्वच्छ आणि वादळापासून सुरक्षित आहे; माझे फर्निचर पुरेसे आणि आरामदायक आहे; मी जे मिळाले आहे त्याबद्दल मी कृतज्ञ आहे, मी अजिबात दुःखी नाही. कार्पेट, सोफा किंवा चांदीची डिश यांची अपेक्षा करायला मी मूर्ख किंवा लालसी नाही. याशिवाय, पाच आठवड्यांपूर्वी माझ्याकडे काहीच नव्हते; मी भिकारी होते, सर्वांनी नाकारलेली एक निराश्रित स्त्री; आता माझी म्हणून काही तरी ओळख बनली आहे. माझ्याकडे घर आणि नोकरी आहे; मी देवाचा चांगुलपणा, माझ्या मित्रांची उदारता आणि नोकरी मिळाल्याने आश्चर्यचकित झाले आहे. माझी काहीच तक्रार नाही, मी आनंदात आहे.”

“परंतु तुला एकटेपणाचा त्रास होत आहे काय? शिवाय, हे छोटेसे घर खूप अंधारलेले आणि खूप रिकामे आहे.”

a

“आत्तापर्यंत, मला शांततेचा आनंद घेण्यासाठी मला फारच कमी वेळ मिळाला आहे आणि एकाकीपणाचा कंटाळा येण्यास अजून बराच अवधी जायला हवा.”

“ठीक ; मला आशा आहे की तुला अपेक्षित असलेले समाधान तुला खरोखरच अनुभवता येईल; काहीही झाले तरी तुमची बुद्धी तुम्हाला शिकवेल की लोटच्या पत्नीसारखे भीतीने घाबरून मागे वळून पाहण्याची गरज नाही. तुम्ही मागे काय सोडले आहे हे मला माहीत नाही, पण मी तुम्हाला सल्ला देतो की प्रलोभनाचा प्रतिकार करा आणि मागे वळून पाहू नका; कमीतकमी काही महिने तरी धैर्याने आपले कार्य चालू ठेवा.”

“मीही तेच करू इच्छिते,” मी उत्तर दिले.

सेंट-जॉन पुढे म्हणाले, “एखाद्याच्या प्रवृत्तीविरुद्ध कृती करणे आणि नैसर्गिक वृत्तीविरुद्ध लढणे कठीण आहे; पण हे शक्य आहे, मला अनुभवावरून माहित आहे. देवाने आपल्याला आपले नशीब स्वतः घडवण्याची शक्ती दिली आहे आणि जेव्हा आपल्या शक्ती संवर्धनासाठी, जास्त पोषणमुल्यांची गरज भासते आणि ती मिळू शकत नाहीत---तेव्हा आपल्याला हवा तो मार्गाचे अनुसरण न करता आल्याने, आपल्या इच्छाशक्तीवर ताण येतो--आपल्याला अशा वेळी उपासाने गलीतगात्र होण्याची अथवा निराशेने खचून जाण्याची आवश्यकता नाही: आपल्याला शक्ती संवर्धनासाठी दुसरे अन्न शोधायला हवे, जे निषिद्ध फळासारखे शक्तीदायक, कदाचित अधिक शुद्ध असेल, त्यांचा आस्वाद घ्यावा लागेल; नशिबाने जर आपला रस्ता अडवला तर आपल्या साहसी पावलांसाठी तसाच थेट आणि रुंद नवा रस्ता खोदायला लागेल भले मग तो खडबडीत का असेना.

a

“एक वर्षापूर्वी, मी देखील खूप दुःखी होतो, कारण मला वाटतं होते की मी धर्मोपदेशक पदाची निवड करण्यात चूक केली की काय: येथील एकाच प्रकारच्या शिस्तबद्ध कामावर मी प्रचंड नाखुश होतो--- क्रियाशील जीवनासाठी मी आसुसलेला होतो---मला साहित्य क्षेत्रात कारकीर्द घडवायची होती--- धर्मोपदेशक बनण्याऐवजी, मला कलाकार, लेखक किंवा वक्ता बनण्यात रस होता: होय, माझ्या धर्मोपदेशकाच्या लांब झग्याआड, माझे हृदय, राजकारणी किंवा सैनिक बनून वैभव, कीर्ती, शक्ती मिळवण्यासाठी तळमळत होते. मला माझे आयुष्य इतके दु:खदायक झाले होते की ते लौकरात लौकर बदलावे किंवा संपून जावे असे वाटत होते. बऱ्याच संघर्षानंतर अंधारात एक आशेचा किरण चमकला आणि दिलासा मिळाला: माझ्या जखडून गेलेल्या आयुष्याला, पुर्ण सामर्थाने पंख पसरून माझ्या सभोवतालच्या परिसरापलीकडे झेपावण्याचा आदेश मला परमेश्वराने दिला. देवाने माझ्यासाठी एक काम नेमून दिले; ते उत्तम प्रकारे निभावण्यासाठी, कौशल्य आणि सामर्थ्य, धैर्य आणि वक्तृत्व, सैनिकी बाणा आणि राजकारणी वृत्ती या सर्व गोष्टींची आणि देशांतराची तयारी असणे गरजेचे आहे: हे सर्व चांगल्या मिशनरीसाठी आवश्यक आहे.

“म्हणून मी मिशनरी होण्याचा निश्चय केला; त्या क्षणापासून, माझे मन बदलले: माझ्या सर्व क्षमता त्यांच्या बंधनातून मुक्त झाल्या, सारे पाश तुटून गेले फक्त त्या जागी बोचरी जाणीव उरली, कालांतराने ती पण नाहीशी होईल. माझ्या वडिलांनी या ठरावाला विरोध केला; परंतु आता त्याच्या मृत्यूनंतर, यापुढे कोणताही कायदेशीर अडथळा नाही; अजून काही गोष्टीची तरतूद करायची आहे, मॉर्टन मध्ये माझा उत्तराधिकारी नेमायचा आहे, भावनांची गुंतागुंत सोडवण्यासाठी काही तोडगा सापडेल किंवा पूर्णपणे तोडून मी माझ्या दुबळेपणावर संघर्ष करून मात करेन, अशी मी शपथ घेतली आहे---आणि मी पुर्वेला जाण्यासाठी युरोप सोडून जाईन.”

a

हे त्यांनी आपल्या विलक्षण आवाजात शांतपणे पण ठासून सांगितले; बोलण्याच्या शेवटी त्यांची नजर माझ्याकडे नव्हती, तर ते मावळतीच्या सूर्य पाहत होते होते: मी सुध्दा तेच करत होते. आम्हा दोघांची पाठ शेतातून येणाऱ्या रस्त्याकडे होती. गवतामधून जाणाऱ्या वाटेवर कुणाची चाहूल लागली नाही. दरीतून वाहणाऱ्या पाण्याचाच काय तो आवाज, त्या शांत वातावरणात भरून राहिला होता. आम्ही निरोपाच्या गोष्टी बोलायला सुरुवात करणार, तोच चांदीच्या घंटेसारखा आनंदी आणि गोड आवाज कानावर आला, "गुड इव्हनिंग मिस्टर रिव्हर्स, गुड इव्हनिंग, ओल्ड कार्लो, तुमचा कुत्रा त्याच्या मित्रांना, तुमच्यापेक्षा लवकर ओळखतो, सर: मी अगदी शेताच्या सुरवातीला होते तेव्हाच त्याने कान उंचावले होते आणि शेपटी हालवत होता आणि तुमची मात्र माझ्याकडे पाठ आहे."

ते खरे होते, तो मंजुळ आवाज कानावर पडल्यावर मि. रिव्हर्स एकदम स्तब्ध झाले. एव्हढ्या जवळून आलेला आवाज आणि बोलणाऱ्या व्यक्तीचे सलगीचा स्वर त्यांना आश्र्चर्यचकित करून गेला. तरीही न वळता त्यांनी बोलणे पूर्ण केले आणि हळुच तोंड त्यादिशेला वळवले, त्यांच्यापासून तीन फुटांवर पांढरा पोशाख केलेली, नाजुक डौलदार बांधा असलेली, एक मोहक तरूणी उभी होती. कार्लोला कुरवाळायला ती खाली वाकली होती जेव्हा तिने डोके वर उचलले तेव्हा तोंडावरचा लांब बुरखा मागे गेला आणि मला तिचा चेहरा दिसला. परिपूर्ण सौंदर्याचा तो आदर्श नमुना होता. तिच्या मोहिनी मध्ये ना कशाची कमतरता होती ना तिच्या सौंदर्यात काही दोष दिसत होता. चित्रातल्यासारखी आखीव रेखीव आणि देखणी होती. काळेभोर, मोठे डोळे, लांब आणि दाट पापण्या, रेखीव भुवया, लाल गुलाबी गाल, स्वच्छ, शुभ्र दात, डाळींबासारखे लालचुटुक ओठ, नाजुकशी हनुवटी, चेहऱ्यावर एक शांत भाव दिसत होता. केसांच्या जाड वेण्या घातल्या होत्या. निसर्गाने अगदी

फुरसतीच्या वेळी तिला घडवण्यासाठी सर्व कसब पणाला लावले होते. तिला पाहताच क्षणी मी आश्र्चर्यचकित झाले आणि तिच्या सौंदर्याने भारावून गेले.

आणि मिस्टर सेंट-जॉनना पृथ्वीवरील या अप्सरेबद्दल काय वाटत असेल? जेव्हा मी त्यांना तिच्याकडे वळून पाहताना पाहिले, तेव्हा मी स्वाभाविकपणे स्वतःला हा प्रश्न विचारला आणि मी त्यांच्या चेहऱ्यावर उत्तर शोधू लागले; पण त्यांचे डोळे आधीच सुंदरी वरून वळले होते, आणि ते दरवाजाजवळ उगवलेल्या डेझीच्या फुलांना न्याहाळत होते.

"एक सुंदर संध्याकाळ! "पण तुला बाहेर एकटे राहायला थोडा उशीर झाला आहे," ते डेझीची फुले पायाखाली चिरडत म्हणाले.

"अरे! ती म्हणाली, मी सकाळीच गावावरून वरून आले आहे. आज दुपारी माझ्या पापानी मला सांगितले की तू मुलींसाठी शाळा उघडली आहेस आणि नवीन शिक्षिका आल्या आहेत. मग चहा झाल्यावर मी कपडे घातले आणि त्यांना भेटायला आले आहे. या त्याच शिक्षिका आहेत का?" तिने माझ्याकडे बोट दाखवत विचारले.

"होय," सेंट-जॉनने उत्तर दिले.

"तुम्हाला मॉर्टनची सवय होईल असे वाटते का?" तिने मला साध्या, निरागस आणि थेट स्वरात विचारले, जे बालिश वाटले असले तरी मी आनंदित झाले. "मला अशी आशा आहे," मी उत्तर दिले.

तुम्हाला तुमच्या शाळेतील मुली तुमच्या अपेक्षेइतक्याच शिकण्यास इच्छुक आढळल्या का?"

"होय."

"तुम्हाला तुमचे घर आवडते का?"

"खूप."

"मी ते छान सुसज्ज केले आहे का?"

a

"खरोखरच खूप छान."

"तुम्हाला मदत करण्यासाठी ॲलिस वुडला कामावर ठेवण्याचा मी चांगला निर्णय घेतला आहे का?"

"नक्कीच होय; ती कुशल आहे आणि तिला शिकण्याची इच्छा पण आहे."

मला वाटले की ही तरुण मुलगी मिस ऑलिव्हर असावी. इतके चांगले भाग्य आणि तितकाच चांगला स्वभाव, मला वाटले जन्माच्या वेळी उच्च स्थितीतील ग्रहयोग असणार.

"मी वेळोवेळी तुमच्या मदतीसाठी येईन," ती पुढे म्हणाली; "तुला भेटण्याने माझ्यासाठी तेव्हढाच बदल होईल; मला बदल आवडतो. मिस्टर रिव्हर्स, तुम्हाला जर आठवत असेल की शहरात राहत असताना मी किती आनंदी असायची. कालच मी पहाटे दोन वाजेपर्यंत नाचत होते. तिथे मिलीटरीची रेजिमेंट आली आहे; त्यातील अधिकारी जगातील सर्वोत्तम पुरुष आहेत: त्यांनी आम्हा तरुण मुलींना अगदी दिपवून टाकले!"

मला वाटले मी मिस्टर रिव्हर्सनी खालचा ओठ चावला. हे नक्की होते की जेव्हा ती आनंदी तरुण मुलगी त्यांच्याशी बॉल डान्सबद्दल बोलल होती तेव्हा त्यांचे तोंड आवळलेले होते आणि त्यांचा चेहरा कठोर आणि गंभीर झाला होता, त्यावर दुःखी भाव दिसत होते. त्यांनी डेझीच्या फुलांकडे पाहणे थांबवले. तिच्याकडे गंभीर, शोधक आणि अर्थपूर्ण नजरेने पाहिले. ती तिचे तारुण्य, तिचा ताजेपणा आणि तिच्या तेजस्वी डोळयांना शोभून दिसेल असे हसली. सेंट-जॉन पुन्हा शांत आणि थंड झालेले पाहून तरुण मुलगी कार्लोला पुन्हा माया करू लागली.

"गरीब कार्लो माझ्यावर प्रेम करतो," ती म्हणाली; "तो त्याच्या मित्रांपासून दूर जात नाही; तो कठोर नाही, त्याला जर बोलता येत असते तर तो नक्कीच तर तो गप्प बसला नसता."

a

तिने खाली वाकून कुत्र्याच्या डोक्यावर थोपटले. मी, मि. रिव्हर्सचा चेहरा उजळलेला पाहिला, त्यांचे गंभीर डोळे सौम्य झाले होते, एका निराळ्या भावनेने ते चमकून निघाले होते, त्यावेळी ते, ती जशी स्त्री सौंदर्याने परिपूर्ण भासत होती तसेच ते सुंदर आणि देखणे पुरुष म्हणून शोभून दिसत होते. त्यांची छाती धडधडत असावी; निरंकुश बंधनाने कंटाळलेले त्यांचें हृदय, त्यांच्या इच्छेविरुद्ध स्वतःला सर्व बंधनातून सुटका करून घेण्यासाठी धडपडत असावे असे वाटले आणि त्याने त्याचे स्वातंत्र्य मिळविण्यासाठी जोरदार प्रयत्न केले असावेत: परंतु सेंट-जॉननी, एखादा निष्णात घोडेस्वार तसा नाठाळ घोडा आपल्या काबूत आणतो, तसे मनातील भावनांना लगाम घातला: त्या तरुण मुलीने केलेल्या गोड आर्जवाला त्यांनी एका शब्दाने किंवा हालचालीने प्रतिसाद दिला नाही.

“पापा म्हणत होते हल्ली तू भेटायला येत नाहीस,” मिस ऑलिव्हर वर बघत म्हणाली. “तुम्ही वेले हॉलमध्ये अगदी परके झाला आहात. आज संध्याकाळी पापा एकटे आहेत आणि सध्या त्यांना थोडे बरे नसते; तुला त्यांना बघायला माझ्यासोबत यायला आवडेल का?”

“मिस्टर ऑलिव्हरना त्रास देण्यासाठी ही चांगली वेळ नाही,” सेंट-जॉनने उत्तर दिले.

“अनुकूल नाही! उलट ही अशी वेळ आहे जेव्हा पापाना माणसांना भेटायला आवडते: जेव्हा काम संपते आणि त्यांच्याकडे दुसरे काही करायला बाकी नसते. मि. रिव्हर्स; तुम्ही इतके लाजाळू आणि दु:खी का आहात?” तरीही सेंट-जॉन शांत असल्याचे पाहून ती पुढे म्हणाली: “अरे! मी विसरले होते, मी खूप गोंधळलेली आणि विसरभोळी आहे! मला माफ करा. माझ्या बडबडीला प्रतिसाद न देण्यामागे तुमच्याकडे खूप चांगले कारण आहे, हे मी पूर्णपणे विसरले होते; डायना आणि मेरी

आज तुम्हाला सोडून गेल्या, मूर-हाउस आता बंद आहे आणि तुम्ही एकटे आहात. मला तुमच्याबद्दल वाईट वाटत आहे; आमच्याकडे या आणि बाबांना भेटा.”

“आज संध्याकाळी नाही, मिस रोझमेंड, आज नको.”

मिस्टर सेंट-जॉन यांत्रिकपणे बोलून गेले; या नकारासाठी किती मेहनत घ्यावी लागली हे फक्त त्यांनाच माहीत होते.

“बरं, तू खूप हट्टी आहेस म्हणून मी आज तुला सोडेन; कारण माझी थांबण्याची हिंमत नाही. दव पडायला सुरुवात होईल. गुड इव्हनिंग.”

तिने त्यांच्याकडे हात पुढे केला; त्यांनी हाताला स्पर्श केला.

“गुड इव्हनिंग,” त्यांनी प्रतिध्वनीसारख्या कमी, मंद आवाजात पुनरावृत्ती केली.

ती निघून गेली, पण काही वेळाने परत आली.

“तुम्ही ठीक आहात?” तिने विचारले.

हा प्रश्न तिने विचारला; कारण सेंट जॉनचा चेहरा पांढराफटक पडला होता.

“खूप छान,” त्याने उत्तर दिले आणि मान लवून तो निघून गेला.

तिने एक मार्ग स्वीकारला, त्यांनी दुसरा; दोनदा तीने त्यांच्याकडे वळून पाहिले आणि अडखळत अडखळत शेतातून चालू लागली. तो मात्र घट्टपणे पाय रोवून चालला होता एकदाही मागे वळून न पाहता.

दुसऱ्यांच्या दुःखाचा आणि त्यागाचा हा प्रसंग, मला माझ्या स्वतःच्या दुःखापासून थोडा दूर घेऊन गेला. डायना रिव्हर्सने घोषित केले होते की तिचा भाऊ मृत्यूसारखा अटळ आहे; त्यात तिने काहीही अतिशयोक्ती केली नव्हती.

## प्रकरण 32

मी माझ्या शाळेचे काम शक्य तितक्या कार्यक्षमतेने आणि श्रध्दापुर्वक करत होते. सुरुवातीला काम खूप अवघड वाटले. मला शाळेतील मुलींचा स्वभाव समजण्यास काही वेळ लागला. त्यांचे अज्ञान आणि शिक्षणासंबंधी उदासीनवृती पाहून मी, त्यांना शिक्षित करण्याची आशा जवळजवळ सोडून देण्याच्या बेतात आले होते. सुरवातीला सर्वजणी सारख्याच मख्ख वाटत होत्या पण लवकरच मला समजले की मी चुकत होते: त्यांच्यामध्ये पण फरक होता जसा इतर सुशिक्षित लोकांमध्ये सुध्दा दिसून येतो. आमची जेव्हा चांगली ओळख झाली ते तो फरक प्रकर्षाने जाणवू लागला. सुरवातीला त्यांना माझी भाषा आणि माझे नियम आणि वागणे यांचे आश्र्चर्य वाटत होते नंतर ते कमी झाले. सुरवातीला मंद, अडाणी वाटणाऱ्या काहीजणी, नंतर आश्र्चर्य करण्यासारख्या अत्यंत तल्लख बुद्धीच्या दिसून आल्या. बऱ्याच जणी प्रेमळ आणि मदत करण्यास तत्पर होत्या आणि मला त्यांच्या अंगी उपजतच सभ्यता, उत्कृष्ट क्षमता आणि स्वाभिमान असल्याचे दिसून आले, त्यामुळे मला आनंद झाला आणि त्यांचे कौतुकही वाटले. लौकरच त्यांच्याकडून कामे करवून घेण्यात, त्यांच्या कुटुंबीयांना पण स्वच्छता, टापटीप, नीटनेटकेपणा यांचे महत्त्व पटवून देण्यात, त्यांना त्यांची कामे नियमितपणे शिकण्यात मला आनंद वाटू लागला. त्यांच्या प्रगतीचा वेग, काही काही घटनांमध्ये, अगदी आश्चर्यचकित करणारा होता, यांचा मला रास्त अभिमान आणि आनंद वाटला. याशिवाय काही मुली मला स्वतःला आवडू लागल्या. माझ्या शाळेत शिकणाऱ्या बऱ्याचशा विद्यार्थ्यींनी शेतकऱ्यांच्या मुली होत्या: त्या आता काही शाळकरी मुली

a

राहिलेल्या नव्हत्या, तर सोळा सतरा वर्षांच्या तरुण मुली होत्या, त्यांना वाचणे, लिहिणे आणि शिवणकाम येत होते, त्यांना मी इतिहास, भूगोल, व्याकरण, नाजुक भरतकाम शिकवले. त्यांना पण शिकण्याची आवड होती, स्वत:मध्ये सुधारणा घडवून आणण्यासाठी त्या प्रयत्नशील होत्या. अनेकदा संध्याकाळी त्यांच्या घरी, हसत खिदळत आमची शिकवणी सुरु असे. त्यांच्या पालकांना या गोष्टीचे मोठे नवल वाटत असे आणि आदराने ते माझे आदरातिथ्य करायला उत्सुक असत. त्यांच्या भावनांचा मान राखत, मी पण त्यांच्या मुलींना अधिकाधिक गोष्टींचे ज्ञान देण्यास सदैव तत्पर असे, ज्याची त्यांना सवय नव्हती आणि त्यांना त्याची अपूर्वाई वाटत असे. या शिकवणीचा त्यांना फायदा झाला. त्यांना मिळालेल्या या चांगल्या वागणुकीमुळे त्यांच्या नजरेत त्यांचा 'स्व' उंचावला आणि आपली गुणवत्ता वाढविण्यासाठी चढाओढ सुरू झाली.

शेजारीपाजारी मी आवडती आणि सन्माननीय व्यक्ती बनले. मी बाहेर पडले की लोक प्रेमळ अभिवादन करून हसून बोलत असत. अशा प्रकारे लोकांच्या, भले कष्टकरी, शेतकरी का असेनात, कौतुकाच्या, आदराच्या नजरा झेलताना, मला उबदार सूर्यप्रकाशात असल्यासारखे शांत आणि आनंदी वाटत असे आणि अंतर्मनात निर्मळ भावना उमलून येऊन उल्हसित वाटत असे. माझे हृदय दुःखाने जड होण्याऐवजी, कृतज्ञतेने भारावून जात असे. तरीही, या शांत आणि प्रसन्न वातावरणात, माझ्या शाळेच्या कामात संपूर्ण दिवस घालवल्यानंतर, संध्याकाळचा वेळ, मी चित्र काढणे किंवा वाचणे यात घालवत असे. रात्रीच्या वेळी विचित्र स्वप्ने माझा पाठलाग करत. वेगवेगळया प्रकारची, रंगीबेरंगी, विलक्षण साहसी, कधी कल्पनारम्य तर कधी गोंधळात टाकणारी, वादळी स्वप्न शृंखला माझा पाठपुरावा करत असे. अनेकदा स्वप्नात मिस्टर रोचेस्टर संकटाच्या सर्वात भयानक क्षणी भेटत असत. मला त्याच्या मिठीत असल्याचा, त्यांचा आवाज ऐकू आल्याचा, त्यांच्याशी

a

नजर मिळवल्याचा, इतके काय तर हाताला त्यांचा स्पर्श झाल्याचा भास होई. स्वप्नात त्यांच्यावर प्रेम करतांना, त्यांचे प्रेम स्विकारताना, त्यांची सोबत आयुष्यभरासाठी लाभावी अशी इच्छा करत असे. एकदा अशीच जाग आली, मी कुठे आणि कोणत्या परिस्थितीत आहे, हे मला आठवले आणि मी पलंगावर थरथर कापत उठले. अजून रात्र संपली नव्हती, माझी निराशा उफाळून वर आली आणि भावनांचा स्फोट झाला. माझे हृदय रडत होते आणि त्यांचे रडणे फक्त मलाच ऐकू येत होते. दुसऱ्या दिवशी सकाळी नऊ वाजता मी शाळा उघडली आणि शांत होऊन मी दिवसभराच्या कामांसाठी तयार झाले.

रोझमेंड ऑलिव्हरने शाळेला भेट देण्याचे तिचे वचन पाळले. ती सहसा तिच्या मॉर्निंग वॉकच्या वेळी तिच्या पोनीवरून शाळेत येत असे, तिच्या पाठोपाठ नोकर आत येई. नेहमीच्या जांभळ्या रंगाच्या घोडेस्वारीच्या पोशाख आणि काळ्या रंगाच्या वेल्वेटची ॲमेझॉन कॅप शोभून दिसत असे. कुरळे केस टोपीतून सुटून तिच्या डौलदार मानेवर दिमाखात रुळत असत.. साध्यासुध्या शाळेतील तिचे आगमन आमच्या गरीब, खेडवळ विद्यार्थ्यींनींना एक पर्वणीच वाटत असे. जेव्हा त्यांच्या विस्मयचकित नजरा झेलत ती संथपणे चालत आत येई, तेव्हा बहुतेक वेळा मि. रिव्हर्स यांचा प्रश्नोत्तरांच्या तास सुरू असे. पाहुणीच्या आगमनाची चाहूल, त्यांना तिला न पाहता होत असावी हे त्यांच्या विचलित झालेल्या मनोवृत्ती वरून जाणवत असे. तिला पाहताच त्यांचा चेहरा उजळून निघत असे. एखादा तिरपा नेत्र कटाक्ष अथवा जाणूनबुजून चेहऱ्यावर आणलेले

अलिप्त भाव यापेक्षा तेथील शांततेतून, त्यांची दडपलेली उत्कंठा अधिक तीव्रपणे प्रगट होत असे.

अर्थात, तिला तिची शक्ती माहित होती: खरे सांगायचे झाले तर मि. रिव्हर्सना यांची कल्पना नव्हती, कारण ते तिच्यापासून काही लपवू शकले नाहीत.

a

मि. रिव्हर्स यांनी ख्रिश्चन धर्म-तत्त्वांनुसार स्थितप्रज्ञता, निर्विकार वृत्ती अंगी बाणवली होती. तरीही एकदा, जेव्हा ती त्यांच्याबरोबर आनंदाने हसत, गमतीने बोलत, त्यांच्या चेहऱ्याकडे प्रेमळ कटाक्ष टाकत होती, तेव्हा त्यांचे हात अस्वस्थपणे थरथरताना दिसले, डोळ्यात स्फुल्लिंग चेतलेले होते. आवळून धरलेल्या ओठातून जरी शब्द बाहेर पडत नसले, तरी त्यांची, दु:खी पण दृढनिश्चयी नजर सांगत होतु, “मी तुझ्यावर प्रेम करतो आणि मला माहीत आहे की तू मला पसंत करतेस. प्रेमातील संभाव्य हार, मला मूक बनवत नसून, माझे प्रेम तू नक्कीच स्वीकारशील याची मला खात्री आहे. पण माझं हृदय अगोदरच पवित्र वेदीवर ठेवलेले आहे: त्या भोवती अग्नी पेटवण्यासाठी व्यवस्था केली गेली आहे, ते लवकरच यज्ञात भस्मसात झाल्याशिवाय शिवाय राहणार नाही.”

ती लहान मुलासारखी उदास झाली. एक दु:खाचा ढग तिच्या तळपत्या उत्साहाला झाकोळून गेला; तिने पटकन आपला हात, त्यांच्या हातातून मागे घेतला, आणि वैतागून चपळाईने बाजूला वळली, तिला पाहून जणू प्राणावर उदार झालेली वीरांगना असल्याचा मला भास झाला. तिला असे जातांना पाहून मि. सेंट जॉन, तिला रोखण्यासाठी, परत बोलवण्यास, संपूर्ण जगाची तमा न बाळगता पुढे होतील असे वाटून गेले: पण त्यांना स्वर्ग गमावण्याची संधी सोडायची नव्हती. खऱ्या, शाश्वत स्वर्गाच्या आशेखातर, ते तिच्या प्रेमाच्या स्वर्गीय सुखावर पाणी सोडायला तयार झाले होते. शिवाय त्यांच्या महत्वाकांक्षी स्वभावातील भटकंतीची आवड, कविता करण्याचा छंद, धर्मोपदेशक बनण्याची आकांक्षा या साऱ्या गोष्टींची बांधिलकी, ते एका उत्कट भावनेकरिता सोडून देऊ शकणार नव्हते. त्यांची, वेले हॉल मधील सुखासीन आणि शांततापूर्ण जीवनासाठी, मिशनरींचा खडतर लढा सोडून द्यायची तयारी नव्हती. या गोष्टी मला नंतर

a

मि. रिव्हर्स यांच्याशी बोलतांना समजल्या. तसा त्यांचा स्वभाव घुम्मा होता पण त्यांना माझ्या स्वभावाची अचूक पारख झाल्याने, मी त्यांना विचारायचे धाडस करू शकले.

मिस ऑलिव्हर अनेकदा मला माझ्या कॉटेजमध्ये भेटायला येत असे. लवकरच मी तिला पूर्णपणे ओळखले, कारण तिच्या स्वभावात कोणताही आडपडदा अथवा रहस्य नव्हते, ती मोहक जरूर होती, पण हृदयशून्य नक्कीच नव्हती. हक्काने मागणी करणारी होती, पण स्वार्थी नव्हती. लहानपणापासून लाडाकोडात वाढलेली होती, पण अति लाडाने बिघडलेली नव्हती. ती थोडी धांदरट असली तरी प्रसन्नचित्त होती. ती आकर्षक होती पण गर्विष्ठ नव्हती.

तिला तिच्या श्रीमंतीचा अभिमान नव्हता. ती उदार, पुरेशी बुद्धिमान, आनंदी आणि चैतन्यशील होती, परंतु थोडी भोळी होती: ती अतिशय मोहक होती अगदी माझ्यासारख्या रूक्ष स्त्रीच्या नजरेलाही, ते अमान्य करणे अवघड होते परंतु ती तितकीशी प्रभावशाली नव्हती किंवा दुसऱ्यावर आपली अमीट छाप पाडायला थोडी कमी पडत होती.

उदा. सेंट जॉनच्या बहिणींपेक्षा तिची मानसिकता खूप वेगळी होती. तरीही मला ती छोट्या ॲडेल सारखी प्रिय वाटली: परंतु आकर्षक प्रौढ व्यक्तीपेक्षा आपण पाहिलेल्या, शिकवलेल्या छोट्या मुलांशी जास्त जवळीक निर्माण होते.

मला ती खट्याळ, सरळमार्गी पण स्वच्छंदी तरुणी वाटली. तिच्या मते, मी काही काही बाबतीत मि.सेंट जॉन रिव्हर्स सारखी होते: अर्थात दिसण्याच्याबाबत मी त्यांच्या इतकी आकर्षक खचितच नाही, हे तिलाही मान्य होते पण त्यांच्यासारखी चांगल्या स्वभावाची प्रेरणादायी व्यक्ती आहे याविषयी ती ठाम होती. मि. सेंट जॉन खरोखरच देवदूत आहेत या बद्दल कोणाचेच दुमत नसावे तथापि मी त्यांच्यासारखी चांगली, शिकलेली, शांत आणि खंबीर असून त्यांच्याप्रमाणे माझा पण स्वभाव

मुलखावेगळा आहे आणि त्यामुळेच खेडेगावात शिक्षक बनण्याचे काम मी हाती घेतलेले आहे, असे तिला वाटत होते. माझ्या गतजीवनांतील गोष्टी अवगत झाल्यास एक उत्कृष्ट कादंबरी तयार होईल असे ती गमतीने म्हणतात असे.

एका संध्याकाळी, ती लहान मुलासारखी बडबड करत माझ्या टेबलावरील वस्तूंची उलटापालट करत होती तेव्हा तिला दोन फ्रेंच पुस्तके दिसली. याशिवाय शिलरचा एक खंड आणि एक जर्मन व्याकरणाचे पुस्तक आणि एक डिक्शनरी पण सापडली. मी काढलेली काही स्केचेस,ज्यात अँडेलचे लहान पोर्ट्रेट, मॉर्टन व्हॅली आणि आजूबाजूच्या परिसरात घेतलेली निसर्गाची काही चित्रे पाहून तिला प्रथम आश्चर्य वाटले, नंतर आनंद झाला.

“तू ही ड्राईंग्ज् बनवली आहेत का? तुला फ्रेंच आणि जर्मन येतं? कित्ती छान, मला खूप आवडले. मला शिकवणाऱ्या शिक्षकांपेक्षा सुंदर चित्रे तू काढली आहेस. तू माझे एक पोर्ट्रेट बनवशील काय? माझ्या पापांना ते पाहून खूप आनंद होईल,” तिने मला विचारले.

“हो, नक्कीच! “ मी उत्तर दिले.

अशा सुंदर मॉडेलचे चित्र काढणे खरोखरच आनंदाची बाब होती. तेव्हा तिने गडद निळया रंगाचा ड्रेस घातला होता; हात आणि मान उघडी होती, खांद्यावरून रुळणारे सुंदर तपकिरी केस, एखाद्या दागिन्यासारखे शोभून दिसत होते. मी एक चांगला कार्डबोर्ड घेतला आणि मी तिच्या मोहक चेहऱ्याचा आकृतिबंध काळजीपूर्वक काढला. मी स्वतःला ते रेखाचित्र रंगवायचे होते. पण, आधीच उशीर झाल्यामुळे, मी तिला दुसऱ्या दिवशी पोझ देण्यास बोलावले.

तिने माझे, तिच्या वडिलांकडे इतके कौतुक केले की ते दुसऱ्या दिवशी संध्याकाळी तिच्यासोबत आले. ते एक उंच, धिप्पाड, मध्यमवयीन व्यक्ती होते, त्यांच्या शेजारी उभी नाजुक रोझमेंड अजून लहान दिसत होती. ते अबोल वाटले,

कदाचित गर्विष्ठ पण असावेत पण माझ्याबरोबर त्यांचे वागणे खूप चांगले होते. रोझमेंडच्या पोर्ट्रेटचे स्केच त्यांना खूप आवडले. त्यांनी मला शक्य तितके परिपूर्ण पेंटिंग बनवण्यास सांगितले शिवाय दुसऱ्या दिवशी येऊन संध्याकाळ वेले हॉलमध्ये येण्याचे आमंत्रण दिले.

दुसऱ्या दिवशी मी तिथे गेले. वेले हॉल त्यांच्या संपन्नतेचे प्रतिक होता. रोझमेंडने आनंदाने आणि उत्साहाने माझे स्वागत गेले. मि. ऑलिव्हर पण चहापाणी झाल्यावर प्रेमाने माझ्याबरोबर गप्पा मारू लागले. मॉर्टनच्या शाळेत मी जे केले होते त्याबद्दल त्यांना माझे अतिशय कौतुक वाटत होते. ते म्हणाले त्यांनी माझ्याबद्दल आणि शाळेबद्दल जे काही पाहिले, ऐकले आहे, त्यावरून त्यांच्या मते माझ्या पात्रतेच्या मानाने हे काम कमी प्रतीचे आहे आणि मला योग्य काम मिळाल्यास मी नक्कीच दुसरे काम स्विकारेन अशी त्यांना भीती वाटत होती.

“अरे! होय, नक्कीच, पापा, रोझमेंड म्हणाली, ती एका उच्च कुटुंबात गव्हर्नेस होण्याइतकी हुशार आहे.”

मी विचार केला, “मला मोठ्या कुटुंबात राहण्यापेक्षा इथे काम करायला जास्त आवडेल.”

मि. ऑलिव्हर, मि. रिव्हर्स आणि त्यांच्या सर्व कुटुंबाबद्दल अत्यंत आदराने बोलत होते; रिव्हर्स हे जुने खानदानी प्रतिष्ठीत घराणे असून, एकेकाळी सर्व मॉर्टन त्यांच्या मालकीचे होते, असे त्यांनी सांगितले. आता देखील सेंट जॉन, मनात असेल तर पुर्वी सारख्याच इतमामात राहू शकतो, ते सोडून, इतक्या देखण्या आणि प्रतिभासंपन्न तरुणाने मिशनरी म्हणून जाण्याची योजना आखल्याचे ऐकून त्यांना वाईट वाटले. अशा प्रकारे, तो एक अतिशय मौल्यवान जीवन गमावत होता, असे त्यांचे स्पष्ट मत होते. मला वाटले मि. ऑलिव्हरना सेंट-जॉन आणि रोझमेंड यांच्या विवाहामध्ये कोणताही अडथळा वाटत नव्हता, उलट त्यांचे चांगले आचार, विचार,

a

शिक्षण, त्यांचे मातब्बर घराणे, पंचक्रोशीत मिळणारा सन्मान आणि त्यांचा पाद्री म्हणून स्विकारलेला पवित्र व्यवसाय या साऱ्या गोष्टी विचारात घेतल्यास, आर्थिक परिस्थिती कमी असली तरी त्यामुळे फारसा फरक पडण्याचे कारण नाही त्यांच्या बोलण्यातून जाणवले .

नोव्हेंबर महिन्यातील सुट्टीचा दिवस होता; माझे घर स्वच्छ करण्यात मला मदत करणारी मुलगी तिचे काम आटोपून निघून गेली होती, तिला दिलेल्या एका पेनी मध्ये ती खुश होती, अगदी मनापासून तिने घर, फर्निचर चकचकीत केले होते. मी पण स्वतःचे व्यवस्थित आवरले आणि सुट्टीचा आराम करण्याच्या तयारीत होते.

तासभर मी जर्मन भाषेतील काही पानांचे भाषांतर केले आणि मग मी माझे रंगाचे पॅलेट आणि पेन्सिल घेऊन रोझमेंड ऑलिव्हरचे चित्र पूर्ण करण्याचे ठरवले. चेहऱ्याचे काम जवळजवळ संपले होते फक्त पार्श्वभूमी रंगवणे आणि ऊन सावलीचा परिणाम साधत, शेवटचा हात फिरवण्यात मी मग्न होते. तेव्हा कोणीतरी दार ठोठावले. मी जाऊन उघडले तर सेंट जॉन आत आले.

ते म्हणाले, “तू तुझा दिवस कसा घालवतेस हे पाहण्यासाठी मी आलो आहे; तू तर चित्र काढण्यात मग्न आहेस. खरच त्यामुळे एकटेपणा जाणवत नाही. आतापर्यंत तू बरेच आश्र्चर्याचे धक्के दिले आहेस. तुझा मनोरंजनासाठी मी एक कवितेचे पुस्तक आणले आहे,” असे म्हणून त्यांनी टेबलावर एक पुस्तक ठेवले.

आणि त्यांनी टेबलावर एक नवीन प्रकाशित झालेले कवितेचे पुस्तक ठेवले. जे प्रतिभाशाली निर्मितींपैकी एक होते, ज्याला लोकांची खूप पसंती मिळाली होती. आधुनिक साहित्याचा तो सुवर्णकाळ होता. ती वॉल्टर स्कॉट यांची

'मार्मियन' ही कविता होती. मी मार्मियनची पाने उत्सुकतेने पाहत असताना, सेंट जॉन मी काढत असलेल्या चित्रांचे निरिक्षण करत होते. मी त्यांच्याकडे पाहिले, तेव्हा त्यांनी माझी नजर टाळली. मला त्यांचे विचार माहित होते आणि मी त्यांचे

मन स्पष्टपणे वाचू शकले. मी त्यांच्यापेक्षा शांत आणि थंड होते. शक्य असल्यास एकदा प्रयत्न करून त्यांच्या मनातील रोझमेंड बाबतचा संदेह मिटतो का पहायचे मी ठरवले.

सेंट जॉननी अत्यंत गंभीरपणे मनोनिग्रह करून, आपल्या भावना, आपल्या चिंता, आपले दुःख, अगदी आपले प्रेम सुध्दा मनाच्या कप्प्यात बंद करून टाकले होते. तिथपर्यंत पोहोचणे, त्यांच्या बहिणींना देखील साध्य झाले नव्हते. त्यांच्या मनात रोझमेंड विषयी विशेष नाजुक भावना आहेत याची मला खात्री होती म्हणून एकदा त्यांच्या मनाचे बंद दार किलकीले करून पाहण्याचा माझा विचार होता.

“मि. रिव्हर्स खुर्ची घेऊन बसून घ्या,” मी त्यांना म्हणाले. पण नेहमीप्रमाणे त्यांनी थांबण्यासाठी वेळ नसल्याची सबब पुढे केली. “ठिक आहे”, मी म्हणाले. पण मी मनातल्या मनात विचार करत होते, “तुम्हाला हवे असेल तर उभे रहा, आज मात्र मी काय तो सोक्षमोक्ष लावणार आहे. एकटेपणा हा सर्वांसाठी सारखाच घातक असतो. मला तुमचा आत्मविश्वास जागा करायचा आहे. सहानुभूतीच्या किल्लीने तुमच्या मनाचे बंद कवाडं उघडते का पहायचे आहे.”

“हे पोर्ट्रेट कुणाचे आहे, ओळखले काय?” अचानक मी प्रश्न विचारला.

“कुणाचे आहे? मी नीट बघितलं नाही.”

“माफ करा, मिस्टर रिव्हर्स, तुम्ही ते पाहिले आहे.”

माझ्या विचित्र प्रश्नाने आणि स्पष्टवक्तेपणाने ते माझ्याकडे आश्चर्याने पाहतच राहिले.

“अरे! हे तर अजून काहीच नाही, तुमच्या अशा पवित्र्याने मी गडबडून जाणार नाही,” मी मनातल्या मनात बेत पक्का केला.

“तुम्ही ते बारकाईने आणि लक्षपूर्वक पाहिले आहे; पण तुम्ही ते पुन्हा बघायला मला हरकत नाही.” मी शांतपणे उत्तरले, आणि उभी राहत, पोर्ट्रेट त्यांच्या हातात ठेवले.

ते म्हणाले, “हे एक उत्तम प्रकारे रेखाटन केलेले पेंटिंग आहे; रंग सौम्य आणि सुस्पष्ट आहेत, पोर्ट्रेट अगदी योग्य आणि सुंदर आहे.”

“होय, होय, मला माहित आहे; पण तुम्हाला हे पोर्ट्रेट कोणाचे दिसते?”

त्यांनी संकोचावर मात करत उत्तर दिले: “मिस ऑलिव्हरचे असावे, असे मला वाटते.”

“नक्कीच. आणि आता, सर, इतका चांगला अंदाज लावल्याबद्दल तुम्हाला बक्षीस देण्यासाठी, मी तुम्हाला हवी असल्यास, तुमच्यासाठी तेव्हढीच काळजीपूर्वक दुसरी प्रत बनवीन. मात्र जर तुमच्या दृष्टीने हे निरर्थक असेल तर मात्र त्या कामात मला माझा वेळ घालवायचा नाही.”

बराच वेळ ते पोट्रेट हातात घट्ट पकडून ते टक लावून पाहत राहिले; खरोखरच त्यांना मनापासून आवडल्याचे दिसत होते.

“अगदी तिच्यासारखेच आहे,” ते पुटपुटले; डोळे चांगले आहेत; रंग, प्रकाश, अभिव्यक्ती, सर्वकाही परिपूर्ण आहे; हे पोर्ट्रेट हसत आहे.”

“असे दुसरे पोर्ट्रेट तुमच्यासाठी बनवले तर तुम्हाला आवडेल की तुम्हाला त्याचा त्रास होईल? तेव्हा तुम्ही मादागास्कर, केपटाऊन किंवा इंडीया मध्ये असाल तेव्हा तिची आठवण तुमचे सांत्वन करेल की ते पाहिल्याने दु:खी आणि त्रासदायक आठवणी येतील?”

त्यांनी झटकन माझ्याकडे गोंधळलेल्या नजरेने पाहिले आणि नंतर पुन्हा एकदा पोर्ट्रेटकडे पाहिले.

a

"मला ते स्वतःपाशी जतन करून ठेवायला निश्चितच आवडेल," ते म्हणाले; "पण तसे करणे शहाणपणाचे होईल का? हा दुसरा प्रश्न आहे."

मला खात्री होती की सेंट जॉन हे रोझमेंडसाठी विशेष महत्वाचे असून

मि. ऑलिव्हर यांची त्याला संमती आहे शिवाय माझ्या मनात त्या दोघांचे प्रेम सफल व्हावे अशीच इच्छा होती. पुर्वेकडील मिशनरी बनून खडतर जीवनात, आपले प्रेम, आपली बुद्धिमत्ता, आपली शक्ती गमावून बसण्यापेक्षा, मि. ऑलिव्हर यांचा जावई होणे हे कधीही त्या दोघांसाठी आणि दोन्ही कुटुंबांकरिता उत्तम होते. त्यांच्या मनाचा अंदाज घेऊन त्यांना या गोष्टींसाठी राजी करण्यासाठी मी त्यांना उत्तर दिले, "माझ्या मते,

पोर्ट्रेटऐवजी जिचे पोर्ट्रेट बनवले आहे, तिलाच कायमची आपली बनवणे योग्य ठरेल."

यावेळी ते बसले: त्यांनी ते चित्र त्याच्या समोर टेबलावर ठेवले होते आणि कपाळाला दोन्ही हातांचा आधार देत त्या चित्राकडे प्रेमाने पाहत होते. माझ्या लक्षात आले की ते माझ्या बोलण्यावर रागावलेले नाहीत किंवा त्यांना त्यांचे आश्चर्य पण वाटलेले नाही. ज्या विषयावर ते बोलण्यास नाखुश होते, त्याच बाबतीत मी स्पष्टपणे आणि मोकळेपणाने बोलणे सुरू केल्याने त्यांना अनपेक्षितपणे स्वतःला व्यक्त होण्याची संधी मिळाली. भिडस्त आणि संकोची वृत्तीच्या व्यक्तींच्या भावना किंवा दु:ख, उघडपणे ऐकण्याची जास्त गरज असते.

कारण स्वतःच्या भावना व्यक्त करण्यास ते उदासीन असतात त्यांची ही जीवघेणी शांतता मोडण्यासाठी धाडसीपणे त्यांना बोलते करणे आवश्यक असते आणि तेच मी केले.

"रोझमेंड तुमच्यावर प्रेम करते, याची मला खात्री आहे," मी त्यांच्या खुर्चीमागे उभी राहून म्हणाले; आणि तिचे वडीलही तुमचा आदर करतात. मग ती

एक मोहक तरूणी आहे; थोडीशी अविचारी, हे खरे आहे, परंतु तुम्ही पुरेसे विचारी आहात. तुम्ही तिच्याशी लग्न करा.''

''ती माझ्यावर प्रेम करते का?'' त्याने विचारले.

''नक्कीच, ती नेहमी तुमच्याबद्दल बोलत असते; इतर कोणताही विषय तिला तितकासा आनंद देत नाही, परत परत तुमच्या विषयी बोलत असते.''

''हे ऐकायला खूप चांगले वाटले, खूपच चांगले,'' ते म्हणाले; आणखी पंधरा मिनिटे बोलू शकतेस.''

वेळ मोजण्यासाठी त्यांनी घड्याळ काढले आणि टेबलावर ठेवले.

मी विचारले, ''पण का म्हणून बोलणे सुरू ठेवायचे?'' मी विचारले, ''जर तुम्ही माझे बोलणे खोडून काढण्यासाठी मोठमोठे तर्क लढवायची तयारी करणार असाल किंवा तुमच्या भावनांना अजून जड साखळदंडाने जखडून टाकणार असाल तर मग काय उपयोग?

''असा कठोर विचार करू नको. मी तिच्यामध्ये स्वतःला हरवून बसलो होतो. माझ्या मनाच्या कारंजातून प्रेमाचे पाणी झुळुझुळु वाहत होते. प्रितीचा मळा त्या शिंपणाने चांगला फुलला होता पण आता एका जोरदार लाटेने सर्व मळा वाहून गेला, कोवळे अंकुर चिखलात रुतून बसले: वेले हॉलच्या ड्रॉईंग रूममध्ये, रोझमेंड ऑलिव्हरच्या पायाजवळ मी स्वत:ला एका सोफ्यावर पहुडलेला पाहत आहे. ती माझ्याकडे प्रेमभराने पाहत, गोड आवाजात बोलत आहे, हसत आहे. ती माझी आहे - मी तिचा आहे - हे वर्तमान जीवन आणि हे जग माझ्यासाठी पुरेसे आहे. शू! काहीही बोलू नको-माझे हृदय आनंदाने भरले आहे-माझ्या संवेदना गुंतल्या आहेत-त्यासाठी बाजूला काढलेली पंधरा मिनिटे शांततेत जाऊ द्या.''

घड्याळ चालूच राहिले; त्यांचा जलद श्वास, हळूहळू संथ झाला. मी शांतपणे पाहत होते. या शांततेत पंधरा मिनिटे संपली. मि. सेंट-जॉन यांनी टेबलावरचे

घड्याळ उचलले आणि पोर्ट्रेट खाली ठेवले. शेकोटी जवळ जात ते म्हणाले, “हा थोडासा वेळ मला आभासी दुनियेतील आनंदात घालवायचा होता. प्रलोभनाला भुलून मी स्वतःहून फुलांची माला म्हणून साप गळ्यात घालून घेतला. आभासी जगातील वाईन कडू आहे, तिथली वचने खोटी आहेत याची मला पूर्ण कल्पना आहे.”

मी त्यांच्याकडे आश्चर्याने पाहिले.

“हे विचित्र आहे,” ते पुढे म्हणाले, “मी रोझमेंड वर उत्कटतेने प्रेम करतो, तिचे सौंदर्य, तिची मोहिनी, तिचे आकर्षण मी नाकारत नाही, पण त्याच वेळी माझे अंतर्मन मला सांगत असते की ती माझ्याकरिता चांगली पत्नी असू शकणार नाही. आमची जोडी एकमेकांना पूरक आणि अनुकूल अशी जोडी नाही आहे हे मला आता सुध्दा जाणवते पण लग्नानंतर वर्षभरात मला हे स्पष्टपणे समजेल आणि मग आयुष्यभर पश्चात्तापाची वेळ येईल.”

यावर मी फक्त हे खरोखरच विचित्र आहे एव्हढेच म्हणू शकले.

ते पुढे म्हणाले, “तिच्या विषयीची तीव्र आसक्ती, मला तिच्यामधील दोषांना विसरू देत नाही. माझ्या कामाबाबत तिला सहानुभूती वाटणार नाही. माझी महत्वाकांक्षा तिला समजणार नाही. मी हाती घेतलेल्या कोणत्याही गोष्टीत ती सहकार्य करू शकणार नाही. रोझमेंड, एका मिशनरीची पत्नी बनून अहोरात्र स्थितप्रज्ञतेने कष्ट, सेवा करणे केवळ अशक्य आहे.”

“पण तुम्हाला मिशनरी असण्याची गरज नाही; आपण हा विचार सोडू शकता.”

“माझ्या पवित्र संकल्पावर पाणी सोडू? मी ज्या महान कार्याचा पाया पृथ्वीवर घालू इच्छित आहे, त्यावर माझ्या स्वर्गातील घराची उभारणी होणार आहे. संपूर्ण मानववंशाच्या उन्नतीसाठी स्वतःच्या वैयक्तिक आशा आकांक्षावर ज्यांनी

तिलांजली दिली अशा महान लोकांपैकी एक, मला व्हायचे आहे. मला अज्ञानाचा अंधार दूर करण्यासाठी ज्ञानाचा दिवा लावायचा आहे. युध्दाच्या जागी शांतता-- गुलामगिरीच्या जागी स्वातंत्र्य-- अंधश्रद्धेच्या जागी धर्म--नरकाच्या भीतीच्या जागी स्वर्गाची आशा? या सर्वांवर मी पाणी सोडायचे? मला माझ्या रक्ता मांसापेक्षा हा प्रकल्प प्रिय आहे. हेच मला पुढे करायचे आहे आणि त्यासाठीच मी जगणार आहे."

बऱ्याच वेळानंतर, मी पुढे म्हटले:

"आणि मिस ऑलिव्हरचे काय? तिची निराशा, तिचे दु:ख याबद्दल तुम्हाला काहीच वाटत नाही?"

"मिस ऑलिव्हरला अनेक लग्नाळू आणि खुशामत करणाऱ्यांनी वेढले आहे. एका महिन्यापेक्षा कमी कालावधीत तिच्या हृदयातून माझी प्रतिमा पुसली जाईल; ती मला विसरेल आणि कदाचित एखाद्याशी लग्न करेल जो तिला माझ्यापेक्षा जास्त आनंदी ठेवेल."

"तुम्ही शांतपणे बोलता आहात पण या संघर्षाचा तुम्हाला त्रास होत आहे. तुमची शक्ती उगाच वाया जात आहे."

"नाही; जर थोडाफार अस्वस्थ झालो असलो तर ते माझ्या प्रकल्पाची सुरुवात कधी होणार याच्या काळजी मुळे ज्या बाबतीत अद्यापही सर्व अनिश्चित आहे. आज सकाळी मला कळले की माझ्या जागेवर येणाऱ्या व्यक्तीच्या आगमनाची मी खूप दिवस वाट पाहत होतो ती व्यक्ती अजून तीन महिने, कदाचित सहा, माझी जागा घ्यायला येऊ शकणार नाही."

"पण मग मिस ऑलिव्हर शाळेत प्रवेश करते तेव्हा तुम्ही अस्वस्थ आणि लाल का बरे होता?"

त्यांच्या चेहऱ्यावर पुन्हा आश्चर्याचे भाव उमटले; एखादी स्त्री पुरुषाशी असे बोलण्याची हिंमत करेल असे त्यांना वाटले नव्हते. पण माझ्याकरिता अशा प्रकारची

a

चर्चा म्हणजे फारशी अवघड गोष्ट नव्हती. पारंपरिक मर्यादेच्या पलीकडे जाण्यापुर्वी, व्यक्तीचा विश्र्वास जिंकून, तिच्या हृदयाजवळ आपले स्थान पक्के केले असेल तर मग शुद्ध, सूज्ञ आणि खंबीर मनाच्या व्यक्तीशी मग ती स्त्री असो वा पुरुष, त्यांच्याबरोबर मी मुक्त संवाद साधू शकत होते.

"तुझे व्यक्तीमत्व अस्सल आहे," सेंट जॉन मला म्हणाले, "आणि तू अजिबात लाजाळू नाही आहेस. तुझा आत्मा जितका शूर आहे तितकी तुझी नजर भेदक आहे; पण मी तुला खात्रीने सांगतो की तू माझ्या भावनांचा चुकीचा अर्थ लावत आहेस; तुला त्या आहेत त्यापेक्षा अधिक खोल आणि तीव्र आहेत असे वाटत आहे, माझ्या विषयी मी न मागता, तू जास्त सहानुभूती देत आहेस. हे खरे आहे की मी मिस ऑलिव्हर समोर आली की अस्वस्थ होतो पण त्याबद्दल मला स्वतःबद्दल सहानुभूती वाटत नाही तर स्वतःच्या दुर्बलतेचा तिरस्कार वाटतो. ही गोष्ट जास्त लक्ष देण्याजोगी नाही हे मला माहीत आहे. निव्वळ शारीरिक प्रतिक्रिया: हा आत्म्याचा नक्कीच क्षोभ नाही. माझा आत्मा, वादळी समुद्राच्या तळाशी असलेल्या खडकासारखा कठीण आणि खंबीर आहे. माझी ओळख एक थंड आणि कठोर माणूस अशीच असू दे."

मी अविश्वासाने हसले.

"तू माझा विश्वास जिंकून घेतलास," तो पुढे म्हणाला;आता तो पूर्णपणे तुझ्या ताब्यात आहे; मी माझ्या मुळ स्थितीत आहे. या ख्रिश्चन धर्मगुरूंच्या पांढऱ्या झग्याआडचा मी, एक कठोर, थंड आणि महत्त्वाकांक्षी माणूस आहे. सर्व भावनांपैकी, केवळ नैसर्गिक स्नेहाची फक्त एकच भावना माझ्यामध्ये कायम राहणार आहे. माझा मार्गदर्शक, भावना नसून विवेक आहे. माझी महत्वाकांक्षा अमर्यादित आहे, उंच जाण्याची, इतरांपेक्षा जास्त परिश्रम करण्याची माझी इच्छा अतृप्त आहे. मी संयम, चिकाटी, उद्योग आणि प्रतिभेचा सन्मान करतो कारण याच गोष्टी

माणसाला महान गोष्टी साध्य करण्यासाठी आणि उच्च प्रतिष्ठा प्राप्त करण्यासाठी उपयोगी पडतात. मी तुझे शाळेतील मुख्याध्यापिकेचे काम अगदी लक्षपूर्वक पाहत आहे. मला तुझ्यामध्ये एक कामसू, हुषार आणि उत्साही स्त्री दिसते म्हणून मला मनापासून कळवळा आहे, तो तू ज्या कठीण प्रसंगातातून तू गेली आहेस किंवा तू अजूनही जे सहन करत आहेस यासाठी कदापि नाही.''

''तुम्ही स्वतःला मुर्ती पूजक पेगन तत्वज्ञानाचे पुरस्कर्ते समजता काय?''

''नाही; माझ्यात आणि देववाद्यांमध्ये फरक आहे; मी गॉस्पेलवर विश्वास ठेवतो. मी मूर्तिपूजक तत्त्वज्ञ नाही, तर येशूच्या पंथाचा ख्रिश्चन तत्त्वज्ञ आहे; त्याचा शिष्य या नात्याने, मी त्याचे उदार, शुद्ध आणि दयाळू सिद्धांत स्वीकारतो. त्यांचा प्रचार करण्याचा माझा निर्धार आहे. तरुणपणी मी धर्माकडे ओढला गेलो. माझ्या मध्ये असलेल्या नैसर्गिक स्नेहभावनेचे बीज, धर्माच्या सानिध्यात परोपकाराच्या शक्तिशाली वृक्षामध्ये विकसित झाले. मला परमेश्वराचा न्याय समजला. परमेश्वराच्या राज्याचा सर्वत्र प्रसार, प्रचार करण्याची महत्त्वाकांक्षा माझ्या मनात स्फुरण पावली. एव्हढे सर्व मला धर्माने दिले. माझ्या मध्ये जे बीज होते, त्याची काळजीपूर्वक जोपासना केली, माझ्या स्वभावाला आकार दिला पण माझा स्वभाव पुर्णपणे काढून टाकणे शक्य नाही नाही आणि जोपर्यंत हे नश्वर शरीर नष्ट होत नाही तोपर्यंत काहीही नष्ट होणार नाही...''

हे शब्द बोलून त्यांनी त्यांची टोपी घेतली, जी माझ्या पॅलेटच्या शेजारी टेबलावर ठेवली होती; त्यांनी पुन्हा एकदा पोर्ट्रेटकडे पाहिले.

''ती सुंदर आहे,'' ते पुटपुटले; ती खरोखर नावाप्रमाणेच गुलाब आहे.

''मी तुमच्यासाठी तिचे पोर्ट्रेट काढावे असे तुम्हाला वाटत नाही?''

''नको, त्यांचा फायदा काय?''

a

अचानक त्यांची नजर, मी पोर्ट्रेट ज्या पातळ कागदाने झाकले होते, त्या कागदावर पडली. सहसा चित्रावर डाग पडू नयेत म्हणून मी मी पेंटिंग करताना माझा हात या कागदावर ठेवत असे. त्यांना त्या कागदावर काय दिसले ते मला समजले नाही. पण काहीतरी नक्कीच त्यांनी पाहिले असावे, त्यांनी पटकन तो कागद हातात घेतला आणि त्यांच्या कडांचे निरिक्षण केले आणि पटकन त्यांची नजर माझ्याकडे वळली, मला काहीच बोध झाला नाही. विजेच्या चपळाईने त्यांनी माझे डोक्यापासून पायापर्यंत निरीक्षण केले. माझा पोशाख पण निरखून पाहिला आणि काही तरी बोलण्यासाठी ओठांची हालचाल झाली पण दुसऱ्या क्षणी त्यांचा विचार बदलल्याचे माझ्या लक्षात आले.

“काय झाले?” मी विचारले.

“काही नाही,” त्यांनी उत्तर दिले; आणि कागद पुन्हा त्याच्या जागी ठेवला, मी त्यांना कडेचा एक छोटा तुकडा पटकन फाडताना पाहिले आणि तो तुकडा त्यांनी हातमोज्यात सरकवून दिला; मग त्यांनी पटकन माझ्या कडे पाहत मान हलवली आणि 'गुड आफ्टरनून' म्हणून निरोप घेतला आणि पटकन निघून गेले.

“बरं!” मी विचार केला की त्यांच्या डोक्यात नेमके काय शिजत आहे हे शोधायला हवे. मी त्या पेपरची छाननी केली; रंगाच्या धूसर डागांशिवाय त्यावर काहीही दिसले नाही. ज्या भागातील कागदाचा तुकडा फाडून घेतला होता, तिथे मी पेन्सिलची शेड तपासून पाहण्यासाठी काही तरी खरडलेले असावे. एक-दोन मिनिटे मी ते गूढ काय असावे याचा, विचार केला; पण ते सोडवता येण्याजोगे काही न मिळाल्याने फार काही महत्त्वाचे नसावे म्हणून त्यांचा नाद सोडून दिला आणि लवकरच ते विसरले.

# प्रकरण 33

मिस्टर सेंट-जॉन जेव्हा माझ्या घरातून बाहेर पडले, तेव्हा बर्फ पडायला सुरुवात झाली होती, रात्रभर वादळ चालू होते. दुसऱ्या दिवशी बर्फवृष्टी सुरू झाली, थंडगार वारा जोरजोरात घोंघावत होता. संध्याकाळ पर्यंत दरीतली वाट बर्फाने जवळजवळ बंद होत आली. मी दरवाजा बंद केला दाराच्या फटीतून बर्फ आत येऊ नये म्हणून दारासमोर एक चटई ठेवली. शेकोटी पेटवली आणि मेणबत्तीच्या प्रकाशात मार्मियन वाचायला सुरुवात केली: वाचनाच्या नादात मी बाहेरचे वादळ विसरून गेले. तेव्हढ्यात दाराचा आवाज आला. मला वाटले, वाऱ्याने दार वाजत असावे. पण सेंट जॉन दार ठोठावत होते. मी दरवाजा उघडला. तशा भयंकर बर्फवृष्टीत, थंडी वाऱ्यात ते अंधारातून आले होते. त्यांचे कपडे बर्फ पडल्याने पांढरे झाले होते. मला धास्ती वाटली, कारण मला इतक्या संध्याकाळी, बर्फाळ दरीतून पाहुणे येण्याची अपेक्षा नव्हती.

"काही वाईट बातमी आहे का?" मी विचारलं. "काही झालं का?"

"नाही. तसे काही घाबरून जाण्याचे कारण नाही." त्यांनी उत्तर दिले. त्यांनी आपला कोट दरवाजावर टांगला आणि दरवाजा जवळची मॅट पुढे ढकलून बुटावरचा बर्फ झटकला. "आज तुझी खोली माझ्यामुळे ओली होणार आहे, मला माफ कर," ते म्हणाले आणि मग शेकोटीच्याजवळ गेले. "आज इथे येताना खूप त्रास झाला, कंबरेएव्हढ्या पाण्यातून वाट काढावी लागली." ते शेगडीच्या जवळ हात गरम करत म्हणाले.

पण तुम्ही अशा वेळी बाहेर का पडलात?" मी न राहवून विचारले.

“घरी आलेल्या पाहुण्यांना असा प्रश्न विचारणे हा अशिष्टपणा आहे, पण आता विचारलाच आहे तर सांगतो की मी फक्त तुझ्याशी गप्पा मारण्यासाठी आलो आहे. मला पुस्तकांचा आणि एकटेपणाचा कंटाळा आला होता शिवाय काल एक गोष्ट अर्ध्यावर सोडली होती, तिचा शेवट

जाणून घ्यायचा होता,” असे बोलून खाली बसले. मला त्यांचे आदले दिवशीचे विक्षिप्त वागणे आठवले. मला त्यांच्या शहाणपणा बद्दल शंका वाटू लागली. जर ते खरोखरच वेडे असतील तर एक शांत, सभ्य आणि देखणे वेडे होते. संगमरवरी पुतळ्याप्रमाणे देखणा चेहरा माझ्या पाहण्यात यापूर्वी आला नव्हता. आता सुध्दा पावसात, बर्फात भिजलेले केस कपाळावर आलेले होते, शेकोटीच्या उजेडात चेहरा उजळून निघाला होता. पण त्यावरची दु:खी भावना लपली जात नव्हती. ते पाहून मला खूप वाईट वाटले. ते काही तरी बोलतील यांची मी वाट पाहत होते, त्यांच्या चेहऱ्यावर उद्विग्नता दिसत होती. त्यांना पाहून माझ्या मनात दया भाव जागा झाला आणि मी बोलायला सुरुवात केली, “मला वाटते की डायना अथवा मेरी तुमच्याबरोबर राहू शकतील तर बरे होईल; असे एकटे राहणे तुमच्यासाठी चांगले नाही आणि तुम्ही तुमच्या तब्येतीच्या बाबतीत खूप उदासीन आहात.”

“अजिबात नाही, ते म्हणाले, जेव्हा आवश्यक असेल तेव्हा मी स्वतःची काळजी घेतो; मी खूप चांगले काम करत आहे. तरीही तुला माझी काळजी का वाटत आहे?”

त्यांच्या बोलण्यातून माझी काळजी त्यांना अनाठायी वाटली, म्हणून मी गप्प बसले.

अजूनही ते ओठावर हळू हळू बोट फिरवत आगीकडे पाहत होते, काहीतरी बोलायला हवे म्हणून मी त्यांना विचारले, “मागच्या दाराने येणाऱ्या गार वाऱ्याचा तुम्हाला त्रास होत आहे काय?”

"नाही, नाही," त्यांनी उत्तर दिले.

"ठिक आहे, तुम्हाला बोलायचे नसेल तर माझे काही म्हणणे नाही, तुम्ही शेकोटीच्याजवळ बसा, मी पुस्तक वाचत बसते." आणि मी मार्मियन वाचायला गेले. थोड्या वेळात ते उठून उभे राहिले. त्यांनी पाकिटातून एक पत्र काढले आणि शांतपणे वाचून, पुन्हा ते दुमडून पाकिटात ठेवले. आणि कसल्यातरी विचारात गढून गेले. ते पाहून माझे वाचनात लक्ष लागेना म्हणून मी परत बोलायला सुरुवात केली, "तुम्हाला अलीकडे मेरी आणि डायनाची खुशाली समजली की नाही?"

"नाही, आठ दिवसांपूर्वी मी तुला त्यांचे पत्र दाखवलेले होते."

"तर मग तुमचा इंग्लंड सोडून जाण्याचे एव्हढ्यात नक्की झाले काय?"

"अजून नाही; पण तसे झाले तर ते माझ्यासाठी खूप आनंदाचे असेल."

नंतर मी माझ्या शाळेविषयी, माझ्या विद्यार्थ्यींनींविषयी बोलू लागले.

"मेरी गॅरेटची आई चांगली आहे," मी म्हणाले. मेरी आज सकाळी शाळेत परतली, आणि पुढच्या आठवड्यात माझ्याकडे फाउंड्री-क्लोजच्या चार नवीन विद्यार्थीनी असतील; बर्फ नसता तर त्या आजच आल्या असत्या."

"खरच?"

"मिस्टर ऑलिव्हर त्यांच्यापैकी दोघींचे पैसे देणार आहेत."

"होय काय?"

"होय आणि ख्रिसमसच्या वेळी संपूर्ण शाळेतील सर्वांना चांगल्या भेटवस्तू देणार आहेत."

"मला माहिती आहे."

"तुम्हीच त्याला असा सल्ला दिला होता का?"

"नाही."

"मग कुणी?"

“मला वाटते, त्यांची मुलगी असावी.”

“खरच, ती खूप चांगली आहे!”

“होय.”

परत एकदा शांतता पसरली. घड्याळात आठ वाजले होते; या आवाजाने त्यांना वेळेचे भान आले आणि ते उठून उभे राहिले आणि त्यांनी मला पुस्तक वाचायचे थांबवून शेकोटीच्या जवळ बोलावले. मला या गोष्टीचे खूप आश्र्चर्य वाटले.

“अर्ध्या तासापूर्वी,” ते म्हणाले, “मी काल एक गोष्ट अर्ध्यावर सोडली होती, तिचा शेवट जाणून घ्यायचा होता याविषयी बोललो होतो, तेव्हा मी विचार केला आहे की मी शेवट सांगेन तू श्रोत्याची भुमिका निभाव. अगोदरच सांगतो गोष्ट जुनी आहे, पण जुने तपशील नव्याने ऐकले की परत नवे होऊन जातात.

“गोष्ट अशी आहे: वीस वर्षांपूर्वी एका चर्चचा पाद्री एका श्रीमंत तरुणीच्या प्रेमात पडला; अर्थात तिचे पण त्यांच्यावर प्रेम होते. तिच्या घरच्यांच्या विरोधाला न जुमानता त्यांनी लग्न केले त्यामुळे घरच्या मंडळींनी त्यांना बेदखल केले. दोनच वर्षांत त्या पतीपत्नीचा मृत्यू झाला. दोघे त्या मोठ्या गावातील चर्चच्या स्मशानभूमीत एकाच जागी चिरविश्रांती घेत आहेत. मी त्यांचे थडगे पाहून आलो आहे. त्यांच्या मागे त्यांची तान्हुली मुलगी अनाथ झाली. बाळपणी बिचारीला दुर्दैवाला सामोरे जावे लागले. तिला तिच्या आईच्या श्रीमंत नातेवाईकांनी ताब्यात घेतले. मला त्यांची ओळख नुकतीच लागली आहे. गेटशेडच्या मिसेस रीड नावाच्या एका मामीने तिचे पालनपोषण केले. मिसेस रीड यांनी दहा वर्षे अनाथ मुलीची काळजी घेतली; ती आनंदी होती की नाही, या विषयी मला काही माहिती मिळाली नाही पण नंतर त्या मुलीला तुला माहीत असलेल्या ठिकाणी, लोवुड येथे

a

अनाथाश्रमात पाठवण्यात आले, जिथे तू स्वतः राहत होतीस. तिनेसुध्दा शिक्षण पूर्ण झाल्यावर तिथे दोन वर्षे शिक्षिकेची नोकरी केली. तिच्या आणि तुझ्या आयुष्यात बराच गोष्टी समान आहेत. नंतर गव्हर्नेस होण्यासाठी तिने लोवुड सोडले. मि. रोचेस्टर यांच्या पाल्याला शिकवण्याचे काम तिने स्विकारले होते."

"मि. रिव्हर्स," मी त्यांचे बोलणे सुरू असताना त्यांना थांबवण्यासाठी प्रयत्न केला.

ते म्हणाले, "मी तुझ्या भावनांचा अंदाज लावू शकतो, पण त्यांना क्षणभर दाबून टाक; मी जवळजवळ गोष्ट पूर्ण करत आलो आहे, शेवटपर्यंत माझे ऐक. मला मिस्टर रॉचेस्टरबद्दल काहीही माहिती नाही, त्यांनी या तरुण मुलीला सन्माननीय लग्नाची ऑफर दिली आणि विवाह वेदीवर असे आढळून आले की त्यांची वेडी पत्नी जिवंत आहे; यापेक्षा जास्त मला माहित नाही.

"दरम्यान एक घटना घडली ज्याने गव्हर्नेसचा शोध घेण्याची आवश्यकता भासली तेव्हा समजले की ती तेथून निघून गेली आहे; केव्हा, कधी, कसे कोणीच सांगू शकले नाही. रात्रीच्या वेळी ती थॉर्नफिल्ड हॉल सोडून निघून गेली होती. सर्वत्र तिचा शोध घेण्याचा प्रयत्न केले पण सर्व फोल ठरले. परंतु तिचा शोध घेणे अत्यंत आवश्यक असल्याने, सर्व वर्तमानपत्रात याविषयी जाहिरात दिली, मला स्वत: वकील, मिस्टर ब्रिग्ज, यांचे एक पत्र आले, ज्यामध्ये मी तुला नुकतेच सांगितलेले तपशील मला कळविण्यात आले होते; एकंदर तुला ही गोष्ट विचित्र वाटत नाही का?"

"आता मी तुम्हाला जे विचारणार आहे त्याचे कृपया मला उत्तर द्या," मी म्हणाले; "तेव्हढे तुम्ही नक्कीच करू शकता. मि. रोचेस्टर बद्दल तुम्हाला काय माहिती मिळाली? ते कोठे आहेत? ते काय करत आहेत? ते बरे आहेत का?"

“मला मि. रोचेस्टरबद्दल काहीच माहिती नाही; पत्रात केवळ त्यांच्या बेकायदेशीर लग्न मोडल्याची माहिती देण्यापुरता त्यांचा उल्लेख केला आहे. त्याऐवजी तू मला गव्हर्नेसचे नाव आणि तिचा तातडीचा शोध कशासाठी चालला आहे याबद्दल विचार.”

“थॉर्नफिल्ड कॅसलमध्ये कोणी गेले नाही काय? मि. रोचेस्टरना कोणी पाहिले नाही?”

“मला तसे वाटत नाही.”

“त्यांना पत्र पाठवून विचारले होते काय?”

“नक्कीच.”

“त्यांचे काय उत्तर आले? ते पत्र कोणाकडे आहे?”

“मि. ब्रिग्ज मला सांगितले की त्यांच्या पत्राचे उत्तर, मिस्टर रोचेस्टरने दिले नव्हते, तर ॲलिस फेअरफॅक्स अशी सही करणाऱ्या एका महिलेने दिले होते.”

मी खूप घाबरले आणि निराश झाले. त्यामुळे माझी भीती खरी ठरल्याची खात्री वाटू लागली: “त्यांनी कदाचित इंग्लंड सोडून पुन्हा एकदा जुनी भटकंती सुरू केली असेल. त्यांनी तीव्र दु:ख कसे सहन केले असेल? त्यांना सावरण्यासाठी, त्यांना समजून घेण्यासाठी, त्यांच्या बरोबर कोण असेल? या प्रश्नांना सामोरे जाण्याची माझी हिंमत नव्हती. आमचे लग्न जवळजवळ झाल्यात जमा होते, ज्यांना मी अनेकदा माझा प्रिय एडवर्ड म्हणत असे!”

“तो माणूस नक्कीच वाईट असेल,” मिस्टर रिव्हर्सने आपले मत मांडले.

“तुम्ही त्यांना ओळखत नाही, कृपया त्यांच्या विषयी असे मत बनवू नका,” मी कळकळीची विनंती केली.

“खूप छान,” ते मला शांतपणे म्हणाले; “माझ्या डोक्यात त्यांच्यापेक्षा महत्त्वाच्या बऱ्याच गोष्टी आहेत, त्यापुर्वी मला माझी गोष्ट पूर्ण करायची आहे. तू

मला गव्हर्नेसचे नांव विचारले नाहीस तरीही मी स्वतः सांगत आहे. थांब, मला ते मिळाले आहे: महत्त्वाच्या गोष्टी कागदावर काळजीपूर्वक लिहून ठेवणे केव्हाही चांगले.”

त्यांनी पुन्हा त्यांचे पाकीट काढले, ते उघडून त्यांनी एक फाटलेला कागद काढला. मी मिस ऑलिव्हरचे पोर्ट्रेट झाकून ठेवलेल्या पेपरमधून काढलेला तुकडा, त्याच्या आकारावरून आणि वेगवेगळया रंगाच्या ब्रशच्या स्ट्रोक्स वरून मी ओळखले. सेंट जॉन उभे राहिले, आणि तो कागद, माझ्या डोळ्यांसमोर धरला, आणि मी ते वाचले, शाईमध्ये मी माझ्या स्वत: 'जेन आयर' हे नाव बहुधा अनावधानाने लिहिले होते..

“ब्रिग्जनी मला 'जेन आयर' हे नाव लिहून कळवले होते आणि तेच नाव वर्तमानपत्रातील जाहिरातींमध्ये होते, मी एक 'जेन इलियट' हिला ओळखत होतो; मी कबूल करतो की मला संशय होता, परंतु काल दुपारपर्यंत मला खात्री नव्हती. आता तरी तू तुझे जेन आयर हे नाव मान्य करून टोपणनावाचा त्याग करतेस काय?”

“होय होय; पण मिस्टर ब्रिग्ज कुठे आहेत? कदाचित त्यांना मिस्टर रोचेस्टरबद्दल तुमच्यापेक्षा जास्त माहिती असेल.”

“ब्रिग्ज लंडनमध्ये आहे; मला खात्री आहे की त्याला मिस्टर रोचेस्टरबद्दल काहीही माहिती नाही; मिस्टर रोचेस्टरामध्ये त्यांना काडीचाही इंटरेस्ट नाही. तू एक महत्त्वाचा मुद्दा विसरत आहेस: मि. बिग्ज तुझा का शोध घेत आहेत? त्यांचे तुझ्याकडे काय काम आहे? हे तू जाणून घेण्याचा प्रयत्नच करत नाही आहेस.”

“खरच, त्यांचे माझ्याकडे काय काम आहे?”

“त्यांना तुला सांगायचे आहे की तुझे काका, मिस्टर आयर, यांचे मडेरा येथे निधन झाले आहे आणि त्यांनी, त्यांची सर्व संपत्ती तुझ्या नावे केली आहे. आता तू

एक श्रीमंत व्यक्ती आहेस; त्यासाठी मि. बिग्ज तुझा शोध घेत आहेत, आणखी काही नाही.''

''मी? आणि श्रीमंत?''

''होय, तू एका श्रीमंत व्यापाऱ्याची वारस आहेस.''

क्षणभर शांतता पसरली.

''तुला तुझी ओळख पटवून द्यावी लागेल,'' सेंट-जॉन पुढे म्हणाले, ''पण त्यात कोणतीही अडचण येणार नाही आणि मग तुला संपत्तीचा ताबा ताबडतोब मिळू शकेल. तुझे नावाचे सर्व पैसे फंडात गुंतवले आहे. ब्रिग्जकडे इच्छापत्र आणि सर्व आवश्यक कागदपत्रे आहेत.''

माझ्या आयुष्यातील तो एक नवीन टप्पा होता. गरीबीतून बाहेर पडून अचानक श्रीमंत होणे हे सुंदर आहे. परंतु ही गोष्ट अशीही नाही की एखाद्याला तिचे लगेच आकलन होईल किंवा परिणामी एकाच वेळी सर्व आनंद मिळेल. त्यानंतर सुद्धा आयुष्यात अजून वेगळे आनंददायक, धक्कादायक प्रसंग येण्याची शक्यता असते. हा या खऱ्या जगातील व्यवहार आहे. त्यात काही आदर्श असे काही नसते. एखाद्याला संपत्ती मिळाले की तो लगेच उड्या मारत नाचत गात सुटत नाही.

जेव्हा अचानक आपण संपत्तीचे मालक होतो, तेव्हा आपण आपल्या जबाबदाऱ्यांचा विचार करून, व्यवसायाचा विचार करायला सुरुवात करतो. निरंतर समाधानाच्या पायावर काही गंभीर काळजी करण्यासारखे प्रसंग सुध्दा उद्भवतात. हा आनंद, समाधान, काळजी सर्व काही स्वतः मध्ये सामावून घेऊन पुढे चालायला हवे. आनंदाची बातमी गंभीर चेहऱ्याने मिळते.

याशिवाय, मृत्यू अंत्यसंस्कार, मृत्युपत्र, वारसा सर्व शब्द शक्यतो एकत्रच येतात.

a

माझे काका मरण पावले होते: ते माझे एकमेव नातेवाईक होते. ते अस्तित्त्वात आहेत हे मला माहीत असल्याने, मी त्यांना एक दिवस भेटण्याची आशा बाळगली होती. ती आता पूर्ण होणार नव्हती. हा पैसा फक्त माझ्या एकटीकडे आला आणि माझ्याकडे कुटुंब नाही, जर असते तर प्रत्येक जण आनंदी झाले असते: निदान मला स्वतंत्र राहता येईल, या विचाराने खूप आनंद झाला आणि हृदय फुलून आले.

"केंव्हापासून तू डोके खाली करून विचार करत बसली आहेस, तुला संपत्ती किती मिळणार हे जाणून घ्यायचे आहे की नाही?" सेंट जॉनने प्रश्न केला.

"होय, खरच किती संपत्ती मिळणार आहे?"

"तसे याबद्दल बोलणे देखील योग्य नाही; तरी वीस हजार पौंड म्हणतात, असे मला समजले."

"काय? वीस हजार पौंड!"

माझ्यासाठी हे भले मोठे आश्चर्य होते; मला चार-पाच हजार वाटले होते; या बातमीने क्षणभर मला काहीच समजेनासे झाले. मिस्टर सेंट-जॉन, ज्यांना मी यापूर्वी कधीही हसताना ऐकले नव्हते, ते पण हसायला लागले.

"तू तर घाबरलेली दिसते आहेस."

"ही एक मोठी रक्कम आहे; काही चूक आहे असे तुम्हाला वाटत नाही का?"

"अजिबात नाही."

"कदाचित तुम्ही संख्या चुकीची वाचली असेल आणि फक्त दोन हजार असतील?"

"हे अक्षरांमध्ये लिहिलेले आहे आणि संख्येत नाही: वीस हजार."

मिस्टर रिव्हर्स उठले आणि अंगरखा घातला.

ते म्हणाले, “जर रात्र इतकी थंड आणि वादळी नसती, मी हन्नाला तुझ्या सोबतीला पाठवले असते; तू इतकी दुःखी दिसत आहेस की तुला एकटीला सोडणे फारसे सुरक्षित नाही; पण गरीब हन्ना, माझ्याप्रमाणे बर्फ तुडवत येऊ शकणार नाही. तुझे तुला सावरायला सांगून मी आता निघतो. शुभ संध्या.”

ते दरवाजा कडे गेले आणि अचानक माझ्या मनात विचार आला.

“एक मिनिट थांबा!” मी मोठ्याने म्हणाले.

“का बरं?”

“मला हे जाणून घ्यायचे आहे की मिस्टर ब्रिग्ज यांनी माझ्याबद्दलचा तपशील जाणून घेण्यासाठी तुम्हाला का पत्र लिहिले? ते तुम्हाला कसे ओळखतात? आणि या दुर्गम प्रदेशात तुम्ही त्यांना मला शोधण्यात मदत करू शकाल असा विचार त्यांना कशामुळे झाला असेल?...”

“अरे! त्यांनी मला विचारले, कारण मी पाद्री आहे आणि अनेकदा अशा काही प्रसंगात आमचा सल्ला घेतला जातो.” ते दार उघडत म्हणाले.

“नाही, हे उत्तर माझे समाधान करत नाही!” मी स्पष्टपणे बोलले.

खरंच, त्यांचे उत्तर पटण्यासारखे नव्हते, त्यांची टाळाटाळ पाहून की माझी उत्सुकता अधिकच वाढली.

“यात काहीतरी विचित्र आहे आणि मला सर्व काही जाणून घ्यायचे आहे.”

“पुन्हा कधी तरी.”

“नाही, आज आत्ता, या संध्याकाळीच!”

मी पुढे जाऊन त्यांची वाट अडवली.

“मला सर्व काही सांगितल्याशिवाय मी तुम्हाला सोडणार नाही.”

“पण,” ते पुढे म्हणाले, “मी तुला सांगितले की मी एक कठोर माणूस आहे आणि मन वळवणे कठीण आहे.”

“आणि मी पण एक कठोर स्त्री आहे जिच्यापासून सुटका होणे अशक्य आहे.”

“मी थंड डोक्याचा माणूस आहे, माझ्यावर कशाचा परिणाम होत नाही.”

“मी अग्निमय आहे आणि आग बर्फ वितळते. शेकोटीच्या आगीने तुमच्या कपड्यांतील सर्व बर्फाचे पाणी होऊन माझ्या खोलीत सर्व चिखल केला आहे. मिस. रिव्हर्स, माझ्या स्वयंपाकघर ओले केल्याच्या गुन्ह्याबद्दल मी तुम्हाला क्षमा करावी असे तुम्हाला वाटत असेल तर मला काय विचारले आहे त्याचे उत्तर द्या.”

“बरं! ते म्हणाले, मी तुझे कुतुहल शमविण्यासाठी नाही, तर तुझ्या चिकाटीला दाद देतो, जसे अखंड पडणाऱ्या पाण्याच्या थेंबाने, दगड पण झिजून जातो तसे, मी यावेळी तुझे समाधान करणार आहे. हे तुला नेहमीसाठी लक्षात ठेवावे लागेल: तुझे नाव जेन आयर आहे का?”

“नक्कीच! मी आधीच सांगितले आहे.”

“कदाचित तुम्हाला माहित आहे काय की माझे नाव तुझ्या सारखेच आहे? माझा जॉन आयर रिव्हर्स या नावाने बाप्तिस्मा झाला.”

“नाही, खरं तर, मला माहित नव्हते; तुम्ही मला दिलेल्या पुस्तकांवर आद्याक्षरात E हे अक्षर लिहलेले मला आठवते; तुमचे पूर्ण नाव काय असावे याचा मला कधी विचार आला नाही; पण मग नक्कीच...”

मी थांबले; माझ्या मनातील सुट्या सुट्या संकल्पना हळुहळु एकत्रित होऊ लागल्या. आणि अंतःप्रेरणेने मला सर्व एक संपुर्ण चित्र डोळयासमोर उभे राहिले. तरीही मी मिस्टर रिव्हर्सने दिलेल्या स्पष्टीकरणाची पुनरावृत्ती करेन.

“माझ्या आईचे माहेरचे आडनाव आयर होते,” त्यांनी मला सांगितले; “तिला दोन भाऊ होते: एक, चर्चमध्ये पाद्री होता त्यांने गेटशेडच्या मिस रीडशी विवाह केला होता. दुसरा, जॉन आयर, मडेरा येथील व्यापारी होता. मिस्टर ब्रिग्ज,

मिस्टर आयरचे वकील, यांनी ऑगस्टमध्ये आम्हाला आमच्या मामांच्या मृत्यूची माहिती देण्यासाठी आणि त्यांच्या निवर्तलेल्या भावाच्या मुलीकडे जे पाद्री होते, तिच्या नावाने आपली सर्व संपत्ती केली असल्याचे सांगण्यासाठी आम्हाला पत्र लिहिले, कारण माझ्या वडिलांबरोबरच्या भांडणामुळे त्यांनी आम्हाला नाकारले असावे. त्यांच्या आणि माझ्या वडिलांमध्ये जे घडले होते, त्यामुळे त्यांना आम्हाला सर्वांना कधीच माफ करायचे नव्हते. परंतू काही आठवड्यांपूर्वी त्यांच्या घरी वकिलांनी आम्हाला पुन्हा पत्र लिहून सांगितले की आम्ही वारस शोधू शकलो नाही आणि आम्हाला तिच्याबद्दल काही माहिती आहे का ते विचारले; कागदाच्या तुकड्यावर योगायोगाने लिहिलेल्या नावाने मला ते शोधून काढता आले. बाकी पुढचे सर्व तुला माहीत आहे…"

त्यांना परत निघायचे होते; पण मी माझी पाठ दाराकडे टेकवली.

"मला बोलू दे," मी म्हणाले; "मला श्वास घेण्यासाठी वेळ द्या."

मी थांबले; ते माझ्यासमोर उभे राहिले होते. हातात टोपी आणि एकदम शांत दिसत होते. मी पुढे म्हटले:

"तुमची आई माझ्या वडिलांची बहीण होती?"

"होय."

"मग ती माझी आत्या होती?"

त्यांनी होकारार्थी खूण केली.

"माझे काका अंकल जॉन तुझे मामा होते?" तुम्ही, डायना आणि मेरी, त्यांच्या बहिणीची मुले आहात आणि मी त्यांच्या भावाची मुलगी आहे?"

"नि: संशय."

"म्हणजे आपण आत्तेमामे भावंडे आहोत? आपले अर्धे रक्त एकाच स्रोतातून वाहते?"

a

“होय, तू आमची मामे बहिण आहेस.”

मी त्यांच्याकडे पाहिले; मला असे वाटले की मला एक भाऊ सापडला आहे, ज्याचा मला अभिमान वाटेल आणि ज्याच्यावर मी प्रेम करू शकेन; मेरी आणि डायना दोघी माझ्या बहिणी आहेत हे सत्य जरी आता समजले असले तरी त्यांनी, मी सर्वस्वी अनोळखी असताना मला आधार दिला, मला मृत्यूच्या दाढेतून ओढून काढले, माझ्याशी मैत्री केली आणि हा उंचेला तरूण माणूस, ज्याने मला त्याच्या घराच्या उंबरठ्यावर मरताना उचलले आणि आसरा दिला, अन्न पाणी दिले, चरितार्थाची सोय केली आणि आता ते माझ्याशी रक्ताच्या नात्याने जोडलेले आहेत हे समजते: एका गरीब, अनाथ स्त्रीसाठी ही एक मोठी उपलब्धी होती! ही खरी संपत्ती होती, हृदयाची संपत्ती! शुद्ध आणि नैसर्गिक आपुलकीची खाण! हा एक चैतन्यशील, अद्भुत आनंद होता, जो मी श्रीमंत आहे हे समजल्यावर जो आनंद अनुभवला होता त्याच्याशी तुलना करत येण्यासारखा नव्हता; कारण, ती बातमी स्वागतार्ह असली तरी, मला असा सात्विक आनंद वाटला नव्हता.

“अरे! मी खुश आहे ! मी खुश आहे ! “ मला रडू आले.

ते पाहून संत-जॉन हसू लागले.

“तू अशा क्षुल्लक गोष्टींना महत्त्व देत आहेस आणि महत्त्वाच्या गोष्टींकडे तुझे दुर्लक्ष होत आहे. मी तुला वारसाहक्काने संपत्ती मिळणार हे जेव्हा सांगितले, तेव्हासुद्धा तुला एव्हढा आनंद झाला नव्हता, जेव्हढा आता एका बिनमहत्त्वाच्या गोष्टीने झाला आहे.”

“हे तुमचे वैयक्तिक मत झाले. कदाचित तुमच्या लेखी ही बाब तितकीशी महत्वाची नसेलही, तुम्हाला सख्ख्या बहिणी आहेत, तुम्ही तुमच्या आईवडिलांना पाहिले आहे, त्यांचे प्रेम, माया प्रसंगी राग देखील अनुभवलेला आहे, तुम्हाला अजून एका मामे बहीणीची गरज नाही; पण माझे तसे नाही, मला आज तीन नातेवाईक

मिळाले आहेत, जर तुम्ही मला तुमच्या कुटुंबियांपैकी एक समजत नसाल तर माझ्याकडे दोन बहिणी तरी नक्कीच आहेत. होय, मी पुन्हा सांगते, मी आनंदी आहे!"

मी पटकन माझ्या खोलीत गेले; भावभावनांचा कल्लोळ उसळला होता. नवीन घटनांची, विचारांची एकवार नीट संगती लावण्याची गरज होती. काय होऊ शकते? काय असू शकते? काय होईल? आणि काय व्हायला हवे? या साऱ्या गोष्टींचा आढावा घेणे आवश्यक होते. मी खिडकीतून बाहेर आकाशाकडे पाहिले. आकाशात असंख्य तारे चमकत होते. माझ्या मनात, ज्यांनी मला आधार दिला, माझा जीव वाचवला, मला प्रेम दिले, माझ्या बरोबर मैत्री केली, मला जर्मन सारखी भाषा शिकण्यास मदत केली शिवाय स्वतंत्रपणे जगण्याचा मार्ग दाखवला त्या सर्वांवर मी, आजवर फक्त प्रेम करत होते, आता मला त्यांच्या चांगल्यासाठी काहीतरी करायची इच्छा झाली. माझ्या नव्याने ज्ञात झालेल्या माझ्या कुटुंबातील चार जणांची तोंडे चार दिशांना होती. त्यांना एकत्र आणून, मला मी जशी आर्थिकदृष्ट्या सक्षम बनणार होते, तसेच त्यांनीही बनावे परत

मूर- हाऊसमध्ये, त्यांनी एकत्र यावे असे मला वाटत होते.

आम्ही चौघे एक कुटुंब नव्हतो का? मग मला एकटीला मिळणारे, वीस हजार पौंड चौघांमध्ये समान विभागून प्रत्येकी पाच हजार पौंड मिळाले तरी ते पुरेसे होतील आणि हे न्यायाच्या दृष्टीने पण उचित असेल असा विचार माझ्या मनात आला. आता मला मिळू घातलेल्या संपत्तीने माझी छाती दडपून जाण्याऐवजी, तो संपन्न वारसा सोन्या नाण्यांचा न राहता, आनंदी जीवनाचा, उज्वल भवितव्याचा बनवण्याचा माझा निर्णय पक्का झाला.

हा सर्व विचार करत असताना मी खिडकीपाशी उभी होते. सेंट जॉननी एक खुर्ची आणून मला शांतपणे बसण्यास सांगितले. मी त्यांना, मी शांतच आहे असे

सांगून, परत खोलीत येरझाऱ्या घालू लागले. थोडी उसंत घेतल्यानंतर मी त्यांना सांगितले, "उद्याच्या उद्या डायना आणि मेरीला पत्र पाठवून बोलावून घ्या. डायना मला म्हणाली होती की तिला आणि मेरीला प्रत्येकी एक हजार पौंड मिळाले तर तेव्हढी आर्थिक विवंचना भासणार नाही, तेव्हा त्यांना प्रत्येकी पाच हजार पौंड, मिळाल्यास त्या सुखी आणि समाधानी होतील."

"मला जरा एक ग्लास पाणी कुठे मिळेल ते सांग," सेंट-जॉनने उत्तर दिले; "खरं तर, तू एव्हढी उत्तेजित होऊ नको."

"मी सर्व शांतपणे ठरवले आहे. तुम्ही मला सांगा, तुमच्या वाटणीचे पाच हजार पौंड मिळाल्यानंतर तुम्ही मिस ऑलिव्हरशी लग्न करून इंग्लंडमध्येच राहाणार ना?"

"तुझे डोके सध्या ठिकाणावर नाही. अचानक तुला ही बातमी समजल्यामुळे तुला हर्षवायू तर झाला नाही ना? तू जास्तच उत्तेजित झाली आहेस."

"मि. रिव्हर्स, मी शांत आहे; तुम्ही मात्र समजून, न समजण्यासारखे वागत आहात."

"जर तू मला स्पष्टपणे सांगितलेस तर मी अर्थबोध होतो का बघतो."

"स्पष्टीकरण देण्याची गरजच नाही. अगदीच साधे सोपे आहे. माझ्या काकांनी मागे सोडून दिलेल्या वीस हजार पौंडची संपत्ती, एक पुतणी, दोन भाच्या आणि एक भाचा असे चार समान हिश्शाने, प्रत्येकाला पाच हजार पौंड मिळतील. तुम्ही फक्त तुमच्या बहिणींना बोलावून घ्या."

"हे तुझे मत झाले."

"होय, मी माझे मत बदलू शकत नाही: "यापेक्षा वेगळा विचार, याबाबत मला करता येणे अशक्य आहे. मी स्वार्थी नाही, आणि दुसऱ्यांवर अन्याय करणारी किंवा कृतघ्न तर नाहीच नाही. मी योग्य मार्ग काढला आहे. मला घर हवे आहे,

a

घरातील माणसे हवी आहेत. मला मूर-हाऊस आवडते, मी तिथे हक्काने राहू शकते, मला डायना आणि मेरी आवडतात आणि मी त्यांच्याशी आयुष्यभर संलग्न राहीन. मला पाच हजार पौंड मिळाल्याने आनंद होईल; पण वीस हजार पौंड मला फक्त त्रास देतील. आणि जरी, कायद्याच्या दृष्टीने हा पैसा माझा असेल तर न्यायाच्या दृष्टीने तो माझ्या मालकीचा नाही. माझ्यासाठी पूर्णपणे अनावश्यक आहे तेच मी तुम्हाला देत आहे; मला या बाबतीत कोणतीही चर्चा किंवा विरोध नको आहे; आपण आपापसात सहमत होऊन पुढचे सगळे लगेच ठरवूया.''

''हे तू भावनावेगात बोलत आहेस. तुला यावर सांगोपांग विचार करून निर्णय घ्यायला हवा आहे.''

''तुम्हाला जर माझ्या प्रांजळपणाबद्दल शंका असेल तर नैसर्गिक न्यायाच्या दृष्टीने विचार करून पहा.''

''मला त्यात थोडाफार न्याय दिसत असला तरी ते प्रथेच्या विरुद्ध आहे. संपूर्ण संपत्ती तुझी आहे; माझ्या मामांनी ती स्वतःच्या कष्टाने कमावली होती, त्यांना ती ज्यांना द्यायला हवी होती त्यांना देण्यास ते मोकळे होते; त्यांनी ती तुला दिली. आता न्यायानुसार ती तुझी संपत्ती आहे: विवेकबुद्धीला अनुसरुन तू ती पुर्णतः तुझी स्वतःची आहे असे समजण्यात काही हरकत नाही.''

''माझ्याकरिता'', मी उत्तर दिले, ''माझ्या विवेकबुद्धीनुसार ही बाब भावनांची आहे. मला माझ्या भावनांचा मान राखायचा आहे. माझ्या भाग्याने मला अशी संधी लाभली आहे आणि ती मी अजिबात दवडणार नाही. वर्षभर जरी तुम्ही माझ्याबरोबर चर्चा केल्यात, आक्षेप घेतलेत अथवा माझे मन जरी दुखावलेत, तरी मी ज्या आनंदाची नुसती झलक पाहून इतकी भारावून गेले आहे, तो मिळवण्यासाठी, मी माझ्यावरच्या आपल्या ऋणातून अंशतः मुक्त होऊन, आयुष्यभरासाठी ऋणानुबंध जपण्याचा माझा इरादा कधीही बदलणार नाही.''

a

"तुझे असे बोलणे सहाजिकच आहे," सेंट-जॉनने उत्तर दिले, "कारण संपत्ती काय असते आणि तिचा आनंद घेणे म्हणजे काय हे तुला माहीत नाही: वीस हजार पौंड, तुला किती समाजात किती महत्त्वाचे स्थान मिळवून देतील, तुझे भवितव्य कसे झळाळून उठेल याची तुला कल्पना नाही----"

"आणि तुम्हाला," मी मध्येच त्यांना थांबवत म्हणाले," मी भावंडांच्या प्रेमासाठी किती आसुसलेली आहे, याची कल्पना येणार नाही. मला घर कधीच नव्हते, भावंडे नव्हती; आता मला दोन्ही गोष्टी मिळणार आहेत आणि मी ते मिळवणारच आहे: तुम्ही मला स्विकारण्यास आणि तुमच्यापैकी एक मानण्यास नाखुश नाहीत ना?"

"जेन: मी तुझा भाऊ असेन, माझ्या बहिणी, तुझ्या बहिणी असतील पण तुझ्या न्याय हक्कामधील वाटणीच्या बदल्यात कधीच नाही."

"भाऊ? जो हजारो मैल दूर, माझ्या बहिणी अनोळखी लोकांच्या गुलामगिरीत, आणि मी श्रीमंत-- सोन्याने मढलेली, कधीही न कमावलेल्या पैश्यांच्या राशीवर लोळणारी, ज्याची पात्रता अंगी नसलेली! आणि तुम्ही निर्धन! हेच का बंधुत्व? हीच का समानता? हेच का जवळचे आप्तेष्ट आणि जिव्हाळयाचे नातेसंबंध?"

"पण, जेन, कौटुंबिक आणि घरगुती सुखाच्या तुझ्या ज्या इच्छा आकांक्षा आहेत, त्या अजून वेगळ्या प्रकारे पुर्ण होऊ शकतात. हे सर्व तू लग्न करून मिळवू शकतेस."

"नाही, मला लग्न करायचे नाही. मी कधीच लग्न करणार नाही."

"असे म्हणणे म्हणजे अगदीच टोकाचे आहे: यावरूनच तू किती संभ्रमात पडली आहेस याची कल्पना येते."

a

"नाही मी पूर्ण विचार करूनच हे बोलत आहे: लग्नाविषयी मला काय वाटते, लग्नाचा साधा विचारही मला कसा सहन होत नाही, याची मला पूर्ण कल्पना आहे. निव्वळ प्रेमासाठी कोणी माझ्याशी विवाह करण्यास तयार होईल असे मला वाटत नाही, सध्या मिळणाऱ्या संपत्तीसाठी कोणी तयार होत असेल तर ते मला मान्य नाही. आणि मला एक अनोळखी व्यक्ती नवरा म्हणून नको आहे - असंवेदनशील, परका, माझ्यापेक्षा वेगळा; मला माझे नातेवाईक हवे आहेत: जे माझे सगेसोयरे, माझे जीवाभावाचे सोबती असतील. पुन्हा एकदा सांगा की तुम्ही माझा भाऊ बनण्यासाठी तयार आहात. जेव्हा हे शब्द मी ऐकले, तेव्हा मला अवर्णनीय आनंद झाला, शक्य असल्यास परत मला ते शब्द ऐकवा."

"मला वाटते की मी करू शकतो; मी माझ्या बहिणींवर नेहमीच प्रेम केले आहे; मी त्यांची योग्यता जाणून आहे, मला त्यासाठी त्यांचा आदर वाटतो, त्यांची बुद्धीमत्ता, त्यांच्या विचारांची परिपक्वता या मला कौतुकास्पद वाटतात. तू पण तत्वनिष्ठ आणि विवेकी आहेस: तुझ्या आवडीनिवडी, सवयी डायना आणि मेरी सारख्या आहेत. तुझी उपस्थिती मला नेहमीच आनंददायी वाटते; तुझ्याबरोबर बोलून मला नेहमीच शांत समाधानी वाटते. माझ्या मनात तुझ्यासाठी नक्कीच जागा असेल, मी तुला माझी सर्वात लहान, तिसरी बहीण समजू शकतो."

"धन्यवाद: सध्या पुरते तरी माझे पूर्ण समाधान झाले, आता तुम्ही परतलेले बरे कारण अजून थोडावेळ तुम्ही थांबलात तर परत नवीन काहीतरी खुसपट काढून मला आणखी चिडवू शकता."

"आपल्या शाळेचे काय, मिस आयर? मला वाटते आपल्याला आता शाळा बंद करावी लागेल."

"नाही, जोपर्यंत तुम्हाला दुसरी शिक्षिका मिळत नाही तोपर्यंत मी माझे काम करत राहीन."

a

त्यांनी हसत हसत मला हँडशेक दिला आणि माझी रजा घेतली.

माझ्या इच्छेनुसार मला मिळालेल्या संपत्तीची समान वाटणी करण्याचे, सर्वांच्या गळी उतरवण्यासाठी, मला किती संघर्ष करावा लागला, किती युक्तिवाद करावे लागले यांचा तपशील बराच मोठा होईल. काम अवघड होते: पण मी पूर्ण करण्यात यशस्वी झाले---माझ्या आत्तेभावंडांना मी माझ्या निर्णयावर ठाम असल्याची आणि माझा हेतू शुद्ध असल्याची खात्री झाली; याशिवाय, अशा परिस्थितीत त्यांनी सुध्दा हेच केले असते, जे मी करण्याचा आग्रह धरत होते यावर त्यांचे एकमत झाले--- तरीसुद्धा थोडाफार वेळ गेलाच, शेवटी त्यांनी हे प्रकरण लवादाकडे पाठवण्याचा निर्णय घेतला. न्यायाधीश म्हणून, मि.ऑलिव्हर आणि एक सक्षम वकील नेमले गेले. त्या दोघांना माझी बाजू पटली आणि मी विजयी झाले. प्रकरण निकालात निघाले. सेंट-जॉन, मेरी, डायना आणि मी आमची संपत्ती ताब्यात घेतली.

मिळालेली संपत्ती आम्हा चौघा भावंडांमध्ये समान वाटून घेण्यासाठी मला सर्वांबरोबर किती संघर्ष करावा लागला आणि मला कोणते युक्तिवाद करावे लागले याचा तपशीलवार वर्णन करण्याची मला गरज नाही. माझे काम अवघड होते; पण मी खूप निश्चय केला होता आणि माझ्या आत्तेभावंडांना शेवटी खात्री पटली की मी समान वाटणी करण्यावर ठाम आहे आणि त्यांना अंतःकरणापासून  माझा हेतू योग्य वाटला. त्यांना हे चांगले ठाऊक होते की माझ्या जागी ते सुद्धा  असेच लागले असते. शेवटी त्यांनी हे प्रकरण लवादाकडे पाठवण्याचा निर्णय घेतला. न्यायाधीश श्री. ऑलिव्हर आणि होते एक सक्षम वकील; दोघांनी माझी बाजू घेतली आणि मी विजयी झाले. प्रकरण निकालात निघाले. सेंट-जॉन, मेरी, डायना आणि मी आमची वाटणी आपापल्या ताब्यात घेतली.

# प्रकरण 34

संपत्तीच्या वाटणी संदर्भातील सर्व कायदेशीर प्रक्रिया पूर्ण झाली आणि मॉर्टनच्या शाळेला नवीन शिक्षिका पण सापडली. ख्रिसमस जवळ आला होता: ख्रिसमसची सुट्टी नंतर नवीन शिक्षिका हजर होणार होती. मी मॉर्टनची शाळा सोडण्याचा निर्णय घेतला. निरोपाच्या क्षणी माझे दातृत्व कमी पडू नये याची मी काळजी घेतली. लक्ष्मीचा वरदहस्त मिळाल्याने, हात थोडे मोकळे सोडायला आणि मन अजून मोठे करायला काहीच प्रत्यवाय नव्हता. आपणास भरभरून मिळाल्यावर इतरांना थोडेफार दिल्याने आपल्या भावनांना व्यक्त करण्याची संधी मिळते. माझ्या अनेक विद्यार्थीनी मला खूप मानत होत्या, माझ्यावर प्रेम करत होत्या हे निरोप समारंभाच्यावेळी प्रकर्षाने जाणवले. या साध्या भोळया मुलींच्या हृदयात मला खरोखरच स्थान आहे हे पाहून माझ्या मनात कृतज्ञता दाटून आली. मी त्यांना वचन दिले की दर आठवड्याला मी त्यांची भेट घेईन आणि त्यांना एक तास त्यांचा अभ्यास घेईन.

त्याचवेळी मि. रिव्हर्स तिकडे पोहोचले. शाळा तपासणी झाली, एकूण साठ विद्यार्थीनी होत्या. मी दरवाजा बंद केला आणि हातात चावी घेऊन मी उभी होते. सात आठ सर्वात हुषार विद्यार्थीनी अजून माझ्यासाठी थांबल्या होत्या: कोणत्याही इंग्रजी शेतकऱ्यांमध्ये त्यांच्या एव्हढ्या सभ्य, विनम्र, चांगल्या वर्तणुकीच्या आदर्श महिला पाहायला मिळणे अवघड होते: इंग्रजी शेतकरी शिक्षण, प्रतिष्ठा आणि

a

सभ्यता यात संपूर्ण युरोपात अव्वल आहेत: मला फ्रेंच आणि जर्मन शेतकरी महिला, माझ्या मॉर्टनच्या विद्यार्थीनींच्या तुलनेत मागासलेल्या वाटल्या.

"तू केलेल्या कामाबद्दल तू स्वतः समाधानी आहेस काय? " सेंट जॉननी विचारले."

"यात काही शंकाच नाही."

"तू काही महिने मुलींच्या भल्यासाठी काम केलेस, तेच पुढे केल्यास संपूर्ण स्त्री जातीचे कल्याण होईल असे तुला वाटत नाही काय?"

"हो," मी उत्तर दिले, "परंतु मी हे काम पुढे पर्यंत करू शकत नाही: अजून मला स्वतःला पुढे शिकायचे आहे. मला मिळालेल्या संधीचा फायदा करून घ्यायचा आहे."

सेंट-जॉनचा चेहरा गंभीर झाला.

"बरं! ते म्हणाले; मग तुला काय करायचे आहे?"

"मला बरीच कामे आहेत. सर्वात प्रथम हन्ना माझ्या मदतीला हवी आहे. तुम्ही दुसरी कोणी मदतनीस पाहा. मला तिची मूर-हाऊस मध्ये गरज आहे. डायना आणि मेरी एका आठवड्यात येतील आणि तोपर्यंत मला त्यांच्या स्वागताची आणि ख्रिसमसची दोन्हीची तयारी करायची आहे."

"ठिक आहे, मला वाटले कुठे सहलीला वगैरे जाणार आहेस की काय? मी हन्नाला तुझ्याबरोबर पाठवून देतो."

"मग तिला उद्यासाठी तयार राहायला सांगा; ही आहे शाळेची चावी, मी लवकरच तुम्हाला माझ्या कॉटेजची चावी देईन."

त्यांनी चावी घेतली.

a

“तू खूप आनंदी दिसत आहेस,” ते मला म्हणाले; “पण मला कारण समजले नाही, हे काम सोडून दुसरे काय करायचे ठरवले आहेस? तुझी महत्वाकांक्षा काय आहे? जीवनाचा हेतू काय आहे?”

“सध्या माझे काम मूर-हाऊस आतून बाहेरून स्वच्छ करणे हा आहे. दुसरे म्हणजे प्रत्येक गोष्ट, फर्निचर तेल, मेण लावून पा ॅलीश करायचे आहे. तिसरे खुर्च्या आणि टेबल, बेड आणि रग्जची व्यवस्था करणे. प्रत्येक खोलीत चांगली शेकोटी आणि कोळशाची व्यवस्था करणे.

सर्वात शेवटी मेरी आणि डायना येण्यापुर्वी दोन दिवस मी आणि हन्ना, ख्रिसमसचा केक बनवण्यासाठी अंडी, मनुका, मसाले घालून तयारी करणार आहोत. अशाप्रकारे त्या दोघींच्या स्वागताची जय्यत तयारी करायचा माझा हेतू आहे आहे. स्नेहपूर्ण स्वागताचा सुंदर आदर्श दाखवण्याची माझी महत्त्वाकांक्षा आहे.”

सेंट-जॉन किंचित हसले; तथापि ते खूष दिसले नाहीत.

“सध्या पुरते ठिक आहे, पण जेव्हा या लहान सहान घरगुती गोष्टीतील तुझे स्वारस्य कमी होईल, तेव्हा यापेक्षा उच्च ध्येय गाठण्यासाठी काम करण्याची महत्त्वाकांक्षा असणे जरुरीचे आहे,” ते म्हणाले.

“ही जगातील सर्वोत्तम गोष्ट आहे,” मी मध्येच बोलले

“नाही, जेन, नाही. हे जग म्हणजे आयुष्याचे साफल्य नाही आणि तसे असण्याचा प्रयत्न करू नकोस: विश्रांती घेऊ नको किंवा आळशी होऊ नको.”

“उलट, मला भरपूर काम करायचे आहे.”

“जेन, मी तुला यावेळी माफ करतो; तुला आयुष्यात उशिरा मिळालेल्या नात्यातील गोडवा चाखायला, तुला नव्याने मिळालेल्या श्रीमंतीचा आनंद उपभोगायला मी तुला दोन महिन्यांचा अवधी देतो. पण मला आशा आहे, तू

लौकरच मूर-हाऊस, मॉर्टन, भगिनीप्रेम आणि आधुनिक सुखसुविधेतील आनंद या सर्वांच्या पलिकडे असलेल्या जगाचा विचार करशील.''

मी त्यांच्याकडे आश्चर्याने पाहतच राहिले.

''सेंट जॉन,'' मी म्हणाले, ''मला तुमचे बोलणे चुकीचे वाटते; मी एखाद्या राणी प्रमाणे आनंदी राहण्याचा विचार करत असताना तुम्ही मात्र मी अविश्रांत परिश्रम करावे अशी अपेक्षा करत आहात, त्यामागचा उद्देश काय आहे?''

''देवाने तुला जे गुण दिले आहेत त्यांचा सदुपयोग व्हावा म्हणून मी तुला प्रेरित करण्यासाठी; एक दिवस त्याला, याचा हिशोब द्यावा लागेल. जेन मी तुला बजावून सांगतो की मी तुझ्यावर या बाबतीत बारकाईने लक्ष ठेवेन आणि घर प्रपंचाच्या क्षुल्लक आनंदापासून दूर रहाण्यास सांगेन. देहाच्या बंधनांना इतके दृढपणे चिकटून राहू नकोस; देवाने योजलेल्या एका योग्य कारणासाठी दृढतेने उत्साह जतन करायला हवा: त्यांला क्षुल्लक क्षणिक आनंदासाठी वाया घालवू नको. तू ऐकते आहेस का, जेन?''

''होय, पण मला तुमचे बोलणे समजत नाही. माझ्याकडे आनंदी राहण्याची चांगली कारणे आहेत आणि मला आनंदी व्हायचे आहे. मी निघते!''

खरंच, मी मूर हाऊसमध्ये आनंदी होते. हन्ना आणि मी खूप कष्ट घेतले; मला स्वच्छतेपासून स्वयंपाकापर्यंत सर्वच कामे व्यवस्थितपणे येतात हे पाहून हन्नाला आनंद वाट होता. हळूहळू स्वच्छतेचे काम आटोपले. नवीन फर्निचर खरेदीसाठी जवळच्या शहरात एक संपूर्ण दिवस गेला.

माझ्याकडे सर्वांनी त्यासाठी पैसे अगोदरच काढून दिले होते आणि आवश्यक त्या सुधारणा माझ्या पूर्ण अखत्यारीत होतील अशी संमती नव्हे तर आग्रह धरला होता. पण डायना आणि मेरीला नवीन फर्निचर कितीही चांगले असले तरी त्यांच्या जुन्या घरातील टेबल, खुर्च्या आणि बेड पाहण्यात जास्त आनंद मिळेल, या

विचाराने ते तसेच ठेवून मी फक्त गडद सुंदर नवीन कार्पेट्स आणि पडदे, पोर्सिलेन आणि ब्राँझमधील काही काळजीपूर्वक निवडलेल्या प्राचीन वस्तूंची नव्याने मांडणी केली. नवीन रग्ज् अभ्रे, बेडशीट्स, आरसे आणि ड्रेसिंग टेबलसाठी लागणाऱ्या वस्तूंची खरेदी केली. एक जादाची बेडरूम आणि बैठकीची खोली रिकामी होती तिथे जुने महोगनी फर्निचर आणि लाल मखमलीच्या गाद्या गिरद्या ठेवल्या. त्या बेड-रूमचे मी संपूर्णपणे नूतनीकरण केले: मी पॅसेजवर कॅनव्हास आणि पायऱ्यांवर कार्पेट ठेवले. सर्व काही पूर्ण झाल्यावर, मला वाटले की मूर-हाऊस आता जरी बाहेरच्या बाजूने एक मोठी, विस्तीर्ण इमारत, थंड आणि निर्जन भासत असली तर आतून एक आरामदायी उबदार घर बनले होते.

शेवटी डायना आणि मेरी यायचा दिवस आला. त्या संध्याकाळी घरी पोहचणार होत्या त्या आधी दोन्ही मजल्यांवर शेकोटी पेटवली होती. स्वयंपाक आटोपून मी आणि हन्ना कपडे बदलून तयार होतो.

सर्व काही तयार होते.

सेंट-जॉन प्रथम आले. मी त्यांना सर्व कामे व्यवस्थितपणे पूर्ण होईपर्यंत मूर -हाऊस मध्ये न येण्यास बजावून सांगितले होते. आमच्या कामाचा पसारा पाहून त्यांची मदत होण्याऐवजी नाराजी सहन करावी लागली असती. मी चहासाठी केक बनवत होते तेव्हा ते किचन मध्ये आले. शेगडी जवळ येत त्यांनी घरकाम करून माझे समाधान झाले काय, याची चौकशी केली.

मी त्यांना माझ्याबरोबर येऊन काम कसे झाले हे पाहण्यासाठी विनंती केली. त्यांनी फक्त सर्व खोल्यांतून नुसती बाहेरून नजर टाकली मग एव्हढेच म्हणाले की इतक्या कमी वेळात एव्हढे मोठे काम करून मला त्रास होऊन थकवा आला असणार. पण एकदाही त्याचे घर व्यवस्थित केलेले पाहून त्यांनी समाधान व्यक्त केले नाही.

a

मला वाटले त्यांना नवीन बदल रुचले नसावेत. काहीशी निराश होऊन, मी त्यांना स्पष्टपणे विचारले.

“नाही तू जून्या घरातील प्रत्येक गोष्ट योग्य प्रकारे उपयुक्तता लक्षात ठेवत, नव्याशी सुसंगत मांडणी केली आहे. पण त्यासाठी आवश्यकतेपेक्षा जास्त श्रम आणि वेळ खर्ची घातले आहे. आता सांग या खोलीसाठी किती तास काम करावे लागले? बरं असो, माझे एक पुस्तक इथे होते, ते दुसरीकडे कुठे ठेवले आहे काय?”

मी त्यांना लायब्ररीत आहे असे सांगितले. त्याने ते लगेच घेतले, आणि खिडकीजवळ त्यांच्या नेहमीच्या जागी जाऊन घेत वाचू लागले.

मला ते आवडले नाही. सेंट-जॉन चांगले होते, पण मला असे वाटले लागले की त्यांनी आपण थंड आणि कठोर असल्याचे सांगितले होते ते खरे असावे. कला कौशल्य, सौंदर्याविष्कार आणि सुख सुविधांचे त्यांना आकर्षण नव्हते---त्यातील शांततापूर्ण आनंद त्यांना मोहक वाटत नव्हता. अक्षरशः ते त्यांच्या महत्वाकांक्षेकरिता जगत होते--जी नक्कीच चांगली आणि महान होती: पण त्यांना विश्रांती घ्यायची नव्हती आणि त्यांच्या भोवतालच्या लोकांनी देखील घेतलेली विश्रांती मान्य नव्हती. माझे लक्ष त्यांच्या वाचनात गढून गेलेल्या चेहऱ्याकडे लक्ष गेले, उंच कपाळ, संगमरवरी पुतळयासारखा सुंदर पण शांत चेहरा पाहून माझ्या एकाएकी लक्षात आले की ते चांगला नवरा बनणे अशक्य आहे: त्यांच्या पत्नीसाठी संसार म्हणजे तारेवरची कसरतच होईल. मला मिस ऑलिव्हर प्रती असलेल्या त्यांच्या प्रेमाचे स्वरूप ध्यानात आले: त्यांचे स्वतःचे मत ते प्रेम नसून शारीरिक आकर्षण आहे असे होते यावर माझा विश्र्वास बसला. त्या प्रेमाचा त्यांच्यावर पडलेला प्रभाव, त्यांना तापदायक वाटत होता. त्यांना ते गुदमरुन नष्ट करायचे होते. लग्न झाल्यास, दोघांपैकी एकही आनंदी होऊ शकणार नाही, यावर त्यांचा दृढ विश्वास होता.

a

विधात्याने त्यांना समाजातील दीन दुबळयांच्या सेवेसाठी, शिक्षणासाठी, धर्माची सुवार्ता सर्वदूर पसरविण्यासाठी, प्रसंगी जीवावर उदार होऊन, वैयक्तिक सुखाचा, संसाराचा त्याग करून, जगाचा संसार सुखनैव चालावा, या महान कार्यासाठी घडवले होते: वैयक्तिक सुखदुःख, आनंद, सुखोपभोग हे त्यांना दृष्टीने बिनकामाचे आणि बिन महत्त्वाचे होते.

"ड्रॉईंग रूम ही, त्यांची जागा नाही," मी स्वतःशी म्हणाले, "हिमालयाचे पर्वत, आफ्रिकेतील जंगले किंवा गिनीचे दमट आणि दुर्गंधीयुक्त किनारे हेच त्यांचे कार्यक्षेत्र असणार आहे. कौटुंबिक सुख समृद्धीमध्ये त्यांच्यातील ज्ञानाचा, क्षमतेचा, विकास होणे अशक्य आहे. संकटाशी सामना करण्यासाठी, कठीण परिस्थितीतून मार्ग काढण्यासाठी, त्यांच्या मधील धैर्य, उर्जा आणि आत्मिक सामर्थ्याच्या अधिकाधिक विकास होईल. 'बोले तैसा चाले' ही उक्ती त्यांना पुरेपूर लागू पडते. एक नेता म्हणून ते नेहमी श्रेष्ठ असतील मात्र वैयक्तिक संसारात त्यांना निभाव लागणे अशक्य आहे. त्यांना मिशनरी व्हायचे आहे हे तेच योग्य आहे."

"डायना, मेरी आल्या आहेत," हन्ना दिवाणखान्याचे दार उघडून म्हणाली.

त्याचवेळी म्हातारा कार्लो आनंदाने भुंकायला लागला. मी बाहेर गेले, अंधार पडत होता; मी गाडीच्या चाकाचा आवाज ऐकला. हन्नाने लवकरच कंदील पेटवला. गेटसमोर गाडी थांबली होती; कोचमनने दार उघडले आणि एकामागून एक दोन्ही बहिणी बाहेर आल्या. प्रथम मेरी आणि नंतर डायना, दोघींनी माझे चुंबन घेतले. नंतर हन्नाची पाळी होती. कार्लो आनंदाने जवळजवळ वेडा झाला होता. आम्ही

सर्वजण आत गेलो, प्रवासाने दोघी थकून गेल्या होत्या. रात्र झाल्यामुळे हवा गार होती. कोचमन आणि हन्नाने सामान आत आणले. तेव्हा सेंट जॉन कुठे आहेत याची विचारणा झाली. त्या क्षणी त्यांनी प्रवेश केला आणि दोन्ही बहिणींना

भेटून त्यांनी त्यांचे स्वागत केले. थोडा वेळ हलक्या आवाजात बोलून परत आत गेले.

डायनाने कोचमनसाठी खाण्या पिण्याची व्यवस्था केली. घरात केलेल्या नवीन सुधारणा दोघींनाही आवडल्या त्या खूपच खुश झाल्या. त्यांनी नवीन हँगिंग्ज, ताज्या कार्पेट्स, अगदी सुंदर पोर्सिलेन फुलदाण्यांचे कौतुक मनापासून केले; त्यांनी माझ्याबद्दल मनापासून कृतज्ञता व्यक्त केली. त्या दोघी त्यांच्या घरी परतल्याने मला आनंद झाला.

ती संध्याकाळ खूप सुंदर होती. आम्ही तिघी इतक्या गप्पागोष्टी मध्ये रंगून गेलो की सेंट जॉन फारसे बोलत नाहीत हे कुणाच्या लक्षात आले नाही. तेव्हढ्यात दारावर टकटक झाली, एक गरीब मुलगा आपल्या मरणासन्न आईसाठी मिस्टर रिव्हर्स बोलावण्यासाठी आल्याचे हन्ना सांगत आली "तो मुलगा कुठे राहतो हन्ना?" सेंट-जॉननी विचारले

"व्हिटक्रॉस-ब्रोच्या अगदी वरच्या बाजूला; ते इथून जवळपास चार मैलांवर आहे, तिकडे सगळी दलदल आणि शेवाळं आहे," हन्ना म्हणाली.

"त्याला सांग मी येत आहे."

"सर, तुम्ही आता न गेलेलेच बरे; रात्रीची वेळ आहे, रस्ता चांगला नाही; दलदलीतून वाट सापडते कठीण आहे शिवाय थंडी पण जास्त आहे. त्याला सांगा की तुम्ही उद्या सकाळी याल." हन्नाच्या बोलण्याचा काही उपयोग झाला नाही. सेंट जॉन कोट घालून निघून गेले. परतायला मध्यरात्र उलटुन गेली. भुकेल्या, थकलेल्या अवस्थेत परत आले पण चेहऱ्यावर आनंद होता, कर्तव्यापुर्तीचा आनंद, कठीण परिस्थितीतून मार्ग काढून, विजय मिळवल्याने, ते स्वतःवर खुश आणि समाधानी होते.

मला विश्वास आहे की पुढील आठवड्यात त्यांच्या संयमाची अनेकदा परीक्षा झाली. नाताळचा आठवडा होता; आम्ही तिघी बहिणी गप्पा गोष्टी, खाणे पिणे, मौजमजा या रंगून गेलो होतो. सेंट जॉननी आम्हाला आडकाठी आणली नाही पण आम्हाला टाळून ते बराचसा वेळ गरीब आणि आजारी लोकांच्या भेटीगाठी घेण्यासाठी बाहेर जात. तसा त्याचा परगणा मोठा होता आणि रहिवासी खूप दूर होते, त्यामुळे दिवसभर घराबाहेर असत.

एके दिवशी सकाळी डायनाने त्यांना त्यांचे पुढील संकल्प अजून तेच आहेत की बदलले आहेत याविषयी विचारणा केली.

“नाही,” त्यांनी उत्तर दिले, “ ते बदलले नाहीत आणि भविष्यात कधी बदलणारही नाहीत, काहीही झाले तरी मी ते सिध्दीस नेणारच. येत्या महिना पंधरवड्यात माझे जाणे निश्चित झाले आहे.”

“मग रोझमेंड ऑलिव्हरचे काय?” मेरीने अनावधानाने प्रश्न केला.

“रोझमेंड ऑलिव्हर, मि. ग्रॅनबी यांचे बरोबर लग्न करणार आहे. सर फ्रेडरिक ग्रॅनबी यांचा नातू आणि त्यांच्या प्रचंड इस्टेटीचा वारस, आजच मला मि. ऑलिव्हर यांनी मला बातमी दिली,” सेंट जॉन आमच्याकडे पाहत म्हणाले. आम्ही तिघी त्यांच्या चेहऱ्याकडे पाहू लागलो, ते एकदम शांत आणि थंड होते.

“हे लग्न जरा घाईत तर होत नाही ना?” डायना म्हणाली.

“दोन महिन्यांपूर्वी त्यांची भेट झाली, सर्वच दृष्टीने अनुकूल असल्यावर जास्त वेळ घालवण्याचे काही कारण नव्हते. फक्त त्यांना लग्नात आहेर म्हणून सर फ्रेडरिक ग्रॅनबी यांचे कडून मिळणाऱ्या वाड्याची रंगरंगोटी बाकी आहे.”

या प्रसंगानंतर जेव्हा सेंट जॉन मला जेव्हा एकटे भेटले, तेव्हा मला त्यांना रोझमेंडचे लग्न ठरल्याबद्दल खंत किंवा दु:ख होते काय, याविषयी चौकशी शिवाय

राहवले नाही. ते टेबलवर वाकून काहीतरी करत होते. चमकून त्यांनी माझ्याकडे पाहिले आणि म्हणाले, "जेन बघ मी लढलो आणि जिंकलो देखील."

"पण या विजयाची किंमत तुम्हाला भारी तर पडणार नाही ना? तुम्ही त्यामुळे उध्वस्त तर होणार नाही ना?"

"मला असे वाटत नाही: आणि तसेही काय फरक पडतो? पुन्हा मला याबाबत पुन्हा कधी संघर्ष करावा लागणार नाही. विजय अंतिम आहे. आता माझा मार्ग अनुसरण करणे सोपे आहे: मी त्यासाठी देवाचे आभार मानतो," असे बोलून ते गप्प बसले आणि आपले काम करु लागले.

लौकरच आमच्या आनंदाचे उधाण थोडे शांत झाले आणि रोजचे जीवन सुरू झाले. सेंट जॉन पण घरात थोडा जास्त वेळ थांबायला लागले. मेरीचा चित्रकलेचा सराव सुरू झाला. डायनाने विश्र्वकोशाचे वाचन सुरू केले आणि मी जर्मन भाषेचा अभ्यास सुरू केला आणि सेंट जॉननी मिशनरी म्हणून नेमणूक भारतात होणार असल्याने, हिंदुस्थानी भाषेचा अभ्यास सुरू केला. स्वतः अभ्यास करताना त्यांचे लक्ष आमच्या अभ्यासाकडे असायचे यांचे मला आश्र्चर्य वाटत होते. मी आठवड्यातून एकदा मॉर्टनच्या शाळेला भेटायला जायचा माझा नेम कधीच चुकवीत नसे. कधी हवामान चांगले नसले, जोराचा पाऊस वारा किंवा बर्फवृष्टी होत असल्यास मेरी आणि डायना, मला मॉर्टनला न जाण्यासाठी गळ घालत, तेव्हा ते त्यांच्या अनाठायी काळजी करण्यावर हसायचे आणि मला माझे कर्तव्य पार पाडण्यासाठी प्रोत्साहन देत असत आणि त्यांना म्हणत, "तुम्ही समजता तेव्हढी जेन दुबळी नाही. प्रतिकूल हवामानाचा ती उत्तम प्रकारे सामना करू शकते." त्यांच्या अश्या बोलण्याने मला खरोखरच बरे नसेल तरी तक्रार करायला हिंमत होत नसे. कारण तक्रारीवरून ते अस्वस्थ होत.

एकदा मी सर्दी तापाने आजारी होते म्हणून घरी थांबले होते, मेरी आणि डायना मॉर्टनला गेल्या होत्या. मी 'शिलर' वाचत होते आणि सेंट जॉन हिंदुस्थानी भाषेचा अभ्यास करत होते. सहज माझे लक्ष त्यांच्याकडे कडे गेले. ते माझ्याकडे निरखून पाहत असल्याचे मला वाटले, ते किती वेळ माझी अशी तपासणी केल्याप्रमाणे पाहत होते असतील असा मला प्रश्न पडला आणि मी कमालीची अस्वस्थ झाले.

"जेन," ते मला म्हणाले, "तू काय करत आहेस?"

"मी जर्मन शिकत आहे."

"हिंदुस्थानी शिकण्यासाठी तू जर्मन सोडावेस असे मला वाटते."

"तुम्ही गंभीरपणे बोलत आहात काय?"

"इतके गंभीरपणे की मला तेच हवे आहे आणि मी तुम्हाला का ते सांगेन."

मग त्यांनी मला समजावून सांगितले की ते स्वतः हिंदुस्थानी भाषा शिकत आहेत; जसं जसा पुढचा अभ्यास सुरू झाला की मागचे विसरायला होतं होते म्हणून एखादा विद्यार्थी मिळाल्यास त्यांच्या बरोबर अभ्यास केल्याचा फायदा होईल असे त्यांना वाटत होते. मी त्यांच्या बहिणींपेक्षा जास्त मेहनती होते म्हणून त्यांनी मला निवडले होते. फक्त तीन महिन्यांची तर बाब होती. त्यानंतर ते हिन्दुस्थानात निघणार होते.

सेंट-जॉनना नाकारणे काही सोपे नव्हते: आनंद आणि वेदना या दोन्हींचा त्यांच्या मनावर अमिट ठसा होता, मी हिंदुस्थानी शिकण्याची तयारी दर्शवली. जेव्हा दोन्ही बहिणी परत आल्या तेव्हा डायनाची शिष्या, आता सेंट जॉनची शिष्या झाल्याचे पाहून त्या हसू लागल्या आणि आपल्या भावाला म्हणाल्या त्याने त्या दोघींना असा निर्णय घेण्यासाठी भरीस घातले नसते. त्यांनी शांतपणे उत्तर दिले, "मला माहित होते."

a

शिक्षक म्हणून सेंट जॉन, धीरोदात्त होते पण विद्यार्थ्यांकडून परिश्रम करवून घेण्यात पटाईत होते. जेव्हा मी त्यांच्या अपेक्षांवर खरी उतरले, तेव्हा त्यांना माझे कौतुक वाटू लागले: त्यांच्या गंभीर प्रवृत्तीमुळे माझ्यावर एक प्रकारचा मानसिक दबाव वाढायला लागला. त्यांच्या समोर मला मोकळेपणाने हसता बोलता येईना. माझ्या लक्षात आले की माझ्यातील उत्साह त्यांना आवडत नव्हता, त्यावर ते नाराज होते. त्यांना फक्त गंभीर गोष्टी आवडत होत्या हे माझ्या ध्यानात आले त्यामुळे झोकून देऊन काम करण्याची माझी उर्मी नष्ट होऊ लागली. सांगकाम्या माणसाप्रमाणे मी जेव्हढे सांगितले तेव्हढेच करायला लागले. परंतु मला ही गुलामगिरी आवडत नव्हती.

त्यामुळे माझी मानसिक शांती भंगली. यापेक्षा ते पुर्वी दुर्लक्ष करत होते तेच बरे होते असे वाटू लागले.

गुड नाईट म्हणून बहिणींना किस करण्याची त्यांची पद्धत होती आणि मला पुर्वीप्रमाणे हात हातात घेऊन हाताला किस करत. एकदा डायनाने त्या याविषयी टोकले आणि म्हणाली जेन पण तुझी तिसरी बहीण आहे तेव्हा तू तिच्याबरोबर आमच्या सारखे वागायला हवे. मी गोंधळून गेले, ते किस घेण्यासाठी वाकले आणि किस केल्यावर माझ्याकडे रोखून पहात होते. मला वाटते माझी प्रतिक्रिया आजमावून पाहत असावेत. मी लाजले नाही पण मला थोडे अवघडल्यासारखे झाले. असे वाटले की त्यांनी नात्यावर शिक्कामोर्तब केले असावे. त्यानंतर या प्रथेमध्ये खंड पडला नाही. मी शांतपणे रिवाज म्हणून स्वीकारले पण सेंट जॉन यांना त्या रिवाजाची काही विशिष्ट भूल पडली होती की काय हे सांगणे अवघड होते.

एक गोष्ट माझ्या लक्षात आली, जेव्हढे म्हणून मी त्यांना संतुष्ट करण्याचा प्रयत्न करेन, त्यासाठी रोजच्या रोज मला मुळ स्वभावाचा त्याग करावा लागेल. माझ्या आवडीचे अभ्यासाचे विषय सोडून देऊन मला त्यांना योग्य वाटणाऱ्या

a

विषयांचा अभ्यास करावा लागेल, माझी अभिरुची बदलून ज्यात मला रुची नाही अशा गोष्टी मला आवडून घ्याव्या लागतील. त्यांना मला अशा गोष्टींमध्ये पारंगत करायचे होते की कितीही प्रयत्न केले तरी मला तिथवर पोहोचणे शक्य नव्हते: त्या साठी प्रत्येक क्षणी सजग राहून मला प्रयत्नांची पराकाष्ठा करायला लागणार होती. माझे ओबडधोबड रुप त्यांना, त्यांनी प्रमाणीत केलेल्या प्रमाणबद्ध साच्यात बसवायचे होते. हे म्हणजे, माझे हिरवे डोळे त्यांच्या निळया डोळयासारखे करणे किंवा माझ्या स्वच्छंदी हसरा चेहरा त्यांच्या चेहऱ्यासारखा, गंभीर तेजाने झळाळून टाकण्या इतकी अशक्य गोष्ट होती.

माझा आनंद रोखून धरण्यासाठी ही एकच गोष्ट कारणीभूत नव्हती, अजूनही काही गोष्टी होत्या ज्या, माझे अंतःकरण दिनरात कुडतडत होत्या, माझा आनंद ओरबाडून घेऊन, मला दु:खी करण्याचा त्यांनी जणू चंगच बांधला होता.

आपल्याला वाटेल की या सर्व धामधुमीत मी मि. रोचेस्टरना विसरून तर गेले नाही ना? नाही, क्षणभर नाही. त्यांची मुर्ती माझ्या मनात कायमची कोरली गेली होती: ती कधीच पुसली जाणे शक्य नव्हते. त्यांचा विचार, त्यांची काळजी दिवसरात्र, मॉर्टनच्या माझ्या कॉटेज प्रमाणेच मूर हाऊस मध्येही माझी पाठ सोडत नव्हती.

मि. ब्रिग्ज यांच्याशी झालेल्या माझ्या पत्रव्यवहारादरम्यान, मृत्युपत्राच्या निमित्ताने, मी त्यांना मिस्टर रोचेस्टरचे सध्याचे निवासस्थान आणि त्यांच्या प्रकृतीची माहिती आहे का,असे विचारले होते. परंतु, सेंट-जॉनच्या म्हणण्याप्रमाणे, त्यांना काहीही माहित नव्हते. म्हणून मी मिसेस फेअरफॅक्सना, पत्र लिहून तिकडची हालहवाल कळविण्याची विनंती केली. त्यांचे उत्तर लगेच येईल अशी मला आशा होती. पण दोन महिने होऊन गेले तरीही उत्तर आले नव्हते, म्हणून मी जास्तच चिंतेत होते. कदाचित पत्र वाटेत हरवले असल्यास आणखी एक पत्र पाठवून पाहिले पण

a

त्याचीही गत पहिल्या पत्रासारखी झाली. माझी आशा पूर्णपणे संपुष्टात आली आणि मी खरोखर दुःखी झाले.

माझा आवडत्या वसंत ऋतूची सुरुवात झाली होती, पण मी आनंदी नव्हते. डायना मला खुश करण्यासाठी निरनिराळ्या क्लुप्त्या काढत होती. त्यातीलच एक, तिने समुद्रस्नानाची टूम काढली. पण सेंट जॉननी लगेच आक्षेप घेतला: मला असे करण्याची अजिबात गरज नाही असे त्यांनी सांगितले, उलट रिकामी मन, सैतानाने घर या उक्तीप्रमाणे मला जास्त काम करण्याची गरज आहे, त्यासाठी त्यांनी माझा हिंदुस्थानीचा अभ्यास वाढवण्यावर भर दिला. त्यांच्या वाढत्या मागणीला मी प्रतिकार करू शकले नाही.

एक दिवशी मात्र कहरच झाला. एक पत्र आले आहे असे हन्नाने सांगितले. मिसेस फेअरफँक्सचे असावे या आशेने मी ताबडतोब खाली गेले आणि पाहते तर काय, मि. ब्रिग्ज यांचे एक व्यावसायिक पत्र दिसले. माझी घोर निराशा झाली, डोळ्यात पाणी उभे राहिले, तरी मी अभ्यासाला सुरुवात केली: हिंदुस्थानी लिपीच्या वाटोळ्या अक्षरांची आणि तेथील वनस्पतिसृष्टीचा अभ्यास सुरू केला.

सेंट जॉननी मला वाचनासाठी बोलावले पण मला हुंदका आवरेना अगदी मुसमुसून रडू लागले. अभ्यासिकेत आम्ही दोघेच होतो: डायनाची पियानो प्रॅक्टिस सुरू होती, मेरी बागकाम करत होती. सुंदर दिवस होता, आल्हाददायक हवा होती, वातावरण प्रसन्न होते, मी मात्र दु:खी होते. माझ्या सहकाऱ्याला या गोष्टीचे आश्चर्य वाटले नाही आणि त्यांनी कारणही विचारले नाही, फक्त मला सांगितले: "जेन, तू शांत होईपर्यंत आपण काही मिनिटे थांबू."

मी स्वतःला सावरत असतानाच ते एखाद्या डॉक्टरांसारखे ते माझे निरीक्षण करत नेमके कारण जाणून घ्यायचा प्रयत्न करत होते. मी डोळे पुसले, आणि परत

अभ्यासाकडे वळले. सेंट जॉननी त्यांचे पुस्तक बंद केले आणि माझे पण पुस्तक बंद करायला लावले आणि म्हणाले, “जेन तू माझ्याबरोबर फिरायला येणार आहेस.”

“मी मेरी आणि डायनाला पण हाक मारते.”

“नाही, मला फक्त तुझ्याबरोबर फिरायला जायचे आहे. तू तयार होऊन मार्श-ग्लेनच्या रस्त्याने चालायला लाग, मी लगेच तुला रस्त्यात गाठतो.”

मला आजवर समजत नव्हते की नि:पक्षपाती आणि दृढनिश्चयी व्यक्ती माझ्या समोर विरोधात उभ्या राहिल्या तर नेमका कोणता पवित्रा घ्यायला हवा? शक्यतो मी बचावात्मक धोरण स्विकारून आज्ञा पालन करत असे पण अगदी टोकाची परिस्थिती आलीच तर माझी बंडखोर वृत्ती सर्व काही झुगारून देऊन लढायला प्रवृत्त होई. सध्याच्या प्रसंगात मला निमुटपणे सहन करण्यावाचून दुसरा पर्याय नव्हता. म्हणून मी सेंट-जॉनच्या आज्ञेचे पालन केले आणि दहा मिनिटांनी आम्ही व्हॅलीच्या रस्त्याने एकत्र चाललो होतो.

पश्चिमेकडून शीतल वारा वाहत होता, रानफुलांचा मंद सुगंध वातावरणात दरवळत होता. आकाश निरभ्र होते. डोंगर दौऱ्यातून वाहणारे पाण्याचे प्रवाह सुर्यकिरणांत चमचम करत होते. आजुबाजुच्या हिरवळीवर पांढरी, पिवळी रानफुले वाऱ्याच्या झुळकेसोबत डोलत होती. आम्ही दरीच्या मध्यावर असल्याने चारही बाजूंनी डोंगर रांगानी वेढलेले होतो. जवळ एक छोटा प्रवाह खळाळून वाहत होता. एका खडकावर बसण्याची सेंट जॉननी विनंती केली. मी खाली बसले; सेंट-जॉन माझ्या जवळ उभे राहिले. त्यांची नजर आजुबाजुच्या निसर्गात हरवून गेली होती. अर्धवट मिटलेल्या नजरेने ते सर्व मनामध्ये साठवून घेत असावेत असे वाटले.

“होय, मी तुम्हाला पुन्हा भेटेन,” ते मोठ्याने म्हणाले, “ जेव्हा मी शुभ्र गंगेच्या काठावर झोपलेला असेन तेव्हा स्वप्नात तुम्हाला मी भेटेन, आणखी

a

कधीतरी अशाच एकाकी क्षणी---एखाद्या निर्जन स्थळी अर्ध्या रात्री माझी झोप मोडेल आणि तुम्ही मला भेटाल एखाद्या निराळ्याच नदीच्या काठावर.”

आपल्या मायभूमीचे प्रेम आणि उच्च ध्येयाप्रती बांधिलकी यांच्या द्वंद्वात ध्येयाचा विजय होणे, हे त्यांच्या बाबतीत स्वाभाविक होते. आम्ही निस्तब्ध झालो, अर्ध्या तासाने ते म्हणाले: “जेन, मी सहा आठवड्यांनी निघत आहे; 20 जून रोजी निघालेल्या बोटीवर मी माझी जागा सुरक्षित केली आहे.”

“देव तुमचे रक्षण करेल,” मी उत्तर दिले, कारण तुम्ही देवासाठी काम करत आहात.”

“होय,” ते पुढे म्हणाले, “हाच माझा गौरव आणि माझा आनंदही आहे. मी एका अतुलनीय देवाचा सेवक आहे: देवाच्या आज्ञेनुसार, त्याने दाखवून दिलेल्या वाटेवर चालणारा एक यात्रेकरू. तोच माझे सर्वस्व आहे आणि मी सर्वस्वी त्याचा आहे. मला आश्र्चर्य वाटते असे असताना इतर लोक देवाच्या कार्यासाठी का बरे एकत्र होत नाहीत?”

“प्रत्येकाकडे तुमच्या सारखी उर्जा नसते आणि दुर्बलांना बलवानांसोबत चालण्याची इच्छा असणे हे वेडेपणाचे ठरेल.”

“मी दुर्बलांबद्दल बोलत नाही, मी त्यांच्याबद्दल विचारही करत नाही; मी त्यांच्याबद्दल बोलत आहे जे या कार्यास पात्र आहेत आणि ते पूर्ण करण्यास सक्षम आहेत.”

“ही संख्या कमी आहेत आणि शोधणे कठीण आहे.”

“तू खरे बोलत आहेस; परंतु जेव्हा आपल्याला तसे लोक सापडतील, तेव्हा आपण त्यांना उत्तेजित केले पाहिजे, त्यांना सर्वस्वाचा त्याग करून सहजपणे देवाच्या हाती स्वत:ला सोपविण्यासाठी प्रयत्न करण्यास, प्रोत्साहित केले पाहिजे.”

a

“जर त्यांचा जन्म या कामासाठी झाला असेल तर त्यांचे अंतःकरण त्यांना तसे सांगेल,” मी पटकन बोलून गेले

मला असे वाटले की माझ्या आजूबाजूला इंद्रजाल पसरत आहे आणि एखादा परवलीचा घातक शब्द ऐकू येईल आणि सर्व काही बदलून जाईल अशी मला भीती वाटली.

“आणि तुझं मन तुला काय सांगतं?” सेंट-जॉनला विचारले.

“माझे हृदय मुके आहे, माझे हृदय मुके आहे,” मी थरथर कापत उत्तर दिले.

“मग मला त्यासाठी बोलायलाच हवं,”

त्याच खोल आणि अथक आवाजात पुढे म्हणाले. “जेन, माझ्याबरोबर भारतात ये, माझी पत्नी म्हणून ये, माझ्या श्रमांची सोबती म्हणून चल.”

मला आजुबाजुचे जग गरगर फिरत असल्याचा भास झाला. कोणी तरी मला मदतीसाठी साद घालत होते, पण मी काही प्रेषित नव्हते, मी त्या हाकेला धावून जाऊ शकत नव्हते.

“अरे! सेंट जॉन, मी ओरडले, माझ्यावर दया करा!”

मी अशा व्यक्तीला विनवणी केली ज्याला फक्त आपले कर्तव्य समजत होते: दया किंवा पश्चात्ताप त्याला माहित नव्हता, ते पुढे म्हणाले:

“देव आणि निसर्गाने तुला मिशनरीची पत्नी होण्यासाठी निर्माण केले आहे; तुझी मानसिक ताकद ही त्याची देणगी आहे: तुझे जीवन श्रम करण्यासाठीच निर्मिले आहे, प्रेमासाठी नाही. तुझ्यासाठी मिशनरीची पत्नीच असणे योग्य आहे. तू माझी होशील: मी तुझ्या माझ्या आनंदासाठी नाही तर माझ्या सार्वभौम सेवेसाठी तुझ्यावर माझा हक्क सांगत आहे.”

“मी त्यास पात्र नाही; ते माझे भागध्येय नाही,” मी उत्तर दिले.

सेंट जॉननी सर्व शांतपणे ऐकून घेतले, माझे आक्षेप त्यांनी पुर्णपणे विचारात घेतले असणार: आक्षेपांना उत्तर देण्यासाठी, विरोध मोडून काढण्यासाठी त्यांची दीर्घकाळ लढण्याची तयारी होती. त्यासाठी त्यांनी संयमाचा शस्त्र म्हणून वापर करण्याचे ठरविले होते.

"जेन," ते पुढे म्हणाले, "नम्रता हा सर्व ख्रिश्चन गुणांचा आधार आहे त्यानुसार तू या कामासाठी लायक नाही असे स्वतः म्हणणे ठिक आहे; पण मग कोण पात्र आहे? यापुर्वी देवाने ज्यांची निवड केली ते सुद्धा स्वतःला त्यासाठी पात्र समजत नव्हते. देव सर्वशक्तिमान आहे. त्याने एक महान कार्य पूर्ण करण्यासाठी एक कमकुवत साधन निवडले असू शकते पण त्या निवडी मागे परमेश्वराची अमर्याद शक्ती आहे, ती उरलीसुरली कमी मी भरून काढेन. जेन माझ्यासारखा विचार कर. माझ्यासारखा विश्र्वास ठेव: परमेश्वर, युगानुयुगे आधार देत आला आहे; तो तुमच्या मानवी दुर्बलतेचे भार सहज सक्षम उचलून धरेल; याबद्दल शंका घेऊ नको."

"मला मिशनरींचे जीवन समजत नाही, मी पुढे म्हणाले, मी त्यांच्या कार्याचा कधीही अभ्यास केलेला नाही."

"ठीक आहे, मी नम्र आहे, तुला आवश्यक ती सर्व मदत देऊ शकतो. सुरवातीला मी तुझ्या प्रत्येक कामात तुझ्याबरोबर असेन; पण मला माहित आहे की तू हे करू शकतोस आणि लवकरच तू माझ्याइतकी मजबूत आणि सक्षम होशील आणि तुला माझ्या मदतीची गरज भासणार नाही."

"पण हे काम पूर्ण करण्यासाठी लागणारी शक्ती मला कुठे मिळेल? मला ती माझ्यात जाणवत नाही. आणि तुमच्याकडून मला मिळेल असे मला वाटत नाही. मला सतत भीती वाटत रहाते की मी तुमच्या अपेक्षांवर खरी उतरणार नाही."

“मी दहा महिने तुला काम करताना, संघर्ष करताना पाहिले आहे. खेडेगावातील शिक्षिकेने काम तू त्याबाबत अनभिज्ञ असतांनाच लिलया पेललेस. तुला मिळालेल्या संपत्ती, अत्यंत नि:स्पृहपणे चौघांना सारखी वाटून टाकलीस, यावरून तुझा त्याग, तुझे दातृत्व लक्षात येते. जेन, तू विनम्र, सक्रिय, विश्वासू, स्थिर आणि धैर्यवान, अतिशय सौम्य आणि वीर वृत्तीची आहेस: माझी इच्छा पूर्ण करण्यासाठी, तू तुला आवडणारा अभ्यास सोडून दिलास आणि मला आवडणारा अभ्यास तू हाती घेतलास, तेव्हा तू ज्या अथक जिद्दीने चिकाटी ठेवलीस, अडचणींविरुद्ध तुझी अविचल ऊर्जा पाहिली आहे, तेव्हा मला समजले की तुझ्यात, माझ्यात असलेले सर्व गुण आहेत जे मी शोधत आहे.”

मला गुदमरल्यासारखे झाले. मी डोळे मिटले असले तरी, सेंट-जॉनने बोललेल्या शेवटच्या शब्दांनी माझा मार्ग स्पष्ट केला होता जो सुरुवातीला दुर्गम वाटला होता; जे काम मला खूप अस्पष्ट आणि गोंधळात टाकणारे वाटत होते ते जितके जास्त बोलले तितके माझे काम सोपे होत गेले. ते माझ्या प्रतिसादाची वाट पाहत होते; मी त्यांना पाऊण तास विचार करण्यासाठी वेळ मागितला. आणि अगदी आनंदाने त्यांनी दिला. दूर हिरवळीवर जाऊन ते वाट पाहू लागले.

“ते मला जे सांगतील ते मी करू शकते,” मी स्वतःला म्हणाले, “पण केंव्हा? हिंदुस्थानातील प्रतिकूल उष्ण वातावरणात जगले वाचले तर. माझा तिकडे जास्त काळ टिकाव लागणार नाही याची मला खात्री आहे पण यामुळे त्यांना फारसा फरक पडणार नाही. जेव्हा माझ्या मृत्यूची वेळ येईल तेव्हा ते मला शांत चेहऱ्याने देवाकडे परत देतील ज्याने, मला त्यांना दिले होते. मला हे सर्व अगदी स्पष्ट दिसत आहे. त्यासाठी मला इंग्लंड, माझी प्रिय मायभूमी सोडावी लागणार होती, जी रोचेस्टरांच्याशिवाय मला भयाण आणि भकास वाटत होती. ते भेटणे अशक्य आहे, हे माहीत असूनही रोजरोज त्यांची वाट पाहणे निरर्थक आणि वेडेपणाचे होते. तो

विचार सोडून दुसऱ्या कुणाचा विचार करणे, सेंट जॉनच्या म्हणण्यानुसार शहाणपणाचे होते. त्यांनी मला सुचवलेले काम देवाने दिलेले आणि मनुष्य स्वीकारू शकेल असे सर्वात गौरवशाली काम नाही का? मला वाटतं आपण हो म्हणावं;" आणि तरीही मी थरथर कापत होते. "जर मी सेंट जॉन बरोबर हिंदुस्थानात गेले तर माझा अर्धा जीव अगोदरच नष्ट झाला असता. भारतात अकाली मृत्यूला सामोरे जावे लागेल ही शक्यता नाकारण्याजोगी नक्कीच नव्हती. म्हणजे माझे या पुढले आयुष्य, इंग्लंड सोडून हिंदुस्थान आणि हिंदुस्थानात एका कबरीमध्ये एव्हढे असणार होते, ते नेमके कसे असेल? सेंट जॉनना संतुष्ट करण्यासाठी जीवापाड प्रयत्न करावे लागतील. त्यांच्या अपेक्षांची पुर्तता करण्याचे ओझे सतत मला वहावे लागणार आहे; ते जे जे काही करू शकतात, ते ते मी पूर्ण करीन. जर मी त्यांच्याबरोबर गेले, त्यांनी माझ्याकडून मागितलेला त्याग मी पूर्ण करीन. मी देवापुढे वेदीवर माझे सर्वकाही ठेवेन, माझे हृदय, माझे जीवन, शेवटी संपूर्ण बलीदान. ते माझ्यावर कधीही प्रेम करणार नाहीत, परंतु ते माझे कार्य मान्य करतील. मी त्यांना अशी ऊर्जा दाखवीन जी त्यांनी अद्याप पाहिलेली नसेल. होय, मी त्यांच्या प्रमाणेच कठोर आणि विनातक्रार काम करू शकते हे दाखवून देईन."

"त्यांच्या मागणीला मला संमती देणे शक्य आहे; फक्त एका गोष्टीची मला भीती वाटते, जी मी ती स्विकारू शकत नाही: त्यांनी मला पत्नी होण्यासाठी विचारले आहे आणि त्यांच्याकडे मला देण्यासाठी, पतीचे हृदय आहे ते या खडकाप्रमाणे कठीण आहे. सैनिकाला जेव्हढे त्यांच्या शस्त्रास्त्राची जशी काळजी असते, तशीच त्यांना माझी काळजी आहे. जर मी त्यांच्याशी लग्न केले नाही तर मला हा त्रास होणार नाही. आता मला त्यांनी, या बाबतीत काय मांडणी केली हे पहावे लागेल. लग्न समारंभ, लग्न विधी, वधुसाठी प्रेमाचे प्रतीक असणारी अंगठी, माझी खात्री आहे की ते कटाक्षाने सर्व गोष्टींचे पालन करतील, पण त्यांचा आत्मा या सर्वात

असेल? त्यांनी दिलेले प्रेम हे तत्त्वानुसार केलेला त्याग आहे हे जाणून घेतल्यानंतर, मी सहन करू शकेन का? नाही: असे हौतात्म्य भयंकर असेल. मला ते सहन करायचे नाही; असे लग्न मला मानवणार नाही. मी त्यांना सांगेन की मी त्यांची त्याची पत्नी म्हणून नव्हे तर त्यांची बहीण म्हणून साथ देईन.'' माझा निर्णय झाला होता.

मी त्यांच्याकडे पाहिले: ते अजूनही तिथेच हिरवळीवर शांतपणे पडले होते, त्यांनी चेहरा माझ्याकडे वळवला; त्यांच्या भेदक डोळयांनी माझे लक्षपूर्वक परीक्षण केले; ते पटकन उठले आणि माझ्या जवळ आले.

''मी भारतात जायला तयार आहे,'' मी म्हणाले, ''जर मी स्वतंत्रपणे जाऊ शकणार असेल तरच.''

''मला नीट समजले नाही; स्पष्टपणे सांग.

''आतापर्यंत,'' मी पुढे म्हणाले, ''तुम्ही माझे आतेभाऊ आहात, मी तुमची मामे बहीण आहे; आपण असेच राहू या, कारण आपण लग्न न केलेलेच बरे होईल.''

त्यांनी मान हलवली.

''हे नाते पुरेसे नाही, तू खरी बहिण असतीस तर गोष्ट वेगळी होती: बहिण म्हणून तुला मी घेऊन गेलो असतो आणि पत्नी शोधली नसती: आपल्या नात्यावर लग्नाचे पवित्र संस्कार होणे आवश्यक आहे अन्यथा कोणतेही नाते अस्तित्वात असणार नाही. या व्यवहारी जगातील, हे अडथळे आहेत. ते दिसत नाही का, जेन? क्षणभर विचार कर, तुझी बुद्धी तुला मार्गदर्शन करेल.''

''माझ्या बुध्दी आणि भावनांचा एकमुखी कौल आहे, बहिण भावाचे नात्याने हिंदुस्थानात जाऊन सेवा करणे सर्वथा योग्य आहे.''

''आपण असे करू शकत नाही; आपण करू शकत नाही, त्यांनी थोडक्यात आणि दृढ स्वरात उत्तर दिले; हे अशक्य आहे. तू म्हणालीस की तू माझ्याबरोबर हिंदुस्थानात येशील; हे लक्षात ठेव.''

"एका अटीवर."

"होय होय. पण महत्त्वाचा मुद्दा म्हणजे इंग्लंड सोडणे, माझ्या भविष्यातील कामात मला मदत करणे, या गोष्टींसाठी तुझी तयारी आहे. तू अगोदरच कामाला सुरुवात केली आहेस: तू हाती घेतलेले काम पूर्ण करण्याचा सर्वोत्तम मार्ग जाणून घेणे आवश्यक आहे. तुझ्या आवडी-निवडी, भाव-भावना, आचार-विचार, इच्छा-आकांक्षा सर्व साधेसोपेपणाने एकत्र करून सर्व गोष्टी, एकाच ध्येयात एकत्रित करणे: ती गोष्ट म्हणजे परमेश्वराने नेमून दिलेले मिशन पूर्ण करणे; त्यासाठी तुला भावाची नाही तर पतीची गरज आहे. मलाही बहिणीची गरज नाही. कारण एक दिवस ती माझ्यापासून हिरावून घेतली जाईल. मला बायको हवी आहे; ती एकच अशी सोबती आहे जिच्यावर मी आयुष्यात नक्कीच प्रभाव टाकू शकतो आणि मरेपर्यंत तो ठेवू शकतो."

ते बोलणे ऐकून मला थरकाप भरला.

"ठीक आहे, सेंट जॉन, तुम्ही माझ्याशिवाय दुसऱ्या कोणाला तरी शोधा," मी म्हणाले, "तुम्हाला अधिक योग्य वाटेल अशा व्यक्तीची निवड करा."

"माझ्या मिशनरी म्हणून असलेल्या गरजांसाठी अनुकूल, असेच तुला म्हणायचे आहे ना? तुला पुन्हा पुन्हा सांगतो की, एक व्यक्ती म्हणून मी गरजांचा विचार करत नसून मिशनरी म्हणून विचार करत आहे."

"ठिक आहे ज्या शक्तीची, उर्जेची मिशनला गरज आहे ती मी देण्यास तयार आहे. पण मी, स्वतःला मिशनरीला अर्पण करणार नाही. ती गोष्ट मिशनच्या दृष्टीने गैरलागू आहे असे मला वाटते."

"तू असे करू शकत नाहीस आणि करू नयेस. या अर्ध्या अर्पणाने देव संतुष्ट होईल असे तुला वाटते का? हा अर्धवट नैवेद्य त्याला मान्य होईल? मी देवाच्या वतीने मागणी करत आहे. रुढी परंपरांच्या मान्यतेनुसार, मी तुला मिशनरीच्या

पत्नीपदा करिता विचारत आहे; देवासाठी विभागलेली निष्ठा स्वीकारता येणार नाही: ती संपूर्ण निष्ठा असणे आवश्यक आहे.''

''तर मग,''मी म्हणाले, मी माझे हृदय देवाला देईन; तुम्हाला त्याची गरज नाही.''

माझ्या या काहीशा टोचून बोलण्यात उपहास नक्कीच होता. मी आतापर्यंत सेंट जॉन यांना पूर्णपणे समजून शकले नव्हते. मला त्यांचा भीतीयुक्त आदर वाटत होता, कारण त्यांनी मला संभ्रमात पाडले होते. त्यांनी संत म्हणून षड्रिपू वर विजय मिळवला आहे, की अजून सर्वसामान्य व्यक्तीप्रमाणे त्यात गुंतून गेले आहेत, हे मला आतापर्यंत माहीत नव्हते. पण त्यांच्या बरोबरच्या बोलण्यातून मला अंदाज येऊ लागला. मी त्यांच्या स्वभावाचे विश्लेषण करुन लागले. त्यांच्या स्वभावातील विसंगती लक्षात येऊ लागल्या, माझ्या समोरच्या हिरवळीवर बसलेले, सेंट जॉन माझ्यासारखेच दुबळे होते. त्यांनी घेतलेले मनोनिग्रहचे आणि कर्तव्यदक्षतेचे ढोंग आता गळून पडले होते. त्यामुळे त्यांच्यामधील अपूर्णता मला समजली आणि माझे मनोधैर्य उंचावले. ते आणि मी एका समान पातळीवर असून मी त्यांच्याबरोबर वादविवाद घालू शकते, अगदीच वेळ आली तर प्रतिकार करू शकते हे सत्य मला नव्याने समजले.

माझे बोलणे ऐकून ते शांत राहिले; मी त्यांच्याकडे पाहण्याचे धाडस केले: ते माझ्याकडे आश्चर्याने पाहत होते. माझ्या उपहासात्मक बोलण्याचा नेमका अर्थ काय असावा असा त्यांना प्रश्न पडल्याचे वाटत होते.

''ही एक गंभीर गोष्ट आहे,'' थोड्यावेळाने सेंट जॉन म्हणाले, ''तू देवाला हृदय देण्याची गोष्ट गंभीरपणे म्हणाली आहेस याची मला पूर्ण कल्पना आहे: तेच तर मला हवे आहे. एकदा तुझे हृदय मानवी प्रेमातून काढून घेऊन प्रभूंच्या सेवेसाठी रुजू करणे आणि पृथ्वीवर देवाचे राज्य येण, हे तुझ्या सर्व गंभीर प्रयत्नांचे ध्येय असेल,

तुझ्या आनंदाचे उद्दिष्ट असेल. यासाठी जे काही आवश्यक असेल ते करण्याची तुझी तयारी असायला हवी. जर आपल्या दोघांच्या शरीर आणि आत्म्याचे मिलन झाले तर दोघांच्या एकत्रितपणे काम केल्याने, धर्म कार्याचा अधिक जोमाने विस्तार होईल.

विवाह संस्था ही एकमेव अशी संस्था आहे की जी माणसाचे नशीब आणि त्याने योजलेले कार्य यांची सुसंगती साधून परस्परांना पूरक बनवते. आपला कल, लहान सहान अडचणी, हळव्या भावना या गोष्टीना विशेष महत्त्व न देता, आपली वैयक्तिक प्रतिबद्धता, पद, कुटुंब, सामर्थ्य या विषयीच्या सर्व शंका मनातून काढून टाकून तू हा विवाहाचा प्रस्ताव लौकरात लौकर मान्य करावयास."

"मी मान्य करावा?" माझ्या मनात प्रश्नचिन्ह उभे होते. मी त्यांची शारीर वैशिष्ट्ये तपासून पाहिली, त्यांच्यामध्ये सुंदर सुसंगती दिसून येत होती, पण त्या सोबत तीव्र कठोरपणा पण लपून राहत नव्हता: त्यांच्या कपाळावरच्या आज्ञा वाचता येत नव्हत्या; त्यांचे डोळे, चमकदार, खोल, शोधक होते पण मृदू नव्हते. शरीरयष्टी, उंच आणि आकर्षक होती: पण त्यांच्या पत्नीच्या जागी मी स्वतः ठेऊन पाहिले, ती कल्पना मला अजिबात भावली नाही: मी त्यांची मदतनीस बनू शकते, सहकारी बनू शकते, महासागर पार करून पुर्वेकडील तप्त उन्हात, वाळवंटात त्यांच्यासोबत काम करू शकते; त्यांच्या असीम धैर्याचे, कठोर धर्मनिष्ठेचे, पराक्रमाचे कौतुक आणि त्यांच्या बरोबर स्पर्धा करू शकते;

शांतपणे त्यांचे वर्चस्व मान्य करून; त्यांच्या अजिंक्य महत्वाकांक्षेचे कौतुक करू शकते; त्यांच्या मध्ये सामावलेल्या खऱ्या ख्रिश्चन माणसाला त्यांच्या पासून वेगळे काढून एकाची मनापासून प्रशंसा आणि दुसऱ्याला मुक्तपणे क्षमा करणे पण मला शक्य होईल. यामुळे मला प्रचंड त्रास होईल: माझे शरीर एका जोखडाखाली जखडून गेले असेल--- पण, पण माझे हृदय आणि मन मुक्त असेल. माझा आत्मा स्वतंत्र असेल; आणि, माझ्या एकाकी क्षणी मी माझ्या नैसर्गिक भावनांशी संवाद

साधू शकेन, माझ्या मनाचा विरंगुळा फक्त माझा असेल, तिथे कोणाला प्रवेश मिळणार नाही: माझ्या मनात अंकुरित झालेले कोवळ्या नाजुक भावबंध, त्यांच्या कठोर तपश्चर्येच्या तेजाने करपवून टाकायला अथवा त्यांच्या विजयी पावलांच्या पायदळी तुडवण्याला मज्जाव असेल. पण त्यांची पत्नी म्हणून - त्यांच्याकडून सतत प्रतिरोध होईल, प्रत्येक गोष्टींची सतत तपासणी होईल - माझ्या स्वभावाची आग सतत थंड कशी राहील याची काळजी घेतली जाईल, मोकळेपणाने रडणे सुध्दा अशक्य असेल, मनातल्या मनात धुमसत असणाऱ्या अग्नीत जळून नष्ट होणे हेच अंतीम सत्य असेल---हे अशक्य आहे.

“सेंट जॉन!” या सगळ्या गोष्टींचा सारासार विचार करून मी त्यांना हाक मारली.

“काय बरं? त्यांनी थंडपणे विचारले.

“मी पुन्हा एकदा सांगते, मी तुमच्यासोबत येण्यास तयार आहे पण तुमची पत्नी म्हणून नाही. मी तुमच्याशी लग्न करून तुमची अर्धांगिनी होऊ शकत नाही.”

“तुला माझा एक भाग व्हावे लागेल,” त्यांनी ठामपणे उत्तर दिले; याशिवाय बाकीचे अशक्य आहे. तीस वर्षांचा मी, एकोणीस वर्षांची तू, जर माझी बायको नसेल, तर मी तुला माझ्याबरोबर भारतात कशी काय घेऊन जाऊ शकतो? जर आपण विवाहीत नसू तर आपण नेहमी एकत्र कसे राहू शकू? आपल्याला एखाद्या निर्जन ठिकाणी, वन्य जमातींसोबत कसे काय राहता येईल?”

“हे सहज शक्य आहे,” मी थोडक्यात उत्तर दिले; मी तुमच्या सख्ख्या

बहीणीप्रमाणे किंवा तुमच्यासारखी स्वतंत्र मिशनरी स्त्री म्हणून राहण्यासाठी तयार आहे.”

“तू माझी सख्खी बहिण नाही आहेस आणि तशी आहेस म्हणून मी तुझी ओळख करून देऊ शकत नाही: असा प्रयत्न करणे म्हणजे आपल्या दोघांवर घातक

संशय बळावला जाईल. आणि शेवटी तुझा मेंदू जरी पुरुषाप्रमाणे प्रबळ असला तरी, तुझे स्त्री-हृदय दुबळे आहे, आणि - असे होणार नाही.''

"हे शक्य होईल,'' मी काही तिरस्काराने म्हणाले, "पूर्णपणे शक्य आहे. माझ्याकडे स्त्रीचे हृदय आहे, हे खरे आहे, परंतु तुमच्या संबंधात नाही. माझ्याकडे तुमच्यासाठी फक्त मित्रांचा बंधुभाव, स्पष्टवक्तेपणा, सैनिकाचे आज्ञापालन, निष्ठा, स्पष्टपणा आहे, तुम्ही त्यांचा स्विकार करू शकता; नवशिक्या माणसाचा आदरभाव आणि पाद्री म्हणून शरणागती एव्हढेच मी देऊ शकते; घाबरून जाऊ नका, यापेक्षा आणखी काहीही नाही.''

स्वतःशीच बोलत असल्यासारखे ते म्हणाले, "मला नेमके हेच हवे आहे. अनेक अडथळे आहेत, ते पार करावे लागतील... जेन, माझ्याशी लग्न केल्याचा तुला पश्चाताप होणार नाही, याची खात्री बाळग. आपण लग्न केलेच पाहिजे; मी तुला पुन्हा सांगतो, हाच एकमेव मार्ग आहे आणि आपल्या लग्नाला नक्कीच तुझ्या नजरेतही हे मिलन योग्य वाटण्याएव्हढे पुरेसे प्रेम मिळेल.''

मी उभी राहिले आणि त्यांच्या समोर जाऊन म्हणाले, "तुम्ही मला देऊ केलेल्या या खोट्या भावनेचा मी तिरस्कार करते; होय, सेंट-जॉन, आणि जे प्रेम, तुम्ही मला अर्पण करत आहात ते माझ्या लेखी उपहासाचा विषय आहे, असे प्रेम तुच्छ मानते.''

त्यांनी माझ्याकडे स्थिरपणे पाहिले, त्यांनी ओठ करकचून आवळून धरले होते; ते आश्चर्यचकित झाले होते की चिडले होते, हे सांगणे कठीण आहे, कारण त्यांना स्वतःवर पूर्णपणे नियंत्रण कसे ठेवायचे हे माहित होते.

ते मला म्हणाले, "तुझ्या तोंडातून हे शब्द ऐकू येतील अशी मला अपेक्षा नव्हती; मला असे वाटत नाही की मी अपमानास्पद असे काही केले किंवा बोललो आहे.''

a

मी त्यांच्या सौम्यतेने प्रभावित झाले आणि त्यांच्या उदात्त आणि शांत स्वभावाने मला जिंकले.

“मला माफ करा, सेंट-जॉन,” मी म्हणाले; “परंतु मी असे बोलण्यास उद्युक्त झाले हा तर तुमचा दोष आहे: तुम्ही असा विषय हाती घेतला आहे ज्यावर आपली मते अगदी भिन्न आहेत आणि ज्यावर आपण कधीही चर्चा करू नये. प्रेम हा शब्द आपल्यातील वादाचे कारण आहे; हे जर सत्यात उतरले तर आपण काय करणार आहोत? त्याला कसे सामोरे जाणार आहोत? मी आपल्याला विनंती करते, झालेला वादविवाद विसरून जा आणि आपल्या लग्नाचा विचार सोडून द्या”

“नाही,” ते म्हणाले; “हा एक प्रदीर्घ प्रकल्प आहे, जो मला माझे महान ध्येय साध्य करण्यात मदत करू शकतो; पण मला आता तुझी मनधरणी करायची नाही. उद्या मी केंब्रिजला निघणार आहे. माझे अनेक मित्र आहेत ज्यांना मी निरोप देऊ इच्छितो. मी पंधरवडा दूर राहीन. या काळात तू माझ्या मागणी बद्दल विचार करशील आणि हे विसरू नको की तू ती नाकारलीस तर मला नाही तर देवाच्या मागणीला तू नकार देत आहेस. तुझी उत्तम कारकीर्द घडवण्यासाठी तो माझा वापर करत आहे; जर तुला माझी पत्नी व्हायचे असेल तर तू ते करू शकतेस; अन्यथा तू आयुष्यभर स्वार्थाने आंधळ्या झालेल्या जगात, उजेडाच्या प्रतिक्षेत चाचपडत राहशील. अशा परिस्थितीत, तुला खूप भीती वाटली पाहिजे की, ज्यांनी देवाच्या वचनांचे पालन करण्यास नकार दिला आहे, आणि जे त्याच्यावर विश्वास ठेवत नाहीत त्यांच्यापेक्षा वाईट लोकांमध्ये तुमचा समावेश देवाने कडून केला जाऊ शकतो!”

त्यांनी बोलणे थांबवले आणि आजूबाजूच्या निसर्गाकडे नजर टाकली. त्यांनी आपल्या भावना मनात खोलवर दाबून ठेवल्या होत्या. जेव्हा आम्ही घरी परतलो तेव्हा त्यांच्या शांततेने मला समजले की त्यांना माझ्याकडून संपूर्ण सहमतीची अपेक्षा असताना अनपेक्षितपणे प्रतिकार केला गेला, मी त्यांच्या चेहऱ्यावर एक कठोर आणि निरंकुश निराशा वाचली: एका शब्दात सांगायचे तर

त्यांना मला आज्ञाधारक बनवायला आवडले असते पण मी अवज्ञा केली: ते केवळ प्रामाणिक ख्रिश्चन होते ज्यांनी माझे आक्षेपार्ह वर्तन इतक्या संयमाने सहन केले आणि माझ्या चिंतनासाठी आणि पश्चात्तापासाठी इतका वेळ दिला.

त्या संध्याकाळी, त्यांच्या बहिणींचे चुंबन घेतल्यानंतर, त्यांनी मला हॅंडशेक देखील दिला नाही. ते शांतपणे खोलीतून निघून गेले. प्रेम नसतानाही मला त्याच्याबद्दल खूप मित्रत्वाची भावना होती, मला त्यांच्या अशाप्रकारे डावलल्यामुळे दु:ख झालं होतं, त्यामुळे माझे डोळे भरून आले.

"मी पाहते आहे," डायना मला म्हणाली, "तुम्ही फिरायला गेला तुझा आणि सेंट-जॉनमध्ये वाद झाला; पण त्याच्या मागे जा: तो बागेत चालत आहे; तुमचा सहज समेट होईल."

मी आनंदाने बागेत गेले.

"शुभ संध्याकाळ, सेंट-जॉन," मी म्हणाले.

"शुभ संध्याकाळ, जेन," त्यांनी शांतपणे उत्तर दिले.

"मला हँडशेक द्या," मी हात पुढे केला.

तेव्हा माझ्या बोटांवर अगदी हलका, थंड दाब जाणवत होता! दिवसभरात जे काही घडले त्यामुळे ते प्रचंड नाराज होते. माझे सौहार्द त्यांना उबदार करू शकले नाही किंवा माझे अश्रू त्यांना हलवू शकले नाहीत. म्हणून, त्यांच्याबरोबर यापुढे सलोखा, हास्य विनोद, चर्चा कधीही होणार नव्हता; तथापि ते संयमशील आणि सौम्य ख्रिश्चन होते.

जेव्हा मी त्यांना विचारले की त्यांनी मला माफ केले आहे का, तेव्हा त्यांनी उत्तर दिले की त्यांना अपमानाची आठवण ठेवण्याची सवय नाही, आणि ते नाराज झाला नसल्यामुळे त्यांना क्षमा करण्यासारखे काहीच कारण नाही.

हे उत्तर दिल्यानंतर ते मला शांतपणे सोडून निघून गेले; त्यापेक्षा त्यांनी मला जमिनीवर फेकले असते हे मी पसंत केले असते.

# प्रकरण 35

सेंट जॉन, सांगितल्याप्रमाणे दुसऱ्या दिवशी केंब्रिजला निघाले नाहीत; ते एक आठवडाभर राहिले आणि या काळात त्यांनी मला हे जाणवून दिले की एक चांगला पण कठोर माणूस त्याला दुखावणाऱ्या व्यक्तीला किती कठोर शिक्षा करु शकतो. उघड शत्रुत्वाचे एकही कृत्य न करता, निंदेचा एकही शब्द न बोलता त्यांनी मला दोष दिल्याचे दाखविण्याचा प्रयत्न केला.

असेही नाही सेंट जॉन, मनात खऱ्या ख्रिश्चन मिशनरीला त्याज्य अशी, द्वेषाची, सूडाची भावना माझ्याकरिता बाळगून होते किंवा त्यांनी माझ्या केसालाही इजा केली नाही, जे त्यांना सहज शक्य होते. त्यांचा स्वभाव आणि त्यांची तत्वे उच्च दर्जाची होती, अश्या रितीने सूडाचे समाधान मिळवण्यास क्षुद्र बुध्दी असणारी निश्चितच नव्हती. मी त्यांचा लग्नाचा प्रस्ताव धुडकावून लावून त्यांच्या प्रेमाचा मी तिरस्कार करते, हे सांगितल्यावर, त्यांनी मला माफ केले आहे, अशी ग्वाही दिली होती, परंतु ती गोष्ट ते विसरले नव्हते आणि जोवर ते किंवा मी जिवंत असेन, तोवर ते ही गोष्ट, कधीच विसरणार नव्हते. मला पाहताना, माझ्याशी बोलताना ते त्यांना दिसत असावेत आणि ऐकू येत असावेत, हे मला त्यांच्या प्रतिसादा वरून जाणवत असे.

या दरम्यान त्यांनी माझ्याशी बोलणे टाळले नाही, उलट रोज सकाळी नेहमीप्रमाणे ते मला त्यांच्या टेबलाजवळ बोलवत. मला त्यांची दोन रूपे पाहायला मिळाली, एक स्खलनशील सामान्य माणूस आणि दुसरा खराखुरा ख्रिश्चन मिशनरी, त्यापैकी पहिला माझ्याशी संवादासाधून आपले श्रेष्ठत्व सिद्ध करण्याचा, मला

a

खिजवण्याचा, माझ्यात अपराधगंड रुजविण्याचा आणि शक्य झाल्यास, त्यांचा नाकारलेल्या प्रस्ताव परत एकदा मला स्विकारण्यास भाग पाडायचा प्रयत्न असावा. एक गोष्ट इथे नमूद कराविशी वाटते त्यांच्यामधील खऱ्या ख्रिश्चन मिशनरी, ह्या उपद्व्यापाबद्दल अनभिज्ञ होता. मला त्यांनां पाहून हाडामांसाचा मनुष्यप्राणी असण्यापेक्षा एखादा संगमरवरी पुतळा असल्यासारखे वाटत असे.

हे सर्व माझ्यासाठी वेदनादायक आणि यातनामय होते; असे वाटायला लागले की ह्या माणसाशी लग्न केल्यास मी आतल्या आत घुसमटून मरून जाईन, रक्ताचा एकही थेंब न सांगता, हा निष्कलंक, विवेकी माणूस, माझ्या मरणाचे कारण बनेल. मला ते निर्दयी वाटले, माझ्या विरोधाचा त्यांना त्रास जाणवत नव्हता ना माझ्या अश्रुंनी त्यांच्या दगडी हृदयावर काही परिणाम होत होता. मात्र या काळात त्यांचे त्यांच्या बहिणींनी वागणे लक्षात येण्याजोगे प्रेमळ बनले होते. कदाचित माझे मन बदलण्यासाठी त्यांचे हे प्रेमळ रूप मला जाणवून देईल की मी नकार देऊन नक्की काय गमावले आहे, असा उद्देश असावा. तरीपण मला खात्री आहे की त्यांनी हे द्वेषभावने केले नसावे, त्यांच्या पुढील योजनेमध्ये येणाऱ्या महत्वाच्या अडचणीतून मार्ग काढण्यासाठी त्यांचा प्रयत्न असावा.

केंब्रिजला निघण्याच्या आदल्या दिवशी संध्याकाळी मी त्यांला बागेत एकटेच फिरताना पाहिले; त्यांना पाहून मला आठवले, मी सर्वस्वी अनोळखी असताना त्यांनी माझा जीव वाचवला होता. कितीही झाले तरी ते माझे नात्याने आतेभाऊ होते, म्हणून मी, त्यांचा स्नेह परत मिळविण्याचा शेवटचा प्रयत्न करण्याचे ठरवले.

“सेंट जॉन,” मी म्हणाले, “अजूनही तुमचा माझ्यावरचा राग गेलेला दिसत नाही, यांचे मला फार दु:ख होत आहे. मागचे सगळे विसरून आपण पुन्हा एकदा मित्र बनुया.”

a

“मला वाटते आहे की आपण मित्रच आहोत,” ते शांतपणे उगवता चंद्र पाहत म्हणाले.

“नाही, सेंट-जॉन,” मी उत्तर दिले; “आपण पूर्वीसारखे मित्र राहिलो नाही आहोत आणि ते तुम्हालाही माहिती.”

“असे तुला वाटत असेल तर मग ते चुकीचे आहे. माझ्याकडून तुला कोणत्याही प्रकारचे दु:ख पोहोचवू नये हीच माझी इच्छा आहे.”

“माझा तुझ्यावर विश्वास आहे, सेंट-जॉन, कारण मला माहित आहे की तुम्ही कोणाचेही नुकसान करू शकत नाही; पण तुमची मामे बहीण या नात्याने इतरांच्या तुलनेत थोड्या अधिक स्नेहाची अपेक्षा करत आहे.”

ते म्हणाले, “नक्कीच, तुझी इच्छा गैरवाजवी नाही मी तुला कधीच गैर मानले नाही आणि मानणारही नाही.”

शांत आणि थंड स्वरात बोललेले हे शब्द ऐकून मी थक्क झाले आणि चीड पण आली. एरव्ही मी तिथून निघून गेले असते पण माझ्या भावनांपेक्षा महत्वाचे एक वेगळे कारण होते ते म्हणजे मला सेंट जॉनच्या अलौकिक बुद्धिमत्तेचा आणि तत्वनिष्ठतेचा आदर होता. एक भाऊ म्हणून मला त्यांच्या विषयी ममत्व वाटते होते. त्यांची मैत्री मला कायमची गमवायची नव्हती, म्हणून त्यासाठी शेवटचा प्रयत्न करून पहायचे ठरवले.

“सेंट जॉन, तुम्ही हिंदुस्थानात जाताना सुध्दा असेल नाराज होऊन जाणार? एकही गोड शब्द न बोलता, आपण असाच निरोप घ्यायचा?”

त्यांनी चंद्राकडे पाहणे थांबवून आश्चर्याने माझ्याकडे पाहत विचारले, “म्हणजे जेन मी हिंदुस्थानात गेल्यावर तुला का सोडू? तू माझ्याबरोबर येणार नाहीस का?”

त्याने चंद्राकडे पाहणे थांबवले आणि माझ्या चेहऱ्याकडे पाहिले. “तुम्हीच तर मला सांगितलेत की मी तुमच्याशी लग्न केल्याशिवाय मी बरोबर येऊ शकत नाही.”

“आणि तुला लग्न नको आहे, तू तुझ्या नकारावर ठाम आहेस?” अतिशय थंडपणे त्यांनी विचारले. या प्रश्नानी मला हादरवून सोडले. त्यांचा राग हिमवादळासारखा होता. असंतोषाच्या गोठलेल्या समुद्रावरून झेपावण्याच्या तयारीत होता.

“नाही, सेंट जॉन,” मी म्हणाले, “मी तुमच्याशी लग्न करणार नाही; मी माझ्या नकारावर ठाम आहे.”

हिमवादळ ढवळून थोडे पुढे सरकले, पण अजून कोसळायचे होते.

“मी तुम्हाला पुन्हा विचारतो की या नकाराचे कारण काय?” सेंट-जॉननी विचारले.

“पूर्वी,” मी म्हणाले, “तुमचे माझ्यावर प्रेम नव्हते म्हणून; आता कारण तुम्ही माझा जवळजवळ तिरस्कार करता आहात म्हणून. मला वाटते मी तुमच्याशी लग्न केले तर तुम्ही मला जीवे माराल आणि तसेही तुम्ही आता माझी अवहेलना करून मला माझा जीव घेत आहात.”

त्यांचा चेहरा रागाने वेडावाकडा झाला होता.

“मी तुला जीवे मारेन, मी आधीच जीव घेत आहे!” तुझे शब्द हिंसक अस्त्रासारखे आहेत. ते कठोर निंदेस पात्र आहेत. एखाद्या स्त्रीच्या तोंडी तर मुळीच शोभणारे नाहीत, अक्षम्य आहेत: परंतु ख्रिश्चन धर्म कर्तव्य आपल्या भावाच्या शंभर अपराधाबद्दल क्षमा करायला शिकवते.”

पण माझे बोलून झाले होते, पहिला घाव करण्यापुर्वी, दुसरा घाव अधिक खोलवर केला गेला होता.

मी म्हणाले, “तुम्ही माझा पूर्णपणे तिरस्कार कराल; समेट करण्याचा प्रयत्न करणे निरुपयोगी आहे; मी पाहते की मी तुम्हाला माझा कायमचा शत्रू बनवून बसले आहे.”

घाव वर्मी बसला होता. तीव्र संतापाने ते वेडे पिसे झाल्याचे वाटत होते. ते पाहून काळजात धस्स झाले.

“तुम्ही माझ्या शब्दांचा चुकीचा अर्थ काढत आहात,” मी त्यांचा हात पकडून म्हणाले, “मी तुम्हाला खात्रीपूर्वक सांगते की तुम्हाला दुखावण्याचा माझा हेतू नव्हता.”

सेंट जॉन कडवटपणे हसले ऊआणि पटकन माझा हात काढून घेतला.

थोडा वेळ थांबल्यानंतर ते म्हणाले, “तू तुझा शब्द मागे घेऊन हिंदुस्थानात जाण्यास नकार देशील असेच आहे ना?”

“माफ करा,” मी उत्तर दिले, “मला तुमची सहकारी म्हणून जायला आवडेल.”

खूप वेळ शांततेत गेला. अचानकपणे त्यांचे डोळे विलक्षण तेजाने चमकले. ते शेवटी म्हणाले: “मी तुला आधीच सिद्ध केले आहे की

तुझ्या वयाच्या अविवाहित स्त्रीने, परक्या देशात माझ्या सारख्या पुरुष माणसांसोबत रहाण्याचा प्रस्ताव देणे हा तद्दन मूर्खपणा आहे. मला वाटले की मी तुला हे पटवून देण्यात यशस्वी ठरलो, पण पुन्हा तू तेच बोलत आहेस, हे ऐकून वाईट वाटले.”

मी त्याना थांबवले; त्यांचे निंदाव्यजक बोलणे मला दिलासा देऊन गेले.

“सेंट जॉन,” मी म्हणाले, बोलताना जरा तारतम्य बाळगा. मी तुम्हाला जे सांगितले त्याचा धक्का बसल्याचा तुमचा दावा खोटा आहे कारण तूम्ही सूज्ञ आहात

a

तेव्हा माझ्या बोलण्याचा जाणूनबुजून विपर्यास करत आहात. मी पुन्हा एकदा सांगते की मी तुमची मदतनीस म्हणून येण्यास तयार आहे, पत्नी म्हणून नाही.''

त्यांच्या चेहऱ्यावरचा रंग उडाला होता. पण तरीही त्याने आपला राग दाबून टाकला आणि मला जोरदार पण शांतपणे उत्तर दिले: ''माझी पत्नी नसलेल्या स्त्रीची मदत मी स्विकारू शकत नाही. या बाबतीत आपले एकमत होत नाही आहे. जर तुला खरोखरच मिशनरी जीवन स्विकारावे असेल तर मी गावात एखाद्या विवाहित मिशनरीशी बोलेन, ज्याच्या पत्नीला तिच्या मदतीसाठी कोणाची तरी गरज असेल तर तू तिच्याबरोबर काम करू शकतील. त्यासाठी तुला तुझ्या वैयक्तिक संपत्तीचा वापर करावा लागेल, संस्थेची मदत मिळणार नाही. अशा प्रकारे तुला, वचनभंगाचा कमीपणा येणार नाही आणि संघात काम करण्याचा हेतू साध्य होईल.''

मी कधीही औपचारिक आश्वासन दिले नव्हते किंवा कोणतेही वचन दिले नव्हते. मला त्यांची ही भाषा खूप कठोर आणि दडपशाहीची वाटली. मी उत्तर दिले: ''मला यात कमीपणा वाटत नाही आणि मी वचन मोडले नाही: मला हिंदुस्थानात विशेषत: परदेशी लोकांसह जाण्याची सक्ती केली जात आहे. तुमच्याबरोबर मी काम केले असते, कारण मी तुमची प्रशंसा करते, माझा तुमच्यावर विश्वास आहे आणि मी तुमच्यावर प्रेम करते; पण मला खात्री आहे की मी त्या देशात कोणासोबतही गेले तरी मी तिथे जास्त काळ जिवंत राहू शकणार नाही.''

''ओ हो! म्हणजे तुला स्वतःच्या जीवाची भीती वाटते,'' ओठ मुडपत ते म्हणाले.

''हे खरे आहे. देवाने मला गमावण्यासाठी जीवन दिले नाही; तुम्ही मला जे विचारत आहात ते आत्महत्येसारखे आहे असे मला वाटत आहे; शिवाय, इंग्लंडला कायमचे सोडण्याआधी मला इथे राहून माझा जास्त उपयोग होऊ शकतो याची खात्री करून घ्यायची आहे.''

"तुला काय म्हणायचे आहे?"

"मला समजावून सांगण्याची गरज नाही; पण एक गोष्ट अशी आहे ज्याबद्दल मला बऱ्याच दिवसांपासून काही शंकांचे निरसन करून घ्यायचे आहे आणि होईपर्यंत मी कुठेही जाऊ शकत नाही."

"मला माहित आहे की तुला ज्या शंकांचे निरसन करून घ्यावयाचे आहे ते बेकायदेशीर आणि अधार्मिक आहे. मला वाटले तू ती गोष्ट मनातून काढून टाकली असावीस पण तू अजूनही रोचेस्टरांच्या विचारातून बाहेर आलेली दिसत नाहीस."

ते खरे होते आणि मी माझ्या मौनाने ते कबूल केले.

"बरं! सेंट-जॉन पुढे म्हणाले, "तू मिस्टर रोचेस्टरला शोधायला सुरुवात करणार आहेस का?"

"त्यांचे काय झाले हे मला माहित असणे आवश्यक आहे."

"म्हणून," ते पुढे म्हणाले, "माझ्या प्रार्थनेत तुझे स्मरण करणे आणि देवाला माझ्या अंतःकरणापासून विनवणी करणे एवढेच उरले आहे की तो तुला बहिष्कृत करणार नाही. मला वाटले की मी तुला मिशनरी म्हणून ओळखले आहे. पण माणसाच्या नजरेपेक्षा परमेश्वराची नजर निराळी असते. त्याच्या इच्छेनुसार होवो."

दार उघडून ते बाहेर गेले आणि थोड्याच वेळात दिसेनासे झाले.

दिवाणखान्यात मला डायना भेटली. बहुदा ती खिडकीतून बाहेर मी आणि सेंट जॉन, बोलत असताना बहुतेक पाहत असावी. न राहवून तिने आमच्यामध्ये नेमके काय चालले आहे याची चौकशी केली. त्यांचे माझ्यावर प्रेम आहे हे जाणून घेण्यासाठी ती उत्सुक होती. मी नाही असे उत्तर दिले. मग तरी ते बऱ्याचदा माझ्या मागे मागे का असतात, का मला त्यांच्या सान्निध्यात जास्त जास्त ठेवण्याच्या प्रयत्नात असतात, गंभीरपणे त्यांचा माझ्या बरोबर लग्नाचा विचार तर चालला नाही ना हे तिला जाणून घ्यायचे होते. या प्रश्नाला मी होकारार्थी उत्तर दिले आणि ती

खूपच आनंदली. आता त्यांचा इंग्लंड सोडून जायचा विचार नक्की बदलला असल्याची तिची खात्री पटली होती. असे काही नसल्याचे उलट मला हिंदुस्थानात सोबत घेऊन जाण्यासाठी लग्नाचा प्रस्ताव दिल्याचे मी सांगितले. हा तिला निव्वळ वेडेपणा वाटला शिवाय तेथील उष्ण हवामानात मी तीन चार महिने देखील तग धरू शकणार नाही, याबद्दल काळजी करू लागली. मी तिला त्यांचाबरोबर लग्नास तयार नाही पण बहिणीच्या नात्याने सोबत मदतीला जाण्यास तयार असल्याचा माझा विचार सांगितला. गोष्टीचे तिला आश्चर्य वाटले आणि दु:ख झाले. भल्या भल्या तगड्या, सशक्त लोकांचा हिंदुस्थानातील प्रतिकूल परिस्थितीत निभाव लागला नसून, माझ्या सारख्या अशक्त स्त्रीला तिथे जाऊन, सेंट जॉन सारख्या अविरतपणे कठोर परिश्रम करणाऱ्या व्यक्तीसोबत काम करणे अवघडच नसून अशक्यप्राय गोष्ट आणि ती मान्य करून मी उगाच जीव धोक्यात घालून नये अशी सक्त ताकीद दिली. तरीही मी लग्नाला नकार का दिला हे जाणून घ्यायचे होते. आमची जोडी शोभून दिसणार नाही मुळात मी त्यांच्या सारखी सुंदर आणि देखणी नाही हे कारण तिने अमान्य केले. तेव्हा मला ते त्यांच्या माझ्यावरील प्रेमापोटी नाही तर त्यांनी हाती घेतलेल्या कामात कर्तव्य निभावून नेण्यासाठी गरज म्हणून लग्नाचा पर्याय दिल्याचे सांगितले. त्यांच्या मते माझा जन्म प्रेमासाठी नसून केवळ कठोर परिश्रमांसाठी आहे हे सांगितले आणि जर मी प्रेमासाठी योग्य नसेल तर लग्नासाठी अयोग्य आहे, म्हणून त्यांचा प्रस्ताव नाकारला. एक अखेरचा पर्याय म्हणून बहिणीच्या नात्याने त्यांची सहकारी म्हणून येण्यास तयार असल्याचे सांगितले पण हा माझा प्रस्ताव मुळातच त्यांना अयोग्य वाटला. जो माणस, पत्नीचा विचार एक उपयुक्त साधन या दृष्टीने करत असेल तर अशा माणसांशी आयुष्यभर साखळदंडाने बांधले जाणे ही क्रूरता आहे म्हणून मी ते नाकारले याची कबुली दिली. तिला माझी बाजू योग्य वाटली. तरीही सेंट जॉन एक चांगली व्यक्ती होते हे तिचे म्हणणे मला सर्वथा मान्य होते. ते स्वतः

a

महान, परोपकारी, धर्मनिष्ठ होते यात काही शंकाच नव्हती पण त्यांच्या तुलनेत कमी असलेल्या माणसाच्या आकांक्षा, भावना आणि गरजांचा त्यांना महत्वाच्या वाटत नाहीत. म्हणून सामान्य लोकांनी त्यांच्यापासून दूरच राहिलेले चांगले नाहीतर त्यांच्या विजयाच्या घोडदौडीत चिरडण्याची भीती नक्कीच आहे. तेव्हढ्यात ते त्या बाजूला येताना दिसले म्हणून मी डायनाचा निरोप घेऊन माझ्या खोलीत गेले.

पण रात्रीच्या जेवणाच्या वेळी मी त्यांना टाळू शकले नाही. आश्चर्याची गोष्ट म्हणजे ते माझ्याशी नेहमी सारखेच प्रामाणिकपणे विनम्रपणे बोलले. माझ्यामुळे निर्माण झालेला राग शमविण्यासाठी त्यांनी परमेश्र्वराकडे प्रार्थना केली आणि मला क्षमा केल्याचे दर्शविले.

जेव्हा बायबल वाचन सुरू झाले तेव्हा त्यांनी एकविसावा अध्याय निवडला. नवीन स्वर्ग, नवीन पृथ्वी या संदर्भात देव पुन्हा एकदा परत येईल, दुःखीतांचे अश्रू पुसेल, कष्ट, यातना, दु:ख, मरण या सर्व जुन्या गोष्टी नष्ट होतील असे प्रतिपादन केले. त्यापुढील उतारा वाचत असताना मला विचित्र वाटले. त्यांनी माझ्याकडे पाहत, आवाजात नाटकीय बदल करून सांगायला सुरुवात केली: “जीवनाच्या संघर्षात जो मोहाला तसेच दुष्ट लोकांच्या छळाला बळी पडूनसुध्दा आस्तिकपणे देवावर विश्वास ठेऊन सर्व संकटांवर मात करून विजयी होतो, त्याला सर्व गोष्टींचा वारसा मिळेल, त्याचा मी देव होईन आणि तो माझा मुलगा असेल.” नंतर सावकाशपणे स्पष्ट आवाजात म्हणाले, “जो मोहाला बळी पडून माझ्या विश्र्वास ठेवणार नाही त्याला अग्नी आणि गंधकाच्या तलावात फेकले जाईल जो दुसरा मृत्यू असेल.”

मला समजले या दोनपैकी कोणती गोष्ट माझ्या नशिबात होती ज्यांचे सेंट जॉनना भय वाटत होते, ते मला समजले.

शेवटचा शब्द उच्चारताना विजयी लोकांच्या यादीत त्यांचे नाव अग्रक्रमाने असेल असा त्यांचा विश्वास प्रतित होत होता. ज्या प्रदेशात चंद्र सूर्याच्या प्रकाशाची आवश्यकता, परमेश्वराच्या गौरवाच्या तेजस्वी प्रकाशाने पूर्ण होते, जिथे सामान्य कोकरू देखील प्रकाशमान असते, पृथ्वीवरील अमाप धनदौलत, सुख समृद्धीची रेलचेल असते अशा स्वर्गाचे दार त्यांच्यासाठी उघडण्याची ते वाट पाहत होते.

यानंतर प्रार्थनेने सांगता झाली. नंतर ध्यानमग्न अवस्थेत गेल्यानंतर त्यांचा आवेश जागृत झाला आणि त्यांनी देवाशी संवाद साधला. दुर्बलांसाठी शक्ती, मार्गावरून भरकटलेल्या लोकांना योग्य वाट, अगदी शेवटच्या क्षणापर्यंत मोहाला बळी पडलेल्या लोकांना परत फिरण्याची अनुज्ञा मागितली. अशा सर्व पापी जनांना नरकाच्या अग्नी ...पासून वाचण्यासाठी वरदान मागितले. त्यांच्या या आवेशपूर्ण अवस्थेत त्यांचा स्पर्श मला झाला आणि एकाएकी मन त्यांच्याविषयी आदराने भरून आले. त्यांच्या भावी संकल्पाविषयी आत्मीयता निर्माण झाली: त्यांच्या प्रवचनाचा जसा माझ्यावर परिणाम झाला तसा इतर श्रोत्यांवर झाल्याचे दिसून आले नाही.

प्रार्थना संपल्यावर आम्ही त्यांचा निरोप घ्यायला गेलो. डायना आणि मेरी, त्यांचे चुंबन घेऊन निघून गेल्या: मला असे वाटले की त्यांनी हळू आवाजात त्या दोघींना काही सांगितले असावे. माझा हात पुढे केला आणि त्यांना सुरक्षित प्रवासासाठी शुभेच्छा दिल्या.

“धन्यवाद, जेन,” ते मला म्हणाले; मी पंधरवड्यात परत येईन तोपर्यंत तू विचार कर. मला स्वतःला परत एकदा तुला लग्नाच्या संदर्भात विचारणे आवडणार

नाही, मात्र मी हे काम देवाच्या प्रेरणेने, एका महान ध्येयाच्या पूर्ततेसाठी कर्तव्य भावनेने करत असल्याने, तुझ्या निर्णयाची वाट पाहीन. रागाच्या भरात मी तुला विनाशाकडे जाऊ देणार नाही. अजूनही झाल्या गोष्टीचा पश्र्चाताप वाटत असेल तर निश्र्चय कर. पुढील जन्मातील पुण्यसंचयासाठी या जन्मातील सर्व ऐहिक सुखाच्या त्याग करणे गरजेचे आहे. पुण्य हीच तुमची शाश्वत संपत्ती आहे आणि देवाने तुला ही संपत्ती निवडण्याची शक्ती दिली आहे जी तुमच्यापासून कोणीही हिरावून घेऊ शकत नाही!"

हे शेवटचे शब्द बोलताना त्यांनी माझ्या डोक्यावर हात ठेवला. ते कळकळीने आणि हळूवारपणे बोलत होते. त्याची नजर त्याच्या प्रेयसीकडे पाहणाऱ्या प्रियकराची नव्हती, तर मेंढपाळाची नजर होती जी त्याच्या भटक्या मेंढरांवर लक्ष ठेवते.

व्यक्ती असो, सामान्य किंवा प्रतिभावान, निर्मोही पुजारी किंवा तानाशाह, ज्याक्षणी ते प्रामाणिकपणे व्यक्त होतात, तो क्षण त्यांच्या विजयाचा असतो त्या क्षणी ते समोरच्या माणसाला वश करतात आणि सुखनैव राज्य करतात. त्या क्षणी मला सेंट जॉनबद्दल तसाच आदर वाटला इतका की, इतक्या दिवसांपासून ज्या बिंदूकडे दुर्लक्ष करत होते त्या ठिकाणी मी अचानक येऊन पोहोचले. मला त्यांच्याशी संघर्ष करणे थांबवण्याचा मोह झाला -त्यांच्या इच्छेच्या प्रवाहात झोकून देऊन, त्याच्या अस्तित्वाच्या अथांग डोहात बुडून तिथेच माझ्या जीवनाचा त्याग करण्याचा मोह झाला.

वेगळ्या कारणासाठी पण, मि.रोचेस्टरने पूर्वी माझ्यावर जेवढे वर्चस्व गाजवले होते तितकेच सेंट जॉन त्याक्षणी माझ्यावर वर्चस्व गाजवत होते. दोन्ही वेळा मी मूर्ख ठरले होते. तेव्हा रोचेस्टरांची सरशी झाली असती तर तत्त्व हरले असते;

a

आणि यावेळी सेंट जॉन जिंकले तर निर्णय चूकीचा ठरला असता. हे आता इतक्या वर्षांनी मला उमजत आहे.

खरच सेंट जॉननी माझ्या डोक्यावर हात काय ठेवला, काही क्षणातच मी सर्व काही विसरून गेले, मी माझा नकार विसरले, माझी भीती गायब झाली, पूर्वी नाकारलेले लग्न शक्य वाटू लागले: धर्माची हाक ऐकू आली, देवाची आज्ञा झाली; मृत्यूचे दार उघडले आणि पलिकडे जाण्यासाठी, त्या आनंदासाठी मी या नश्वर जगाचा त्याग करण्यास तयार झाले.

“तू आता तुझा निर्णय घेऊ शकतेस ?” मिशनरी अत्यंत हळुवार स्वरात मला विचारत होते. त्यांच्या मैत्रीपूर्ण बोलण्याने मी त्यांच्या पूर्णपणे कह्यात गेले. शक्तीपेक्षा ही सौम्यता किती शक्तिशाली होती!-जॉनच्या रागाचा प्रतिकार करू शकले पण त्यांच्या चांगुलपणाने मी वेतासारखी लवले: मी अतिशय नम्रपणे स्विकारलेला लग्नाचा आणि हिंदुस्थानात जाण्याचा प्रस्ताव भविष्यात, माझ्या पुर्वीच्या बंडखोरीच्या प्रयत्नांमुळे, पश्र्यातापाची वेळ आणल्याशिवाय राहणार नाही याची मला खात्री होती. एका तासाच्या प्रार्थनेने त्यांचा स्वभाव बदलला गेला नसता: काही वेळा पुरता उंचावला होता एव्हढेच.

“जर मला पटले तर मी नक्कीच निर्णय घेऊ शकते, जर ही देवाची इच्छा आहे याची पक्की खात्री झाली तर मला तुमच्याशी लग्न करावे लागेल, तसे वचन द्यावे लागेल: आता या इथे लग्नाला तयार आहे ---पुढे काय होईल ते होवो.”

“माझी प्रार्थना ऐकली गेली,” सेंट जॉन म्हणाले आणि डोक्यावरचा हात अजून घट्ट दाबून धरला जणू माझ्यावर हक्क प्रस्थापित केला जात होता. त्यांच्या हातांनी मला असे धरले होते की ते प्रेम व्यक्त करत असावेत. मला प्रेम काय ते माहिती होते. पण त्याच्याप्रमाणेच मी प्रेमाचा प्रश्न सोडवला होता आणि मी फक्त कर्तव्याचा विचार केला होता. अजूनही एक शंकेचा ढग डोळ्यासमोर तरळत होता.

त्याला बाजूला करून, जे खरोखरच योग्य आहे ते करण्याची माझी मनापासून अगदी मनापासून, उत्कट इच्छा होती; आणि फक्त तेच मला करायचे होते. “मला मार्ग दाखव - मला मार्ग दाखव!” मी देवाची प्रार्थना केली. मी पूर्वीपेक्षा जास्त उत्साहित होते.

घर शांत होते; मी आणि सेंट जॉन फक्त जागे होतो. खोलीतील दिवा वाऱ्याच्या झोताने विझला; खिडकीतून चंद्र प्रकाश आत आला होता. माझे हृदय वेगाने धडधडत होते; मला त्याची धडधड ऐकू येत होती. अचानक, त्याची धडधड थांबवण्याचे जाणवले आणि जाणवली एक अवर्णनीय संवेदना जी डोक्यापासून पायापर्यंत सळसळत गेली. ही भावना विजेच्या धक्क्यासारखी नव्हती; पण तितकीच तीक्ष्ण, विचित्र, धक्कादायक होती: जणू मी एकप्रकारच्या गुंगीत होते आणि या संवेदनेने माझ्या गुंगीत असलेल्या मेंदूतील भावनांना जबरदस्तीने जागे केले. डोळे पाहण्यासाठी आणि कान ऐकण्यासाठी आतूर झाले होते. सगळे अंग थरथरत होते.

“तू काय ऐकलं?” तुला काय दिसले ? सेंट-जॉनने मला विचारले.

मी काही पाहिले नव्हते; पण मला एक आवाज ऐकू आला: “जेन! जेन! जेन!” आणि आणखी काही नाही.

“अरे देवा! हे काय आहे?” मी आवंढा गिळला.

तो गूढ आवाज कुठून आला असावा? खोलीतून, घरातून अथवा बागेतून आला नव्हता किंवा हवेतून अथवा अंतरिक्षातून आला नव्हता. पण तो कुणाचा होता हे मी जाणले होते. आणि तो आवाज होता एका ओळखीच्या प्रिय व्यक्तीचा--- एडवर्ड फेअरफॅक्स रोचेस्टरचा होता: अतीव वेदनेने आणि दु:खाने कळवळून मारलेली ती हाक होती---जीवाच्या आकांताने मारलेली हाक, तातडीच्या मदतीसाठी---

“मी येत आहे! येत आहे मी! थांब माझ्यासाठी थांब!”

मी दार उघडण्यासाठी धावत बाहेर गेले: बाहेर कोणीच नव्हते; मग बागेत पळत गेले: फक्त अंधार होता,

“तू कुठे आहेस ? “ मी रडत रडत साद घातली.

मार्श-ग्लेनच्या मागे असलेल्या पर्वतांनी अस्पष्टपणे प्रतिध्वनी आला: “तू कुठे आहेस?” वडाच्या झाडामधून वारा मंद उसासा टाकत होता; माझ्या आजूबाजूला मला फक्त दलदल आणि रात्रीचा एकांत दिसला.

गेटजवळ झाडाची सावली भुतासारखी हालत होती. हा जादुटोणा किंवा चमत्कार खचितच नव्हता. ती एक दु:खी अंत:करणाने मारलेली हाक होती, निसर्गाने आपले पोहोचवण्याचे काम केले होते.

सेंट जॉन माझ्यामागे आले होते, मी त्यांच्यापासून दूर गेले. मी त्यांना कोणतेही प्रश्न विचारु नका असे सांगितले.

कोणताही प्रश्न न विचारता ते तेथून निघून गेले. माझी शक्ती, माझे सामर्थ्य परत आले होते. जेव्हा तुमच्याकडे आज्ञा देण्यासाठी पुरेशी उर्जा असते, तेव्हा त्याचे पालन त्वरित होते. मी माझ्या खोलीत गेले आणि गुडघ्यावर बसून माझ्या स्वतःच्या पद्धतीने प्रार्थना केली. माझी प्रार्थनेची पद्धत सेंट जॉन यांच्या पद्धतीपेक्षा वेगळी होती आणि जास्त प्रभावशाली होती.

मला असे वाटले की मी एका परमेश्वराच्या खूप जवळ आहे. कृतज्ञतेने मी परमेश्वराच्या चरण धरले आणि वंदन केले. मी एक संकल्प केला आणि तो पूर्ण करण्याचा दृढनिश्चय केला. दिवस उजडायची वाट पाहत मी झोपी गेले.

a

# प्रकरण 36

शेवटी एकदा दिवस उजाडला. मी पहाटे लौकर उठून माझी खोली, कपाट आवरुन ठेवले. त्या दरम्यान सेंट जॉन बाहेर पडणार होते. निघताना मला ते दार ठोठावून आत येतील की काय अशी भीती वाटली पण त्याऐवजी त्यांनी एक चिठ्ठी दाराच्या फटीतून आत सरकवली. त्यात खालीलप्रमाणे मजकूर होता, “काल रात्री अचानक तू मला सोडून गेलीस. पंधरा दिवसांनी मी परत येत आहे. तोपर्यंत मला तुझा स्पष्ट निर्णय हवा आहे. दरम्यान जागृत राहून मोहाला बळी न पडण्यासाठी प्रार्थना करणे. माझा विश्वास आहे की तुझ्या आत्म्याची इच्छा चांगली आहे, परंतु देह कमकुवत आहे. मी सर्व तास तुझ्यासाठी प्रार्थना करीन.”

‘तुझा सेंट जॉन.’

मी स्वतःशी विचार केला, “माझा आत्मा चांगल्या आणि योग्य गोष्टी करण्यास इच्छुक आहे, माझे शरीर स्वर्गाची इच्छा पुर्ण करण्यासाठी पुरेसे मजबूत आहे, पण ती इच्छा मला स्पष्टपणे दर्शविली गेली असली पाहिजे. कोणत्याही परिस्थितीत, संशयाचे निरसन होण्यासाठी, योग्य चौकशी करायला हवी, पुरावे शोधायला हवेत, तेव्हाच निश्चित काय ते ठरवता येईल.”

१ जूनची सकाळ असली तरी हवा पावसाळी होती. पाऊस खिडक्यांवर धडकत होता. मी सेंट जॉननी समोरचा दरवाजा उघडतानाचा आवाज ऐकला आणि त्यांना बाग ओलांडताना मी खिडकीतून पाहिले. ते धुक्यातून दलदलीच्या रस्त्याच्या बाजूने व्हाईटक्रॉसच्या दिशेने निघाले. तिथेच त्यांना गाडी भेटणार होती.

काही तासांत मी पण तिकडेच जाणार होते. इंग्लंड कायमचे सोडून जाण्यापूर्वी जुन्या नातेसंबंधाबाबत हालहवाल जाणून घेणे आवश्यक होते.

दुपारच्या जेवणाला अजून दोन तास बाकी होते; मी ज्या घटनेने मला हा अचानक निर्णय घेण्यास भाग पाडले त्याचा विचार करू लागले.

मला जाणवलेली भावना आठवली, मला तो आवाज आठवला. पुन्हा पुन्हा विचार करूनही मला तो नेमका कसा ऐकू आला याचा उलगडा झाला नाही, जणू काही आकाशवाणी झाली असावी. परंतु त्या आवाजाने माझ्या आत्म्याला बंधमुक्त केले. 'जेन, जेन, जेन!' तो ऐकून मी घाबरले नव्हते अथवा हादरूनही गेले नव्हते. स्थळ, काळ, वेळ, यांच्या सीमारेषा ओलांडून ती हाक माझ्यापर्यंत पोहोचल्याने आश्चर्यची आणि आनंदाची अशी संमिश्र भावना मनात दाटून आली होती.

यापुर्वी पाठवलेल्या पत्रांचा काही उपयोग झाला नव्हता. आता मला स्वतःलाच त्यांचा शोध घ्यायला हवा होता. जेवणाच्यावेळी मी मेरी आणि डायनाला चार दिवस बाहेरगावी जाणार असल्याचे सांगितले. मी एकटीच चालले असल्याने त्यांना थोडी काळजी वाटली. एका मित्राच्या संदर्भात बरेच दिवस काही खबरबात समजली नसल्याने, त्या संदर्भात मला जाणे आवश्यक आहे असे मी त्यांना सांगितले. त्यांनी मग जास्त चौकशी केली नाही.

मी दुपारी तीन वाजता मूर हाऊस सोडले, चार वाजता व्हाईटक्रॉसच्या गाडी तळावर थॉर्नफिल्डला घेऊन जाणाऱ्या गाडीची वाट पाहत होते. साधारण वर्षभरापूर्वी याच ठिकाणी मी निर्धन, निराधार अवस्थेत आले होते, आज पुन्हा थॉर्नफिल्डच्या वाटेवर, घरी परतणाऱ्या पक्ष्यांसारखी आनंदाने भारून गेले होते.

प्रवासाला छत्तीस तास लागले. मंगळवारी दुपारी व्हाईटक्रा ॅस सोडले गुरूवारी पहाटे घोड्यांना पाणी देण्यासाठी एका खानावळीत गाडी थांबली. आजुबाजुची हिरव्यागार झाडे, मोठमोठाली शेते, डोंगर दऱ्यांना पाहून मा ॅर्टनच्या दलदलीची आठवण झाली. आपल्या परिचित व्यक्तीला बऱ्याच दिवसांनी भेटल्याचा आनंद झाला. माझे उतरण्याचे ठिकाण जवळ आल्याची खात्री पटली.

a

तेथील पोऱ्याला थॉर्नफिल्ड कॅसल किती दूर आहे याची विचारणा केली. त्याने दोन मैल असे सांगितले. माझा प्रवास संपला होता. मी गाडीतून बाहेर पडले. सामानाची ट्रंक खानावळीत ठेऊन घेण्याचे पैसे देऊन, गाडीवानाला खुशाली देऊन मी बाहेर आले. खानावळीच्या नांवाच्या बोर्डवर रोचेस्टर कुटुंबाचे कुलचिन्ह रेखांकीत केले होते. माझे हृदय धडधडायला लागले. मी, मी माझ्या प्रिय रोचेस्टरांच्या मालकीच्या जागेवर होते. मन प्रसन्न झाले, पण लगेचच दुसरा विचार मनात आला, ते यावेळी तिथे उपस्थित असतील? बहुदा इंग्लडसुध्दा सोडून गेले असतील, मग कॅसल मध्ये बर्थे आणि नोकर मंडळींशिवाय कोणी असणार नाही. त्यापेक्षा खानावळीत चौकशी करून सध्या रोचेस्टर थॉर्नफिल्डमध्ये आहेत काय विचारणे संयुक्तिक होते. पण मी तो विचार बाजूला सारला. मला उत्तराची भीती वाटत होती, निराशा पदरी पडायचे भय वाटत होते. त्यापेक्षा उत्तर मिळण्याचा जेव्हढा उशीर होईल, तेव्हढा वेळ मला रोचेस्टरांबद्दल चांगली बातमी मिळण्याच्या आशा अजून थोडा वेळ जिवंत राहिल्याचे समाधान मिळाले असते. निदान थॉर्नफिल्ड कॅसल तरी पाहता आला असता. माझ्या नकळत माझ्या पावलांनी थॉर्नफिल्डची वाट धरली होती. याच रस्त्याने मी दु:खाने, अपमानाने, रागाने वेडी पिशी होऊन बाहेर पडले होते. पण आता परत एकदा ते जंगल, ती शेते, ती गवताळ कुरणे पहायला मन आसुसले होते. शेवटी शेते मागे टाकून मी थॉर्नफिल्डच्या मागच्या बाजूला जाणाऱ्या रस्त्याजवळ आले. मागच्या बाजूस कोर्ट यार्डच्या भिंती आणि नोकर मंडळींच्या राहण्यासाठी लहान घरे होती. तेथील झाडावर डोमकावळयांची वसाहत होती.

मला दिंडी दरवाजातून थॉर्नफिल्ड पहायचे होते. तिथून रोचेस्टरांच्या खोलीची खिडकी दिसली असती. कदाचित ते खिडकीतून बाहेर पाहत असतील किंवा सकाळच्या वेळी बागेत फेरफटका मारायला बाहेर पडले असतील. मी त्यांना

a

पाहिले तर भान हरपून धावत जाऊन भेटेन काय अशा संभ्रमात मन पडले. पण नक्की मी काय करेन माझे मला सांगता आले नाही. एकवार त्यांना पाहून माझे डोळे सुखावतील, मन आनंदाने मोहरुन जाईल. छे! छे! काहीही वेड्यासारखा विचार करणे थांबवले पाहिजे: ते अगोदर इथे असायला तर हवेत! ते स्पेनच्या उंच पर्वतांवर असतील, नाहीतर फ्रान्सच्या समुद्र किनाऱ्यावरून सूर्योदय बघत असतील.

मी बागेच्या छोट्या भिंतीजवळून चालत कोपऱ्यात वळले. दगडी गोळे असलेल्या दोन दगडी खांबांच्यामध्ये कुरणाकडे जाणारा दरवाजा होता. माझ्या डोक्यावरून बरेच कावळे उडाले. मग तेथून मी माघारी वळले आणि दर्शनी भागाकडे निघाले.

मी माझी आनंदी नजर एका सुंदर घराकडे वळवली आणि मला फक्त धुराने काळे पडलेले अवशेष दिसले.

आता तिथे झोपलेल्याना जाग येऊ नये म्हणून लपून छपून पाहण्याची गरज नव्हती. गेटवरचे दरवाजे काढून टाकलेले होते. हिरवळ, शेतं, पायदळी तुडवली आणि उद्ध्वस्त झालेली होती. मागे मी एकदा स्वप्नात पाहिल्याप्रमाणे, फक्त एक उंच पडकी भिंत तेव्हढी उभी होती, छत, खिडक्या, दरवाजे, शेकोटीचे धुरांडे सारे सारे उध्वस्त झालेले होते. काळे पडलेले दगड बघून, किल्ला आगीमुळे नष्ट झाला आहे हे सहज समजले; "पण आग कोणी पेटवली? हे दुर्दैव कसे घडले?"

असे वाटले, बुरखा पांघरून निजलेल्या प्रेयसीला, प्रियकराने उठवायला जावे आणि निद्रिस्त सुंदरी, चिरविश्रांती घेत असल्याचे लक्षात यावे तसे झाले होते. माझी सर्व मनोरथे व्यर्थ गेली. घर तर पूर्णपणे जमिनदोस्त झाले होतेच पण तेथे राहणाऱ्या लोकांचे काय झाले असा प्रश्न, काळीज कुडतडू लागला.

मी उध्वस्त झालेल्या भिंतीभोवती फिरत असताना आणि उद्ध्वस्त झालेल्या किल्ल्याभोवती पाहिले तेव्हा मला समजले की आग आधीच थोडी जुनी

असावी. या रिकाम्या कमानीखाली बर्फाचा रस्ता तयार झाला होता. मोडून पडलेल्या खिडक्यांच्या लाकडातून गवत उगवले होते. या काळात, अवशेषांचा दुर्दैवी मालक कुठे होता? तो कोणत्या देशात राहत होता? माझे डोळे लक्ष जुन्या चर्चच्या टॉवरच्या दिशेने गेले आणि मी स्वतःशी म्हणाले: "रोचेस्टर्सच्या पिढीजात दफनभूमीत, थोरल्या सर रोचेस्टरांसोबत संगमरवरी कबरीत तर आश्रय घेतला नसेल ना?"

मला माहिती हवी होती, ती फक्त खानावळीत मिळाली असती म्हणून मी लगेच माघारी परतले. मालक स्वतः जेवण घेऊन आले. मी त्यांना बसण्याची विनंती केली. मला सुरुवात कोठून करायची हे कळत नव्हते. खानावळीचे मालक एक मध्यमवयीन आदरणीय गृहस्थ होते.

"तुम्हाला थॉर्नफिल्ड कॅसल माहित असेल?" मी शेवटी धाडस केले.

"होय, मॅडम, मी पुर्वी तिथे राहत होतो.

"तुम्ही?" मी विचारात पडले.

"मी दिवंगत मिस्टर रॉचेस्टरचा बटलर होतो," तो पुढे म्हणाला.

दिवंगत रोचेस्टर! जे ऐकू नये असे वाटत होते, तेच कानावर पडत होते.

"मि. रोचेस्टर गेले?"

"मी मिस्टर एडवर्डच्या वडीलांच्या संदर्भात बोलत आहे."

मी मोठा श्वास घेतला, मला खात्री पटली मि. एडवर्ड जिवंत आहेत. देव त्यांचे भले करो! आता जरी ते दुसऱ्या ध्रुवावर जरी असले असते तरी मला चालले असते.

"मि. रॉचेस्टर थॉर्नफील्ड कॅसलवर आहेत का?" " मी विचारले.

उत्तर मला माहित होते. मुद्दाम मी थेट प्रश्न विचारायचे टाळले.

"अरे! नाही, मॅडम, त्याने उत्तर दिले; तेथे आता कोणीही राहत नाही. तुम्ही परगांवहून आलात म्हणून तुम्हाला कल्पना नाही, था ॅर्नफिल्ड कॅसलची राखरांगोळी झाली आहे. वाडा हिंवाळयात आगीच्या भक्ष्यस्थानी पडला. प्रचंड नुकसान झाले. अगदीच किरकोळ काही वाचले असेल तर असेल. मध्यरात्रीच्या वेळी आग लागली आणि मिलकोट येथे बातमी कळण्यापूर्वी वाडा आधीच आगीच्या ज्वाळांनी पेटला होता; ते एक भयंकर दृश्य होते; मी त्याचा साक्षीदार होतो."

"मध्यरात्री? आगीचे कारण समजले काय?" मी विचारले.

"आमचा असा अंदाज आहे की त्या घरात एक वेडी स्त्री बंद होती."

"असे काही मी ऐकल्यासारखे वाटते."

"होय मॅडम, अनेक वर्षे नक्की कुणालाच माहित नव्हते पण सांगोवांगी असे म्हटले जायचे की मि. एडवर्ड तिला घेऊन आला होता. पण गेल्या वर्षी एक विचित्र घटना घडली."

मला माझी स्वतःची गोष्ट त्यांच्या कडून ऐकायची नव्हती, म्हणून मी विचारले, "त्या वेड्या बाईचे काय?"

ती रोचेस्टरची पत्नी होती हे गेल्या वर्षी सर्वांना समजले. "त्यांचे काय झाले, किल्ल्यावर एक तरूण स्त्री, शिक्षिका म्हणून आली होती."

"पण आगीचे काय?"

"होय मॅडम मी तिथे येतच आहे .

a

" मि. रोचेस्टर त्या मुलीच्या प्रेमात पडले. नोकर मंडळींच्या सांगण्याप्रमाणे ते प्रेमात पार वेडे झाले होते. तशी ती काही फारशी सुंदर नव्हती. वयाने लहान, अंगाने बारीक सडपातळ लहान मुलीसारखी होती म्हणे. मी काही तिला पाहिले नाही पण लेआ, तिथली मोलकरणी सांगत होती. लेआला ती आवडत होती. रोचेस्टर चाळीस वर्षांचे होते आणि ती वीस. या वयातील पुरुषांवर अशा मुली जादू करतात. बरं! मिस्टर रोचेस्टरला तिच्याशी लग्न करायचे होते."

"तुम्ही मला त्याबद्दल नंतर सांगा. मला आगीचे कारण जाणून घ्यायचे आहे. त्या वेड्या स्त्री ने तर काही केले नाही ना?"

"होय मॅडम तिनेच आग लावली इतर कोणी नाही हे नक्की. तिच्या देखरेखीसाठी एक मिसेस पूल म्हणून नर्स होती, ती चांगली विश्र्वासू होती. पण तिची एक वाईट सवय होती, ती नेहमी जिनची बाटली जवळ बाळगत असे. तसे तिचे आयुष्य फार कष्टाचे होते. थोडा जास्त दारुचा डोस झाला आणि तिला गाढ झोप लागली. ती वेडी स्त्री फार पाताळयंत्री होती, तिने नर्सच्या चाव्या काढून घेतल्या आणि खोली बाहेर पडली.

असे म्हटले जाते की तिने एकदा मिस्टर रोचेस्टरला त्याच्या पलंगावर जाळण्याचा प्रयत्न केला; पण मला ही कथा नीट माहीत नाही. प्रथम तिने शेजारच्या खोलीतील पडदे वगैरे पेटवले नंतर खाली त्या गव्हर्नेसच्या खोलीत जाऊन पलंग पेटवला. सुदैवाने तिथे कोणी नव्हते, ती मुलगी दोन महिन्यांपूर्वी कोणालाही न सांगता निघून गेली होती. याचा रोचेस्टरवर खूपच वाईट परिणाम झाला. दु:खाने ते जवळजवळ वेडे झाले. त्यांना एकटे राहायचे होते. त्यांनी मिसेस फेअरफॅक्सना त्यांच्या मैत्रिणीकडे पाठवून दिले. ती खूप चांगली स्त्री होती. मि. रोचेस्टरनी त्यांना चांगली पेन्शन दिली आणि मिस ॲडेल, जिचे रोचेस्टर पालक होते, तिला त्यांनी

बोर्डिंग स्कूलमध्ये पाठवले. आपल्या सर्व परिचितांशी संबंध तोडले आणि एखाद्या संन्यासीप्रमाणे वाड्यात कोंडून घेतले.”

“कसे! त्यांनी इंग्लंड सोडले नाही का?”

“इंग्लंड सोडून? छे! रात्रीच्या वेळी बागेत आणि वेळीअवेळी शेतात निरर्थक भटकण्याशिवाय घराचा उंबरठा देखील ओलांडला नाही. ते सर्व भान हरवून बसले होते. कारण त्यापुर्वी ते जिंदा दिल व्यक्ती होते. वाइन, पत्ते आणि रेस अशा व्यसनात गुंतलेले नव्हते, ते एक धाडसी आणि माणुसकी जपणारे होते. शिवाय, ते काही फारसा देखणा नव्हते, परंतु ते धैर्यवान होते आणि त्याच्याकडे दृढ इच्छाशक्ती होती. मी लहानपणापासून त्यांना ओळखत होतो. मला वाटते ती मिस आयर थॉर्नफिल्डमध्ये येण्यापुर्वीच समुद्रात बुडून मेली असती तर बरे झाले असते.”

“मग आग लागली तेव्हा मिस्टर रोचेस्टर वाड्यात होते?”

“होय, आणि सर्व काही आगीत जळत असताना तो पोटमाळ्यात गेला; त्याने नोकरांना उठवले आणि स्वत: खाली सर्वांना बाहेर पडण्यास मदत केली, मग तो वेड्या स्त्रीला वाचवण्यासाठी परत तिच्या खोलीत गेला. तोवर ती छतावर गेली होती आणि मोठमोठ्याने आरडाओरड करत होती. मी स्वतः तिला पाहिले. लांब काळे केस असलेली चांगलीच जाडजूड स्त्री होती. तिला वाचवायला रोचेस्टर स्कायलाईट मधून छतावर चढले आणि बर्थे म्हणून हाक मारली. तो तिच्या जवळ गेला; तेव्हा ती जोराने किंचाळली आणि एकदम झेप घेतली दुसऱ्याक्षणी खाली जमिनीवर पडली.”

“ अरे बापरे! मेली”

“होय, त्या क्षणीच. फार उंचावरून पडली होती.”

“अरे देवा”

“खरे आहे मॅडम, खरोखरच ते सर्व भयानक होते.” त्यांच्या आवाज कापत होता.

“आणि नंतर ? मी बोलले.

“नंतर, घराचा पाया जाळला; फक्त भिंतीचे फक्त काही भाग उभे राहिले.”

“इतर लोक मारले गेले काय?”

“नाही, आणि तरीही कदाचित ते अधिक चांगले झाले असते.”

“तुम्हाला काय म्हणायचे आहे?”

“गरीब मिस्टर एडवर्ड!” ते पटकन बोलून गेले, “असा दिवस मी बघेन असे वाटले नव्हते. काही लोक म्हणतात की, स्वतःचे पहिले लग्न लपवून आणि स्वतःची मुलगी जिवंत असतानाच दुसरी बायको करायची इच्छा केल्याची ही शिक्षा आहे; पण मला त्याची दया येते.”

“काय? ते जिवंत आहेत? मी ओरडले.

“होय होय; पण अनेकांना वाटते की तो मेला असता तर बरे झाले असते.”

“का? कशासाठी?”

आणि माझे रक्त पुन्हा गोठून गेले.

“ते कोठे आहेत ? मी विचारले; ते इंग्लंडमध्ये आहे का?”

“होय, तो इंग्लंडमध्ये आहे; तो आता बाहेर पडू शकत नाही, तो कायमचा एका जागी पडून आहे.”

“हे सगळे ऐकणे माझ्यासाठी वेदनादायक होते आणि हा माणूस त्या अजून किती लांबवणार आहे कोणास ठाऊक.”

“तो दगडासारखा आंधळा झाला आहे, गरीब मिस्टर एडवर्ड!”

मला वाईट वाटले; मला भीती वाटली की तो वेडा बिडा झाला की काय! पुढचे दुर्दैवाचे दशावतार कशामुळे घडले हे ऐकायला मी माझी शक्ती गोळा केली.

a

"याला कारण, त्याचे धैर्य आणि दयाळूपणा. मॅडम, सगळे बाहेर पडेपर्यंत त्याला घर सोडायचे नव्हते. जेव्हा मिसेस रोचेस्टरनी छतावरून उडी घेतली, तेव्हा ते मोठ्या दगडी जिना खाली उतरले आणि त्याच वेळी, बाकीची इमारत कोसळली आणि त्या खाली ते गाडले गेले. नंतर त्याला ठिगाऱ्याखालून जिवंत बाहेर काढण्यात आले, पण ते गंभीर जखमी झाले होते; एक तुळई अशा प्रकारे पडली होती की त्यामुळे त्याचे अंशतः संरक्षण झाले; पण एक डोळा पूर्णपणे निकामी झाला आणि एक हात इतका खराब झाला की सर्जन मिस्टर कार्टर यांना तो ताबडतोब कापायला लागला. दुसरा डोळा पण आगीने भाजला गेल्याने त्याची पण दृष्टी गेली. त्यामुळे त्याची दृष्टी पूर्णपणे गेली आणि आता तो असहाय्य, आंधळा आणि अपंग झाला आहे.

"ते कोठे आहेत ? आता कुठे राहतात?"

"फर्न्डियनच्या जागेवर, येथून सुमारे तीस मैलांवर त्यांच्या मालकी असलेली इस्टेट आहे; ते पूर्णपणे निर्जन ठिकाण आहे."

"त्याच्याबरोबर कोण आहे?"

"जुना नोकर जॉन आणि त्याची पत्नी; त्याला इतर कोणीही नको होते; तो पूर्णपणे खचला आहे असे म्हणतात"

"तुमच्याकडे येथे काही प्रवासाची सोय आहे का?"

"आमच्याकडे एक बग्गी आहे, मॅडम, एक अतिशय सुंदर बग्गी."

"ती ताबडतोब तयार करा आणि तुमच्या मुलाला सांगा की जर तो मला रात्रीच्या आधी फर्न्डियनला घेऊन गेला तर मी नेहमीच्या भाड्याच्या दुप्पट पैसे देईन"

# प्रकरण 37

फर्न्डियन मनोर ही मध्यम आकाराची जुनी वास्तू होती, वास्तुशिल्पाचा विचार न करता, जंगलाच्या मध्यभागी वसलेली होती. मिस्टर रोचेस्टरांकडून मी याबद्दल आधीच ऐकले होते. ते कधी कधी तिथे शिकारीसाठी जात असत. त्यांच्या वडिलांनी ही मालमत्ता विकत घेतली होती; जर त्याना कुळे सापडली असती तर त्यांनी ते कसायला दिली असती; पण तसे ती घनदाट जंगलात असलेल्याने कोणालाही ते नको होती, शिवाय असुरक्षित आणि आरोग्यासाठी अपायकारक अशा ठिकाणी होती. त्यामुळे शिकारीच्या हंगामासाठी तयार केलेल्या दोन किंवा तीन खोल्यांचा अपवाद वगळता फर्न्डियन राहाण्याच्या दृष्टीने सुसज्ज नव्हते. मालक वाड्यात शिकारीच्या निमित्ताने वेळ घालवायला येत असत.

अंधार पडण्याच्या थोडे आधी मी फर्न्डियन मनोरला पोहोचले. थंड वारा वाहत होता. पावसाचा मारा सुरु होता. शेवटच्या मैलभराचे अंतर पायी पार करावे लागल्याने मी भिजून गेले होते. अगोदर ठरल्याप्रमाणे दुप्पट भाडे देऊन, सामानाची ट्रंक गाडीवानापाशी ठेवली आणि पुढे निघाले. आजुबाजुला घनदाट झाडी होती, तिथून मनोर दिसणे अवघड होते. ग्रॅनाइटच्या खांबांच्या मध्ये लोखंडी प्रवेशद्वार दिसले ते ओलांडून अंधारात पुढील अंतर पार करायला सुरुवात केली. नागमोडी पायवाट होती, दोन्ही बाजूला मोठमोठाले वृक्ष उभे होते. रस्ता संपता संपेना. घरे, शेते अशा मानवी वस्तीच्या काही खुणा दिसत नव्हत्या. चुकीच्या दिशेने आले की रस्ता चुकले समजेना.

अजून थोडे पुढे गेल्यावर थोडा मोकळा रस्ता लागला. झाडी थोडी कमी झाली. शेवटी एक घर दिसले. अंधारात ओळखणे अवघड होते. गेट एका साध्या

a

कडीने बंद केले होते. ते उघडून मी आत गेले. घराच्या भिंती पावसाने ओलसर वाटत होत्या, त्यावर शेवाळाची पुटे चढल्याने हिरवट रंगाच्या दिसत होत्या. फुले नव्हती, बाग नव्हती. एक वाट दारापाशी जात होती. मी पुढे निघाले. आजूबाजूला बाग अथवा शोभेची झाडे नव्हती. उतरते छप्पर होते. खिडक्या अरूंद असून बंद होत्या. मुख्य दरवाजा पण अरूंद होता. मी पायरीपाशी पोहोचले. पुर्वी मि. रोचेस्टरनी सांगितल्याप्रमाणे ती खरोखरच निर्जन जंगलातील वास्तू होती. लहान गावातील शांत चर्चसारखी भासत होती. फक्त पानावर पडणाऱ्या पावसाच्या थेंबांचा आवाज ऐकू येत होता.

इथे खरोखरच कोणी राहत असू शकेल काय, असा मला प्रश्न पडला. पण लगेचच उत्तर मिळाले. समोरचा अरूंद दरवाजा हळू उघडला आणि एक व्यक्ती बाहेर आली. हात पुढे करून तिने पाऊस पडतोय की काय याचा अंदाज घेतला. ती व्यक्ती म्हणजे, माझे एडवर्ड फेअरफॅक्स रोचेस्टरच होते, अंधारात देखील ओळख पटली. माझे पाऊल थबकले, नकळत माझा श्वास रोखला गेला, मी माझी चाहूल न लागू देता त्यांना निरखून पाहू लागले. अचानक झालेली भेट, आनंदापेक्षा दु:ख देणारी होती. हळुच मी तेथून बाजूला झाले.

शरीरयष्टीपुर्वी सारखीच होती. केस पुर्वीसारखे काळे होते. वर्षापुर्वीचा अंगातील जोम पण तसाच वाटत होता, बदलले होते, ते चेहऱ्यावरचे भाव.

पुर्वीचा आनंदी, बेफिकीर भाव जाऊन तिथे हताश, गंभीर भाव दिसत होता. जणुकाही साखळदंडाने बांधलेले जंगली श्वापद किंवा पिंजऱ्यात कैद झालेला गरूड असल्याचा भास झाला. कसेही असले तरी मी या भव्य कपाळाचे, या दृष्टी गमावलेल्या पापण्यांचे निदान एखादे गोड चुंबन घेता येईल, या आशेने, मनातील मी निराशा झटकून टाकली. पण अजून थोडावेळ मला धीर धरायला हवा होता. अजून मला त्यांच्या पुढ्यात यायचे नव्हते.

a

पायरी उतरून रोचेस्टर सावकाश अंदाज घेत लॉनच्या दिशेने गेले. पण पुढे गेल्यावर थांबले, त्यांना पुढे कुठल्या दिशेला जायचे कळेना. त्यांनी हात पुढे केला, पापण्या फडफडवण्याचा प्रयत्न केला. त्यांच्यापुढे फक्त काळोख असावा.

तुटलेला डावा हात त्यांनी छातीलगत धरला होता. त्यांना स्पर्शाने जाणून घ्यायचे होते, पण शेवटी त्यांनी प्रयत्न करण्याचे सोडले आणि पावसात भिजत शांत उभे राहिले. जॉन तिकडे आला आणि त्यांना, त्याच्या हाताला धरून घराकडे येण्याचे सुचविले. पण त्याची सूचना मान्य झाली नाही. जॉन एकटाच पुढे गेला पण त्याने मला पाहिले नाही. रोचेस्टर आता माघारी वळले आणि कसेबसे घराच्या दारात पोहोचले. दारातून आत शिरल्यावर आतून कडी लावून घेतली.

थोड्या वेळाने मी पुढे होऊन दरवाजा ठोठावला. जॉनची बायको मेरी दार उघडायला आली. मला पाहून ती आश्चर्यचकित झाली. मी घनदाट जंगलातील निवासस्थानी परतून आल्याचे पाहून तिला विश्वास बसत नव्हता. तिच्या मागोमाग मी किचनमध्ये गेले. जॉन आगीजवळ बसला होता. थॉर्नफिल्ड येथे जे काही घडले ते सर्व मी ऐकले आहे आणि मी मिस्टर रोचेस्टरला भेटायला आले आहे हे मी त्यांना थोड्या शब्दांत समजावून सांगितले. जॉनला माझे गाडीत सोडून आलेले सामान आणण्यासाठी पाठवले. मेरीला माझ्या राहण्याची व्यवस्था करायला सांगितली. तेव्हढ्यात दिवाणखान्यातून बेल वाजली. मी, मेरीला मालकांना त्यांना भेटायला कोणीतरी आले आहे, असे माझे नांव न सांगता सांगायला सांगितले. ते कुणालाही भेटत नसल्याचे मेरी म्हणाली, झालेही तसेच. कोण आले आहे त्यांचे नाव जाणून घेतल्याशिवाय रोचेस्टरनी भेट घेण्याचे नाकारले. मेरी पाण्याचे ग्लास ट्रे मधून घेऊन निघाली होती. मी तिला तो ट्रे मी घेऊन जाईन असे सांगून माझ्याकडे मागून घेतला. मेरीने माझ्याकरिता दार उघडले. माझे हृदय जोराने धडधडत होते. दिवाणखान्यात सर्वत्र एकप्रकारची उदासीनता भरून राहिली होती. रोचेस्टर जून्या शेकोटीजवळ

वाकले होते आणि त्यांचा आवडता कुत्रा पायलट, पायाजवळ बसलेला होता. मी आत आल्याचे पाहून पायलटने कान टवकारले आणि उडी मारून माझ्याजवळ आला. माझ्या अंगावर झेप घेतली तसा माझ्या हातातील पाण्याचा ट्रे हिंदकळला. मी तो जवळच्या टेबलावर ठेवून, पायलटला जवळ घेऊन शांत करु लागले. कसला आवाज झाला हे पाहण्यासाठी रोचेस्टर मागे वळले पण काहीच बोध न झाल्याने, 'मेरी पाणी दे,' अशी मागणी केली. अर्धा भरलेला ग्लास घेऊन मी जवळ गेले; पायलट माझ्यामागे आला, तो खूप उत्साहात उड्या मारत होता. मी पुन्हा त्याला चूप केले. रोचेस्टरांचे लक्ष त्या आवाजाने वेधून घेतले आणि काय चालले आहे अशी विचारणा केली. मी पुन्हा पायलटला 'खाली बस' अशी आज्ञा केली.

"तू खरोखरच मेरी आहेस?" रोचेस्टरनी विचारले.

"मेरी किचनमध्ये आहे."

पटकन त्यांनी हात पुढे केला पण मला पाहता न आल्याने, त्यांना स्पर्श करून जाणून घ्यायचे होते.

"कोण आहे ते ? कोण आहे? मला उत्तर हवे आहे."

"सर तुम्हाला अजून थोडे पाणी हवे आहे का?" मी विचारले; कारण अर्धे पाणी पायलट मुळे सांडले होते.

"कोण आहे ते? हे काय आहे? कोण बोलतंय?"

"पायलट मला ओळखले आणि मी येथे आले आहे ते जॉन आणि मेरीला माहित आहे: मी आज संध्याकाळी आले," मी उत्तर दिले.

"अरे देवा! हे आणि काय नवीन? मला आता भ्रम देखील होऊ लागला की का? हा निव्वळ वेडेपणा झाला."

"कोणताही भ्रम नाही की वेडेपणा नाही: सर तुमचे मन चांगले खंबीर आहे आणि प्रकृती चांगली ठणठणीत आहे."

"पण कोण बोलत आहे? हा फक्त आवाज ऐकू येत आहे? मी पाहू शकत नाही पण मला जाणवायला तर हवे नाहीतर माझे हृदय आता बंद पडायची वेळ आली आहे. तुम्ही कोणीही असाल मला स्पर्शाने जाणून घ्यायला हवे आहे, नाहीतर माझे प्राण जातील."

ते धडपडत आवाजाच्या रोखाने चाचपडून पहायला लागले. त्वरित मी त्यांचा हात माझ्या दोन्ही हातात घेतला.

"ही तर तिचीच बोटे आहेत! नाजुक लांबसडक! म्हणजे नक्की तीच असणार!"

त्यांनी झटकन आपला हात माझ्या हातातून सोडवून घेतला आणि माझा खांदा धरून जवळ खेचले, दुसऱ्या क्षणी मी त्यांच्या मिठीत होते.

"ही तर जेन आहे! तेच हात, तीच बोटे, तीच अंगकाठी."

"आणि तोच आवाज, ती स्वतः इथे हजर आहे: आणि तीचे हृदय सुध्दा. देवाच्या कृपेने मी आज तुमच्या भेटू शकले."

"पण तू जिवंत आहेस ना? तिचे भूत - बीत तर नाहीस ना?"

"सर तुम्ही मला स्पर्श करू शकता. पकडून ठेऊ शकता. मी मेलेल्या माणसासारखी थंड नाही किंवा भूतासारखा विरळ हवेचा स्तंभ नाही."

"माझी प्रिया जिवंत आहे! परमेश्वरा तुझी कृपा अगाध आहे. पण इतकी दु:खे माझ्या वाट्याला आल्यावर, मला असा आनंद मिळेल यावर माझा विश्र्वास बसत नाही. हे पण एक नेहमीप्रमाणे स्वप्न असू शकेल. ती आली, तीने पाहिले आणि मला जिंकून घेतले, असे वाटते की ती मला सोडून कुठेही जाणार नाही."

"नाही, सर, हे सत्य आहे आणि मी तुम्हाला पुन्हा कधीही सोडून जाणार नाही."

“मला स्वप्नात पण हेच सांगितले होते. जाग आली आणि माझी क्रूर थट्टा झाल्याचे समजले. मला एकट्यालासोडून ती निघून गेली. माझे सारे आयुष्य अंधकारमय, एकलकोंडे झाले. माझ्या मिठीतून तू आताही गायब होशील. जाण्यापूर्वी मला चुंबन घेऊ दे, जेन, मला आणखी एकदा चुंबन दे.”

“हो सर, नक्कीच.”

मी त्यांच्या केसांवरून हात फिरवला. त्यांच्या निस्तेज पापण्यांवर आणि कपाळावर ओठ टेकवले. ते भानावर आले आणि हे स्वप्न त्यांना नसून सत्य असल्याची खात्री पटली.

“तू जेन आहेस! तू माझ्या कडे परत आलीस?”

“होय सर.”

“मला वाटले होते की तू कधीच परत येणार नाहीस. तू या जगातून कायमची निघून गेली असशील असे मला वाटू लागले होते. आता तू अनोळखी लोकांच्या मेहरबानीवर जगत आहेस काय? सर्व जग तुझी कींव करत असेल.”

“नाही सर, माझी मी स्वतंत्र जगत आहे.”

“स्वतंत्र! तुला काय म्हणायचे आहे, जेन?”

“मडेरा येथील माझे काका मरण पावले आणि मला पाच हजार पौंड माझ्यासाठी सोडले.”

“अरे व्वा! ही खूपच छान बातमी आहे. मला असे स्वप्नातही वाटले नव्हते. आता तू एकदम श्रीमंत व्यक्ती झाली आहेस.”

“हो बऱ्यापैकी श्रीमंत. जर तुम्ही मला तुमच्यासोबत राहण्यासाठी परवानगी दिली नाहीत तर मी इथेच शेजारी घर बांधून राहू शकेन आणि तुम्हाला सोबतीची गरज लागल्यास गप्पा मारायला येत जाईन.”

“छे! छे! आता तू श्रीमंत आहेस, तरुण आणि सुंदर तर आहेसच, तुझ्या भोवताली आता मित्रमंडळींचा घोळका असेल. ते तुला, एका आंधळ्या, अपंग माणसासाठी तुझे आयुष्य पणाला लावू देणार नाहीत.”

“मी तुम्हाला सांगितले आहे, मी श्रीमंत आहे, स्वतंत्र आहे आणि माझ्या मनाची मी मालकीण आहे.”

“आणि तरीही, तुला माझ्याबरोबर रहायचे आहे?”

“तुमची परवानगी असेल तर नक्कीच. मी तुमची शेजारीण बनायला, नर्स बनायला अगदी घरकाम करायला पण तयार आहे. मी तुम्हाला सोबत करेन; तुम्हाला वाचून दाखवेन; तुझ्यासोबत चालेन; तुमची सेवा करेन; तुमच्यासाठी, तुमचे हात, तुमचे डोळे बनेन; मी जिवंत असेपर्यंत तुम्ही कधीही एकटे असणार नाही.”

त्यांनी उत्तर दिले नाही. गंभीरपणे ते विचारात गढून गेलेले दिसले. बोलण्यासाठी त्यांनी तोंड उघडले आणि लगेचच बंद केले आणि एक उसासा सोडला. मला थोडेसे लाजल्यासारखे झाले. असे न मागता देऊ केलेले सहचर्य आणि मदत, त्यांना कदाचित आवडले नसावे. सेंट जॉनना मी लग्नाला नकार दिल्यानंतर भारतात सोबत म्हणून येण्याची माझी तयारी जशी मानवी नव्हती तसेच आता या जंगलात सोबत राहण्यासाठी दाखवलेली तयारी, रोचेस्टरांच्या पचनी पडली नव्हती असे दिसत होते. रोचेस्टरांचे माझ्याविषयी नेमके काय मत झाले असेल हे मला कळत नव्हते. अजूनही त्यांना मी पत्नी म्हणून हवी असेन असे मला वाटत होते पण ते काहीच बोलले नाहीत आणि अधिकाधिक उदास झाल्याचे पाहून मला माझ्या अविचारीपणाचा पश्च्याताप झाला. हळूवारपणे मी तेथून दूर होण्याचा प्रयत्न केला पण रोचेस्टरनी तो सफल होऊ दिला नाही.

ते म्हणाले, “नाही जेन तू सोडून जाऊ नकोस. तू परत आलीस, भेटलीस, बोललीस त्यामधील गोडवा अवर्णनीय आहे. हे सुख मी सोडून देऊ शकत नाही.

आता माझ्या म्हणून म्हणाव्या अशा फार थोड्या गोष्टी माझ्याकडे उरल्या आहेत. तू मला हवी आहेस. सारे जग मला हसेल, स्वार्थी म्हणेल पण मला त्याची पर्वा नाही. तू माझ्या आत्म्याची गरज आहेस: माझा आत्मा जर असंतुष्ट राहिला तर तो माझ्या शरीराचा देखील त्याग करेल."

"सर मी कायम तुमच्यासोबत राहीन: असे मी याआधीच, तुम्हाला सांगितले आहे."

"तू सोबत राहण्याचे कबूल केले आहेस, ही एक चांगली गोष्ट आहे, पण माझ्या मनात दुसरीच शंका आहे. तू दयाळू आणि प्रेमळ आहेसच, माझ्यासारख्या आंधळया अपंगाची तू नर्स बनून चांगली काळजी घेशील तेव्हढे माझ्यासाठी पुरेसे आहे: आता तुझ्याबद्दल माझ्या मनात फक्त पितृत्वाची भावना असावी, असे तुला वाटते काय? "

"सर, तुम्हाला काय आवडेल याचा मी विचार करेन: तुम्हाला मान्य असेल तर मी फक्त तुमची परिचारिका असण्यात समाधानी आहे."

"पण तू कायमस्वरूपी माझी परिचारिका होऊ शकत नाहीस, जेन; तू तरुण आहेस आणि एक दिवस तुझे लग्न होईल."

"मी लग्नाची काळजी करत नाही."

"तुला काळजी करायला हवी जेनेट: मी पुर्वीसारखा असतो तर मी तुझी काळजी घेतली असती पण मी स्वतः एक दुर्दैवी आंधळा माणूस तुझी काय काळजी घेणार?"

असे बोलून ते परत निराश झाले. मला मात्र आनंद झाला, या शब्दांनी मला जणू बळ मिळाले. नेमका काय अडथळा आहे याचा मला अंदाज आला. माझ्या दृष्टीने तो अडथळा फारसा काळजी करण्यासारखा नसल्याने मी अधिक उत्साहाने बोलणे सुरू केले.

“खरोखरच तुमच्या वर कोणीतरी दया दाखवणे आवश्यक आहे. तुमचे हे वाढलेले केस, नखे पाहून तुम्ही अगदी जंगली प्राणी किंवा पक्षी वाटत आहात.”

“पण या दुसऱ्या हाताच्या जागी फक्त खुंट उरला आहे, त्याला ना पंजा ना बोटे, नखे तर लांबची गोष्ट,” त्यांनी छातीपाशी दाबून धरलेला तुटका हात दाखवत म्हणाले, “भयानक दृश्य! बरोबर आहे ना, जेन?”

“होय, हे पाहून तुमच्यावर दया करावीशी वाटते--- शिवाय कपाळावरचे जखमांचे व्रण, दृष्टीहीन डोळे: पण या सर्व गोष्टींमुळे, कोणीतरी तुमच्या वर जीवापाड प्रेम करेल.”

“माझा विद्रुप चेहरा आणि थोटा हात बघून तू घाबरून पळ काढशील असे मला वाटत होते.”

“तुम्हाला काय वाटते, ते मला सांगत बसू नका, मी तुमच्या मताशी असहमत आहे. मला आता या खोलीतील शेकोटी स्वच्छ करून चांगली आग पेटवायची आहे. तुम्हाला पेटलेली आग जाणवते काय?”

“होय उजव्या डोळ्याला थोडीशी चमक जाणवते आणि लालसर रंग तरंगत असल्यासारखे वाटते.”

“तुम्ही मेणबत्ती पाहू शकता?”

“सर्व मला पांढरट धुक्यासारखे वाटते.”

“तुम्ही मला पाहून शकता?”

“नाही, प्रिये; पण तुझे बोलणे ऐकू येते, तुझे असणे मला जाणवते हेच माझ्यासाठी खूप जास्त आहे.”

“तुम्ही रात्रीचे जेवण कधी करता?

“मी कधीही रात्रीचे जेवण घेत नाही.”

"पण आज संध्याकाळी तुम्ही जेवण करणार आहात. मला भूक लागली आहे आणि तुम्हाला पण लागली असणार याची मला खात्री आहे, फक्त तुम्ही विसरला असाल."

मी मेरीला सांगून खोली नीट आवरून घेतली. रात्रीच्या जेवणापर्यंत आणि नंतरही झोपायला जाईपर्यंत आम्ही गप्पा गोष्टी करत बसलो होतो. आम्ही एकमेकांच्या सहवासात पूर्णपणे रममाण झालो होतो. त्यांच्या चेहऱ्यावरचा हसू होते. आनंद चेहऱ्यावर उमटला होता. चेहऱ्यावरचे भाव मृदू झाले होते. जेवणानंतर त्यांनी, मी थॉर्नफिल्ड सोडून गेल्यानंतर मी काय काय केले आणि कशी काय गुजराण केली, याविषयी बरेच प्रश्न विचारले. मी त्यांची जेव्हढ्यास तेव्हढी उत्तरे दिली. फार जास्त खुलासा करत बसले नाही. मला फक्त त्यांना आनंदी ठेवायचे होते. थोडा वेळ जरी संभाषण थांबले असते तरी ते पुन्हा दु:खी झाले असते. मी खरोखरच पुन्हा परत आले आहे याविषयी त्यांची अजून संपूर्ण खात्री पटत नव्हती. गेले कित्येक महिने दु:खात हताशपणे घालवल्यानंतर त्यांना कशाचीच आशा वाटत नव्हती; अगदी थंडी वाऱ्याची, तहानभुकेची जाणीव अनेकदा होत नव्हती. हरवलेली दृष्टी परत मिळण्यापेक्षा, माझी गाठभेट व्हावी अशी आस यांच्या जीवाला लागून राहिली होती. जशी मी परत आले, तशी पुन्हा नाहीशी झाले तर पुन्हा शोधणे त्यांच्यासाठी अशक्य झाले असते.

त्यांना या अस्वस्थ मन:स्थितीतून बाहेर काढण्याचा एकच उपाय होता, तो म्हणजे त्यांचे लक्ष दुसरीकडे वळवायला हवे होते.

मी त्यांना कंगव्याने केस विंचरायला सांगितले. आणि त्यांच्या दिसण्यावरून काही चेष्टा केली.

"मी खूप कुरूप आहे, नाही का जेन?" त्यांनी विचारले.

"होय, सर, तुम्ही नेहमीच होता."

“तू इतके दिवस परक्या लोकांसोबत राहिलीस तरी बोलण्यातील दुष्टपणा अजून तसाच आहे. ते लोक पण तसेच असावेत.”

“तरीही मी खूपच चांगल्या लोकांबरोबर राहिले होते. तुमच्यापेक्षा शंभर पटीने चांगली माणसे होती. अतिशय उदात्त आणि उच्च विचारसरणी असणारी माणसे होती, ज्यांची तुम्ही कल्पना पण करू शकणार नाही.”

“नेमके कोण लोक होते?”

“तुम्ही अशी माझी उलटतपासणी करणार असाल तर मी एकही शब्द सांगणार नाही. त्यासाठी तुम्हाला उद्या सकाळची वाट पहावी लागेल.”

“तू अतिशय हट्टी आणि दुराग्रही आहेस. तरी पण एका गोष्टीचा खुलासा केलास तर बरे होईल, त्या घरात तुझ्या बरोबर फक्त स्त्रियाच होत्या ना?”

“सर मी आता झोपायला जाते, तीन दिवसांच्या प्रवासाने मी अगदी दमून गेले आहे. गुड नाईट,”असे म्हणून मी तेथून हसत हसत फळ काढला.

त्यांना दुःखातून बाहेर काढण्याचा एक चांगला मार्ग मला मिळाला. अशा प्रकारे थोडे चिडवून, डिवचून, थट्टा मस्करी करुन मला त्यांचा मुळ स्वभाव परत आणायचा होता.

दुसरे दिवशी सकाळी खूप लौकर ते उठून मेरीकडे माझी झोपायची व्यवस्था चांगली केली की नाही याची चौकशी करताना आढळले. नाष्टाच्या वेळी मी त्यांना पाहिले. एक उमदा, जिंदा दिल माणूस, शारीरिक दृष्ट्या असहाय्य झालेला पाहून, मला खूपच वाईट वाटले.

“आज चांगला दिवस आहे, सर,” मी म्हणाले, “पाऊस थांबला आहे आणि स्वच्छ सूर्यप्रकाश पडला आहे. तुम्ही माझ्याबरोबर लवकरच फिरायला येणार आहात.”

त्यांचा चेहरा एकदम उजळला. मला पाहून ते खूपच आनंदी झाल्याचे वाटत होते. नाष्टा झाल्यावर आम्ही दोघे घराबाहेर जंगलात फिरायला गेलो. आजुबाजुच्या निसर्गाचे वर्णन मी त्यांना ऐकवत होते. मी एक छान, चांगली सावली असलेली जागा शोधली; ते झाडाच्या खोडावर बसले आणि मी त्याच्या मांडीवर बसण्यास नकार दिला नाही. आम्हाला एकत्र बसण्यात आनंद वाटत होता. जवळच पायलट आनंदाने शेपूट हालवत बसला होता.

एका हाताने मला जवळ घेत अचानक रोचेस्टर मोठ्याने म्हणाले, "तू जेव्हा थॉर्नफिल्डमधून काहीही न सांगता सवरता निघून गेलीस तेव्हा माझी काय अवस्था झाली याची तुला कल्पनाही करता येणार नाही. जेव्हा तुझ्या खोलीची तपासणी केली तेव्हा तू सोबत काहीच घेऊन गेली नव्हतीस असे दिसले. मी दिलेला मोत्यांचा हार पण खोलीत सापडला. अश्या परिस्थितीत तू काय दिव्य केले असशील या कल्पनेने मला धडकी भरते, तरीसुद्धा मला तुझ्या तोंडून जाणून घ्यायचे आहे."

मी त्यांना वर्षभरातील सर्व घटना विशद केल्या. पोटाला अन्न, हाताला काम आणि डोक्यावर छप्पर शोधत तीन दिवस अन्नान दशेत दारोदार हिंडत होते, हे ऐकून त्यांना खूप दुःख झाले. त्यांनी मला सांगितले की मी थॉर्नफिल्ड सोडून जाण्यापूर्वी, त्यांना माझा हेतू कळवला असता तर त्यांनी काही जबरदस्तीने मला त्यांची रखेल होण्यास भाग पाडले नसते. ते कितीही निराश अथवा संतप्त झाले असले तरी त्यांनी माझ्यावर मनापासून प्रेम केले होते. मी असे देशोधडीला लागण्यापेक्षा, राजीखुशीने निरपेक्षपणे त्यांची अर्धी संपत्ती मला देण्याची त्यांची तयारी होती. मी जे सांगितले, त्यापेक्षा मला नक्कीच जास्त त्रास झाला असणार याची त्यांना खात्री होती. मला पण नव्याने त्यांनी या वर्षभरात काय काय सोसले यांची पूर्णपणे कल्पना आली. त्यांना थोडं हलके वाटावे म्हणून मी मूर हाऊस मधील सर्व घटनाक्रम सांगितला. तशा आडगावात मुलींसाठी उघडलेली शाळा, माझे

अज्ञात असलेले नातेवाईक, माझ्या काकांकडून वारसाहक्काने मिळालेली संपत्ती या साऱ्याची तपशीलवार माहिती दिली. हे सर्व सांगताना सेंट जॉन यांचे नाव सतत येत होते. त्यांच्या ते बरोबर लक्षात आले आणि खोदून खोदून त्यांनी त्यांची चौकशी केली. माझ्या वयाला साजेसा, दिसण्यात चांगला, चांगले घराणे, शिकला सवरलेला, चांगल्या वागणूकीचा आणि जवळच्या नात्यातील लग्नाळू तरुण मला भेटल्याचे समजल्यावर त्यांना माझ्या वरच्या प्रेमात एक वाटेकरी झाल्याचे वाटून त्यांच्या मनात इर्षा निर्माण झाली.

त्यांनी मला विचारले, "कदाचित तुला यापुढे माझ्या मांडीवर बसण्याची इच्छा नसेल, मिस आयर?"

मला हा प्रश्न अपेक्षित नव्हता.

"का बरे? तुम्हाला असे का वाटले?"

"नुकतेच तू तुमच्या आते भावाचे वर्णन केले आहे ते ऐकून माझ्या डोळयासमोर, उंच, देखण्या, निळे डोळे अशी अपोलो देवाची प्रतिमा आली आणि त्याला सोडून माझ्यासारख्या आंधळया आणि अपंग, वयस्कर आणि कुरुप माणसावर साधी दृष्टी टाकणे सुध्दा वेडेपणा होईल."

"मी कधीच तसा विचार केला नाही, सर; पण तुम्ही नक्कीच वर्णन केल्याप्रमाणे दिसताय हे खरे आहे."

"बरं! तुम्ही मला सोडून जाऊ शकतेस; पण जाण्यापूर्वी मला काही प्रश्नांची उत्तरे दिल्यास बरे होईल." असे म्हणून त्यांनी मला नेहमीपेक्षा घट्ट मिठीत घेतले.

"काय प्रश्न आहेत? विचारा सर."

"तुला शाळेत शिक्षिकेने काम तुमचे नाते समजण्यापुर्वी मिळाले होते?"

"होय."

"सेंट जॉन,तुला नेहमी भेटायला येत असत?

“होय”

“तुमचे नातेसंबंध उघड झाल्यानंतर तुम्ही त्यांच्या समवेत किती दिवस राहिलात?”

“पाच महिने.”

“तू मि. रिव्हर्स आणि त्यांच्या बहिणीबरोबर खेळीमेळीने रहात होतीस?”

“होय सर”

“तुम्ही नेमका वेळ कसा घालवत होतात?”

“आम्ही नवीन भाषा शिकत होतो.”

“कुठल्या नवीन भाषा?”

“सुरवातीला मी डायनाकडून जर्मन शिकले आणि नंतर मि. रिव्हर्सकडून कडून हिंदुस्थानी.”

हे ऐकल्यावर त्यांना काहीतरी खटकल्याचे जाणवले. आणि त्यांनी त्यांच्या बहिणींना पण हिंदुस्थानी भाषा येते काय विचारले. मी त्यांना, मि. रिव्हर्सनी फक्त मलाच हिंदुस्थानी शिकवण्याचा आग्रह कशासाठी केला होता याचे कारण सांगितले. त्यांनी मला मागणी घातली होती हे मी सांगितल्यावर, मी मुद्दाम त्यांना त्रास देण्यासाठी अशी गोष्ट रचून सांगत आहे असा आरोप केला. त्यावर मी, जे खरोखरच घडलेले आहे तेच सांगत आहे असे सांगितले. त्यांनी मला त्यांना सोडून निघून का जात नाही, यांचे कारण विचारले. मी इथे खूप आनंदात आहे असे उत्तर दिले.

“नाही, जेन, तू इथे आनंदात नाहीस, कारण तुझे हृदय माझ्याबरोबर नसून मि. रिव्हर्स कडे आहे.अरेरे! या क्षणापर्यंत माझा विश्वास होता की माझी छोटी जेन माझीच आहे. ती मला सोडून गेली तेव्हाही मला विश्वास होता की ती अजूनही माझ्यावर प्रेम करते. मी प्रचंड दु:खात होतो तरी हा विश्वास मला बळ देत होता.

आपण एकमेकांना दुरावलो असता मी बरेचदा रडलो देखील पण मला कधीच वाटले नाही की जेन दुसऱ्या कुणावर प्रेम करू शकते. पण आता दुःख करण्यात अर्थ नाही. जेन, मला सोडून दे आणि मि. रिव्हर्स बरोबर लग्न कर."

"सर तुम्ही जरी मला हाकलून दिलेत तरी मी तुम्हाला सोडून जाणार नाही."

"जेन, जेव्हा केव्हा मी तुझा आवाज ऐकतो, तेव्हा माझ्या आशा पल्लवित होतात. पण तो आता भूतकाळ झाला. आता तू नवीन बंध तयार केले आहेस; पण मी वेडा नाही. दूर जा, जेन, निघून जा."

"पण मी कुठे जाऊ, सर?"

"तू निवडलेल्या नवऱ्याकडे जा."

"तो कोण आहे?"

"तुला हे चांगले माहीत आहे, सेंट-जॉन रिव्हर्स."

"सर तो माझा नवरा नाही आणि कधीही होणार नाही. मी त्याला आवडत नाही आणि मलाही तो आवडत नाही. त्यांचे रोझमेंड ऑलिव्हरवर प्रेम आहे. पण त्याला माझ्याबरोबर लग्न करायचे आहे, कारण त्याला माझ्यामध्ये एका मिशनरीला योग्य अशी बायको दिसली. तो दिसायला खरेच चांगला आहे पण स्वभावाने थंड आणि गंभीर आहे. त्याला माझ्यात काडीमात्र रस नाही. मी फक्त त्यांच्या मिशनमध्ये उपयुक्त आणि गरजेची आहे म्हणून माझ्याशी लग्न करायचे होते. माझा जन्म सुखोपभोगासाठी नसून खडतर आयुष्य कंठण्यासाठीच आहे, अशी त्यांची धारणा आहे. . बरं! सर, मला सांगा खरचं मी तुम्हाला सोडून त्याच्याबरोबर जाऊ काय?"

भावनाविवश होऊन मला पुढे बोलता येईना, अंग कंप पावू लागले. रोचेस्टरनी मला आणखी जवळ ओढले आणि हसत हसत म्हणाले, "खरचं मि.रिव्हर्स आणि तुझ्यामध्ये काही नाही?"

"सर तुम्हाला मत्सर वाटण्याचे कारण नाही. मी तुमचे दुःख कमी करण्यासाठी तुम्हाला चिडवत होते. दुःखापेक्षा, तुमचा राग पत्करला. मी तुमच्यावर प्रेम करावे अशी जर तुमची अशी इच्छा असेल, तर मी तुमच्यावर किती प्रेम करते ते जाणून घ्या, समजून घ्या, तुम्हाला माझा अभिमान वाटेल आणि आनंद होईल. माझे संपूर्ण हृदय तुमच्या मालकीचे आहे. सर, आणि ते कायम तुमचेच राहील, जरी नशिबाने आपल्याला कायमचे वेगळे केले तरीही."

त्यांनी माझे पुन्हा चुंबन घेतले आणि परत दुःखी विचारात गढून गेले.

"अरेरे! माझी दृष्टी गेली, माझी शक्ती गेली!" दुःखी स्वरात पुटपुटलेले मला ऐकू आले.

त्यांच्या हृदयातील शल्य मी जाणून होते पण त्यांचे सांत्वन करण्याची माझ्यात हिंमत नव्हती. क्षणभर त्यांनी चेहरा बाजुला वळवला. बंद पापण्यातून गालावर अश्रू ओघळतांना मी पाहिले आणि माझे मन दुःखाने भरून आले.

थोड्यावेळाने ते भानावर आले आणि म्हणाले, "आता माझी, थॉर्नफिल्डमधल्या वीज पडून होरपळलेल्या, वादळात अर्ध्याहून अधिक मोडलेल्या, चेस्टनटच्या झाडासारखी अवस्था झाली आहे. अशा कलेवरास, लाल, पिवळ्या फुलांनी बहरलेली नाजुक वेल लपेटून घेण्याचा काय अधिकार आहे?"

"तुम्ही कलेवर किंवा वादळाने मोडकळीस आलेले झाड नाही आहात: तुम्ही अजून तरुण आणि जोमदार आहात. तुमच्या रूजलेल्या मुळांतून पुन्हा नव्याने झाडे वाढतील, तुमची इच्छा असो वा नसो. कारण तुमच्या समृद्ध सावलीत त्यांना आनंद मिळेल. जसे जसे ती मोठी होतील तस तशी ती तुमच्या बाजुला झुकतील कारण तुमची शक्ती त्यांचे रक्षण करेल."

ते थोडे हसले: माझ्या सांत्वनाचा थोडा फार परिणाम झाला होता.

"तू मित्र म्हणून बोलत आहेस, जेन?" त्यांनी मला विचारले.

“हो,” मी संकोचून उत्तर दिले. खरेतर मला मित्रापेक्षा जास्त काहीतरी म्हणायचे होते पण नेमके काय म्हणायचे ते समजेना. तेव्हढ्यात तेच माझ्या मदतीला आले.

“पण, जेन,” ते मला म्हणाले, “मला तर बायको हवी आहे.”

“सर हे खरे आहे?”

“तुला ही बातमी खोटी वाटली?”

“अर्थात: तुम्ही त्याबद्दल आधी काहीच बोलला नव्हतात.”

“ही वाईट बातमी आहे का?”

“हे परिस्थितीवर अवलंबून आहे, सर - आणि तुमच्या निवडीवर.”

“जेन, तू मला मदत कर. मी तुझ्या निर्णयाचे पालन करीन.”

“मग, सर, अशी व्यक्ती निवडा जी तुमच्यावर सर्वात जास्त प्रेम करते.”

“मी किमान अशी निवडेन - जी मला सर्वात जास्त आवडते. जेन, तू माझ्याशी लग्न करशील का?”

“होय सर.”

“एक अपंग माणूस, तुझ्यापेक्षा वीस वर्षांनी
मोठा, त्याची सर्वोतोपरी काळजी घ्यावी लागेल”

“होय सर”

“हे खरे आहे, जेन?

“खरंच खरे आहे सर.”

“देव तुझे कल्याण करेल.”

“मिस्टर रॉचेस्टर, जर मी माझ्या आयुष्यात काही चांगले काम, काही चांगला विचार, कधी प्रामाणिकपणे शुध्द मनाने प्रार्थना अथवा काही उदात्त इच्छा

मनात आणली असेल तर ते माझे इप्सित साध्य झाले आहे. माझ्यासाठी, तुमची पत्नी बनणे म्हणजे भाग्याची गोष्ट आहे.”

“कारण तुला त्याग करायला आवडते.”

“त्याग? कसला त्याग? दुष्काळात अन्नपाण्याचा की अपेक्षांची पूर्तता न झाल्याने अपेक्षा त्यागण्याचा? जे माझे सर्वस्व आहेत, त्यांच्यावर प्रेम करण्याला, आनंदाने संसार करण्याला जर कोणी त्याग म्हणत असेल तर असा त्याग मी हसत हसत करायला तयार आहे.”

“जेन आता मी दुबळा बनलो आहे, माझ्यातील उणीवा तुला सतत जाणवत राहतील.”

“सर, माझ्यासाठी ते काहीच नाही. मी आता तुमच्यावर अधिक प्रेम करायला लागले आहे, मला तुम्हाला खरोखर काही मदत करता आली तर ती एक चांगली गोष्ट होईल. या पुर्वी तुम्ही जेव्हा स्वतः दात्याच्या आणि संरक्षकाच्या भुमिकेत होता, तेव्हा तुम्हाला दुसऱ्याची मदत स्विकारण्याची कल्पना देखील तिरस्करणीय वाटत होती.”

“आतापर्यंत मला दुसऱ्यावर अवलंबून राहणे खरच तिरस्करणीय वाटत होते. मग ते नोकर असोत वा इतर कोणी. मला कुणी अंगाला हात लावलेला आवडत नसे, सदैव नोकरांच्या नजरेखाली असण्यापेक्षा मी एकांतवास स्वीकारला होता. आता मात्र जेनची गोड सेवा हा कायमचा आनंद असेल. मला जेन आवडते; पण मी तुला आवडतो का?”

“अरे! होय, सर, पूर्णपणे.”

“मग, आता जगातील कोणतीही गोष्ट आपल्याला प्रतीक्षा करण्यास भाग पाडू शकत नाही; आपल्याला लगेच लग्न करावे लागेल.”

a

त्यांच्या शब्दात, स्वरात उत्कटता होती. जुना उतावळेपणा परत आला होता.

“जेन चर्च कडून लग्नाचा परवाना मिळाल्या मिळाल्या लगेचच लग्न करूया”

“मिस्टर रोचेस्टर, संध्याकाळ होत आली आहे, सूर्य मावळत आहे. पायलट डिनरसाठी आधीच रवाना झाला आहे; मला तुमच्या घड्याळात वेळ पाहू दे.”

“ते आता तुझ्याकडेच ठेव. मला आता त्याची गरज नाही.”

“सर, तुम्हाला भूक लागली नाही का?”

“तीन दिवसात, जेन, आपल्याला लग्न करायचे आहे. दागिने आणि सुंदर कपडे नसल्याने काही फरक पडत नाही.”

“जेन, तुला माहीत आहे का की तुझा लहान मोत्यांचा हार सध्या माझ्या टायखाली, माझ्या गळ्यात बांधलेला आहे? माझा एकमात्र खजिना हरवला, त्या दिवसापासून मी तो तुझी आठवण म्हणून ठेवला आहे.”

रोचेस्टर आपल्याच नादात बोलत राहिले:

“जेन तू मला नास्तिक म्हणून समजत होतीस पण आज माझे हृदय परमेश्वराची अगाध लीला पाहून, कृतज्ञतेने भरून आले आहे. त्याची दृष्टी व्यापक आहे, तो अत्यंत सूज्ञपणे न्याय करतो. मी चुक केली: त्यांने मला एक निष्पाप फुल दिले होते, माझ्याकडून मर्यादा भंग झाला आणि ते फुल कोमेजून गेले. त्यांची शिक्षा मला मिळाली, देवाने ते फुल माझ्या पासून हिसकावून घेतले. परमेश्वराच्या इच्छेपुढे मान तुकवण्याऐवजी मी ती धुडकावून लावली. देवाचा न्याय झाला होता. एकामागून एक संकटाची मालिका जणू माझ्यावर कोसळली: मृत्यूची अगदी पाठ शिवून आलो. त्यांच्या शिक्षेचा आसूड एकदा उगारला गेला की भल्याभल्यांची वाट लागते, एका फटक्यात मला कायमचे नम्र बनवले. तुला माहीत आहे की मला माझ्या शक्ती

सामर्थ्याचा किती अभिमान होता; आता माझी अवस्था एखाद्या लहान मुलाप्रमाणे झाली आहे, पूर्णपणे परस्वाधीन. देवच माझी परिक्षा घेत आहे याची मला खात्री झाली. एकदा परमेश्वराला शरण जावे असे मनापासून वाटू लागले. मी कधी कधी प्रार्थना करू लागलो. माझी प्रार्थना लहान असायची पण मनाच्या तळापासून कळकळीने केलेली असायची.''

''चार दिवसांपूर्वी, सोमवारची रात्र होती. मी अगदी विमनस्क स्थितीत होतो. दु:खाचे कारण म्हणजे, बराच शोध घेऊनही तुझी काहीच खबरबात न समजल्याने मी तू जिवंत असण्याची आशा सोडून दिली होती. मध्यरात्री अकरा बाराच्या दरम्यान, झोपायला जाण्यापूर्वी मी देवाला कळकळीची विनवणी केली, ज्या जगात जेन नाही, त्या जगातून मला कायमचे घेऊन जावे, निदान मृत्यूनंतर तरी जेन मला भेटू शकेल एव्हढीच आशा मनात उरली होती.''

''मी माझ्या खोलीत खिडकी उघडून बसलो होतो. आकाशात चंद्र शांत प्रकाश देत होता. चांदण्या काही दिसल्या नाहीत.

एक अस्पष्ट विरळ ढग चंद्रा सोबत होता आणि त्याच्या प्रकाशात उठून दिसत होता. माझे शरीर, माझे मन आणि माझा अंतरात्मा तुझ्यासाठी आक्रंदन होता. मी अत्यंत नम्रपणे पण व्यथित अंतःकरणाने देवाला कळकळीची विनवणी केली. माझ्या एकाकी आयुष्यात माझी चाललेली छळवणूक आणि सोसाव्या लागणाऱ्या यातनांचा अजून संपणार नसतील तर पुन्हा एकदा आनंद आणि शांती लौकर मिळणे अवघड आहे. माझा धीर आता संपत आला आहे. मी कबूल करतो की मी जे सोसत आहे, त्या शिक्षेसाठी मी पात्र आहे. पण माझे शरीर, माझे मन, माझा आत्मा या सर्वातून सुटका मिळवण्यासाठी आतूर झाला आहे, माझी सहनशक्ती आता संपली आहे. मला हे यातनामय जीवन नकोसे झाले आहे. माझे हृदयातील आशा आकांक्षा एकाएकी बंड करून उठल्या आणि त्यांनी तुला साद घातली---

“जेन! जेन! जेन!”

“तुम्ही हे शब्द मोठ्याने बोललात काय?

“होय, जेन; आणि जर कोणी माझी हाक ऐकली असती, तर त्याने मला वेडा समजले असते, कारण ती हाक अमानवी शक्तीने भारलेली होती.”

“तुम्ही म्हणता की तो या आठवड्यातला सोमवार होता आणि वेळ मध्यरात्रीची होती?”

“होय; पण तो कोणता दिवस आहे हे महत्त्वाचे नाही. पुढे ऐक, एक विचित्र गोष्ट या पुढे घडली: तुला वाटेल की मी अंधश्रद्धाळू आहे, तशी माझ्या रक्तात नेहमीच थोडी अंधश्रद्धा होती. पण तुला मी जे सांगणार आहे ते नक्कीच खरे आहे; ज्या क्षणी मी हाक मारली त्याला उत्तरा दाखल एक आवाज आला, कोठून, कसा ते मला ठाऊक नाही पण कुणाचा ते मी जाणतो: “मी येत आहे! येत आहे मी! थांब माझ्यासाठी थांब!”

आणि काही क्षणानंतर, वाऱ्यावर कुजबुज ऐकू आली- ‘तू कुठे आहेस?'

“या शब्दाचा नेमका माझ्या मनावर काय परिणाम झाला हे मला सांगता आले तर मी सांगायचा प्रयत्न करेन, पण ते सांगणे अवघड आहे. फर्न्डियन मनोर घनदाट जंगलात लपलेले आहे, तिथे आवाज मंद ऐकू येतो आणि आवाज घुमत नाही. ‘तू कुठे आहेस?' हे शब्द मला डोंगराच्या दिशेने आल्याचे जाणवले आणि त्याच्या प्रतिध्वनी पण ऐकायला आला. ताज्या गार वाऱ्याची झुळूक कपाळावरचे केस उडवून गेली; असे वाटले की माझी जेन नुकतीच या जंगलात येऊन मला भेटून बोलून गेली आणि माझा खरोखर विश्वास आहे की आपल्या आत्म्यांची भेट घडली असावी यात काही शंका नाही. जेन त्यावेळी तू गाढ निद्रेत होती असणार, तुला त्याची जाणीवही झाली नसेल, पण तुझ्या आत्म्याने माझ्या हाकेला प्रतिसाद दिला होता. माझी खात्री आहे तो तुझाच आवाज होता जो माझे सांत्वन करण्यासाठी, मला

धीर देण्यासाठी एव्हढ्या दूरवरून मला शोधत आला होता. तुला स्वतःला या जागेच्या नांवाव्यतिरिक्त काहीच माहिती नव्हती.”

सोमवारी मध्यरात्री मला रोचेस्टरांची आर्त हाक ऐकू आली होती आणि माझ्या अंत:करणारा भिडली होती. मी पण नेमके तेच उत्तर दिले होते, जे रोचेस्टरनी आता सांगितले. मला सर्व गोष्टींचे आश्र्चर्य वाटले पण मी मला आलेल्या अनुभवांचा उल्लेख मुद्दामच टाळला. जर मी सांगितले असते, तर त्यांच्या मनाची अगोदरच नाजुक अवस्था झाली असतांना त्या गोष्टीचा खोलवर ठसा उमटला असता आणि मला ते नको होते. मी माझा अनुभव माझ्या मनातच ठेवला.

रोचेस्टर पुढे म्हणाले, “आता तुझ्या लक्षात आले असेल की काल रात्री तुझा आवाज ऐकल्यावर मी का गोंधळून गेलो होतो. सोमवारी रात्रीप्रमाणे तुझा नुसता आवाज ऐकू आला असावा असे मला वाटले. पण आता तुला प्रत्यक्ष पाहिल्यानंतर मी देवाचे अंत:करणापासून आभार मानत आहे.”

मी उठून उभी राहिले. त्यांनी कपाळावरची हॅट काढून हातात घेतली. कमरेत वाकून नजर जमिनीवर रोखली आणि परमेश्वराची प्रार्थना केली.

“मी परमेश्वराचे आभार मानतो, माझ्या बाबतीत न्याय करतांना त्याने माझ्यावर दया बुद्धी दाखवली. मी माझ्या तारणकर्त्याला नम्रपणे विनंती करतो की भविष्यात आतापर्यंत मी ज्याप्रकारे जीवन व्यतीत केले, त्यापेक्षा अधिक शुद्ध जीवन जगण्यासाठी आवश्यक शक्ती मला द्यावी.”

मग त्यांनी पुढे जाण्यासाठी हात पुढे केला. मी तो हात हातात घेतला, क्षणभर माझ्या ओठांवर धरला, त्यांनी माझा खांदा चाचपून पाहिला आणि आधारासाठी आपला हात त्यावर ठेवला: मी त्यांच्या पेक्षा उंचीने कमी असल्याने आधार देण्याचे आणि वाटाड्याचे काम आनंदाने करण्यासाठी पुढे झाले. घराकडे जाण्यासाठी आम्ही जंगलातून वाट काढत निघालो.

# प्रकरण 38 - निष्कर्ष

वाचकहो मी त्यांच्याबरोबर लग्न केले. काहीही गाजावाजा न होता लग्न पार पडले: रोचेस्टर, मी, पाद्री आणि तेथील कारकून एव्हढीच लोक उपस्थित होतो. जेव्हा आम्ही चर्चमधून परतलो, तेव्हा मी किचनमध्ये गेले, मेरी जेवण बनवत होती, जवळच जॉन चाकूला धार लावत होता. मी म्हणाले, “मेरी आज सकाळी मी, मि.रोचेस्टरांबरोबर लग्न केले.” दोघेही नवरा बायको अगदी विश्र्वासू नोकर होते.

मेरीने माझ्या कडे रोखून पाहिले: क्षणभरासाठी तिच्या हातातील काम थांबवले आणि शांतपणे म्हणाली, “तुम्ही लग्न केलेत? खरचं खूप छान झाले. सकाळी मी तुम्हाला मालकांबरोबर बाहेर जाताना पाहिले पण मला माहित नव्हते की तुम्ही चर्चमध्ये लग्न करायला जात आहात.” आणि तिने परत आपले काम सुरू केले.

जॉन आ वासून पाहत होता. तो म्हणाला, “मी मेरीला असे होईल म्हणून अगोदरच सांगितले होते. मला माहित होते की मिस्टर एडवर्ड असेच करतील, तो फार काळ थांबणार नाही; मला खात्री आहे की त्याने चांगले केले आहे.” जॉन रोचेस्टरांच्या लहानपणापासून घरी काम करत असल्याने त्यांना नावाने बोलावत असे.

“धन्यवाद, जॉन,” मी आभार मानले, “मिस्टर रोचेस्टरनी मला हे तुला आणि मेरीला देण्यास सांगितले आहे.” असे म्हणून मी त्याला पाच पौंडांची नोट दिली. आणि तेथून निघाले.

जाता जाता त्या दोघांमधील बोलणे कानावर पडले. “ती त्याची इतर कोणत्याही स्त्रीपेक्षा जास्त चांगली काळजी घेईल. जरी ती खूप सुंदर नसली तरी ती

स्वभावाने खूप चांगली आहे. ती कशातही कमी नाही. आणि मुख्य म्हणजे त्याला ती सुंदर वाटते. मग आणखी काय पाहिजे?"

लगेच मी, डायना आणि मेरीला लग्नाची बातमी कळवली. त्यांचे अभिनंदनाचे पत्र आले. त्यांना माझा निर्णय योग्य वाटला हे त्यांनी आवर्जून कळवले. डायनाने मला सांगितले की ती आमचा हनीमून झाल्यावर मला भेटायला येईल. जेव्हा रोचेस्टरना मी पत्र वाचून दाखवले तेव्हा ते म्हणाले, "जेन तुझ्या बहिणीने इतके दिवस थांबणे चांगले नाही, कारण आपला हनीमून आयुष्यभरासाठी असणार आहे. त्या चंद्राचे किरण आपल्यापैकी एकाच्या थडग्यावर गेल्यावरच मावळतील."

सेंट-जॉनला या बातमीमुळे नक्की काय वाटले हे मला समजले नाही. मी त्यांना लिहिलेल्या पत्राला त्यांचे उत्तर आले नाही. सहा महिन्यांनंतर त्यांनी मला पत्र लिहिले, पण त्यात रोचेस्टरांचे नाव अथवा आमच्या लग्नाचा उल्लेख नव्हता. त्यानंतर अधूनमधून आमचा पत्र व्यवहार सुरू आहे. ते आशा करतात की मी आनंदी आहे, आणि त्यांचा असा विश्वास आहे की मी फक्त भौतिक सुखात सुख रममाण नसून परमेश्वरावर विश्र्वास ठेवून आहे.

आता आमच्या छोट्या ॲडेलबद्दल सांगायलाच हवे. रोचेस्टरांच्या परवानगीने मी तिला बोर्डिंग हाऊसमध्ये जाऊन भेटले. मला पाहून ती आनंदीत झाली. पण थोडी फिकट आणि बारीक वाटत होती. ती तिथे खुश नव्हती. मला तिकडचे नियम खूप कठोर आणि तिच्या वयाच्या मुलीसाठी पण अभ्यास जास्त वाटला. मी तिला माझ्यासोबत घेऊन आले. मला पुन्हा तिची शिक्षका व्हायचे होते; पण मी लवकरच पाहिले की ते अशक्य आहे: मला माझा वेळ माझ्या नवऱ्याला देणे गरजेचे होते. माझ्या पतीला त्याची नितांत गरज होती. मी एक चांगले बोर्डिंग हाऊस शोधले, जे अगदी जवळ होते, मला तिला भेटायला जाणे किंवा तिला घरी

आणणे सोईचे होते. तिच्या खाण्यापिण्याची आबाळ होणार नाही, आरोग्याची काळजी घेतली जाईल याची खात्री करून घेतली.

तिला लवकरच तिच्या नवीन घराची सवय झाली, ती पुन्हा आनंदी झाली आणि तिची अभ्यासात वेगाने प्रगती झाली. इंग्रजी शिक्षणामुळे तिच्या फ्रेंच स्वभावातील दोष नाहीसे झाले. जेव्हा तिचे शिक्षण पुर्ण झाले तेव्हा ती सुस्वभावी, नम्र, तत्वनिष्ठ आणि आनंदी व्यक्ती बनली. मी तिची घेतलेली काळजी तिच्यावर केलेले प्रेम आता ती मला सव्याज परत करत आहे. मला तिचा अभिमान वाटतो.

माझी कथा संपण्याच्या जवळ आली आहे. एक स्त्री म्हणून माझ्या आयुष्यात ज्यांची नावे इथे वारंवार आली आहेत त्यांच्या आयुष्यातील महत्त्वाच्या घटनावर आणखी काही शब्द सांगून मग मी पूर्ण करेन.

माझ्या लग्नाला आता दहा वर्षे झाली आहेत. जगात आपले ज्यांच्यावर प्रेम असते त्यांच्यासाठी आणि त्यांच्याबरोबर जगणे म्हणजे काय असते ते मला कळले आहे. मी स्वतःला इतकी भाग्यशाली समजते, की मी ते शब्दात मांडू शकत नाही. माझ्या पतीच्या आयुष्यात मी पुर्णपणे सामावून गेले आहे तसेच ते माझ्या आयुष्यात सामावले आहेत. माझी खात्री आहे की कोणतीही स्त्री आपल्या पतीच्या इतकी जवळ नसेल जितकी की मी आहे. मला कधीही त्यांच्या सानिध्यात थकवा जाणवला नाही तसेच तेही

माझ्याबरोबर असताना कधी कंटाळले नाहीत. आमच्या हृदयांचे ठोके पण एक सारखे पडत असावेत. मला वाटते की आम्ही दिवसभर बोलत असतो: आमचे बोलणे म्हणजे एकमेकांचे विचार ऐकणे आणि प्रत्यक्षात आचरणात उतरवणे असे असते. मी त्यांच्यावर पुर्णपणे विश्र्वास टाकला आहे आणि त्यांनी त्यांचा विश्र्वास मला समर्पित केला आहे: आमचे स्वभाव एकमेकांशी तंतोतंत जुळतात. परिणामत: आमचा संसार एक सुरेल वाद्यांचा मेळ जमल्याप्रमाणे परिपूर्ण झाला आहे.

आमच्या लग्नाला दोन वर्षे पूर्ण होईतो मि. रोचेस्टरांची दृष्टी परत आली नव्हती.

कदाचित यामुळेच आम्ही इतके जवळ आलो असू आणि आमचे मिलन इतके घनिष्ट झाले असेल. त्यावेळी मी त्यांची दृष्टी बनून राहिले होते, आता अजूनही मी त्यांचा उजवा हात आहेच. मी त्यांची सर्वात आवडती व्यक्ती असून त्याचा त्यांना अभिमान आहे. माझ्याकडून त्यांनी आजुबाजुचा परिसर जाणून घेतला, पुस्तके ऐकली, सभोवतालची शेते, नद्या, शहरे, झाडे, ढग आणि सूर्यकिरण, हवामान यांचे वर्णन करतांना मी कंटाळले नाही. जे त्यांच्या डोळ्याला दिसत नव्हते ते मी शब्दांद्वारे कानापर्यंत पोहोचत होते.

त्यांना वाचून दाखवण्यात कधी कंटाळले नाही की त्यांना हवे तिकडे घेऊन जाण्यात कुचराई केली नाही: त्यांची जी काही इच्छा असेल ती पूर्ण करणे हे मी माझे कर्तव्य समजून करत राहिले: या गोष्टी माझ्याकडून करवून घेतांना रोचेस्टर, अपमानीत झाल्याचे वाटून नाउमेद झाले नाहीत किंवा लाज वाटून दु:खी झाले नाहीत उलट माझी परिपूर्ण आणि उत्कृष्ट सेवा आनंदाने हसत खेळत स्विकारली.

ते माझ्यावर प्रांजळपणे प्रेम करत त्यामुळे माझ्या सेवेचा लाभ घेण्यात त्यांना अजिबात संकोच वाटून घेत नसे: किंवा माझ्या प्रेमात इतकी आत्मीयता होती की त्यांना माझ्याकडून देखभाल करवून घेणे म्हणजे माझी इच्छापूर्ती केल्याचे, त्यांना समाधान मिळाले असावे.

आमच्या लग्नाला दोन वर्षे झाली होती; एके दिवशी सकाळी जेव्हा मी त्यांच्या सांगण्यावरून पत्र लिहीत होते, तेव्हा ते जवळ आले, माझ्याकडे झुकून म्हणाले: “जेन, तुझ्या गळयात काही चमकदार आहे का?”

माझ्याकडे सोन्याची साखळी होती; मी त्यांना हो म्हणाले.

“आज तू फिकट निळा ड्रेस घातला काय?”

a

मी खरोखरच निळा ड्रेस घातला होता. मग त्यांनी मला सांगितले की अलीकडे एका डोळ्यापुढील अंधार थोडा कमी गडद होत आहे.

आम्ही लंडनला गेलो. तिथे एका प्रख्यात नेत्रतज्ज्ञाचा सल्ला घेतला आणि शेवटी त्यांच्या एका डोळयाला पुन्हा दृष्टी मिळाली. अजूनही त्यांना खूप स्पष्टपणे दिसत नाही: ते फार काळ वाचू किंवा लिहू शकत नाहीत; पण ते कुणाचाही आधार न घेता हिंडू फिरू शकतात. जेव्हा आमचा पहिला मुलगा त्यांच्या हातात दिला तेव्हा त्यांनी बाळाचे डोळे त्यांच्याप्रमाणेच मोठे काळेभोर आणि तेजस्वी असल्याचे सांगितले. शिक्षा देताना सुध्दा देव दयाळू आहे हे पुन्हा अधोरेखित झाले. आम्ही दोघे या साठी परमेश्वराचे अत्यंत ऋणी आहोत.

मी आणि एडवर्ड आनंदी आहोत: आणि आम्ही ज्या लोकांवर प्रेम करतो तेही सारखेच आनंदात आहेत. डायना आणि मेरी रिव्हर्स, दोघींचे लग्न झाले. दोघीही दरवर्षी आमच्याकडे भेटायला येतात किंवा आम्ही त्यांच्याकडे जातो. डायनाचा नवरा सागरी कप्तान आहे; तो एक शूर अधिकारी आणि उत्कृष्ट माणूस आहे. मेरीने चर्चमधील पाद्री बरोबर लग्न केले. तो तिच्या भावाचा, कॉलेजमधील तत्वनिष्ठ आणि सदाचारी मित्र आहे. कॅप्टन फ्रिट्झजेम्स आणि मिस्टर वॉर्थन त्यांच्या पत्नीवर मनापासून प्रेम करतात. मेरी आणि डायना आपापल्या संसारात पूर्णपणे सुखी, समाधानी आहेत.

सेंट जॉनविषयी सांगायचे झाल्यास त्यांनी ठरविल्याप्रमाणे हिंदुस्थानात जाण्यासाठी लंडन सोडले आणि त्यांनी स्विकारलेल्या कार्याचा पाठपुरावा करत आहेत. दृढनिश्चय आणि कठोर परिश्रमाने त्यांच्या मार्गात येणाऱ्या प्रत्येक अडचणींवर मात करत पुढे जात आहेत. त्यांच्या कार्याशी ते

एकनिष्ठ आहेत. खंबीरपणे, पूर्ण ताकदीनिशी, श्रध्देने आणि समर्पित भावनेने ते त्यांनी स्वतःला मिशनमध्ये झोकून दिले आहे. त्यांच्या मार्गात येणाऱ्या प्रत्येक

a

धार्मिक आणि सामाजिक पुर्वग्रहांना तोडून एका महत्वाकांक्षी योद्ध्यासारखी वाटचाल सुरू आहे. त्या वाटेवरचा उदात्त आत्मा, एक यात्रेकरू बनून सर्वसंग परित्याग करून जीवन व्यतीत करत आहेत. त्यांची कृती ही प्रेषिताची कृती आहे, त्यांची भाषा ही ख्रिस्ताची भाषा आहे: “ज्याला माझे व्हायचे आहे त्याने स्वतःचा वधस्तंभ उचलावा. आणि माझे अनुसरण करावे.”

परमेश्वराच्या सिंहासनासमोर सर्व पापांपासून मुक्त झालेल्या आणि देवाने निवडलेल्या, विश्र्वासू लोकांच्यामध्ये पुढच्या श्रेणीत स्थान मिळवणे, ही त्यांची महत्त्वाकांक्षा आहे.

सेंट जॉन अविवाहित आहेत आणि या पुढेही लग्न करणार नाहीत. आतापर्यंत त्यांनी एकट्याने काम पुढे नेले आहे: पण आता हा तेजस्वी सूर्य

मावळण्याच्याजवळ आला आहे. त्यांचे शेवटचे पत्र वाचून डोळयात पाणी आले, परंतु हृदय दैवी आनंदाने भरून आले: त्यांना त्यांच्या पुरस्काराची: अविनाशी मुकुटाची आस आहे. मला कल्पना आहे कदाचित पुढील पत्र एखाद्या परक्या माणसाने लिहलेले असेल जे मला सांगेल की परमेश्वराने त्याच्या चांगल्या आणि विश्वासू सेवकाला शेवटी आपल्यापाशी बोलावून घेतले आहे. यासाठी का बरे शोक करायचा? सेंट जॉन मृत्यूच्या शेवटच्या घटकेला भीतीने डगमगून जाणारे नाहीत. त्यांच्या मनात आशंका असणार नाही, हृदय निर्भय असेल, त्यांची आशा निश्चित असेल, त्यांचा विश्वास दृढ असेल. त्यांचे स्वतःचे शब्द याची साक्ष आहेत.

“माझ्या प्रभुने मला सावध केले आहे. रोज मला अधिकाधिक स्पष्टपणे सांगत आहे,--'खात्रीने मी लौकरच येईन;' आणि प्रत्येक क्षणी मी त्याला अधिक उत्साहाने प्रतिसाद देतो: “आमेन; ये, प्रभु येशू ये!”

----- समाप्त ----